THE LIBRARY OF CONGRESS
1800

7

MAY -- 1.
COPY 1978

78-911532

A

COMPLETE COLLECTION

OF THE

POEMS OF TUKÁRÁMA,

(THE POET OF THE MAHÁRÁSHTRA.)

EDITED BY

VISHṆU PARASHURÁM SHÁSTRÍ PANDIT,

UNDER THE SUPERVISION OF

ŚANKAR PÁNDURANG PANDIT, M. A.,

LATE SECRETARY OF THE DAKSHINÁ PRIZE COMMITTEE;
NOW DISTRICT DEPUTY COLLECTOR AND MAGISTRATE, KHANDESH.

IN TWO VOLUMES,

Vol. II.

WITH A COMPLETE INDEX TO THE POEMS AND A GLOSSARY
OF DIFFICULT WORDS.

PRINTED AND PUBLISHED,

Under the patronage of the Bombay Government,

BY

THE PROPRIETORS OF THE INDU PRAKÁSH PRESS.

BOMBAY:
1873.

Bombay:

PRINTED AT THE "INDU-PRAKASH" PRESS.

(Registered under Act XXV. of 1867.)

Tukārāma.

तुकारामबावाच्या अभंगांची गाथा

विष्णु परशुराम शास्त्री पंडित

यांनीं

शंकर पांडुरंग पंडित, एम. ए.

"दक्षिणप्रैज" कमिटीचे चिटणीस

यांच्या साह्यानें

शुद्ध करून

छापण्याकरितां तयार केली.

ती

दोन भागांत छापून प्रसिद्ध केली.

V. 2

भाग २ रा.

(यांत पहिल्या भागांत छापलेल्या अभंगांपुढील राहिलेले अभंग, सर्व अभंगांची अनुक्रमणिका व कठिण शब्दांचा कोश हीं आहेत.)

मुंबईत

इंदुप्रकाशाच्या मालकांनीं

नामदार मुंबई सरकारच्या आश्रयानें

छापून प्रसिद्ध केली.

1873

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें हक्क ठेवला आहे.)

शके १७९५ श्रीमुखनामसंवत्सरे.

सन १८७३ इसवी.

PK2418
T8A126
1869
vol.2
Orien
Mar

मुंबईत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

तुकारामाचे अभंग.

भाग २ रा.

॥ २२४८ ॥

बरें आह्मां कळों आलें देवपण। आतां गुज कोण राखे तुझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मारिलें कां मज सांग आजिवरी। आतां सरोबरी तुज मज ॥ध्रु॥
जें आह्मी बोलों तें आहे तुझ्या अंगीं। देईन प्रसंगीं आजि शिव्या ॥ २ ॥
निलाजिरा तुज नाहीं याति कुळ। चोरटा शिंदळ ठावा जना ॥ ३ ॥
खासी धोंडे माती जीव जंत झाडें। एकलें उघडें परदेसी ॥ ४ ॥
गाढव कुतरा ऐसा मज ठावा। बईल तूं देवा भारवाही ॥ ५ ॥
लंटिका तूं मागें बहुतांसी ठावा। आलें अनुभवा माझ्या तें ही ॥ ६ ॥
तुका ह्मणे मज खवळिलें भांडा। आतां धीर तोंडा न धरवे ॥ ७ ॥

॥ २२४९ ॥

आह्मी भांडों तुजसवें। वर्मीं धरूं जालें ठावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होसी सरड बेडुक। वांघ गांढ्या ही पाईक ॥ ध्रु ॥
बळ करी तया भ्यावें। पळों लागे तया घ्यावें ॥ २ ॥
तुका ह्मणे दूर परता। नर नारी ना तूं भूता ॥ ३ ॥

॥ २२५० ॥

काय साहतोसी फुका। माझा बुडविला रुका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रीण घराचें पांगिलें। तें न सुटे कांहीं क्रेलें ॥ ध्रु॥

---

१ दे. लडिका.—२ दे. त. वाग.

दैवांचिया मतें । आधीं खरें केलें होतें ॥ २ ॥
तुका ह्मणे यावरी । आतां भीड कोण धरी ॥ ३ ॥

॥ २२५१ ॥

प्रीतीचा कळहे[1] पदरासी घाली पीळ ।
सरों नेदी बाळ मागें पुढें पित्यासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय लागे त्यासी बळ हेडाधितां कोण काळ ।
गोवितें सबळ जोळीं[2] स्नेहसूत्राचीं ॥ ध्रु ॥
सलगी दिला लाड बोले[3] तें तें वाटे गोड ।
करी बुझावोनि कोड हातीं देऊनि भातुकें ॥ २ ॥
तुका ह्मणे बोल कोणा हें कां नेणां नारायणा ।
सलगीच्या वचना कैचें उपजे विषम ॥ ३ ॥

॥ २२५२ ॥ ॥ ४ ॥

भार देखोनि वैष्णवांचे । दूत पळाले यमाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आले आले वैष्णववीर । काळ कांपती असुर ॥ ध्रु ॥
गरुडटकयाच्या[4] भारें । भूमी गर्जे जयजयकारें[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे काळ । पळे देखोनियां बळ ॥ ३ ॥

॥ २२५३ ॥ ॥ १ ॥

रंगीं रंगें रे[6] श्रीरंगे । काय भुललासी पतंगें[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शरीर जायांचें ठेवणें । धरिसी अभिळास[8] झणें ॥ ध्रु ॥
नव्हे तुझा हा परिवार । द्रव्य दारा क्षणभंगुर ॥ २ ॥

१पं. कळह.—२पं जाली.—३पं. बोले तैसें वाटे०.—४ दे. गरुडडकयांच्या. पं. गरुडटक्याच्या.—५दे.त. जेजेकारें.—६ पं. रंगा रंगारे श्रीरंगा। काय भुललासी पतंगा ॥—७ त. वो.—८ पं. अभिळाश.

अंतकाळींचा सोइरा । तुका ह्मणे विठो धरा ॥ ३ ॥

॥ २२५४ ॥ ॥ १ ॥

जन्मा येउनि काय केलें । तुवां मुदल गमाविलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे न फिरसी माघारा । अझुनि तरी फजितखोरा ॥ ध्रु ॥
केली गांठोळीची नासी । पुढें भीकें[1] चि मागसी ॥ २ ॥
तुका ह्मणे ठाया । जाईं आपल्या आलिया ॥ ३ ॥

॥ २२५५ ॥ ॥ १ ॥

पंढरीस जाते निरोप आइका । वैकुंठनायका क्षेम[2] सांगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनाथांचा नाथ हें तुझें वचन । धांवें नको दीन गांजों देऊं ॥ ध्रु ॥
ग्रासिलें भुजंगें सर्पें महाकाळें । न दिसे हें जाळें उगवतां ॥ २ ॥
कामक्रोधसुनीं श्वापदीं[3] बहुतीं । वेढलों आवर्तीं[4] मायेचिये ॥ ३ ॥
मृगजलनदी बुडविना तरी । आणूनियां वरी तळा नेते ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुवां धरिलें उदास । तरि पाहों वास कवणाची ॥ ५ ॥

॥ २२५६ ॥

कृपाळू सज्जन तुह्मी संतजन । हें चि कृपादान तुमचें मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आठवण तुह्मां द्यावी पांडुरंगा । कींव माझी सांगा काकुलती ॥ ध्रु ॥
अनाथ अपराधी पतिताआगळा[5] । परि पायांवेगळा नका करूं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी निराविल्यावरि । मग मज हरि उपेक्षीना ॥ ३ ॥

---

१ दे. भीकें.—२ दे. पं. क्षम.—३ पं. श्वापदें.—४ दे. आवुर्तीं.—५ पं. पतित०.

॥ २२५७ ॥

संतांचिया पायीं माझा विश्वास[1] । सर्वभावें दास जालों त्यांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ते चि माझें हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी
॥ ध्रु ॥
भागलिया मज वाहतील कडे[2] । त्यांचियानें[3] जोडे सर्व सुख ॥ २ ॥
तुका ह्मणे शेष घेईन आवडी । वचन न मोडीं बोलिलों[4] तें ॥ ३ ॥
॥ ३ ॥

॥ २२५८ ॥

लाघवी सूत्रधारी[5] दोरी नाचवी कुसरी ।
उपजवी पाळूनि संहारि नानापरिचीं[6] लाघवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुरोनि पंढरिये उरलें भक्तिसुखें लांचावलें[7] ।
उभें चि राहिलें कर कटीं न बैसे ॥ ध्रु ॥
बहु काळें ना सावळें बहु कठिण ना कोंवळें ।
गुणत्रया वेगळें बहुबळें आथिलें ॥ २ ॥
असोनि नसे सकळांमधीं मना अगोचर बुद्धी ।
स्वामी माझा कृपानिधि तुका ह्मणे विठ्ठल[8] ॥ ३ ।

॥ २२५९ ॥

कीर्तन ऐकावया भुलले श्रवण । श्रीमुख लोचन दिखावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उदित हें भाग्य होईल कोणे काळीं । चित्त तळमळी ह्मणऊनि
॥ ध्रु ॥
उतावीळ बाह्या भेटिलागीं दंड । लोटांगणीं धड जावयासी ॥ २ ॥

---

१ त. विसवास.—२ पं. कडिये.—३ दे. यांचियानें.—४ त. पं. बोलिले तें.—५ पं. सूत्र दोरी०.—६ पं. नानापरिचें.—७ पं. सुखावलें.—८ पं. श्रीविठ्ठले.

तुका ह्मणे माथा ठेवीन चरणीं । होतिल पारणी इंद्रियांची[1] ॥ ३ ॥

॥ २२६० ॥

नाम घेतां कंठ शीतळ शरीर । इंद्रियां व्यापार नाठवती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गोड गोमटें हें अमृतासी वाड । केला कइवाड माझ्या चित्तें ॥ ध्रु.
प्रेमरसें जाली पुष्ट अंगकांति । त्रिविध सांडिती ताप अंगें[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे तेथें विकाराची मात । बोलों नये हित सकळांचें ॥ ३ ॥
॥ ३ ॥

॥ २२६१ ॥

स्वामिकाजें[3] गुरुभक्ति । पितृवचन सेवा पति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे चि विष्णूची महापूजा ॥ अनुभाव नाहीं दुजा ॥ ध्रु. ॥
सत्य बोले मुखें । दुखवे आणिकांच्या दुःखें ॥ २ ॥
निश्चयाचें बळ । तुका ह्मणे तें च फळ ॥ ३ ॥

॥ २२६२ ॥

चित्त घेऊनियां तूं काय देसी । ऐसें मजपासीं सांग आधीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि च पंढरिराया करिन साटोवाटी । नेघें[4] जया तुटी येईल तें ॥ ध्रु. ॥
रिद्धिसिद्धि कांहीं दाविसी अभिळास । नाहीं मज आस मुक्तीची ही ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझें[5] माझें घडे तर । भक्तीचा भाव रे देणें[6] घेणें ॥ ३ ॥

॥ २२६३ ॥

तुझा संग पुरे संग पुरे । संगति पुरे विठोबा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपल्या सारिखें करिसी दासां । भिकारिसा जग जाणे ॥ ध्रु. ॥
रूपा[7] नाहीं ठाव नांवा । तैसें आमुचें[8] करिसी देवा ॥ २ ॥

---

१ पं. डोळियांचीं.—२ दे. अंग.—३ दे. 'स्वामिसेवा गुरुभक्ति । पितृवचन पाळिती ॥' असा पाठ नवीन केला आहे; पूर्वी मूळांत लिहिल्याप्रमाणेंच होता.—४ पं. नघें.—५ पं. माझें तुझें.—६ पं. घेणें देणें.—७ पं. रूप नाहीं ठावा नांवा ।.—८ त. आह्मां.

तुका ह्मणे तोयें आपुलें मेंडोळें। करिसी वाटोळें माझें तैसें ॥ ३ ॥

॥ २२६४ ॥

आतां मज तारीं । वचन हें साच करीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझें नाम दिनानाथ । बिदावळी जगविख्यात ॥ ध्रु. ॥
कोण लेखी माझ्या दोषा । तुझा त्रिभुवनीं ठसा ॥ २ ॥
वांयां जातां मज । तुका ह्मणे तुह्मां लाज ॥ ३ ॥

॥ २२६५ ॥

विठ्ठल आमुचा निजांचा । सज्जन सोयरा जीवाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मायबाप चुलता बंधु । अवघा तुजशीं संबंधु ॥ध्रु ॥
उभयकुळींसाक्ष । तूं चि माझा मातुळपक्ष ॥ २ ॥
समर्पिली काया । तुका ह्मणे पंढरिराया ॥ ३ ॥

॥ २२६६ ॥

वेदाचा तो अर्थ आह्मांसी च ठावा । येरांनीं वाहावा भार माथां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं। भार धन वाही मजुरीचें ॥ ध्रु ॥
उत्पत्तिपाळणसंहाराचें निज । जेणें नेलें बीज त्याचे हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें आपण चि फळ । हातोहातीं मूळ सांपडलें ॥ ३ ॥

॥ २२६७ ॥

आमचा तूं[2] ऋणी ठायींचा चि देवा । मागावया ठेवा आलों दारा[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वर्म तुझें आह्मां सांपडलें हातीं । धरियेले चित्तीं दृढ पाय ॥ ध्रु ॥
बैसलों धरणें कोंडोनियां द्वारीं । आंतूनि बाहेरी येओं नेदी ॥ २ ॥

---

१ दे. 'तुका ह्मणे आह्मां सांपडलें मूळ । आपण चि फळ आलें हातां ॥' असा पाठ मागून केला आहे; पूर्वीं मूळांतल्या प्रमाणेंच होता.—२ पं. 'तूं' नाहीं.—३ पं. द्वारा.

तुज मज सरी होइल या विचारें । जळो भांडखोरें निलाजिरीं[1] ॥ ३ ॥
भांडवल माझें मिरविसी जनीं । सहस्र वोवेंणी[2] नाममाळा ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मी केली जिवें साटी । तुह्मां आह्मां तुटी घालू आतां ॥ ५ ॥

॥ २२६८ ॥

काय धोविलें बाहेरी मन राळलें अंतरीं ।
गादलें जन्मवरी असत्यकाटें काटलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांडी व्यापार दंभाचा शुद्ध करीं रे मन वाचा ।
तुझिया चित्ताचा तूं च ग्वाही आपुला ॥ ध्रु ॥
पापपुण्यविटाळ देहीं भरितां[3] न विचारिसी कांहीं ।
काय चाचपसी मही जी अखंड सोंवळी ॥ २ ॥
कामक्रोधा वेगळा ऐसा होई कां[4] सोंवळा ।
तुका ह्मणे कळा गुंडुन ठेवीं कुसरी ॥ ३ ॥

॥ २२६९ ॥

ऊंस वाढवितां वाढली गोडी । गुळ साकर हे त्याची परवडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्यकर्मे आचरें रे । बापा सत्यकर्मे आचरें रे ।
सत्यकर्मे आचरें होईल हित । वारेलें[5] दुःख असत्याचें ॥ ध्रु ॥
साकरेच्या आळां लाविला कांदा । स्थूळसानापरि वाढे दुर्गंधा ॥ २ ॥
सत्य असत्य हें ऐसिया परी । तुका ह्मणे याचा विचार करीं ॥ ३ ॥

॥ २२७० ॥

पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकावरी पाय ठेवीं ॥ १ ॥

---

१ पं. निलाजिरे.—२ दे. वोवनी.—३ पं. करितां.—४ पं. कारे सोवळा.—५ दे. त. वाढेल.

॥ ध्रु. ॥ सार तो भाव सार तो भाव । अनुभवीं देव ते चि जाले ॥ ध्रु ॥
उदका भिन्न पालट काई । गंगा गोड येरां चवी काय नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे हें भाविकांचें वर्म । येरीं धर्माधर्म विचारावे ॥ ३ ॥
॥ १० ॥

॥ २२७१. ॥

जन्मा येऊनि कां रे निदसुरा । जायें भेटी वरा रखुमाईच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाप ताप दैन्य जाईल सकळ । पावसी अढळ उत्तम तें ॥ ध्रु ॥
संतमहंतसिद्धहरिदासदाटणी । फिटती पारणीं इंद्रियांचीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तेथें नामाचा गजर । फुकाची अपार लुटी घेई ॥ ३ ॥

॥ २२७२ ॥

काय धोविलें कातडें । काळकुट भीतरि कुडें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उगा राहें लोकभांडा । चाळविल्या पोरें रांडा ॥ ध्रु ॥
घेसी बुंथी पानवथां । उगा च हालविसी माथा ॥ २ ॥
लावूनि बैसे टाळी । मन इंद्रियें मोकळीं ॥ ३ ॥
हालवीत बैस माळा । विषयजप वेळोवेळां ॥ ४ ॥
तुका ह्मणे हा व्यापार । नाम विठोबाचें सार ॥ ५ ॥ ॥ २ ॥

॥ २२७३ ॥

येई वो येई वो येई धांवोनियां । विलंब कां वायां लावीला कृपाळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठाबाई विश्वंभरे भवच्छेदके । कोठें गुंतलीस अंगे विश्वव्यापके
॥ ध्रु ॥
न करीं न करीं न करीं आतां अळस अव्हेरु । व्हावया प्रकट कैंचें दूरि अंतरु ॥ २

---

१ पं. काय चवी.—२. पं. धांवोनि लवलाह्य ।.—३ पं. लाविपेळा.—४ पं. माय.—५ पं. प्रगट व्हावयासी कैंचे.

नेघें नेघें नेघें माझी[1] वाचा विसांवा। तुका ह्मणे हांवा[2] हांवा हांवा साधावा॥ ३ ॥

॥ २२७४ ॥

हें चि याच्या ऐसें मागावें[3] दान। वंदूनि चरण नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धीर उदारीव निर्मळ निर्मत्सर। येणें सर्वेश्वर ऐसें नांव ॥ध्रु॥
हा चि होईजेल याचिया विभागें। अनुभववी[4] अंगें अनुभववील ॥ २ ॥
जोडे तयाचे कां[5] न करावे सायास। जाला तरि अळस दीनपणें ॥३॥
पावल्यामागें कां न घलावी[6] धांव। धरिल्या तरि हांव बळ[7] येतें ॥ ४ ॥
तुका ह्मणे घालूं खंडीमध्यें टांक। देवाचें हें एक करूनी घेऊं ॥ ५ ॥

॥ २२७५ ॥

सत्ताबळें येतो मागतां विभाग। लावावया लाग निमित्य करूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझीं ऐसीं मुखें करूं उच्चारण[8]। बोलें नारायण सांपडवूं ॥ध्रु॥
आसेविण नाहीं उपजत मोहो। तरि च हा गोहो न पडे फंदीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां व्हावें याजऐसें। सरिसें सरिसें समागमें ॥ ३ ॥

॥ २२७६ ॥

करितां होया व्हावें[9] चित्त चि नाहीं। घटापटा कांहीं करूं नये ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मग हालत चि नाहीं जवळून। करावा तो सीण सीणवितो ॥ध्रु॥
साहत चि नाहीं कांहीं पांकुळलें। उगल्या उगलें ढळत आहे ॥ २ ॥
तुका ह्मणे तरी बोलावें झांकून। येथें खुंगे खूण पुरतें[10] चि ॥ ३ ॥

॥ २२७७ ॥

संतसंगें[11] याचा वास सर्वकाळ। संचला सकळ मूर्तिमंत[12] ॥ १ ॥

---

१ पं. माझे.—२ पं. हांवहांव साधावा.—३ त. मागावें हो दोन.—४ पं. अनुभवी अंगें अनुभविलें.—५ पं. 'कां' नाहीं.—६ पं. घालावी.—७ पं. वळीयेते।—८ पं. उच्चारणा। बोले नारायणा०.—९ पं. होय.—१० त. पुरे ते. पं. पुरत.—११ पं. संतसंग.—१२ दे. मूर्तिमंद.

॥ ध्रु. ॥ घालूनियां काळ अवघा बाहेरी। त्यासी च अंतरीं वास दिला ॥ ध्रु ॥
आपुलेंसें जिहीं नाहीं उरों[1] दिलें । चोजवितां भलें ऐसीं स्थळें ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं झांकत परिमळ । चंदनाचें स्थळ चंदन चि ॥ ३ ॥

॥ २२७८ ॥

पुष्ट कांति निवती डोळे । हे सोहळे श्रीरंगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतर्बाहीं विलेपन । हें भूषण मिरवूं ॥ ध्रु ॥
इच्छेऐसी आवड पुरे । विश्वंभरे जवळी ॥ २ ॥
तुका करी नारायण । या या सेवन नामाचें ॥ ३ ॥

॥ २२७९ ॥

सुकाळ हा दिवसरजनी । नित्य[2] धणी नवी च ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करुण सेवूं नानापरी । राहे उरी गोडीनें ॥ ध्रु ॥
सरे ऐसा नाहीं झरा । पंक्ती करा समवेत ॥ २ ॥
तुका ह्मणे बरवा पान्हा । कान्हाबाई माउलीचा ॥ ३ ॥

॥ २२८० ॥

पाहतां तव एकला दिसे । कैसा[4] असे व्यापक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्याचे त्याचे मिळणीं मिळे । तरी खेळे बहुरूपी ॥ ध्रु ॥
जाणिवेचें नेदी अंग । दिसों[3] रंग निवडीना ॥ २ ॥
तुका ह्मणे ये चि ठायीं । हें तों नाहीं सर्वत्र ॥ ३ ॥ ॥ ८ ॥

॥ २२८१ ॥

तुह्मांसाटीं आह्मां आपुला विसर । करितां अव्हेर कैसें[4] दिसे ॥ १ ॥

---

१ पं. "उरों" नाहीं.—२ दे. त. नीत.—३ पं. दिसे.—४ पं. कैसा.

॥ ध्रु. ॥ विचाराजी आतां ठायींचें हे देवा । आह्मां नये हेवा वाढवितां ॥ ध्रु ॥
आलों टाकोनियां सुखाची वसती । पुढें माझ्या युक्ति खुंटलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे जाला सकळ वृत्तांत । केला प्रणिपात ह्मणऊनि ॥ ३ ॥

॥ २२८२ ॥

करावा उद्धार हें तुह्मां उचित । आह्मी केली नीत कळली ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाववील हाक धांवा ह्मणऊन । करावें जतन ज्याचें तेणें ॥ ध्रु
दुश्चितासी बोल ठेवायासी ठाव । ऐसा आह्मी भाव जाणतसों ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें कायावाचामन । दुसरें तें ध्यान करित नाहीं ॥ ३ ॥

॥ २२८३ ॥

संताचे उपदेश आमुचे मस्तकीं । नाहीं मृत्यलोकीं[1] राहाणेसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि बहु तळमळी चित्त । येई वो धांवत पांडुरंगे ॥ ध्रु ॥
उपजली चिंता लागला उसीर । होत नाहीं धीर निढळ वाटे ॥ २ ॥
तुका ह्मणे पोटीं रिघालेंसे भय । करूं आतां काय ऐसें जालें ॥ ३ ॥

॥ २२८४ ॥

काळावरि घालूं तरि तो सरिसा । न पुरतां इच्छा दास कैसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां नाहीं कांहीं उसिराचें काम । न खंडावें प्रेम नारायणा ॥ ध्रु ॥
देणें लागे मग विलंब कां आड । गोड तरि गोड आदि अंत ॥ २ ॥
तुका ह्मणे होइल दर्शनें[2] निश्चिंती[3] । गाईन तें गीतीं ध्यान मग ॥ ३ ॥

---

१ दे. मृतेलोकीं.—२ दे. त. दरुषणें.—३ पं. निश्चिति.

॥ २२८५ ॥

परउपकारें[1] कायावाचामन । वेधे सुदर्शन रक्षी तया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ याजसाटीं असें योजिलें श्रीपति । संकल्पाचे हातीं सर्व तोडीं ॥ ध्रु.
परपीडे ज्याची जिव्हा मुंडताळे[2] । यमदूत डाळे[3] करिती पूजा ॥ २ ॥
तुका ह्मणे अंबऋषी दुर्योधना । काय झालें नेणां दुर्वासया ॥ ३ ॥

॥ २२८६ ॥

हागिल्याचे सिंके[4] वोणवा चि राहे । अपशकुन पाहे वेडगळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अत्यंत समय नेणतां अवकळा । येऊं नये बळा सिक धरा ॥ ध्रु.
भोजनसमयीं[5] ओकाचा आठव । ठकोनियां जीव कष्टी करी ॥ २ ॥
तुका ह्मणे किती सांगों[6] उगवून । अभाग्याचे गुण अनावर ॥ ३ ॥

॥ २२८७ ॥

नारे[7] तरि काय नुजेडे कोंबडें । करूनियां वेडें आग्रो[8] दावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आइत्याचें[9] साहे फुकाचा विभाग । विक्षेपानें जग ची थू करी ॥ ध्रु.
नेमून ठेविला करत्यानें काळ । नल्हायेसें बळ करूं[10] पुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे देव साहे जाल्यावरी । असांग चि[11] करी सर्व[12] सांग ॥ ३ ॥

॥ ७ ॥

॥ २२८८ ॥

तरी सदा निर्भर दास । चिंताआसविरहित ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघा च एकीं ठाव । सर्व[13] भाव विठ्ठलीं ॥ ध्रु. ॥
निरविलें तेव्हां त्यास । जाला वास त्यामाजी ॥ २ ॥
तुका ह्मणे रूप[14] ध्यावें । नाहीं ठावे गुणदोष ॥ ३ ॥

---

१ पं. पर उपकार कायावाचामनें.—२ त. मुडताळे.—३ पं. टाळे.—४ पं सिके.—५ पं. भोजनासमयीं.—६ पं. सांगावें.—७ पं. नारडें.—८ पं. आग्रो (आग्रह).—९ त. आइत्याची.—१० पं. पुढें करूं.—११ पं. तें.—१२ दे. सर्व संग।.—१३ पं. शुद्ध.—१४ त. गुण गावे।.

॥ २२८९ ॥

वेडिया उपचार करितां सोहळे । काय सुख कळे तयासी तें[1] ।
अंधापुढें दीप नाचती नाचणें । भक्तिभावेंविण भक्ति तैसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तिमाणें[2] राखण ठेवियेलें सेता । घालुनियां माथां चुना तया ।
खादलें ह्मणोनि सेवटी बोंबली[3] । ठायींची भुली कां नेणां रया ॥ ध्रु ॥
मुकियापासाव सांगतां पुराण[4] । रोगिया मिष्टान्न कांय[5] होय ।
नपुंसका काय करील पद्मिणी । रुचिविण वाणी तैसे होय ॥ २ ॥
हात पाय नाहीं करिल तो कांय[6] । वृक्षां[7] फळ आहे अमोलिक ।
हातां नये तैसा वांयां च तळमळी । भावेंविण भोळीं ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ २२९० ॥

मेघवृष्टीनें[8] करावा उपदेश परि गुरुनें न करावा शिष्य ।
वांटा लाभे त्यास केल्या अर्धकर्माचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ द्रव्य वेचावें अन्नछत्रीं[9] भूतीं द्यावें सर्वत्र ।
नेदावां[10] हा पुत्र उत्तमयाती पोसणा[11] ॥ ध्रु ॥
बीज न पेरावें खडकीं ओल नाहीं ज्याचे बुडखीं ।
यीतां ठके सेखीं पाठी लागे दिवाण ॥ २ ॥
गुज बोलावें संतांशीं पत्नी राखावी जैसी[12] दासी ।
लाड देतां तियेसी वांटा पावे कर्माचा ॥ ३ ॥
शुद्ध कसूनि पाहावें वरि रंगा न भुलावें ।
तुका ह्मणे घ्यावें जया नये तुटी तें ॥ ४ ॥

---

१ त. "तें" नाहीं.—२ पं. तिमानें.—३ दे. बोंबाली.—४ पं. पुराणें.—५ दे. काई.—६ दे. काई—७ पं. वृक्षीं—८ दे. "मेघवृष्टीनें" असतां "मेघवृष्टीन" केलें आहे.—९ अन्नसत्रीं.—१० त. न द्यावा.—११ दे. त. पोसना.—१२ पं. दासी जैसी.

॥ २२९१ ॥

नावडावें नन नावडावा मान । करूनि प्रमाण तूं चि होईं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सोडवूनि[1] देहसंबंध व्यसनें[2] । ऐसी नारायणें कृपा कीजे ॥ ध्रु ॥
नावडावें रूप नावडावे रस । अवघी राहो आस पायांपाशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां आपुलिया सत्ता । करूनि अनंता ठेवा[3] ऐसें ॥ ३ ॥

॥ २२९२ ॥

उपाधिवेगळे तुह्मी निर्विकार । कांहीं च संसार तुह्मां नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें मज करूनी ठेवा नारायणा । समूळ वासना नुरवावी ॥ ध्रु ॥
निसंग तुह्मांसी राहणें एकट । नाहीं कटकट साहों येत[4] ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं मिळों येत शिळा[5] । रंगासी सकळां[6] स्पाटिकाची ॥ ३ ॥

॥ २२९३ ॥

माहार माते चपणी भरे । न कळे खरें पुढील ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वोंगळ[7] अधमाचे गुण । जातां घडी न लगे चि ॥ ध्रु ॥
श्वान झोळी स्वामिसत्ता । कोप येतां उतरे ॥ २ ॥
तुका ह्मणे गुमान कां । सांगों लोकां अधमासी ॥ ३ ॥

॥ २२९४ ॥

डोळ्यामध्यें जैसें कणु । अणु तें हि न समाये[8] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें शुद्ध करीं[9] हित । नका चित्त बाटवूं ॥ ध्रु ॥
आपल्याचा[10] कळवळा । आणिका बाळावरि न ये ॥ २ ॥
तुका ह्मणे बीज मुडा[11] । जैशा[12] चाडा पिकाच्या ॥ ३ ॥

---

१ दे. सोडुनि. पं. सांडुनियां.—२ दे. त. वेसनें.—३ पं. ठेवी.—४ दे. त. येक.—५ दे. शिळ.—६ दे. सकळ. (हे दोन्ही पाठ मागून केलेले आहेत.).—७ पं. अधमाचे वोंगळ गुण.—८ पं. साहे.—९ पं. राखा.—१० पं. अपल्याचा.—११ दे. मुडां.—१२ पं. वैशा.

॥ २२९५ ॥

मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसी[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वैष्णवांचा माल खरा । तुरतुरा[2] वस्तूसी ॥ ध्रु ॥
भस्म दंड न लगे काठी । तीर्थां आटी भ्रमण ॥ २ ॥
तुका ह्मणे आडकाठी । नाहीं भेटी देवाचे ॥ ३ ॥

॥ २२९६ ॥

आगी लागो तया सुखा । जेणें हरि नये मुखा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज होत कां विपत्ति । पांडुरंग राहो चित्तीं ॥ ध्रु ॥
जळो तें समूळ । धन संपत्ति उत्तम कुळ ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । जेणें घडे तुझी सेवा ॥ ३ ॥

॥ २२९७ ॥

आतां न ह्मणे मी माझें । नेघें भार कांहीं ओझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तूं चि तारिता मारिता । कळों आलासी निरुता ॥ ध्रु ॥
अवघा तूं चि जनार्दन । संत बोलती वचन ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा[3] । तुझ्या रिगालों वोसंगा ॥ ३ ॥

॥ २२९८ ॥

समुद्रवळयांकित पृथ्वीचें दान । करितां समान न ये नामा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि कोणीं न करावा आळस । ह्मणा रात्रीदिवस रामराम ॥ ध्रु ॥
सकळ ही शास्त्रें[4] पठण करितां वेद । सरी नये गोविंदनामें[5] एकें ॥ २ ॥
सकळ ही तीर्थें प्रयाग[6] काशी । करितां नामाशीं तुळेति ना ॥ ३ ॥

---

१ पं. बहुतांची.—२ पं. नूर्तातूर्त.—३ पं. ०कांहीं । माझें तिळभरी नाहीं.—४ पं. शास्त्र.—५ दे. नाम एकें. पं. नामें एका.०—६ त. प्रयाग हे काशी. पं. प्रयागादि काशी.

कर्वतीं कर्मरी देहासी दंडण । करितां समान नये नामा ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । नाम हें चि सार विठोबाचें ॥ ५ ॥

॥ २२९९ ॥

अवघ्या वाटा जाल्या क्षीण कळीं[1] न घडे साधन ।
उचित विधि विधान न कळे न घडे सर्वथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भक्तिपंथें बहु सोपा पुण्य नागवेया[2] पापा ।
येणें जाणें खेपा येणें[3] चि एक खंडती ॥ ध्रु ॥
उभारोनि बाहे विठो पालवीत आहे ।
दासां मी चि साहे[4] मुखें बोले आपुल्या ॥ २ ॥
भाविक विश्वासी पार उतरिलें[5] त्यांसी ।
तुका ह्मणे नासी कुतर्क्याचे कपाळीं ॥ ३ ॥

॥ २३०० ॥

आह्मीं नामाचे धारक नेणों प्रकार आणीक ।
सर्व भावें एक विठ्ठल चि प्रमाण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे जपणावें नेणावें गावें आनंदें नाचावें ।
प्रेमसुख घ्यावें[6] वैष्णवांचे संगती ॥ ध्रु ॥
भावबळें[7] घालूं कास लज्जा चिंता दवडूं आस ।
पायीं निजध्यास ह्मणों[8] दास विष्णूचे ॥ २ ॥
भय नाहीं जन्म घेतां मोक्षपदा हाणों लाता ।
तुका ह्मणे सत्ता धरूं निकट सेवेची ॥ ३ ॥

---

१ पं. कली.—२ पं. नागवती.—३ पं. अवघ्या येणें खंडती.—४ पं. आहे.—५ पं. पावविलें. त. उतरील.—६ पं. °घ्यावें या वैष्णवांसंगती।.—७ पं. ह्मणवूं.—८ पं. मोक्षसुखा.

॥ २३०१ ॥

आह्मी हरिचे संवगडे जुने ठायींचे वेडे बागडे ।
हातीं धरुनी कडे पाठीसवें वागविलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि भिन्न भेद नाहीं देवा आह्मां एकदेहीं[1] ।
नाहीं जालों कैहीं[2] एका एक वेगळे ॥ ध्रु ॥
निद्रा करितां होतों पायीं सवें चि लंका घेतली तईं ।
वानरें[3] गोवळ गाई सवें चारित फिरतसों ॥ २ ॥
आह्मां नामाचें चिंतन राम कृष्ण नारायण ।
तुका ह्मणे क्षण खातां जेवितां न विसंभों[4] ॥ ३ ॥

॥ २३०२ ॥

मागें बहुतां जन्मीं हें चि करित आलों आह्मी ।
भवतापश्रमी दुःखें पीडिलीं निववूं त्यां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गर्जों हरिचे पवाडे मिळों[5] वैष्णव बागडे ।
पाझर रोकडे काढूं पाषाणामध्यें ॥ ध्रु ॥
भाव शुद्ध नामावळी हर्षें नाचों पिटूं टाळी ।
घालूं पायां तळीं कळिकाळ त्याबळें[6] ॥ २ ॥
कामक्रोध बंदखाणी[7] तुका ह्मणे दिले दोन्ही ।
इंद्रियांचे धणी आह्मी जालों गोसांवी ॥ ३ ॥

॥ २३०३ ॥

अमर तूं खरा । नव्हे कैसा मी दातारा ॥ १ ॥

---

१ पं. त. एकदोही.—२ त. कांहीं.—३ दे. त. वानरें.—४ पं. विसंबों.—५ पं. मिळवूं.—६ पं. यावळें.—७ पं. बंदीखाणी.

॥ ध्रु. ॥ चाल जाऊं संतांपुढें । वाद सांगेन निवाडें ॥ ध्रु ॥
तुज नांव जर नाहीं । तर माझें दाव काई ॥ २ ॥
तुज[1] रूप नाहीं । तर माझें दाव काई ॥ ३ ॥
खेळसी तूं लीळा । तेथें[2] मी काय तेगळा ॥ ४ ॥
साच तूं लटिका । तैसा मी ही ह्मणे तुका ॥ ५ ॥

॥ २३०४ ॥

मंत्र चळे[3] पिसें लागतें सत्वर । अबद्ध ते फार तरले नामें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अशौच[4] तो बाधी आणिकां अक्षरां । नाम निदसुरा घेतां तरे ॥ ध्रु ॥
रागज्ञानघात चुकतां होय वेळ । नाम सर्वकाळ शुभदायक ॥ २ ॥
आणिकां भजना[5] बोलिला निषेध । नाम तें अभेद सकळां मुखीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तपें घालिती घालणी । वेश्या उद्धरूनि नेली नामें ॥ ४ ॥

॥ २३०५ ॥

नव्हती[6] ते संत करितां कवित्व । संताचे ते आप्त नव्हती संत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें नाहीं वेश सरतें आडनांवें[7] । निवडे घावडाव व्हावा अंगीं ॥ ध्रु ॥
नव्हती ते संत धरितां भोंपळा । करितां वाकळा प्रावरण[8] ॥ २ ॥
नव्हती[9] ते संत करितां कीर्तन । सांगतां पुराणें नव्हती संत ॥ ३ ॥
नव्हती ते संत वेदाच्या पठणें । कर्म आचरणें नव्हती संत ॥ ४ ॥
नव्हती[10] संत करितां तप तीर्थाटणें । सेविलिया वन नव्हती संत ॥ ५ ॥
नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें । भस्मउद्धूळणें नव्हती संत ॥ ६ ॥
तुका ह्मणे नाहीं निरसला देहे । [11]तों अवघे हे संसारिक ॥ ७ ॥

---

१ पं. हें कडवें नाहीं.—२ पं. तरी काय मी वेगळा.—३ दे. पं. चळ.—४ दे. आशोचे. त. आशौच्य.—५ पं. °भजना विधि बोलिला०.—६ पं. होती (पण "न" लेखकप्रमादानें चुकला आहे असें उघड दिसतें).—७ त. सरत आड नावें. पं. सरत आड नांव.—८ पं. प्रावर्ण तें. त. प्रावर्णे.—९ पं. हें कडवें या ठिकाणीं नसून "नव्हती संत करितां तप तीर्थाटणें०" या कडव्याच्या पुढें आहे.—१० पं. नव्हती ते संत.—११ पं. तंव हे अवघे संसारिक.

॥ २३०६ ॥

हें चि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गुण गाईन आवडी । हे चि माझी सर्व जोडी ॥ ध्रु ॥
न लगे मुक्ति आणि संपदा[1] । संतसंग देई सदा ॥ २ ॥
तुका ह्मणे गर्भवासीं । सुखें घालावें आह्मासी ॥ ३ ॥

॥ २३०७ ॥

भाग्यवंता हे परवडी । करिती जोडी जन्माची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलाल्या[2] लाहों भावें । जें ज्या व्हावें तें आहे ॥ ध्रु ॥
इच्छाभोजनाचा दाता । न लगे चिंता करावी ॥ २ ॥
तुका ह्मणे आल्या थाऱ्या । वस्तु बऱ्या मोलाच्या ॥ ३ ॥

॥ २३०८ ॥

वंचुनियां[3] पिंड । भाता दान करी लंड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जैसी याची चाली वरी । तैसा अंतरला दुरी ॥ ध्रु ॥
मेला राखे दिस । ज्यालेपण[4] जालें वोस ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । लोभें न पुरे चि सेवा ॥ ३ ॥

॥ २३०९ ॥

अधीरा माझ्या मना एकें[5] एकी मात । तूं कां रे दुश्चित निरंतर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे चि चिंता काय खावें ह्मणऊनि । भले तुजहूनि पक्षिराज ॥ ध्रु ॥
पाहा तें चातक नेघे भूमिजळा । वरुषे उन्हाळा मेघ तया ॥ २ ॥

---

१ पं. धनसंपदा.—२ दे. आपुलाल्या लाहो भावें. पं. आपुलाल्या हो भावें.—३ पं. वेचूनियां.—४ दे. ज्यालेपणें.—५ दे. ऐक एकी. पं. ऐक एक.

सकळयातींमध्यें ठक हा सोनार । त्याघरीं व्यापार झारियाचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे जळीं वनीं जीव एक । तयापाशीं लेख काय असे ॥ ४ ॥

॥ २३१० ॥

कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जनासी एकला तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बाळा दुधा[1] कोण करितें उत्पत्ती । वाढवी श्रीपति सेवें[2] दोन्ही ॥ ध्रु ॥
फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥ २ ॥
तेणें तुझी काय नाहीं[3] केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनि ॥ ३ ॥
तुका ह्मणे ज्याचें नाम[4] विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥ ४ ॥

॥ २३११ ॥

उदारा कृपाळा पतितपावना । ब्रिदें नारायणा साच तुझीं ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ वर्णिलासी जैसा जाणतां नेणतां । तैसा तूं अनंता साच होसी ॥ ध्रु ॥
दैत्यां काळ भक्तां मेघश्याममूर्ति । चतुर्भुज हातीं शंख चक्र ॥ २ ॥
काम इच्छा तयां तैसा होसी राणीं । यशोदेच्या स्तनीं पान करी ॥ ३ ॥
होऊनि सकळ कांहींच न होसी । तुका ह्मणे यासी वेद ग्वाही ॥ ४ ॥

॥ २३१२ ॥

ऐका संतजन उत्तरें माझे बोबडे बोल ।
करीं लाड तुह्मांपुढें हो कोणी झणी कोपाल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उपाय साधन आइका कोण गति अवगति ।
दृढ बैसोनि सादर तुह्मी धरावें चित्तीं ॥ ध्रु ॥

---

१ पं. दुध.—२ पं. स्वयें.—३ पं. केली नाहीं.—४ पं. नांव.

धर्म तयासी घडे रे ज्याचे स्वाधीन[1] भाज ।
कर्म तयासी जोडे रे भीत नाहीं लाज ॥ २ ॥
पुण्य तें जाणां रे भाइनो परउपकाराचें[2] ।
परपीडा परनिंदा रे[3] खरें पाप तयाचें[4] ॥ ३ ॥
लाभ तयासी जाला रे मुखीं देव उच्चारी ।
प्रपंचापाठी गुंतला हाणी तयासी च थोरी ॥ ४ ॥
सुख तें जाणा रे भाइनो संतसमागम ।
दुःख तें जाणारे भाइनो सम[5] तेथें विषम[6] ॥ ५ ॥
साधन तयासी साधे रे ज्याची स्वाधीन बुद्धि ।
पराधीनासी[7] आहे घात रे थोर जाण[8] संबंधी ॥ ६ ॥
मान पावे तो आगळा मुख्य इंद्रियें[9] राखे ।
अपमानी तो अधररसस्वाद चाखे ॥ ७ ॥
जाणता तयासी बोलिजे जाणे समाधान[10] ।
नेणता तयासी बोलिजे वाद करी भूषण ॥ ८ ॥
भला तो चि एक जाणा रे गयावर्जन करी ।
बुरा धन नष्ट मेळवी परद्वार जो करी ॥ ९ ॥
आचारी अन्न काढी रे गाई अतितभाग ।
अनाचारी करी भोजन ग्वाही नसतां संग ॥ १० ॥
स्वहित तेणें चि[11] केलें रे भूतीं देखिला देव ।
अनहित तयाचें जालें रे आणी अहंभाव ॥ ११ ॥

---

१ पं. आधीन.—२ पं. परोपकाराचें.—३ पं. 'रे' नाहीं.—४ पं. त्याचें.—५ दे. पं. शम तेथें विशम.—६ त. विशम.—७ पं. पराधीन.—८ पं. जाणा.—९ पं. इंद्रिय. त. इंद्रियें.—१० पं. सारलक्षण.—११ पं. "चि" नाहीं.

धन्य जन्मा ते चि आले रे एक हरिचे दास ।
धिग ते विषयीं गुंतले केला आयुष्या[1] नास ॥ १२ ॥
जोहरी[2] तो चि एक जाणा रे जाणे सिद्धलक्षणें[3] ।
वेडसरु तो भुले रे वरदळभूषणें ॥ १३ ॥
बाळियाढा तो चि जाणा रे भक्ति दृढ शरीरीं ।
गांढ्या तयासी बोलिजे एक भाव न धरी ॥ १४ ॥
खोल तो वचन गुरूचें जो गिळूनि बैसे ।
उथळ धीर नाहीं अंगीं रे ह्मणे होईल कैसें ॥ १५ ॥
उदार तो[4] जीवभाव रे ठेवी देवाचे पायीं ।
कृपण तयासी बोलिजे पडे उपाधिडाईं ॥ १६ ॥
चांगलेंपण तें चि रे ज्याचें अंतर शुद्ध ।
वोंगळ मळिण[5] अंतरीं वाणी वाहे दुर्गंध ॥ १७ ॥
गोड तें चि एक[6] आहे रे सार विठ्ठलनाम ।
कडु तो संसार रे लक्षचौऱ्याशी जन्म ॥ १८ ॥
तुका ह्मणे मना धरीं[7] रे संतसंगतिसोई ।
न लगे कांहीं करावें रहिं विठ्ठलपायीं ॥ १९ ॥

॥ येकाखडी ॥ १ ॥

॥ २३१३ ॥

करावा कैवाड । नाहीं तरी आला नाड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्मरा पंढरीचा देव । मनीं धरोनिया भाव ॥ ध्रु ॥

---

१ पं. आयुष्याचा नाश.—२ दे. जोहोरि तो०.—३ पं. सिद्धलक्षण.—४ पं. तो. चि जीव०.—५ दे. मळिन.—६ पं. 'एक' नाहीं.—७ पं. रे धरीं.

खचविलें काळें । उगवा लवलाहें जाळें ॥ २ ॥
गजर नामाचा । करा लवलाहे वाचा ॥ ३ ॥
घरटी चक्रफेरा । जन्ममृत्याचा भोंवरा ॥ ४ ॥
नानाहव्यासांची जोडी । तृष्णा करी देशधडी ॥ ५ ॥
चरणीं ठेवा[1] चित्त । ह्मणवा देवाचे संकित ॥ ६ ॥
छंद नानापरी । कळा न पविजे हरी ॥ ७ ॥
जगाचा जनिता । भुक्तिमुक्तींचा ही दाता ॥ ८ ॥
झणी माझें माझें । भार वागविसी ओझें ॥ ९ ॥
यांची कां रे गेली बुद्धि । नाहीं तरायाची[2] शुद्धि ॥ १० ॥
टणक धाकुलीं । अवघीं सरती विठ्ठलीं ॥ ११ ॥
ठसा त्रिभुवनीं । उदार हा शिरोमणि ॥ १२ ॥
डगमगी तो वांयां जाय । धीर नाहीं गोता खाय ॥ १३ ॥
ढळों नये जरी । लाभ घरिचिया घरीं ॥ १४ ॥
नाहीं ऐसें राहे । कांहीं नासिवंत देहे ॥ १५ ॥
तरणा भाग्यवंत । नटे हरिकीर्तनांत ॥ १६ ॥
थंडी टाकी पैलतीर । बाहे ठोके होय वीर ॥ १७ ॥
दया[3] तिचें नांव । अहंकार जाय जंव ॥ १८ ॥
धनधान्य हेवा । नाडे[4] कुटुंबाची सेवा ॥ १९ ॥
नाम गोविंदाचें । घ्या रे हें चि भाग्य साचें ॥ २० ॥
परउपकारा । वेचा शक्ति निंदा वारा ॥ २१ ॥

---

१. पं. ठेवीं.—२ पं तयाची हे शुद्धि.—३ पं. 'दमातिचे नांवें । अहंकार जाय जीवें ॥' असें आहे. दे. पूर्वी असा पाठ होता; मागून फिरविला आहे.—४ पं. नाड.

फळ भोग इच्छा । देव आहे जयां[1] तैसा ॥ २२ ॥
बरवा ऐसा छंद । वाचे गोविंद गोविंद ॥ २३ ॥
भविष्याचे माथां । भजन न द्यावें[2] सर्वथा ॥ २४ ॥
माग लागला न संडीं । अळसें मांती घालीं तोंडीं ॥ २५ ॥
यश कीर्ति[3] मान । तरी जोडे नारायण ॥ २६ ॥
रवि लोपे तेजें । जरी हारपे हें दुजें ॥ २७ ॥
लकार लाविला । असतां नसतां चि उगला ॥ २८ ॥
वासनेची[4] धाडी । बंद खोडया नाडयां[5] बेडी ॥ २९ ॥
सरतें[6] न कळे । काय झांकियेले डोळे ॥ ३० ॥
खंती ते न धरा । होणें[7] गाढव कुतरा ॥ ३१ ॥
सायासाच्या जोडी । पिकें[8] काढियेल्या पेडी ॥ ३२ ॥
हातीं हित आहे । परि न करिसी पाहें ॥ ३३ ॥
अळंकार लेणें । ल्या रे तुळसीमुद्रामूषणें[9] ॥ ३४ ॥
ख्यांती[10] केली विष्णुदासीं । तुका ह्मणे पाहा कैसी ॥ ३५ ॥

॥ २३१४ ॥

देवें देऊळ सेविलें । उदक कोरडें चि ठेविलें[11] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव्हे मत गूढ उमानें क्वांहीं । तूं आपआपणापें पाहीं[12] ॥ ध्रु ॥
पाठें पूर वोसंडला । सरिता सागर तुंबोनि ठेला ॥ २ ॥
वांजेघरीं[13] बाळ तान्हा । एक बाळी दों कानां ॥ ३ ॥
तुका ह्मणे पैस । अनुभविया ठावा गोडीरस ॥ ४ ॥

---

१ पं. जैसा.—२ दे. 'न द्यावें' या बद्दल 'नेदावें.'—३ दे. कीर्त.—४ दे. पं. वासने चि.—५ पं. नाड.—६ पं. सार तें.—७ पं. होय.—८ त. पिकें.—दे. 'पिकें' असतां 'पिके' केलें आहे. पं.—पीक काढिले ते पेडी.—९ पं. तुळसीभूषणें.—१० दे. क्ष्याति. त. क्षाति.—११ त. ठेलें.—१२ दे. कांहीं.—१३ पं. वाझेघरीं.

॥ *लोहागांवीं कीर्तनांत मेलें मूल जीत झालें ते समयीं स्वामींनीं अभंग केले ते.

॥ २३१५ ॥

अशक्य तों[1] तुह्मां नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागें काय जाणों स्वामीचे पवाडे । आतां कां रोकडे दावूं नये ॥ ध्रु ॥
थोर भाग्य आह्मी समर्थाचे[2] कांसे[3] । ह्मणवितों दास काय थोडें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझे निवदावे डोळे । दावूनि सोहळे सामर्थ्याचे ॥ ३ ॥

॥ २३१६ ॥

दाता तो एक जाणा । नारायणा स्मरवी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक नासिवंतें काय । न सरे हाय ज्यांच्यानें[4] ॥ ध्रु ॥
यावें तयां काकुलती । जे दाविती सुपंथ ॥ २ ॥
तुका ह्मणे उरी नुरे । त्याचें खरे उपकार ॥ ३ ॥

अलंकापुरी ब्राह्मण धरणें बसून बेताळीस दिवस उपवासी होता त्यास दृष्टांत कीं देहूस तुकोबापाशीं जाणें. ब्राह्मण स्वामीपें आला त्याबदल अभंग ॥ ३१ ॥

॥ २३१७ ॥

श्रीपंढरीशा पतितपावना । एक विज्ञापना पायांपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनाथां जीवांचा तूं काजकैवारी । ऐसी चराचरीं ब्रिदावळी ॥ ध्रु ॥
न संगतां[5] कळे अंतरींचें गुज । आतां तुझी लाज तुज देवा ॥ २ ॥

---

* त. कीर्त० मूल मृ०. पं. लोहोगांवीं मूल कीर्तनांत जीवंत जालें ते अ०.

१ पं. तें.—२ पं. समर्थांची.—३ त. काशे.—४ पं. ज्याचनी.—५ पं. सांगतां.

आळिकर ज्याचें करिसी समाधान । अभयाचें दान देऊनियां ॥ ३ ॥
तुका ह्मणे तूं चि खेळें दोहीं ठायीं । नसेल तो देईं धीर मना ॥ ४ ॥

॥ २३१८ ॥

अगा ये उदारा अगा विश्वंभरा । रखुमाईच्या वरा पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा । अगा मेघश्यामा विश्वजनित्या ॥ ध्रु ॥
अगा कृपावंता जीवन तूं दाता । अगा सर्वसत्ता धरितया ॥ २ ॥
अगा सर्वजाणा अगा नारायणा । करुणावचना चित्त द्यावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं अधिकार तैसी । सरती पायांपाशीं केली मागें ॥ ४ ॥

२३१९ ॥

नव्हें दास खरा । परि जाला हा डांगोरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ यासी काय करूं आतां । तूं हें सकळ जाणता ॥ ध्रु ॥
नाहीं पुण्यगांठी । जे[२] हें वेचूं कोणासाठीं ॥ २ ॥
तुका ह्मणे कां उपाधी । वाढविली कृपानिधी ॥ ३ ॥

॥ २३२० ॥

तुजविण सत्ता । नाहीं वाचा वदविता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसे आह्मी जाणों दास । ह्मणोनि जालों उदास ॥ ध्रु ॥
तुह्मी दिला धीर । तेणें मन झालें स्थिर ॥ २ ॥
तुका ह्मणे आड । केलों मी हें तुझें कोड ॥ ३ ॥

॥ २३२१ ॥

काय मी जाणता । तुह्माहूनि अनंता ॥ १ ॥

---

१ पं. त्याचें.—२ पं. देहे वेचूं.

॥ ध्रु. ॥ जो[1] हा करूं अतिशय । कां[2] तुह्मां दया नये ॥ ध्रु ॥
काय तुज नाहीं कृपा । विश्वाचिया मायबापा ॥ २ ॥
तुका ह्मणे वाणी । माझी वदे तुह्मांहूनि ॥ ३ ॥

॥ २३२२ ॥

काय ज्ञानेश्वरीं उणें । तिंहीं पाठविलें धरणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐकोनियां लिखित । ह्मूण जाणवली हे मात ॥ ध्रु ॥
तरी जाणे धणी । वदे सेवकाची वाणी ॥ २ ॥
तुका ह्मणे ठेवा[3] । होतां सांभाळावें देवा ॥ ३ ॥

॥ २३२३ ॥

ठेवूनियां डोई । पायीं जालों उतराई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कारण तें तुह्मी जाणां । मी तराळ नारायणा ॥ ध्रु ॥
प्रसंगीं वचन । दिलें तें चि खावें अन्न ॥ २ ॥
तुका ह्मणे भार । तुह्मी जाणां थोडा फार ॥ ३ ॥

उपदेश अभंग ॥ १ ॥

॥ २३२४ ॥

नको कांहीं पडों ग्रंथाचिये[4] भरीं । शीघ्र व्रत करीं हें चि एक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवाचिये चाडे आळवावें देवा । ओस देहभावा पाडोनियां ॥ ध्रु
साधनें घालिती काळाचिये मुखीं । गर्भवास सेखीं[5] न चुकती ॥ २ ॥
उधाराचा मोक्ष होय नव्हे[6] ऐसा । पतनासी इच्छा आवश्यक ॥ ३ ॥
रोकडी पातली अंगसंगें जरा । आतां उजगरा कोठवरि ॥ ४ ॥
तुका ह्मणे घालीं नामासाटीं उडी । पांडुरंग थडी पाववील ॥ ५ ॥

---

१ पं. जे.—२ त. काय.—३ त. °देवा । होता सांभाळी हा ठेवा॥—४ दे. ग्रंथाचे.—५ दे. सेकीं.—६ पं. नोहे.

॥ २३२५ ॥

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोळें । आणूनि निराळें द्यावें हातीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ इंद्रियांचा जय साधुनियां मन । निर्विषय कारण असे तेथें ॥ ध्रु.
उपास पारणीं अक्षरांची आटी । सत्कर्मा शेवटीं असे फळ ॥ २ ॥
आदरें संकल्प वारीं अतिशय । सहज तें काय दुःख जाण[1] ॥ ३ ॥
स्वर्गीच्या घायें विवळसी[2] वांयां । रडे रडतियासवें मिथ्या ॥ ४ ॥
तुका ह्मणे फळ आहे मूळापाशीं । शरण देवासीं जाय वेगीं ॥ ५ ॥

॥ २३२६ ॥

त्यजिलें[3] भेटवी आणूनि वासना । दाविल्याचे जना काय काज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आळवावें देवा भाकूनि करुणा । आपुलिया मना साक्ष[4] करीं ॥ ध्रु. ॥
नाहीं जावें यावें दुरूनि लागत । आहे साक्षभूत अंतरींचा ॥ २ ॥
तुका ह्मणे[5] हा आहे कृपासिंधु । तोडी भवबंधु तात्काळिक ॥ ३ ॥

॥ २३२७ ॥

गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥ ध्रु. ॥
आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥ २ ॥
तुका ह्मणे आळी । जेवी नुरे चि वेगळी ॥ ३ ॥

॥ २३२८ ॥

ज्याचें[6] जया ध्यान । तें चि होय त्याचें मन ॥ १ ॥

---

१ पं. जाणे.—२ दे. त. विळवसी.—३ दे. त. तजिलें.—४ पं. साक्षे.—५ पं. ह्मणे तो हा.—६ पं. जया ज्याचें.

॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि अवघें सारा । पांडुरंग दृढ धरा ॥ ध्रु ॥
सम खूण ज्याचे पाय । उभा व्यापक विटे ठाय ॥ २ ॥
तुका ह्मणे नभा । परता अनूचा ही गाभा ॥ ३ ॥

॥ २३२९ ॥

पाहुनियां ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां आलें जाण फळ त्याचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तरि वांयां केली तोंडपिटी । उरी ते शेवटी उरलीसे[1] ॥ ध्रु ॥
पढोनियां वेद हरिगुण गावे[2] । ठावें तें जाणावें तेव्हां जालें ॥ २ ॥
तपतीर्थाटणें[3] तेव्हां कार्यसिद्धि । स्थिर राहे बुद्धि हरिच्या नामीं ॥ ३ ॥
यागयज्ञादिक काय दानधर्म । तरि फळ नाम कंठीं राहे ॥ ४ ॥
तुका ह्मणे नको काबाडाचे भरी । पडों सार धरीं हें चि एक ॥ ५ ॥

॥ २३३० ॥

सुखें खावें अन्न । त्याचें करावें चिंतन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचें[4] दिलें त्यासी । पावे फळ आपणासी ॥ ध्रु ॥
आहे हा आधार । नाम त्याचें विश्वंभर ॥ २ ॥
नाहीं रिता ठाव । तुका ह्मणे पसरीं भाव ॥ ३ ॥

॥ २३३१ ॥

संकोचोनि काय जालासी लहान । घेई अपोशण ब्रह्मांडाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करोनि पारणें आंचवें संसारा । उशीर उशिरा लावूं नको ॥ ध्रु ॥
घरकुलानें[5] होता पडिला अंधार । तेणें केलें फार कासावीस ॥ २ ॥
झुगारूनि दुरी लपविलें काखे । तुका ह्मणे वाखे कौतुकाचे ॥ ३ ॥

---

१ पं. उरली आहे.—२ पं. गाये.—३ दे. तप त्रिर्थाटण.—४ पं. त्याचें दिलें त्यासी पावे। फळ आपणासी फावे ॥.—दे. पूर्वीं पं. प्रमाणें होतें, मागून फिरविलें आहे.—५ त. घरकुल्यानें.

॥ २३३२ ॥

माझ्या बापें मज दिधलें भातुकें । ह्मणोनि कवतुकें क्रीडा करीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केली आळी पुढें बोलिलों वचन । उत्तम हें ज्ञान आलें त्याचें ॥ ध्रु ॥
घेऊनि विभाग जावें लवलाह्या । आलोंति या[1] ठाया आपुलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्ञानदेवीं समुदाय । करावा मी पाय येइन वंदूं ॥ ३ ॥

॥ २३३३ ॥

ज्ञानियांचा गुरु[2] राजा महाराव । ह्मणती ज्ञानदेव ऐसें तुह्मां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥ ध्रु ॥
ब्रह्मादिक जेथें तुह्मां वोळगणे[3] । इतर तुळणें काय पुरे ॥ २ ॥
तुका ह्मणे नेणें[4] युक्तीची ते खोली । ह्मणोनि ठेविली पायीं डोई ॥ ३ ॥

॥ २३३४ ॥

बोलिलीं लेंकुरें । वेडीं वांकुडीं उत्तरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करा क्षमा अपराध । महाराज तुह्मी सिद्ध ॥ ध्रु ॥
नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ॥ ३ ॥

॥ २३३५ ॥ ॥ ११ ॥

काय तुह्मी जाणां । करूं अव्हेर नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी या लटिक्याची गोही[5] । निवडली दुसरे ठायीं ॥ ध्रु ॥
कळों अंतरींचा गुण । नये फिटल्यावांचून[6] ॥ २ ॥
आणिलें अनुभवा । जनाच्या हें ज्ञानदेवा ॥ ३ ॥

---

१ त. त्या.—२ पं. तूं. त. °राजा गुरु महा०.—३ पं. वोळगण । आणीक तुळणें०.—४ पं. नेणों.—५ त. ग्वाही.—६ पं. फुटल्या०.

आणीक कोणी भिती । त्यांच्या चिंतनें विश्रांति ॥ ४ ॥
तुका ह्मणे बीज पोटीं । फळ तैसें चि सेवटीं ॥ ५ ॥

॥ २३३६ ॥

अविश्वासियाचें शरीर सुतकी । विटाळ पातकी भेद वोही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय त्याचा वेळ जाईल मांडला । होता तैसा ठेवा आह्मा पुढें ॥ ध्रु ॥
मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळींचा धोंडा उभा ठाके ॥ २ ॥
तुका ह्मणे जैसा कुचराचा दाणा । परिपाकीं अन्नाँ न मिळे जैसा ॥ ३ ॥

॥ २३३७ ॥

तामसाचीं तपें पापाची सिदोरी । तमोगुणें भरी घातले ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राज्यमदा आड सुखाची संपत्ति । उलंघूनि जाती निरयगांवा ॥ ध्रु ॥
इंद्रियें दमिलीं इच्छा जिती जीवीं । नागविती ठावीं नाहीं पुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे हरिभजनावांचून । करिती तो सीण पाहों नये ॥ ३ ॥

॥ २३३८ ॥

हरिकथेवांचून इच्छिती स्वहित । हरिजन चित्त न घला तेथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाईल भंगोन आपुला विश्वास । होईल या नास कारणांचा ॥ ध्रु ॥
ज्याचिया बैसावें भोजनपंगती । त्याचिया संगती तैसें खावें ॥ २ ॥
तुका ह्मणे काय जालेति जाणते । देवा ही परते थोर तुह्मी ॥ ३ ॥

॥ २३३९ ॥

सेवकें करावें स्वामीचें वचन । त्यासी हुंतूंपण कामा नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घेईल जीव कां सारील परतें । भंगलिया चित्तें सांदी जेनां ॥ ध्रु ॥

---

१ पं. यांच्या.—२ पं. वाहे.—३ पं. पुढें आला.—४ दे. कपाळीचें. त. कपाळीचें तोंड, उभें ठाके.—५ पं. परिपाका जाणा रसा नये ।.—६ पं. घातलेसे.—७ दे. जिति. पं. जिती त. जीते..—८ पं. हरिकथेविण.—९ पं. हरिजनि चित्त न घाला तेथें.—१० दे. सांदी जनां

खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलें चि नीट उसंतावें ॥ २ ॥
तुका ह्मणे तो ज्ञानाचा सागर । परि नेंदी अगर भिजों भेदें ॥ ३ ॥

॥ २३४० ॥

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥ ध्रु ॥
जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥ २ ॥
तुका ह्मणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ॥ ३ ॥

॥ २३४१ ॥

बहुतां छंदाचें बहु वसे जन । नये वांटूं मन त्यांच्या संगें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करावा जतन आपुला विश्वास । अंगा आला रस आवडचा ॥ ध्रु ॥
सुखाची समाधि हरिकथा माउली । विश्रांति साउली सिणलियांची[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे बुडे बांधोनि दगड । तेथें काय कोड धांवायाचें ॥ ३ ॥

॥ २३४२ ॥

हरिकथे नाहीं । विश्वास ज्याचे ठायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याची वाणी अमंगळ । कान उंदेराचें[2] बीळ ॥ ध्रु ॥
सांडुनि हा रस । करिती आणीक सायास ॥ २ ॥
तुका ह्मणे पिसीं । वांयां गेलीं किती ऐसीं ॥ ३ ॥

॥ २३४३ ॥

प्रेम अमृताची धार । वाहे देवा[3] ही समोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उर्ध्ववाहिनी[4] हरिकथा । मुगुटमणि सकळां[5] तीर्थां ॥ ध्रु ॥

---

१ पं. सिणलिया.—२ पं. उंदिराचें.—३ त. देवा हे. पं. देवाचे.—४ दे. त. उर्ध्व वाहिणी.—५ पं. सकळ तीर्थां.

शिवाचें[1] जीवन । जाळी महादोष कीर्तन ॥ २ ॥
तुका ह्मणे हरि । इची स्तुति वाणी थोरी ॥ ३ ॥

॥ २३४४ ॥

आतां माझ्या मना । इची घडो उपासना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें करीं[2] पांडुरंगा । प्रेम वोसंडेसें अंगा ॥ ध्रु ॥
सर्व काळ नये । वाचे विट आड भये ॥ २ ॥
तुका वैष्णवांसंगती । हें चि भजन[3] पंगती ॥ ३ ॥

॥ २३४५ ॥

उपास कराडी[4] । तिहीं करावीं बापुडीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मी विठोबाचे दास । चिंता झुगारिली[5] आस ॥ ध्रु ॥
भक्तीच्या उत्कर्षें । नाहीं मुक्तीचें तें पिसें ॥ २ ॥
तुका ह्मणे बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥ ३ ॥

॥ २३४६ ॥

करविली तैसी केली कटकट । वांकडें[6] कीं नीट देव जाणे ॥ १ ॥
कोणाकारणें हें जालेंसे निर्माण । देवाचें कारण देव जाणे ॥ २ ॥
तुका ह्मणे मी या अभिमाना वेगळा । घालूनि गोपाळा भार असें ॥ ३ ॥

॥ २३४७ ॥

तुह्मी येथें पाठविला धरणेकरी । त्याची जाली परी आइका ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां काय पुढें वाढवुनि विस्तार । जाला समाचार आइका तो ॥ ध्रु ॥

---

१ पं. जीवाचें.—२ पं. करीं गा पांडुरंगा ।.—३ पं. भोजनपंगती.—४ त. कडाडी.—५ दे. झुगारावी.—६ त. वांकडी कां नीट०. पं. वांकुडें हें नीट०.

देवाचे उचित एकादश अभंग । महाफळ त्याग करूनि गेला ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवा समर्पूनि पायीं । जालों उतराई ठावें असो ॥ ३ ॥
॥ ३१ ॥

॥ २३४८ ॥

मरण माझें मरोन गेलें । मज केलें अमर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठाव पुसिलें बुड पुसिलें । वोस वोसलें देहभावा[1] ॥ ध्रु ॥
आला होता गेला पूर । धरिला धीर जीवनीं ॥ २ ॥
तुका ह्मणे बुनादीचें । जालें साचें उजवणें ॥ ३ ॥

॥ २३४९ ॥

माझे लेखीं देव मेला । असो त्याला असेल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गोष्टी न करीं नांव नेघें । गेलों दोघें खंडोनी ॥ ध्रु ॥
स्तुतिसमवेत निंदा । केला धंदा[2] उदंड ॥ २ ॥
तुका ह्मणे निवांत ठेलों । वेचित आलों जीवित्व ॥ ३ ॥

॥ २३५० ॥

लवविलें[3] तया सर्वें लवे जाती[4] । अभिमाना हातीं सांपडेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भोळिवेचें लेणें विष्णुदासां साजे । तेथें भाव दुजे हारपती ॥ ध्रु ॥
अर्चन वंदन नवविधा भक्ति । दया क्षमा शांति तया ठायीं ॥ २ ॥
तये गांवीं नाहीं दुःखाची वसती । अवघा चि भूतीं नारायण ॥ ३ ॥
अवघें चि जालें सोंवळें ब्रह्मांड । विटाळाचें तोंड न देखती ॥ ४ ॥
तुका ह्मणे गाजे वैकुंठीं सोहळा । याही[5] भूमंडळामाजी कीर्ति ॥ ५ ॥

---

१ पं. देहभाव.—२ पं. धांवा.—३ पं. लवविली.—४ त. लविजेती.—५ पं. आणि या भूमंडळा०.

॥ २३५१ ॥

पंढरीची वारी आहे माझे घरीं । आणिक न करीं तीर्थव्रत ॥ १ ॥
व्रत एकादशी करीन उपवासी[1] । गाइन अहर्निशीं मुखीं नाम ॥ २ ॥
नाम विठोबाचें घेईन मी वाचे । बीज कल्पांतींचें तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ २३५२ ॥

संपदा सोहळा नावडे मनाला । करी[2] तें टकळा पंढरीचा ॥ १ ॥
जावें पंढरिसी आवडी[3] मनासी । कधीं एकादशी आषाढी हे ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें आर्त ज्याचे मनीं । त्याची चक्रपाणी वाट पाहे ॥ ३ ॥

॥ २३५३ ॥

कथनी पठणी करूनि काय । वांचुनि रहणी वांयां जाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुखीं वाणी अमृतगोडी । मिथ्या भुकें चरफडी ॥ ध्रु ॥
पिळणी पाक करितां दगडा । काय जडा होय तें ॥ २ ॥
मधु मेळवूनि माशी । आणिका[4] सांसी पारधिया ॥ ३ ॥
मेळऊनि धन मेळवी माती । लोभ्या हातीं तें चि मुखीं ॥ ४ ॥
आपलें केलें आपण खाय । तुका वंदी त्याचे पाय ॥ ५ ॥

॥ २३५४ ॥

उमटती वाणी । वाटे नामाचिया ध्वनी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरें सेवन उपकारा । द्यावें द्यावें या उत्तरा ॥ ध्रु ॥
सरळ आणि मृद । कथा पाहावी ते ऊर्ध्व[5] ॥ २ ॥
गात जात[6] तुका । हा चि उपदेश आइका ॥ ३ ॥

---

१ पं. उपासी (ह्मणजे "उपवासी" व "उपासी" असे दोन शब्द यांत आहेत).—२ पं. करितों.—३ पं. उद्योग मानसीं.—४ पं. आणिकासी पारधीया ।.—५ दे. उर्ध.—६ पं. जावो.

॥ २३५५ ॥

कथाकाळींची मर्यादा सांगतों ते भावें वंदा ।
प्रीतीनें गोविंदा हें चि एक आवडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ टाळ वाद्य गीत नृत्य अंतःकरणें[1] प्रेमभरित ।
वाणिता तो कीर्त तद्भावने लेखावा ॥ ध्रु ॥
नये अळसें मोडूं अंग कथे कानवडें ढुंग ।
हेळणेचा रंग दावी तो चांडाळ ॥ २ ॥
तोंडीं विडा माने ताठा थोरपणें घाली गेंठा[2] ।
चित्त नेदी नामपाठा गोष्टी लावी तो चांडाळ ॥ ३ ॥
कथे इच्छी मान दावूनियां थोरपण ।
रजा संकोच[3] न लुगडीं सांवरी तो चांडाळ ॥ ४ ॥
आपण बैसे बाजेवरी सामान्य[4] हरिच्या दासां धरी ।
तरि तो सुळावरी वाहिजे निश्चयेसीं ॥ ५ ॥
येतां न करी नमस्कार कर जोडोनियां नम्र ।
न ह्मणतां[5] थोर आणिकां खेटी तो चांडाळ ॥ ६ ॥
तुका विनवी जना कथे नाणावें अवगुणा ।
करा नारायणा ऋणी समर्पक भावें ॥ ७ ॥

॥ २३५६ ॥

कथा देवाचें ध्यान कथा साधना मंडण ।
कथे ऐसें पुण्य आणीक नाहीं सर्वथा ॥ १ ॥

---

१ पं. अंतःकरण.—२ त. गाठा.—३ त. संकोचोन.—४ दे. सामान.—५ दे. त. ह्मणवितां.

॥ ध्रु. ॥ ऐसा साच खरा भाव । कथेमाजी उभा देव ॥ ध्रु ॥
मंत्र स्वल्प जभा उच्चारितां वाचे मना ।
ह्मणतां नारायणा क्षणें जळती महा दोष ॥ २ ॥
भावें करितां कीर्तन तरे तारी आणीक जन ।
भेटे नारायण संदेह नाहीं ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ २३५७ ॥

कथा त्रिवेणीसंगम देव भक्त[1] आणि नाम ।
तेथींचें उत्तम चरणरज वंदितां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जळती दोषांचे डोंगर शुद्ध होती नारी नर ।
गाती ऐकती सादर जे पवित्र हरिकथा ॥ ध्रु ॥
तीर्थें तया ठाया येती पुनीत व्हावया ।
पर्वकाळ पांया तळीं वसे वैष्णवां ॥ २ ॥
अनुपम्य हा महिमा नाहीं द्यावया उपमा ।
तुका ह्मणे ब्रह्मा नेणे वर्णूं या सुखा ॥ ३ ॥

॥ २३५८ ॥

सांडूनि कीर्तन न करीं आणीक काज ।
नाचेन निर्लज्ज तुझ्या रंगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडीचें आर्त पुरवीं पंढरिराया ।
शरण तुझ्या पायां या चि लागीं ॥ ध्रु ॥
टाळी वाऊनियां[2] विठ्ठल ह्मणेन ।
तेणें निवारीन भवश्रम ॥ २ ॥

---

१ दे. भक्त आणि देव नाम.—२ दे. वाहूनियां. त. वाहोनियां.

तुका ह्मणे देवा नुपेक्षावें आह्मां ।
न्यावें निजधामा आपुलिया ॥ ३ ॥

॥ २३५९ ॥

जळती कीर्तनें । दोष पळतील विघ्नें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें चि बळिवंत गाढें । आनंद करूं दिंडीपुढें ॥ ध्रु ॥
कळि पापाची हे मूर्ति । नामखड्ग[1] घेऊं हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे जाऊं । बळें दमामे[2] ही लावूं ॥ ३ ॥

॥ २३६० ॥

यम[3] सांगे दूतां तुह्मां नाहीं तेथें सत्ता ।
जेथें होय कथा सदा घोष नामाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नका जाऊं तया गांवां नामधारकाच्या शिवा[4] ।
सुदर्शन यावा[5] घरटी फिरे भोंवती ॥ ध्रु ॥
चक्र गदा घेउनी हरि उभा असे त्यांचे द्वारीं ।
लक्ष्मी कामारी रिद्धिसिद्धीसहित ॥ २ ॥
ते बळियाशिरोमणी हरिभक्त ये मेदिनी ।
तुका ह्मणे कानीं यम सांगे दूतांचे ॥ ३ ॥

॥ २३६१ ॥

कान्हया रे जगजेठी । देई भेटी एकवेळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय मोकलिलें वनीं । सावजांनीं वेढिलें ॥ ध्रु ॥
येथवरी होता संग । अंगें अंग लपविलें ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहिलें मागें । एवढ्या वेगें अंतरला ॥ ३ ॥

---

१ पं. नामखर्ग.—२ पं. हे.—३ पं. यमधर्म.—४ त. सींवा. पं. शिवा.—५ दे. येवा.

॥ २३६२ ॥

आपुल्या आह्मी पुसिलें नाहीं । तुज कांहीं कारणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागें मागें धांवत आलों । कांहीं बोलों यासाटीं ॥ ध्रु ॥
बहुत दिस[1] होतें मनीं । घ्यावी धणी एकांतीं ॥ २ ॥
तुका ह्मणे उभा राहें । कान्हो पाहें मजकडे ॥ ३ ॥

॥ २३६३ ॥

धन्य बा[2] ह्या ऐशा नारी । घरीं दारीं नांदती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चोरूनियां तुजपाशीं । येतां त्यांसी न कळतां ॥ ध्रु ॥
दोन्हीं ठायीं समाधान । सम काठिण बहुतांचि[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवासाठीं । दुर्लभ भेटी ते देवा ॥ ३ ॥

॥ २३६४ ॥

उदासीना पावल्या वेगीं । अंगा अंगीं जडलिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेटाळिला भोंवता हरी । मयूरफेरीं[4] नाचती ॥ ध्रु ॥
मना आले करिती चार । त्या फार हा एकला ॥ २ ॥
तुका ह्मणे नारायणीं । निरंजनीं[5] मीनलिया ॥ ३ ॥

॥ २३६४ ॥

विषमाची[6] शंका वाटे । सारिखें भेटे तरी सुख ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि चोरिलें जना । आल्या राणां[7] एकांतीं ॥ ध्रु ॥
दुजियासी कळों नये । जया सोय नाहीं हे ॥ २ ॥
तुका ह्मणे मोकळें मन । नारायण भोगासी ॥ ३ ॥

---

१ पं. दिवस.—२ पं. बाया ऐशा०.—३ पं. बहुता चि।.—४ दे. त. पं. मयोरफेरीं.—५ दे. त. निरांजनी.—६ दे. विशमाची.—७ दे. त. पं. राणां.

॥ २३६५ ॥

आलिंगन कंठाकंठीं । पडे मिठी सर्वांगें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न घडे मागें परतें[1] मन । नारायण संभोगी ॥ ध्रु ॥
वचनासी वचन मिळे । रिघती डोळे डोळियांत ॥ २ ॥
तुका ह्मणे अंतर्ध्यानीं । जीव जीवनीं विराल्या ॥ ३ ॥

॥ २३६६ ॥

कोणी सुना कोणी लेंकी । कोणी एकी सेतंता[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघियांची जगनिंद[3] । जाली धिंद सारखी ॥ ध्रु ॥
अवघ्या अवघ्या चोरा । विना वरा मायबापा ॥ २ ॥
तुका ह्मणे करा सेवा । आलें जीवावर तरी ॥ ३ ॥

॥ २३६७ ॥

येथलि जे[4] एक घडी । तये जोडी पार नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ किती त्यांचा सासुरवास । कैंचा रस हा तेथें ॥ ध्रु ॥
अवघे दिवस गेले कामा । नाहीं जन्मा खंडण ॥ २ ॥
तुका ह्मणे रतल्या[5] जनीं । सोडा झणीं कान्होबा ॥ ३ ॥ ॥ ८ ॥

॥ २३६८ ॥

चिंता नाहीं गांवीं विष्णुदासांचिये । घोष जयजयकार सदा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नारायण घरीं सांठविलें धन । अवघे चि वाण तया पोटीं ॥ ध्रु ॥
सवंग सकळां पुरे धणीवरी । सेवावया नारी नर बाळा ॥ २ ॥
तुका ह्मणे येगें आनंदी आनंदु । गोविंदें गोविंदु पिकविला ॥ ३ ॥

---

१ पं. परतो.—२ पं. संतता.—३ त. जगानिंद्य.—४ दे. जें.—५ पं. रातल्या.

॥ २३६९ ॥

करिती तया वेवसाव आहे । येथें व्हा रे साहे एकां एक ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ गातां आइकतां समान चि घडे । लाभें लाभ जोडे विशेषता ॥ध्रु॥
प्रेमाचें भरतें भातें घ्यावें अंगीं । नटे टाळी रंगीं शूरत्वेंसी ॥ २ ॥
तुका ह्मणे बहुजन्मांचें खंडण । होईल हा सीण निवारोनि ॥ ३ ॥
॥ २ ॥

॥ २३७० ॥

स्वामीचें अभंगींचें नांव काढून सालोमालो आपुलें नांव घालीत त्यावर अभंग ॥ ८ ॥

नाहीं घाटावें लागत । एका सितें कळे भात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्षीर निवडतें[1] पाणी । चोंची हंसाचिये आणी ॥ ध्रु ॥
आंगडें फाडुनि घोंगडें करी । अवकळा तये परी ॥ २ ॥
तुका ह्मणे कण । भुसीं निवडे कैंचा सीण ॥ ३ ॥

॥ २३७१ ॥

सालोमालो हरिचे दास । ह्मणउन केला[2] अवघा नास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघें बचमंगळ केलें । ह्मणतां एकांचें आपुलें ॥ ध्रु ॥
मोडूनि संतांचीं वचनें । करिती आपणां भूषणें ॥ २ ॥
तुका ह्मणे कवी । जगामधीं रूढ दावी ॥ ३ ॥

॥ २३७२ ॥

जायांचे[3] अळंकार । बुडवूनि होती चोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्यांसी ताडणाची[4] पूजा । योग घडे बऱ्या वोजा ॥ ध्रु ॥

---

१ दे. निवडितें. पं. निवडिते.—२ पं. अवघा केला.—३ पं. जयांचें.—४ ताडण चि.

अभिलाषाच्या सुखें । अंतीं होती काळीं मुखें ॥ २ ॥
तुका ह्मणे चोरा । होय भूषण मातेरा ॥ ३ ॥

॥ २३७३ ॥

कालवूनि विष । केला अमृताचा नास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐशा अभाग्याच्या बुद्धि । सत्य लोपी नाहीं शुद्धि ॥ ध्रु ॥
नाक कापुनि लावी सोनें । कोण अळंकार तेणें ॥ २ ॥
तुका ह्मणे बावी । मोडूनि मदार बांधावी ॥ ३ ॥

॥ २३७४ ॥

कण भुसाच्या आधारें । परि तें निवडितां बरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय घोंघाणिया घाणी[1] । ताकामध्यें घाटी लोणी ॥ ध्रु ॥
सुइणीपुढें चेंटा । काय लपविसी चाटा ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्ञान । दिमाकाची भेनभन[2] ॥ ३ ॥

॥ २३७५ ॥

विकल तेथें विका । माती नांव ठेवूनि बुका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हा तो निवाडयाचा ठाव । खऱ्या खोटया निवडी भाव ॥ ध्रु ॥
गऱ्हवारे हा विधि । पोट वाढविलें चिंधी ॥ २ ॥
लावूं जाणे विल्हे । तुका साच आणिक[3] कल्हे ॥ ३ ॥

॥ २३७६ ॥

विषयीं अद्वये । त्यासी आह्मां सिवों नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव तेथुनि निराळा । असे निष्काम[4] वेगळा ॥ ध्रु ॥

---

१ दे. काय घोंगाणि पाधाणी । पं. काय घोंगाणी पादाणी । घाटी ताकामध्यें लोणी ॥—
२ पं. भणभण.—३ पं. आणि.—४ दे. त. निःकाम.

वासनेची बुंथी[1] । तेथें कैंची ब्रह्मस्थिति ॥ २ ॥
तुका ह्मणे असतां[2] देहीं । तेथें नाहीं जमतीं[3] ॥ ३ ॥

॥ २३७७ ॥

नामितों या देवा । माझी एके ठायीं सेवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गुणअवगुण निवाडा । ह्मैस ह्मैस रेडा रेडा ॥ ध्रु ॥
जनीं जनार्दन । साक्ष त्यासी लोटांगण ॥ २ ॥
तुका ह्मणे खडे । निवडूं दळणीं घडघडे ॥ ३ ॥

॥ ८ ॥

॥ २३७८ ॥

जीव जीती[4] जीवना संगें । मत्स्या मरण त्या वियोगें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जया चित्तीं जैसा भाव । तयां जवळि तैसा देव ॥ ध्रु ॥
सकळां पढिये[5] भानु । परि त्या कमळाचें जीवनु ॥ २ ॥
तुका ह्मणे माता । वाहे तान्हयाची[6] चिंता ॥ ३ ॥

॥ २३७९ ॥

मुंगीचिया घरा कोण जाय[7] मूळ । देखोनियां गूळ धांव घाली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवे हिता आपुलिया ॥ ध्रु ॥
उदक अन्न काये ह्मणे मज खा ये । भुकेला तो जाये चोजवीत ॥ २ ॥
व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा । दुःखाच्या परिहारा आपुलिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे जया आपुलें स्वहित । करणें तो चि प्रीत धरी कथे ॥ ४ ॥

॥ २३८० ॥

जन्मांतरिंचा परिट न्हावी । जात ठावी त्यानें ते ॥ १ ॥

---

१ पं. गुंती.—२ पं. असा.—३ दे. त. जेमेतीं. पं. जमेति.—४ पं. जीवती.—५ दे. पाढीये.—६ दे. तान्हें याची.—७ पं. धाडी.

॥ ध्रु. ॥ वाखर जैसा चरचरी । तोंड करी संवदणी ॥ ध्रु ॥
पूर्व[1] जन्म शिखासूत्र । मळ मूत्र अंतरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे करिती निंदा । धुवटवंदा पुढिलांचा ॥ ३ ॥

॥ २३८१ ॥

नाम[2] दूषी त्याचें नको दरषण । विष तें वचन वाटे मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अमंगळ वाणी नाइकवे[3] कानीं । निंदेची पोहणी[4] उठे तेथें ॥ ध्रु ॥
कायें[5] साच लभ्य त्याचिये वचनीं । कोणत्या पुराणीं दिलो ग्वाही ॥ २ ॥
काय आड लावूं त्याचिया तोंडासी । आतां या जिभेसी[6] काय करूं ॥ ३ ॥
तुका ह्मणे संत न मानिती त्यांस । घेऊं पाहे ग्रास यमदूत ॥ ४ ॥

॥ २३८२ ॥

येऊनि नरदेहा झांकितील डोळे । बळें चि अंधळे होती लोक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उजडासरसी न चलती वाट । पुढील बोभाट जाणोनियां ॥ ध्रु ॥
बहु फेरे आले सोसोनि वोळसा । पुढें नाहीं ऐसा लाभ मग ॥ २ ॥
तुका ह्मणे जाऊं सादावीत वाट । भेटे तरी भेटो[7] कोणी तरी ॥ ३ ॥

॥ २३८३ ॥

नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बळिया माझा पंढरिराव । जो या देवांचा ही देव ॥ ध्रु ॥
रंडी चंडी शक्ति । मद्यमांसातें[9] भक्षिती ॥ २ ॥
बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाटीं देव ॥ ३ ॥

---

१ पं. पूर्वजन्मीं.—२ पं. नामद्वेषी. दे. त. नाम दुसी.—३ पं. नाइकावी—४ दे. पोहोणी.—५ त. काय लभ्य असे त्याचिये०. दे. काय लभ्य त्याचिये०—६ पं. जिव्हे.—७ त. पं. भेटे.—८ पं. यादवांचा.—९ दे. पं. मद्यमांस.

गणोबा[1] विक्राळ । लाडुमोदकांचा काळ ॥ ४ ॥
मुंज्या ह्लैसासुरें[2] । हें तों कोण लेखी पोरें ॥ ५ ॥
वेताळें[3] फेताळें । जळो त्यांचें तोंड काळें ॥ ६ ॥
तुका ह्लणे चित्तीं । धरा रखुमाईचा पती ॥ ७ ॥

॥ २३८४ ॥

पडतां जड भारी । दासीं आठवावा हरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग तो होऊं नेदी सीण । आड घाली सुदर्शन ॥ ध्रु ॥
नामाच्या[4] चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥ २ ॥
तुका ह्लणे प्राण । करा देवासी अर्पण ॥ ३ ॥

॥ २३८५ ॥

मायें मोकलिलें कोठें जावें बाळें । आपुलिया बळें न वंचे[5] तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रुसोनियां पळे सांडुनियां[6] ताट । मागें पाहे वाट यावें ऐसी ॥ध्रु॥
भांडवल आह्मां आळी करावी हे । आपणची[7] माये धांवसील ॥ २ ॥
तुका ह्लणे आळी करुनियां निकी । देसील भातुकीं बुझाऊनि ॥ ३ ॥

॥ २३८६ ॥

नागर गोडें[8] बाळरूप । तें स्वरूप काळीचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गाईगोपाळांच्या संगें । आलें लागें पुंडलीका ॥ ध्रु ॥
तें हें ध्यान दिगंबरें[9] । कटीं कर मिरवती ॥ २ ॥
नेणेंपणें[10] उगें चि उभें । भक्तिलोभें राहिलें ॥ ३ ॥

---

१ पं. गणोजी.—२ पं. ह्लैसासुर.—३ पं. वेताळ फेताळ । जळो त्यांचें तोंड काळ ॥.—४ पं. हरिनामाच्या.—५ पं. वांचे.—६ पं. सोडुनियां.—७ दे. आपणें.—८ पं. गोंडें.—९ दे. त. दिगांबर.—१० पं. नेणेपणें.

नेणे वरदळाचा मान । विटे चरण सम उभें ॥ ४ ॥
सहज कटावरी हात । दर्हीभात शिदोरी ॥ ५ ॥
मोहरी पांवा गांजिवा पाठीं । धरिली काठी ज्या काळें ॥ ६ ॥
रम्य स्थळ चंद्रभागा । पांडुरंगा क्रीडेसी ॥ ७ ॥
भीमा दक्षणमुख वाहे । दृष्टी पाहे समोर ॥ ८ ॥
तारावेसे मूढ लोक । दिली भाकं पुंडलिका ॥ ९ ॥
तुका ह्मणे वैकुंठवासी । भक्तांपासीं राहिला ॥ १० ॥

॥ २३८७ ॥

विठ्ठलनामाचा नाहीं ज्या विश्वास । तो वसे उदास नरकामध्यें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तयासी बोलतां होईल विटाळ। नेव[1] जाये तो जळस्नान करितां ॥ ध्रु ॥
विठ्ठलनामाची नाहीं[2] ज्या आवडी । त्याची काळ घडी लेखिताहे ॥ २ ॥
तुका ह्मणे मज विठोबाची आण । जरी प्रतिवचन करिन त्यासी ॥ ३ ॥

॥ २३८८ ॥

तया घडले सकळ नेम । मुखीं विठोबाचें नाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं न लगे सिणवें । आणिक वेगळाल्या भावें ।
वाचे उच्चारावें । रामकृष्णगोविंदा ॥ ध्रु ॥
फळ पावाल अवलिळा । भोग वैकुंठ रोहळा ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याच्या नांवें । तो चि होईजे[3] स्वभावें ॥ ३ ॥

॥ २३८९ ॥

पुराणप्रसिद्ध सीमा । नामतारकमहिमा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागें जाळी महा दोष । पुढें नाहीं गर्भवास ॥ ध्रु ॥

---

१ पं. न वजे तो०.—२ पं. ज्या नाहीं.—३ दे. होइजेल.

जें निंदिलें शास्त्रें । वंद्य जालें नाममात्रें ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसा । त्रिभुवनीं नामठसा ॥ ३ ॥

॥ २३९० ॥

नाम घेतां न लगे मोल । नाममंत्र नाहीं खोल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दों चि[1] अक्षरांचें काम । उच्चारावें राम राम ॥ ध्रु ॥
नाहीं वर्णधर्मयाती[2] । नामीं अवघीं चि[3] सरतीं ॥ २ ॥
तुका ह्मणे नाम । चैतन्य[4] निजधाम ॥ ३ ॥

॥ २३९१ ॥

नाम घेतां वांयां गेला । ऐसा कोणें आईकिला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांगा विनवितों तुह्मांसी । संत महंत सिद्ध ऋषी ॥ ध्रु ॥
नामें तरला नाहीं कोण । ऐसा द्यावा निवडून ॥ २ ॥
सलगीच्या उत्तरा । तुका ह्मणे क्षमा करा ॥ ३ ॥

॥ २३९२ ॥

फुकाचें तें लुटा सार । व्हा रे अमर सदैव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं गर्भवास पुढती । डोंगर जळती दोषांचे ॥ ध्रु ॥
उदंड भावें उदंड घ्यावें । नाम गावें आवडी ॥ २ ॥
तुका ह्मणे घारिच्या घरीं । देशा उरीं न सीणीजे[5] ॥ ३ ॥

॥ १५ ॥

॥ २३९३ ॥

प्रीति नाहीं रायां[6] वर्जिली ते कांता । परी तिची सत्ता,जगावरी[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसे दंभी[8] जालों तरी तुझे भक्त । वास यमदूत न पाहाती ॥ ध्रु ॥

---

१ दे. त. "चि" नाहीं.—२ दे. त. वर्णाधम०.—३ त. पं. "चि" नाहीं.—४ पं. चैतन्य हें निज०.—५ पं. सीणी.—६ पं. रायें वर्जियेली.—७ पं. सर्वावरी.—८ पं. दांभी.

राजयाचा पुत्र अपराधी देखा । तो काय आणिकां दंडवेल ॥ २ ॥
बाहातरी[1] खोडी परी देवमण कंठीं । तैसा[2] जगजेठी ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ २३९४ ॥

करावा उद्धार किंवा घ्यावी हारी । एका बोला स्थिरी राहें[3] देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निरसनें[4] माझा होईल संदेह । अवघें चि आहे मूळ पायीं ॥ ध्रु ॥
राहिलों चिकटून कांहीं चि न कळे । कोणा[5] नेणों काळें उदय भाग्य ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु उद्वेगला जीव । भाकीतसें कीव देवराया ॥ ध्रु ॥

॥ २३९५ ॥ ॥ १ ॥

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूं नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक[6] ॥ध्रु॥
भयाचिये[7] पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भलें ॥ २ ॥
तुका ह्मणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ३ ॥

॥ २३९६ ॥

भोग तो न घडे संचितावांचूनि । करावें तें मनीं समाधान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनी मनीं मानूं नये खेद[8] । ह्मणावा गोविंद वेळोवेळां ॥ ध्रु॥
आणिकां रुसावें न लगे बहुतां । आपुल्या संचितावांचूनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे भार घातलिया वरी । होईल कैवारी नारायण ॥ ३ ॥

॥ २३९७ ॥

निर्वैर व्हावें सर्वभूतांसवें । साधन बरवें हें चि एक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी च अंगीकार करिल[9] नारायण । बडबड तो सीण येणेंविण ॥ ध्रु॥

---

१ पं. बाहातर खोडा घोडे देव०.—२ पं. तैसा मी जग०.—३ पं. राहवें.—४ पं. निराने.—५ पं. कोण्या नेणें.—६ दे. त. रंकें.—७ पं. भवाचिया.—८ दे. पं. ०खेदु । ह्मणावा गोविंदु०.—९ पं. करी.

सोइरें पिशुन समान चि घडे । चित्त पर ओढे उपकारी ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्त जालिया निर्मळ । तरि च सकळ केलें होय ॥ ३ ॥

॥ २३९८ ॥

दिली चाले वाचा । क्षय मागिल्या तपाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रिद्धि सिद्धि येती घरा । त्याचा करिती पसारा ॥ ध्रु ॥
मानदंभांसाटीं । पडे देवासवें तुटी ॥ २ ॥
तुका ह्मणे मेवा । कैचा वेठीच्या[1] निर्दैवां ॥ ३ ॥

॥ २३९९ ॥

तापल्यावांचून नव्हे अळंकार । पिटूनियां सार उरलें तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग कदाकाळीं नव्हे[2] शुद्ध जाति । नासें शत्रु होती मित्र ते चि ॥ ध्रु ॥
कळिवर बरें भोगूं द्यावें भोगा । फांसिलें तें रोगा हातीं सुटे ॥ २ ॥
तुका ह्मणे मन करावें पाठेळ[3] । साहावे चि जाळ सिजेवरि ॥ ३ ॥

॥ २४०० ॥

पाठेळ करितां न साहावे वारा । साहेलिया ढोरा गोणी चाले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपणां आपण हे चि कसवटी । हर्षामर्ष पोटीं विरों द्यावे ॥ ध्रु ॥
नवनीत तोंवरी कडकडी लोणी । निश्चळ होऊनी राहे मग ॥ २ ॥
तुका ह्मणे जरी जग टाकी घाया । त्याच्या पडे पायां जन मग ॥ ३ ॥

॥ २४०१ ॥

कावळियासी[4] नाहीं दया उपकार । काळिमा अंतर विटाळसें ॥ १ ॥

---

१ पं. वेठीचा निर्दैवा. दे. वेठीच्या नदवां.—२ पं. शुद्ध नव्हे.—३ पं. पाटेळ.—४ पं. कावळिया.

॥ ध्रु. ॥ तैसें कुधनाचें जिणें अमंगळ । घाणेरी वोंगळ वदे वाणी ॥ ध्रु ॥
कडु भोंपळ्याचा उपचारें पाक । सेविल्या तिडीक कपाळासी ॥ २ ॥
तुका ह्मणे विष सांडूं नेणे[1] साप । आदरें तें पाप त्याचे ठायीं ॥ ३ ॥

॥ २४०२ ॥

लाभ खरा नये तुटी । नाहीं आडसळा भेटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाय अवघिया देशा । येथें संचलासी[2] तैसा ॥ ध्रु ॥
मग न लगे पारखी । अवघीं सकट[3] सारखीं ॥ २ ॥
तुका ह्मणे वोळे । रूपें भुलविले डोळे ॥ ३ ॥

॥ २४०३ ॥

नको आतां पुसों कांहीं । लवलाहीं उसंती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाय वेगीं पंढरपुरा । तो सोयरा दीनांचा ॥ ध्रु ॥
वचनाचा न करीं[4] गोवा । रिघें देवासीं शरण ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपावंता । बहु चिंता दीनाची ॥ ३ ॥

॥ २४०४ ॥

बुद्धिहीनां जडजीवां । नको[5] देवा उपेक्षूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परिसावी हे[6] विज्ञापना । आह्मां दीनां दासांची ॥ ध्रु ॥
चिंतूनियां आले पाय । त्यांसी काय वंचन ॥ २ ॥
तुका ह्मणे पुरुषोत्तमा । करीं क्षमा अपराध ॥ ३ ॥

॥ २४०५ ॥

ह्मणऊनि काकुळती । येतों पुढतों पुढती ।
तुह्मां[7] असे हातीं । कमळापती भांडार ॥ १ ॥

---

१ पं. नये.—२ दे. त. संचलाची.—३ पं. सकळ.—४ पं. वचनाचा न रिघे गोवा । रिघे देवासी शरण ॥.—५ पं. नका.—६ पं "हे" नाहीं.—७ पं. तुमचिया.

॥ ध्रु. ॥ फेडूं गालेती दरिद्र । तरी न लगे उशीर ।
पुरे अभयंकर । ठाया[1] ठाव रंकाशी ॥ ध्रु ॥
कोठें न घली पांव । याजसाठीं तेजिली[2] हांव ।
घेऊं नेदी वाव । मना केला विरोध[3] ॥ २ ॥
कारणांच्या गुणें । वेळ काळ तोही नेणें ॥
तुमच्या कीर्तनें । तुका तुह्मां जागवी ॥ ३ ॥

॥ २४०६ ॥

बहु नांवें ठेविलीं स्तुती[4]चे आवडी । बहुत या गोडी आली रसा ॥ १॥
॥ ध्रु. ॥ बहु सोसें सेवन केलें बहुवस । बहु आला दिस गोमटयाचा ॥ ध्रु ॥
बहुतां पुरला बहुतां उरला । बहुतांचा केला बहु नट ॥ २ ॥
बहु तुका जाला निकट वृत्ती । बहु काकुलती येऊनियां ॥ ३ ॥

॥ २४०७ ॥

इहलोकीं[5] आह्मां वस्तीचें पेणें । उदासीन तेणें देहभावीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय पुरतें[6] कारण मारगीं । उलंघूनि वेगीं जावें स्थळा ॥ ध्रु ॥
सोंगसंपादणी चालवितों वेव्हार । अत्यंतीं[7] आदरें नाहीं गोवा ॥ २ ॥
तुका ह्मणे वेंच लाविला संचिता । होइल घेतां देतां लाभ कोणां ॥ ३ ॥

॥ २४०८ ॥

रोजकीर्दी[8] जमा धरूनी सकळ । खताविला काळ वरावरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं होत झाडयापाडयाचें लिगाड । हुजराती ते[9] गोड सेवा रुजू ॥ ध्रु ॥

---

१ पं. ठायीं.—२ पं. त्यजिली.—३ पं. निरोध.—४ पं. स्तुतीची.—५ दे. त. पं. येह.—६ दे. त. पुरातें.—७ पं. दे. अत्यंतिक आदर.—८ दे. त. रोज कीर्ति.—९ पं. "ते" नाहीं

चोरासाठीं रदबदल आटाहास[1] । जळो जिणें दास्य[2] बहुताचें ॥ २ ॥
सावधान तुका निर्भर मानसीं । सालझाडयापाशीं गुंपों नेणे ॥ ३ ॥

॥ २४०९ ॥

त्रिविधकर्माचे वेगळाले भाव । निवडूनि ठाव दाखविला[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आलियाचा झाडा राहिल्याचा ठाव । सुख[4] गौरव संतां अंगीं ॥ ध्रु ॥
हिशेबें[5] आलें तें सकळांसी प्रमाण । तेथें नाहीं आन चालों येत ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं पापपुण्य[6] खतीं । झाडयाची हुजती हातां आली ॥ ३ ॥

॥ २४१० ॥

साकरेचें नाम घेतां कळे गोडी । तैसी आह्मां जोडी वैष्णवांची[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मोक्ष गांठी असे ठेविला बांधोनी । सोस तो भजनीं आवडीचा ॥ ध्रु ॥
भोजनाची चिंता माय वाहे बाळा । आह्मां तरी खेळावरि चित्त ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी देहउपकारें । गाऊं निरंतर नाचों लागों ॥ ३ ॥

॥ २४११ ॥

सुखें घेऊं जन्मांतरें । एक बरें इहलोकीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पंढरीचे वारकरी । होतां थोरी जोडी हे ॥ ध्रु ॥
हें[9] तों आलें अनुभवा । पाहावें जीवावरूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे केला त्याग । सर्वसंग ह्मणऊनि ॥ ३ ॥

---

१ दे. त. आटा हाश.—पं. अटाहास्य.—२ दे. दाश०. त. दाष्ये०. पं. दास बहुताचे ।.—३ पं. दाखविले.—४ त. सुखाच गौरव. पं. सुख तो गौरव.—५ त. हिसोबें.—६ त. पापपुण्यें खंती. पं. पापपुण्या खंती.—७ दे. त. आह्मांसि.—८ पं. हें चि.—९ दे. या अभंगांतील "हें तों आलें अनुभवा । पाहावें जीवावरूनि ॥" हें कडवें, आणि पुढल्या अभंगांतील "हरिदासांचा समागम । अंगीं प्रेम विसावे ॥" हें कडवें यांच्या जागा मागून आंकडे घालून परस्पराशीं पालटल्या आहेत.

॥ २४१२ ॥

करूं जातां सन्निधान । क्षणि[1] जन पालटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां गोमटे ते पाय । तुझे माय विठ्ठले ॥ ध्रु ॥
हरिदासांचा समागम । अंगीं प्रेम विसांवे ॥ २ ॥
तुका[2] ह्मणे हें चि मन । इच्छादान मागतसे ॥ ३ ॥

॥ २४१३ ॥

क्षीर मागे तया रायतें वाढी । पाधानी गधडी ऐशा नांवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ समयो जाणां समयो जाणां । भलतें नाणां भलतेथें ॥ ध्रु ॥
अमंगळ[3] वाणी वदवी मंगळी[4] । अशुभ वोंगळी शोभन तें ॥ २ ॥
तुका ह्मणे नेणें समयो ठाया ठाव । राहाडी ते वाव नरकाडी ॥ ३ ॥

॥ २४१४ ॥

दिंचा पीडी नांगी । ज्याचा दोष त्याचे अंगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केला पाहिजे विचार । मन मित्र दावेदार ॥ ध्रु ॥
मधुरा उत्तरीं । रांवो[5] खेळे उरावरी ॥ २ ॥
तुका ह्मणे रेडा । सुखें जाती ऐशा पीडा ॥ ३ ॥

॥ २४१५ ॥

तीर्थांची अपेक्षा स्थळीं वाढे धर्म । जाणावें तें वर्म बहु पुण्य ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु बरी ऐसी भाविकांची जोडी । काळ नाहीं घडी जात वांयां ॥ ध्रु ॥
करूनी चिंतन करवावें आणिकां । तो या जाला लोकां नाव जगीं ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे परउपकारी । त्यांच्या पायांवरी डोई माझी ॥ ३ ॥

---

१ पं. क्षण.—२ दे. "तुका ह्मणे केला त्याग । सर्व संग ह्मणऊनि" ॥ असें मूळचा पाठ खोडून मागून केलें आहे, प्रथम मूळांतल्याप्रमाणेंच होतें.—३ पं. मंगळ.—४ पं. अगळी.—५ पं. राखा.

॥ २४१६ ॥

भयाची तों आह्मां चित्तीं । राहो खंती सकेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ समर्पिलों[1] जीवें भावें । काशा[2] भ्यावें कारणें ॥ ध्रु ॥
करीन तें कवतुकें । अवघें निकें शोभेलें[3] ॥ ॥ २ ॥
तुका ह्मणे माप भरूं । दिस सारूं कवतुकें ॥ ३ ॥

॥ २४१७ ॥

पाचारितां धांवे[4] । ऐसी ठायींची हे सवे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बोले करुणा वचनीं । करी कृपा लावी स्तनीं ॥ ध्रु ॥
जाणे कळवळा । भावसिद्धींचा जिव्हाळा[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे नाम । मागें मागें धांवे प्रेम ॥ ३ ॥

॥ २४१८ ॥

कां जी माझे जीवीं । आळस ठेविला गोसावीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येवढा घात आणीक काय । चिंतनासी अंतराय ॥ ध्रु ॥
देहआत्म वंदी । केला घात कुबुद्धी ॥ २ ॥
तुका ह्मणे मन । कळवळी वाटे सीण ॥ ३ ॥

॥ २४१९ ॥

दर्शनाचें आर्त जीवा । बहु देवा राहिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां जाणसी तें करीं । विश्वंभरीं काय उणें ॥ ध्रु ॥
येथें जरी उरे चिंता । कोण दाता याहूनी २ ॥
तुका ह्मणे जाणवलें । आह्मां भलें एवढें च ॥ ३ ॥

---

१ पं. "समर्पिलों०" आणि "करीन ते०" या कडव्यांच्या जागा परस्पराशीं पालटल्या आहेत.—२ पं. कारणा.—३ त. शोभलें.—४ पं. पावे.—५ पं. सोहळा.

॥ २४२० ॥

बैसों पाठमोरीं । मना वाटे तैसें करीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि तूं जाणसी आवडी । बाळा बहुतांची परवडी ॥ ध्रु ॥
आपुलाल्या इच्छा । मागों जया व्हावें जैशा ॥ २ ॥
तुका ह्मणे आई । नव्हसी उदास निठाई ॥ ३ ॥

॥ २४२१ ॥

विश्वंभरा वोळे । बहुत हात कान डोळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेथें असे तेथें देखे[1] । मागितलें तें ऐइके[2] ॥ ध्रु ॥
जें जें वाटे गोड । तैसें पुरवितो[3] कोड ॥ २ ॥
तुका ह्मणे भेटी । कांहीं पडों नेदी तुटी ॥ ३ ॥

॥ २४२२ ॥

दाटे कंठ लागे डोळियां पाझर । गुणाची अपार वृष्टि वरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेणें सुखें छंदें घेईन सोंहळा । होऊनि निराळा पापपुण्यां ॥ ध्रु ॥
तुझ्या मोहें पंडो[4] मागील विसर । आलापें सुस्वर करिन कंठ ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें पाहिजे सौरस । तुह्मांविण रस गोड नव्हे ॥ ३ ॥

॥ २४२३ ॥

पसरूनि राहिलों बाहो । सोयी अहो तुमचिये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां यावें लागवेगें । पांडुरंगे धांवत ॥ ध्रु ॥
बैसायाची इच्छा कडे । चाली खडे रुपंताती[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपाळुवा । करीन सेवा लागली ॥ ३ ॥

---

१ त. देखें.—२ त. आइकें.—३ पं. पुरविता कोडें.—४ पं. पडे.—५ पं. रुपती.

॥ २४२४ ॥

आह्मी जालों एकविध । सुद्या सुदें असावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ यावरी तुमचा मोळा । तो गोपाळा अढळ ॥ ध्रु ॥
घेतलें तें उसणें द्यावें । कांहीं भावें [1]विशेषें ॥ २ ॥
तुका ह्मणे क्रियानष्ट । तरी कष्ट घेतसां ॥ ३ ॥

॥ २४२५ ॥

[2]आह्मी आर्तभूत जिवीं । तुह्मी गोसावी तों [3]उदास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वादावाद समर्थाशीं । काशानशीं करावा ॥ ध्रु ॥
आह्मी मरों वेरझारीं । स्वामी घरीं बैसले ॥ २ ॥
तुका ह्मणे करितां वाद । कांहीं भेद कळेना ॥ ३ ॥

॥ २४२६ ॥

पुसावें तें ठाईं आपुल्या आपण । अहंकारा शून्य घालूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येर वाग्जाळ मायेचा अहंकार । वचनाशीं थार अज्ञान तें ॥ ध्रु ॥
फळ तें चि बीज बीज तें ची फळ । उपजावें मूळ न पालटे ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघे गव्हांचे प्रकार । सोनें अलंकार मिथ्या नांव ॥ ३ ॥

॥ २४२७ ॥

माझी आतां सत्ता आहे । तुह्मां पायां हे वरती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एकाविण नेणें दुजा । पंढरिराजा सर्वांगें ॥ ध्रु ॥
पुरवावी केली आळी । जे जे काळीं [4]मागेन तें ॥ २ ॥
तुका ह्मणे सुटसी कैसा । धरूनि दिशा राहिलों ॥ ३ ॥

---

१ त. विशेष.—२ त. "आह्मी" नाहीं.—३ पं. "तों" नाहीं.—४ दे. त. मागण.

॥ २४२८ ॥

फावलें तुह्मां मागें । नवतों लागें पावलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आलों आतां उभा राहें । जवळी पाहें सन्मुख ॥ ध्रु ॥
घरीं होती गोवी जाली । कामें बोली न घडे चि ॥ २ ॥
तुका ह्मणे धडफुडा । जालों झाडा देई देवा ॥ ३ ॥

॥ २४२९ ॥

आतां नये बोलों अव्हेराची मात । बाळावरि चित्त असों द्यावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुज कां सांगणें लागे हा प्रकार । परि हें उत्तर आवडीचें ॥ध्रु॥
न वंचीं वो कांहीं एकही प्रकार । आपणां अंतर नका मज ॥ २ ॥
तुका ह्मणे मोहो राखावा सतंत । नये पाहों अंत पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ २४३० ॥

करूनि राहों जरी आत्मा चि प्रमाण । निश्चळ नव्हे मन काय करूं ॥१॥
॥ ध्रु. ॥ जेवलिया विण काशाचे ढेंकर । शब्दाचे प्रकार शब्द चिंते ॥ध्रु॥
पुरे पुरे आतां तुमचें ब्रह्मज्ञान । आह्मासी चरण न सोडणें[1] ॥ २ ॥
विरोधें विरोध वाढे पुढतोपुढती । वासनेचे हातीं गर्भवास ॥ ३ ॥
सांडीमांडीअंगीं वसे पुण्यपाप । बंधन[2] सकल्प या चि नांवें ॥ ४ ॥
तुका ह्मणे नाहीं मुक्तता मोकळी । ऐसा कोण बळी निरसी[3] देह ॥ ५ ॥

॥ २४३१ ॥

तुमचे स्तुतियोग्य कोठें माझी वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भक्तिभाग्य तरी नेदीं तुळसीदळ । जोडूनि अंजुळ उभा असें ॥ ध्रु ॥

---

१ त. दे. सोडवे.—२ त. बंधनें.—३ पं. निरसे.

कैचें भाग्य ऐसें पाविजे संनिध । नेणें पाळूं विध करुणा भाकीं ॥ २ ॥
संतांचे सेवटीं उच्छिष्टाची आस । करूनियां वास पाहातसें ॥ ३ ॥
करीं इच्छा मज ह्मणोत आपुलें । एखादिया बोलें निमित्याच्या ॥ ४ ॥
तुका ह्मणे शरण आलों हें साधन । करितों चिंतन रात्रदिवस ॥ ५ ॥

॥ २४३२ ॥

सर्वविशीं आह्मीं हे चि जोडी केली । स्वामीची साधिली चरणसेवा ॥१॥
॥ ध्रु. ॥ पाहिलें चि नाहीं मागें परतोनी । जिंकिला तो क्षणीं[1] क्षण काळ ॥ ध्रु ॥
नाहीं पडों दिला विचाराचा गोवा । नाहीं पाठी हेवा येऊं दिलों[2] ॥ २ ॥
केलों[3] लाग वेगीं अवघी चि तांतडी । भावना ते कुडी दुराविली ॥ ३ ॥
कोठें मग ऐसें होतें सावकास । जळो तया आस वेव्हाराची ॥ ४ ॥
तुका ह्मणे लाभ घेतला पालवीं । आतां नाहीं गोवी कशाची ही ॥ ५ ॥

॥ २४३३ ॥

येणें मुखें तुझे वर्णीं गुण नाम । तें चि मज प्रेम देईं देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ डोळे भरूनियां पाहें तुझें मुख । तें चि मज सुख देईं देवा ॥ध्रु॥
कान भरोनियां ऐकें[4] तुझी कीर्ती । ते मज विश्रांती देईं देवा ॥ २ ॥
वाहें रंगीं टाळी नाचेन उदास । हें देईं हातांस पायां बळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा सकळ देहभाव । आणीक नको ठाव चिंतूं यासी ॥४॥

॥ २४३४ ॥

तूं माझा मायबाप सकळ वित्त गोत ।
तूं चि माझें हित करिता देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तूं चि माझा देव तूं चि माझा जीव ।

---

१ पं. क्षणक्षणीं.—२ पं. दिली.—३ पं. केली लागवेगीं.—४ पं. ऐकेन.

तूं चि माझा भाव पांडुरंगा ॥ ध्रु ॥
तूं चि माझा आचार तूंचि माझा विचार ।
तूं चि सर्व भार चालविसी ॥ २ ॥
सर्व भावें मज तूं होसी प्रमाण । ऐशी तुझी आण वाहातसें[1] ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज विकला जीवभाव । कळे तो उपाव करीं आतां ॥ ४ ॥

॥ २४३५ ॥

वारंवार तुज द्यावया आठव । आइक[2] तो भाव माझा कैसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गेले[3] मग नये फिरोन दिवस । पुढिलांची आस गणित नाहीं ॥ ध्रु ॥
गुणां अवगुणांचे पडती आघात । तेणें होय चित्त कासावीस ॥ २ ॥
कांहीं एक तुझा न देखों आधार । ह्मणऊनी धीर नाहीं जीवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तूं ब्रह्मांडाचा जीव । तरि कां आह्मी कींव भाकीतसों ॥ ४ ॥

॥ २४३६ ॥

असोत हे तुझे प्रकार सकळ । काय खळखळ करावी हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आमुचें स्वहित जाणतसों आह्मी । तुझें वर्म नामीं आहे तुझ्या ॥ ध्रु ॥
विचारितां आयुष्य जातें वांयांविण । रोज नांगवण[4] पडतसे ॥ २ ॥
राहेन मी तुझे पाय आठवूनी । आणीक तें मनीं येऊं नेदीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें येसी अनायासें । थोर तुज[5] पिसें कीर्तनाचें ॥ ४ ॥

॥ २४३७ ॥

विष्णुदासां[6] भोग । जरी[7] आह्मां पीडी रोग ॥ १ ॥

---

१ दे. त. वाहातुसें.—२ दे. पं. ऐक.—३ पं. गेला.—४ त. रोज जन्मा गोवण पडतसे।.—दे. पूर्वीं तळेगांवाप्रमाणें होतें.—५ पं. "तुज" नाहीं.—६ पं. 'विष्णुदासां' याबद्दल नाहीं हरिच्या दासां.—७ पं. 'जरी' याबद्दल तरि कां.

॥ ध्रु. ॥ तरि हें दिसे लाजिरवाणें । काय तुह्मांसी सांगणें ॥ ध्रु ॥
आह्मां काळें खावें[1] । बोलिलें तें वांयां जावें ॥ २ ॥
तुका ह्मणे दास । आह्मी भोगूं गर्भवास ॥ ३ ॥

॥ २४३८ ॥

भावें गावें गीत । शुद्ध करूनियां चित्त ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुंज[2] व्हावा आहे देव । तरि हा सुलभ उपाव ॥ ध्रु ॥
आणिकांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ॥ २ ॥
मस्तक ठेंगणा । करीं[3] संतांच्या चरणा ॥ ३ ॥
वेचीं तें वचन । जेणें राहे समाधान ॥ ४ ॥
तुका ह्मणे फार । थोडा तरी पर उपकार ॥ ५ ॥

॥ २४३९ ॥

वचन तें[4] नाहीं तोडीत शरीरा । भेदत अंतरा वज्राऐसें[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं न सहावे काशा[6] ही कारणें । संदेह निधान देह बळी ॥ ध्रु ॥
नाहीं शब्द मुखीं लागत तिखट । नाहीं जड होत[7] पोट तेणें ॥ २ ॥
तुका ह्मणे जरी गिळे अहंकार । तरी वसे घर नारायण ॥ ३ ॥

॥ २४४० ॥

नव्हो आतां जीवीं कपटवसती । मग काकुळती कोणा यावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्याचिये मापें गांठीं नये नाड । आदि अंत गोड नारायण ॥ ध्रु ॥
चोखटिया नाहीं विटाळाचा आघात । साच तें साचांत सांचा[8] पडे ॥ २ ॥

---

१ पं. खाये । बोलितें वायां जाये ।.—२ पं. जरि तुज व्हावा देव । .—३ पं. लागें.—४ पं. हें.—५ पं. वज्राऐसा.—६ दे. काशा करणें. त. कासया कारणें.—७ पं. पोट होत. त. मागून 'पोट होत' असा पाठ केला आहे.—८ पं. सांच.

विचारिली वाट उसंत सीतळ । बुद्धीपुढें बळ तृणतुल्य ॥ ३ ॥
आहाराच्या घासें पचोनियां जिरे । वासना ही उरे उर्वरीत[1] ॥ ४ ॥
तुका ह्मणे ताळा घालावा वचनीं । तूं माझी जननी पांडुरंगे ॥ ५ ॥

॥ २४४१ ॥

नव्हती हीं माझीं जोयाचीं[2] भूषणें । असे नारायणें उचित केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शब्दाच्या वोवोनी[3] रत्नाचिया माळा । मुळींचा जिव्हाळा झरवणी ॥ ध्रु ॥
अर्थांतरीं असे अनुभवसेवन । परिपाकीं मन साक्ष[4] येथें ॥ २ ॥
तुका ह्मणे मज सरतें परतें । हें नाहीं अनंतें उरों दिलें ॥ ३ ॥

॥ २४४२ ॥

सहज लीळा मी साक्षी याचा[5] । नये वंचूं वाचा ऐसें जालें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उपक्रमें वदे निशब्दाची वाणी । जे कोठें बंधनीं गुंपों नेणें ॥ ध्रु ॥
तम नासी परि वेव्हारा वेगळा । रविप्रभाकळा[6] वर्ते जन ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें गेला अतिशय । आतां पुन्हा नये तोंड दावूं ॥ ३ ॥

॥ २४४३ ॥

बोलाल या आतां आपुल्यापुरतें । मज या अनंतें गोवियेलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ झाडिला न सोडी हातींचा पालव । वेधी वेधें जीव वेधियेला ॥ ध्रु ॥
तुमचे ते शब्द कोरडिया गोष्टी । मज सर्वें मिठी अंगसंगें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मां होईल हे परी । अनुभव वरी येईल मग ॥ ३ ॥

---

१ दे. त. उरउरीत.—२ पं. जयाचीं.—३ पं. वोवणीं.—४ पं. साक्षी.—५ पं. तयाचा.—६ पं. °कळे.

॥ २४४४ ॥

जैशा तुह्मी दुरी आहां । तैशा राहा अंतरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नक्का येऊं देऊं आळ । अंगीं गोपाळ लडलासे ॥ ध्रु ॥
अवघा हा[1] चि राखा काळ । विक्राळ चि भोंवता ॥ २ ॥
तुका ह्मणे मज ऐशा । होतां पिशा जगनिंद्य ॥ ३ ॥

॥ २४४५ ॥

सतीचें तें घेतां वाण । बहु कठीण परिणामीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जिवासाटीं गौरव वाढे । आहाच जोडे तें नव्हे ॥ ध्रु ॥
जरि होय उघडी दृष्टि । तरि गोष्टी युद्धाच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे अंगा येतां । तरी सत्ता धैर्याची ॥ ३ ॥

॥ २४४६ ॥

आडवा तो उभा । असे दोटोनियां[2] प्रभा[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव नाहीं एकविध । एक भाव असे शुद्ध ॥ ध्रु ॥
भेदाभेद आटी । नाहीं फार कोठें तुटी ॥ २ ॥
तुका ह्मणे गोवा । उगवा वेव्हाराचा हेवा ॥ ३ ॥

॥ २४४७ ॥

एका बोटाची निशाणी । परीपाक[4] नाहीं मनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि तें संपादिलें सोंग । कारणावांचूनियां व्यंग[5] ॥ ध्रु ॥
वैष्णवांचा धर्म । जगीं[6] विष्णु नेणे वर्म ॥ २ ॥
अतिशयें पाप । तुका सत्य करी माप ॥ ३ ॥

---

१ पं. "हा" नाहीं.—२ त. ताणोनियां.—३ पं. उभा.— ४ दे. त. परीपाख.—५ दे. वेंग.—६ पं. जगीं.—

॥ २४४८ ॥

सत्यत्वेंशीं घेणें भक्तीचा अनुभव । स्वामीचा गौरव इच्छीतसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग तें अवीट न भंगे साचारें। पावलें विस्तारें फिरों नेणे ॥ ध्रु ॥
वाणी वदे त्याचा कोणांसी विश्वास । अभयें[1] करें दास सत्य तईं ॥ २ ॥
तुका ह्मणे आधीं न करीं तांतडी । पायीं जाली जोडी तेणें शुद्ध ॥ ३ ॥

॥ २४४९ ॥

सर्वात्मकपण । माझें हिरोनि नेतो[2] कोण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मनीं भक्तीची आवडी । हेवा व्हावी ऐशी जोडी ॥ ध्रु ॥
घेईन जन्मांतरें । हें चि करावया खरें ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । ऋणी करूनि ठेवूं सेवा ॥ ३ ॥

॥ २४५० ॥

आणितां[3] त्या गती । हंस काउळे न होती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांडा सांडा रे मठारे । येथें गांठीसवें धुरें ॥ ध्रु ॥
नाकेंविण मोती । उभ्या बाजारें[4] फजिती ॥ २ ॥
हुकुमदाज[5] तुका । येथें कोणी फुंदों नका ॥ ३ ॥

॥ २४५१ ॥

ढेंकणासी बाज गड । उतरचढ केवढी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होता तैसा कळों भाव । आला वाव अंतरींचा ॥ ध्रु ॥
बोरामध्यें वसे[6] अळी । अठोळीच भोंवती ॥ २ ॥
पोटासाटीं वेंची चणे । राजा ह्मणे तोंडें मी ॥ ३ ॥

---

१ त. पं. आभयकरें दास.—२ पं. नेतें.—३ पं. आणितांनि गती। हंस काउळी.—४ पं. बाजारा.—५ दे. त. हा चरण कायम ठेवून त्याजवर "ह्मणे विष्णुदास तुका।" हा पाठ घातला आहे.—६ पं. असे.

बेडकानें चिखल खावा । काय ठावा सागर ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसें आहे । काय पाहे त्यांत तें ॥ ५ ॥

॥ २४५२ ॥

धांव धांव गरुडध्वजा । आह्मां अनाथांच्या काजा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु जालों कासावीस । ह्मणोनि पाहें तुझी वास ॥ ध्रु ॥
पाहें पाहें त्या मारगें । कोणी येतें माझ्या लागें ॥ २ ॥
असोनियां ऐसा । तुज सारिखा कोंवसा ॥ ३ ॥
न लवावा उशीर । नेणों कां हो. केला धीर ॥ ४ ॥
तुका ह्मणे चाली । नको चालूं धांव घालीं ॥ ५ ॥

॥ २४५३ ॥

पांडुरंगे पांडुरंगे । माझे गंगे मौउलिये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पान्हां घालीं प्रेमधारा । पूर क्षीरा लोटों दे ॥ ध्रु ॥
अंगें अंग मेळउनी । करीं धणी फेडाया ॥ २ ॥
तुका ह्मणे घेइन उडया । सांडिन कुडया भावना ॥ ३ ॥

॥ २४५४ ॥

गजेंद्र पशु आतें मोकलिला । तो तुज स्मरला पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्यासाठीं गरुड सांडुनि धांवसी । माया झळंबसी दिनानाथा ॥ ध्रु ॥
धेनु वत्सावरी झेंप घाली जैसी । तैसें गजेंद्रासी सोडविलें ॥ २ ॥
तुका ह्मणे ब्रीद बांधलें यासाटीं । भक्तांसी संकटीं रक्षावया ॥ ३ ॥

---

१ पं. "पाहें पाहें०" व "असोनियां०" या दोन कडव्यांच्या जागा परस्पराशीं पालटल्या आहेत; आणि "पाहें पाहें" याबद्दल "पाहें" इतकेंच आहे.—२ पं. हो.—३ पं. फेडावया.—४ त. पं. गजेंद्र.—५ दे. झळंबेसी.

॥ २४५५ ॥

चारी वेद जयासाटीं । त्याचें नाम धरा कंठीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न करीं आणीक साधन[1] । कष्टसी कां वांयांविण ॥ ध्रु ॥
अठरा पुराणांचे पोटीं । नामाविण नाहीं गोठी[2] ॥ २ ॥
गीता जेणें उपदेशिली । ते हीं[3] विठेवरी माउली ॥ ३ ॥
तुका ह्मणे सार धरीं । वाचे हरिनाम उच्चारीं ॥ ४ ॥

॥ २४५६ ॥

पाहातां ठायाठाव । जातो अंतरोनि देव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नये वाटों गुणदोषीं । मना जतन येविशीं ॥ ध्रु ॥
त्रिविधदेह परिचारा । जनीं जनार्दन खरा ॥ २ ॥
तुका ह्मणे धीरें- । विण कैसें होतें बरें ॥ ३ ॥

॥ २४५७ ॥

नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरें[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे[5] सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥ ध्रु ॥
ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥ २ ॥
रामकृष्णहरिविठ्ठलकेशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥ ३ ॥
यांविण[6] असतां आणीक साधन । वाहातसें आण विठोबाची ॥ ४ ॥
तुका ह्मणे सोपें आहे सर्वांहूनि । शाहाणा तो धणी घेतो[7] येथें ॥ ५ ॥

---

१ दे. साधनें.—२ त. पं. गोष्टी.—३ पं. हे.—४ पं. जन्मांतरिंचीं.—५ पं. लगती.—६ पं. याहूनि आणीक नाहीं पैं साधन ।.—दे. पूर्वी असें होतें.—७ पं. घेत असे.

॥ २४५८ ॥

भाविकांचें काज अंगें देव करी । काढी धर्माघरीं उच्छिष्ट तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उच्छिष्ट तीं फळें खाय भिल्लटीचीं । आवडी तयांची मोठी देवा ॥ ध्रु ॥
काय देवा घरीं न मिळेची अन्न । मागे भाजीपान द्रौपदीसी[1] ॥ २ ॥
अर्जुनाचीं घोडीं धुतलीं अनंतें । संकटें बहुतें[2] निवारिलीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसीं आवडती लडिवाळें । जाणीवेचें काळें तोंड देवा ॥ ४ ॥

॥ २४५९ ॥

सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें । उभें पंढरीचे विटेवरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ डोळियांची धणी पाहातां न पुरे । तया लागीं झुरे मन माझें ॥ ध्रु ॥
आन गोड कांहीं न लगे संसारीं । राहिले अंतरीं पाय तुझे ॥ २ ॥
प्राण रिघों पाहे कुडी हे सांडुनी । श्रीमुख नयनीं न देखतां ॥ ३ ॥
चित्त मोहियेलें नंदाच्या नंदनें । तुका ह्मणे येणें गरुडध्वजें[3] ॥ ४ ॥

॥ २४६० ॥

ऐका[4] ऐका भाविकजन । कोणें[5] कोण व्हाल ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ॥ ध्रु ॥
नका शोधूं मतांतरें । नुमगे खरें बुडाल ॥ २ ॥
कलिमध्यें दास तुका । जातो[6] लोकां सांगत ॥ ३ ॥

---

१ पं. द्रौपदीचें.–२ पं. बहुत.–३ पं. गरुडध्वजा.–४ त. ऐका गा भाविक हो । कोण कोण व्हाल ते ॥.–५ दे. "व्हाल कोण कोण ते" असें मागून केलें आहे.–६ पं. करी लोका सावध ।.

॥ २४६१ ॥

आपुलिया आंगें तोडी मायाजाळ । ऐसें नाहीं बळ कोणापाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रांडापोरें त्याग करी कुटुंबाचा । नावरे हे वाचा आणि मन ॥ध्रु॥
हर्षामर्ष[1] जों हे नाहीं जों जिराले । तोंवरि हे केले चार त्यांनीं ॥ २ ॥
मुक्त जालों ऐसें बोलों जाये मुखें । तुका ह्मणे दुःखें बांधला तो ॥ ३ ॥

॥ २४६२ ॥

आलिया अतीता ह्मणतसां पुढारें । आपुलें रोकडें सत्त्व जाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय त्याचा भार घेऊनि मस्तकीं । हीनकर्मी लोकीं ह्मणावया ॥ध्रु॥
दारीं हाका कैसें करवतें भोजन । रुची तरि अन्न कैसें देतें ॥ २ ॥
तुका ह्मणे ध्वज उभारिला कर । ते शक्ति उदार काय जाली ॥ ३ ॥

॥ २४६३ ॥

जेथें लक्ष्मीचा वास । गंगा आली पापा नास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तें म्यां ह्रदयीं धरिलें । तापें[2] हरण पाउलें ॥ ध्रु ॥
सेवा केली संतजनीं । सुखें[3] राहिले लपोनी ॥ २ ॥
तुका ह्मणे वांकी । भाट जाली तिहीं लोकीं ॥ ३ ॥

॥ २४६४ ॥

रूपीं जडले लोचन । पायीं स्थिरावलें मन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देहभाव हरपला । तुज पाहातां विठ्ठला ॥ ध्रु ॥
कळों नये सुखदुःख । तान हरपली भूक ॥ २ ॥
तुका ह्मणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती ॥ ३ ॥

---

१ पं. हें कडवें नाहीं.—त. हर्षामर्ष हे जों नाहीं जिराले ।.—२ पं. तापशमन.—३ पं. सुख राहिलें.

॥ २४६५ ॥

जाणतें लेंकरूं । माता लागे दूर धरूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें न करीं कृपावंते । पांडुरंगे माझे माते ॥ ध्रु ॥
नाहीं मुक्ताफळा । भेटी मागुती त्या जळा ॥ २ ॥
तुका ह्मणे लोणी । ताक सांडी निवडूनि ॥ ३ ॥

॥ २४६६ ॥

तुजविण कोणां । शरण जाऊं नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा न देखें मी कोणी । दुजा तिहीं त्रिभुवनीं ॥ ध्रु ॥
पाहिलीं पुराणें । धांडोळिलीं दरुषणें ॥ २ ॥
तुका ह्मणे ठायीं । जडून ठेलों तुझ्या पायीं ॥ ३ ॥

॥ २४६७ ॥

ऐसें भाग्य कईं लाहाता होईन । अवघें देखें जन ब्रह्मरूप ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥ ध्रु ॥
शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥ २ ॥
विवेकासहित वैराग्याचें बळ । धगधगितोज्ज्वाळ अग्नि जैसा ॥ ३ ॥
भक्ति नवविधा भावशुद्ध बरी । अळंकारावरी मुगुटमणि ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझी पुरवी वासना । कोण नारायणा तुजविण ॥ ५ ॥

॥ २४६८ ॥

कासया करावे तपाचे डोंगर । आणीक अपार दुःखरासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया फिरावे अनेक ते देश । दावितील आस पुढें लाभ ॥ ध्रु ॥

---

१ पं. जालें जाणतें०.—२ पं. करीं.—३ त. पं. आणीक.

कासया पुजावीं अनेक[1] दैवतें । पोटभरे तेथें लाभ नाहीं ॥ २ ॥
कासया करावे मुक्तीचे सायास । मिळे पंढरीस फुका साटीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे करीं कीर्तन पसारा । लाभ येईल घरा पाहिजे तो ॥ ४ ॥

॥ २४६९ ॥

वैष्णवमुनिविप्रांचा सन्मान । कराया आपण घेऊं नये ॥ १ ॥
प्रभु जाला तरी संसाराचा दास । विहित[2] तयासी[3] यांची सेवा ॥ २ ॥
तुका ह्मणे हे आशीर्वादें बळी । जाईल तो छळी नरकायासीं ॥ ३ ॥

॥ २४७० ॥

देव वसे चित्तीं । त्याची घडावी संगती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें आवडतें मना । देवा पुरवावी वासना ॥ ध्रु ॥
हरिजनांसी[4] भेटी । नहो अंगसगें[5] तुटी ॥ २ ॥
तुका ह्मणे जिणें । भलें संतसंघट्टणें ॥ ३ ॥

॥ २४७१ ॥

भाग सीण गेला । माझा सकळ विठ्ठला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझा ह्मणवितों दास । केली उच्छिष्टाची आस ॥ ध्रु ॥
राहिली तळमळ । तईं पासोनी सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे धालें । पोट ऐसें कळों आलें ॥ ३ ॥

॥ २४७२ ॥

रायाचें सेवक । सेवटीचें[6] पीडी रंक ॥ १ ॥

---

१ पं. आणीक.—२ पं. विहित हे त्यास.—३ त. तयास.—४ पं. हरिजनाची.—५ पं. अंगसंग.—६ सेवटील.

॥ ध्रु. ॥ हा तों हिणाव कवणा । कां हो नेणां नारायणा ॥ ध्रु ॥
परिसेंसी भेटी । नव्हे लोहोपणा तुटी ॥ २ ॥
तुझें नाम कंठीं । तुक्या काळासवें भेटी ॥ ३ ॥

॥ २४७३ ॥

सुखरूप ऐसें कोण दुजें सांगा । माझ्या पांडुरंगा सारिकें तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे हिंडणें मुंडणें तें कांहीं । साधनाची नाहीं आटाआटी ॥ध्रु॥
चंद्रभागे स्नान विधि[1] तो हरिकथा । समाधान चित्ता सर्वकाळ ॥ २ ॥
तुका ह्मणे काला वैकुंठीं दुर्लभ । विशेष तो[2] लाभ संतसंग ॥ ३ ॥

॥ २४७४ ॥

नसतां अधिकार उपदेशासी बळात्कार[3] ।
तरि ते केले हो[4] चार माकडा आणि गोरोडी[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन[6] धान्य राज्य बोल वृथा रंजवणें फोल ।
नाहीं तेथें ओल बीज वेची मूर्ख तो ॥ ध्रु ॥
नये बांधों गांठी पदरा आंगीं[7] ऐसी तुटी ।
असोन कसोटी शिष्टांचा अनुभव ॥ २ ॥
उपदेसी तुका मेघ वृष्टीनें आइका ।
संकल्पासी धोका सहज तें उत्तम ॥ ३ ॥

॥ २४७५ ॥

घालुनियां मापीं । देवभक्त बैसले जपीं ॥ १ ॥

---

१ "विधि" यावद्दल.—२ त. हा.—३ दे. त. वळत्कार.—४ पं. "हो" नाहीं.—५ दे. गारुडी.—त. गारूडी.—६ पं. धन्यधन्य राज्य०.—७ दे. पं. आण.

॥ ध्रु. ॥ तैसीं होते सांडउलंडी । निजनिजांची मुकुंडी[1] ॥ ध्रु ॥
अमुपीं उखतें । आपण वोस आपण यातें ॥ २ ॥
देव आतां जाला । उगवे संकोच वेहिला[2] ॥ ३ ॥
अखंड नेलें वेठी । भार सत्याविण गांठी[3] ॥ ४ ॥
आंडकिला[4] झोंपा । रिता कळिवराचा खोंपा ॥ ५ ॥
गोदातीरीं[5] आड । करिते[6] करविते द्वाड ॥ ६ ॥
तुका ह्मणे बळें । उपदेशाचें तोंड काळें ॥ ७ ॥

॥ २४७६ ॥

उंबरांतील कीटका । हें चि ब्रह्मांड ऐसें लेखा[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसीं उंबरें किती झाडीं । ऐशीं झाडें किती नवखंडीं[8] ॥ ध्रु॥
हें चि ब्रह्मांड आह्मांसी । ऐसीं अगणित अंडें कैसीं ॥ २ ॥
विराटाचे अंगीं तैसे । मोजूं जातां अगणित केंश ॥ ३ ॥
ऐशा विराटाच्या कोटी । सांटवल्या ज्याच्या पोटीं ॥ ४ ॥
तो हा नंदाचा बाळमुकुंद । तान्हा ह्मणवी परमानंद ॥ ५ ॥
ऐशी अगम्य ईश्वरी लीळा । ब्रह्मानंदीं गम्य तुक्याला ॥ ६ ॥

॥ २४७७ ॥

ब्रह्मज्ञान जरी[9] एके दिवसीं कळे । तात्काळ हा गळे अभिमान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अभिमान लागे शुकाचिये पाठी । व्यासें उपराटी दृष्टी केली ॥ ध्रु ॥
जनकभेटीसी[10] पाठविला तेणें । अभिमान नाणें खोटें केलें ॥ २ ॥
खोटें करूनियां लाविला अभ्यासीं । मेरुशिखरासी शुक गेला ॥ ३ ॥

---

१ दे. मुकंडी.—२ पं. गहिला.—३ पं. गोठी.—४ पं. हें कडवें नाहीं.—५ पं. गंगेतीरीं.—६ त. करी.—७ पं. देखा.—८ दे. नवखडीं.—९ दे. त. तरी.—१० पं. जनकभेटी.

जाऊनियां तेणें[1] साधिली समाधी । तुका ह्मणे तधीं होतों आह्मी ॥४॥

॥ २४७८ ॥

सहज पावतां भगवंतीं परि हीं[2] विकल्पें परतीं ।
फुकाची हे चित्तीं आठवण[3] कां न धारिती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हरि व्यापक सर्वगत [4]हें तंव मुख्यत्वें वेदांत ।
चिंतनासी चित्त असों द्यावें सावध ॥ ध्रु ॥
विरजाहोम या चि नांवें देह नव्हे मी जाणावें ।
मग कां जी यावें वरी लागे संकल्पा ॥ २ ॥
कामक्रोधें देह मळिण स्वाहाकारीं कैंचें पुण्य ।
मंत्रीं पूजियेला यज्ञ मनमुंडण नव्हे चि ॥ ३ ॥
अनन्यभक्तीचे उपाय ते या विठोबाचे पाय ।
ध्याइल तो काय जाणे चुकों[5] मारग ॥ ४ ॥
आतां सांगे तुका एक तुह्मी चुकों नका ।
सांडीमांडी धोका शरण रिघतां गोमटें ॥ ५ ॥

॥ २४७९ ॥

आह्मीं जाणावें तें काईं तुझें वर्म कोणे ठायीं ।
अंतपार नाहीं ऐसें श्रुति बोलती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होईं मज तैसा मज तैसा साना सकुमार त्वृषीकेशा[6] ।
पुरवीं माझी आशा भुजा चारी दाखवीं ॥ ध्रु ॥
खालता सप्त ही पाताळा वरता स्वर्गाहूनि ढिसाळा ।

---

१ पं. तेथें.—२ पं. हे.—३ दे. वाठवण.—४ पं. हा.—५ पं. चुकों जाणे.—६ दे. त. रुषीकेशा.

तो मी मशक[1] डोळां कैसा पाहों आपुल्या[2] ॥ २ ॥
मज असे[3] हा भरवसा पढीयें होसी[4] तयां तैसा ।
पंढरीनिवासा तुका ह्मणे गा विठोबा ॥ ३ ॥

॥ २४७९ ॥

वृक्ष वल्ली आह्मां सोयरीं वनचरें । पक्षी ही सुस्वरें आळविती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुण दोष अंगा येत ॥ ध्रु ॥
आकाश मंडप पृथिवी[5] आसन । रमे तेथें मन क्रीडा करी ॥ २ ॥
कंथाकुमंडल देहउपचारा । जाणवितो वारा अवसरु[6] ॥ ३ ॥
हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ॥ ४ ॥
तुका ह्मणे होय मनासी संवाद । आपुला चि वाद आपणांसी ॥ ५ ॥

॥ २४८० ॥

अनंत ब्रह्मांडें[7] । एके रोमीं ऐसें घेंडें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो यां गौळियांचे घरीं । उंबरा चढतां टेंका धरी ॥ ध्रु ॥
मारी[8] दैत्य गाढे । ज्यांचे पुराणीं पवाडे ॥ २ ॥
तुका ह्मणे कळा । अंगीं जयाच्या सकळा ॥ ३ ॥

॥ २४८१ ॥

सावधान ऐसें काय तें विचारा । आले हो संसारा सकळ ही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतीं समयाचा करणें विचार । वेचती सादर घटिका पळें ॥ ध्रु ॥
मंगळ हें नोहे कन्यापुत्रादिक । राहिला लौकिक अंतरपाट[10] ॥ २ ॥
तुका ह्मणे देव अंतरला दुरी । डोळिया अंधारी पडलीसे ॥ ३ ॥

---

१ दे. त. मस्यक. पं. मश्यक.—२ दे. आपला.—३ पं. आहे.—४ दे. वोसी.—५ पं. पृथ्वी.—दे. पृथुवी.—६ दे. त. अवश्वरु.—७ पं. ब्रह्मांड.—८. पं. हा.—९ पं. मारियेले.—१० पं. अंत्रपाट.

॥ २४८२ ॥

लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा समरस जालों । तुजमाजी हरपलों ॥ ध्रु ॥
अग्निकर्पुराच्या मेळीं । काय उरली काजळी ॥ २ ॥
तुका ह्मणे होती । तुझी माझी एक ज्योती ॥ ३ ॥

॥ २४८३ ॥

सुख नाहीं कोठें आलिया संसारीं । वांया हांवभरी होऊं नका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दुःखबांदवडी आहे हा संसार ।
सुखाचा विचार नाहीं कोठें ॥ ध्रु ॥
चवदा कल्पेंवरी आयुष्य जयाला ।
परी तो राहिला ताटीखालीं[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे वेगीं जाय सुटोनियां ।
धरूनि त्वदयामाजी हरि ॥ ३ ॥

॥ २४८४ ॥

तुज करितां नव्हे[2] ऐसें कांहीं नाहीं ।
डोंगराची राई रंक राणा[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥अशुभाचें शुभ करितां तुज कांहीं ।
अवघड नाहीं पांडुरंगा[4] ॥ ध्रु ॥
सोळा सहस्र नारी ब्रह्मचारी कैसा ।
निराहारी दुर्वासा नवल नव्हे ॥ २ ॥
पंचभ्रतार[5] द्रौपदी सती ।

---

१ पं. ताटीतळीं.—२ त. दे. होय.—३ प. राणे.—४ पं. नारायणा.—५ पं. पंचभ्रतारांची द्रौपदी ते सती ॥.

करितां पितृशांती[1] पुण्य धर्मा ॥ ३ ॥
दशरथा पातकें ब्रह्महत्ये[2] ऐसीं ।
नवल त्याचे कुशीं जन्म तुझा ॥ ४ ॥
मुनेश्वरा[3] नाहीं दोष अनुमात्र[4] ।
भांडावितां सुत्रें[5] वध होती ॥ ५ ॥
तुका ह्मणे[6] माझे दोष ते[7] कायी ।
सरता तुझें[8] पायीं जालों देवा ॥ ६ ॥

पाळणा.

॥ २४८५ ॥

जननिया बाळका रे घातलें पाळणा ।
पंचतत्त्वीं जडियेल्या वारतिया चहूं कोणा ।
अखंड जडियेल्या तया ढाळ अंगणा ।
वैखरी धरूनि हातीं भाव दावी खेळणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निजीं रे निजीं आतां ।
ह्मणोनि परियें[9] दे माता ।
खेळतां कष्टलासी बाळा तूं रे नेणतां ।
निजीं रे निजीं आतां ॥ ध्रु ॥
खेळतां बाहेरि रे मुला लोकांच्या सवें ।
बागुल काळतोंडा नाहीं नेतो तें ठावें ।
खेळतां दुश्चित्ता[10] रे देखोनि तें न्यावें ।
ह्मणोनि सांगें तुज शीघ्र वचन पाळावें ॥ २ ॥

---

१ पं. गोत्रशांती.—२ पं. ब्रह्महत्यारासी.—३ "मुनीश्वरा" यावद्दल.—४ "अणुमात्र" यावद्दल.—५ पं. 'सुत्र वध' यावद्दल स्तोत्रवंद्य.—६ पं. ह्मणे तेथें माझे.—७ पं. "ते" नाहीं.—८ त. दे. तुझा.—९ त. पं. परिये.—१० पं. दुश्चित.

* सुत्र (सुत) असें यमका करितां केलें असावें.

संचित मागें तुज शुद्ध होतें सांगाती ।
तेणें तुज वांचविलें वेरझारिया हातीं ।
आणीक नेलीं मागें काय जाणों तीं किती ।
आलासि येथवरि थोरपुण्यें[1] बहुतीं ॥ ३ ॥
खेळतां शुक देवा तो रे लागला पाठीं ।
लपाला वरुषें बारा तिये[2] मातेचे पोटीं ।
रिघतां बाहेरि रे पळे वेऊनि कासोटी ।
ते[3] चि परी जाली स्वामी भेणें रिघें कपाटीं ॥ ४ ॥
खेळतां चक्रवर्ती जनका लागला धाक ।
पडिला अग्नीमाजी पाव जळत एक ।
भरलासे कांप अंगीं सुख नाठवें दुःख ।
आप पर तें ही नाहीं देहभाव सकळिक ॥ ५ ॥
सिभ्रीया* चक्रवर्ती कव पडिली अवचिती ।
धीट तो न भे तया मास कापिलें हातीं ।
टाकिलें तयावरी खुणें गोविला अंतीं ।
पावला मायबाप हिरोन घेतला हातीं ॥ ६ ॥
बांधलें अजामेळा वेश्यागणीका कैसी ।
मारिली हाक धाकें कळलें मायबापासी ।
घातली धांव नेटें वेगीं[4] पावला त्यासी ।
हिरोनि नेलीं दोघें आपणयां[5] तीं पासीं ॥ ७ ॥
धरूनी आठवू[6] रे बाळा राहें निश्चळ ।

---

१ पं. थोरपुण्य.—२ पं. तये.—३ पं. तेणें परि० —४ पं. त्वरे.—५ पं. आपयातीपासी.—
६ पं. आटबू.
* शिबिराया.

खेळतां दुश्चिता रे नको जाऊं बरळ ।
टोंकताहे तुजलागीं दिवस लेखूनी काळ ।
मग नेदी आठवूं रे नेत्रीं घालीं पडळ ॥ ८ ॥
ऐसी तीं कृपावंतें बाळा मोहिलें चित्त ।
सुस्वरें कंठ गाय मधुर आणि संगीत ।
तेणें तें चि चित्त राहे होऊनियां निवांत ।
पावती तुका ह्मणे नाहीं विश्वास ते घात ॥ ९ ॥
॥ १ ॥

॥ २४८६ ॥

उभ्या बाजारांत कथा । हे तों नावडे पंढरिनाथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघें पोटासाटीं ढोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ ध्रु ॥
लावी अनुसंधान । कांहीं देईल ह्मणऊन ॥ २ ॥
काय केलें रांडलेंका । तुला राजी नाहीं तुका ॥ ३ ॥

॥ २४८७ ॥

असोत लोकांचे बोल शिरावरी ।
माझी मज बरी विठाबाई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपंगिलें मज आहे ते कृपाळु ।
बहुत कनवाळु अंतरींची ॥ ध्रु ॥
वेदशास्त्रें जिसी वर्णिती पुराणें ।
तिचें मी पोसणें लडिवाळ ॥ २ ॥
जिचें नाम कामधेनु कल्पतरू ।
तिचें मी लेंकरूं तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ २४८८ ॥

वाराणसी गया पाहिली द्वारका । परी नये तुका पंढरीच्या ॥ १ ॥
पंढरीसी नाहीं कोणा अभिमान । पायां पडे जन एकमेका ॥२॥
तुका ह्मणे जाय एकवेळ पंढरी । तयाचिये घरीं यम न ये ॥ ३ ॥

॥ २४८९ ॥

सांडुनियां सर्व लौकिकाची लाज । आळवा यदुराज भक्तिभावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहूनियां झाडें वरबडूनि पाला । खाऊनि विठ्ठला आळवावें ॥ध्रु॥
वेंचूनियां चिंध्या भरूनियां धागा । गुंडाळूनि ढुंगा आळवावें ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें मांडिल्या निर्वाण । तया नारायण उपेक्षीना ॥ ३ ॥

॥ २४९० ॥

दह्यांचिया अंगीं निघे ताक लोणी । एका मोलें दोन्ही मागों नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आकाशाचे पोटीं चंद्र तारांगणें । दोहींशी समान पाहों नये ॥ ध्रु ॥
पृथ्वीचा पोटीं हिरा गारगोटी । दोहींसी संसोटी करूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे तैसे संत आणि जन । दोहींसी समान भजूं नये ॥ ३ ॥

॥ २४९१ ॥

तेरा दिवस जाले निश्चक्र करितां । न पवसी अनंता मायबापा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाषाणांची खोळ घेउनि बैसलासी । काय हृषीकेशी जालें तुज ॥ ध्रु ॥
तुजवरी आतां प्राण मी त्यजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा ॥ २ ॥
फार विठाबाई धरिली तुझी आस । करीन जीवा नास पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां मांडिलें निर्वाण । प्राण हा सांडीन चंद्रभागे ॥ ४ ॥

---

१ पं. एक वेळा.—२ दे. त. समसाटी.—३ पं. बोधाची.—४ दे. त. तजीन.—५ पं. हें कडवें नाहीं.—६ त. तुजवरी.—७ पं. तुजवरी.

॥ २४९२ ॥

लोक फार वाखा अमंगळ जाला । त्याचा त्याग केला पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विषयां[1] वंचलों मीपणा मुकलों । शरण तुज आलों पांडुरंगा ॥ ध्रु ॥
घर दार अवघीं त्यजिलीं[2] नारायणा । जीवींच्या जीवना पांडुरंगा ॥ २ ॥
तुका ह्मणे पडिलों[3] पुंडलिकापाशीं । धांव[4] हृषीकेशी आलिंगीं मज ॥ ३ ॥

॥ २४९३ ॥

इंद्रियांचीं दिनें । आह्मी केलों नारायणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि ऐसें सोसीं । काय सांगों कोणांपाशी ॥ ध्रु ॥
नाहीं अंगीं बळ । त्याग करीसा सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे मोटें । प्रारब्ध होतें खोटें ॥ ३ ॥

॥ २४९४ ॥

हातीं धरूं जावें[4] । तेणें परतें चि व्हावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा कां हो आला वांटा । हीन भाग्याचा करंटा ॥ ध्रु ॥
देव ना संसार । दोहीं ठायीं नाहीं थार ॥ २ ॥
तुका ह्मणे पीक । भूमि न दे न मिळे भीक ॥ ३ ॥

॥ २४९५ ॥

पोलें घातलें रडाया । नाहीं असुं आणि माया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा भक्तिवाद काय । रंगबेगडीचा न्याय ॥ ध्रु ॥
वेठी धरिल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव[5] ॥ २ ॥
काजव्याच्या ज्योती । तुका ह्मणे न लगे वाती ॥ ३ ॥

॥ २४९६ ॥

तरि च जन्मा यावें । दास विठ्ठलाचें व्हावें ॥ १ ॥

---

१ पं. विषयीं चेवलों.—२ दे. त. तजिलीं.—३ पं. वहु जालों कासाविसी ।.—४ पं. धांवे.—५ पं. ठाव.

॥ ध्रु. ॥ नाहीं तरि काय थोडीं । श्वानशूकरें[1] बापुडीं ॥ ध्रु ॥
ज्योल्याचें[2] तें फळ । अंगीं लागों नेदी मळ ॥ २ ॥
तुका ह्मणे भले । ज्याच्या नांवें[3] मानवलें ॥ ३ ॥

॥ लळतें ९ ॥

॥ २४९७ ॥

देव ते संत देव ते संत । निमित्य त्या प्रतिमा ॥१ ॥
॥ ध्रु. ॥ मी तों सांगतसें भावें । असो ठावें सकळां ॥ ध्रु ॥
निराकारी ओस दिशा । येथें इच्छा पुरतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे रोकडें केणें । सेवितां येणें पोट धाय ॥ ३ ॥

॥ २४९८ ॥

न कळे[4] माव मुनि मागे ऐकी[5] अंतुरी ।
साठी संवत्सरां जन्म तया उदरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसा आकळे[6] गे माये चपळ वो ।
त्रिभुवनव्यापक[7] सकळ वो ॥ ध्रु ॥
हनुमंता भेटी गर्व हरिला दोहींचा ।
गरुडा विटंबना रूपा सत्यभामेच्या ॥ २ ॥
द्रौपदीचा भेद पुरविला समयीं ।
ऋषि फळवनीं देठीं लावितां[8] ठायीं ॥ ३ ॥
अर्जुनाच्या रथीं कपि स्तंभीं ठेविला ।
दोहीं पैज तेथें गर्व हरी[10] दादुला ॥ ४ ॥

---

१ पं. श्वान शूकर.—२ पं. जाल्याचें.—३ पं. नांवा.—४ पं. न कळे वो माव०.—५ पं. एक.—६ त. पं. आकळ वो.—७ पं.० व्यापक हरि सकळ वो.—८ पं. लावित्या.—९ त. तईं.—१० पं. हरी हा दादुला.

भावभक्ती सत्त्वगुण जाला दुर्जना ।
तुका ह्मणे सकळां छंदें खेळे आपणा[1] ॥ ५ ॥

॥ २४९९ ॥

उदारा कृपाळा अगा देवांच्या देवा ।
तुजसवें पण आतां आमुचा दावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसा जासी सांग आतां मजपासुनी ।
केलें वाताहात, दिलें संसारा पाणी ॥ ध्रु ॥
अवघीं आवरूनि तुझे लाविलीं पाठीं ।
आतां त्या विसर सोहंकोहंच्या गोष्टी ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां चरणीं घातली मिठी ।
पडिली ते पडो तुह्मा आह्मांसी तुटी ॥ ३ ॥

॥ २५०० ॥

जाली होती काया । बहु[2] मळीन देवराया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमच्या[3] उजळली नामें । चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥ ध्रु ॥
अनुतापें झाला झाडा । प्रारब्धाचा केला[4] तोडा ॥ २ ॥
तुका ह्मणे देह पायीं । ठेवूनि झालों उतराई ॥ ३ ॥

॥ २५०१ ॥

आजि[5] आनंदु रे एकी परमानंदु रे ।
जया श्रुति नेति नेति ह्मणती गोविंदु रे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठोबाचीं वेडीं आह्मां आनंदु सदा ।

---

१ दे. आपण.—२ पं. बहुत मळिण पंढरिराया.—३ पं. तुझ्या.—४ पं. नि तोडा ।.—५ पं. "आजि" नाहीं.

गाऊं नाचों वाऊं टाळी रंजवूं गोविंदा ॥ ध्रु ॥
सदा सण[1] सांत आह्मां नित्य दिवाळी ।
आनंदें निर्भर आमचा कैवारी बळी ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं जन्ममरणांचा धाक ।
संत सनकादिक तें आमचें कवतुक ॥ ३ ॥

॥ २५०२ ॥

प्राणिया[2] एक बीजमंत्र उच्चारीं ।
प्रतिदिनीं रामकृष्ण ह्मण कां मुरारि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें चि साधन रे तुज सर्व सिद्धींचें ।
नाम उच्चारीं पां[3] गोपाळाचें वाचे ॥ ध्रु ॥
उपास पारणें न लगे वनसेवन ।
न लगे धूम्रपान पंचाअग्नतापन[4] ॥ २ ॥
फुकाचें सुखाचें कांहीं न वेचें भांडार ।
कोटी यज्ञां परिस तुका ह्मणे हें सार ॥ ३ ॥

॥ २५०३ ॥

विठ्ठल कीर्तनाचे अंतीं । जय जय हरी जे ह्मणती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तें चि सुकृताचें फळ । वाचा रामनामें निखळ ॥ ध्रु ॥
बैसोनि हरिकथेसी । होय सावध चित्तासी ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याचा जन्म । सुफळ जाला भवक्रम[5] ॥ ३ ॥

॥ २५०४ ॥

न चलवे पंथ वेचें[6] नसतां पालवीं । शरीर विटंबिलें वाटे भीक मागावी ॥ १ ॥

---

१ दे. त. सन.—२ दे. त. प्राणियां.—३ पं. रे.—४ पं. पंचाग्निसाधन ।.—५ पं. भवश्रम.
—६ पं. वचन न सतां.

॥ ध्रु. ॥ न करीं रे तैसें आपआपणां । नित्य राम राम तुह्मी सकळ ह्मणा ॥ ध्रु ॥
राम ह्मणवितां[1] रांडा पोरें निरविशी । पडसी यमा हातीं जाचविती चौऱ्याशी ॥ २
मुखीं नाहीं राम तो[2] ही आत्महत्यारा ।
तुका ह्मणे लाज नाहीं तया गंव्हारा ॥ ३ ॥

॥ २५०५ ॥

थडियेसी निघतां पाषाणांच्या सांगडी ।
बुडतां मध्यभागीं तेथें कोण घाली[3] उडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न करीं रे तैसें आपआपणिया[4] ।
पतंग जाय वांयां जीवें ज्योती घालूनियां ॥ ध्रु ॥
सावधपणें सोमवल[5] वाटी भरोनियां प्याला ।
मरणा अंतीं वैद्य बोलावितो गहिला ॥ २ ॥
तुका ह्मणे करीं[6] ठायींचा चि विचार ।
जंव[7] नाहीं पातला यमाचा किंकर ॥ ३ ॥ ॥ ९ ॥

॥ २५०६ ॥

द्या जी माझा विचारोनियां विभाग ।
न खंडे हा लाग आहाचपणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ किती नेणों तुह्मां साहाते कटकट ।
आह्मी च वाईट निवडलों ते[8] ॥ ध्रु ॥
करितां[9] कलह जिवाचियेसाटीं ।
हे तुह्मां वोखटीं ढाळ देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे धीर कारण आपुला । तुह्मीं तों विठ्ठला मायातीत ॥ ३ ॥

---

१ पं. ह्मणतां.—२ त. तर. पं. "ही" नाहीं.—३ त. घाला.—४ दे. आपआपणा. पं. आपआपण्या.—५ तं. सोमल. पं. सोमवोल.—६ पं. करीं रे ठायींचा०.—७ पं. जवळि.—८ पं. "ते" नाहीं.—९ दे. त. करवितां कल्हें.

॥ २५०७ ॥

आमुचे ठाउके तुह्मां गर्भवास । बळिवंत दोष केले भोग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कास हा सांगावा नसतां नवलाव[1] । मैंदपणें भाव[2] भुलवणेचा ॥ध्रु॥
एका पळवूनि एका पाठी लावा । कवतुक देवा पाहावया ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्यांणें[3] असें चेतविलें । त्याच्यानें उगलें कैसें नव्हे ॥ ३ ॥

॥ २५०८ ॥

निर्दयासी तुह्मी करितां दंडण । तुमचें गाऱ्हाणें कोठें[4] द्यावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाकितों करुणा ऐकती कान । उगलें चि मौन्य धरिलें ऐसें ॥ध्रु॥
दीनपणें पाहें पाय भिडावोनि । मंजुळा वचनीं विनवीतसें ॥ २ ॥
तुका ह्मणे गांठी मनाची उकला । काय जी विठ्ठला पाहातसां ॥ ३ ॥

॥ २५०९ ॥

नसतों[5] किविलवाणें । कांहीं तुमच्या कृपादानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे चि तयाची ओळखी । धालें टवटवित मुखीं ॥ ध्रु ॥
वांयां जात नाहीं । वचन प्रीतीचें तें कांहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । सत्य येतें अनुभवा ॥ ३ ॥

॥ २५१० ॥

जालों[6] तंव साचें । दास राहवणें काचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें कां मिळतें उचित[7] । तुह्मी नेणा कृपावंत[8] ॥ ध्रु ॥
सिंहाचें तें पिलें । जाय घेऊनियां कोल्हें ॥ २ ॥
तुका ह्मणे नास । आह्मां ह्मणविलियां दास ॥ ३ ॥

---

१ दे. त. नवलावो.—२ दे. त. भावो.—३ पं. ऐसें जेंणें.—४ पं. कोणें.—५ त. नसतां.—६ पं. जाले नवसाचे.—७ पं. उचिता.—८ पं. कृपावंता.

॥ २५११ ॥

देवाच्या उद्देशें जेथें जेथें भाव । तो तो असे ठाव विश्वंभरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लोभाचे संकल्प पळालियावरी । कैंची तेथें उरी पापपुण्या ॥ ध्रु ॥
शुद्ध भक्ती मन जालिया निर्मळ । कुश्चळी[1] विटाळ वज्रलेप ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्याचें तयासी च कळे । प्रांत येतो फळें[2] कळों मग ॥ ३ ॥

॥ २५१२ ॥

कडसणी धरितां अडचणीचा ठाव । ह्मणऊनि जीव त्रासलासे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लौकिकाबाहेरि राहिलों निराळा । तुजविण वेगळा नाहीं दुजा ॥ ध्रु ॥
संकोचानें नाहीं होत धणीवरी । उरवूनि उरी काय काज ॥ २ ॥
तुका ह्मणे केलें इच्छे चि सारिखें । नाहींसें पारिखें येथें कोणी ॥ ३ ॥

॥ २५१३ ॥

हें चि जतन करा दान । धरुनी चरण राहिलों[3] तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक कांहीं न घलों[4] भार । बहुत[5] फार सांकडें ॥ ध्रु ॥
घ्यावी माझ्या हातें सेवा । हे चि देवा विनवणी ॥ २ ॥
तुका तुमचा ह्मणवी दास । तेणें[6] आस पुरवावी ॥ ३ ॥

॥ २५१४ ॥

आपल्या च स्फुंदें[7] । जेथें तेथें घेती छंदें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पडिला सत्यांचा दुष्काळ । बहु फार जाली घोळ ॥ ध्रु ॥
विश्वासाचे माठ । त्याचे कपाळीं तें नाट ॥ २ ॥
तुका ह्मणे घाणा । मूढा तीर्थीं[8] प्रदक्षिणा ॥ ३ ॥

---

१ पं. कुश्चळ.—२ पं. फळ.—३ पं. राहिलोंसें.—४ त. पं. घालीं.—५ पं. बहु.—६ पं. त्याची.—७ पं. फुंदे. दे. स्फुदे.—८ पं. तीर्थ प्रदक्षणा

॥ २५१५ ॥

उद्वेगाची धांव बैसली आसनीं[1]। पडिलें नारायणीं मोटळें[2] हें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सकळ निश्चिंती जाली हा भरवसा । नाहीं गर्भवासा येणें ऐसा ॥ ध्रु ॥
आपुलिया नांवें नाहीं आह्मां जिणें। अभिमान तेणें नेला देवें ॥ २ ॥
तुका ह्मणे चळे[3] एकाचिया सत्ता । आपुलें मिरवितां[4] पणें ऐसें ॥ ३ ॥

॥ २५१६ ॥

बहुतां पुरे ऐसा वाण । आलें धन घरासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घ्या रे फुका मोलेंविण । नारायण न भुला ॥ ध्रु ॥
ऐका निवळल्या मनें । बरवें कानें सादर ॥ २ ॥
तुका ह्मणे करूनि अंतीं । निश्चिंती[5] हे ठेवावी ॥ ३ ॥

॥ २५१७ ॥

माझी मज जाती आवरली देवा । नव्हतां या गोवा इंद्रियांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया मी तुझा ह्मणवितों दास । असतों उदास सर्व भावें ॥ ध्रु ॥
भवाचिये[6] भेणें धरियेली कास । न पुरतां आस काय थोरी ॥ २ ॥
तुका ह्मणे आपआपुलीं जतन । कैचें थोरपण मग तुह्मां ॥ ३ ॥

॥ २५१८ ॥

विनावितों तरी आणितोसि परी । याचकानें थोरी दातयाची ॥ १ ॥

---

१ पं. पडिलों.—२ पं. मोटाळें हें.—३ दे. चेळें.—४ पं. मी रिता पणें आसे ।.—५ दे. त. निश्चिंती.—६ दे. त. भयाचिया.

॥ ध्रु. ॥ आमुचे ही कांहीं असों द्या प्रकार । एकल्यानें थोर कैचे तुली ॥ ध्रु ॥
नेघावी जी कांहीं बहु साल सेवा । गौरव तें[2] देवा यत्न कीजे ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं आमुची मिरासीं । असावेंसीं[3] ऐसीं दुर्बळें चि ॥ ३ ॥

॥ २५१९ ॥

एका ऐसें एक होतें कोणा[4] काळें । समर्थाच्या बळें काय नव्हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घालूनि बैसलों मिरासीस पाया । जिंकों देवराया संदेह नाहीं ॥ ध्रु ॥
केला तो न संडीं आतां कइवाड । वारीन हे आड कामक्रोध ॥ २ ॥
तुका ह्मणे जोळीं[5] अळसाची धाडी । नव्हती आली जोडी कळों साच॥३॥

॥ २५२० ॥

जालें समाधान । तुमचे धरिले[6] चरण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां उठावेंसें मना । येत नाहीं नारायणा ॥ ध्रु ॥
सुरवाडिकपणें[7] । येथें सांपडलें केणें[8] ॥ २ ॥
तुका ह्मणे भोग[9] । गेला निवारला लाग ॥ ३ ॥

॥ २५२१ ॥

मुखाकडे वास । पाहें करूनियां आस[10] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां होईल ते शिरीं । मनोगत आज्ञा[11] धरीं ॥ ध्रु ॥
तुह्मीं अंगीकार । केला पाहिजे हें[12] सार ॥ २ ॥
तुका ह्मणे दारीं । उभें याचक मीं हरी ॥ ३ ॥

---

१ पं. उपकार.—२ पं. तो.—३ दे. असावेंसें —४ पं. कोण्या. दे. कोणां.—५ पं. जाली.—६ पं. देखिले.—७ त. पं. सुरवाडिकपेणें.—८ पं. पेणें.—९ पं. भोग.—१० पं.वास —११ पं. आज्ञाधारी.—१२ पं. तो.

संकल्पाच्या बीजें इंद्रियांची चाली। प्रारब्ध[1] तें घाली गर्भवासीं ॥ २ ॥
तुका ह्मणे बीजें जाळुनी सकळ। करावा[2] गोपाळ आपुला तो ॥ ३ ॥

॥ २५३० ॥

आतां होइन धरणेकरी। भीतरीच कोंडीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं केली जीवेंसाटी। तों कां गोष्टी रुचे ते[3] ॥ ध्रु ॥
आधीं निर्धार तो सार। भग भार सोसीन ॥ २ ॥
तुका ह्मणे खाऊं जेवूं। नेदूं होऊं वेगळा ॥ ३ ॥

॥ २५३१ ॥

होइल तरि पुसापुसी। उत्तर त्यांसी योजावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तोंवरि मी पुढें कांहीं। आपुलें नाहीं घालीत ॥ ध्रु ॥
जाणोनियां अंतर देव। जेव्हां भेव फेडील ॥ २ ॥
तुका ह्मणे धरिला हातीं। करील खंतीवेगळें ॥ ३ ॥

॥ २५३२ ॥

हा तों नव्हे कांहीं निराशेचा ठाव। भलें पोटीं वाव राखिलिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विश्वंभरें विश्व सामाविलें पोटीं। तेथें चि सेवटीं आह्मी असों ॥ध्रु॥
नेणतां चिंतन करितों अंतरीं। तेथें अभ्यंतरीं उमटेल ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा स्वामी अबोलणा। पुरवूं खुणे खुणा जाणतसों[4] ॥ ३ ॥

॥ २५३३ ॥

निष्ठुर तो दिसे[5] निराकारपणें। कोंवळा सगुणें[6] प्रतिपाळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केला चं करावा केला कइवाड। होईल तें गोड न पुरेते[7] ॥ ध्रु ॥

---

१ दे. प्रारब्ध. त. परारब्ध.—२ पं. करावें गोपाळें आपुले भाट.—३ दे. तें.—४ पं. जाणतसे.—५ त. असे.— ६ पं. सगुण.—७ पं. पुरते.

मथिलिया लागे नवनीत हातां । नासे वितळितां[1] आहाच तें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां मनाशीं विचार । करावा तो सार एकचित्त ॥ ३ ॥

॥ २५३४ ॥

बहु देवा बरें जालें । नसतें गेलें सोंवळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धोवटाशीं पडिली गांठी । जगजेठीप्रसादें ॥ ध्रु ॥
गादल्याचा जाला जाडा । गेली पीडा विकल्प ॥ २ ॥
तुका ह्मणे वरावरी । निर्मळ करी निर्मळा ॥ ३ ॥

॥ २५३५ ॥

स्वामित्वाचीं वर्मे असोनि जवळी । वाहों जावें मोळी गुणांसवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काबाडापासूनि सोडवा दातारा । कांहीं नका भारा पात्र करूं ॥ध्रु॥
धनवंत्र्याचिये[2] अंगीं सत्ताबळ । व्याधि तो सकळ तोडावया ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें मोड्यासी कोंपट । सांडव्याची वाट विसरावी ॥ ३ ॥

॥ २५३६ ॥

ऋणाच्या परिहारा जालों वोळगणा । द्यावी नारायणा वासलाती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जालों उतराई शरीरसंकल्पें । चुकों द्यावीं पापें सकळ ही ॥ ध्रु ॥
आजिवरि होतों धरूनि जिवासी । व्याजें कासाविसी बहु केलें ॥ २ ॥
तुका ह्मणे मना आणिला म्यां भाव । तुमचा तेथें ठाव आहे देवा ॥ ३ ॥

॥ २५३७ ॥

येणें पांगें पायांपाशीं । निश्चयेंसी राहेन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांगितली करीन सेवा । सकळ देवा दास्यत्व[3] ॥ ध्रु ॥

---

१ पं. वितळतां.—२ दे. त. धनमंत्र्याचिये. "धन्वंतऱ्याचिये" असावें.—३ त. दाशत्व.

बंधनाची तुटली बेडी । हे चि जोडी सग आह्मां ॥२ ॥
तुका ह्मणे नव्हें क्षण । पायांविण वेगळा ॥ ३ ॥

॥ २५३८ ॥

आपुल्या आपण उगवा लिगाड । काय माझें जड करून घ्याल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उद्धारासी[1] काय उधाराचें काम । वाढवूं चि श्रम नये देवा ॥ ध्रु ॥
करा आतां मजसाटीं वाड पोट । ठाव नाहीं तटें[2] जालें लोकीं ॥ २ ॥
तुका ह्मणे बाकी झडालियावरी । न पडें व्यवहारीं[3] संचिताचे ॥ ३ ॥

॥ २५३९ ॥

सर्व संगीं विट आला । तूं एकला आवडसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दिली आतां पायीं मिठी । जगजेठी न सोडीं ॥ ध्रु ॥
बहु जालों क्षेदक्षीण[4] । येणें सीण तो नासे ॥ २ ॥
तुका ह्मणे गंगे[5] वास । बहु त्या आस स्थळाची ॥ ३ ॥

॥ २५४० ॥

शीतळ तें शीतळाहुनी । पायवणी चरणींचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सेवन हें[6] शिरसा धरीं । अंतरीं ही[7] वरदळा ॥ ध्रु ॥
अवघें चि नासी पाप । तीर्थ बाप माझ्याचें ॥ २ ॥
बैसोनियां तुका तळीं । त्या कल्लोळीं डौरला ॥ ३ ॥

॥ २५४१ ॥

गोदें कांठीं होता आड । करूनि कोड कवतुकें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देखण्यांनीं एक केलें । आइत्या नेलें जिवनापें ॥ ध्रु ॥

---

१ दे. त. उधारासी.—२ पं. तट.—३ दे. त. वेव्हारीं.—४ दे. क्षीदक्षीण (खेदक्षीण ?).—५ दे. त. गंगवास ॥०.—६ पं. ही.— ७ दे. हीं.

राखोनियां ठाव । अल्प जीव लावूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे फिटे धनी । हे सज्जनीं विश्रांति ॥ ३ ॥

॥ २५४२ ॥

न पाहें माघारें आतां परतोनि । संसारापासूनि विटला जीव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सामोरें येऊनि कवळीं दातारा । काळाचा हाकारा न साहावे ॥ ध्रु ॥
सावधान चित्त होईल आधारें । खेळतां ही बरें वाटईल ॥ २ ॥
तुका ह्मणे कंठ दाटला या सोसें । न पवे चि कैसें जवळी हें ॥ ३ ॥

॥ २५४३ ॥

मथनीचें नवनीत । सर्व हितकारक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दंडवत दंडा परी । मागें उरी नुरवावी[1] ॥ ध्रु ॥
वचनाचा तो पसरु काई । तांतडी डोईपाशींच ॥ २ ॥
तुका ह्मणे जगजेठीं । लावीं कंठीं उचलूनि ॥ ३ ॥

॥ २५४४ ॥

अवचिता चि हातीं ठेवा । दिला सेवा न करितां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाग्य फळलें जाली भेटी । नेघें तुटी यावरी ॥ ध्रु ॥
दैन्य गेलें हरली चिंता । सदैव[2] आतां यावरी ॥ २ ॥
तुका ह्मणे वांटा जाला । बोलों बोली देवासीं ॥ ३ ॥

॥ २५४५ ॥

समर्थाची धरिली कास । आतां नाश[3] काशाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धांवें[4] पावें करीन लाहो । तुमचा[5] आहो विठ्ठला[6] ॥ ध्रु ॥

---

१ दे. नुरावी.—२ दे. पं. सदैव.—३ त. नास.—४ दे. त. धांव.—५ दे. तुमच्या. पं. "तुमचा" बद्दल "नामें".—६ पं. विठ्ठल.

न लगे मज पाहाणें दिशा । हाकेसरिसा ओढसी ॥ २ ॥
तुका ह्मणे नव्हे धीर । तुह्मां स्थिर दयेनें ॥ ३ ॥

॥ २५४६ ॥

करूं तैसें पाठांतर । करुणाकर भाषण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जिहीं केला मूर्तिमंत । ऐसे[1] संतप्रसाद ॥ ध्रु ॥
सोज्ज्वळ केल्या वाटा । आइत्या नीटा मागीलां[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे घेऊं धांवा । करूं हांवा ते जोडी ॥ ३ ॥

॥ २५४७ ॥

अचळ न चळे ऐसें जालें मन । धरूनि निज खुण राहिलोंसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडी बैसली गुणांची अंतरीं । करूं धणीवरी सेवन तें ॥ ध्रु ॥
एकविंध भाव नव्हे अभावना । आणिकिया[3] गुणां न मिळवे ॥ २ ॥
तुका ह्मणे माझे पडिलें आहारीं । ध्यान विटेवरी ठाकलें तें ॥ ३ ॥

॥ २५४८ ॥

काय तुझी थोरी वर्णूं मी पामर । होसी दयाकर कृपासिंधु ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुज ऐसी दया नाहीं आणिकासी । ऐसें[4] ह्रृषीकेशी नवल एक ॥ ध्रु ॥
कुरुक्षेत्रभूमीवरी पक्षी व्याले । तृणामाजी केलें कोठें त्यांनीं ॥ २ ॥
अकस्मात तेथें रणखांब रोविला । युद्धाचा नेमिला ठाव तेथें ॥ ३ ॥
कौरव पांडव दळभार दोन्ही । झुंजावया रणीं आले तेथें ॥ ४ ॥
तये काळीं तुज पक्षी आठविती । पाव बा श्रीपती ह्मणोनियां ॥ ५ ॥
हस्ती[5] घोडे रथ येथें धांवतील । पाषाण होतील शतचूर्ण ॥ ६ ॥

---

१ पं. ऐसा.—२ पं. मागील्या.—३ पं. आणीक या.—४ पं. ऐकें.—५ पं. हत्ती.

ऐसिये आकांतीं वांचों कैसे परी । धांव बा श्रीहरी लवलाहें ॥ ७ ॥
टाकोनियां पिलीं कैसें जावें आतां । पावें जगन्नाथा लवलाहीं ॥ ८ ॥
आली तिये[1] काळीं कृपा तुझ्या चित्ता । अनाथांच्या नाथा नारायणा ॥ ९ ॥
एका गजाचिया कंठीं घंटा होती । पाडिली[2] अवचिती तयांवरी ॥ १० ॥
अठरा दिवस तेथें द्वंद्वयुद्ध[3] जालें । वारा ऊन लागलें नाहीं तया ॥ ११ ॥
जुंज[4] जाल्यावरी दाविलें अर्जुना । तुह्मीं नारायणा पक्षियांसी ॥ १२ ॥
पाहें आपुलिया दासां म्यां[5] रक्षिलें । रणीं वांचविलें कैशा परी ॥ १३ ॥
ऐसी तुज माया आपुल्या भक्तांची । माउली आमुची तुका ह्मणे ॥ १४ ॥

॥ २५४९ ॥

वैष्णवां संगती सुख वाटे जीवा । आणीक मी देवा कांहीं नेणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गायें नाचें उडें आपुलिया छंदें । मनाच्या आनंदें आवडीनें ॥ ध्रु ॥
लाज भय शंका दुराविला मान । न कळे साधन यापरतें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां आपुल्या सायासें । आह्मां जगदीशें[6] सांभाळावें ॥ ३ ॥

॥ २५५० ॥

शरण शरण वाणी । शरण त्रिवाचा विनवणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्तुती न पुरे हे वाचा । सत्य दास मी दासांचा ॥ ध्रु ॥
देह[7] सांभाळून । पायांवरीं लोटांगण ॥ २ ॥
विनवी तुका[8] संतां दीन । नव्हे गोरवें उत्तीर्ण ॥ ३ ॥

॥ २५५१ ॥

लेंकरा लेववी माता अळंकार । नाहीं अंतपार आवडीसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कृपेचें पोसणें तुमचें मी दीन । आजि संतजन मायबाप ॥ ध्रु ॥

---

१ पं. तये.—२ पं. पडिली.—३ दे. द्वंदजुंज.—४ पं. जुंझ.—५ पं. मी.—६ दे. त. जग. देशें.—७ पं. देह न सांभा०.—८ दे. संता तुका.

आरुषा उत्तरीं संतोषे माउली । कवळूनि घाली त्हृदयांत ॥ २ ॥
पोटा आलें त्याचे नेणे गुणदोष । कल्याण[1] चि असे असावें हें ॥ ३ ॥
मनाची ते चाली मोहाचिये सोई । ओघें[2] गंगा काई परतों जाणे ॥ ४ ॥
तुका ह्मणे कोठें उदार मेघां शक्ति । माझी तृषा किती चातकाची ॥५ ॥

॥ २५५२ ॥

युक्ति तंव जाल्या कुंटित सकळा । उरली हे कळा जीवनाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संतचरणीं भावें ठेविलें मस्तक । जोडोनि हस्तक राहिलोंसें ॥ ध्रु ॥
जाणपणें नेणें कांहीं चि प्रकार । साक्षी तें अंतर अंतरासी ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी केलें अभयदान । तेणें[3] समाधान राहिलेंसे[4] ॥ ३ ॥

॥ २५५३ ॥

हागे आलों कोणी[5] ह्मणे बुडतिया । तेणें किती तया बळ चढे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी तंव भार घेतला सकळ । आश्वासिलों बाळ अभयकरें ॥ध्रु॥
भुकेलियां आस दावितां निर्धार । किती होय धीर समाधान ॥ २ ॥
तुका ह्मणे दिली चिंतामणीसाटीं । उचित कांचवटी दंडवत ॥ ३ ॥

॥ २५५४ ॥ ॥ १ ॥

कैसा तीं[6] देखिला होसील गोपाळीं । पुण्यवंतीं[7] डोळीं नारायणा ॥ १॥
॥ ध्रु. ॥ तेणें लोभें जीव जालासे[8] बराडी । आह्मी ऐशी जोडी कई लाभों ॥ ध्रु ॥
असेल तें कैसें दर्शनाचें सुख । अनुभवें श्रीमुख अनुभवितां ॥ २ ॥
तुका ह्मणे वाटे देसी आलिंगन । अवस्था ते क्षणक्षणा[9] होते[10] ॥ ३ ॥

---

१ त. पं. कल्याणाची आस असावें हें ।.—२ पं. वोघ.—३ दे. जेणें.—४ पं. राहिलोंसें.—५ ह्मणे कोणी.—६ पं. तो.—७ पं. पुण्यवंता.—८ पं. जालोसे.—९ दे. क्षणाक्षणां.—१० पं. होत.

॥ २५५५ ॥

कासया या लोभें केलें आर्तभूत । सांगा माझें चित्त नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चातकाचे परी एक चि निर्धार । लक्षभेदीतीर फिरों नेणे ॥ ध्रु ॥
सांवळें रूपडें चतुर्भुज मूर्ति । कृष्णनाम चित्तीं संकल्प हा ॥ २ ॥
तुका ह्मणे करीं आवडीसी ठाव । नको माझा भाव भंगों देऊं ॥ ३ ॥

॥ २५५६ ॥

काय माझा पण होईल लटिका । ब्रिदावळी लोकां दाविली ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खरी करूनियां देई माझी आळी । येऊनि कुरवाळीं[1] पांडुरंगे ॥ध्रु॥
आणीक म्यां कोणा ह्मणवावें हातीं । नये काकुलती दुजियासी ॥ २ ॥
तुका ह्मणे मज येथें चि ओळखी । होईन तो सुखी पायांनीं च ॥ ३ ॥

॥ २५५७ ॥

तुह्मां आह्मां जंव जालिया समान । तेथें कोणां कोण सनमानी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उरी तों राहिलें[2] गोमटें गौरव । ओढे माझा जीव पायांपाशीं ॥ध्रु॥
नेणपणें आह्मी आळवूं वोरसें । बोलावितों रसें शब्दरत्नें ॥ २ ॥
तुका ह्मणे लळे पाळीं वो विठ्ठले । कां हे उरविले भेदाभेद ॥ ३ ॥

॥ २५५८ ॥

नको माझे मानूं आह्मांच ते शब्द । कळवळ्याचा वाद करितसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासयानें बळ करूं पायांपाशीं । भाकावी ते दासीं करुणा आह्मीं ॥ध्रु॥
काय मज चाड असे या लौकिकें । परी असे निकें अनुभवाचें ॥ २ ॥
लांचावल्यासाटीं वचनाची आळी । टकळ्यानें घोळी जवळी मन ॥ ३ ॥

---

१ दे. त. कुवाळी.—२ दे. त. राहिली.

वाटतसे आस पुरविसी ऐसें । तरि अंगीं पिसें लावियेलें ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझी येथें[1] चि आवडी । श्रीमुखाची जोडी इच्छीतसें ॥ ५ ॥

॥ २५५९ ॥

ह्मणऊनी लवलाहें । पाय आहें[2] चिंतीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाठिलागा[3] येतो काळ । तूं कृपाळ[4] माउली ॥ ध्रु ॥
बहु उसंतीत आलों । तया भ्यालों स्थळासी ॥ २ ॥
तुका ह्मणे तूं जननी । ये निर्वाणीं विठ्ठले ॥ ३ ॥

॥ २५६० ॥

जेणें वाढे अपकीर्ति । सवार्थीं तें वर्जावें[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्य रुचे भलेपण । वचन तें जगासी ॥ ध्रु ॥
होइजेतें शुद्ध[6] त्यागें । वाउगें तें सारावें ॥ २ ॥
तुका ह्मणे खोटें वर्म । निंद्यकर्म[7] काळिमा ॥ ३ ॥

॥ २५६१ ॥

याची सवे लागली जीवा । गोडी हेवा संगाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परतें न सरवे दुरी । क्षण हरीपासूनि ॥ ध्रु ॥
जालें तरीं काय तंट । आतां चट न संडे[8] ॥ २ ॥
तुका ह्मणे चक्रचाळे । वेडें[9] बळें लाविलें ॥ ३ ॥

॥ २५६२ ॥

याचा तंव हा[10] चि मोळा । देखिला डोळा उदंड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेदी मग फिरों मागें । अंगा अंगें संचरे ॥ ध्रु ॥
कां गा याची नेणां खोडी । जीभा जोडी करितसां ॥ २ ॥

---

१ पं. येथींची.—२ पं. असें.—३ पं. पाठिलाग.—४ दे. त. कृपाळू.—५ पं. त्यजावें.—६ दे. त. शूर.—७ पं. नित्यकर्म.—८ दे. त. संटे. ९ दे. त. वेळ.—१० पं. ऐसा चि मोळा.

पांवरे तें बहु काळें । घोंगडें ही ठायींचें ॥ ३ ॥
अंगीं वसे चि ना लाज । न ह्मणे भाज कोणाची ॥ ४ ॥
सर्वसाक्षी अबोल्यानें । दुश्चित कोणें[1] नसावें ॥ ५ ॥
तुका ह्मणे धरिला हातीं । मग निश्चितीं हरीनें[2] ॥ ६ ॥

॥ २५६३ ॥

प्रसिद्ध हा असे जगा । अवघ्या रंगारंगाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी वाटा न वजे कोणी । नारायणीं घरबुडी ॥ ध्रु ॥
बहुतां ऐसें केलें मागें । लाग लागें लागेना ॥ २ ॥
हो कां नर अथवा नारी । लाहान थोरीं आदर ॥ ३ ॥
जालें वेगळें लोकीं पुरे । मग नुरे समूळ ॥ ४ ॥
कळेना तो आहे कैसा । कोणी दिशा[3] बहु थोडा ॥ ५ ॥
तुका ह्मणे दुसऱ्या भावें । छायें नावें न देखवे ॥ ६ ॥

॥ २५६४ ॥

न संडावा आतां ऐसें[4] वाटे ठाव । भयाशी उपाव रक्षणाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि मनें वेंळियेलें[5] मन । कारियेकारण[6] चाड नाहीं ॥ध्रु॥
नानांची[7] उपाधि करूनियां मूळ । राखतां विटाळ तें चि व्हावें ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें न वेचे वचन । निर्जीं निजखूण सांपडली ॥ ३ ॥

॥ २५६५ ॥

सत्तेचें भोजन समयीं आतुडे । सेवन ही घडे रुचिनेसी[8] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वर्मे श्रम नेला जालें एकमय । हृदयस्थीं सोय संग जाला ॥ ध्रु ॥

---

१ पं. कोणी.—२ पं. हरीन.—३ पं. दिसा.—४ पं. ऐसा.—५ पं. वोळियेलें. मना ६ पं.० कारणा.—७ दे. त. नाना वीचि.—८ त. रुचिनसी.

कोथळीस जमा पडिलें संचित । मापल्याचा वित्त नेम जाला ॥ २ ॥
तुका ह्मणे धणी ऐसा जालों आतां । करीन ते सत्ता माझी आहे ॥ ३ ॥

॥ २५६६ ॥

देईल तें उणें नाहीं । याचे कांहीं पदरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहिजे तें संचित आतां । येथें सत्ता करावया ॥ ध्रु ॥
गुणां ऐसा भरणा भरी । जो जें विचारी[1] तें लाभे ॥ २ ॥
तुका ह्मणे देवीं देव । फळे भाव आपुला ॥ ३ ॥

॥ २५६७ ॥

तेव्हां होतों भोगाधीन । तुह्मां भिन्न पासूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां बोलों नये ऐसें । आनारिसें वेगळें ॥ ध्रु ॥
सन्मुख जालों स्वामीकडे । भव औठडे निराळे ॥ २ ॥
चिंतिलें तें चिंतामणी । फिटे धणी तों द्यावें ॥ ३ ॥
सहज स्थिति[2] आहे अंगीं । प्रसंगीं ते वंचेना ॥ ४ ॥
तुमची देवा धरिली कास । केला नास प्रपंचा ॥ ५ ॥
तुका ह्मणे जाणोनि वर्म । कर्माकर्म ठेविलीं ॥ ६ ॥

॥ २५६८ ॥ ॥ ५ ॥

केला कईवाड[3] संतांच्या आधारें । अनुभवें खरें कळों आलें ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ काय जीवित्वाची धरूनियां आशा । व्हावें गर्भवासा पात्र मेणें ॥ ध्रु ॥
अंबाळीनें[4] जावें निश्चितीच्या[5] ठायां । रांडा रोटा वांयां करूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे बळी देतां तें निधान । भिकेसाटीं कोण राज्य देतो ॥ ३ ॥

---

१ दे. त. चारी.—२ दे. त. स्थित.—३ त. कइवाड. दे. कैवाड.४— पं. आभाळीनें.—५ दे. निचिंतिया.

॥ २५६९ ॥

संगतीनें होतो पंगतीचा लाभ । अशोभीं अनुभव असिजेतें[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जैसीं तैसीं असों पुढिलांचे सोई । धरिती हातीं पायीं आचारिये ॥ ध्रु ॥
उपकारी नाहीं देखत आपदा । पुढिलांची सदा दया चित्तीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तरीं सज्जनाची कीर्ति । पुरवावी आर्ति निर्बळांची ॥ ३ ॥

॥ २५७० ॥

करितां विचार सांपडलें वर्म । समूळ[2] निश्रम परिहाराचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज घेऊनियां आपणांसी द्यावें । सांटीं[3] जीवें जीवें नारायणा ॥ ध्रु ॥
उरी नाहीं मग पडदा कां आला । स्वमुखें चि भला करितां वाद ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें खरें देणें घेणें । तुह्मी साक्षी जाणें अंतरींचें ॥ ३ ॥

॥ २५७१ ॥

कुळींची हे कुळदेवी । केली ठावी संतांनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरवें जालें शरण गेलों । उगविलों संकटीं ॥ ध्रु ॥
आणिला रूपा ही बळें । करूनि खळें[4] हरिदासीं ॥ २ ॥
तुका ह्मणे समागमें । नाचों प्रेमें लागलों ॥ ३ ॥

॥ २५७२ ॥

आतां देह अवसान । हें जतन तोंवरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गाऊं नाचों गदा रोळें । जिंकों बळें संसार ॥ ध्रु ॥
या चि जीऊं अभिमानें । सेवाधनें बळकट ॥ २ ॥
तुका ह्मणे न सरें मागें । होईन लागें आगळा ॥ ३ ॥

---

१ पं. अशुभ.—२ त. समूळुनिश्रम.—३ पं. सांडीं जीवें भावें नारायणा. दे. साटी.—
४ पं. खळ.

॥ २५७३ ॥

ज्यानें आड यावें कांहीं । त्याचें नाहीं बळ आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मन येथें साह्य जालें । हरिच्या धालें गुणवादीं ॥ ध्रु ॥
चुकुर तो गेला काळ । जालें बळ संगाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे धरूं सत्ता । होईल आतां करूं तें ॥ ३ ॥

॥ २५७४ ॥

देवासी तो पुरे एकभाव गांठी । तो चि त्याचे मिठी देइल पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहोनि राहीन कवतुक निराळा । मी मज वेगळा होऊनियां ॥ध्रु॥
कांहीं नेघें शिरीं निमित्त्याचा भार । न लगे उत्तर वेचावें चि ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवें पडिलिया गांठी । मग नाहीं मिठी सुटों येत ॥ ३ ॥

॥ २५७५ ॥

लौकिकासाटीं या पसाऱ्याचा गोवा । कांहीं नाहीं देवा लागों येत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठेवावा माथा तो नुचलावा पायीं । ठांयींचिये ठांयीं हालों नये ॥ ध्रु ॥
ढवळिल्या[1] मनें वितळिलें रूप । नांवऐसें पाप उपाधीचें ॥ २ ॥
तुका ह्मणे देव प्रीतीनें कवळी । ठेवील जवळी उठवूनि ॥ ३ ॥

॥ २५७६ ॥

नाहीं होत भार घातल्या उदास । पुरवावी आस सकळ ही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा नाहीं मज एकाचा अनुभव । धरिला तो भाव उद्धरील[2] ॥ ध्रु॥
उतावीळ असे शरणागतकाजें । धांवा केशीराजे आइकतां ॥ २ ॥
तुका ह्मणे हित चिंतन[3] भरवंसा । नेदी गर्भवासा येऊं देवा ॥ ३ ॥

---

१ दे. त. पं. डव्हळिल्या.—२ दे. त. उद्धरलें.—३ त. चिंतनें.

॥ २५७७ ॥

उपजों[1] मरों हे तों आमुची मिरासी । हें तूं निवारिसी तरी थोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उभा राहीं करीं खरा खोटा वाद । आह्मी जालों निंद्य[2] लंडीपणें ॥ ध्रु ॥
उभयतां आहे करणें समान । तुह्मां ऐसा ह्मणें मी ही देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे हातीं सांपडलें वर्म । अवघाची भ्रम[3] फेडिन आतां ॥ ३ ॥

॥ २५७८ ॥

मेलियांच्या रांडा इच्छितील करूं । लाज नाहीं धरूं प्रीती कैशी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागिलां पुढिलां एक[4] सरेंबरी । काळाची पेटारी खांदीं[5] वाहे ॥ ध्रु ॥
आन दिसे परी मरणें चि खरें । सांपळा उंदिरें सामाविलीं ॥ २ ॥
तुका ह्मणे जाली मनाची परती । निवळली ज्योती दिसों आली ॥ ३ ॥

॥ २५७९ ॥

निष्ठुर मी जालों अतिवादागुणें । हें कां नारायणें नेणिजेल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांडियेली तुह्मी गोत परिसोय । फोडविली डोय कर्मा हातीं ॥ ध्रु ॥
सांपडूनि[6] संदी केली जीवेंसाटीं । घ्यावयासि तुटी कारण हें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज काय ह्मणों उणें । नाहीं अभिमानें चाड देवा ॥ ३ ॥

॥ २५८० ॥

माझें माझ्या हाता आलें । आतां भलें सकळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काशासाटीं विषम थारा । तो अंतरा विटाळ ॥ ध्रु ॥
जालीं तया दुःखें तुटी । मागिल पोटीं नसावें ॥ २ ॥
तुका ह्मणे शुद्धकुळ । तेथें मळ काशाचा ॥ ३ ॥

---

१ पं. उपजोनि मरों.—२ दे. निंद.—३ पं. श्रम.—४ दे. एकी.—५ पं. खादीं.—६ पं. संधी.

॥ २५८१ ॥

समर्थपणें हे[1] करा संपादणी। नसतें चि मनीं धरिल्याची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दुसऱ्याचें येथें नाहीं चालों येत। तरि[2] मी निवांत पाय पाहें ॥ध्रु॥
खोटियाचें खरें खरियाचें खोटें। मानलें गोमटें तुह्मांसी तें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मां सर्वें करितां वाद। होईजेतें निंद्य[3] जनीं देवा ॥ ३ ॥

॥ २५८२ ॥

तुह्मां आह्मांसवें न पडावी गांठी। आलेति[4] जगजेठी कळों आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ किती ह्मणों आतां वाइटा वाइट। शिवों नये वीट आल्यावरी॥ध्रु॥
बोलिल्याची आतां हे चि परचित। भीड भार थीत बुडवलि ॥ २ ॥
तुका ह्मणे आली रोकडी प्रचिती। झांकणें तें किती कोठें देवा[5] ॥ ३ ॥

॥ २५८३ ॥

सकळ सत्ताधारी। व्हावें ऐसें काय हरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परी या कृपेच्या वोरसें। कुढावयाचें चि पिसें ॥ ध्रु ॥
अंगें सर्वोत्तम। अवघा चि पूर्णकाम ॥ २ ॥
तुका ह्मणे दाता। तरि हा जीव दान देतां[6] ॥ ३ ॥

॥ २५८४ ॥

कोणापाशीं द्यावें माप। आपीं[6] आप राहिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासयाची भरोवरी। काय दुरी जवळी ॥ ध्रु ॥
एकें दाखविले दाहा। फांटा पाहा पुसून ॥ २ ॥
तुका ह्मणे सरलें वोझें। आतां माझें सकळ ॥ ३ ॥

---

१ पं. "हे" नाहीं.—२ पं परी.—३ दे. निंद.—४ त. आली ती जग०.—५ दे. देता.—६ पं. आपे आप.

॥ २५८५ ॥

नभोमय जालें जळ । एकीं सकळ हरपलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां काय सारासारी । त्याच्या लहरी तयांत ॥ ध्रु ॥
कैचा तेथ यावा सांडी । आप कोंडी आपणा[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे कल्प जाला । अस्त[2] मेला उदय ॥ ३ ॥

॥ २५८६ ॥

राजा करी तैसे दाम । ते[3] ही चाम चालती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कारण ते सत्ता शिरीं । कोण करी अव्हेर ॥ ध्रु ॥
वाइले तें सुनें खांदीं । चाले पदीं बैसविलें ॥ २ ॥
तुका ह्मणे विश्वंभरें । करुणाकरें रक्षिलें[4] ॥ ३ ॥

॥ २५८७ ॥

आह्मी देव तुह्मी देव । मध्यें भेव अधीक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैवाडाच्या धांवा लागें । मागें मागें विठ्ठले ॥ ध्रु ॥
भेडसाविलें हाके नादें । वोळखी भेदें मोडिली ॥ २ ॥
तुका ह्मणे उभा राहे । मागें पाहे परतोनि ॥ ३ ॥

॥ २५८८ ॥

हीनसुरबुद्धीपासीं । आकृतीसी भेद नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक दांडी एक खांदी । पदीं[5] पदीं भोगणें ॥ ध्रु ॥
एकाऐसें एक नाहीं । भिन्न पाहीं प्रकृती ॥ २ ॥
तुका ह्मणे भूमी खंडे । पीक दंडे जेथें तें ॥ ३ ॥

---

१ दे. आपण्यां.—२ पं. अस्ता.—३ पं. चाम ते ही.—४ त. रक्षीलों.—५ पं. पदोपदीं जोगणें.

॥ २५८९ ॥

काय बोलों सांगा । याउपरी पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं आधारावांचून । पुढें न चले वचन ॥ ध्रु. ॥
वाढे ऐसा रस । कांहीं करावा सौरस ॥ २ ॥
भक्तिभाग्यसीमा । द्यावा जोडोनियां प्रेमा ॥ ३ ॥
कोरड्या उत्तरीं । नका गौरवूं वैखरी ॥ ४ ॥
करी विज्ञापना । तुका प्रसादाची दाना ॥ ५ ॥

॥ २५९० ॥

आहाच तो मोड वाळलियामधीं । अधीराची बुद्धि तेणें न्यायें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि संग न करीं दुसरें । चित्त मळीन द्वारें दोडें[1] पडे ॥ ध्रु. ॥
विषासाटीं सर्पा भयाभीत लोक । हें तों सकळीक जाणतसां ॥ २ ॥
तुका ह्मणे काचें राहे कुळांकुड । अवगुण तो नाड ज्याचा तया ॥ ३ ॥

॥ २५९१ ॥

क्षणक्षणां जीवा वाटतसे खंती । आठवती चित्तीं पाय देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येई वो येई वो येई लवलाहीं । आळिंगूनि बाहीं क्षेम देई ॥ ध्रु. ॥
उताविळ मन पंथ अवलोकी । आठवा ते चुकी काय जाली ॥ २ ॥
तुका ह्मणे माझ्या जीवींच्या जीवना । घाला नारायणा उडी वेगीं ॥ ३ ॥

॥ २५९२ ॥

आळी करावी तें कळतें बाळका । बुझवावें हें कां नेणां तुह्मी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निवाड तो तेथें[2] असे पायांपाशीं । तुह्मांआह्मांविशीं एकेठायीं ॥ ध्रु. ॥

---

१ त. पूर्वीं "द्वाडपडें" असून "द्वोडपडें" केलें आहे.—२ पं. येथें.

आणीक तों आह्मी न देखोंसें ज्ञालें । जाणावें शिणलें भागलेंसें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मां लागतें सांगावें । अंतरींचें ठावें काय नाहीं ॥ ३ ॥

॥ २५९३ ॥

तांतडीनें आह्मां धीर चि न कळे । पाळावे हे लळे लवलाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नका कांहीं पाहों सावकाशीं देवा । करा एक हेवा तुमचा माझा ॥ ध्रु ॥
वोरसाचा हेवा[1] सांभाळावी प्रीत । नाहीं राहों येत अंगीं सदा[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे मज नका गोवूं खेळा । भोजनाची वेळा राखियेली ॥ ३ ॥

॥ २५९४ ॥

नाहीं लोपों येत गुण । वेंधी आणीकें[3] चंदन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न संगतां पडे ताळा । रूप दर्पणीं सकळां ॥ ध्रु ॥
सारविलें वरी । आहाच तें क्षणभरी ॥ २ ॥
तुका ह्मणे वोहळें । सागराच्या ऐसें व्हावें ॥ ३ ॥

॥ २५९५ ॥

वचनें चि व्हावें आपण उदार । होइल विश्वंभर संतुष्ट[4] चि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ सत्यसंकल्पाचीं फळें बीजाऐसीं । शुद्ध नाहीं नासी पावों येत ॥ध्रु॥
वेंचिलिया काय येतसे उपेगा । शरीर हें नरकाचें चि आळें ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव जितां थारे लावा । पडिलिया गोवा देशधडी ॥ ३ ॥

॥ २५९६ ॥

उखतें आयुष्य जायांचें कलिवर[5] । अवघें वोडंबर विषयांचें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कोणासी हा लागे पुसणें विचार । मनें[6] चि सादर करूं आतां ॥ ध्रु ॥

---

१ पं. यावा.—२ पं. धंदा.—३ पं. आणीकां.—४ दे. त. संपुष्ट.—५ दे. त. कळिवर.—६ पं. मन.

उत्पत्ति प्रळय पडिलें दळण । पाकाचें भोजन बीज वाढे ॥ २ ॥
तुका ह्मणे जाऊं अभयाच्या ठायां । रिघों देवराया शरण वेगीं ॥ ३ ॥

॥ २५९७ ॥

बोलावे ह्मूण हे[1] बोलतों उपाय । प्रवाहें हें जाय गंगाजळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाग्ययोगें कोणां घडेल सेवन । कैंचे येथें जन अधिकारी ॥ ध्रु ॥
मुखीं देतां घांस पळवितीं तोंडें[2] । अंगींचिया भांडे असुकानें ॥ २ ॥
तुका ह्मणे पूजा करितों देवाची । आपुलिया रुची मनाचिये ॥ ३ ॥

॥ २५९८ ॥

लटिक्याचे वाणी चवी ना सवाद[3] । नांहीं कोणां वाद रुचों येत ॥१॥
॥ध्रु.॥ अन्याय तो त्याचा नव्हे वायचाळा । मायबापीं वेळा न साधिली ॥ध्रु॥
अनावर अंगीं प्रबळ अवगुण । तांतडीनें मन लाहो साधी ॥ २ ॥
तुका ह्मणे दोष आणि अवकळा । न पडतां ताळा घडतसे[4] ॥ ३ ॥

॥ २५९९ ॥

नये स्तवूं काचें होतें क्रियानष्ट । फुंदाचें[5] ते कष्ट भंगा मूळ ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नाहीं परमार्थ साधत लौकिकें । धरुन होतों फिकें अंगा आलें ॥ध्रु॥
पारखिया पुढें नये घालूं तोंड । तुटी लाभा खंड होतो[6] मानां[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे तरी मिरवतें परवडी । कामावल्या गोडी अविनाश[8] ॥ ३ ॥

॥ २६०० ॥

कोण्या काळें येईल मना । नारायणा तुमचिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझा करणें अंगीकार । सर्व भार फेडूनि ॥ ध्रु ॥

---

१ पं. "हे" नाहीं.—२ पं. तोंड.—३ त. पं. संवाद. दे. पूर्वी 'संवाद' असें होतें.—४ दे. घडे तसे.—५ पं. स्फुंदाचे.—६ त. होती.—७ त. पं मना.—८ त. अविनाशा.

लागली हे तळमळ चिंत्ता[1] । तेरी दुश्चिता संसारीं ॥ २ ॥
सुखाची च पाहें वास । मागें दोष सांभाळीं ॥ ३ ॥
इच्छा पूर्ण जाल्याविण । कैसा सीण वारेल ॥ ४ ॥
लाहो काया मनें वाचा । देवा[2] साच्या भेटीचा ॥ ५ ॥
कांटाळा तो न धरावा । तुह्मी देवा दासांचा ॥ ६ ॥
तुका ह्मणे माझे वेळे । न कळे कां हें उफराटें ॥ ७ ॥

॥ २६०१ ॥

घ्यावी तरी घ्यावी उदंड चि सेवा । द्यावें तरी देवा उदंड चि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसीं कैंचीं आह्मी पुरतीं भांडवलें । आल्या करीं बोलें समाधान ॥ ध्रु ॥
व्हावें तरी व्हावें बहुत चि दुरी । आलिया[3] अंतरीं वसवावें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझें सख्यत्व आपणीं । असशील ऋणी आवडीचा ॥ ३ ॥

॥ २६०२ ॥

काय करूं जीव होतो कासावीस । कोंडलिये[4] दिस गमे चि ना ॥ १ ॥
पडिलें हें दिसे ब्रह्मांड चि वोस । दाटोनि उच्छ्वास राहातसे ॥ २ ॥
तुका ह्मणे आगा सर्वजाणतिया । विश्वंभरें काया निववावी ॥ ३ ॥

॥ २६०३ ॥

सुकालियां कोमां अत्यंत जळधर । तेणें च प्रकार न्याय असे ॥ १ ॥
न चलें पाउलीं सांडीं गरुडासन । मनाचें हो[5] मन त्वरेलागीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भूक न साहावे बाळा । जीवनांची कळा ओढलीसे ॥ ३ ॥

---

१ पं. चिंता.—२ पं. दिवसाचा भेटीचा.—३ पं. आपुल्या.—४ पं. कोंडली हे.—५ त. ही.

॥ २६०४ ॥

शृंगारिक माझीं नव्हती उत्तरें । आळवितों खरे अवस्थेच्या ॥ १ ॥
न घलावा[1] मधीं कामाचा विलंब । तुह्मी तों स्वयंभ करुणामूर्ति ॥ २ ॥
तुका ह्मणे केलें सन्मुख वदन । देखतां चरण पोटाळीन ॥ ३ ॥

॥ २६०५ ॥

तूं माझी माउली तूं माझी साउली । पाहातों वाटुली पांडुरंगे ॥ १ ॥
तूं मज येकुला वडिल धाकुला । तूं मज आपुला सोयरा जीव ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव तुजपाशीं असे । तुजविण[2] ओस सर्व दिशा ॥ ३ ॥

॥ २६०६ ॥

कराल तें करा । हातें आपुल्या दातारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बळियाचीं आह्मी बाळें । असों निर्भर या सळे ॥ ध्रु ॥
आतां कोठें काळ । करील[3] देवापाशीं बळ ॥ २ ॥
तुका ह्मणे पंढरीराया । थापटितों ठोक बाह्या ॥ ३ ॥

॥ २६०७ ॥

डोळां भरिलें रूप । चित्ता[4] पायांपें संकल्प ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघी घातली वांटणी । प्रेम राहिलें कीर्तनीं ॥ ध्रु ॥
वाचा केली माप । रासीं हरिनाम अमुप ॥ २ ॥
भरूनियां भाग । तुका बैसला पांडुरंग ॥ ३ ॥

॥ २६०८ ॥

आतां आहे नाहीं । न कळे आळी करा कांहीं ॥ १ ॥

---

१ पं. घालावा.—२ दे. त. तुझियानें.—३ पं. मध्यें रिघेल वोंगळ—४ पं. चित्तीं पायांचे संकल्प.

॥ ध्रु. ॥ देसी पुरवुनी इच्छा । आतां पंढरीनिवासा ॥ ध्रु ॥
नेणे भाग सीण । दुजें कोणी[1] तुह्मांविग ॥ २ ॥
आतां नव्हे दुरी । तुका पायीं मिठी मारी ॥ ३ ॥

॥ २६०९ ॥

संकल्पासी अधिष्ठान । नारायण गोमटें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघियांचें पुरे कोड । फिटे जड देहत्व ॥ ध्रु ॥
उभय लोकीं उत्तम कीर्ति । देव चित्तीं राहिलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव धाय । नये हाय जवळी ॥ ३ ॥

॥ २६१० ॥

भाग्यवंता ऐशी जोडी । परवडी संतांची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन घरीं पांडुरंग । अभंग जें सरेना ॥ ध्रु ॥
जनाविरहित हा लाभ । दांचें नभ सांटवणें ॥ २ ॥
तुका ह्मणे विष्णुदासां । नाहीं आशा दुसरी ॥ ३ ॥

॥ २६११ ॥

जरी आलें राज्य मोळविक्या हातां । जरी तो मागुता व्यवसायी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तृष्णेचीं मजुरें नेणती विसांवा । वाढे हांव हांवां काम कामीं ॥ ध्रु ॥
वैभवाचीं सुखें नातळतां[2] अंगा । चिंता करी भोगी[3] विघ्न जाळी ॥ २ ॥
तुका ह्मणे वाहे मरणाचें भय । रक्षणउपाय करूनि असे ॥ ३ ॥

॥ २६१२ ॥

कोण होईल आतां संसारपांगिलें । आहे उगवलें सहजें[4] चि ॥ १ ॥

---

१ पं. कांहीं.—२ पं. नातळती अंगीं.—३ पं. भोगी विघ्नें.—४ पं. सहजचि.

॥ध्रु.॥ केला तो चालवीं आपुला प्रपंच । काय कोणां वेच आदा घे दे ॥ ध्रु॥
सहजें[1] चि घडे आतां मोळ्याविण । येथें काय सीण आणि लाभ ॥ २ ॥
तुका ह्मणे जालों सहज देखणा । ज्याच्या तेणें खुणा दाखविल्या ॥ ३ ॥

॥ २६१३ ॥

आह्मां शरणागतां । एवढी काय करणें चिंता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि हे कौतुकाचे खेळ । अवघे पाहातों[2] सकळ ॥ ध्रु ॥
अभयदानवृंदें[3] । आह्मां कैंचीं भयद्वंद्वें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी । हरिजन साधनाचे स्वामी ॥ ३ ॥

॥ २६१४ ॥

देवाचिये चाडे प्रमाण उचित । नये वांटूं चित्त निषेधासीं ॥ १ ॥
नये राहों उभें कसमळापाशीं[4] । भुंकतील तैसीं सांडावीं तीं[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे क्षमा सुखाची हे रासी । सांडूनि कां ऐसी दुःखी व्हावें ॥ ३ ॥

॥ २६१५ ॥ ॥ १ ॥

खळा सदा क्षुद्रीं[6] दृष्टी । करी कष्टी सज्जना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करिती[7] आपुलाले परी । धणीवरी व्यापार ॥ ध्रु ॥
दया संतां भांडवल । वेची बोल उपकार ॥ २ ॥
तुका ह्मणे आपुलालें । उसंतिलें ज्यांणीं तें ॥ ३ ॥

॥ २६१६ ॥

जग ऐसें बहुनांवें । बहुभावें भावना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहों[8] बोलों बहु नये । सत्य काय सांभाळा ॥ ध्रु ॥

---

१ पं. सहजचि.—२ त. पाहातो गोपाळा.—३ दे. त. द्वंदें.—४ पं. कश्मळापाशीं.—५ पं. ते.—६ पं. क्षुद्र.—७ दे. करितां.— ८ पं. पाहों बहु बोलोंनये.

कारियासी जें कारण । तें जतन, करावें ॥ २ ॥
तुका ह्मणे संतजनीं । हें चि मनीं धरावें ॥ ३ ॥

॥ २६१७ ॥

निघालें तें अगीहूनि । आतां झणीं आतळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पळवा परपरतें दुरी । आतां हरी येथूनि ॥ ध्रु ॥
धरिलें तैसें श्रुत करा हो । येथें आंहो प्रपंचीं ॥ २ ॥
अबोल्यानें ठेला तुका । भेडुनि[1] लोकां निराळा ॥ ३ ॥

॥ २६१८ ॥

आतां दुसरें नाहीं वनीं । निरंजनीं[2] पढिलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमची च पाहें वास । अवघी आस निरसली ॥ ध्रु ॥
मागिलांचा मोडला माग । घडला त्याग अरुची ॥ २ ॥
तुका ह्मणे करुणाकरा । तूं सोयरा जीवींचा[3] ॥ ३ ॥

॥ २६१९ ॥

धरूनियां सोई परतलें मन । अनुलक्षीं[4] चरण करूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येई पांडुरंगे नेई सांभाळूनि । करुणावचनीं आळवितों ॥ ध्रु॥
बुद्धि जाली साह्य परि नाहीं बळ । अवलोकितों जळ वाहे नेत्रीं ॥ २ ॥
न चलतां पाय गळित जाली काया । ह्मणऊनि दया येऊं द्यावी[5] ॥ ३ ॥
दिशेच्या[6] करितों वारियासीं मात । जोडुनियां हात वास पाहें ॥ ४ ॥
तुका ह्मणे वेग करावा सत्वर । पावावया तीर भवनदीचें[7] ॥ ५ ॥

॥ २६२० ॥

कौलें भरियेली पेंठ । निग्रहाचे खोटे तंट ॥ १ ॥

---

१ पं बोलुनि.—२ दे. त. निरांजनीं.—३ पं. दीनांचा.—४ दे. त. अनुरक्षीं.—५ तं. व्हावी.—६ दे. दिशच्या. पं. दिसेच्या.—७ त. पं. भवनदी.

॥ ध्रु. ॥ ऐसें माता जाणे वर्म । बाळा वाढवितां धर्म ॥ ध्रु ॥
कामवितां[1] लोहो कसे । तांतडीनें काम नासे ॥ २ ॥
तुका ह्मणे खडे । देतां अक्षर[2] तें जोडे ॥ ३ ॥

॥ २६२१ ॥

चालिलें न वाटे । गाऊनियां जातां वाटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरवा वैष्णवांचा संग । येतो सामोरा श्रीरंग ॥ ध्रु ॥
नाहीं भय आड । कांहीं विषमांचें जड ॥ २ ॥
तुका ह्मणे भक्ति । सुखरूप आदीं अंतीं ॥ ३ ॥

॥ २६२२ ॥

करितां विचार तो हा दृढ संसार ।
ब्रह्मांदिकां पार नुलंघवे सामर्थ्यें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शरण शरण नारायणा मज अंगीकारीं[3] दीना ।
आलें तें वचनांपासीं माझ्या सामर्थ्य[4] ॥ ध्रु ॥
पाठीवरी मोळी तो चि कळवा पायीं[5] तळीं ।
सांपडला जाळीं मत्स्य जाला तो न्याय ॥ २ ॥
आतां करीन तांतडी लाभाची ते याच जोडी ।
तुका ह्मणे ओढी पायां सोई मनाची ॥ ३ ॥

॥ २६२३ ॥

बहुतां जातीचा केला अंगीकार । बहुत ही फार सर्वोत्तमें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सरला[6] चि नाहीं कोणांचिये वेचें । अक्षोभ ठायींचें ठायीं आहे ॥ ध्रु ॥

---

१ पं. कामावितां.—२ दे. अक्षरें.—३ पं. अगीकार.—४ त. सामर्थ्यें.—५ पं. पायांतळीं.—६ पं. धरला.

लागत चि नाहीं घेतां अंतपार । वसवी अंतर अणुचें ही ॥ २ ॥
तुका ह्मणे केला होय[1] टाकीऐसा । पुरवावी इच्छा धरिली ते[2] ॥ ३ ॥

॥ २६२४ ॥

पोट धालें आतां जीवनीं आवडी । पुरवावे परवडी बहुतांचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय आंचवणा तांतडीचें काम । मागील तीं श्रम न पवावीं[3] ॥ध्रु॥
वाढितिया पोटीं बहु[4] असे वाव । सांभाळितां ठाव काय वांचे[5] ॥ २ ॥
दाविल्यावांचूनि नाहीं कळों येत । तेथें ही[6] दुश्चित एकपणें[7] ॥ ३ ॥
नावेचा भार तो उदकाचे शिरीं । काय हळू भारी तये ठायीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे गीतीं गाऊनि गोविंद । करूं ब्रह्मानंद एकसरें ॥ ५ ॥

॥ २६२५ ॥

एका हातीं टाळ एका हातीं चिपाळिया ।
घालिती हुंमरी एक वाताती[8] टाळिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मातले वैष्णव नटती नाना छंदें ।
नाहीं चाड[9] मोक्षपदें भजनीं आवडी ॥ ध्रु ॥
हाका अरोळिया गीतें[10] वाद्यें सुखसोहळे ।
जाय तें न कळे केव्हां रजनी दिवस ॥ २ ॥
तीर्थीं नाहीं चाड न लगे जावें वनांतरा ।
तुका ह्मणे हरिहरात्मक चि पृथिवी[11] ॥ ३ ॥

॥ २६२६ ॥

देव सखा आतां केलें नव्हे काई । येणें[12] सकळ[13] ही सोइरीं च ॥ १ ॥

---

१ पं. हाये.—२ त. ती.—३ त. पावावीं.—४ त. वहुत.—५ पं. वेचे.—६ पं. हे.—७ पं. एकपण.—८ पं. वाहातातीं.—९ दे. चाट.—१० दे. गीतवादें सुख०.—११ दे. पृथुवी. त. पृथवी. पं. पृथ्वी. १२ पं. तेणें.—१३ दे. सकळई सोइरीं च.

॥ ध्रु. ॥ भाग्यवंत जालों गोतें सपुरतीं । आतां पुण्या नीती पार नाहीं ॥ ध्रु ॥
पाहातां दिसती भरलिया दिशा । ठसावला ठसा लोकत्रयीं ॥ २ ॥
अविनाश जोडी आह्मां भाग्यवंतां । जाली होती सत्ता संचिताची ॥३॥
पायांवरी डोई ठेवाया अरोथा । जाली द्यावी सत्ता क्षेम ऐसी ॥ ४ ॥
तुका ह्मणे जीव पावला विसावा । ह्मणवितां देवा तुमचींसीं ॥ ५ ॥

॥ २६२७ ॥

कोण आतां कळिकाळा । येऊं बळा देईल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्ता झाली त्रिभुवनीं । चक्रपाणी कोंवसा ॥ ध्रु ॥
लडिवाळांचा भार वाहे । उभा आहे कुढावथा[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे घटिका दिस । निमिष[2] ही न विसंभे ॥ ३ ॥

॥ २६२८ ॥

आह्मां आवडे नाम घेतां । तो [3]ही पिता संतोषे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उभयतां एकचित्त । तरी प्रीत वाढली ॥ ध्रु ॥
आह्मी शोभों निकटवासें । अनारिसें न दिसे ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगे । अवघीं अंगें निवालीं[4] ॥ ३ ॥

॥ २६२९ ॥

देह तंव असे भोगाचे अधीन । याचें सुख सीण क्षणभंगुर[5] ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अविनाश जोडी देवापायीं भाव। कल्याणाचा ठाव सकळही ॥ ध्रु ॥
क्षणभंगुर हा येथील पसारा । आलिया आकारा[6] अवघें नासे[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें सकळ विश्रांति । आठवावा चित्तीं नारायण ॥ ३ ॥

---

१ पं. कुडावया.—२ दे. निमिश. त. निमिश्य. पं. निमिष्य.—३ पं. हा.—४ पं. निववि-लीं.—५ दे. क्षीणभंगर. त. क्षण भंगरे.—६ त. दे. हाकारा.—७ त. राहे. दे. हा पाठ दिला आहे.

॥ २६३० ॥

आतां आवश्यक करणें समाधान। पाहिलें निर्वाण न पाहिजे ॥ १ ॥
केलें तरीं आतां सुशोभ्य[1] करावें। दिसतें बरवें संतांमधीं ॥ ध्रु ॥
नाहीं भक्तराजीं ठेविला उद्धार[2]। नामाचा आकार त्यांचियानें[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे माझ्या वडिलांचें ठेवणें। गोप्य नारायणें[4] न करावें ॥ ३ ॥

॥ २६३१ ॥

काया वाचा मनें श्रीमुखाची वास। आणीक उदास विचारासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय आतां मोक्ष करावा जी देवा। तुमचिया गोवा दर्शनासी ॥ ध्रु ॥
केलिया नेमासी[5] उभें ठाडें व्हावें। नेमलें तें भावें पालटेना ॥ २ ॥
तुका ह्मणे जों जों कराल उशीर। तों तों मज फार रडवील ॥ ३ ॥

॥ २६३२ ॥

पुढिलांचे सोयी माझ्या मना चाली। मताची आणिली नाहीं बुद्धी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केलासि तो उभा आजिवरी संतीं। धरविलें[6] हातीं कट देवा ॥ ध्रु ॥
आहे तें ची मागों नाहीं खोटा चाळा। नये येऊं बळा लेंकराशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा साक्षीचा व्यवहार। कृपण जी थोर परी तुह्मी ॥ ३ ॥

॥ २६३३ ॥

बहुत करूनि चाळवाचाळवी। किती तुह्मी गोवी करीतसां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लागटपणें मी आलों येथवरी। चाड ते दुसरी न धरूनि ॥ ध्रु ॥
दुजियाचा तंव तुह्मांसी कांटाळा। राहासी निराळा एकाएकीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां यावरी गोविंदा। मजशीं विनोदा येऊं नये ॥ ३ ॥

---

१ दे. शुशोभें.—२ दे. उधार.—३ पं. याचियातें.—४ पं. नारायण.—५ पं. ० नेमा उभें ठाड०.—६ दे. त. वेव्हार.

॥ २६३४ ॥

तीर्थ जळ देखे पाषाण प्रतिमा । संत ते अधमा माणसांऐसे[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांजेच्या मैथुनापरी[2] गेलें वांयां । बांडेल्याचें[3] जायां जालें पीक ॥ ध्रु. ॥
अभाविक सदा सुतकी चांडाळ । सदा तळमळ चुके चि ना ॥ २ ॥
तुका ह्मणे वरदळी ज्याची दृष्टी । देहबुद्धि कष्टी सदा दुःखी ॥ ३ ॥

॥ २६३५ ॥

नव्हे मतोळ्याचा वाण । नीच नवा नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुख उपजे श्रवणें । खरें टांकसाळी नाणें ॥ ध्रु. ॥
लाभ हातोहातीं । अधिक पुढतीपुढती ॥ २ ॥
तुका ह्मणे नेणों किती । पुरोनि उरलें[4] पुढती ॥ ३ ॥

॥ २६३६ ॥

घातला[5] दुकान । देती आलियासी दान[6] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संत उदार उदार । भरलें अनंत भांडार ॥ ध्रु. ॥
मागत्याची पुरे । धणी आणिकांसी उरे ॥ २ ॥
तुका ह्मणे पोतें । देवें भरिलें नव्हे रितें ॥ ३ ॥

॥ २६३७ ॥

नरस्तुति आणि कथेचा विकरा । हें नको दातारा घडों देऊं ॥ १ ॥
ऐसिये कृपेची भाकितों करुणा । आहेसि तूं[7] राणा उदाराचा ॥ ध्रु. ॥
परांविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ॥ २ ॥
भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हें नको गोविंदा घडों देऊं ॥ ३ ॥

---

१ त. दे. माणसा ऐसे.—२ पं. मैथुन परि.—३ त. वाडेल्याचें वांयां आलें.०—४ त. उरलों.—५ पं. घातलें.—६ पं. वान.—७ पं. तो.

देहअभिमान नको देऊं शरीरीं । चढों कांहीं परी एक देऊं ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडों देऊं ॥ ५ ॥

॥ २६३८ ॥

लौकिकापुरती नव्हे माझी सेवा । अनन्य केशवा दास तुझा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि करीं पायांसवें आळी । आणीक वेगळी नेणें परी ॥ ध्रु ॥
एकविध आह्मी स्वामिसेवेसाटीं । वरी तो चि पोटीं एकभाव ॥ २ ॥
तुका ह्मणे करीं सांगितलें काम । तुह्मां धर्माधर्म ठावे देवा ॥ ३ ॥

॥ २६३९ ॥

ज्यांच्या संगें होतों पडिलों भोवनीं । ते केली धोवनी झोडूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां एकाएकीं मनासीं विचार । करूं नाहीं भार दुजियाचा ॥ ध्रु ॥
प्रसादसेवनें आली उष्टावळी । उचित ते काळीं अवचित ॥ २ ॥
तुका ह्मणे वर्म सांपडलें हातीं । सांडिली ते खंती चिंता देवा ॥ ३ ॥

॥ २६४० ॥

आवडीभोजन प्रकार परवडी । भिन्नाभिन्न गोडी एका रसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भोगित्या पंगती लाधलों प्रसाद । तिहीं नाहीं भेद राखियेला ॥ ध्रु ॥
पाकसिद्धि स्वहस्तकें विनियोग । आवडीचे भाग सिद्ध केले ॥ २ ॥
तुका ह्मणे आला उच्छिष्ट प्रसाद । तेणें हा आनंद माझ्या जीवा ॥ ३ ॥

॥ २६४१ ॥

समर्थाचा ठाव संचलाचि असे । दुर्बळाची आस पुढें करी ॥ १ ॥

---

१ पं. हें कडवें नाहीं.—२ पं. सांडोनियां.—३ दे. दुजा याचा.—४ दे. त. भिन्नाभिन्न गोडी एक रसा.—५ पं. स्वये हस्तकें.

॥ ध्रु. ॥ पावलें घेईन पदरीं हें[1] दान । एकांतीं भोजन करूं जाऊं[2] ॥ ध्रु ॥
न लगे पाहावी उचिताची वेळ । अयाचित काळ साधला तो ॥ २ ॥
तुका ह्मणे मोट घालिया उपरी । गौरवा उत्तरीं पूजूं देवा ॥ ३ ॥

॥ २६४२ ॥

आपुल्यांचा करीन मोळा । माझ्या कुळाचारांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघियांचे वंदिन पाय । ठायाठाय न देखें ॥ ध्रु ॥
नेदीं तुटों समाधान । थांबों जन सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे झाडा होय । तों हे सोय न संडीं[3] ॥ ३ ॥

॥ २६४३ ॥

जन्ममरणांची विसरलों चिंता । तूं माझा अनंता मायबाप ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होतील ते डोळां पाहेन प्रकार । भय आणि भार निरसलीं ॥ ध्रु ॥
लिंगाडाचें[4] मूळ होतीं पंच भूतें । त्यांचें[5] यां पुरतें विभागिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे जाला प्रपंच पारिखा । जिवासी तूं सखा पांडुरंगा[6] ॥ ३ ॥

॥ २६४४ ॥

उदार तूं हरी ऐसी कीर्ति चराचरीं । अनंत हे थोरी गर्जतील[7] पवाडे ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ तुझे पायीं माझा भाव पुसी जन्ममरणां[8] ठाव ।
देवाचा तूं देव स्वामी सकळां[9] ब्रह्मांडा ॥ ध्रु ॥
मागणें तें तुज मागों जीवभाव तुज सांगों ।
लागों तरी लागों पायां तुमच्या दातारा ॥ २ ॥
दिसों देसी कीविलवाणें । तरी तुजं[10] चि हें उणें ।
तुका ह्मणे जिणें माझें तुजं[11] अधीन ॥ ३ ॥

---

१ पं. तें.—२ दे त. दाऊं.—३ त. सोडी.—४ पं. लिगाडाच्या मुळें.—५ पं. त्याच्या त्या पुरतें.—६ पं. पांडुरंग.—७ पं. वर्णितातीं.—८ पं. जन्ममरण.—९ पं. सकळ.—१० पं. तुजसी हें०. ११—पं. तुझ्या.

॥ २६४६ ॥

पाहा किती अलि शरण समान घि केले ।
नाहीं विचारिले गुण दोष कोणांचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज सेवटींसा द्यावा ठाव तयांचिये देवा ।
नाहीं करीत हेवा कांहीं थोरपणाचा ॥ ध्रु ॥
नाहीं पाहिला आचार कुळगोत्रांचा विचार ।
फेडूं आला भार मग न ह्मणे दगड ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्वजाणा तुझ्या आल्यावरि मना ।
केला तो उगाणा घडल्या महादोषांचा[1] ॥ ३ ॥

॥ २६४७ ॥

आतां चुकलें बंधन गेलें[2] विसरोनि दान ।
आपुले ते वाण[3] सावकाश विकावे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लाभ जोडला अनंत घरीं सांपडलें वित्त ।
हातोहातीं थीत उरों तळ नल्हाचि ॥ ध्रु ॥
होतें गोविलें विसारें माप जालें एकसरें ।
होतें होरें[4] वारें तों चि ह्मा हो साधिला ॥ २ ॥
कराया जतन तुका ह्मणे निजधन ।
केला नारायण साह्य नेदी विसंबों ॥ ३ ॥

॥ २६४८ ॥

तुझ्या रूपें माझी काया भरों द्यावी पंढरीराया ।

---

१ दे. दोषांच्या.—२ पं. गेलों.—३ पं. वान.—४ त. हारें वारें.

दर्पणींची छाया एका रूपें भिन्नत्व ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुख पडिलें साटवण सत्ता वेचे शनें शनें ।
अडचणीचे कोन चारी मार्ग उगवले ॥ ध्रु ॥
वेसो डोळयांची बाहुली कवळे भिन्न छाया आली ।
कृष्णांजन चाली नव्हे परती माघारी ॥ २ ॥
जीव ठसावला शिवें मना आलें तेथें जावें ।
फांटा पडिला नांवें तुका ह्मणे खंडलें ॥ ३ ॥

॥ २६४९ ॥

सोसें सोसें मारूं हाका । होइल चुका ह्मणऊनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागें पुढें क्षणभरी । नव्हे दुरी अंतर ॥ ध्रु ॥
नाम मुखीं बैसला चाळा । वेळोवेळां पडताळीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सुखी केलें । या विठ्ठलें बहुतांसी ॥ ३ ॥

॥ २६५० ॥

धरूनियां चाली हांवा । येइन गांवां धांवत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाठविसी मूळ तरी । लवकरी विठ्ठले ॥ ध्रु ॥
नाचेन त्या प्रेमसुखें । कीर्ती मुखें गाईन ॥ २ ॥
तुका ह्मणे संतमेळीं । पायधुळी वंदीन ॥ ३ ॥

॥ २६५१ ॥

मायबापाचिये भेटी । अवघ्या तुटी संकोचा ॥ १ ॥

---

१ पं. शनःशने.– त. शनेशनें.–२ त. वसे.–३ दे. प्रति०.–४ पं. चाले.–५ त. पं. संकोच्या

॥ ध्रु. ॥ भोगिलें तें आहे सुख । खातां मुख मोकळें ॥ ध्रु ॥
उत्तम तें बाळासाटीं । लावी ओठीं[1] माउली ॥ २ ॥
तुका ह्मणे जाली धणी । आनंद मनीं न समाये ॥ ३ ॥

॥ २६५२ ॥

उदासीनाचा देह ब्रह्मरूप । नाहीं पुण्य पाप लागत त्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनुताप अंगीं अग्निचिया ज्वाळा । नाहीं मृगजळा विझों येत ॥ ध्रु ॥
दोष ऐशा नावें देहाचा आदर । विटलें[2] अंतर अहंभावें ॥ २ ॥
तुका ह्मणे जाय नासोनियां खंती । तंव चि हे चित्तीं बद्धता ते ॥ ३ ॥

॥ २६५३ ॥

बंधनाचा तोडूं फांसा । देऊं आशा टाकोनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तें च घेतां शिरीं । होइल दुरी निजपंथ ॥ ध्रु ॥
नाथिलें चि माझें तुझें । कोण वोझें वागवी ॥ २ ॥
तुका ह्मणे अंतराय । देवीं काय जिणें तें ॥ ३ ॥

॥ २६५४ ॥

तें च किती वारंवार । बोलों फार बोलिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझें दंडवत । तुमच्या संत चरणांसी ॥ ध्रु ॥
आवडी ते नीच नवी । जाली जीवीं वसती ॥ २ ॥
तुका ह्मणे बरवें जालें । घरा आलें बंदरींचें ॥ ३ ॥

॥ २६५५ ॥

उपासा सेवटीं अन्नासवें भेटी । तैसी माझी मिठी पडो पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुरवीं वासना साच सर्वजाणा । आह्मां नारायणा अंकितांची[3] ॥ ध्रु ॥

---

१ त. पं. होटीं.—२ पं. विटाळे—३ त. अंकितासी.

बहु[1]दिसां पुत्रामातेमध्यें भेटीं । तैसा दाटो पोटीं प्रीति[2]उभड ॥ २ ॥
तुका ह्मणे धन कृपणा सोई[3]रें । यापरि दुसरें नहो आतां ॥ ३ ॥

॥ २६५६ ॥

रणीं निघतां शूर न पाहे माघारें । ऐशा मज धीरें रा[4]ख आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संसारा हातीं अंतरलों दुरी । आतां कृपा करीं नारायणा ॥ ध्रु ॥
वागवितों तुझिया नामाचें हत्यार । हा चि बडिवार मिरवितों ॥ २ ॥
तुका ह्मणे मज फिरतां माघारें । तेथें उणें पु[5]रें तुह्मी जाणां ॥ ३ ॥

॥ २६५७ ॥

सकळ पूजा स्तुति । करावी ते व्हा[5]वें याती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि वारा जन । संतपूजा नारायण ॥ ध्रु ॥
सेवा[6]वें तें वरी । दावी उमटूनि ढेंकरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सुरा । दुधा ह्मणतां केवीं बरा ॥ ३ ॥

॥ २६५८ ॥

धीर नव्हे मनें । काय तयापाशीं उणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भार घातलियावरी । दासां नुपेक्षील हरी ॥ ध्रु ॥
याऐसी आटी । द्यावी द्रव्याचियें साटी ॥ २ ॥
तुका ह्मणे पोटें । देवा बहु केलें खोटें ॥ ३ ॥

॥ २६५९ ॥

द्रव्याचिया कोटी । नये गांडीची लंगोटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतीं बोळवणेसाटीं । पांडुरंग धरा कंठीं ॥ ध्रु ॥

---

१ पं. बहुदिस पुत्रा मातेसवें भेटी ।.—२ दे. त. उभोड.—३ दे. सोयरें.—४ पं. राखें.—५ दे. व्होवें.—६ पं. सेवावी.

लोभाचीं[1] लोभिकें । यांचें[2] सन्निधान फिकें ॥ २ ॥
तुका ह्मणे हितें । जग[3] नव्हो पडो रितें ॥ ३ ॥

॥ २६६० ॥

कोणापाशीं आतां सांगों मी बोभाट । कधीं खटखट सरेल हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोणां आराणूक होईल कोणे काळीं । आपुलालीं जाळीं उगवूनि ॥ ध्रु ॥
माझा येणें दुःखें फुटतसे प्राण । न[4] कळतां जन[5] सुखी असे ॥ २ ॥
भोगा आधीं मनें मानिलासे त्रास । पाहें लपायास ठाव कोठें ॥ ३ ॥
तुका ह्मणे देतों देवाचें गाऱ्हाणें । माझें ऋण[6] येणें सोसियेलें ॥ ४ ॥

॥ २६६१ ॥

राहिलों निराळा । पाहों कवतुक डोळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करूं जगाचा विनोद । डोळां पाहोनियां छंद ॥ ध्रु ॥
भुललिया संसारें । आलें डोळ्यासी माजिरें ॥ २ ॥
तुका ह्मणे माथा । कोणी नुचली[7] सर्वथा ॥ ३ ॥

॥ २६६२ ॥

आह्मां एकविधा पुण्य सर्वकाळ । चरणसकळ[7] स्वामीचे ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चित्ताचे संकल्प राहिलें चळण । आज्ञा ते प्रमाण करूनी असों ॥ ध्रु ॥
दुजियापासून परतलें मन । केलें द्यावें[8] दान होईल तें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां पुरला नवस । एकाविण ओस[10] सकळ ही ॥ ३ ॥

॥ २६६३ ॥

राहाणें तें पायांपाशीं । आणिकां रसीं विटोनि ॥ १ ॥

---

१ पं. लोभाचें.—२ पं. त्याचें.—३ पं. जाग नको पडो रिते.—४ पं. जाण.—५ दे. त. रिण.—६ पं. नुचलिती.—७ पं. 'चरण सकळ' याबद्दल 'चरणकमळ'.—८ पं. घ्यावें.—९ पं. आजि.—१० पं. सोस.

॥ ध्रु. ॥ ऐसा धीर देई मना । नारायणा विनवितों ॥ ध्रु ॥
अंतरीं तों तुझा वास । आणिकां नास कारणां[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे शेवटींचें । वाटे साचें[2] राखावें ॥ ३ ॥

॥ २६६४ ॥

चंदन तो चंदनपणें । सहजगुणें[3] संपन्न ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेधलिया धन्य जाती । भाग्यें[4] होती सन्मुख ॥ ध्रु ॥
परिसा अंगीं परिसपण । बाणोनि तें राहिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे कैंची खंती । सुजाती ते ठाकणी[5] ॥ ३ ॥

॥ २६६५ ॥

लय लक्षी मन न राहे निश्चळ । मुख्य तेथें बळ आसनाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें[6] तों असाध्य जी सर्वत्र या जना । भलें नारायणा आळवितां ॥ ध्रु ॥
कामनेचा त्याग वैराग्य या नांव । कुटुंब ते सर्वविषयजात[7] ॥ २ ॥
कर्म उसंतावें चालत पाउलीं । होय जों राहिली देहबुद्धि ॥ ३ ॥
भक्ती[9] तें नमावें जीवजंतुभूत । शांतवूनि ऊत कामक्रोध ॥ ४ ॥
तुका ह्मणे साध्य साधन अवघडें[10] । देतां हें सांकडें[8] देह बळी ॥ ५ ॥

॥ २६६६ ॥

ऐसें कां हो न करा कांहीं । पुढें नाहीं नास ज्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विश्वंभरा शरणागत । भूतजात वंदूनि ॥ ध्रु ॥

---

१ दे. कारण.—२ पं. साच.—३ दे. सहज गुणसंपन्न ।.—४ पं. भोग्यें.—५ पं. टाकणी.—६ पं. हें चितों. असाध्य सर्वत्र.—७ पं. सवे विषये जात.—८ पं. हें कडवें नाहीं.—९. पं. भक्ती ते नमावीं जीव जंतु भूतें. त. भक्ती तें नमावें जीव जंतु भूतें.—१० पं. अवघड देतां हें सांकडें०.

श्रुतीचें कां नेघा फळ । सारमूळ जाणोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे पुढें कांहीं । वाट नाहीं यावरी ॥ ३ ॥

॥ २६६७ ॥

जाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव श्मशानींचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रडती रात्रदिवस कामक्रोधमाया । ह्मणती हायहाया यमधर्म ॥ ध्रु॥
वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि भरभरां[1] जीवित्वेसी ॥२॥
फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्य[2] जनीं बोंब जाली ॥ ३ ॥
दिली तिळांजुळी कुळनामरूपांसी । शरीर ज्याचें त्यासी समर्पिलें ॥ ४ ॥
तुका ह्मणे रक्षा जाली आपींआप[3] । उजळला दीप गुरुकृपा ॥ ५ ॥

॥ २६६८ ॥

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाला सोहळा अनुपम्य ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग जाला ॥ ध्रु ॥
एकदेशीं होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा॥३॥
फिटलें सुतक जन्ममरणाचें । मी माझ्या संकोचें दुरी जालों ॥ ३ ॥
नारायणें दिला वसतीस[4] ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे दिलें उमटूनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ॥ ५ ॥

॥ २६६९ ॥

बोळविला देह आपुलेनि हातें । हुताशिलीं भूतें ब्रह्माग्नीसीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एकवेळे जालें सकळ कारण । आतां नारायण नारायण ॥ ध्रु ॥
अमृतसंजीवनी निवविली खाई । अंगें तये ठायीं हारपलीं ॥ २ ॥

---

१ पं. लागला ब्रह्मत्वेंसी. दे. त. यांत असाच पाठ असतां मागून मूळांतल्या प्रमाणें केला आहे.—२ पं. महा वाक्यध्वनि बोंब०.—३ पं. आपें आप.—४ दे. पं. वस्तीस.

एकादशीविध जागरण उपवास । बारावा दिवस भोजनाचा ॥ ३ ॥
अवघीं कर्मे जालीं घटस्पोटामाशीं । संबंध एकेसी उरला नामीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां आनंदीं आनंदु । गोविंदीं[1] गोविंदु विस्तारला ॥ ५ ॥

॥ २६७० ॥

पिंडदान[2] पिंडे ठेविलें करून । तिळीं तिळवण मूळत्रयीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सारिले संकल्प एका चि वचनें । ब्रह्मीं ब्रह्मार्पण सेवटींच्या ॥ध्रु॥
सव्य अपसव्य बुडालें हें कर्म । एकाएक[3] वर्म एकोविष्णु ॥ २ ॥
पित्यापुत्रत्वाचें जालें अवसान । जनीं जनार्दन अभेदेंसी ॥ ३ ॥
आहे तैसी पूजा पावली सकळ । सहज तो काळ साधियेला ॥ ४ ॥
तुका ह्मणे केला अवघ्यांचा[4] उद्धार । आतां नमस्कार सेवटींचा ॥ ५ ॥

॥ २६७१ ॥

सरलें आतां नाहीं । न ह्मणे वेळकाळ कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठल कृपाळु माउली । सदा प्रेमें पान्हायेली ॥ ध्रु ॥
सीण[5] विचारी भाग । नव्हे निष्ठुर नाहीं राग ॥ २ ॥
भेदाभेद नाहीं । तुका ह्मणे तिच्याठायीं ॥ ३ ॥

॥ २६७२ ॥

तुज पाहावें हे धरितों वासना । परि आचरणा नाहीं[6] ठाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करिसी कैवार आपुलिया सत्ता । तरि च देखता होइन पाय ॥ध्रु॥
बाहिरल्या वेषें उत्तम दंडलें[7] । भीतरी मुंडलें नाहीं तैसें ॥ २ ॥
तुका ह्मणे वांयां गेलों च मी आहें । जरि तुह्मी साहे[8] न व्हा देवा ॥ ३ ॥

---

१ पं. गोविंदे.—२ पिंडदानें पिंड०.—३ पं. एकाएकी वर्म.—४ दे. त. अवघियांचा.—५ दे. त. सीण न विचारी०.—६ पं. ठाव नाहीं.—७ पं. दंडिलें.—८ पं. साह्य.

॥ २६७३ ॥

दुष्ट आचरण ग्वाही माझें मन । मज ठावे गुण दोष माझे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां तुह्मी सर्वजाण[1] पांडुरंगा । पाहिजे प्रसंगाऐसें केलें ॥ ध्रु. ॥
व्याह्याजांवायांचे पंगती दुर्बळ । वंचिजे तो काळ नव्हे कांहीं[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां जालों शरणागत । पुढील उचित तुह्मां हातीं ॥ ३ ॥

॥ २६७४ ॥

आतां भय नाहीं ऐसें वाटे जीवा । घडलिया सेवा समर्थाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझ्या मनें धरावा निर्धार । चिंतनीं अंतर न पडावें ॥ ध्रु. ॥
येथें नाहीं जाली कोणांची निरास । आल्या याचकास कृपेविशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें नाहीं दुजी परी । राया रंका सरी देवा पायीं ॥ ३ ॥

॥ २६७५ ॥

वैष्णवें चोरटीं । आलीं घरासी करंटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आजि आपुलें जतन । करा भांडें पांघरुण[3] ॥ ध्रु. ॥
ज्याचे घरीं खावें । त्याचें सर्वस्व[4] ही न्यावें ॥ २ ॥
तुका ह्मणे माग । नाहीं लागों देत लाग ॥ ३ ॥

॥ २६७६ ॥

ऐकतों दाट । आले एकांचे बोभाट ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नका विश्वासों यावरी । चोर देहाचे खाणोरी ॥ ध्रु. ॥
हे चि यांची जोडी । सदा बोडकीं उघडीं ॥ २ ॥
तुका ह्मणे न्यावें । ज्याचें त्यासी नाहीं ठावें ॥ ३ ॥

---

१ पं. सर्व जाणा.—२ पं. कायी.—३ दे. पांघुरण.—४ दे. सर्वस्वें.

॥ २६७७ ॥

आणिकांची सेवा करावी शरीरें । तीं येथें उत्तरें कोरडीं च ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा पांडुरंग सुलभ सोपारा । नेघे येरझारा सेवकाच्या[1] ॥ ध्रु ॥
आणिकांचे भेटी आडकाठी पडे । येथें तें न घडे वचन ही ॥ २ ॥
आणिकांचें देणें काळीं पोट भरे । येथील न सरे कल्पांतीं ही ॥ ३ ॥
आणिकें दंडिती चुकलिया सेवा । येथें सोस हेवा नाहीं दोन्ही ॥ ४ ॥
तुका ह्मणे करी आपणासारिखें[2] । उद्धरी पारिखें उंच निंच[3] ॥ ५ ॥

॥ २६७८ ॥

दुर्जनाची जाती । त्याचे तोंडीं पडे माती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याची बुद्धि त्यांसी[4] नाडी । वाचे अनुचित बडबडी ॥ ध्रु ॥
पाहें संतांकडे । दोषदृष्टी पाहें[5] भीडे ॥ २ ॥
उंच निंच नाहीं । तुका ह्मणे खळा कांहीं ॥ ३ ॥

॥ २६७९ ॥

न करीं उदास । माझी पुरवावी आस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐकां[6] ऐका नारायणा । माझी परिसा विज्ञापना ॥ ध्रु ॥
मायबाप बंधुजन । तूं चि सोयरा सज्जन ॥ २ ॥
तुका ह्मणे तुजविरहित । माझें कोण करी हित ॥ ३ ॥

॥ २६८० ॥

जीवन उपाय । वैद्यवाणी[7] तुझे पाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ते मी नाठवीं घडिघडी । ह्मणोनियां चरफडीं[8] ॥ ध्रु ॥

---

१ पं. याचकांच्या.—२ दे. त. आपण्यासारिखें.—३ त. पं. नीच.—४ पं. त्यासि नाहीं नाडी०.—५ दे. त. सांडी भडे.—६ पं. ऐसें.—७ दे. वैदेवाणी.—८ त. पं. चरफडी.

तुटे भवरोग । जेथें सर्व सुखें भोग[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे विटे । धरियेले जें गोमटें ॥ ३ ॥

॥ २६८१ ॥

ऐका हें वचन माझें संतजन । विनविती जोडुन कर तुह्मां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तर्क करूनियां आपुल्या भावना । बोलतिया जना कोण वारी ॥ ध्रु ॥
आमुच्या जीवींचा तो चि जाणे भावो । रेखुमाबाईचा[2] नाहो पांडुरंग॥२॥
चित्त माझें त्याचे गुंतलेंसे पायीं । ह्मणऊनि कांहीं नावडे त्या ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज न साहे मीनती । खेद होय चित्तीं भंग मना ॥ ४ ॥

॥ २६८२ ॥

ऐसा कोणी नाहीं हें जया नावडे । कन्या पुत्र घोडे दारा धन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निंब घेतें रोगी कवणिया सुखें[3] । हरावया दुःखें[4] व्याधि पीडा॥ध्रु॥
काय पळे सुखें[5] चोरा लागे पाठी । न घलावी काठी आड तया ॥ २ ॥
जयाचें कारण तो चि जाणे करूं । नये कोणां वारूं आणिकासी ॥३ ॥
तुका ह्मणे तरी सांपडे निधान । द्यावा ओंवाळून जीव बळी ॥ ४ ॥

॥ २६८३ ॥

काय मी अन्यायी तें घाला पालवीं । आणिक[6] वाट दावीं चालावया ॥१॥
॥ ध्रु. ॥ माग पाहोनियां जातों ते च सोयीं[7] । न वजावें कायी कोण सांगा[8]॥ध्रु॥
धोपट मारग लागलासे गाढा । मज काय पीडा करा तुह्मी ॥ २ ॥
वारितां ही भय कोण धरी धाक । परी तुह्मां एक सांगतों मी ॥ ३ ॥
तुका ह्मणे शूर दोहीं पक्षीं भला । मरतां मुक्त जाला मान पावे ॥ ४ ॥

---

१ पं. सुख भोग ।.—२ दे. त. रकुमाईचा.—३ पं. मुखें.—४ पं. दुःख.—५ पं. सुख.—६ पं. आणिकां वाटा.०—७ पं. ठायीं.—८ पं. सांग.

॥ २६८४ ॥

नव्हती माझे बोल जाणां हा निर्धार । मी आहें मजूर विठोबाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निर्धारा वचन[1] सोडविलें माझ्या । कृपाळुवें लज्जा राखियेली ॥ ध्रु ॥
निर्भर मानसीं जालों आनंदाचा । गोंडावली वाचा नामघोषें ॥ २ ॥
आतां भय माझें नासलें संसारीं । जालोंसें यावरी गगनाचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे हा तों संतांचा प्रसाद । लाधलों आनंद प्रेमसुख ॥ ४ ॥

॥ २६८५ ॥

जरा कर्णमूळीं सांगों आली गोष्टी । मृत्याचिये भेटी जवळी आली ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ आतां माझ्या मना होईं सावधान । ऊँ[2]पुण्य ची जाण कार्यसिद्धि ॥ ध्रु ॥
शेवटील घडी बुडतां न लगे वेळ । साधावा तो काळ जवळी आला ॥ २ ॥
तुका ह्मणे[3] चिंतीं कुळींची देवता । वारावा भोंवता शब्द मिथ्या ॥ ३ ॥

॥ २६८६ ॥

मागील ते आटी येणें घडे सांग । सुतवेल अंग एका सूत्रें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पहिपाहुणेर ते सोहळ्यापुरते । तेथूनि आरते उपचार ते ॥ ध्रु ॥
आवश्यक तेथें आगळा आदर । चाली थोडें फार संपादतें ॥ २ ॥
तुका ह्मणे ऋण फिटे एके घडी । अलभ्य ते जोडी हातां आल्या ॥ ३ ॥

॥ २६८७ ॥

साधावा तो देव सर्वस्वाचेसाटीं[4] । प्रारब्ध[5] तुटी क्रियमाण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग कासयानें पुन्हा संवसार । बीजाचे अंकुर दग्ध होती ॥ ध्रु ॥
जिणें दिल्हें त्यासी द्यावें[6] पिंडदान । उत्तीर्ण चरण धरूनि व्हावें ॥ २ ॥
तुका ह्मणे निज भोगईल निजता । नाहीं होइल सत्ता दुजियाची ॥ ३ ॥

---

१ पं. वचनें.—२ दे. त. वोंपुण्याची.०—३ पं. "ह्मणे" नाहीं.—४ दे. त. सर्वस्वाचे०—५ त. प्रारब्धे. पं. प्रारब्धा.—६ दे. द्यावा.

॥ २६८८ ॥

*[1]जळों अगी पडो खाण[2] । नारायण[3] भोगिता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी ज्याची वदे वाणी । नारायणीं ते पावे ॥ ध्रु ॥
भोजनकाळीं करितां धंदा । ह्मणा गोविंदा पावलें ॥ २ ॥
तुका ह्मणे न लगे मोल । देवा बोल आवडती ॥ ३ ॥

॥ २६८९ ॥

संतांसी क्षोभवी कोण्या[4] ही प्रकारें । त्याचें नव्हे बरें उभयलोकीं ॥१ ॥
॥ ध्रु. ॥ देवाचा तो वैरी शत्रु दावेदार । पृथ्वी[5] ही थार नेदी तया ॥ध्रु ॥
संतांपाशीं ज्याचा नुरे चि विश्वास । त्याचे जाले दोष बळिवंत ॥२ ॥
तुका ह्मणे क्षीर वासराच्या अंगें । किंवा धांवे लागें विषमें मारूं ॥ ३॥

॥ २६९० ॥

उदकीं कालवी[6] शेण मलमूत्र । तो[7] होय पवित्र कासयानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उद्धारासी ठाव नाहीं भाग्यहीना । विन्मुख चरणा संतांचिया॥ध्रु॥
दुखवी तो बुडे सांगडीचा तापा । अतित्याई पापाची च मूर्ति ॥ २ ॥
तुका ह्मणे जेव्हां फिरतें[8] कपाळ । तरी अमंगळ योग होतो[9] ॥ ३ ॥

॥ २६९१ ॥

शोकवावा म्यां देहे । ऐसें नेणों पोटीं आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी च नेदों[10] जी उत्तर । दुःखी राखिलें अंतर ॥ ध्रु ॥

---

१ त. जळतां आगी पडतां खान । नारायण भोगिता॥—२ दे. खान.—३ पं. नारायण तो भोक्ता. दे. नारायण भोक्ता.—४ पं. कोणा.—५ पं. पृथ्वीवरी थार—६ पं. कालविलें.—७ पं. ते.—८ पं. परते.—९ पं. येतो.—१० पं. दुःख.

* त. " हारपल्याची हानी ॥ नका मनीं धरूं कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पावले ते ह्मणा देवा । सहज सेवा या नांवें ॥ ध्रु ॥"
हीं दोन कड़वीं " जळो अगी० " याच्या पूर्वीं जास्त आहेत.

जावें वनांतरा । येणें उद्देशें दातारा ॥ २ ॥
तुका ह्मणे गिरी । मज सेववावी दरी ॥ ३ ॥

॥ २६९२ ॥

येइल तुझ्या नामा । लाज ह्मणों पुरुषोत्तमा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धीर राहिलों धरूनि । त्रास उपजला मनीं ॥ ध्रु ॥
जगा कथा नांव । निराशेनें नुपजे भाव ॥ २ ॥
तुह्मी साक्षी कीं गा । तुका ह्मणे पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ २६९३ ॥

नेणें जप तप अनुष्ठान याग । काळें तंव लाग घेतलासे[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रिघालों या भेणें देवाचे पाठीसी । लागे त्याचें त्यासी सांभाळणें ॥ ध्रु ॥
मापें माप सळे चालिली चढती । जाली मग राती काय चाले ॥ २ ॥
तुका ह्मणे चोरा हातीं जें वांचलें । लाभावरी आलें वारिलेशु ॥ ३ ॥

॥ २६९४ ॥

कळों आलें ऐसें आतां । नाहीं सत्ता तुह्मांसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी वीर्य नाहीं नामा । जातो प्रेमा खंडत ॥ ध्रु ॥
आड ऐसें येतें पाप । वाढे ताप आगळा ॥ २ ॥
तुका ह्मणे गुण जाला ॥ हा विठ्ठला हीनशक्ति ॥ ३ ॥

॥ २६९५ ॥

लागों दिलें अंगा । ऐसें कांगा सन्निध ॥ १ ॥

---

१ पं. घातलासे.

॥ ध्रु. ॥ कोण्या पापें उदय[1] केला । तो देखिला प्रळय ॥ ध्रु ॥
न देखवे पिडला सर्प । दया दर्प विषाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे भलें । मज तों न वजे साहिलें ॥ ३ ॥

॥ २६९६ ॥

धांवा शीघ्रवत । किंवा घ्यावें दंडव्रत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमचा जातो बडिवार । आह्मी होतों हीनवर ॥ ध्रु ॥
न धरावा धीर । धांवा नकां चालों स्थिर ॥ २ ॥
तुका ह्मणे वाणी । माझी लाजली[2] जी गुणीं ॥ ३ ॥

॥ २६९७ ॥

सेवकासी आज्ञा निरोपासी काम । स्वामीचे ते धर्म स्वामी जाणे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मनाचिये मुळीं रहावें बैसोन । आकर्षावे[3] गुण पायांपाशीं ॥ ध्रु ॥
भेटीचे तांतडी करीतसें लाहो । ओंवाळावा देहो ऐसें वाटे ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें करावें कारण । आपुलें जतन ब्रीद करा ॥ ३ ॥

॥ २६९८ ॥

उद्वेगासी[4] बहु फाकती मारग । नव्हे ऐसें अंग माझें होतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां कोण यासी करणें विचार । तो देखा साचार पांडुरंगा ॥ ध्रु ॥
मज तो अत्यंत दर्शनाची आस । जाला तरी हो नाश जीवित्वाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे आहे वचनाची उरी । करितों तोंवरि विज्ञापना ॥ ३ ॥

॥ २६९९ ॥

दुःखाची संगति[5] । तिच्याठायीं कोण प्रीति ॥ १ ॥

---

१ दे. त. उदो.—२ पं. लाजिली गुणीं.—३ पं. त. आकर्शावे. दे. आकशावे.—४ पं. उदेगाचे.—५ पं. सांगाती.

॥ ध्रु. ॥ अवघें[1] असो हें निराळें । करूं सोइरें सावळें ॥ ध्रु ॥
क्षणभंगुर ते[2] ठाव । करूनि सांडावे[3] चि वाव ॥ २ ॥
तुका ह्मणे बरा । ठाव पावलों हा थारा ॥ ३ ॥

॥ २७०० ॥

मेला तरी जावो सुखें नरकासी । कळंकी याविशीं शिवों नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रजस्वला करी वेलासी आघात । अंतरें[4] तों हित दुरी बरें ॥ध्रु॥
उगी च कां आलीं नासवावीं फळें । विटाळ विटाळें कालवूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे लोणी घालोनि शेणांत । उपेगाची मात काय असे ॥ ३ ॥

॥ २७०१ ॥

वर्णावे ते किती । केले पवाडे श्रीपति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विश्वासिया घडे लाभ । देइल तरी पद्मनाभ ॥ ध्रु ॥
भाव शुद्ध तरी । सांगितलें काम करी ॥ २ ॥
तुका ह्मणे भोळा देव । परि हा नागवी संदेह ॥ ३ ॥

॥ २७०२ ॥

संचितावांचून । पंथ न चलवे कारण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोरडी ते अवघी आटी । वांयां जाय लाळ घोंटी ॥ ध्रु ॥
धन वित्त जोडे । देव ऐसें तों न घडे ॥ २ ॥
तुका ह्मणे आड । स्वहितासी बहु नाड ॥३ ॥

॥ २७०३ ॥

अतित्याई बुडे गंगे । पाप लागे त्यांचें[5] त्या ॥१ ॥

---

१ पं. अवघी.—२ पं. तो.—३ पं. सांडावा.—४ पं. अंतरतो.—५ पं. ज्याचें.

॥ ध्रु. ॥ हें तों आपुलिया गुणें । असे जेणें योजिलें ॥ ध्रु ॥
अवचटें अग्नि जाळी । न सांभाळी दुःख पावे ॥ २ ॥
जैसें तैसें दावी आरसा । नकटया[1] कैसा पालटे ॥ ३ ॥

॥ २७०४ ॥

हेंदऱ्याचे भरितां कान । हलवी मान भोंक रितें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं मी येथें सांगों स्पष्ट[2] । भावें नष्ट घेत नाहीं ॥ ध्रु ॥
अवगुणी बाटलें चित्त । तया हित आतळे ना ॥ २ ॥
तुका ह्मणे फजितखोरा । ह्मणतां बरा उगा[3] रहा ॥ ३ ॥

॥ २७०५ ॥

नाहीं सरों येत[4] जोडिल्या वचनीं । कवित्वाची वाणी कुशळता ॥ १ ॥
॥ध्रु.॥ सत्याचा अनुभव वेधी सत्यपणें । अनुभवाच्या गुणें रुचों येतों[5]॥ध्रु॥
काय अगीपाशीं शृंगारिलें चाले । पोटींचें उकले कसापाशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें करावा उकळ । लागे चि ना बोल वाढवूनि ॥ ३ ॥

॥ २७०६ ॥

लचाळाच्या कामा नाहीं ताळाबाळा । न कळे आंगळा उपदेश ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वचनचर्येची न कळे चांचणी । ऐसी संघष्टनी अमंगळ ॥ ध्रु ॥
समय[5] न कळे वेडगळ बुद्धि । विजाती[6] ते शुद्धि चांच चाट[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे याचा धिक्कार चि बरा । बहुमति खराहूनि हीन ॥ ३ ॥

॥ २७०७ ॥

एक धरिला चित्तीं । आह्मीं रखुमाईचा पती ॥ १ ॥

---

१ पं. नकटा.—२ त. प. पष्ट.—३ पं. उगी.—४ पं. येत.—५ पं. समयो.—६ त. जीवाची.—७ पं. चाड.—८ पं. त्याचा

॥ ध्रु. ॥ तेणें जालें अवघें काम । निवारला भवश्रम ॥ ध्रु ॥
परद्रव्य परनारी । जाली विषाचिये परी ॥ २ ॥
तुका ह्मणे फार । नाहीं लागत[1] व्यवहार[2] ॥ ३ ॥

॥ २७०८ ॥

भेणें पळे डोळसा । न कळे मृत्यु तो सरिसा[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसी जाली दिशाभुली । न वजातिये वाटे चाली ॥ ध्रु ॥
संसाराची खंती । मावळल्या तरी शक्ति ॥ २ ॥
तुका ह्मणे हीणा[4] । बुद्धि चुकली नारायणा ॥ ३ ॥

॥ २७०९ ॥

अभिमानाचें तोंड काळें । दावी बळें अंधार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लाभ न्यावा हातोहातीं । तोंडीं माती पाडोनि ॥ ध्रु ॥
लोंगलीसे[5] पाठी लाज । जालें काज नासाया ॥ २ ॥
तुका ह्मणे कुश्चळ मनीं । विटंबनीं पडिलीं तीं ॥ ३ ॥

॥ २७१० ॥

चोराचिया धुडका मनीं । वसे ध्यानीं लंछन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐशा आह्मी करणें काय । वरसो[6] न्यायें पर्जन्य ॥ ध्रु ॥
ज्याच्या बैसे खतावरी । ते चुरचुरी दुखवूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्याची खोडी । त्याची जोडी त्या पीडी ॥ ३ ॥

॥ २७११ ॥

बुद्धिहीना उपदेश । तें तें विष अमृतीं ॥ १ ॥

---

१ पं. लागला.—२ दे. त. वेव्हार.—३ पं. सहसा.—४ पं. हीना.—५ पं. पाठी लागलीसे.—६ पं. वर्षे.

॥ ध्रु. ॥ हुंगों नये गोव्हवाडी । तेथें जोडी विटाळ ॥ ध्रु ॥
अळसियाचें अंतर कुडें । जैसें मढें निष्काम ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐशा हातीं । मज श्रीपती वांचवा ॥ ३ ॥

॥ २७१२ ॥

न करीं तुमची सेवा । बापुडें मी पण देवा ॥
बोलिलों तो पाववा । पण सिद्धी सकळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक काय तुह्मां काम । आह्मां नेदा तरी प्रेम ॥
कैसे धर्माधर्म । निश्चयेंसी रहाती ॥ ध्रु. ॥
आह्मी वेचलों शरीरें । तुह्मी बीज पेरा खरें ॥
संयोगाचें बरें । गोड होतें उभयतां ॥ २ ॥
एका हातें टाळी । कोठें वाजते निराळी ।
जाला तरी बळी । स्वामीविण शोभेना ॥ ३ ॥
रूपा यावें जी अनंता । धरीन पुटाची त्या सत्ता ।
होईन सरता । संतांमाजी पोसणा ॥ ४ ॥
ठेविलें उधारा । वरी काय तो पातेरा ।
तुका ह्मणे बरा । रोकडा चि निवाड ॥ ५ ॥

॥ २७१३ ॥

भुके नाहीं अन्न । मेल्यावरी पिंडदान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे तों चाळवाचाळवी । केलें आपण चि जेवी ॥ ध्रु ॥
नैवेद्याचा आळ । वेचें ठाकणीं सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे जड । मज न राखावें दगड ॥ ३ ॥

१ पं. बापुडेपणें मी देवा.—२ पं. राहातील.—३ पं. वेचे.—४ त. "न" नाहीं.

॥ २७१४ ॥

सर्व भाग्यहीन । ऐसें सांभाळिलों दीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पायीं संतांचे मस्तक । असों जोडोनि हस्तक ॥ ध्रु ॥
जाणें तरि सेवा । दीन दुर्बळ जी देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव । समर्पून भाकों कींव ॥ ३ ॥

॥ २७१५ ॥

भाग्याचा उदय । ते हे जोडी संतपाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथूनिया नुठो माथा । मरणावांचूनि सर्वथा ॥ ध्रु ॥
होई बळकट । माझ्या मना तूं रे धीट ॥ २ ॥
तुका आला लोटांगणीं । भक्तिभाग्यें जाली धणी ॥ ३ ॥

॥ २७१६ ॥

नाहीं तरी आतां कैचा अनुभव । जालासी तूं देव घरघेणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेथें तेथें देखें लांचाचा पर्वत । घ्यावें तरि चित्त समाधान ॥ ध्रु ॥
आधीं वरी हात या नांवें उदार । उसण्याचे उपकार फिटाफीट ॥ २ ॥
तुका ह्मणे जैसी तैसी करूं सेवा । सामर्थ्य न देवा पायांपाशीं ॥ ३ ॥

॥ २७१७ ॥

आह्मी सर्वकाळ । कैंचीं सावधान । व्यवसायें मन अभ्यासलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी ह्मणा मोट ठेविली चरणीं । केलों गुणागुणीं कासावीस ॥ ध्रु ॥
याचे कानसुलीं मारितसे हाका । मज घाटूं नका मधीं आतां ॥ २ ॥
तुका ह्मणे निद्रा जागृति सुषुप्ति । तुह्मी हो श्रीपती साक्षी येथें ॥ ३ ॥

---

१ पं.० दुर्बळाची. त. दुर्बळ चि.—२ नुठऊं.—३ पं. भक्तिभाग्या.—४ त. सामर्थ्यानें देवा०.—५ दे. त. सावधानें.—६ पं. व्यवसाय दे. वेवसायें.—७ पं. मोटे ठेविलें.—८ दे. कानसुळीं.—९ पं. आतां मधीं.

॥ २७१८ ॥

नसता चि दाउनि भेव । केला जीव हिंगुटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जालों तेव्हां कळलें जना[1] । वाउगा हा आकांत ॥ ध्रु. ॥
गंवसिलों[2] पुढें मागें । लागलागे पायला ॥ २ ॥
तुका ह्मणे केली आणि । सलगीच्यांनीं सन्मुख ॥ ३ ॥

॥ २७१९ ॥

हें का आह्मां सेवादान । देखों सीण विषमाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांभाळा जी ब्रीदावळी । तुह्मी कां कळीसारिखे ॥ ध्रु. ॥
शरणागत वैऱ्या हातीं । हे निश्चिंती[3] देखिली ॥ २ ॥
तुका ह्मणे इच्छीं भेटी । पाय पोटीं उफराटे ॥ ३ ॥

॥ २७२० ॥

कां हो आलें नेणों भागा । पांडुरंगा माझिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उफराटी तुह्मां चाली । क्रिया गेली सत्याची ॥ ध्रु. ॥
साक्षी हेंगे[4] माझें मन । आर्त कोण होतें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे समर्थपणें । काय नेणें करीतसां ॥ ३ ॥

॥ २७२१ ॥

शकुनानें लाभ हानि । येथूनि च कळतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भयारूढ जालें मन ॥ आतां कोण विश्वास ॥ ध्रु. ॥
प्रीत कळे आलिंगनीं । संपादनीं अत्यंत ॥ २ ॥
तुका ह्मणे मोकलिलें । कळों आलें बरवें हें ॥ ३ ॥

---

१ त. जगा.—२ पं. गवसिलें.—३ पं. निश्चिती.—४ पं. हे गे.

॥ २७२२ ॥

नव्हेव निग्रह देहासी दंडण । न वजे भूकतान सहावली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि नित्य नित्य करीं आळवण । माझा अभिमान असों द्यावा ॥ ध्रु ॥
नाहीं विटाळिलें कायावाचामन । संकल्पासी[1] भिन्न असें चि या ॥ २ ॥
तुका ह्मणे भवसागरीं उतार । करायाआधार इच्छीतसें ॥ ३ ॥

॥ २७२३ ॥

आइकिली[2] कीर्त्ति संतांच्या वदनीं । तरि हें ठाकोनि[3] आलों स्थळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागिला पुढिला करावें सारिखें । पालटों पारिखें नये देवा ॥ ध्रु ॥
आह्मासी विश्वास नामाचा आधार । तुटतां हे थार उरी नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें नसावें चि दुजें । विनंती पंढरिराजें परिसावी हे ॥ ३ ॥

॥ २७२४ ॥

मोलाचें आयुष्य वेचतसे सेवें । नुगवतां गोवे खेद होतो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उगवूं आलोंति तुह्मी नारायणा । परिहार या सिणा निमिषांत[4] ॥ ध्रु ॥
लिगाडाचे मासी न्यायें[5] जाली परी । उरली ते उरी नाहीं कांहीं ॥ २
तुका ह्मणे लाहो साधीं वाचाबळें । ओढियेलों काळें धांव घालीं[6] ॥ ३ ॥

॥ २७२५ ॥

ह्मणऊनि जालों क्षेत्रींचे संन्यासी । चित्त आशापासीं[7] आवरूनि ॥ १ ॥

---

१ पं. संकल्पानें.—२ दे. ऐकिली. —३ पं. टाकोनि.—४ दे. निमिस्यांत. त. पं. निमिष्यांत.—५ पं. न्याय.—६ पं. घालीं.—७ दे. त. आशापाशीं.

॥ध्रु.॥ कदापि ही नव्हे सीमा उलंघन । केलें विसर्जन आव्हानीं च ॥ध्रु॥
पारिखा तो आतां जाला दुजा ठाव । दृढ केला भाव एकविध ॥ २ ॥
तुका ह्मणे कार्यकारणाचा हेवा । नाहीं जीव देवा समर्पिला ॥ ३ ॥

॥ २७२६ ॥

विभ्रंशिली[2] बुद्धि देहांत जवळी । काळाची[3] अंकाळीं वायचाळा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ पालटलें जैसें देंठ सांडी[4] पान । पिकलें आपण तयापरी ॥ ध्रु ॥
न मारितां हीन बुद्धि दुःख पावी । माजल्याची गोवी तयापरी ॥ २ ॥
तुका ह्मणे गळ लागलिया मत्स्या । तळमळेचा तैसा लवलाहो ॥ ३ ॥

॥ २७२७ ॥

न[5] वजावा तो काळ वांयां । मुख्य दया हे देवा[6] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि जैसें तैसें । रहणी असें पायांचे ॥ ध्रु ॥
मोकळें हें मन कष्ट । करी नष्ट दुर्जन ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं नेणें । न वजें येणेंपरी वांयां ॥ ३ ॥

॥ २७२८ ॥

कल्पतरूअंगीं इच्छिलें तें फळ । अभागी दुर्बळ भावें सिद्धी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्य त्या जाती धन्य त्या जाती । नारायण चित्तीं सांठविला ॥ध्रु॥
बीजाऐसा द्यावा उदकें अंकुर । गुणाचे प्रकार ज्याचे तया ॥ २ ॥
तुका ह्मणे कळे पारखिया हिरा । ओझें पाठी खरा चंदनाचें ॥ ३ ॥

॥ २७२९ ॥

उकरडा आधीं अंगीं नरकाडी । जातीची ते जोडी ते चि चित्तीं ॥ १ ॥

---

१. पं आव्हानींचें.—२ त. विभ्रंशली.—३ पं. अवकाळीं वायचळ.—४ दे. सोडी.—५ पं. न वजे तो.०—६ त. देवाची.

॥ ध्रु. ॥ कासयानें देखे अंधळा[1] मागिकें । चवीविण फिके वांयां जाय ॥ ध्रु ॥
काय जाणे विष पालटों उपचारें । मुखासी अंतर तों चि बरें ॥ २ ॥
तुका ह्मणे काय उपदेश वेड्या । संगें होतो रेड्यासवें कष्ट ॥ ३ ॥

॥ २७३० ॥

जया शिरीं कारभार । बुद्धि सार तयांची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वर्ते तैसें वर्ते जन । बहुतां गुण एकाचा ॥ ध्रु ॥
आपणीयां पाक करी । तो इतरीं सेविजे ॥ २ ॥
तुका ह्मणे शूर रोखे[2] । गाढ्या[3] वाखे सांगातें ॥ ३ ॥

॥ २७३१ ॥

एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोण जाणे[4] कैसी परी । पुढें उरी ठेवितां ॥ ध्रु ॥
अवघे धन्य होऊं आतां । स्मरवितां स्मरण ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघी जोडी । ते आवडी चरणांची ॥ ३ ॥

॥ २७३२ ॥

फळकट तो संसार । येथें सार भगवंत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें जागवितों मना । सरसें जनासहित ॥ ध्रु ॥
अवघें निरसूनि काम । घ्यावें नाम विठोबाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे देवाविण । केला सीण तो मिथ्या ॥ ३ ॥

॥ २७३३ ॥

सुधारसें ओलावली । रसना धाली न धाय ॥ १ ॥

---

१ पं. अंधळें.—२ दे. त. राखें.—३ प. गाढ्या.—४ प. जाणो

॥ ध्रु. ॥ कळों नये जाली धणी । नारायणीं पूर्णता ॥ ध्रु ॥
आवडे[1] तें तें च यासी । ब्रह्मरसीं निरसें ॥ २ ॥
तुका ह्मणे बहुतां परी । करूनि करीं सेवन ॥ ३ ॥

॥ २७३४ ॥

असतीं कांटाळा हा नव्हे मत्सर । ब्रह्म तें विकारविरहित ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ तरि ह्मणा त्याग प्रतिपादलासे । अनादि हा असे वैराकार ॥ध्रु ॥
सिजलें हिरवें एका नांवें धान्य । सेवनापें भिन्न निवडे[2] ते ॥ २ ॥
तुका ह्मणे भूतीं साक्षी[3] नारायण । अवगुणीं दंडण गुणीं पुजा ॥ ३ ॥

॥ २७३५ ॥

आपुलें आपणें जाणावें स्वहित । जेणें राहे चित्त समाधान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहुरंगें माया असे विखरली[4] । कुंटित चि चाली होतां बरी[5] ॥ध्रु॥
पूजा ते अबोला चित्ताच्या प्रकारीं । भाव विश्वंभरीं समर्पावा ॥ २ ॥
तुका ह्मणे गेला फिटोनियां भेव । मग होतो देव मनाचा चि ॥ ३ ॥

॥ २७३६ ॥

असोनि न कीजे अलिप्त अहंकारें । उगी च या भारें कुंथाकुंथी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धांवा सोडवणें वेगीं लवकरी । मी तों जालों हरी शक्तिहीन ॥ध्रु॥
भ्रमल्यानें दिसें बांधल्याचेपरी । माझें मजवरी वाहोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे धांव घेतलीसे सोई । आतां पुढें येई लवकरी ॥ ३ ॥

---

१ त. पं. आवडे ते ते च०.—२ पं. निवडतें.—३ दे. पं. साक्ष.—४ पं. विखुरली.—५ पं. बरें.

॥ २७३७ ॥

आपुल्याचा भोत चाटी । मारी करंटी पारख्या[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें जन भुललें देवा । मिथ्या हेवा वाढवी ॥ ध्रु ॥
गळ गिळी आमिषें[2] मासा । प्राण आशा घेतला ॥ २ ॥
तुका ह्मणे बोकडमोहो । धरी पहा ह्मे खाटिक ॥ ३ ॥

॥ २७३८ ॥

विषय तो मरणसंगीं । नेणे सुटिका अभांगी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शास्त्राचा केला लुंडा । तोंडीं पाडियेला धोंडा ॥ ध्रु ॥
अगदीं मोक्ष नाहीं ठावा । काय सांगावें गाढवा ॥ २ ॥
तुका ह्मणे ग्यानगड । सुखें पावो[3] देवा नाड ॥ ३ ॥

॥ २७३९ ॥

मी च विखळ मी च विखळ । येर सकळ बहु बरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहिजे हें क्षमा केलें । येणें बोलें विनवणी ॥ ध्रु ॥
मी च माझें मी च माझें । जालें ओझें अन्याय ॥ २ ॥
आधीं आंचवला आधीं आंचवला । तुका जाला निमनुष्य ॥ ३ ॥

॥ २७४० ॥

येणें जाणें तरी । राहे देव कृपा करी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें तंव पुण्य नाहीं । पाहातां माझे गांठी कांहीं ॥ ध्रु ॥
भय निवारिता । कोण वेगळा अनंता ॥ २ ॥
तुका ह्मणे वांरे भोग । वारी तरी पांडुरंग ॥ ३ ॥

---

१ दे. पारिख्या.—२ दे. त. आविसें. पं. अविशें.—३ पं. पावे. दे. त. सुखें देवा पावेना.

॥ २७४१ ॥

भल्याचें कारण सांगावें[1] स्वहित । जैसी कळे नीत आपणासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परी आह्मी असों एकाचिये हातीं । नाचवितो चित्तीं त्याचें तैसें ॥ ध्रु. ॥
वाट सांगे त्याच्या पुण्या नाहीं पार । होती उपकार अगणित ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी बहु कृपावंत । आपुलें उचित केलें संतीं ॥ ३ ॥

॥ २७४२ ॥

लावूनियां पुष्टी पोरें[2] । आणि, करकर कथेमाजी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पडा पायां करा विनंती । दवडा हातीं धरोनियां ॥ ध्रु. ॥
कुर्वाळूनि बैसे मोहें । प्रेम कां हें नासीतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे वाटे चित्त । करा फजित ह्मणऊनि ॥ ३ ॥

॥ २७४३ ॥

पुण्य उभें राहो आतां । संतांचें[3] याकारणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पंढरीचे लागा[4] वाटे । सखा भेटे विठ्ठल ॥ ध्रु. ॥
संकल्प हे[5] यावे फळा । कळवळा बहुतांचा ॥ २ ॥
तुका ह्मणे होऊनि क्षमा । पुरुषोत्तमा अपराध ॥ ३ ॥

॥ २७४४ ॥

आइकिली मात । पुरविले मनोरथ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेम वाढविलें देवा । बरवी घेऊनियां सेवा ॥ ध्रु. ॥
केली विनवणी । तैसी पुरविली धणी ॥ २ ॥
तुका ह्मणे काया । रसा कुरोंडी वरोनियां[6] ॥ ३ ॥

---

१ पं. करावें.—२ दे. पोरें. त. पोरे.—३ पं. संताचिये कारणें.—४ पं. लागें.—५ पं. ते.—६ पं. करूनियां.

॥ २७४५ ॥

संतांची स्तुति ते दर्शनाच्या योगें । पडिल्या[1] प्रसंगें ऐसी कीजे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संकल्पते सदा स्वामीचे चि चित्तीं । फाकों नये वृत्ति अखंडित ॥ ध्रु ॥
दास्यत्व तें असे एकाविध नांवें । उरों नये जीवें भिन्नत्वासी ॥ २ ॥
निज बीजा येथें तुका अधिकारी । साहिजे तें परी तये वेळे[1] ॥ ३ ॥

॥ २७४६ ॥

सेजेचा एकांत अगीपाशीं कळे । झांकिलिया डोळे अधःपात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राहो अथवा मग जळो अगीमधीं । निवोड[2] तो आधीं होऊनि गेला ॥ ध्रु ॥
भेणें झडपणी नाहीं येथें दुजें । पादरघिटा ओझें हतियारें ॥ २ ॥
तुका ह्मणे मज नाहीं जी[3] भरवसा । तोवरि सहसा निवांडा[4] तो ॥ ३ ॥

॥ २७४७ ॥

न सरे भांडार । भरलें वेचितां अपार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मवित्याचें पोट भरे । पुढिलासी पुढें उरे ॥ ध्रु ॥
कारणापुरता । लाहो आपुलाल्या हिता ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । पुढें केला चाले हेवा ॥ ३ ॥

॥ २७४८ ॥

तरी हांव केली अमुपा व्यापारें । व्हावें एकसरें[5] धनवंत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जालों हरिदास शूरत्वाच्या नेमें । जालीं ठावीं वर्मे पुढिलांचीं ॥ ध्रु ॥
जनावेगळें हें असे अभिन्नव । बळी दिला जीव ह्मणऊनि ॥ २ ॥
तुका ह्मणे तरी लागलों विल्हेसी । चालतिया दिसीं स्वामी ऋणी ॥ ३ ॥

---

१ पं. वेळीं.—२ दे. त. निवाडु.—३ पं. "जी" नाहीं.—४ दे. त. निवाडु.—५ पं. लागलें.

॥ २७४९ ॥

कोण दुजें हरी सीण । शरण दीन आल्याचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मांविण जगदीशा । उदार ठसा त्रिभुवनीं ॥ ध्रु ॥
कोण ऐसें वारी पाप । हरी ताप जन्माचा ॥ २ ॥
तुका ह्मणे धांव घाली । कोण चाली मनाचे ॥ ३ ॥

॥ २७५० ॥

ग्रंथाचे अर्थ नेणती[1] हे खळ । बहु अनर्गळ जाले विषयीं ॥ १ ॥
नाहीं भेद ह्मूण भलतें चि आचरे । मोकळा विचरे[2] मनासवें ॥ २ ॥
तुका ह्मणे विषा नांव तें अमृत । पापपुण्या भीत नाहीं नष्ट ॥ ३ ॥

॥ २७५१ ॥

कायावाचामनें जाला विष्णुदास । काम क्रोध त्यास बाधीतना ॥ १ ॥
विश्वास तो करी स्वामीवरी सत्ता । सकळ भोगिता होय त्याचें ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्त करावें निर्मळ । येऊनि गोपाळ राहे तेथें ॥ ३ ॥

॥ २७५२ ॥

याती हीन मति[3] हीन कर्म हीन माझें ।
सांडोनियां सर्व लज्जा शरण आलों तुज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येई गा तूं मायबापा पंढरीच्या राया ।
तुजविण सीण जाला क्षीण जाली काया ॥ ध्रु ॥

---

१ पं. नेणतां.—२ पं. विचार.—३ पं. "मति हीन" नाहीं

दिनानाथ[1] दीनबंधु नाम तुज साजे ।
पतितपावन नाम ऐसीं ब्रीदावळी गाजे ॥ २ ॥
विटेवरि नीट उभा कटावरी कर ।
तुका ह्मणे हें चि आह्मां ध्यान निरंतर ॥ ३ ॥

॥ २७५३ ॥

गंगा आली आह्मांवरि । संतपाउलें साजिरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें करीन मी[2] अंघोळी । उडे चरणरजधुळी ।
येती तीर्थावळी । पर्वकाळ सकळ ॥ ध्रु ॥
पाप पळालें जळालें । भवदुःख दुरावलें ॥ २ ॥
तुका ह्मणे धन्य जालों । संतसागरांत[3] न्हालों ॥ ३ ॥

॥ २७५४ ॥

पोटासाटीं खटपट करिसी अवघा वीळ ।
राम राम ह्मणतां तुझी बसली[4] दांतखीळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हरिचें नाम कदाकाळीं कां रे नये वाचे ।
ह्मणतां राम राम तुझ्या बाचें काय वेचे ॥ ध्रु ॥
द्रव्याचिया आशा तुजला दाही दिशा न पुरती ।
कीर्तनासी जातां तुझी जड झाली माती ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐशा जीवा काय करूं आतां ।
राम राम न ह्मणे त्याचा गाढव मातापिता ॥ ३ ॥

---

१ त. दिनानाथा.—२ पं. "मी" नाहीं.—३ त. पं. संतसागरीं न्हालों.—४ पं. बैसे.

॥ २७५५ ॥

आह्मां सुकाळ सुखाचा । जवळी हाट पंढरीचा ।
सादाविती वाचा । रामनामें वैष्णव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घ्या रे आपुलाल्या परी । नका ठेवूं कांहीं उरी ।
ओसरतां भरीं । तोंडवरी अंबर ॥ ध्रु ॥
वाहे बंदर द्वारका । खेप आली पुंडलिका ।
उभे चि विकिलें एका । सनकादिकां सांपडलें ॥ २ ॥
धन्य धन्य हे भूमंडळी । प्रगटली नामावळी ।
घेती जीं दुबळीं । तीं आगळीं सदैव ॥ ३ ॥
माप आपुलेनि हातें । कोणी नाहीं निवारितें ।
पैस करूनि चित्तें । घ्यावें हितें आपुलिया ॥ ४ ॥
नाहीं वांटितां सरलें । आहे तैसें चि भरलें ।
तुका ह्मणे गेलें । वांयांविण न घेतां ॥ ५ ॥

॥ २७५६ ॥

चुकलिया ताळा । वाती घालुनि बैसे डोळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें जागें करीं चित्ता । कांहीं आपुलिया हिता ॥ ध्रु ॥
निक्षेपिलें धन । तेथें गुंतलेंसे मन ॥ २ ॥
नाशिवंतासाटीं । तुका ह्मणे करिसी आटी ॥ ३ ॥

॥ २७५७ ॥

करूनि जतन । कोणा कामा आलें धन ॥ १ ॥

---

१ पं. नामाचा.—२ पं. साधाविती.

॥ ध्रु. ॥ ऐसें जाणतां जाणतां । कां रे होतोसी नेणता ॥ ध्रु ॥
प्रिया पुत्र बंधु । नाहीं तुज यांशीं संबंधु ॥ २ ॥
तुका ह्मणे एका । हरीविण नाहीं सखा ॥ ३ ॥

॥ २७५८ ॥

आह्मी देतों हाका । कां रे जालासी तूं मुका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न बोलसी नारायणा । कळलासी क्रियाहीना ॥ ध्रु ॥
आधीं करूं चौघाचार । मग सांडूं भीडभार ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवटीं । तुह्मां आह्मां घालूं तुटी ॥ ३ ॥

॥ २७५९ ॥

नव्हे भिडा हें कारण । जाणे करूं एसें जन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जों जों धरावा लौकिक । रवेडवितोसी आणीक ॥ ध्रु ॥
चाल जाऊं संतांपुढें । ते हें निवडिती रोकडें ॥ २ ॥
तुका ह्मणे तूं निर्लज्ज । आह्मां रोकडी गरज ॥ ३ ॥

॥ २७६० ॥

बहु होता भला । परि ये रांडेनें नासिला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु शिकला रंग चाळे । खरें खोटें इचे वेळे ॥ ध्रु ॥
नव्हतें आळवितें कोणी । इनें केला जगऋणी ॥ २ ॥
ज्याचे त्यासी नेदी देऊं । तुका ह्मणे धांवे खाऊं ॥ ३ ॥

॥ २७६१ ॥

काय करावें तें आतां । जालें नयेसें बोलतां ॥ १ ॥

---

१ पं जाणत.—२ पं रडवितोसी.

॥ ध्रु. ॥ नाहीं दोघांचिये हातीं । गांठी घालावी एकांतीं ॥ ध्रु ॥
होय आपुलें काज । तों हे[1] भीड सांडूं लाज ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । आधीं निवडूं हा गोवा ॥ ३ ॥

॥ २७६२ ॥

केली सलगी तोंडपिटी । आह्मी लाडिवाळें धाकुटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न बोलावें तें चि आलें । देवा पाहिजे साहिलें ॥ ध्रु ॥
अवघ्यांमध्यें एक बेडें । तें चि खेळविती कोडें ॥ २ ॥
तुका ह्मणे मायबापा । मजवरि कोपों नका ॥ ३ ॥

॥ २७६३ ॥

शिकवूनि बोल । केलें कवतुक नवल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपणियां रंजविलें । बापें माझिया विठ्ठलें ॥ ध्रु ॥
हातीं प्रेमाचें भातुकें । आह्मां देऊनियां निकें ॥ २ ॥
तुका करी टाहो । पाहे रखुमाईचा ना हो ॥ ३ ॥

॥ २७६४ ॥

तेथें सुखाची वसति । गाती वैष्णव नाचती ।
दिंड्या[2] पताका झळकती । गर्जती हरिनामें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दोषा जाली घेघेमारी । पळंती[3] भरले दिशा चारी ।
न येती माघारीं । नाहीं उरी परताया ॥ ध्रु ॥
विसरोनि देवपणा । उभा पंढरीचा राणा ।
विटोनि[4] निर्गुणा । रूप धरिलें गोजिरें[5] ॥ २ ॥

---

१ पं. वरि.—२ दे. "दिंड्या" नाहीं. त. दिंडी.—३ पं. पळती दिशा भरल्या चारी.—४ पं. विठला.—५ दे. "सगुण" असा पाठ घातला आहे.

पोट सेवितां न धाये । भूक भुकेली च राहे ।
तुका ह्मणे पाहे । कोण आस[1] मुक्तीची ॥ ३ ॥

॥ २७६५ ॥

शूद्रवंशीं जन्मलों । ह्मणोनि दंभें मोकलिलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अरे तूं चि[2] माझा आतां । मायबाप पंढरीनाथा ॥ ध्रु ॥
घोकाया अक्षर । मज[3] नाहीं अधिकार ॥ २ ॥
सर्वभावें दीन । तुका ह्मणे यातिहीन ॥ ३ ॥

॥ २७६६ ॥

वेडें वांकडें[4] गाईन । परि मी तुझा चि ह्मणवीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज तारीं दिनानाथा । ब्रीदें[5] साच करीं आतां ॥ ध्रु
केल्या अपराधांच्या राशी । ह्मणऊनि आलों तुजपाशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मज तारीं । सांडीं[6] ब्रीद नाहींतरीं ॥ ३ ॥

॥ २७६७ ॥

हरिभक्त माझे जिवलग सोइरे । त्हृदयीं पाउलें[7] धरीन त्यांचीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥अंतकाळीं येती[8] माझ्या सोडवणे । मस्तक बैसणें देइन त्यांसी ॥ ध्रु ॥
आणिक सोइरे सज्जन वो कोणी । वैष्णवांवांचोनि नाहीं मज ॥ २ ॥
देइन आलिंगण धरीन चरण । संवसारसीण नासे तेणें ॥ ३ ॥
कंठीं तुळशीमाळा नामाचे धारक । ते माझे तारक भवनदीचे ॥ ४ ॥
तयांचे चरणीं घालीन मी मिठी । चाड हे[9] वैकुंठीं नाहीं मज ॥ ५ ॥
अंळसें दंभें भावें हरिचें नाम गाती । ते माझे सांगाती परलोकींचे ॥ ६ ॥

---

१ दे. आस या मुक्तीची.—२ पं. "चि" नाहीं.—३ त. मति.—४ पं. वेडें वांकुडें गायीन परी तुझा ह्मणवीन. त. परि तुझाचि ह्मणवीन.—५ पं. ब्रीद.—६ पं. सोडीं.—७ दे. पाउले धरिन त्यांचे.—८ त. माझे येती.—९ पं. त्या. दे. चाड वैकुंठीं.

कायावाचामनें देइन क्षेम त्यासी । चाड जीवित्वासी[1] नाहीं मज ॥ ७ ॥
हरिचें नाम मज ह्मणविती कोणी । तया सुखा धणी[2] धेणी वरी ॥ ८ ॥
तुका ह्मणे तया उपकारें[3] बांधलों । ह्मणऊनि आलों शरण संतां ॥ ९ ॥

॥ २७६८ ॥

लटिका तो प्रपंच एक हरि साचा । हरिविण आहाच सर्व इंद्रियें ॥ १ ॥
॥ध्रु.॥लटिकें तें मौन[4] भ्रमाचें तें स्वप्न । हरिविण ध्यान नश्वर[5] अवघें[6] ॥ध्रु॥
लटिकिया वित्पत्ति[7] हरिविण करिती[8] । हरि नाहीं चित्तीं तो[9] शव जाणा॥ २॥
तुका ह्मणे हरि हें धरिसी[10] निर्धारीं । तरी तूं झडकरी जासी वैकुंठा॥ ३ ॥

॥ २७६९ ॥

सर्वस्वा मुकावें तेणें हरि[11] जिंकावें । अर्थ प्राण जीवें देहत्याग ॥ १ ॥
॥ध्रु.॥मोह,ममता माया चाड[12] नाहीं चिंता । विषयकंदु[13]वेथा जाळूनियां.॥ध्रु॥
लोकलज्जा दंभ आणि अहंकार । करूनि मत्सर देशधडी ॥ २ ॥
शांति क्षमा दया सखिया विनउनी[14] । मूळ चक्रपाणी धाडी त्यांसी ॥ ३॥
तुका ह्मणे याती अक्षरें अभिमान । सांडोनियां शरण रिघें संतां ॥ ४ ॥

॥ २७७० ॥

एकांताचें सुख देईं मज देवा । आघात या जीवा चुकवूनि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर । आपुला विसर पडों नेदीं ॥ध्रु॥
मायबाळा भेटी सुखाची आवडी । तैशी मज गोडी देईं देवा ॥ २ ॥
कीर्ती ऐकोनियां जालों शरणांगत । दासाचें तूं हित करितोसी॥ ३ ॥
तुका[15] ह्मणे मी तों दीन पापराशी । घालावें पाठीशी मायबापा ॥ ४ ॥

---

१ पं. जीवित्वाची.—२ पं. पार नाहीं.—३ उपकार बोधलों.—४ दे. त. मौन्य भ्रमाचें स्वप्न. ५ पं. नैश्वर्य. त. नैश्वर.—६ दे. आहे.—७ दे त. विपत्ति ८.—पं रीति.—९ पं. "तो" नाहीं.—१० पं. धरीं.—११ दे. त. हरीसी.—१२ पं. चाड नाहीं चिंता.—१३ पं. विषय कंडवेथा.—१४ पं. विनवनी.—१५ पं. तुका ह्मणे दीन मी तो पाप०.

॥ २७७१ ॥

लटिकें तें ज्ञान लटिकें तें[1] ध्यान । जरि हरिकीर्तन प्रिय नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लटिकें[2] चि दंभ घातला[3] दुकान । चाळविलें जन पोटासाटीं ॥ध्रु॥
लटिकें चि केलें वेदपारायण । जरि नाहीं स्फुंदन प्रेम कथे ॥ २ ॥
लटिकें तें तप लटिका तो जप । अळस निद्रा झोप कथाकाळीं ॥ ३ ॥
नाम नावडे तो करील बाहेरी । नाहीं त्याची खरी चित्तशुद्धि ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसीं गर्जती पुराणें । शिष्टांचीं वचनें मागिला ही ॥ ५ ॥

॥ २७७२ ॥

भूतीं भगवद्भाव । मात्रासहित[4] जीव ।
अद्वैत तो ठाव । निरंजन एकला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसीं गर्जती पुराणें । वेदवाणी सकळ जन ।
संत गर्जतील तेणें । अनुभवें निर्भर ॥ ध्रु ॥
माझें तुझें हा विकार । निरसतां एकंकार ।
न लगे कांहीं फार । विचार चि करणें ॥ २ ॥
तुका ह्मणे दुजें । हें तो नाहीं सहजें ।
संकल्पाच्या काजें । आपें आप वाढलें ॥ ३ ॥

॥ २७७३ ॥

नेणें फुंकों कान । नाहीं एकांतीचें[5] ज्ञान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी आइका हो संत । माझा सादर वृत्तांत ॥ ध्रु ॥
नाहीं देखिला तो डोळां । देव दाखवूं सकळां ॥ २ ॥
चिंतनाच्या सुखें । तुका ह्मणे नेणें दुःखें ॥ ३ ॥

---

१ पं. "तें" नाहीं.—२ पं. लटिका.—३ पं. घातलें.—४ दे. त. मात्रासहित जीव । अद्वैत ठाव।.—५ पं. एकांताचें.

॥ २७७४ ॥

त्याग तरी ऐसा करा । अहंकारा दवडावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग जैसा तैसा राहें । काय पाहें उरलें तें ॥ ध्रु ॥
अंतरींचें विषम गाढें । येऊं पुढें नेदावें[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे शुद्ध मन । समाधान पाहिजे ॥ ३ ॥

॥ २७७५ ॥

मातेचिये चित्तीं । अवघी बाळकाची व्याप्ति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देह विसरे आपुला । जवळी घेतां सीण गेला ॥ ध्रु ॥
दावी प्रेमभातें । आणि अंगावरि चढतें ॥ २ ॥
तुका संतापुढें । पायीं झोंबे लाडें कोडें ॥ ३ ॥

॥ २७७६ ॥

कोणा पुण्या फळ आलें । आजि देखिलीं पाउलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें नेणें[2] नारायणा । संतीं सांभाळिलें[3] दीना ॥ ध्रु ॥
कोण लाभकाळ । दीन आजिचा[4] मंगळ ॥ २ ॥
तुका ह्मणे जाला । लाभ[5] सहज विठ्ठला ॥ ३ ॥

॥ २७७७ ॥

मान इच्छी तो अपमान पावे । अमंगळ सवे अभाग्याची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एकाचिये अंगीं दुजियाचा[6] वास । आशा पुढें नाश सिद्ध करी ॥ ध्रु ॥
आधीं फळासी कोठें पावों शके । वासनेची भिकेवरी चाली ॥ २ ॥
तुका ह्मणे राजहंस ढोरा नांव । काय तया घ्यावें अळंकाराचें ॥ ३ ॥

---

१ त. न द्यावें.—२ पं. नेणों.—३ त. सांभाळिलों.—४ दे. आजि.—५ पं. एवढा लाभ हा विठ्ठला.—६ पं. दुजियाची.

॥ २७७८ ॥

संसारापासूनी कैसें[1] सोडविशी । न कळे त्वृषीकेशी काय जाणें ।
करितां न सरे अधिक वाट पाहीं । तृष्णा देशधडी केलों ।
भक्तिभजनभाव यांसी नाहीं ठाव । चरणीं तुझ्या अंतरलों ।
मागें पुढें रीग न पुरे चि पाहातां । अवघा अवघीं वेष्टिलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझी लाज राखें नारायणा । हीन दीन लीन[2] याचकाची ।
करितां न कळे कांहीं असतील गुण दोष । करीं होळी संचिताची[3] ॥ ध्रु ॥
इंद्रियें द्वारें मन धांवे सैरें । नांगवे[4] करितां चि कांहीं ।
हात पाय कान मुख लिंगस्थान । नेत्र घ्राण द्वारें पाहीं ।
जया जैसी सोय तया तैसें होय । क्षण एक स्थिर नाहीं ।
करिती ताडातोडी ऐसी यांची खोडी । न चले माझें यास कांहीं ॥ २ ॥
शरीरसंबंधु पुत्र पत्नी बंधु । धन लोभ मायावंत ।
जन लोकपाळ मैत्र हे सकळ । सोइरीं सज्जनें बहुतें[5] ।
नाना कर्म डाय करिती उपाय । बुडावया घातपातें[6] ।
तुका ह्मणे हरी राखे भलत्या परी । आह्मी तुझीं शरणागतें ॥ ३ ॥

॥ २७७९ ॥

नाम घेतां उठाउठीं । होय संसारासी तुटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा लाभ बांधा गांठी । विठ्ठलपायीं पडे मिठी ॥ ध्रु ॥
नामापरतें साधन नाहीं । जें तूं करिशी आणिक कांहीं ॥ २ ॥
हाकारोनि सांगे तुका । नाम घेतां राहों नका ॥ ३ ॥

---

१ पं. कई.—२ पं. "लीन" नाहीं.—३ पं. संसाराची.—४ पं. सैर नांगवेचि करितां कांहीं ।.—५ पं. सज्जन बहुत.—६ पं. घात पात.

॥ २७८० ॥

प्राण समर्पिला आह्मी । आतां उशीर कां स्वामी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें फेडावें उसणें । भार न मना या ऋणें ॥ ध्रु ॥
जाला कंठस्फोट । जवळी पातलों निकट ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवा । कैसी बरी वाडे देवा ॥ ३ ॥

॥ २७८१ ॥

येणें मार्गें आले । त्यांचें निसंतान केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी अवघड वाट । ऐकोन आलों मी बोभाट ॥ ध्रु ॥
नागविल्या थाटी । उरों नेदी च लंगोटी ॥ २ ॥
तुका ह्मणे चोर । तो हा उभा कटिकर ॥ ३ ॥

॥ २७८२ ॥

तोंवरि तोंवरि जंबुक करि गर्जना । जंव त्या पंचानना[1] देखिलें नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तोंवरि तोंवरि सिंधु करि गर्जना । जंव त्या अगस्तिब्राह्मणा देखिलें नाहीं ॥ ध्रु ॥
तोंवरि तोंवरि वैराग्याच्या गोष्टी । जंव सुंदर वनिता दृष्टी पडिली नाहीं ॥ २ ॥
तोंवरि तोंवरि शूरत्वाच्या गोष्टी । जंव परमाईचा पुत्र दृष्टी देखिला नाहीं ॥ ३ ॥
तोंवरि तोंवरि माळामुद्रांचीं भूषणें । जंव तुक्याचें दर्शन जालें नाहीं ॥ ४ ॥

॥ २७८३ ॥

तोंवरि तोंवरि शोभतील गारा । जंव नाहीं हिरा प्रकाशला ॥ १ ॥
तोंवरि तोंवरि शोभती[2] दीपिका । नुगवता एका भास्करासी ॥ २ ॥
तोंवरि तोंवरि सांगती संताचिया गोष्टी । जंव नाहीं भेटी तुक्यासवें ॥ ३ ॥

---

१ पं. कोणा सांगावा बोभाट । दे. पूर्वीं असें होतें.—२ दे. शोभतील.

॥ २७८४ ॥

धरोनि दोन्ही रूपें पाळणें संहार । करी कोप रुद्र दयाळ विष्णु ॥१॥
॥ ध्रु. ॥ जटाजूट एका मुगुट माथां शिरीं । कमळापति गौरीहर एक
॥ ध्रु ॥
भस्मउद्धळण लक्ष्मीचा भोग । शंकर श्रीरंग उभयरूपीं ॥ २ ॥
वैजयंती माळा वासुगीचा हार । लेणें अळंकार हरिहरा ॥ ३ ॥
कपाळ झोळी एका स्मशानींचा वास । एक जगन्निवास विश्वंभर ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज उभयरूपीं एक । सारोनि संकल्प शरण आलों ॥ ५ ॥

॥ २७८५ ॥

उचिताचा भाग होतों राखोनियां । दिसती ते वांयां कष्ट गेले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वचनाची कांहीं राहे चि ना रुचि। खळाऐसें[1] वाची कुची जालें[2]
॥ ध्रु ॥
विश्वासानें माझें बुडविलें घर । करविला धीर येथवरी ॥ २ ॥
तुका ह्मणे शेकीं थार नाहीं बुड । कैसें तुह्मीं कोड पुरविलें ॥ ३ ॥

॥ २७८६ ॥

लांब लांब जटा काय वाढवूनि । पावडें घेऊनि क्रोधें चोले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खायाचा वोळसा शिव्या दे जनाला । ऐशा तापशाला बोध कैंचा
॥ ध्रु ॥
सेवी भांग अफू तमाखू उदंड । परि तो अखंड भ्रांतीमाजी ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसा सर्वस्वें बुडाला । त्यासी अंतरला पांडुरंग ॥ ३ ॥

---

१ पं. खेळा ऐसे. —२ पं. झालें.

॥ २७८७ ॥

अवघीं च तीर्थें घडलीं एकवेळा । चंद्रभागा डोळां देखिलिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघीं च पापें गेलीं दिगांतरीं । वैकुंठ[1] पंढरी देखिलिया ॥ ध्रु ॥
अवघिया संतां एकवेळा भेटी । पुंडलीक दृष्टी देखिलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे जन्मा आल्याचें सार्थक । विठ्ठल चि एक देखिलिया ॥ ३ ॥

॥ २७८८ ॥

सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल । तेणें गळां माळ घालूं नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्यासी नाहीं धर्म[2] दया क्षमा शांति । तेणें अंगीं[3] विभूती लावूं नये ॥ ध्रु
जयासी न कळे भक्तीचें माहिमान । तेणें ब्रह्मज्ञान बोलों नये ॥ २ ॥
ज्याचें मन नाहीं लागलें हातासी । तेणें प्रपंचासी टाकूं नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे ज्यासी नाहीं हरिभक्ति । तेणें भगवें हातीं धरूं नये ॥ ४ ॥

॥ २७८९ ॥

आह्मी असों निश्चितीनें । एक्या गुणें तुमचिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दुराचारी तरले नामें । घेतां प्रेमें[4] ह्मणोनि ॥ ध्रु ॥
नाहीं तुह्मां[5] धांव घेतां । कृपावंता आळस ॥ २ ॥
तुका ह्मणे विसरूं काईं । तुज वो आई विठ्ठले ॥ ३ ॥

॥ २७९० ॥

अनुभवें वदे वाणी । अंतर ध्यानीं आपुलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैंची चिका दुधचवी । जरी दावी पांढरें ॥ ध्रु ॥
जातीऐसा दावी रंग । बहु जग या नावें ॥ २ ॥
तुका ह्मणे खद्योत तें । ढुंगाभोंवतें आपुलिया ॥ ३ ॥

---

१ त. भूवैकुंठ.—२ दे. पं. "धर्म" नाहीं.—३ पं. अंगासी.—४ दे. प्रेम.—५ पं. आह्मां.—६ दे. कांहीं.

॥ २७९१ ॥

परपीडक तों आह्मां दावेदार । विश्वीं विश्वंभर ह्मणऊनि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ दंडूं त्यागूं बळें नावलोकूं डोळा । राखूं तो चांडाळा ऐसा दुरि ॥ ध्रु ॥
अनाचार कांहीं न साहे अवगुणें । बहु होय मन कासावीस ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी एकविध सेवा । विमुख ते देवा वाळी चित्तें ॥ ३ ॥

॥ २७९२ ॥

कांहीं न मागे कोणासी । तो चि आवडे देवासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव तयासी ह्मणावें । त्याचें चरणीं लीन व्हावें ॥ ध्रु ॥
भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥ २ ॥
नाहीं नाहीं त्यासमान । तुका ह्मणे मी जमान ॥ ३ ॥

॥ २७९३ ॥

नाम उच्चारितां कंठीं । पुढें उभा जगजेठी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें धरोनियां ध्यान । मनें करावें चिंतन ॥ ध्रु ॥
ब्रह्मादिकांच्या[1] ध्याना नये । तो हा कीर्तनाचे सोये ॥ २ ॥
तुका ह्मणे सार घ्यावें । मनें हरिरूप पाहावें ॥ ३ ॥

॥ २७९४ ॥

आडलिया जना होसी सहाकारी । अंधळियाकरीं काठी तूं चि ॥ १ ॥
आडिले[2] गांजिले पीडिले संसारीं ॥ त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥ ध्रु ॥
प्रल्हाद महासंकटीं राखिला । तुह्मी अवंगिला नानापरी ॥ २ ॥
आपुलें चि अंग तुह्मी वोडविलें । त्याचें निवारलें महा दुःख ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझे रूपे पार नाहीं । माझे विठाबाई जननीये ॥ ४ ॥

---

१ त. पं. ब्रह्मादिकां ध्याना. —२. पं आडले.

॥ २७९५ ॥

तपासी तें मन करूं पाहे घात । धरोनि सांगात इंद्रियांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि कीर्त्तन आवडलें मज । सांडोनियां लाज हें चि करीं ॥ ध्रु ॥
पाहातां आगमनिगमाचे ठाव[1] । तेथें नाहीं भाव एकाविध ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें नाहीं वो विकार । नाम एक सार विठोबाचें ॥ ३ ॥

॥ २७९६ ॥

गुरुशिष्यपण । हें तों अधमलक्षण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भूतीं नारायण खरा । आप तैसा चि दुसरा ॥ ध्रु ॥
न कळतां दोरी साप । राहूं नेदावा तो कांप[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे गुणदोषी । ऐसें न पडावें सोसीं ॥ ३ ॥

॥ २७९७ ॥

अंगीकार ज्याचा केला नारायणें । निंद्य तें हि तेणें[3] वंद्य केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अजामेळ भिल्ली[4] तारिली कुटणी । प्रत्यक्ष पुराणीं वंद्य केली ॥ ध्रु ॥
ब्रह्महत्याराशी पातकें अपार । वाल्मीक किंकर वंद्य केला ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळावें तें ॥ ३ ॥

॥ २७९८ ॥

धनवंता घरीं । करी धन चि चाकरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होय बैसल्या व्यापार । न लगे सांडावें चि घर ॥ ध्रु ॥
रानीं वनीं द्वीपीं[5] । असतीं तीं होतीं सोपीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मोल । देतां कांहीं नव्हे खोल ॥ ३ ॥

---

१ पं. आगमनिगमाचा.—२ पं. कंप.—३ पं. जन.—४ दे. त. पं. भिल्ली.—५ दे. त. दीपीं.

॥ २७९९ ॥

हा गे माझा अनुभव । भक्तिभाव भाग्याचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केला ऋणी नारायण । नव्हे क्षण वेगळा ॥ ध्रु ॥
घालोनियां भार माथां । अवघी चिंता वारली ॥ २ ॥
तुका ह्मणे वचनासाठीं[1] । नाम कंठीं धरोनि ॥ ३ ॥

॥ २८०० ॥

देव आहे सुकाळ देशीं । अभाग्यासी दुर्भिक्ष ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेणती हा करूं सांटा । भरले फांटा आडरानें ॥ ध्रु ॥
वसवूनि असे घर । माग दूर घातला ॥ २ ॥
तुका ह्मणे मन मुरे । मग जें उरे तें चि तूं ॥ ३ ॥

॥ २८०१ ॥

खुंटोनियां[2] दोरी आपणियांपाशीं । वावडी आकाशीं मोकलिली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलिया आहे मालासी जतन । गाहाणाचे ऋण बुडों नेणें ॥ ध्रु ॥
बीज नेलें तेथें येईल अंकुर । जतन तें सार करा याची ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी निश्चितीची सेवा । वेगळें नाहीं देवा उरों दिलें ॥ ३ ॥

॥ २८०२ ॥

शाहाणपणें वेद मुका । गोपिका त्या ताकटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसें[3] येथें कैसें तेथें । शहाणे ते जाणती ॥ ध्रु ॥
यज्ञमुखें[4] खोडी काढी । कोण गोडी बोरांची ॥ २ ॥
तुका ह्मणे भावाविण । अवघा सीण केला होय[5] ॥ ३ ॥

---

१ दे. त. वचन साटीं.—२ पं. सुटोनियां.—३ पं. कैसा.—४ पं. यज्ञा मुखीं.—५ पं. तो.

॥ २८०३ ॥

मजुराचें पोट भरे । दाता उरे संचला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ या रे या रे हातोहातीं । काम माती सारावी ॥ ध्रु ॥
रोजकीर्दी[1] होतां झाडा । रोकडा चि पर्वत ॥ २ ॥
तुका ह्मणे खोल पाया । वेचों काया क्लेशेसीं[2] ॥ ३ ॥

॥ २८०४ ॥

स्मशानीं आह्मां न्याहालीचें सुख । या नांवें कौतुक तुमची कृपा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नाहीं तरीं वांयां अवघें[3] निर्फळ । शब्द ते पोकळ बडबड ॥ ध्रु ॥
झाडें झुडें जीव सोइरे पाषाण । होती तेंई दान तुह्मीं केलें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां पाहे अनुभव । घेऊनि हातीं जीव पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ २८०५ ॥

आमची जोडी ते देवाचे चरण । करावें चिंतन विठोबाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लागेल तरीं कोणी घ्यावें[4] धणीवरी । आमुपचि परी आवडीच्या ॥ ध्रु ॥
उभारिला कर प्रसिद्ध या जग[5] । करूं केला त्याग मागें पुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे होय दरिद्र विच्छिन्न । ऐसें देऊं दान एकवेळे ॥ ३ ॥

॥ २८०६ ॥

दधिमाझी लोणी जाणती सकळ । तें[6] काढी निराळें जाणे मथन ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अग्नि काष्ठामाजी ऐसें जाणे जन । मथिलियाविण कैसा जाळी ॥२॥
तुका ह्मणे मुख मळीण दर्पणीं । उजळिल्यावांचूनि कैसें भासे ॥ ३ ॥

---

१ त. रोज किर्दी.—२ पं. क्लेशेची.—३ पं. अवघेचि निर्फळ.—४ पं. घ्यारे .—५ पं. जगें.—६ पं. तो.

॥ २८०७ ॥

नको नको मना गुंतूं मायाजालीं । काळ आला जवळी ग्रासावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काळाची हें उडी पडेल बा जेव्हां । सोडविना तेव्हां मायबाप ॥ ध्रु
सोडवीना राजा देशींचा चौधरी । आणीक सोइरीं भलीं भलीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुला सोडवीना कोणी । एका चक्रपाणी वांचूनियां ॥ ३ ॥

॥ २८०८ ॥

पुढें जेणें लाभ घडे । तें चि वेडे नाशिती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येवढी कोठें नागवण । अंधारून[2] विष घ्यावें ॥ ध्रु ॥
होणारासी मिळे बुद्धि । नेदी शुद्धी धरूं तें ॥ २ ॥
तुका ह्मणे जना सोंग । दावी रंग आणीक ॥ ३ ॥

॥ २८०९ ॥

ऐका गा ए अवघे जन । शुद्ध मन तें हित ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघा काळ नव्हे जरी । समयावरी जाणावें ॥ ध्रु ॥
नाहीं कोणी सवें येता । संचिता या वेगळा[3] ॥ २ ॥
बरवा अवकाश आहे । करा साहे इंद्रियें ॥ ३ ॥
कर्मभूमीऐसा ठाव । वेवसाव जाणावा ॥ ४ ॥
तुका ह्मणे उत्तम जोडी । जाती घडी नरदेह ॥ ५ ॥

॥ २८१० ॥

संतसेवेसि अंग चोरी । दृष्टी न पडो तयावरी ॥ १ ॥
ऐसियासी व्याली रांड । जळो जळो तिचें तोंड ॥ ध्रु ॥

---

१ पं. तुज.—२ दे. त. अंधारुण.—३ पं. वेगळें.

संतचरणीं ठेवितां भाव । आपेंआप भेटे[1] देव ॥ २ ॥
तुका म्हणे संतसेवा । माझ्या पूर्वजांचा ठेवा ॥ ३ ॥

॥ २८११ ॥

गेले पळाले दिवस रोज । काय ह्मणतोसि माझें माझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सळे धरोनि बैसला काळ । फाकों नेदी घटिका पळ ॥ ध्रु ॥
कां रे अद्यापि न कळे । केश फिरले कान डोळे ॥ २ ॥
हित कळोनि असतां हातीं । तोंडीं पाडोनि घेसी माती ॥ ३ ॥
तुज ठाउकें मी जाणार । पाया शोधोनि बांधिसी घर ॥ ४ ॥
तुका ह्मणे वेगें । पंढरिराया शरण रिघें ॥ ५ ॥

॥ २८१२ ॥

आतां माझ्या मायबापा । तूं या पापा प्रायश्चित्त ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फजित हे केले खळ । तो विटाळ निवारीं ॥ ध्रु ॥
प्रेम आतां पाजीं रस । करीं वास अंतरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । जिवलगा माझिया ॥ ३ ॥

॥ २८१३ ॥

कां रे न पवसी धांवण्या । अंगराख्या नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंगीं असोनियां बळ । होसी खटयाळ नाटयाळ ॥ ध्रु ॥
आह्मां नरकासी जातां । काय येइल तुझ्या हातां ॥ २ ॥
तुका ह्मणे कान्हा । क्रियानष्टा नारायणा ॥ ३ ॥

॥ २८१४ ॥

माझे पाय तुझी डोई[1] । ऐसें करिं गा भाक देई[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहतां तंव उफराटें । घडे तेरी भाग्य मोठें ॥ ध्रु ॥

---

१ त. भेटेल.—२ दे. पं. वई.

बहु साधन मोलाचें । यासी जोडा दुजें कैचें ॥ २ ॥
नका अनमानूं विठ्ठला । तुका ह्मणे धडा जाला[1] ॥ ३ ॥

॥ २८१५ ॥

पवित्र तें अन्न । हरिचिंतनीं भोजन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येर वेठ्या पोट भरी । चाम मसकाचे परी ॥ ध्रु ॥
जेऊनि[2] तो धाला । हरिचिंतनीं केला काला ॥ २ ॥
तुका ह्मणे चवी आलें । जें कां मिश्रित विठ्ठलें ॥ ३ ॥

॥ २८१६ ॥

चरणाचा महिमा । हा तो तुझ्या पुरुषोत्तमा ॥ १ ॥
॥ ध्रु. अंध पारखी माणिकें । बोलविशी स्पष्ट मुकें ॥ ध्रु ॥
काय नाहीं सत्ता । हातीं तुझ्या पंढरीनाथा ॥ २ ॥
तुका ह्मणे मूढा । मज चेष्टविलें जडा ॥ ३ ॥

॥ २८१७ ॥

बळिवंत कर्म । करी आपुला तो धर्म ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुढें घालुनियां सत्ता । न्यावें पतना पतिता ॥ ध्रु ॥
आचरणें खोटीं । केलीं सलताती पोटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । नाहीं भजन केली सेवा ॥ ३ ॥

॥ २८१८ ॥

कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥ ध्रु ॥

---

१ त. घाला.—२ पं. जेऊनियां तोचि धाला.

कैं भोज्य नानापरी । कैं कोरड्या भाकरी ॥ २ ॥
कैं बसावें वहनीं । कैं पायीं अन्हवाणी ॥ ३ ॥
कैं उत्तम प्रावर्णें । कैं वसनें तीं जीर्णें ॥ ४ ॥
कैं सकळ संपत्ती । कैं भोगणें विपत्ती ॥ ५ ॥
कैं सज्जनाशीं संग । कैं दुर्जनाशीं योग ॥ ६ ॥
तुका ह्मणे जाण । सुख दुःख तें समान ॥ ७ ॥

॥ २८१९ ॥

उंचें[1] निंच कांहीं नेणे हा भगवंत । तिष्ठे भाव भक्त देखोनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्या घरीं रक्षी प्रल्हादासी[2] ॥ ध्रु. ॥
चर्म रंगूं लागे रोहिदासा संगीं[3] । कबिराचे मागीं[4] विणी शेले ॥ २ ॥
सजनकसाया[5] विकूं लागे मास । मळा[6] सांवत्यास खुरपूं लागे ॥ ३ ॥
नरहरिसोनारा घडों फुंकूं लागे । चोखामेळ्या संगें ढोरें ओढी ॥ ४ ॥
नामयाची[7] जनी सर्वें वेची शेणी । धर्मा घरीं पाणी वाहे झाडी ॥ ५ ॥
नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित । ज्ञानियाची भिंत अंगीं ओढी ॥ ६ ॥
अर्जुनाचीं[8] घोडीं हाकी हा सारथी । भक्षी पोहे प्रीती[9] सुदाम्याचे ॥ ७ ॥
गौळियांचे घरीं गाई[10] अंगें वळी । द्वारपाळ बळीद्वारीं[11] जाला ॥ ८ ॥
यंकोबाचें[12] ऋण फेडी त्वष्टकेशी । आंबऋषीचे सोशी गर्भवास ॥ ९ ॥
मिराबाई साटीं घेतो विषप्याला । दामाजीचा जाला पाडेवार ॥ १० ॥

---

१ दे. त. उंचनिंच नेणे काहीं भगवंत ।—तिष्ठे भाव भक्त०.—२ पं. प्रल्हादासी.—३ पं. संगें.—४ पं. मागें शेले विणी.—५ त सज्जन कसाया पं. सजन्या कसवासी.—६ पं. माळया.—७ पं "नामयाची०" आणि "नामा सर्वें०" या कडव्यांच्या जागा परस्परांशी बदलल्या आहेत.—८ पं. अर्जुनाचे रथीं होय हा सारथी ।.—९ दे. प्रीती सुदाम्याची.—१० पं. अंगें गाई वोळी.—११ पं. बळिचा द्वारीं.—१२ पं. यकोबाचें. त. येंकोबाचें.

घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी[1] महत्याची अंगें भरी ॥ ११ ॥
पुंडलिकासाटीं अझूनि तिष्ठत । तुका ह्मणे मात धन्य त्यांची[2] ॥ १२ ॥

॥ २८२० ॥

भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहे रात्रीं दिवस वाट तुझी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पूर्णिमेचा चंद्रमा[3] चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ॥ध्रु॥
दिवाळीच्या मुळा लेंकी आसावली । पाहतसे वाटुली पंढरीची ॥ २ ॥
भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परि माउलीची ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज लागलीसे भूक । धांवूनि श्रीमुख दावीं देवा ॥ ४ ॥

॥ १८२१ ॥

आलें संत पाय ठेविती मस्तकीं । इहीं[4] उभयलोकीं सरता केलों ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ वंदीन पाउलें लोळेंन चरणीं । आजि इच्छाधणी फिटईल ॥ध्रु॥
अवघीं पूर्व पुण्यें जालीं सानुकूळ । अवघें चि मंगळ संतभेटी ॥ २ ॥
तुका ह्मणे कृतकृत्य जालों देवा । नेणें परि सेवा डोळां देखें ॥ ३ ॥

॥ २८२२ ॥

करीं धंदा परि आवडती[5] पाय । प्रीती सांगों काय नेणें[6] देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रूप डोळां देखें सदा सर्वकाळ । संपादितों आळ प्रपंचाचा ॥ध्रु॥
नेमून ठेविली कारया[7] कारणीं । आमुचिये वाणी गुण वदे ॥ २ ॥
मनासी उत्कंठा दर्शनाचा हेवा । नाहीं लोभ जीवा धन धान्य ॥ ३ ॥

---

१ पं. हुंडी त्या महंयाची० —२ दे. याची.—३ दे.० चंद्र चकोराचें जीवन ।—४ दे. त. येहीं.—५ पं. आठवती.—६ पं. नेणों.—७ पं. काया हे कारणीं । आमुची हे वाणी.

उसंतितों पंथ वेठीचिया परी । जीवनसूत्र दोरीपाशीं ओढ ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसें[1] करितों निर्वाण । जीव तुह्मां भिन्न नाहीं माझा ॥ ५ ॥

॥ २८२३ ॥

कां रे माझीं पोरें ह्मणसील[2] ढोरें । मायबाप खरें कांय[3] एक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे गेलें ह्मणोनि करिसी तळमळ । मिथ्या चि कोल्हाळ मेलियाचा ॥ ध्रु ॥
कां रे माझें माझें ह्मणसील गोत । नो संडविती[4] दूत यमा हातीं ॥ २ ॥
कां रे मी बळिया ह्मणविसी ऐसा । सरणपाशीं कैसा उचलविसी[5] ॥ ३ ॥
तुका ह्मणे न धरीं भरवसा कांहीं[6] । वेगीं शरण जाईं पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ २८२४ ॥

अगा करुणाकरा करितसें धांवा । या मज सोडवा लवकरि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐकोनियां माझीं करुणेचीं वचनें । व्हावें नारायणें उतावीळ ॥ ध्रु ॥
मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव । ठेवूनि पायीं भाव वाट पाहें ॥ २ ॥
उशीर तो आतां न पाहिजे केला । अहो जी विठ्ठला मायबापा ॥ ३ ॥
उरलें[6] तें एक हें चि मज आतां । अवघें विचारितां शून्य जालें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां करीं कृपादान । पाउलें समान दावीं डोळां ॥ ५ ॥

॥ २८२५ ॥

न मनीं ते ज्ञानी न मनीं ते पंडित । ऐसे परीचे एकएका भावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धातू पोसोनियां आणिकां उपदेश । अंतरीं तो लेश प्रेम नाहीं ॥ ध्रु ॥

---

१ त. ऐकें.—२ पं. ह्मणविसी.—३ त. कांहीं एक.—४ पं. न सोडविती.—५ त. उचलसी.—६ पं. उरलें तें मज हें चि एक आतां.

न मनीं ते योगी न मनीं ते हरिदास । दर्शनें बहुवस बहुतां परीचीं[1] ॥२॥
तुका ह्मणे तयां नमन बाह्यत्कारी । आवडती परी चित्तशुद्धीचे ॥ ३ ॥

॥ २८२६ ॥

कासिया पाषाण पूजिती पितळ । अष्ट धातु खळ भावें[2] विग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाव चि कारण भाव चि कारण[3] । मोक्षाचें साधन बोलियेलें ॥ध्रु॥
काय करिल[4] जपमाळा कंठमाळा । करिशी वेळोवेळां विषयजप ॥ २ ॥
काय करिशील पंडित हे वाणी । अक्षराभिमानी थोर होय ॥ ३ ॥
काय करिशील कुशल गायन । अंतरीं मळीण कुबुद्धि ते ॥ ४ ॥
तुका ह्मणे भाव नाहीं करी सेवा । तेणें काय देवा योग्य होशी ॥ ५ ॥

॥ २८२७ ॥

अंतरींचें गोड । राहे आवडीचें कोड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संघट्टणें येती अंगा । गुणदोष मनोभंगा[5] ॥ ध्रु ॥
उचिताच्या कळा । नाहीं कळत[6] सकळा ॥ २ ॥
तुका ह्मणे अभावना । भावीं मूळ तें पतना ॥ ३ ॥

॥ २८२८ ॥

शिळा जया देव । तैसा फळे त्याचा भाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होय जतन तें गोड । अंतरा येती नाड ॥ ध्रु ॥
देव जोडे भावें । इच्छेचें तें प्रेम घ्यावें ॥ २ ॥
तुका ह्मणे मोड दावी । तैशीं फळें आलीं व्हावीं ॥ ३ ॥

---

१ पं. परी—२ पं. भाव हीण.—३ त. कारण.—४ पं. काय करितील जपमाळ कंठ०.—५ दे. त. मनभंगा.—६ दे. त. कळती.

॥ २८२९ ॥

कासया जी ऐसा माझे माथां ठेवा । भार तुह्मी देवा संतजन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विचित्र विंदानी नानाकळा खेळे[1] । नाचवी पुतळे नारायण ॥ ध्रु ॥
काय वानरांची अंगींची ते शक्ति । उदका तरती वरी शिळा ॥ २ ॥
तुका ह्मणे करी निमित्य चि आड । चेष्टवूनि जड दावी पुढें ॥ ३ ॥

॥ २८३० ॥

पायां पडावें हें माझें भांडवल । सरती हे बोल कोठें पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि हे सलगी कवतुक[2] केलें । लडिवाळ धाकुलें असें बाळ ॥ ध्रु ॥
काय उणें तुह्मां संताचिये घरीं । विदित या परी सकळ ही ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें[3] उचित हे सेवा । नये करूं ठेवाठेवी कांहीं ॥ ३ ॥

॥ २८३१ ॥

वदवावी वाणी माझी कृपावंता । वाग्पुष्प* संतां समर्पीशी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्वसंकटाचा तुह्मां परिहार । घालावा म्यां भार पांडुरंगा ॥ ध्रु ॥
एकसरें चिंता[3] ठेवूनियां पायीं । जालों उतराई होतों तेणें ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें जालें अवसान । काया वाचा मन वेचूनियां ॥ ३ ॥

॥ २८३२ ॥

नमावें पाय हें माझें उचित । आशीर्वादें हित तुमचिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कृपेचा वोरस न समाये पोटीं । ह्मणोनि उफराटीं वचनें हीं ॥ ध्रु ॥
तुमची उष्टावळी हें[4] माझें भोजन । झाडावें अंगण केरपुंजे ॥ २ ॥
परि ऐसें पुण्य नाहीं माझे गांठीं । जेणें पडे मिठी पायांसवें ॥ ३ ॥
तुका ह्मणे राहे आठवण चित्तीं । ऐशी कृपा संतीं केली तुह्मीं ॥ ४ ॥

---

१ दे. त. खेळ.—२ पं. माझी.—३ पं. चित्त.—४ पं. तें.

* "वाक्पुष्प" याबद्दल.

॥ २८३३ ॥

काय नाहीं माता गौरवीत बाळा । काय नाहीं लळा पाळीत ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय नाहीं त्याची करीत ते सेवा । काय नाहीं जीवा गोमटें तें ॥ ध्रु ॥
अमंगळपणें[1] कांटाळा न धरी । उचलोनि करीं कंठीं लावी ॥ २ ॥
लेववी आपुले अंगें[2] अळंकार । संतोषाये[3] फार देखोनियां ॥ ३ ॥
तुका ह्मणे स्तुति योग्य नाहीं परी । तुह्मां लाज थोरी अंकिताची ॥ ४ ॥

॥ २८३४ ॥

माझिया मीपणावर पडो पाषाण । जळो हें भूषण नाम माझें ॥
पापा नाहीं पार दुःखाचे डोंगर । जालों ये भूमीसी ओझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय[4] विटंबना सांगों किती । पाषाण फुटती ऐसें दुःख ॥
नर नारी सकळ उत्तम चांडाळ । न पाहाती[5] माझें मुख ॥ ध्रु ॥
काया वाचा मनें अघटित करणें । चर्मचक्षु हात पाय ॥
निंदा द्वेष घात विश्वासीं व्यभिचार । आणीक सांगों किती काय ॥ २ ॥
लक्ष्मीमदें मातें[6] घडले महा दोष । पत्नी दोनी भेदाभेद[7] ।
पितृवचन घडली अवज्ञा अविचार । कुटिल कुचर वादी निंद्य ॥ ३ ॥
आणीक किती सांगों ते अवगुण । न वळे जिव्हा कांपे मन ।
भूतदया उपकार नाहीं शब्दा धीर । विषयीं लंपट हीन[8] ॥ ४ ॥
संत महानुभाव[9] ऐका हें उत्तरें । अवगुण अविचारें वृद्धि पापा ।
तुका ह्मणे सरतें करा पांडुरंगीं । शरण आलों मायबापा ॥ ५ ॥

---

१ पं. अमंगळपण.—२ त. हातें.—३ पं. संतोषे हे .—४ पं. कासया.—५ पं.० पाहाती डोळां माझें.—६ पं.० मातले घडले बहु दोष ।.—७ दे. त. भेदभेद.—८ पं. शब्द हीन.—९ पं. महानुभव.

कृष्णजन्म. अ० ॥ ५ ॥

॥ २८३५ ॥

फिराविलीं दोनी । कन्या आणि चक्रपाणी ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ जाला आनंदें आनंद । अवतरले गोविंद ॥ ध्रु ॥
तुटलीं बंधनें । वसुदेवदेवकीचीं दर्शनें ॥ २ ॥
गोकुळासी आलें । ब्रह्म अव्यक्त चांगलें ॥ ३ ॥
नंद दसवंती । धन्य देखिले श्रीपती ॥ ४ ॥
निशीं जन्मकाळ । आले अष्टमी गोपाळ ॥ ५ ॥
आनंदली मही । भार गेला सकळ ही ॥ ६ ॥
तुका ह्मणे कंसा । आट मोविला वळसा ॥ ७ ॥

॥ २८३६ ॥

सोडियेल्या गांठी । दरुषणें कृष्णभेटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करिती नारी अक्षवाणें । जीवभाव देती दानें ॥ ध्रु ॥
उपजल्या काळें । रूपें मोहीलीं सकळें ॥ २ ॥
तुका तेथें वारी । एकी आडोनि दुसरी ॥ ३ ॥

॥ २८३७ ॥

मुख डोळां पाहे । तैशी च ते उभी राहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केल्याविण नव्हे हातीं । धरोनि आरती परती ॥ ध्रु ॥
न धरिती मनीं । कांहीं संकोच दाटणी ॥ २ ॥
तुका ह्मणे देवें । ओस केल्या देहभावें ॥ ३ ॥

---

१ पं. वसुदेवदेवकी.

॥ २८३८ ॥

गोकुळीच्या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बाळकृष्ण नंदा घरीं । आनंदल्या नरनारी ॥ ध्रु ॥
गुढिया तोरणें । करिती कथा गाती गाणें ॥ २ ॥
तुका ह्मणे छंदें । येणें वेधिलीं[1] गोविंदें ॥ ३ ॥

॥ २८३९ ॥

विटंबिलें भट । दिला[2] पाठिवरी पाट ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खोटें जाणोनि अंतर । न साहे चि विश्वंभर ॥ ध्रु ॥
तें चि करी दान । जैसें आइके वचन ॥ २ ॥
तुका ह्मणे देवें । पूतना शोषियेली जीवें ॥ ३ ॥

॥ ५ ॥

॥ २८४० ॥

प्रेम देवाचें देणें । देहभाव जाय जेणें ॥
न धरावी मनें । शुद्धी देशकाळाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुक्त लज्जाविरहित । भाग्यवंत हरिभक्त ॥
जाले वोसंडत । नामकीर्तिपवाडे ॥ ध्रु ॥
जोडी जाली अविनाश । जन्मोनि जाले हरिचे दास ॥
त्यांस[3] नव्हे गर्भवास । सौरसें[4] परब्रह्मीं ॥ २ ॥
हे चि वाहाती संकल्प । पुण्यप्रसंगाचे जप ॥
तुका ह्मणे पाप । गांवीं[5] नाहीं हरिजना ॥ ३ ॥

---

१ पं. वेधिलें.—२ पं दिले.—३ त. त्या नव्ह. पं. त्याचा नव्हे.—४ द. परब्रह्मीं सौरस.—५ पं. नाहीं गांवीं.

॥ २८४१ ॥

तो चि लटिक्यामाजी भला । ह्मणे देव म्यां देखिला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐशियाच्या उपदेशें । भवबंधन कैसें नासे ।
बुडवी आपणासरिसे । अभिमानें[1] आणिकांसें[2] ॥ ध्रु ॥
आणिक नाहीं जोडा । देव ह्मणविता या मूढा ॥ २ ॥
आणिकांचे न मनी साचें । तुका ह्मणे या श्रेष्ठांचें ॥ ३ ॥

॥ २८४२ ॥

होईल जाला अंगें देव जो आपण । तयासी हे जन अवघे देव ॥१॥
॥ ध्रु. ॥ येरांनीं सांगावी रेमट काहाणी । चित्ता रंजवणी करावया ॥ ध्रु ॥
धाला आणिकांची नेणे तान भूक । सुखें पाहे सुख आपुलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें पाहिजे अनुभव । शब्दाचें गौरव कामा नये ॥ ३ ॥

॥ २८४३ ॥

कां न वजावें बैसोनि कथे । ऐसें ऐका हो श्रोते ।
पांडुरंग तेथें । उभा असे तिष्ठत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि करी धीर । लक्ष लावूनि सादर ।
भवसिंधुपार । असेल ज्या तरणें ॥ ध्रु ॥
कथे कांहीं अणुमात्र । [3]नो बोलावें हा वृत्तांत ।
देवभक्तां चित्त । समरसीं खंडणा ॥ २ ॥
कां वैष्णवा पूजावें । ऐका घेईल जो भावें ।
चरणरजा शिवें । वोडविला[4] मस्तक ॥ ३ ॥

---

१ पं. अभिमान.—२ त. आणिकां.—३ पं. न.—४ पं. वोडविलें.

ऐसें जाणा हे[1] निभ्रांत । देव वैष्णवांचा अंकित ।
अलिप्त अतीत । परमित त्यांसाठीं[2] ॥ ४ ॥
घालोनि लोळणी । तुका आला लोटांगणीं ।
वंदी पायवणीं । संतचरणींचें माथां ॥ ५ ॥

॥ २८४४ ॥

अनुभवें आलें अंगा । तें या जगा देतसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव्हती हाततुके बोल । मूळ ओल अंतरिंची ॥ ध्रु ॥
उतरूनि दिलें कशीं । शुद्धरसीं सरे[3] तें ॥ २ ॥
तुका ह्मणे दुसरें नाहीं । ऐसी ग्वाही गुजरली[4] ॥ ३ ॥

॥ २८४५ ॥

साधकाची दशा उदास असावी । उपाधि नसावी अंतर्बाही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लोलुपता काय निद्रेनें जिणावें । भोजन करावें परमित ॥ ध्रु ॥
एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं वचन । प्राण गेल्या जाण बोलों नये ॥२॥
संग सज्जनाचा उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐशा[5] साधनीं जो राहे । तो चि ज्ञान लाहे गुरुकृपा ॥ ४ ॥

॥ २८४६ ॥

अंतरींची ज्योती प्रकाशली दीप्ति । मुळींची जे होती आच्छादिली ॥ १ ॥
तेथींचा आनंद ब्रह्मांडीं न माये । उपमेशीं काये देऊं सुखा ॥ ध्रु ॥
भावाचे मथिलें निर्गुण संचलें । तें हें उभें केलें विटेवरी ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां ब्रह्मांड पंढरी । प्रेमाची जे थोरी सांठवण ॥ ३ ॥

---

१ पं. रे.—२ पं. यासाठीं.—३ पं. सरतों. ।—४ पं गुदरली.—५ दे. ऐसा.

॥ २८४७ ॥

कासया गा मज घातलें संसारीं । चित्त पायांवरी नाहीं तुझ्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया गा मज घातलें या जन्मा । नाहीं तुझा प्रेमा नित्य नवा ॥ ध्रु ॥
नामाविण[1] माझी वाचा अमंगळ । ऐसा कां चांडाळ निर्मियेलें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी जळो जळो कायां । विठ्ठला सखया वांचूनियां ॥ ३ ॥

॥ ५८४८ ॥

प्रारब्धें चि जोडे धन । प्रारब्धें चि वाढे मान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सोस करिसी[2] वांयां । भज मना पंढरीराया ॥ ध्रु ॥
प्रारब्धें चि होय सुख । प्रारब्धें चि पावे[3] दुःख ॥ २ ॥
प्रारब्धें चि भरे पोट । तुका करीना बोभाट ॥ ३ ॥

॥ २८४९ ॥

हीन माझी याति । वरी स्तुती केली संतीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंगीं वसूं पाहे गर्व । माझे हरावया सर्व ॥ ध्रु ॥
मी एक जाणता । ऐसें वाटतसे[4] चित्ता ॥ २ ॥
राख राख गेलों वांयां । तुका ह्मणे पंढरीराया ॥ ३ ॥

॥ २८५० ॥

तपाचें सायास । न लगे घेणें वनवास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें कळलें आह्मां एक । जालों नामाचे धारक ॥ ध्रु ॥
जाळीं महाकर्में । दावीं निजसुख धर्में ॥ २ ॥
तुका ह्मणे येणें । कळिकाळ तें ठेंगणें ॥ ३ ॥

---

१ पं. नामाविणें.—२ पं. करितोसी.—३ प. पीडा.—४ पं. वाटे माझ्या चित्ता.

॥ २८५१ ॥

माता कापी गळा । तेथें कोण सखी बाळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें कां नेणां नारायणा । मन चाळवितां दीना ॥ ध्रु ॥
नागवी धावणें । तेथें साह्य व्हावें कोणें ॥ २ ॥
राजा सर्व हरी । तेथें दुजा कोण वारी ॥ ३ ॥
तुझ्या केल्याविण । नव्हे स्थिर वेश[1] जन ॥ ४ ॥
तुका ह्मणे हरी । सूत्र तुह्मां हातीं दोरी ॥ ५ ॥

॥ २८५२ ॥

गाऊं नेणें परी मी कांहीं गाईन । शरण जाईन पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ब्रह्मांडनायक मी त्याचा अंकित । काय यमदूत करिती काळ ॥ध्रु॥
वेश्या[2] ज्याच्या नामें तारिली गणिका । अजामेळासारिखा पापरासी ॥ २ ॥
चरणींच्या रजें अहिल्या तारिली । रूपवंत केली कुबजा क्षणें[3] ॥ ३ ॥
पृथिवी तारिली पाताळासी जातां । तुका ह्मणे आतां आह्मी किती ॥ ४ ॥

॥ २८५३ ॥

गाजराची पुंगी । तैसे नवे जाले जोगी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करोनि पठन । केली अहंता जतन ॥ ध्रु ॥
अल्प असे ज्ञान । अंगीं ताठा अभिमान ॥ २ ॥
तुका ह्मणे लंड । त्याचें हाणोनि फोडा तोंड ॥ ३ ॥

॥ २८५४ ॥

परद्रव्य परनारी । अभिळासूनि नाक धरी ॥ १ ॥

---

१ पं. वस्य मन ।.—२ पं. वेश्या ज्याच्या नांवें.—३ पं. दासी.

॥ ध्रु. ॥ जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ॥ ध्रु ॥
सोंवळ्याची स्फीति[1] । क्रोधें विटाळला चित्तीं ॥२ ॥
तुका ह्मणे सोंग । दावी बाहेरील रंग ॥ ३ ॥

॥ २८५५ ॥

टिळा टोपी उंच दावी । जगीं मी एक गोसावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघा वरपंग सारा । पोटीं विषयांचा थारा ॥ ध्रु ॥
मुद्रा लावितां कोरोनि । मान व्हावयासी जनीं ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे किती । नरका गेले पुढें जाती ॥ ३ ॥

॥ २८५६ ॥

ऐसे संत जाले कळीं । तोंडीं तमाखूची नळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्नानसंध्या बुडविली । पुढें भांग वोडवली ॥ ध्रु ॥
भांगभुर्का हें साधन । पची पडे मद्यपान ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघें सोंग । तेथें कैचा पांडुरंग ॥ ३ ॥

॥ २८५७ ॥

जातीची शिंदळी । तिला कोण वंशावळी[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपघर ना बापघर । चित्तीं मनीं व्यभिचार ॥ ध्रु ॥
सेजे असोनियां धणी । परद्वार मना आणी ॥ २ ॥
तुका ह्मणे असल[3] जाती । जातीसाठीं खाती[4] माती ॥ ३ ॥

॥ २८५८ ॥

अंधळ्याची काठी । हिरोनियां कडा लोटी ॥ १ ॥

---

१ दे. त. सोहोळ्याची स्थिति ।—२ दे. वसावळी. पं. कसावळी. त. वंसावळी.—३ दे. त. असील.—४ पं. खावी.

॥ ध्रु. ॥ हें कां देखण्या उचित । लाभ किंवा कांहीं हित ॥ ध्रु ॥
साकर[1] ह्मणोनि माती । चाळवूनि द्यावी हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे वाटे । देवा पसरावे सराटे ॥ ३ ॥

॥ २८५९ ॥

प्रीतिचिया बोला नाहीं पेसपाड । भलेतसें[2] गोड करूनि घेई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें विठ्ठलराया तुज मज आहे । आवडीनें गायें नाम तुझें ॥ ध्रु ॥
वेंडे वांकडे बाळकाचे बोल । करिती नवल भायबाप[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज येवो माझी दया । जीवींच्या सखया जिवलगा ॥ ३ ॥

॥ २८६० ॥

माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां आड उभा राहें नारायणा । दयासिंधुपणा साच करीं ॥ ध्रु ॥
वाचा वदे परी करणें कठीण । इंद्रियां अधीन जालों देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ॥ ३ ॥

॥ २८६१ ॥

वर्णावी ते थोरी एका विठ्ठलाची[4] । कीर्ती मानवाची सांगों[5] नये ॥ १ ॥
॥ध्रु.॥ उदंड चि जाले जन्मोनियां मेले[6] । होऊनियां गेले राव रंक ॥ध्रु॥
त्यांचें नाम कोणी नेघे चराचरीं । साही वेद चारी वर्णिताती ॥ २ ॥
अक्षय अढळ चळेना ढळेना । तया नारायणा ध्यात जावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुह्मी विठ्ठल चित्तीं ध्यातां । जन्ममरण व्यथा दूर[7] होती ॥ ४ ॥

---

१ पं. चाळवूनि हातीं । साकर ह्मणोनि द्यावी माती । दे. मागून असा पाठ केला आहे.—
२ पं. भलतैसें.—३ त. मायबापें.—४ पं. विठोबाची.—५ पं. बोलों.—६ त. मेलें.—७ त. दुरी.

॥ २८६२ ॥

नको देऊं देवा पोटीं हें संतान । मायाजाळें जाण नाठवसी ॥ १ ॥
नको देऊं देवा द्रव्य आणि भाग्य । तो एक उद्वेग होय जीवा ॥ २ ॥
तुका ह्मणे करीं फकिराचे परी । रात्रदिवस हरि येइल घरा ॥ ३ ॥

॥ २८६३ ॥

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उत्तम चि गती तो एक पावेल । उत्तम भोगिल जीव खाणी ॥ ध्रु ॥
परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥ २ ॥
भूतदया गाईपशूचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥ ३ ॥
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ४ ॥
तुका ह्मणे हें चि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥ ५ ॥

॥ २८६४ ॥

हरि ह्मणतां गति पातकें नासती । कळिकाळ कांपती हरि ह्मणतां ॥ १ ॥
हरि ह्मणतां भुक्ति हरि ह्मणतां मुक्ति । चुके यातायाती हरि ह्मणतां ॥ ध्रु ॥
तपें अनुष्ठानें न लगती साधनें । तुटती बंधनें हरि ह्मणतां ॥ २ ॥
तुका ह्मणे भावें जपा हरिचें नाम । मग काळयम शरण तुह्मा ॥ ३ ॥

॥ २८६५ ॥

नये वांटूं मन । कांहीं न देखावें भिन्न ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाय विठोबाचे चित्तीं । असों द्यावे दिवसराती ॥ ध्रु ॥

---

१ त. होईल.—२ पं. व्यवहारें.

नये काकुळती । कोणा यावें[1] हरिभक्ति ॥ २ ॥
तुका ह्मणे साई । करील कूरेची विठाई ॥ ३ ॥

॥ २८६६ ॥

सकळ देवाचें दैवत । उभें असे रंगा आंत[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रंग लुटा माझे बाप । शुद्ध भाव[3] खरें माप ॥ ध्रु ॥
रंग लुटिला बहुतीं । शुक नारदादि संतीं ॥ २ ॥
तुका लुटितां हे रंग । साह्य जाला पांडुरंग ॥ ३ ॥

॥ २८६७ ॥

उशीर कां केला । कृपाळुवा जी[4] विठ्ठला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज दिलें कोणा हातीं । काय मांनिली[5] निश्चिती ॥ ध्रु ॥
कोठवरी धरूं धीर । आतां मन करूं स्थिर ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव । ऐसी भाकितसे कीव ॥ ३ ॥

॥ २८६८ ॥

तुका वेडा अविचार । करी बडबड फार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नित्य वाचे हा चि छंद । राम कृष्ण हरि गोविंद ॥ ध्रु ॥
धरी पांडुरंगीं भाव । आणीक नेणें दुजा देव ॥ २ ॥
गुरुज्ञान सर्वा ठायीं । दुजें न विचारी कांहीं ॥ ३ ॥
बोल नाईके कोणाचे । कथे नागवा चि नाचे ॥ ४ ॥
संगउपचारें कांटाळे । सुखें भलते ठायीं लोळे ॥ ५ ॥
कांहीं उपदेशिलें नेणे । वाचे विठ्ठल विठ्ठल ह्मणे ॥ ६ ॥

---

१ पं. येऊं.—२ त. रंगांपात.—३ पं. भावें.—४ दे. त. "जी" नाहीं.—५ पं. मांडिली.

केला बहुतीं फजित । तेरी हें चि करी नित्य ॥ ७ ॥
अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ॥ ८ ॥

॥ २८६९ ॥

आली सिंहस्थपर्वणी । न्हाव्या भटा जाली धणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतरीं पापाच्या कोडी । वरिवरि बोडी डोई दाढी ॥ ध्रु ॥
बोडिलें तें निघालें । काय पालटलें सांग वहिलें ॥ २ ॥
पाप गेल्याची काय खुण । नाहीं पालटले अवगुण ॥ ३ ॥
भक्तिभावें विण । तुका ह्मणे अवघा स्नीण ॥ ४ ॥

॥ २८७० ॥

तुज घालोनियां पूजितों संपुष्टीं । परि तुझ्या पोटीं चवदा भुवनें ॥१॥
॥ ध्रु. ॥ तुज नाचऊनि दाखवूं कौतुका । परी रूपरेखा नाहीं तुज ॥ध्रु॥
तुजलागीं आह्मी गात असों गीत । परी तूं अतीत शब्दाहूनि ॥ २ ॥
तुजलागीं आह्मीं घातियेल्या माळा । परि तूं वेगळा कर्तृत्वासी ॥३॥
तुका ह्मणे आतां होऊनि परमित । माझें कांहीं हित विचारावें ॥ ४ ॥

॥ २८७१ ॥

पापाची मी राशी । सेवा चोर पायांपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करा दंड नारायणा । माझ्या मनाची खंडणा ॥ ध्रु ॥
जना हातीं सेवा । घेतों लंडपणें देवा ॥ २ ॥
तुझा ना संसार । तुका दोहींकडे चोर ॥ ३ ॥

॥ २८७२ ॥

दुडीवरी दुडी । चाले मोकळी गुजरी ॥ १ ॥

---

१ पं. परी.

॥ ध्रु. ॥ ध्यान लागो ऐसें हरी । तुझे चरणीं तैशापरी ॥ ध्रु ॥
आवंतण्याची आस । जैसी लागे दुर्बळास ॥ २ ॥
लोभ्या कळांतराची[1] आस । बोटें मोजी दिवस मास ॥ ३ ॥
तुका ह्मणे पंढरीनाथा । मजला आणिक नको व्यथा ॥ ४ ॥

॥ २८७३ ॥

लागोनियां पायां विनवितों तुम्हाला । करें[2] टाळी बोला मुखें[3] नाम ॥१॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळां । हा सुखसोहळा स्वर्गीं नाहीं ॥ ध्रु ॥
कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ । मार्ग हा प्रांजळ वैकुंठीचा ॥ २ ॥
सकळांसीं येथें आहे अधिकार । कलयुगीं उद्धार हरिनामें[4] ॥ ३ ॥
तुका ह्मणे नामापाशीं चारी मुक्ति । ऐसें बहुग्रंथीं[5] बोलियेलें ॥ ४ ॥

॥ २८७४ ॥

लटिकें[6] हासें लटिकें रडें । लटिकें उडें लटिक्यापें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लटिकें माझें लटिकें तुझें । लटिकें ओझें लटिक्याचें ॥ ध्रु ॥
लटिकें गायें[7] लटिकें ध्यायें । लटिकें जायें लटिक्यापें ॥ २ ॥
लटिका भोगी लटिका त्यागी । लटिका जोगी जग माया ॥ ३ ॥
लटिका तुका लटिक्या भावें । लटिकें बोले लटिक्यासवें ॥ ४ ॥

॥ २८७५ ॥

जालों[8] म्हणती त्याचें मज वाटे आश्चर्य । ऐकों[9] नव्हे धीर वचन माझें ॥१॥
॥ ध्रु. ॥ शिजलिया अन्ना ग्वाही दांत हात । जिव्हेसी चाखत न कळे कैसें ॥ ध्रु ॥

---

१ पं. कळंतराची.—२ पं. कर.—३ पं. मुखीं.—४ पं. हरिच्यानामें.—५ पं. बहुता ग्रंथीं.—६ पं. हें कडवें व ध्रुवपद यांत प्रत्येक "लटिकें" यापुढें "हें" आहे.—७ पं. गाय लटिकें ध्याय । लटिकें जाय०.—८ पं. जाला.—९ पं. ऐको.

तापलिया तेलीं[1] बावन चंदन । बुंद एक क्षण शीतळ करी ॥ २ ॥
पारखी तो जाणे अंतरींचा भेद । मूढजनां छंद लावण्यांचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे कसीं निवडे आपण । शुद्ध मंद हीन जैसें तैसें ॥ ४ ॥

॥ २८७६ ॥

हे चि थोर भक्ति[2] आवडती देवा । संकल्पावी माया संसाराची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठेविलें अनंतें तैसें चि राहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥ ध्रु ॥
वांहिल्या[3] उद्वेग दुःख चि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥ २ ॥
तुका म्हणे घालूं तयावरी भार । वाहूं हा संसार देवा पायीं ॥ ३ ॥

॥ २८७७ ॥

जन्मा येणें घडे पातकाचे[4] मूळें । संचिताचें फळ आपुलिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग वांयांविण दुःख वाहों नये । रुसोनियां काय देवावरी ॥ ध्रु ॥
ठाउका चि आहे संसार दुःखाचा । चित्तीं सीण याचा वाहों नये ॥ २ ॥
तुका ह्मणे नाम[5] त्याचें आठवावें । तेणें विसरावें जन्मदुःख ॥ ३ ॥

॥ २८७८ ॥

आतां माझे नका वाणूं गुण दोष । करिसों उपदेश याचा कांहीं ॥ १ ॥
मानदंभासाठीं छळीतसें कोणा । आण या चरणां विठोबाची ॥ २ ॥
तुका म्हणे हें तों ठावें पांडुरंगा । काय कळे जगा अंतरींचें ॥ ३ ॥

॥ २८७९ ॥

काय माझें नेती वाईट म्हणोन । करूं समाधान कशासांटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय मज लोक नेती परलोका । जातां कोणा एका निवारेल ॥ ध्रु ॥

---

१ पं. तेलें.—२ पं. भक्त.—३ पं. वाहिल्या.—४ पं. पातकाच्या मुळें.—५ पं. त्याचें नाम.

न ह्मणें कोणासी उत्तम वाईट । सुखें माझी कूट खावो मागें ॥ २ ॥
सर्व माझा भार असे पांडुरंगा । काय माझें जगासवें काज ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझें सर्व ही साधन । नामसंकीर्त्तन विठोबाचें ॥ ४ ॥

देवांनीं स्वामींस चिंचवडास नेलें होतें ते अभंग.

॥ २८८० ॥

वांजा गाई दुभती । देवा ऐसी तुझी ख्याति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें मागत नाहीं तुज । चरण दासपावे मज ॥ ध्रु ॥
चातक पाखरूं । त्यासी वर्षे मेघधारु ॥ २ ॥
पक्षी राजहंस । अमोलिक मोतीं त्यास ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा । कां गा खोचलासी जीवा ॥ ४ ॥

॥ २८८१ ॥

परतें मी आहें सहज चि दुरी । वेगळें भिकारी नामरूपा[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे रुसावें धरावा संकोच । सहज तें नीच आलें भागा ॥ ध्रु ॥
पडिलिये ठायीं उच्छिष्ट सेवावें । अर्थ[2] तें चि देवें केलें ऐसें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी आह्मां जी वेगळे । केलेती[3] निराळे द्विज देवें[4] ॥ ३ ॥

॥ २८८२ ॥

चिंतामणिदेवा गणपतीसी आणा । करवावें भोजना दुजे पात्रीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव ह्मणती तुक्या[5] एवढी कैची थोरी । अभिमानाभीतरी नागवलों ॥ ध्रु ॥

---

१ पं. नामरूप.—२ पं. अर्थ. त. आर्थे. दे. "आर्थे" याचें "आर्थ" केलें आहे.—३ पं. केले ते.—४ पं. देवा.—५ पं तुका.

वाढवेळ[1] जाला सिळें जालें अन्न । तटस्थ ब्राह्मण बैसलेती ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा तुमच्या सुकृतें । आणीन, त्वरित मोरयासी ॥ ३ ॥

॥ २८८३ ॥

भोक्ता नारायण लक्षुमीचा पति । ह्मणोनि प्राणाहुती घेतलिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भर्ता आणि भोक्ता कर्त्ता आणि करविता । आपण सहजता पूर्णकाम ॥ ध्रु ॥
विश्वंभर[2] कृपादृष्टी सांभाळीत । प्रार्थना करीत ब्राह्मणांची ॥ २ ॥
कवळोकवळीं नाम घ्यावें[3] गोविंदाचें । भोजन भक्तांचें तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ २८८४ ॥

माझा स्वामी तुझी वागवितो लात । तेथें मी पतित काय आलों ॥ १ ॥
तीर्थें तुमच्या चरणीं जाहालीं[4] निर्मळ । तेथें मी दुर्बळ काय वाणूं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी देवा द्विजवंद्य । मी तों काय निंद्य हीन याति ॥ ३ ॥

॥ २८८५ ॥

वंदिलें वंदावें जीवाचिये साटीं । किंवा बरी तुटी आरंभीं च ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्वहिताची चाड ते ऐका हे बोल । अवघें चि मोल धीरा अंगीं ॥ ध्रु ॥
सिंपिलें तें रोंप वरीवरी बरें । वाळलिया वैरी कोंभ नये ॥ २ ॥
तुका ह्मणे टाकीघायें देवपण । फुटलिया जन कुला पुसी ॥ ३ ॥

॥ २८८६ ॥

आह्मां विष्णुदासां हें चि भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥ १ ॥

---

१ पं. वाढवेळ.—२ पं. विश्वीं विश्वंभर.—३ दे. पं. घ्या.—४ पं. जालीं पे निर्मळ.—५ पं. पुरें.

वाणी नाहीं घ्यावें आपुलिया हातें । करोनियां चित्तें[1] समाधान ॥ २ ॥
तुका ह्मणे द्रव्य मेळविलें मागें । हें तों कोणासंगें आलें नाहीं ॥ ३ ॥

॥ २८८७ ॥

सुखाचे व्यवहारीं सुखलाभ जाला । आनंदें[2] कोंदला मागें पुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संगती पंगती देवासवें[3] घडे । नित्यानित्य पडे तें चि सांचा ॥ ध्रु. ॥
समर्थाचे घरीं सकळ संपदा । नाहीं तुटी कदा कासयाची ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें लाभाचिया कोटी । बहु नाव पोटीं समर्थाचे ॥ ३ ॥

॥ २८८८ ॥

काय देवें खातां घेतलें हातींचें । आलें हें तयाचें थोर भय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणतां गजरें राम एकसरें । जळती पापें थोरें भयधाकें ॥ ध्रु. ॥
काय खोळंबले हात पाय अंग । नाशिलें हें सांग रूप काय ॥ २ ॥
कोण लोकीं सांगा[4] घातला बाहेरी । ह्मणतां हरि हरि तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ २८८९ ॥

उत्तम त्या याति । देवा शरण अनन्यगति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं दुजा ठाव । कांहीं उत्तम मध्यम भाव ॥ ध्रु. ॥
उमटती ठसे । ब्रह्मप्राप्ति अंगीं दिसे ॥ २ ॥
भाविक विश्वासी । तुका ह्मणे नमन त्यांसी ॥ ३ ॥

---

१ पं. चित्त.—२ पं. आनंद.—३ त. देवासंगें.—४ पं. सांग.

॥ २८९० ॥

ज्यासी नावडे एकादशी । तो जिता चि, नरकवासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्यासी नावडे हें व्रत । त्यासी नरक तो हीं भीत ॥ ध्रु ॥
ज्यास मान्य एकादशी । तो जिता चि मुक्तवासी ॥ २ ॥
ज्यासी घडे एकादशीं । जाणें लागे विष्णूपाशीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे पुण्यराशी । तो चि करी एकादशी ॥ ४ ॥

॥ २८९१ ॥

मुंगी होउनि साकर खावी । निजवस्तूची भेटी घ्यावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाळवंटी साकर पडे । गज येउनि काय रडे ॥ ध्रु ॥
जाला हरिदास गोसांवी । अवघी मायिक क्रिया दावी ॥ २ ॥
पाठ पाठांतरिक विद्या । जनरंजवणी संध्या ॥ ३ ॥
प्रेम नसतां अंगा आणी । दृढ भाव नाहीं मनीं ॥ ४ ॥
ब्रह्मज्ञान वाचे बोले । करणी पाहातां न[1] निवती डोळे ॥ ५ ॥
मिथ्या भगल वाढविती । आपुली आपण पूजा घेती ॥ ६ ॥
तुका ह्मणे धाकुटें व्हावें । निजवस्तूसी[2] मागुनि घ्यावें ॥ ७ ॥

॥ २८९२ ॥

भय हरिजनीं । कांहीं न धरावें मनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नारायण ऐसा सखा । काय जगाचा हा लेखा ॥ ध्रु ॥
चित्त वित्त हेवा । समर्पून राहा[3] देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे मन । असों द्यावें समाधान ॥ ३ ॥

---

१ पं. "न" नाहीं.—२ पं. निजवस्तु.—३ पं. राहें.

॥ २८९३ ॥

आयुष्य मोजावया बैसला मापारी । तूं कां रे वेव्हारी संसाराचा[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेईल ओढोनि ठाउकें नसतां । न राहे दुश्चिता हरिविण ॥ ध्रु ॥
कठिण हें दुःख यम जाचतील । कोण सोडवील तया ठायीं ॥ २ ॥
राहतील दुरी सज्जन सोयरीं । आठवीं श्रीहरी लवलाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे किती करिसी लंडायी । होईल भंडाई पुढें[2] थोर ॥ ४ ॥

॥ २८९४ ॥

होऊं नको कांहीं या मना आधीन । नाइकें वचन याचें कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हटियाची गोष्टी मोडून टाकावी । सोई[3] ही धरावी विठोबाची ॥ ध्रु ॥
आपुले आधीन करूनियां ठेवा । नाहीं तरि जीवा घातक हें ॥ २ ॥
तुका ह्मणे जाले जे मना आधीन । तयांसी बंधन यम करी ॥ ३ ॥

॥ २८९५ ॥

नामाविण काय वाउगी चावट । वांयां वटवट हरीविण[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फुकट चि सांगे लोकाचिया गोष्टी । राम जगजेठी वाचे नये ॥ ध्रु ॥
मेळवूनि चाट करी सुरापान[5] । विषयांच्या गुणें मातत[6]से ॥ २ ॥
बैसोनि टवाळी[7] करी दुजयाची । नाहीं गोविंदाची आठवण ॥ ३ ॥
बळें यम दांत खाय तयावरी । जंव भरे दोरी[8] आयुष्याची ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुला सोडवील कोण । नाहीं नारायण आठविला ॥ ५ ॥

॥ २८९६ ॥

संत गाती[9] हरिकीर्त्तनीं । त्यांचे घेइन पायवणी ॥ १ ॥

---

१ पं. संसारीच्या.—२ पं. थोर पुढें.—३ पं. सोई हे धरा विठोबाची.—४ पं. हरीविणें —५ पं. मद्यपान.— ६ पं. मातला.—७ त. ढवाळी ८ त. सिदोरी. दे.—मागून शोध घालून "सिदोरी" केलें आहे.—९ पं. जाति.

॥ ध्रु. ॥ हें चि तप तीर्थ माझें । आणिक मी नेणें दुजें ॥ ध्रु ॥
काया कुरवंडी करीन । संत महंत ओंवाळीन ॥ २ ॥
संत महंत माझी पूजा । अनुभाव[1] नाहीं दुजा ॥ ३ ॥
तुका ह्मणे नेणें कांहीं । अवघें आहे संतांपायीं ॥ ४ ॥

॥ २८९७ ॥

जालें भांडवल । अवघा पिकला विठ्ठल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां वाणी काशासाटीं । धीर धरावा च पोटीं ॥ ध्रु. ॥
आपुल्या संकोचें । ह्मणऊनि तेथें टांचे ॥ २ ॥
घेतों खऱ्या मापें । तुका देखोनियां सांपें ॥ ३ ॥

॥ २८९८ ॥

शुद्ध ऐसें ब्रह्मज्ञान । करा मन सादर[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रवि रसां सकळां शोषी । गुणदोषीं न लिंपे ॥ ध्रु ॥
कोणासवें नाहीं चोरी । सकळांवरी समत्व ॥ २ ॥
सत्य तरी ऐसें आहे । तुका पाहे उपदेशीं ॥ ३ ॥

॥ २८९९ ॥

अग्नि हा पाचारी कोणासी साक्षेपें । हिंवे तो चि तापे जाऊनिया[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उदक ह्मणे काय या हो मज प्यावें । तृषित तो धांवे सेवावया ॥ ध्रु ॥
काय वस्त्र ह्मणे यावो मज नेसा । आपुले स्वइच्छा जग वोढी[4] ॥ २ ॥
तुक्यास्वामी ह्मणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारा लागूनियां ॥ ३ ॥

---

१ पं. आनभाव.—२ पं. सान सादर.—३ दे. जाणोनियां.—४पं. वेढी. दे. "वोढी" याचें "वेढी" केलें आहे.

॥ २९०० ॥

भक्त देवाघरचा[1] सुना । देव भक्ताचा पोसणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येर येरां जडलें कैसें । जीवा अंगें[2] जैसें तैसें ॥ ध्रु ॥
देव भक्ताची कृपाळु माता । भक्त देवाचा जनिता ॥ २ ॥
तुका ह्मणे अंगें । एक एकाचिया संगें ॥ ३ ॥

॥ २९०१ ॥

बरवयांबरवंट । विटे चरण सम नीट ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ते म्या त्हृदयीं धरिले । तापशमन पाउलें ॥ ध्रु ॥
सकळां तीर्थां अधिष्ठान । करी लक्ष्मी[3] संवाहन ॥ २ ॥
तुका ह्मणे अंतीं । ठाव मागितला संतीं ॥ ३ ॥

॥ २९०२ ॥

मांस चर्म हाडें । देवां[4] अवघीं च गोडें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जे जे हरिरंगीं रंगले । कांहीं न वचे वांयां गेले ॥ ध्रु ॥
वेद खाय शंखासुर[5] । त्याचें वागवी कलिवर ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसा । बराडी हा[6] भक्तिरसा ॥ ३ ॥

॥ २९०३ ॥

कोणा चिंता आड । कोणा लोकलाज नाड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैंचा राम अभागिया । करी कटकट[7] धांयां ॥ ध्रु ॥
स्मरणाचा राग । क्रोधें विटाळलें अंग ॥ २ ॥
तुका ह्मणे जडा । काय चाले या[8] दगडा ॥ ३ ॥

---

१ पं. देवाचा घरसुना.—२ दे. अंगें.—३ दे. त. लक्षुमी.—४ त. देवें अवघीं केलीं गोडें ।.—५ त. संखासुर. दे. शंकासुर.—६ पं. या.—७ पं. वडबड.—८ पं. त्या.

॥ २९०४ ॥

आपुलिया काजा । आह्मीं सांडियेली[1] लाजा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मां असों जोगवीत[2] । आपुलिया[3] हातीं हित ॥ ध्रु. ॥
तुह्मी देहशून्य । आह्मां कळे पाप पुण्य ॥ २ ॥
सांगायासी लोकां । उरउरीत उरला तुका ॥ ३ ॥

॥ २९०५ ॥

मायबापें केवळ काशी । तेणें न वजावें तीर्थासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुंडलीकें काय केलें । परब्रह्म उभें ठेलें ॥ ध्रु. ॥
तैसा होई सावधान । त्हदयीं धरीं नारायण ॥ २ ॥
तुका ह्मणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥ ३ ॥

॥ २९०६ ॥

सत्य आह्मां मनीं । नव्हों गाबाळाचे धनी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें जाणा रे सकळ । भरा शुद्ध टांका मळ ॥ ध्रु. ॥
देतों तीक्ष्ण उत्तरें । पुढें व्हावयासी बरें ॥ २ ॥
तुका ह्मणे बरें घडे । देशोदेशीं चाले कोडें ॥ ३ ॥

॥ २९०७ ॥

शिकवूनि हित । सोयी लावावे हे नीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याग करूं नये खरें । ऐसें विचारावें बरें ॥ ध्रु. ॥
तुमचिया तोंडें । धर्माधर्म[4] चि खंडे ॥ २ ॥
मजसाटीं देवा । कां हो लपविला हेवा ॥ ३ ॥

---

१ दे. त. सांडियेलें.—२ पं. वागवीत.—३ दे. आपुलें आपुले हित।—४ पं. धर्माधर्मांचीं खंडें.

जाला सावधान । त्यासी घालावें भोजन ॥ ४ ॥
तुका ह्मणे पिता । वरी बाळाच्या तो हिता ॥ ५ ॥

॥ २९०८ ॥

सुख[1] सुखा भेटे । मग तोडिल्या न तुटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रविरश्मिकळा । नये घालितां पैं डोळां ॥ ध्रु ॥
दुरि तें जवळी । स्नेहें आकाशा[2] कवळी ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्त । माझें पायीं अखंडित ॥ ३ ॥

॥ २९०९ ॥

तुह्मां न पडे वेच । माझा सरेल संकोच ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फुकासाटीं जोडे यश[3] । येथें कां करा आळस ॥ ध्रु ॥
कृपेचें भुकेलें । होय जीवदान केलें ॥ २ ॥
तुका ह्मणे शिकविलें । माझें ऐकावें विठ्ठलें ॥ ३ ॥

॥ २९१० ॥

लोक ह्मणती मज देव । हा तों अधर्म उपाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां कळेल तें करीं । सीस तुझे हातीं सुरी ॥ ध्रु ॥
अधिकार नाहीं । पूजा करिती तैसा कांहीं ॥ २ ॥
मन जाणे पापा । तुका ह्मणे मायबापा ॥ ३ ॥

॥ २९११ ॥

एका ह्मणे भलें । आणिका सहज चि[4] निंदिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं न करितां आयास[5] । सहज घडले ते दोष ॥ ध्रु ॥

---

१ पं. सुखा सुख.—२ पं. आकाश.—३ त. वेश.—४ पं. "चि" नाहीं.—५ पं. सायास.

बरें वाइटाचें । नाहीं मज कांहीं साचें ॥ २ ॥
तुका ह्मणे वाणी । खंडोनि राहावें चिंतनीं ॥ ३ ॥

॥ २९१२ ॥

आणिलें सेवटा । आतां कामा नये फांटा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज आपुलेंसें ह्मणा । उपरि या नारायणा ॥ ध्रु ॥
वेचियेली वाणी । युक्ती अवघी चरणीं ॥ २ ॥
तुका धरी पाय । क्षमा करकूनि अन्याय ॥ ३ ॥

॥ २९१३ ॥

न करा टांचणी । येथें कांहीं ओडचणी ॥ १ ॥
जिव्हा अमुप करी माप । विठ्ठल पिकला माझा बाप ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्वकाळ । अवघा गोविंद गोपाळ ॥ ३ ॥

॥ २९१४ ॥

तुझ्या नामाची आवडी । आह्मी विठो तुझीं वेडीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां न वजों अणिकां ठायां । गाऊं गीत लागों पायां ॥ ध्रु ॥
काय वैकुंठ बापुडें । तुझ्या प्रेमसुखापुढें ॥ २ ॥
संतसमागमेळें[2] । प्रेमसुखाचा सुकाळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझ्या पायीं । जन्ममरणा ठाव नाहीं ॥ ४ ॥

॥ २९१५ ॥

साकरेच्या योगें[3] वर्ख । राजा कागदातें देखे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें आह्मां मनुष्यपण[4] । रामनाम केण्यागुणें ॥ ध्रु ॥.

---

१ याच्या पुढें त. "अष्टही प्रहर । बारा मास निरंतर ॥" हें कडवें अधिक आहे.—२ दे. त. ०मेळे.—३ त. नावें.—४ दे. त. मानुसपण.

फिरंगीच्या योगें करी । राजा काष्ठ हातीं धरी ॥ २ ॥
रत्नकनका योगें लाख । कंठीं धरिती श्रीमंत लोक ॥ ३ ॥
देवा देवपाट । देव्हाऱ्यावरी बैसे स्पष्ट ॥ ४ ॥
ब्रह्मानंदयोगें तुका । पढीयंता संज्जनलोकां[1] ॥ ५ ॥

॥ २९१६ ॥

धनवंतालागीं । सर्वमान्यता आहे जगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माता पिता बंधु जन । सर्व मानिती वचन ॥ ध्रु ॥
जव मोठा चाले धंदा । तंव बहिण म्हणे दादा ॥ २ ॥
सदा शृंगारभूषणें । कांता लवे बहुमानें ॥ ३ ॥
तुका ह्मणे धन । भाग्य अशाश्वत जाण ॥ ४ ॥

॥ २९१७ ॥

न विचारितां ठायाठाव । काय भुंके तो[2] गाढव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केला तैसा लाहे दंड । खळ अविचारी लंड ॥ ध्रु ॥
करावें लाताळें । ऐसें नेणे कोण्या काळें ॥ २ ॥
न कळे उचित । तुका ह्मणे नीत हित ॥ ३ ॥

॥ २९१८ ॥

कंठीं नामसिका । आतां कळिकाळासी धका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रोखा माना कीं सिका माना । रोखा सिका तत्समाना ॥ ध्रु ॥
रोखा न मैना[3] सिका न मना । जतन करा नाककाना ॥ २ ॥
सिका न मैनी[4] रावण । त्याचें केलें निसंतान ॥ ३ ॥

---

१ पं. जनलोका.—२ पं. तें.—३ पं. माना.—४ पं. मानी.

सिका मानी हळाहळ । जाले[1] सर्वांगीं शीतळ ॥ ४ ॥
तुका ह्मणे नाम सिका । पटीं बैसलों निजसुखा ॥ ५ ॥

॥ २९१९ ॥

भूतीं देव ह्मणोनि भेटतों[2] या जना । नाहीं हे भावना नरनारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाणे भाव पांडुरंग अंतरींचा । नलगे द्यावा साचा परिहार ॥ ध्रु ॥
दयेसाटीं केला उपाधिपसारा । जड जीवां[3] तारा नाव कथा ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं पडत उपवास । फिरतसे आस धरोनियां ॥ ३ ॥

॥ २९२० ॥

हारपल्याची नका चित्तीं । धरूं खंती वांयां च ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पावलें तें ह्मणा देवा । सहज सेवा या नांवें ॥ ध्रु ॥
होणार[4] तें तें भोगें घडे । लाभ जोडे संकल्पें ॥ २ ॥
तुका ह्मणे मोकळें मन । अवघें पुण्य या नांवें ॥ ३ ॥

॥ २९२१ ॥

नेसणें आलें होतें गळ्या । लोक रळ्या करिती ॥ १ ॥
आपणियां सावरिलें । जग भलें आपण ॥ ध्रु ॥
संबंध तो तुटला येणें । जागेपणें[5] चेष्टाचा ॥ २ ॥
भलती सेवा होती अंगें । बारस वेगें पडिलें ॥ ३ ॥
सावरिलें नीट वोजा । दृष्टिलाजा पुढिलांच्या ॥ ४ ॥
बरे उघडिले डोळे । हळहळेपासूनि ॥ ५ ॥
तुका ह्मणे विटंबना । नारायणा चुकली ॥ ६ ॥

---

१ पं. जाला.—२ पं. भेटतां—३ पं. जीव.—४ पं. होणार तें भोगें.—५ पं. जागपणे.

॥ २९२२ ॥

जिव्हा जाणे फिकें मधुर कीं[1] क्षार । येर मास नर होता[2] न कळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देखावें नेत्रीं बोलावें मुखें । चित्ता सुखदुःखें कळों येती ॥ ध्रु ॥
परिमळासी घ्राण ऐकती श्रवण । एकाचे कारण एका नव्हे[3] ॥ २ ॥
एकदेहीं भिन्न ठेवियेल्या[4] कळा । नाचवी पुतळा सूत्रधारी ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐशी जयाची सत्ता । कां तया अनंता विसरलेती ॥ ४ ॥

॥ २९२३ ॥

न लगे द्यावा जीव सहज चिं[5] जाणार । आहे तो विचार जाणा कांहीं ॥ १ ॥
मरण जो मागे गाढवाचा बाळ । बोलिजे चांडाळ शुद्ध त्यासी ॥ २ ॥
तुका ह्मणे कईं[6] होईल स्वहित । निधान जो थीतें[7] टाकूं पाहे ॥ ३ ॥

॥ २९२४ ॥

मोल वेचूनियां धुंडिती सेवका । आह्मी[8] तरी फुका मागों बळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नसतां जवळी हित फार करूं । जीव भाव धरूं तुझ्या पायीं ॥ ध्रु ॥
नेदूं भोग आह्मी आपुल्या शरीरा । तुह्मांसी दातारा व्हावें म्हूण ॥ २ ॥
कीर्ती तुझी करूं आमुचे सायास । तूं का रे उदास पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज काय मागों आह्मी । फुकाचे कां ना भी ह्मणसी ना ॥ ४ ॥

॥ २९२५ ॥

काय लवणकणिकेविण[9] । एके क्षीण सांगर[10] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मां हे[11] येवढी अडचण । नारायणीं मजविण ॥ ध्रु ॥
कुबेर[12] अटाहासे जोडी । काय कवडी कारणें ॥ २ ॥
तुका ह्मणे काचमणि । कोण गणी भांडारी ॥ ३ ॥

---

१ दे. त. "कीं" नाहीं.—२ दे. त. हातास.—३ पं. नये.—४ पं. दावियेल्या.—५ त. "चि" नाहीं.—६ पं. कायी.—७ दे. पं. थीतें.—८ पं. "आह्मी" नाहीं.—९ दे. त. लवण कळिकेविण.—१० दे. त. सागरा.—११ पं. "हे" नाहीं.—१२ दे. त. कुबेरा.

॥ २९२६ ॥

तुज मज नाहीं भेद । केला सहज विनोद ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तूं माझा आकार । मी तों तूं च निर्धार ॥ ध्रु ॥
मी तुजमाजी देवा । घेसी माझ्या अंगें सेवा ॥ २ ॥
मी तुजमाजी अचळ । मजमाजी तूं सबळ[1] ॥ ३ ॥
तूं बोलसी माझ्या मुखें । मी तों तुजमाजी सुखें ॥ ४ ॥
तुका ह्मणे देवा । विपरीत ठायीं नांवा ॥ ५ ॥

॥ २९२७ ॥

वैराग्याचें भाग्य । संतसंग हा चि लाभ[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संतकृपेचे हे दीप । करी साधका[3] निष्पाप ॥ ध्रु ॥
तो चि देवभक्त । भेदाभेद नाहीं ज्यांत ॥ २ ॥
तुका प्रेमें नाचे गाये । गाणियांत विरोन जाये ॥ ३ ॥

॥ २९२८ ॥

जप तप ध्यान न लगे धारणा । विठ्ठलकीर्त्तनामाजी सर्व[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राहें माझ्या मना दृढ या वचनीं । आणिक तें मनीं न धरावें ॥ ध्रु ॥
कीर्तनसमाधि साधन ते मुद्रा । राहतील थारा धरोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे मुक्ति हरिदासांच्या घरीं । वोळगती चारी ऋद्धिसिद्धी ॥ ३ ॥

॥ २९२९ ॥

नाहीं तुज कांहीं मागत संपत्ती । आठवण चित्तीं असों द्यावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सरलिया भोग येईन सेवटीं । पायापें या भेटी अनुसंधानें ॥ ध्रु ॥

---

१ दे. तुझें बळ ।.—२ पं. लाभ.—३ पं. साधक.—४ पं. उभा.

आतां मजसाटीं याल आकारास । रोकडी हे आस नाहीं देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे मुखीं असो तुझें नाम । देईल तो श्रम देवो काळ[1] ॥ ३ ॥

॥ २९३० ॥

हितावरी यावें । कोणी बोलिलों या भावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव्हे[2] विनोदउत्तर । केले रंजवाया चार ॥ ध्रु ॥
केली अटाअटी । अक्षरांची देवासाटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे खिजों । नका जांगा[3] येथें निजों ॥ ३ ॥

॥ २९३१ ॥

संचित प्रारब्ध[4] क्रियमाण । अवघा जाला नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं आह्मांसी संबंधु । जरा मरण कांहीं बाधु ॥ ध्रु ॥
द्वैताद्वैतभावें । अवघें व्यापियेलें देवें ॥ २ ॥
तुका ह्मणे हरि । आह्मांमाजी क्रीडा करी ॥ ३ ॥

॥ २९३२ ॥

नेणें करूं सेवा । पांडुरंगा कृपाळुवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धांवें बुडतों मी काढीं । सत्ता आपुलिया ओढीं ॥ ध्रु ॥
क्रियाकर्महीन । जालों इंद्रियां अधीन ॥ २ ॥
तुका विनंती करी । वेळोवेळां पाय धरी ॥ ३ ॥

॥ २९३३ ॥

जयांपासोनि सकळ । महीमंडळ जालें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो एक पंढरीचा राणा । नये श्रुती[5] अनुमाना ॥ ध्रु ॥

---

१ पं. काळा.—२ पं. नव्हती विनोद उत्तरें । केले रंजवाया चारे ॥.—३ पं. रांगा.—४ पं. " प्रारब्ध " नाहीं.—५ पं. अनुमाना श्रुतीसी.

विवादती जयासाठीं । जगजेटी तो विठ्ठल ॥ २ ॥
तुका ह्मणे तो[1] आकळ । आहे सकळव्यापक ॥ ३ ॥

॥ २९३४ ॥

नाहीं रूप नाहीं नांव । नाहीं ठांव धराया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेथें जावें तेथें आहे । विठ्ठल मायबहीण ॥ ध्रु ॥
नाहीं आकार विकार । चराचर भरलेंसे ॥ २ ॥
नव्हे निर्गुण सगुण । जाणे कोण तयासी ॥ ३ ॥
तुका ह्मणे भावाविण । त्याचें मन वोळेना ॥ ४ ॥

॥ २९३५ ॥

आहे सकळां वेगळा । खेळे कळा चोरोनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खांबसुत्राचिये परी । देव दोरी हालवितो ॥ ध्रु ॥
आपण राहोनि निराळा । कैसी कळा नाचवी ॥ २ ॥
जेव्हां असुडितो दोरी । भूमीवरी पडे तेव्हां ॥ ३ ॥
तुका ह्मणे तो जाणावा । सखा करावा आपुला ॥ ४ ॥

॥ २९३६ ॥

आतां पुढें मना । चोली[2] जाली नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें[3] राहिलें राहिलें । कैसें गुंतोनि उगलें ॥ ध्रु ॥
भोवतें भोंवनी । आलियांची जाली[4] धणी ॥ २ ॥
तुका ह्मणे रंग रंगे । रंगलें पांडुरंगे ॥ ३ ॥

॥ २९३७ ॥

आळस पाडी विषयकामीं । शक्ती देई तुझ्या नामीं ॥ १ ॥

---

१ पं. "तो" नाहीं.—२ पं. वाचा.—३ पं. तेथें.—४ पं. "जाली" नाहीं.

॥ ध्रु. ॥ हे[1] चि विनवणी विनवणी[2] । विनविली धरा मनीं ॥ध्रु ॥
आणिक वचना मुकी वाणी । तुमच्या गर्जों द्यावी गुणीं ॥ २ ॥
तुका ह्मणे पाय डोळां । पाहें[3] एरवी अंधळा ॥ ३ ॥

॥ २९३८ ॥

कोण वेंची वाणी । आतां क्षुल्लका कारणीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां हें चि काम करूं । विठ्ठल ह्रदयांत धरूं ॥ ध्रु ॥
नेंदाविया वृत्ति । आतां उठों चि बहुती ॥ २ ॥
उपदेश लोंकां । करूनी वेडा होतो तुका ॥ ३ ॥

॥ २९३९ ॥

मागणें[4] तें एक तुज । देईं विचारोनि मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नको दुर्जनांचा संग । क्षणक्षणा चित्तभंग ॥ध्रु ॥
जन्म घेईन मी नाना । बहु सोसीन यातना ॥ २ ॥
रंक होईन दीनांचा । घायें देहपात साचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे हें चि आतां । देईं देईं तूं सर्वथा ॥ ४ ॥

॥ २९४० ॥

जाणसी उचित । पांडुरंगा धर्मनीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि म्यां बोलावें तें काई । सरे ऐसें तुझे पायीं ॥ ध्रु ॥
पालटती क्षणें । संचितप्रारब्धक्रियमाणें[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्ता । होसी सकळ करिता ॥ ३ ॥

---

१ पं. "हे चि विनवणी०." व "आणीक वचना०." ह्या पंक्ति मागेंपुढें आहेत.—२ पं. विनवणी । विनविली०.—३ दे. "पाहें" याचें "पाहावें" केलें आहे.—४ दे. मागेन.—५ दे. त. °क्रियमाण.

॥ २९४१ ॥

तुह्मी कांटाळलां तरी । आह्मां न सोडणें हरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जावें कवणिया ठाया । सांगा विनवितों पायां ॥ ध्रु ॥
केली जिवा साटी । आतां सुखें लागा पाठी ॥ २ ॥
तुका ह्मणे ठाव । न सोडणें हा चि भाव ॥ ३ ॥

॥ २९४२ ॥

येउनि संसारीं । मी तों एक[1] जाणें हरी ॥ १ ॥
नेणें आणिक कांहीं धंदा । नित्य ध्यातसें गोविंदा ॥ ध्रु ॥
कामक्रोधलोभस्वार्थ ॥ अवघा माझा पंढरिनाथ ॥ २[2] ॥
तुका ह्मणे एक । धणी विठ्ठल मी सेवक ॥ ३ ॥

॥ २९४३ ॥

सर्वपक्षीं हरि साहिसखा जाला । ओल्या अंगणीच्या कल्पलता त्याला ॥ १ ॥
सहजचाली चालतां पायवाटें । चिंतामणींसमान होती गोटे ॥ २ ॥
तुका तरी सहज बोले वाणी । त्याचे घरीं वेदांत वाहे पाणी ॥ ३ ॥

॥ २९४४ ॥

काय पुण्य ऐसें आहे मज्र्पाशीं । तांतडी धांवसी पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय ऐसा भक्त[5] यांयां गेलों थोर । तूं मज समोर होसी वेगां[3] ॥ ध्रु ॥
काय कष्ट माझे[4] देखिली चाकरी । तो तूं झडकरी पाचारिशी ॥ २ ॥
कोण मी नांवाचा थोर[5] गेलों मोटा । अपराधी करंटा नारायणा ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं ठाउकें संचित । येणें जन्महित नाहीं केलें ॥ ४ ॥

---

१ पं. जाणें एक.—२ पं. "ऐसें हरिभक्ताचें ज्ञान माहिमान । अतर्क्य तयाचें दुर्लभ दरुषण ॥." हें कडवें जास्त आहे.—३ पं. वेगीं.—४ माझी.—५ त. "थोर" नाहीं.

॥ २९४५ ॥

आमुचिया भावें तुज देवपण । तें कां विसरोन राहिलासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ समर्थासी नाहीं उपकारस्मरण । दिल्या आठवण वांचोनियां ॥छ॥
चळण वळण सेवकाच्या बळें । निर्गुणाच्या[1] मुळें सांभाळावें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां आलों खंडावरी । प्रेम देउनि हरी बुझवावें ॥ ३ ॥

॥ २९४६ ॥

आह्मी मेलों तेव्हां देह दिला देवा । आतां करूं सेवा कोणाची मी[2] ॥१॥
॥ ध्रु. ॥ सूत्रधारी जैसा हालवितो कळा । तैसा[3] तो पुतळा नाचे छंदें ॥छ॥
बोलतसें जैसें[4] बोलवितो देव । मज हा संदेह[5] कासयाचा ॥ २ ॥
पाप पुण्य ज्याचें तो चि जाणे कांहीं । संबंध हा नाहीं आह्मांसवें ॥३॥
तुका ह्मणे तुह्मी आइका हो मात । आह्मी या अतीत देहाहूनी ॥ ४ ॥

॥ २९४७ ॥

लागों नेदीं बोल पायां तुझ्या हरी । जीव जावो परि न करीं आण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परनारी मज रखुमाईसमान । वमनाहूनि धन नीच मानीं ॥२॥
तुका ह्मणे याची लाज असे कोणा । सहाकारी दीना ज्याची तया ॥ ३ ॥

॥ २९४८ ॥

हे चि भेटी साच रूपाचा आठव । विसावला जीव आवडीपें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखाचें भातुकें करावें जतन । सेविल्या ताहान भूक जाय ॥छ॥
दुरील जवळी आपण चि होतें । कवळिलें चित्तें जिवापासीं[6] ॥ २ ॥
तुका ह्मणे नाम घेतों वेळोवेळां । होतील सकळा शीतळा नाडी ॥ ३ ॥

---

१ पं. निर्गुणाचें मूळ—२ दे. "मी" नाहीं.—३ पं. नाचवी पुतळा.—४ त. तैसें.—५ पं. संत.—६ पं. जीवनासी.

॥ २९४९ ॥

आपुलिया बळें नाहीं[1] मी बोलत । सखा भगवंत वाचा[2] त्याची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ॥
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याची कोण जाणे कळा । चालवी[3] पांगळा पायांविण ॥ ३ ॥

॥ २९५० ॥

हित सांगे तेणें दिलें जीवदान । घातकी तो जाण मनामागें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बळें हे वारावे अधर्म करितां । अंधळें चालतां आडरानें ॥ ध्रु ॥
द्रव्य देऊनियां धाडावें तीर्थासी । नेदावें चोरासी चंद्रबळ ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें आहे हें पुराणीं । नाहीं[4] माझी वाणी पदरींची ॥ ३ ॥

॥ २९५१ ॥

ऐसा घेई[5] कां रे संन्यास । करीं संकल्पाचा न्यास[6] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग तूं राहें भलते ठायीं । जनीं वनीं खाटे भोई ॥ ध्रु ॥
तोडीं जाणिवेची कळा । होई वृत्तीसी वेगळा[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे नभा । होई आमुचा ही भागा ॥ ३ ॥

॥ २९५२ ॥

सोळा सहस्र होऊं येतें । भरलें रितें आह्मापें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसे तुह्मां ठाऱ्याठाव । देव ह्मूण संपादे ॥ ध्रु ॥
कैची चिरामध्यें चिरे । मना बरें आलें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । अंगलगा[8] भिन्न परा[9] ॥ ३ ॥

---

१ पं. नाहीं बोलवत । सखा कृपावंत०.—२ त. कृपा.—३ पं. वागवी पांगुळा.—४ पं. नव्हे.—५ त. घेई रे सन्यास ।. पं. घेई कां संन्यास.—६ दे. नास. पं. नाश.—७ पं. निराळा —८ पं. अंगसंगा.—९ दे. करा.

॥ २९५३ ॥

इहलोकीं आम्हां भूषण अवकळा । भोपळा वाकळा आणि भिक्षा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निर्मोली संपदा भयविरहित । सर्वकाळ चित्त समाधान ॥ ध्रु ॥
छिद्राचा आश्रम उंदीरकुळवाडी । धन नाम जोडी देवाचें[2] तें ॥ २ ॥
तुका ह्मणे एक सेवटीं राहाणें । वर्ततों या जना विरहित ॥ ३ ॥

॥ २९५४ ॥

आह्मी भाग्याचे भाग्याचे । आह्मां तांबे भोपळ्याचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लोकां घरीं गाई ह्मैसी । आह्मां घरीं उंदिरघुसी ॥ ध्रु ॥
लोकां[3] घरीं हत्ती घोडे । आह्मां आधोडीचें[4] जोडे ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी सुडके । आह्मां देखोन काळ धाके ॥ ३ ॥

॥ २९५५ ॥

गाऊं नेणें कळा कुसरी । कान धरोनि ह्मणें हरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझ्या बोबडिया बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ॥ ध्रु ॥
मज हंसतील लोक । परि मी गाईन निःशंक ॥ २ ॥
तुझे नामीं मी निर्लज्ज । काय जनासवें काज ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी[4] विनंती । तुह्मी परिसा कमळापती ॥ ४ ॥

॥ २९५६ ॥

विष पोटीं सर्पा । जन भीतें[5] तया दर्पा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पंच भूतें नाहीं भिन्न । गुण[6] दुःख देती शीण ॥ ध्रु ॥

---

१ त. अन्न भिक्षा. दे. "आणि भिक्षा" याचें "अन्न भिक्षा" केलें आहे.—२ पं. देवाची ते.—३ पं. "लोकांघरीं तांबे थाळे । आह्मां घरीं परळ काळे ॥" हें कडवें येथें जास्त आहे.—४ पं. हो.—५ पं. भीत.—६ पं. गुणदुःखें.

चंदन प्रिय वासें । आवडे[1] तें जातीऐसें ॥ २ ॥
तुका ह्मणे दाणा । कुचर मिळों नये अन्ना ॥ ३ ॥

॥ २९५७ ॥

देव अवघें प्रतिपादी । वंदी सकळां एका निंदी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें अवघें गेलें वांयां । विष घास एके ठायां ॥ ध्रु ॥
सर्वांग कुरवाळी । उपटी एक रोमावळी ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्त । नाहीं जयाचें अंकित ॥ ३ ॥

॥ २९५८ ॥

मज माझा उपदेश । आणिकां नये याचा रीस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी अवघे पांडुरंग । मी च दुष्ट सकळ चांग ॥ ध्रु ॥
तुमचा मी शरणागत । कांहीं करा माझें हित ॥ २ ॥
तुका पाय धरी । मी हें माझें दुर करीं ॥ ३ ॥

॥ २९५९ ॥

जाणे त्याचें वर्म नेणे त्याचें कर्म । केल्याविण धर्म नेणवती ॥ १ ॥
मैथुनाचें सुख सांगितल्या शून्य[2] । अनुभवाविण कळूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे जळो शाब्दिक, हें[3] ज्ञान । विठोबाची खूण विरळा जाणे ॥ ३ ॥

॥ २९६० ॥

अभिमानी पांडुरंग । गोवा काशाचा हो[4] मग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनुसरा लवलाहीं । नका विचार करूं कांहीं ॥ ध्रु ॥

---

१ पं. आवडती.—२ दे. "शून्य" खोडून "खूण" केलें आहे.—३ त. "हें" नाहीं
४ पं. हा.

कोठें राहातील पापें । जालिया[1] हो अनुताप[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे ये चि घडी । उभ्या पाववील थडी ॥ ३ ॥

॥ २९६१ ॥

तुझें वर्म हातीं । दिलें सांगोनियां संतीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुखीं नाम धरीन कंठीं । अवघा सांटवीन पोटीं ॥ ध्रु ॥
नवविधा वेढिन आधीं । सांपडलासी भावसंधी ॥ २ ॥
तुका ह्मणे बळिये गाढे । कळिकाळ पायां पडे ॥ ३ ॥

॥ २९६२ ॥

माझ्या मना लागो चाळा । पहावया विठ्ठल डोळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक नाहीं चाड । न लगे संसार हा गोड ॥ ध्रु ॥
तरि च फळ जन्मा आलों । सरता पांडुरंगीं जालों ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । देईं चरणांची सेवा ॥ ३ ॥

॥ २९६३ ॥

अवघें जेणें पाप नासे । तें हें असे पंढरीसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गात जागा गात जागा । प्रेम मागा विठ्ठला ॥ ध्रु ॥
अवघी सुखाची च राशी । पुंडलिकाशीं वोळली हे[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे जवळी आलें । उभें ठेलें[4] समचरणीं ॥ ३ ॥

॥ २९६४ ॥

देह तुझ्या पायीं । ठेवूनि जालों उतराई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझ्या जीवा । करणें तें करीं देवा ॥ ध्रु ॥

---

१ पं. जाहालिया अनुतापे.—२ दे. अनुतापें.—३ पं. "हे" नाहीं.—४ दे. त ठालें.

बहु अपराधी । मतिमंद हीनबुद्धि ॥ २ ॥
तुका ह्मणे नेणें । भावभक्तीचीं लक्षणें ॥ ३ ॥

॥ २९६५ ॥

जन हें सुखाचें दिल्याघेतल्याचें । अंत हें काळींचें नाहीं कोणी ॥१॥
॥ ध्रु. ॥ जाल्या हीन शक्ति नाकडोळे गळती । सांडोनि पळती रांडापोरें ॥ ध्रु ॥
बाइल ह्मणे खर[1] मरता तरी बरें । नासिलें हें घर थुंकोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे माझीं नव्हतील कोणी । तुज चक्रपाणी वांचूनियां ॥ ३ ॥

॥ २९६६ ॥

जाणोनि नेणतें करीं माझें मन । तुझी प्रेमखूण देऊनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मंग मी व्यवहारीं असेन वर्तत । जेवीं जळाआंत पद्मपत्र ॥ध्रु॥
ऐकोनि नाइकें निंदास्तुति कानीं । जैसा कां उन्मनी योगिराज ॥ २ ॥
देखोनि न देखें प्रपंच हा दृष्टी । स्वप्नींचिया सृष्टि चेविल्या[2] जेवीं ॥३॥
तुका ह्मणे ऐसें जालियावांचून । करणें[3] तें तें सीण वाटतसे ॥ ४ ॥

॥ २९६७ ॥

विठ्ठला विठ्ठला । कंठ आळवितां फुटला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कईं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धांवणें ॥ ध्रु ॥
जाल्या येरझारा । जन्मां बहुतांचा फेरा ॥ २ ॥
तुका ह्मणे नष्टा । अबोलण्या तुझ्या चेष्टा ॥ ३ ॥

---

१ पं. खरें.—२ पं. चेइल्या. दे. "चेविल्या" याचें "चेइल्या" केलें आहे.—३ पं. करणें तो सीण.

॥ २९६८ ॥

ज्यासी विषयाचें ध्यान । त्यासी कैंचा नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साधु कैंचा पापीयासी । काय चांडाळासी काशी ॥ ध्रु ॥
काय पतितासी पिता । काय अधर्मासी[1] गीता ॥ २ ॥
तुका ह्मणे निरंजनी । शेठ[2] कैंचा ब्रह्मज्ञानी ॥ ३ ॥

॥ २९६९ ॥

वरतें करोनियां तोंड । हाका मारितो प्रचंड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राग आळवितो नाना । गातो काय तें कळेना ॥ ध्रु ॥
आशा धरोनि मनीं । कांहीं देईल ह्मणऊनि ॥ २ ॥
पोटा एका साटीं । तुका ह्मणे जाले[3] कष्टी ॥ ३ ॥

॥ २९७० ॥

प्रपंच वोसरो । चित्त तुझे पायीं मुरो[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें करिं गा पांडुरंगा । शुद्ध रंगवावें रंगा ॥ ध्रु ॥
पुरे पुरे आतां । नको दुजियाची सत्ता ॥ २ ॥
लटिकें तें फेडा । तुका ह्मणे जाय पीडा ॥ ३ ॥

॥ २९७१ ॥

ऐका कलीचें हें फळ । पुढें होइल ब्रह्मगोळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चारी वर्ण अठरा याती । भोजन करिती एके पंक्ती ॥ ध्रु ॥
पूजिती असुरा रांडा । मद्य प्राशितील पेंढा ॥ २ ॥
वामकवळ मार्जन । जन जाईल अधःपतन[5] ॥ ३ ॥
तुका हरिभक्ति करी । शक्ति पाणी वाहे घरीं ॥ ४ ॥

---

१ पं. कसावासी.—२ दे. त. शट. पं. षट्.—३ त. जालों.—४ पं. मरो.—५ दे. त. अधोपतन.

॥ २९७२ ॥

गुरुमार्गामुळें भ्रष्ट[1] सर्वकाळ । ह्मणती याती कुळ नाहीं ब्रह्मीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पवित्राला ह्मणती नको हा कंटक । मानिती आत्मिक अनामिका ॥ ध्रु ॥
डोहोरे[2] होलार दासी बलुती बारा । उपदेशिती फारा रांडापोरां[3] ॥ २ ॥
कांहीं टाण्या टोण्या विप्र शिष्य होती । उघडी[4] फजिती स्वधर्माची ॥ ३ ॥
नसता करुनी होम खाती एके ठायीं । ह्मणती पाप नाहीं मोक्ष येणें ॥ ४ ॥
इंद्रियांचे पेठे भला कौल देती । मर्यादा जकाती[5] माफ केली ॥ ५ ॥
नाहीं शास्त्राधार पात्रापात्र नेणे । उपदेशून घेणें द्रव्य कांहीं ॥ ६ ॥
तुका ह्मणे ऐसे गुरु शिष्य पूर्ण । विठोबाची आण नरका जाती ॥ ७ ॥

॥ २९७३ ॥

बोलांचे[6] गौरव । नव्हे माझा हा[7] अनुभव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझी हरिकथा माउली । नव्हे आणिकांसी[8] पांगिली ॥ ध्रु ॥
व्याली वाढविलें । निजपदीं निजविलें ॥ २ ॥
दाटली वो रसें । त्रिभुवन ब्रह्मरसें ॥ ३ ॥
विष्णु जोडी कर । माथां[9] रज वंदी हर ॥ ४ ॥
तुका ह्मणे बळ । तोरडीं[10] हा कळिकाळ ॥ ५ ॥

॥ २९७४ ॥

सेवट तो भला । माझा बहु गोड जाला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आलों निजांच्या माहेरा । भेटों[11] रखुमाईच्या वरा ॥ ध्रु ॥

---

१ पं. भ्रष्टले सकळ. त. भ्रष्ट जाले सकळ.—२ पं. लोहार डोहार दासे०—३ पं. रांडापोरें.—४ पं. उघड.—५ पं. जाण.—६ पं. वोलाचा.—७ पं. "हा" नाहीं.—८ पं. आणिकां.—९ रज माथां.—१० पं. तोडरीं.—११ पं. नेटी (? भेटी).

परिहार जाला । अवघ्यां[1] दुःखाचा मागिल्या ॥ ३ ॥
तुका ह्मणे वाणी । गेली आतां घेऊं धणी ॥ ४ ॥

॥ २९७५ ॥

तुझें नाम गाऊं आतां । तुझ्या रंगीं नाचों था था ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझ्या नामाचा विश्वास । आह्मां कैंचा गर्भवास ॥ ध्रु ॥
तुझे नामीं विसर पडे । तरी कोटी हत्या घडे ॥ २ ॥
नाम घ्या रे कोणी फुका । भावें सांगतसें तुका ॥ ३ ॥

॥ २९७६ ॥

बाइल तरी ऐसी व्हावी । नरकीं गोवी अनिवार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घडों नेदी तीर्थयात्रा । केला कुतरा हातसोंका ॥ ध्रु ॥
आपुली च करवी सेवा । पुजवी देवासारिखें ॥ २ ॥
तुका ह्मणे गाढव पशु । केला नाशु आयुष्यां[2] ॥ ३ ॥

॥ २९७७ ॥

बाइले अधीन होय[3] ज्याचें जिणें । तयांच्या[4] अवलोकनें पडिजे[5] द्वाड ॥ १ ॥
कासया ते जंत जिताती संसारीं । माकडाच्या परी गारोड्यांच्या ॥ ध्रु ॥
बाइलेच्या मना येईल तें खरें । अभागी तें पुरें बाइलेचें ॥ २ ॥
तुका ह्मणे मेंग्या गाढवाचें जिणें । कुतऱ्याचें खाणें लगबगा ॥ ३ ॥

॥ २९७८ ॥

जगीं मान्य केलें हा तुझा देकार । कीं कांहीं विचार आहे पुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करितों कवित्व जोडितों अक्षरें । येणें काय पुरें जालें माझें ॥ ध्रु ॥

---

१ पं. अवघा दुःखाचा मागिला.—२ पं. आयुष्याचा.—३ त. होइल.—४ पं. त्याच्या.—५ पं. पडे.

तोंवरि हे माझी न सरे करकर। जो नव्हे विचार तुझ्या मुखें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज पुंडलिकाची आण। जरी कांहीं वचन करिसी मज ॥३॥

॥ २९७९ ॥

कोंडिलों गे माज। निरोधुनी द्वार[2]।
राखण तें बरें। येथें करा कारण[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हा गे हा गे हरि। करितां सांपडला चोरी ॥
घाला गांठी धरी। जीवें माय त्रासाया ॥ ध्रु ॥
तें[3] चि पुढें आड। तिचा लोभ तिला नाड।
लावुनी चरफड। हात गोउनी पळावें[4] ॥ २ ॥
संशयाचें बिरडें[5]। याचे निरसले भेटी।
घेतली ते तुटी। आतां घेतां फावेल ॥ ३ ॥
तुका येतो काकुलती। वाउगिया सोड।
यासी चि निवाड। आह्मी भार वाहिका ॥ ४ ॥

॥ २९८० ॥

झड मारोनियां बैसलों पंगती। उठवितां फजिती दातयाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तें उचित तुह्मां कां न कळे। कां हो झांका डोळे पांडुरंगा ॥ ध्रु ॥
घेईन इच्छेचें मागोनि सकळ। नाहीं नव्हे काळ बोलायाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे जालों माना अधिकारी। नाहीं[6] लोक परी लाज देवा ॥ ३ ॥

---

१ दे. "कोंडिलागे रोधुनि" असें मागून केलें आहे.—२ पं. "द्वार" नाहीं.—३ त. तो.—४ पं. फळा वेगीं.—५ दे. बिन्हडें.—६ पं. योग्य नाहीं परी लोक लाज।

॥ २९८१ ॥

नाम न वदे ज्याची वाचा । तो लेंक दो बापांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे चि ओळख तयाची । खूण जाणा अभक्ताची ॥ ध्रु ॥
ज्यासी विठ्ठल नाहीं ठावा । त्याचा संग न करावा ॥ २[1] ॥
नाम न म्हणे ज्याचें तोंड । तें चि चर्मकाचें कुंड ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याचे दिवशीं । रांड गेली महारापाशीं ॥ ४ ॥

॥ २९८२ ॥

पतित मी पापी शरण आलों तुज । राखें माझी लाज पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तारियेले भक्त न कळे तुझा अंत । थोर मी पतित पांडुरंगा ॥ध्रु॥
द्रौपदी बहिणी वैरीं[2] गांजियेली । आपणाऐसी केली पांडुरंगा ॥ २ ॥
प्रल्हादाकारणें[3] स्तंभीं अवतार । माझा कां विसर पांडुरंगा ॥ ३ ॥
सुदामा ब्राह्मण दरिद्रें[4] पीडिला । आपणाऐसा केला पांडुरंगा ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुज शरण निजभावें[5] । पाप निर्दाळावें पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ २९८३ ॥

कस्तूरीचें रूप अति हीनवर । माजी असे सार मोल तया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक ही तैसीं चंदनाचीं झाडें । परिमळें वाढे मोल तयां ॥ध्रु॥
काय रूपें असे परीस[6] चांगला । धातु केली मोला वाढ तेणें ॥ २ ॥
फिरंगी आटितां नये बारा रुके । गुणें मोलें[7] विकें सहस्रवरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं जातीसवें काम । ज्याचे मुखीं नाम तो चि धन्य ॥४॥

---

१ पं. "ठावा नाहीं पांडुरंग । जाणा जातीचा तो मांग ॥" हें कडवें जास्त आहे.—२ पं. वैरियें गांजिली.—३ पं. प्रल्हादा०—४ दे. त. दारिद्रें.—५ पं. जीवें भावें.—६ त. पारीस चांगला.—७ पं. मोल.

॥ २९८४ ॥

नव्हें मी स्वतंत्र अंगाचा पाईक । जे हे सकळिक सत्ता वारूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मां आळवावें पाउला पाउलीं । कृपेची साउली करीं मज
॥ ध्रु ॥
शक्तिहीन तरी जालों शरणागत । आपुला वृत्तांत जाणोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे भवाभेणें धरिलें पाय । आणीक उपाय नेणें[1] कांहीं ॥ ३ ॥

॥ २९८५ ॥

पाहों ग्रंथ तरी आयुष्य नाहीं हातीं । नाहीं ऐशी मति अर्थ कळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होईल तें हो या विठोबाच्या नांवें । आचरलें[2] भावें जीवीं धरूं
॥ ध्रु ॥
एखादा अंगासी येईल प्रकार । विचारितां फार युक्ति वाढे ॥ २ ॥
तुका ह्मणे आळी करितां गोमटी । मायबापा पोटीं येते दया ॥ ३ ॥

॥ २९८६ ॥

पाहातां रूप डोळां भरे । अंतर नुरे वेगळें ।
इच्छावशें[3] खेळ मांडी । अवघें सांडी बाहेरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो हा[4] नंदानंदन बाइये । यासी काय परिचार वो[5] ॥ ध्रु ॥
दिसतो हा नव्हे तैसा, । असे दिशाव्यापक ।
लाघव हा खोळेसाटीं[6] । होतां भेटी परतेना ॥ २ ॥
ह्मणोनि उभी ठालीये[7] । परतलीये या वाटा ।
आड करोनियां तुका । जो या लोकां दाखवितो ॥ ३ ॥

---

१ पं. नेणों.—२ पं. आर्जिलें तें भावें०.—३ त. पं.० वसे. ०"वशें" याबद्दल.—४ पं. "हा" नाहीं.—५ पं. "वो" नाहीं.—६ पं. खेळे साटीं.—७ पं. ठाकलीये.—८ त. साटीं.

॥ २९८७ ॥

कान्होबा देवाशीं भांडले ते अभंग ॥ ३७ ॥

दुःखें दुभागलें त्वद्दयसंपुष्ट । गहिंवरें कंठ दाटताहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें काय केलें सुमित्रा सखया । दिलें टाकोनियां वनामाजी ॥ध्रु॥
आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनी फुटों[1] पाहे ॥ २ ॥
काय हें सामर्थ्य नव्हतें तुजपाशीं । संगें न्यावयासी अंगभूतां ॥ ३ ॥
तुज ठावें आह्मां कोणी नाहीं सखा । उभयलोकीं तुका तुजविण ॥४॥
कान्हा ह्मणे तुझ्या वियोगें पोरटीं । जालों दे रे भेटी बंधुराया ॥ ५ ॥

॥ २९८८ ॥

सख्यत्वासी गेलों करीत सलगी ।
नेणें चि अभागी महिमा तुझा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पावलों आपुलें केलेंलाहेंरास ।
निर्दैवां परिस काय होय ॥ ध्रु ॥
कष्टविलासी म्यां चांडाळें संसारीं ।
अद्यापिवरि तरि उपदेशीं[2] ॥ २ ॥
उचित अनुचित सांभाळिलें नाहीं ।
कान्हा[3] ह्मणे कांहीं बोलों आतां ॥ ३ ॥

॥ २९८९ ॥

असो आतां कांहीं करोनियां ग्लांती ।
कोणा काकुलती येइल येथें ॥ १ ॥

---

१ पं. कांपों. दे. मागून "फुटों" याचें "कांपों" केलें आहे.—२ पं. उदेश ही. दे. उदेशही असेंच असतां मागून "उपदेशी" असें केलें आहे. आणि त. ही उदेशही असतां "उपदेशही" असें केलें आहे.—३ पं. तुका.

॥ ध्रु. ॥ करूं कांहीं दिस राहे तों सायास ।
झोंबों[1] त्या लागास भावाचिये ॥ ध्रु ॥
करितां[2] रोदना बापुडें ह्मणती ।
परि नये अंतीं कामा कोणी ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे पडिलिया वनीं ।
विचार तो मनीं बोलिला हे ॥ ३ ॥

॥ २९९० ॥

चरफडें चरफड शोकें शोक होये । कार्यमूळ आहे धीरापाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कल्पतसे मज ऐसें हें पाहातां । करावी ते चिंता मिथ्या खोटी ॥ ध्रु ॥
न चुके होणारें सांडिल्या शूरत्वा । फुकट चि सत्त्वा होइल हानी ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे दिल्या बंद मना । वांचूनि निधाना न पवीजे ॥ ३ ॥

॥ २९९१ ॥

न लगे चिंता आतां अनुमोदन[3] हाता । आलें मूळ भ्राता गेला[4] त्याचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घरभेद्या येथें आहे तें[5] सुकानु । धरितों कवळून[6] पाय दोन्ही ॥ ध्रु ॥
त्याचें त्याचिया मुखें पडिलें ठावें । न लगे सारावें मागें पुढें ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे करा भेटी भावा । सोडीन[7] तेधवां या विठ्ठला ॥ ३ ॥

॥ २९९२ ॥

मूळस्थळ[8] ज्याचें गोमतीचे तीरीं । तो हा सारी दोरी खेळवितो ॥ १ ॥

---

१ पं. झोंबें.—२ पं. करिती रुदना बापुडीं०.—३ दे. अन्मोन. त. आन्मोहन. पं. आन्मोदन.—४ पं. गेले.—५ पं. तो.—६ त. पं. कवळुनु.—७ पं. सोडीं.—८ पं. मूळस्थान

॥ ध्रु. ॥ ऐसें हें कळलें असावें सकळां। चोरत्या वेगळा नाहीं दुजा ॥ ध्रु ॥
वैष्णव[1] हे हेर तयाचे पाळती । खूण हे निरुती सांगितली ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे आलें अनुभवास । तेणें च आह्मांस नागविलें ॥ ३ ॥

॥ २९९३ ॥

बरा रे निर्गुणा नष्ट नारायणा । घरतुडवणा भेटलासी ॥ १ ॥
एके घरीं कोणी कोणासी न धरी । ऐसी अपरांपरी केली आह्मां ॥ २ ॥
कान्हा ह्मणे कां रे निष्काम[2] देखिलें। ह्मणोनि मना आलें कारितोसी ॥ ३ ॥

॥ २९९४ ॥

धदिंधदिं तुझ्या करीन धींदड्या । ऐसें काय वेडया जाणितलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केली तरी बरें मज भेटी भावास। नाहीं तरि नास आरंभिला ॥ ध्रु ॥
मरावें पारावें या आलें प्रसंगा । बरें[3] पांडुरंगा कळलेंसावें ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे तुझी माझी उरी। उडाली न धरीं भीड कांहीं ॥ ३ ॥

॥ २९९५ ॥

भुक्ति मुक्ति तुझें[4] जळो ब्रह्मज्ञान। दे माझ्या आणोनी भावा वेगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रिद्धी[5] सिद्धी मोक्ष ठेवीं गुंडाळून। दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ ध्रु ॥
नको आपुलिया नेऊं वैकुंठासी। दे माझ्या भावासी आणुन वेगीं ॥ २ ॥
नको होऊं कांहीं होसील प्रसन्न । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे पाहा हो नाहींतरी । हत्या होईल गिरीं पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ २९९६ ॥

मुख्य आहे आह्मां मातेचा पटंगा । तुज पांडुरंगा कोण लेखी ॥ १ ॥

---

१ दे. त. वैष्णव हे रे तयाचे.—२ दे. पं. निःकाम.—३ पं. काय पांडुरंगा पाहातोसी.—४ पं. तुझी.—५ पं. "रिद्धिसिद्धि" व "नको आपुलिया" या कडव्यांच्या जागा परस्पराशीं बदलल्या आहेत.

॥ ध्रु. ॥ नको लावूं आह्मां सवें तूं तोंवरी। पाहा दूरवरी विचारूनी ॥ ध्रु ॥
साहे संतजन केले महाराज । न घडे आतां तुज भेईन मी ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे अ[1]इक्यें ऐक्यता । वा[2]ढतें अनंता दुःखें दुःख ॥ ३ ॥

॥ २९९७ ॥

नय सोमसरी उपचारांची हरी । करकरेचें करीं काळें तोंड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागतों इतुकें जोडुनियां कर । ठेउनियां शीर पायांवरी ॥ ध्रु ॥
तुह्मां आह्मां एके ठायीं सहवास । येथें द्वैत द्वेष काय बरा[3] ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे बहुतां बहुतां रीती । अनंता विनंती परिसावी हे ॥ ३ ॥

॥ २९९८ ॥

लालुचाईसाटीं बळकाविसी भावा । परी मी जाग देवा जिरों नेदीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असों द्या निश्चय हा मनीं मानसीं । घातली येविशीं दृढ कास ॥ ध्रु ॥
मज आहे बळ आळीचें सबळ । फोडीन अंत्राळ हृदय तुझें ॥ २ ॥
करुणारसें तुकयाबंधु ह्मणे भुलवीन । काढूनि घेईन निज वस्तु ॥ ३ ॥

॥ २९९९ ॥

तुझीं वर्मे आह्मां ठावीं नारायणा । परी तूं शाहाणा होत नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग कालाबुली[4] हाका देते वेळे । होतोसि परी डोळे नुघडिसी ॥ ध्रु ॥
जाणोनि अज्ञान करावें मोहरें । खोटी खोडी हे रे तुझी देवा ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे कारण प्रचीति । पाहातों वेळ किती तेंच गुण ॥ ३ ॥

---

१ त. आहिक्यें आहिक्येता. दे. अहिक्यें ऐक्यता. पं. ऐक्य एक्यता.—२ पं. वाढे त्या.—३ पं. खरा.—४ पं. हाक.

॥ ३००० ॥

अवघीं तुज बाळें सारिखीं नाहीं तें । नवल वाटतें पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणतां लाज नाहीं सकळांची माउली । जवळी धरिलीं[1] एकें दुरी ॥ ध्रु ॥
एकां सुख द्यावें घेऊनि वोसंगा । एक[2] दारीं गळा श्रमविती ॥ २ ॥
एकां नवनीत पाजावें दाटून । एकें अन्न अन्न[3] करितील ॥ ३ ॥
एकें वाटतील न वजावीं दुरी । एकांचा मत्सर जवळी येतां ॥ ४ ॥
तुकयाबंधु ह्मणे नावडतीं त्यांस । कासया व्यालास नारायणा[4] ॥ ५ ॥

॥ ३००१ ॥

निनांव[5] हें तुला । नांव साजे रे विठ्ठला ।
बरा शिरविला । फाटक्यामध्यें पाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं तरी विचारिलें । पाप पुण्य ऐसें केलें ।
भुरळें घातलें । एकाएकीं भावासी ॥ ध्रु ॥
मुद्राधारण[6] माळा टिळे । बोल रसाळ कोंवळे ।
हातीं फांशाचे गुंडाळे । कोण चाळे गृहस्था हे ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे मिस्किर्न । करितोसी देखोन ।
पाहा दुरिवरी विच्छिन्न । केला परी संसार ॥ ३ ॥

॥ ३००२ ॥

नाहीं घटिका ह्मणसी । लाग लागला तुजपाशीं ।
पडिला त्वृषीकेशी । जाब सकळ करणें ॥ १ ॥

---

१ पं. धरियेलीं.—२ पं. एकें.—३ दे. अन्नें.—४ पं. पांडुरंगा.—५ दे. त. निनांवा.—६ दे. त. मुद्रा धारणें.

॥ ध्रु. ॥ माझें नेलें पांघरुण । ठावें असोंन दुर्बळ दीन ।
माणसांमधून । उठविलें खाणोऱ्या ॥ ध्रु ॥
आह्मीं हें जगऊनि होतों पाणी । संदीं देवदेव करूनि ।
जालासी कोठोनि । पैदा चोरा देहाच्या[1] ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे केलें । उघडें[2] मजचि उमगिलें ।
ऐसें[3] काय गेलें । होतें तुज न पुरतें ॥ ३ ॥

॥ ३००३ ॥

कनवाळ कृपाळ । उदार दयाळ मायाळ ॥
ह्मणवितोसी परि केवळ । गळेकाटू दिसतोसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय केलें होतें आह्मीं । सांग तुझें[4] एकये जन्मीं ।
जालासी जो स्वामी । एवढी सत्ता करावया ॥ ध्रु ॥
भलेपणाचा पवाडा । बरा दाविला रोकडा ।
करूनि बंधु वेडा । जोडा माझा विखंडिला[5] ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे भला । कैसें ह्मणतातीं तुजला ।
जीव आमुचा नेला । अंत पाहिला कांहींतरी ॥ ३ ॥

॥ ३००४ ॥

आतां कळों आले गुण । अवघे चि यावरोन ।
चोखट लक्षण । धरिलें हें[6] घरघेणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ या नांवें कृपासिंधु । ह्मणवितोसी दीनबंधु ।
मज तरी मैंदु । दिसतोसी पाहातां ॥ ध्रु ॥

---

१ पं. देवाच्या.—२ पं. उघड.—३ पं. ऐसें कांहीं एक केलें.—४ पं. तुझें ये जन्मीं.—५ त. विघडिला.—६ पं. "हें" नाहीं.

अमळ दया नाहीं पोटीं । कठीण तैसाचि कपटी ।
अंधळ्याची काठी । माझी गुदरसी च ना ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे पुरता । नाहीं ह्मूण बरें अनंता ।
एरवीं[1] असतां । तुझा घोंट भरियेला ॥ ३ ॥

॥ ३००५ ॥

काय सांगों त्वृषीकेशा । आहे अनुताप आला ऐसा ।
गिळावासी निमिषा । निमिष लागों नेदावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें बुडविलें घर । लेंकरें बाळें दारोदार ।
लाविलीं काहार । तारातीर करोनि ॥ ध्रु. ॥
जीव घ्यावा किंवा[2] द्यावा । तुझा आपुला केशवा ।
इतुकें उरलें आहे । भावाचिया निमित्यें ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे जग बरें । वाईट ह्मणो मग ।
या कारणें परी लाग । न संडावा सर्वथा ॥ ३ ॥

॥ ३००६ ॥

मायबाप निमाल्यावरी[3] । घातलें भावाचे आभारीं ।
तो ही परि हरी । तुज जाला असमाई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे कां भक्तिचे उपकार । नांदतें विध्वंसिलें घर ।
प्रसन्नता व्यवहार[4] । सेवटीं हे जालासी ॥ ध्रु. ॥
एका जिवावरी । होतों[5] दोनी कुटुंबारी ।
चाळवूं तो तरीं[6] । तुज येतो निर्लज्जा ॥ २ ॥

---

१ पं. एऱ्हवीं तरी असता.—२ दे. कीं.—३ पं. मीनल्यावरी.—४ दे. त.० वेव्हार —५ पं. होते दोही कटुं०.—६ पं. उरी.

तुकयाबंधु ह्मणे भला । आणीक काय ह्मणावें तुला ।
वेडा त्यांनें[1] केला । तुजसवें संबंधु ॥ ३ ॥

॥ ३००७ ॥

पूर्वीं पूर्वजांची गती । हे चि आईकिली होती ।
सेवे लावूनि श्रीपती । निश्चिती केली तयांची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे पाठी लागलासी । ऐसा सांग हृषीकेशी ॥
अद्यापवरी[2] न राहासी । अंत पाहासी किती ह्मूण ॥ ध्रु ॥
जन्मजन्मांतरीं दावा । आह्मां आपणां केशवा ।
निमित्य[3] चालवा । काईसयास्तव हें ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे अदेखणा[4] । किती होसी नारायणा ।
देखों सकवेना । खातयासी न खात्या ॥ ३ ॥

॥ ३००८ ॥

निसुर संसार करून । होतों पोट भरून ।
केली विवसी निर्माण । देवपण दाखविलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा काढियेला निस । काय ह्मूण सहित वंश ।
आणिलें शेवटास । हाउस तरी न पुरे ॥ ध्रु ॥
उरलों पालव्या सेवटीं । तें ही न देखवे दृष्टी ।
दोघांमध्यें तुटी । रोकडीचि पाडीली ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे गोड । बहु जालें अति वाड ।
ह्मणोनी कां बुड । मुळ्यांसहित खावें ॥ ३ ॥

---

१ पं. त्याणीं.—२ त. अद्याप तरी.—३ पं. निमित्य चालवावा.—४ पं. न देखणा.

॥ ३००९ ॥

बरा जाणतोसी धर्मनीती । उचित अनुचित श्रीपती ।
करूं येते राती । ऐसीं डोळे झांकूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां जाब काय कैसा । देसी तो दे जगदीशा ॥
आणिला वोळसा । आपणां भोंवता ॥ ध्रु ॥
सेवेचिया[1] सुखास्तव । बळें धरिलें अज्ञानत्व ।
येइल परि हा भाव । ज्याचा त्यासी कारणा ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे नाहीं । आतां आह्मां बोल कांहीं ।
जडोनियां पायीं । तुझें त्वां चि घेतलें ॥ ३ ॥

॥ ३०१० ॥

कांहीं विपत्ति अपत्यां । आतां अमुचिया होतां ।
काय होईल अनंता । पाहा बोलों कासया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरें अनायासें जालें । सायासेंविण बोले चाले ॥
काबाड चुकलें । केलें कष्टावेगळें ॥ ध्रु ॥
बरा सांपडलासी वोजा । वर्मावरी केशीराजा ।
बोलायासी तुझा । उजुरचि नाहींसा ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे दगा । बरा दिला होता बागा ।
झडकरी चेलागा[2] । चांग दैवें पावलों ॥ ३ ॥

॥ ३०११ ॥

देवा तुजपें माझ्या पूर्वजांचें ऋण । आहे तें कां नेदिसी अझून ।
अवगलासी झोंडपणें । परी मी जाण जीवें जिरों[3] नेदीं ॥ १ ॥

---

१ पं. सवेचिया.—२ पं. चलगा.—३ पं. "जिरों नेदीं" याच्याबद्दल "न सोडीं".

॥ ध्रु. ॥ कळों येईल रोकडें । उभा करिन संतांपुढें ।
तुझें काय एवढें । भय, आपुलें मागतां ॥ ध्रु ॥
आजिवरी होतों[1] नेणता । तों तुज फावलें रे अनंता ।
कवडीचा तो आतां । पडों नेदीन फेर ॥ २ ॥
ठेविला ये जविनीं जवि । ह्मणे तुकयाचा बंधव ।
माझा गळा तुझा पाव । एके ठायीं बांधेन ॥ ३ ॥

॥ ३०१२ ॥

मागें असताशी कळला । उमस घेऊं नसता दिला ।
तेणें चि काळें केला । असतां अवघा निवाडा[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ इतका न लगता उशीर । न धरितों भीडभार ।
सिद्धासी व्यवहार[3] । कासयासी लागला ॥ ध्रु ॥
असोनियां माल खरा । किती केल्या[4] येरझारा ।
धरणें ही[5] दिवस तेरा । माझ्या भावें घेतलें ॥ २ ॥
अझुन तरी इतक्यावरी । चुकवीं जनाचार हरी ।
तुकयाबंधु ह्मणे उरी । नाहीं तरी नुरे कांहीं ॥ ३ ॥

॥ ३०१३ ॥

आतां न राहें क्षण एक । तुझा कळला रे लौकिक ।
नेदीं हालों एक । कांहीं केल्यावांचूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संबंध पडिला कोणाशीं । काय डोळे झांकितोसी ।
नेईन पांचांपाशीं । दे नाहींतरी वोढूनि ॥ ध्रु ॥

---

१ पं. होता.—२ पं. निवाड.—३ दे. त. वेव्हार.—४ पं. जाल्या.—५ पं. "ही" नाहीं.

सुखें नेदीस जाणवलें । नास केल्याविण उगलें ।
तरि तें ही विचारिलें । आह्मी आहे तुज आधीं ॥ २ ॥
असें च करूनि किंती । नागविलीं नाहीं नीती ।
तुकयाबंधु ह्मणे अंतीं। न सोडिसी ते खोडी ॥ ३ ॥

॥ ३०१४ ॥

तुज ते सवे आहे ठावें । घ्यावें त्याचें बुडवावें ।
परि तें आह्मांसवें । आतां न फावे कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव्हों सोडायाचे धणी । कष्टें मेळविलें करोनि ।
पाहा विचारोनी । आढी धरोनि काम नाहीं ॥ ध्रु ॥
अवघे राहिले प्रकार । जालों जीवासी उदार ।
असा हा निर्धार कळला । असावा असेल ॥ २ ॥
आतां निदसुर नसावें । गाठ पडली कुणब्यासवें ।
तुकयाबंधु ह्मणे राखावें । देवा महत्व आपुलें ॥ ३ ॥

॥ ३०१५ ॥

बहु बोलणें नये कामा । वाउगें तें पुरुषोत्तमा ।
एकाचि वचनें आह्मां । काय सांगणें तें सांगें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देणें आहे कीं भांडाई । करणें आहे सांग भाई ।
आतां भीड कांहीं । कोणी न धरी सर्वथा ॥ ध्रु ॥
मागें गेलें जें होउनी । असो तें धरित नाहीं मनीं ।
आतां पुढें येथूनि । कैसा काय विचार ॥ २ ॥

---

१ पं. सोडी.—२ पं. सांगा.—३ पं. भंडाई.

सारखी नाहीं अवघी वेळ । हें तों कळतें सकळ ।
तुकयाबंधु ह्मणे खळखळ । करावी ते उरेल[1] ॥ ३ ॥

॥ ३०१६ ॥

आतां हें न सुटे न चुके । बोल कां दवडिसी फिके ।
जन लोक पारिखें। अवघें केलें म्यां यासाटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नये सरतां नव्हे भलें । तुझें लक्षण कळलें ।
बैसलासी काढिलें । देहाचें मुळीं दिवाळें ॥ ध्रु ॥
दिसतोसी बरा बोल कोंवळे । गुण मैंदाचे चाळे ।
दिसताती ये वेळे । काय करूं विसंबोनि ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे देखतां । अंध बहिर ऐकतां ।
कैसें व्हावें आतां । इतकियाउपरी ॥ ३ ॥

॥ ३०१७ ॥

तिहीं ताळीं हेचि हाक । ह्मणती पांढरा स्फटिक ।
अवघा बुडविला लौकिक । सुखें चि भीके[2] लाविलीं ॥ १ ॥
थोंटा नांव शिरोमणी । नाहीं जोडा त्रिभुवनीं ।
ह्मणोनि शाहाणे ते कोणी । तुझे दारीं बैसतिना ॥ ध्रु ॥
निर्गुण निलाजिरा निनांवा । लंड झोंड कुडा देवा ।
नागवणा[3] या नांवा । वांचूनि दुजा नाइकों ॥ २ ॥
सर्वगुणें संपन्न । कळों आलासी संपूर्ण ।
तुकयाबंधु ह्मणे चरण । आतां जीवें न सोडीं ॥ ३ ॥

---

१ पं. उरे.–२ पं. भीक लागली.–३ दे. "नागविसी रूपनावा" असा या चरणावर नवीन पाठ घातला आहे.

॥ ३०१८ ॥

तो चि प्रसंग आला सहज। गुज धरितां नव्हे काज।
न संडितां लाज। पुढें वोज न दिसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तूं तर न होसी शाहाणा। नये सांगतों तें ही मना।
आपण आपणा। आतां प्रयत्न देखावा ॥ ध्रु ॥
न पुरवी पाहातां वाट। द्यावें प्रमाण[1] चोखट।
कास घालूनियां नीट। चौघाचार करावा ॥ २ ॥
आतां श्रमाचें कारण। नव्हे व्हावें उदासीन।
न पडे तयाविण। गांठी तुकयाबंधु ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३०१९ ॥

हळूहळू जाड। होत चालिलें लिगाड।
जाणवेल निवाड[2]। न करिसी परी पुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मी तों सांगून उतराई। जालों[3] आतां तुज काई।
कळों येईल भाई। तैसा करीं विचार ॥ ध्रु ॥
मागें युगें अठ्ठाविस। जालीं दिवसाचा दिवस।
मुदल व्याज कासावीस। होसी देवा ये कामें ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे राखें। आतां टाकीं तुझीं तीं सुखें।
जगजाहिर ठाउकें। जालें नाहीं खंडलेंसें ॥ ३ ॥

॥ ३०२० ॥

पत्र उचटिलें प्रेत्नें। ग्वाही कराया[4] कारणें।
नाहींतरी पुण्यें। तुझ्या काय उणें आह्मां ॥ १ ॥

---

१ पं. प्रमाणाचे खट.—२ पं. निवाडें.—३ पं. आलों.—४ पं. करावया.

॥ ध्रु. ॥ नांव तुझें चि करोनि । आहों सुखें पोट भरोनि ।
केली जाणवणी । ह्मणउनि नाहीं ह्मणसील ॥ ध्रु ॥
आतां इतकियाउपरी । दे नको भलतें करीं ।
ह्मणती ऋणकरी । आमुचा इतकें उंदंड ॥ २ ॥
तुकयाबंधु जागा । अळवावया पांडुरंगा ।
केला कांहीं मागायाची नव्हती गरज ॥ ३ ॥

॥ ३०२१ ॥

माझ्या भावें केली जोडी । न सरेसी कल्पकोडी ।
आणियेलें धाडी । घालुनि अवघें वैकुंठ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां न लगे यावें । जावें कोठें कांहीं च करावें ।
जन्मोजन्मीं खावें सुखें । बैसोनसें जालें ॥ ध्रु ॥
असंख्य संख्या नाहीं पार । आनंदें दाटलें अंबर ।
न माये अपार । त्रिभुवनीं सांटवितां ॥ २ ॥
अवघें भरलें सदोदित । जाले सुखाचे पर्वत ।
तुकयाबंधु ह्मणे परमार्थ । धन अद्भुत संपडलें ॥ ३ ॥

॥ ३०२२ ॥

आतां चुकलें देशावर । करणें अकरणें सर्वत्र ।
घरासी आगर । आला सकळसिद्धींचा[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जालों निधाई निधानें । लागलें अनंतगुणरत्न ।
जन्माचें विच्छिन्न । दुःख जालें दारिद्र[2] ॥ ध्रु ॥

---

१ पं. सिद्धांचा.—२ पं. दरिद्र.

तारूं सांगरिचें अवचितें । हेंदोवलें आलें येथें ।
ओढिलें संचितें । पूर्वदत्तें लाधलें ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे सीमा । नाहीं आमुचिया दैवा ।
आतां पुरुषोत्तमा । ऐसा सवदागर सांपडला ॥ ३ ॥

॥ ३०२३ ॥

सांपडलें जुनें । आमुच्या वडिलांचें ठेवणें ।
केली नारायणें कृपा । पुण्यें पूर्वीचिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखें आनंदरूप[2] आतां । आह्मी आहों याकारितां ।
निवारली चिंता । देणें घेणें चुकलें ॥ ध्रु ॥
जालें भांडवल घरिचें । अमुप नाम विठ्ठलाचें ।
सुकृत भावाचें हें । तयानें दाविलें[3] ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे फिटला । पांग नाहीं बोलायाला ।
चाड दुसरी विठ्ठला । वांचूनियां आणीक ॥ ३ ॥ ॥ ३७ ॥

॥ ३०२४ ॥

काम क्रोध अहंकार नको देहीं ।
आशा तृष्णा माया लज्जा चिंता कांहीं ।
वास पंढरीचा जन्म सदा देईं । आणीक दुजें मागणें तुज नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कृपा[4] देईं दान हरि मज कृपा देईं दान ।
नासीं त्रिमिर दाखवीं चरण । आर्त पुरवावें भेटी देऊन ।
नको उपेक्षूं आलिया शरण ॥ ध्रु ॥

---

१ पं. लागलें.—२ पं. आनंदरूपें.—३ पं. दाखविलें.—४ पं. "कृपा देईं दान" हे पहिले शब्द नसून "ये हरि मज कृपा देईं दान नाशीं त्रिमिर०" असें आहे.

नाम अखंड त्हदयीं राहो वाणी । न पडो विसर क्षण ज्यागृति स्वप्नीं ।
संतसमागम ऐसा दे लावुनि । आणीक दुजें कांहीं नेणें तुजवांचूनि ॥२॥
पंथपुरिंचा रविसुत पुरे आतां । आड करावा भवसिंधु ऐसा नव्हता ।
नाहीं आडताळा त्रैलोक्यामाजी सरता । विनवी तुकयाबंधु चरणीं ठेवूनि माथा
॥ ३ ॥

॥ ३०२५ ॥

तटाचे जातीला नाहीं भीड भार । लाता मारी थोर लाहान नेणे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परी त्या विशेष मनुष्य होऊनि । करी खंड मान वडिलांचा ॥ध्रु॥
बेरसा गाढव माय नो बहीण । भुंके चन्द्रीविण मलतें चि ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे बोकड मातलें । न विचारी आपुले तोंडीं मुते ॥ ३ ॥

॥ ३०२६ ॥

मायझवा खर गाढवाचें बीज । तें ऐसें सहज कळों येतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपमानिलें जेणें श्रेष्ठाचें वचन । ते चि त्याची खुण ओळखावी
॥ ध्रु ॥
मद्यपी तो पुरा अधम यातीचा । तया उपदेशाचा राग वांयां ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे पिसाळलें सुनें । आप परें तेणें न विचारावें ॥ ३ ॥

॥ ३०२७ ॥

मत्स्यकूर्मशेषा कोणाचा आधार । पृथिवीचा भार वाहावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय धाक आह्मां कासयाची चिंता । ऐसा तो असतां साहाकारी
॥ ध्रु ॥

---

१ दे. त. परी तो त्या विशेष मानुष होऊन.—२ पं. नाहीं.—३ पं. भलेचि.—४ पं. विचारितां.—५ पं. तें हें रासें (ऐसें ?).—६ दे. त. मद्यपीर पुरा.—७ पं. पृथ्वीचा.

शंखचक्रगदा आयुधें अपार । वागवितो भार भक्तांसाटीं ॥ २ ॥
पांडवां जोहरी राखिलें कुसरी । तो हा बंधुचा कैवारी तुकयाच्या ॥३॥

॥ ३०२८ ॥

राम ह्मणतां कामक्रोधांचें दहन । होय अभिमान देशधडी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ राम ह्मणतां कर्म तुटेल भवबंधन । नये श्रम सीण स्वप्नास[1] ही ॥ध्रु॥
राम ह्मणतां[2] जन्म नाहीं गर्भवास । नव्हे दारिद्रास पात्र कधीं ॥ २ ॥
राम ह्मणतां यम शरणागत बापुडें । आढळ पद पुढें काय तेथें ॥ ३ ॥
राम ह्मणतां धर्म घडतो[3] सकळ । तिमिरपडळ[4] नासे हेळा ॥ ४ ॥
राम ह्मणतां ह्मणे तुकयाचा बंधु । तरिजेल भवसिंधु संदेह नाहीं ॥ ५ ॥

॥ ३०२९ ॥

मरोनि जाईन गुणनामावरूनि । तुझ्या चक्रपाणी मायबापा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चुकविलीं दुःखें मायेचा वोळसा । तोडोनियां आशापाश तेणें ॥ध्रु॥
केली काया तनु हिंवसी शीतळ । चिंतातळमळ नाहीं ऐसी ॥ २ ॥
काळें तोंड काळ करूनि राहिलें । भूतमात्र जालें सज्जनसखें ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे अवघ्या दशदिशा[5] । मुक्त रे[6] परेशा तुझ्या पुण्यें ॥ ४ ॥

॥ ३०३० ॥

आतां मागतों तें ऐक नारायणा ।
भावपूर्वक मनापासूनियां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ असों दे मोकळी जिव्हा जरि गाइल गुण ।
नाहीं तरी खिळुन टाकीं परती ॥ ध्रु ॥

---

१ पं. स्वप्नामाजी.—२ दे. ह्मणे.—३ दे. घडतील.—४ दे. त. पं. त्रिमिर०.—५ दे. देशदिशा. त. अवघा देशदिशा.—६ पं. "रे" नाहीं.

मातेचिया परी देखती परनारी ।
ठेवीं नेत्र तरी नाहीं तरि[1] नको ॥ २ ॥
तरी बरें कांटाळा करिती निंदास्तुतीचा ।
नाहीं तरि कानांचा ही देख प्रेत्न ॥ ३ ॥
सकळ[2] इंद्रियांचा निग्रह करूनि एक ।
राखावीं[3] पृथक तोडोनि[4] भ्रम ॥ ४ ॥
तुकयाबंधु ह्मणे ते चि वाट प्राणां ।
पडतां नारायणा विसर तुझा ॥ ५ ॥

॥ ३०३१ ॥

नमस्कारी भूतें विसरोनि याती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परउपकारीं वेचियेल्या शक्ती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ ध्रु. ॥
द्वैताद्वैतभाव[5] नाहीं जया चित्तीं । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ २ ॥
जयाचिये वाचे नये निंदास्तुती । तेणें आत्मस्थिती जाणीतली ॥ ३ ॥
उचित अनुचित जाणे धर्मनीती । दृढ भाव भक्ति मानव तो ॥ ४ ॥
तुकयाबंधु ह्मणे वरकड ते येर । संसाराचे खर भारवाही ॥ ५ ॥

॥ ३०३२ ॥

चवदा भुवनें लोक तिन्हीं दाढे जो कवळी । संपुष्ट तो[6] संबळीमध्यें देखा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उत्पत्तिसंहारकरिता जो पाळण । तो नंदा[7] नंदन ह्मणवीतसे ॥ ध्रु. ॥
असुर तोडरी[8] दैत्यांचा काळ । जाला द्वारपाळ बळीचा तो ॥ २ ॥

---

१ पं. "तरि" नाहीं.—२ पं. सकळा.—३ दे. राखवीं.—४ पं. तोडोनियां ।.—५ दे. त. द्वयें द्वैतभाव.—६ त. "तो" नाहीं. ७ पं. नंदाचा.—८ त. पं. तोरडी.

लक्षुमीचा स्वामी क्षीराच्या सागरा । उच्छिष्टकवळा[1] पसरी मुख ॥ ३ ॥
तुकयाबंधु ह्मणे चतुरांचा राधो । भावें तो पाहा[2] हो केला वेडा ॥ ४ ॥

॥ ३०३३ ॥

कोण या पुरुषार्थाची गति । आणियेला हातोहातीं ।
जाहाज पृथ्वीपति । केलीं ख्याती अद्भुत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भला रे पुंडलिका भला । महिमा नव जाये वर्णिला ।
दगा देउनि अवघियांला । सांटविलें अविनाश ॥ ध्रु ॥
केलें एके घरीं केणें[3] । भरलीं सदोदित दुकानें ।
दुमदुमिलीं सुखानें । हे भाग्याची पंढरी[4] ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे किल्लया । संताचे हातीं दिल्या ।
आंगवेगळें आपुल्या । टाकुनि जाला महिमान[5] ॥ ३ ॥

॥ ३०३४ ॥

पाहा हो कलिचें महिमान । असत्यासी रिझलें जन ।
पापा देती अनुमोदन । करिती हेळण संतांचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें अधर्माचें बळ । लोक झकविले सकळ ।
केलें धर्माचें निर्मूळ । प्रळयकाळ आरंभला ॥ ध्रु ॥
थोर या युगाचें आश्चर्य । ब्रह्मकर्म उत्तम सार ।
सांडूनियां द्विजवर । दावलपीर स्मरताती ॥ २ ॥
ऐसे यथार्थाचे अनर्थ । जाला बुडाला परमार्थ ।
नाहीं जाली ऐसी नीत । हा हा भूत पातलें ॥ ३ ॥

---

१ पं. उच्छिष्ट कळवळा.—२ त. वो.—३ दे. "केलें" दोनवेळ आहे.—४ दे. त. पं. मेहेमान.—५ त. वाटोळें.

शांति क्षमा दया । भावभक्ति सत्क्रिया ।
ठाव नाहीं सांगावया । सत्त्वधैर्य[1] भंगिलें ॥ ४ ॥
राहिले वर्णाश्रमधर्म[2] । अन्योन्य विचरती कर्म ।
ह्मणविताँ रामराम । श्रम[3] महा मानिती ॥ ५ ॥
थेर भोरपाचे[4] विशीं । धांवती भूतें आमिषां[5] तैसीं ॥
कथा पुराण ह्मणतां सिसी । तिडीक उठी[6] नकऱ्याचे ॥ ६ ॥
विषयलोभासाटीं । सवार्थेसीं[7] प्राण साटी ।
परमार्थीं पीठ मुठी । मागतां उठती[8] सुनींसीं ॥ ७ ॥
धनाढ्य देखोनि अनामिक । तयातें मानिती[9] आवश्यक ।
अपमानिले वेदपाठक । सात्त्विक शास्त्रज्ञ संपन्न ॥ ८ ॥
पुत्र ते[10] पितियापाशीं । सेवा घेती सेवका ऐसी ।
सुनांचिया दासी । सासा जाल्या आंदण्या ॥ ९ ॥
खोटें जालें आली विवसी । केली मर्यादा नाहींसी ।
भार्या[11] भ्रतारेंसी । रंक तैसीं मानिती ॥ १० ॥
नमस्कारावया हरिदासां । लाजती[12] धरिती कांहीं गर्वसा ।
पोटासाटीं खौसा । वंदिती मलिंछाच्यां[13] ॥ ११ ॥
बहुत पाप जालें उचंबळ । उत्तम न ह्मणती चांडाळ ।
अभक्ष भक्षिती विटाळ । कोणी न धरी[14] कोणाचा ॥ १२ ॥
कैसें जालें नष्ट वर्तमान । एकादशीस खाती अन्न ।
विडे घेऊनि ब्राह्मण । अविंदवाणी वदताती ॥ १३ ॥

---

१ पं. सत्वधैर्या.—२ दे. त. वर्णावर्णधर्म.—३ पं. महाश्रम.—४ पं. भोरप्याचे.—५ दे. त. पं. आविसा.—६ पं. नरक्याचे.—७ पं. परमार्थेसी.—८ पं. उठी.—९ पं. मानिती.—१० पं. "ते" नाहीं.—११ दे. त. भ्रतारें तीं भार्यासी । रंक तैसें.—१२ पं. लाज धरिती०.—१३ पं. मिलिंदाच्या.—१४ पं. धरिती.

कामिनी विटंबिल्या कुळवंती । वदनें दासीचीं[1] चुंबिती ।
सोवळ्याच्या स्फीती[2] । जगीं मिरविती पवित्रता[3] ॥ १४ ॥
मद्यपानाची सुराणी । नवनीता न पुसे[4] कोणी ।
केळवती व्यभिचारिणी । दैन्यवाणी पतिव्रता ॥ १५ ॥
केवढी दोषाची सबळता । जाली[5] पाहा हो भगवंता ।
पुण्य धुडावोनी संता । तीर्थीं हरी आणिली ॥ १६ ॥
भेणें मंद जाल्या मेघवृष्टि । आकांतली कांपे सृष्टि ।
देव रिगाले कपाटीं । आटाआटी प्रवर्तली ॥ १७ ॥
अपीक धान्यें दिवसें दिवसें । गाई म्हैसी चेवल्या गोरसें ।
नगरें दिसती उध्वंसें[6] । पिकलीं बहुवसें[7] पाखांडें ॥ १८ ॥
होम[8] हरपलीं हवनें । यज्ञयाग अनुष्ठानें ।
जपतपादिसाधनें । आचरणें भ्रष्टलीं ॥ १९ ॥
अठरा यातींचे[9] व्यापार । करिती[10] तस्कराई विप्र ।
सांडोनियां शुद्ध शुभ्र । वस्त्रें निळीं पांघरती ॥ २० ॥
गीता लोपली गायत्री । भरले चमत्कार मंत्रीं ।
अश्वाचियापरी । कुमारी विकिती वेदवक्ते ॥ २१ ॥
वेदाध्ययनसंहितारुचि । भंकाद्या[10] करिती तयाची ।
आवडी पंडितांची । मुसाफावरी बैसली ॥ २२ ॥
मुख्य सर्वोत्तम साधनें । तीं उच्छेदुनि केलीं दीनें ।
कुडीं कापट्यें[11] महा मोहनें । मिरविताती दुर्जन ॥ २३ ॥

---

१ पं. दासीचीं प्रीती चुंबिती.—२ त. स्थिती.—३ पं. पवित्र.—४ त. पुसती.—५ पं. जाली.—६ पं. उद्वंस.—७ पं. वहुवस.—८ पं. यातीचा.—९ पं. करितात.—१० पं. काद्या.—११ दे. कापटें.

कळाकुशळता चतुराई । तर्कवादी भेद निंदेठायीं ।
विधिनिषेधाचा वाही । एक ही ऐसीं नाडलीं ॥ २४ ॥
जे[1] संन्यासी तापसी ब्रह्मचारी । होतां वैरागी दिगांबर निस्पृही वैराग्यकारी[2] ।
काम[3]क्रोधें व्यापिले भारी । इच्छा[4]करीं न सुटती ॥ २५ ॥
कैसें विनाशकाळाचें कौतुक । राजे जाले प्रजांचे अंतक ।
पिते पुत्र सहोदर । एकाएक[5] शत्रुघातें वर्त्तती ॥ २६ ॥
केवढी ये[6] रांडेची अंगवण । भ्रमविलें अवघें जन ।
याती अठरा चारही वर्ण । कर्दम करूनि विटाळले[7] ॥ २७ ॥
पूर्वीं होतें भविष्य केलें । संतीं तें यथार्थ जालें ।
ऐकत होतों तें देखिलें । प्रत्यक्ष लोचनीं ॥ २८ ॥
आतां असो हें आघवें । गति नव्हे कळीमध्यें वार्गवरावें[8] ।
देवासी भाकोनि करूणावें । वेगें स्मरावें अंतरीं ॥ २९ ॥
अगा ये वैकुंठनायका । काय पाहातोसि या कौतुका ।
धांव कलीनें गांजिलें लोकां । देतो हाका सेवक तुकयाचा ॥ ३० ॥

॥ ३०३५ ॥

केली हार्णाळां अंघोळी । येऊनि बैसलों राउळीं ॥ १ ॥
आजिचें जालें भोजन । राम कृष्ण नारायण ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे नास । नाहीं कल्पांती जयास ॥ ३ ॥ ॥ १२ ॥

॥ ३०३६ ॥

तुजलागीं माझा जिव जाला पिसा । अवलोकितों[10] दिशा पांडुरंगा ॥ १ ॥

---

१ पं. "जे" नाहीं.—२ पं. "वैराग्यकारी" नाहीं.—३ पं. कामक्रोध.—४ पं. इच्छेकरीं.—५ दे. एकएक (असें मागून केलें आहे).—६ पं. "ये" नाहीं.—७ पं. टाकिली.—८ पं. "वागवरावें" नाहीं.—९ पं. करुणा भाका वेगें.—१० पं. अवलोकितां.

॥ ध्रु: ॥ सांडिला व्यवहार[1] माया लोकाचार । छंद निरंतर हा चि मनीं ॥ ध्रु ॥
आइकिलें ज्ञानीं तें रूप लोचन[2] । देखावया सीण करिताति ॥ २ ॥
प्राण हा विकळ होय कासावीस । जीवनाविण मत्स्य तथापरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां कोण तो उपाव । करूं तुझे पाव आतुडे तो ॥ ४ ॥

॥ ३०३७ ॥

कोणे गांवीं आहे सांगा हा विठ्ठल । जरी ठावा असेल तुह्मां कोणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लागतसें पायां येतों लोटांगणीं । मात तरी कोणी सांगा याची[3] ॥ ध्रु ॥
गुण रूप याचे वाणिती[4] या संतां । मज क्षेम देतां सुख वाटे ॥ २ ॥
सर्वस्वें हा जीव ठेवीन चरणीं । पांडुरंग कोणी दावी मया ॥ ३ ॥
तुका ह्मणे गाईवत्सा तडातोडी[5] । तैसी जाते घडी एकी भज ॥ ४ ॥

॥ ३०३८ ॥

एकाचिये सोई कवित्वाचे[8] बांधे । बांधिलिया साधे[6] काय तेथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय हातीं लागे भुसाचे कांडणीं । सत्यासी दाटणी करूनि काय[7] ॥ ध्रु ॥
कवित्वाचे रूढी पायां पाडी[9] जग । सुखावोनि मग नरका जाय ॥ २ ॥
तुका ह्मणे देव केल्याविण साहे । फजिती ते[10] आहे लटिक्या अंगीं ॥ ३ ॥

॥ ३०३९ ॥

भल्याचें दर्शन[11] । तेथें शुभ चि वचन[12] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बोलावी हे धर्मनीत । क्षोभें होत नाहीं हित ॥ ध्रु ॥

---

१ दे. त. वेव्हार.—२ पं. लोचनीं.—३ पं. त्याची.—४ पं. वाणिता.—५ पं. ताडातोडी.—६ दे. त. साध्य.—७ पं. ठेवी.—८ पं. कवित्वाची.—९ पं. पडे.—१० दे. "ते" नाहीं. त. ती.—११ दे. त. पं. दरुषण.—१२ त. शकुन.

मर्यादा ते बरी । वेळ जागावी चतुरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु । लागे ऐसें बरें मऊ ॥ ३ ॥

॥ ३०४० ॥

आवडीनें धरिलीं नांवें । प्रियभावें चिंतन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेडा जाला वेडा जाला । लांचावला भक्तीसी ॥ ध्रु ॥
निचाडया[1] चाड धरी । तुळसी करीं दळ मागे ॥ २ ॥
धरिला मग न करी बळ । तुका ह्मणे कळ पायीं ॥ ३ ॥

॥ ३०४१ ॥

कंठीं राहो नाम । अंगीं भरोनियां प्रेम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें द्यावें कांहीं दान । आलों पतित शरण ॥ ध्रु ॥
संतांचिये पायीं । वेळोवेळां[2] ठेवीं डोई ॥ २ ॥
तुका ह्मणे तरें । भवसिंधु एकां[3] सरें ॥ ३ ॥

॥ ३०४२ ॥

विठ्ठल विठ्ठल येगें छंदें । ब्रह्मानंदें गर्जावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांये[4] टाळ टाळयाटाळी । होईल[5] होळी विघ्नांची ॥ ध्रु ॥
विठ्ठल आदि[6] अवसानीं । विठ्ठल मनीं स्मरावा[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे विठ्ठलवाणी । वदा कानीं आईका ॥ ३ ॥

॥ ३०४३ ॥

पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुंडलिका दिला[8] वर । करुणाकरें विठ्ठलें ॥ ध्रु ॥

---

१ पं निचाड हा.—२ पं. ठेवीं वेळावेळां.—३ पं. एकसरें.—४ पं. वाहे.—५ पं. होय.—६ दे. त. आंधे.—७ पं. धरावा.—८ पं. दिधला.

मूढ पापी जैसे तैसे । उतरी कासे लावूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे [1]स्वरें जालें । एका बोलें संतांच्या ॥ ३ ॥

॥ ३०४४ ॥

अमृताचीं फळें अमृ[2]ताची वेली । ते चि पुढें चाली बीजा[3]ची ही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसियांचा संग देई नारायणा । बोलावा वचना जयांचिया ॥ ध्रु ॥
उत्तम सेवन सितळ कंठासी । पुष्टी कांती तैसी दिसे वरी ॥ २ ॥
तुका ह्मणे तैसें होइजेत संगें । वास लागे अंगें चंदना[4]च्या ॥ ३ ॥

॥ ३०४५ ॥

पंढरीसी जा रे आलेनो संसारा । दीनाचा सोयरा पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाट पाहे उभा भेटीची आवडी । कृपाळू तांतडी उतावीळ ॥ ध्रु ॥
मागील परिहार पुढें नोव्हे[5] सीण । जालिया [6]दर्षण एकवेळा ॥ २ ॥
तुका ह्मणे नेदी आणिकांचे हातीं । बैसला तो चित्तीं निवडेना ॥ ३ ॥

॥ ३०४६ ॥

न कळे तें कळों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न दिसे तें दिसों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ ध्रु ॥
न बोलों तें बोलों येईल उगलें । नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ २ ॥
न भेटे तें भेटों येईल आपण । करितां चिंतन विठोबाचें ॥ ३ ॥
अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर ह्मणतां वाचे ॥ ४ ॥
तुका ह्मणे आसक्त जीवें[7] सर्वभावें । तरतील नांवें विठोबाच्या ॥ ५ ॥

---

१ त. गोवियेलें ।—२ पं. अमृत चि.—३. पं. निजाचिया ।—४ पं. चंदनाचा.—५ पं. नाहीं. दे. नेहे.—६ दे. दर्षणें.—७ त. जड जीव०.

॥ ३०४७ ॥

बहुजन्मीं केला लाग । तो हा भाग लाधलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जीव देइन हो बळी । करीन होळी संसारा ॥ ध्रु ॥
गेलें मग नये हाता । पुढती चिंता वाटतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे तांतड करूं । पाय धरूं बळकट ॥ ३ ॥

॥ ३०४८ ॥

भक्तिप्रेमसुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियांसी ॥ १ ॥
आत्मनिष्ठ जरी जाले जीवन्मुक्त । तरी भक्ति सुख दुर्लभ त्यां ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपा करिल नारायण । तरि च हें वर्म पडे ठावें ॥ ३ ॥

॥ ३०४९ ॥

दुधाळ गाढवीं जरी जाली पाहे । पावेल ते काय धेनुसरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कागाचिया गळा पुष्पाचिया माळा । हंसाची तो कळा काय जाणे ॥ ध्रु ॥
मर्कटें अंघोळी लावियेले टिळे । ब्राह्मणाचे लीळे वर्तूं नेणे ॥ २ ॥
जरी तो ब्राह्मण जाला कर्मभ्रष्ट । तुका ह्मणे श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥ ३ ॥

॥ ३०५० ॥

देव भक्तालागीं करूं बंदी संसार । अंगें वारावार करोनि ठेवी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाग्य द्यावें तरी अंगीं भेर ताठा ॥ ह्मणोनि करंटा करोनि ठेवी ॥ ध्रु ॥
स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा । यालागीं कर्कशा पाठी लावी ॥ २ ॥
तुका ह्मणे मजे प्रचित आली देखा । आणीक या लोकां काय सांगों ॥ ३ ॥

---

१ पं. बहुजन्म.—२ पं. पापातळीं.—३ पं. वाढत असे.—४ द. त. ठायीं.—५ पं. ते.—६ पं. लळे.—७ पं. करीतसे.—८ पं. करूनि ठेवी.—९ पं. साक्ष मज आली०.

॥ ३०५१ ॥

वाघें उपदेशिल्ला कोल्हा । सुखें खाऊं द्यावें[1] मला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतीं मरसी तें न चुके । मज ही[2] मारितोसी भुके ॥ ध्रु ॥
येरू ह्मणे भला भला । निवाड[3] तुझ्या तोंडें जाला ॥ २ ॥
देह तंव[4] जाणार । घडेल हो[5] उपकार ॥ ३ ॥
येरू ह्मणे मनीं । ऐसें जावें समजोनि ॥ ४ ॥
गांठी पडली ठका ठका । त्याचा[6] धर्म बोले तुका ॥ ५ ॥

॥ ३०५२ ॥

जेथें आठवती स्वामीचे ते पाय । उत्तम ते[7] ठाय रम्य स्थळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रान अथवा घर एकांत लोकांत । समाधान चित्त तें[8] ते घडी ॥ ध्रु ॥
धन्य तो हा काळ सरे आनंदरूप । वाहातां संकल्प गोविंदाचे ॥ २ ॥
तुका ह्मणे लाभकाळ तें[8] चि जीणें[9] । भाग्य नारायण उत्तम तें ॥ ३ ॥

॥ ३०५३ ॥

तुज न भें मी कळिकाळा । मज नामाचा जिव्हाळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझा बळिया नेगसी कोण । संतां साहे नारायण ॥ ध्रु ॥
शंख वधिला सागरीं । वेद घेउनि आला चारी ॥ २ ॥
कूर्म[10] दैत्य वधिला जेठी । हात पाय लपवी पोटी ॥ ३ ॥
वाराहरूप[11] धरिलें गाढें । धरा प्रतापें धरिली दाढे ॥ ४ ॥
हिरण्यकश्यप विदारिला । भक्त प्रल्हाद[12] रक्षिला ॥ ५ ॥

---

१ पं. देरे मला ।.—२ पं. कां.—३ पं. तुझ तोंडें निवाड जाला.—४ पं. तो.—५ पं. पर.—६ पं. त्याचें वर्म बोले.—७ पं. तो.—८ त. तो.—९ पं. जेणें.—१० पं. कूर्म.—११ पं वराहरूप.—१२ पं. प्रव्हाद.

वामन जाला दिनानाथ । बळी पाताळीं घातला दैत्य ॥ ६ ॥
छेदुनियां सहस्र भुजा । कामधेनु आणिली वोजा ॥ ७ ॥
शिळा प्रतापें सागरीं तारी । स्थापी बिभीषण रावण मारी ॥ ८ ॥
मारोनियां कंसराव । पिता सोडविला वसुदेव ॥ ९ ॥
पांचाळीसी गांजितां वैरी । वस्त्रें आपण जाला हरी ॥ १० ॥
गजेंद्र स्मरे राम राम । त्यासी पावविली वैकुंठधाम ॥ १२ ॥
तुका ह्मणे हरिरूप जाले । पुन्हा जन्मा नाहीं आले ॥ १२ ॥

॥ ३०५४ ॥

सर्वा[1] भूतीं द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारोन ।
उपतिष्ठे कारण । तेथें बीज पेरीजे[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुण्य करितां होय पाप । दुग्ध[3] पाजोनि पोशिला साप[4] ।
करोनि अघोरें[5] जप । दुःख विकत घेतलें ॥ ध्रु ॥
भूमी पाहातां नाहीं वेगळी । माळ बरड एक काळी ।
उत्तम निराळी । मध्यम कनिष्ठ ॥ २ ॥
ह्मणोनि विवेकें । कांहीं करणें[6] निकें ।
तुका ह्मणे फिकें । रुची नेदी मिष्टान्न ॥ ३ ॥

॥ ३०५५ ॥

देवावरी भार । वृत्ति अयाचित सार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देह देवाचे सांभाळी । सार योजे यथाकाळीं ॥ ध्रु ॥
विश्वासीं निर्धार । विस्तारील विश्वंभर ॥ २ ॥
तुका ह्मणे व्हावें । बळ एक चि जाणावें ॥ ३ ॥

---

१ पं. सर्वभूतीं०.— २ त. पेरावें.—३ पं. दुध.—४ त. सर्प.—५ पं. अघोराचा.—६ पं. करणें तें निकें

॥ ३०५६ ॥

वर्त्ततां बासर[1] । काय करावें शरीर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठेवा नेमून नेमून । माझें तुमचे पायीं मन ॥ ध्रु ॥
नेदाविया वृत्ती । कोठें फांकों चि श्रीपती ॥ २ ॥
तुका ह्मणे भले । जन्मा येऊनियां जाले[2] ॥ ३ ॥

॥ ३०५७ ॥

केली प्रतिज्ञा[3] मनाशीं । तईं[4] मी दासें सत्यत्वेशीं ।
नेईन[6] पायांपाशीं । स्वामी मूळ पंढरिये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तोंवरी हें भरीं पोट । केला तो मिथ्या बोभाट ।
नाहीं सांपडली वाट । सइराट फिरतसें ॥ ध्रु ॥
ज्यावें आदराचें जिणें[7] । स्वामी कृपा करी तेणें ।
पाळिल्या वचनें । सख्यत्वाचा अनुभव ॥ २ ॥
घडे तैसें घडो आतां । मायबापाची हे[8] सत्ता ।
तुका ह्मणे चिंता । काय पाहें मारगा[9] ॥ ३ ॥

॥ ३०५८ ॥

नेत्र झाकोनियां काय जपतोसी । जंवें[10] नाहीं मानसीं भावप्रेम[11] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उघडा मंत्र जाणा राम कृष्ण ह्मणा । तुटती यातना गर्भवास ॥ ध्रु ॥
मंत्र[12] यंत्र कांहीं करिसी जडी बुटी । तेणें भूतसृष्टी पावशील ॥ २ ॥
सार[13] तुका जपे बीजमंत्र एक । भवसिंधुतारक रामकृष्ण[14] ॥ ३ ॥

---

१ पं. बसर.—२ पं. ज्याले.—३ दे. त. प्रज्ञा.—४ पं. तरि.—५ दे. त. दान.—६ पं. नेईं-पाया०.—७ पं. ज्याणें.—८ दे. त. "हे" नाहीं.—९ पं. मारग.—१० पं. जरी.—११ पं. प्रेम-भाव.—१२ पं. मंत्र तंत्र संध्या करिसी०.—१३ पं. तुका ह्मणे ऐक सुंदर मंत्र एक ।.—१४ पं. रामनाम.

॥ ३०५९ ॥

संत मारगीं चालती । त्यांची लागो मज माती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करावीं साधनें । काय नव्हे एक तेणें ॥ ध्रु ॥
शेंष घेईन[1] उच्छिष्ट । धाय धणीवरी पोट ॥ २ ॥
तुका ह्मणे संतां पायीं । जीव ठेविला निश्चयीं ॥ ३ ॥

॥ ३०६० ॥

जैसें तैसें बाळ मातेसी आवडे । बोलतां बोबडे शब्द गोड ॥ १ ॥
आपुले आवडी लेववी खाववी । पाहोनियां जीवीं सुख वाटे ॥ २ ॥
तुका ह्मणे काय देऊं परिहार । काय तें साचार जाणतसें ॥ ३ ॥

॥ ३०६१ ॥

देवाचिया वस्त्रा स्वर्मीं ही नाठवी । स्त्रियेसी पाठवी उंच साडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गाईचें पाळण नये चि विचारा । अश्वासी खरारा करी अंगें ॥ ध्रु ॥
लेकराची रीस[2] स्वयें धांवे क्षाळूं । न ह्मणे प्रक्षाळूं द्विजपायां[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याच्या तोंडावरि थुंका । जातो यमलोका भोगावया ॥ ३ ॥

॥ ३०६२ ॥

उरा लावी उर आळंगितां कांता । संतासी भेटतां अंग चोरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अतीत देखोनि होय पाठमोरा । व्याह्यासी सामोरा जाय वेगीं ॥ ध्रु ॥
द्विजा नमस्कारा मनीं भाव कैचा । तुर्काचे दासीचा लेंक होय ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणीं ॥ ३ ॥

---

१ पं. सेवीन.—२ पं. गांड.—३ पं. द्विजपाय.

॥ ३०६३ ॥

ब्रह्मज्ञान जरी कळे उठाउठी । तरि कां हिंपुटी वेदशास्त्रें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शास्त्रांचें भांडण जप तीर्थाटण। उर्वीचें भ्रमण या च साटीं ॥ध्रु॥
याचसाटीं जप याचसाटीं तप । व्यासें ही अमुप ग्रंथ केले ॥ २ ॥
या च साटीं संतपाय हे सेवावे । तरि च तरावें तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३०६४ ॥

गायत्री विकोन पोट जे जाळिती । तया होय गति यमलोकीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कन्येचा जे नर करिती विक्रा । ते जाती अघोरा नरकपाता ॥ध्रु॥
नाम गाऊनियां द्रव्य जे मागती । नेणों तयां गति कैसी होय ॥ २ ॥
आमुचा सांगाती आहे तो श्रीहरि । न लगे दुराचारी तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३०६५ ॥

साधूच्या दर्शना लाजशी गव्हारा । वेश्येचिया घरा पुष्पें नेसी ॥ १ ॥
वेश्या दासी मुरळी जगाची वोंवळी । ते तुज सोंवळी वाटे कैशी ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां लाज धरीं बुच्या । टांचराच्या कुच्या मारा वेगीं ॥ ३ ॥

॥ ३०६६ ॥

राउळासी जातां त्रास मानी मोठा । बैसतो चोहोटां आदरेशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न करी स्नान संध्या ह्मणे रामराम। गुरुगुडीचे प्रेम अहर्निशीं ॥ ध्रु ॥
देवाब्राह्मणासी जाईना शरण । दासीचे चरण वंदी भावें ॥ २ ॥
सुगंध चंदन सांडोनियां माशी । बसे दुर्गंधीशीं अतिआदरें ॥ ३ ॥
तुका ह्मणे अरे ऐक भाग्यहीना । कां रे रामराणा विसरसी ॥ ४ ॥

---

१ दे. केलें.—२ दे. तीर्थाटणें.—३ पं. "कैसें होइल त्यांचें तेच हो जाणती । आह्मांसी संगति नलगे त्यांची. ॥" हें कडवें ज्यास्त आहे.—४ पं. पुष्प.—५ दे. त. वेणीं.—६ पं. नजाय —७ पं. दुर्गंधासीं अत्यादरें।—८ पं. विसरलासी.

॥ ३०६७ ॥

दुर्बुद्धि ते मना ! कदा नुपजो नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां[1] ऐसें करीं । तुझे पाय चित्तीं धरीं ॥ ध्रु ॥
उपजला भावो[2] । तुमचे[3] कृपे सिद्धी जावो ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । लाभ नाहीं या परता ॥ ३ ॥

॥ ३०६८ ॥

तरुवर बीजा पोटीं । बीज तरुवरा सेवटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें तुह्मां आह्मां जालें । एकीं एक सामावलें ॥ ध्रु ॥
उदकावरील तरंग । तरंग उदकाचें अंग ॥ २ ॥
तुका ह्मणे बिंबच्छाया । ठायीं पावली विलया ॥ ३ ॥

॥ ३०६९ ॥

साकरेच्या गोण्या बैलाचिये पाठी । तयासी सेवटीं करबाडें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मालाचे पैं पेटे वाहाताती उंटें । तयालागीं कांटे भक्षावया ॥ ध्रु ॥
वाउगा हा धंदा आशा वाढविती । बांधोनियां देती यमा हातीं ॥ २ ॥
ज्यासी असे लाभ तो चि जाणे गोडी । येरासीं बापुडीं सिणलीं वांयां ॥ ३ ॥
तुका ह्मणे शाहणा होई रे गव्हारा । चौऱ्यासीचा फेरा फिरों नको ॥ ४ ॥

॥ ३०७० ॥

चिरगुटें[4] घालूनि वाढविलें पोट । गव्हवार बोभाट जनामध्यें ॥ १ ॥
लटिके चि डोहळे दाखवी प्रकार । दुध स्तनीं पोर पोटीं नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे अंतीं वांज चि ते खरी । फजिती दुसरी जनामध्यें ॥ ३ ॥

---

१ पं. आतां मज ऐसें.—२ दे. भाव.—३ पं तुझे.—४ पं. चिरकुटें.

॥ ३०७१ ॥

माझी सर्व चिंता आहे विठोबासी । मी त्याच्या पायांसी न विसंभें[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विसरेना[2] रूप[3] क्षण एक चित्तीं । जिवलग मूर्ती सांवळी ते ॥ ध्रु ॥
विसरतां हरी क्षण एक घडी । अंतरली जोडी लक्षलाभ ॥ २ ॥
तुका ह्मणे माझ्या विठोबाचे पाये । संजीवनी आहे त्हदयामाजी ॥ ३ ॥

॥ ३०७२ ॥

काय तीं करावीं मोलाचीं माकडें । नाचतांती[4] पुढें संसाराच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ झाडा देतेवेळे विचकिती दांत । घेती यमदूत दंडवरी[5] ॥ ध्रु ॥
हात दांत कान हलविती मान । दाखविती[6] जन मानावया ॥ २ ॥
तुका ह्मणे किती जालीं हीं[7] फजित । मागें नाहीं नीत भारवाही ॥ ३ ॥

॥ ३०७३ ॥

थोर ती गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरि अंतर शुद्ध नाहीं ॥ ध्रु ॥
घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावेंविण तैसें पाठांतर ॥ २ ॥
तुका ह्मणे धरा निष्ठावंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो ॥ ३ ॥

॥ ३०७४ ॥

जाय जाय तूं पंढरी । होय होय वारकरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांडोनियां वाळवंट । काय इच्छिसी वैकुंठ ॥ ध्रु ॥
खांद्या पताकांचे भार । तुळसीमाळा आणि अबीर ॥ २ ॥
साधुसंतांच्या दाटणी । तुका जाय लोटांगणीं ॥ ३ ॥

---

१ पं०. पायांपाशीं न विसंबें.—२ दे. त. विसरतां.—३ पं. क्षणरूप एक चित्तीं ।.—४ त. नाचतील.—५ पं. दंडावरी.—६ पं. दाविती हे जन०.—७ त. तीं.

॥ ३०७५ ॥

जगीं ऐसा बाप व्हावा । ज्याचा वंश मुक्तिस जावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पोटा येतां हरलें पापा । ज्ञानदेवा मायबापा ॥ ध्रु ॥
मुळीं बाप होता ज्ञानी । तरी आह्मी लागलों ध्यानीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मी पोटींचें बाळ । माझी पुरवा ब्रह्मींची आळ ॥ ३ ॥

॥ ३०७६ ॥

संतांच्या हेळणे बाटलें जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड चर्मकाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भेसळीचें वीर्य ऐशा अनुभवें । आपुलें परावें नाहीं खळा ॥ ध्रु ॥
संतांचा जो[1] शोध करितो धांडोळ । धरावा विठाळ बहु त्याचा ॥ २ ॥
तुका ह्मणे केली प्रज्ञा[2] या च साटीं । कांहीं माझे पोटीं शंका नाहीं ॥ ३ ॥

॥ ३०७७ ॥

बहु टाळाटाळी । होतां[3] भोवताहे कळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरें नव्हेल सेवटीं । भय असों द्यावें पोटीं ॥ ध्रु ॥
मुरंगाळी[4] कान । घुसमांडील[5] सावधान ॥ २ ॥
अबोलणा तुका । ऐसें कोणी[6] लेखूं नका ॥ ३ ॥

॥ ३०७८ ॥

जिव्हे जाला चळ । नेघे अवसान ते[7] पळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें चि वोसनायोनी[8] उठी । देवें सांटविला पोटीं ॥ ध्रु ॥
नाहीं ओढा वारा । पडिला प्रसंग तो बरा ॥ २ ॥
तुका ह्मणे जाली । मज हे[10] अनावर बोली ॥ ३ ॥

---

१ पं. शोध जो.—२ पं. प्रतिज्ञा यासाटीं.—३ पं. होते भोवत हे०.—४ पं. मुरगाळितां.—५ दे. घुसमाडील.—६ पं. कांहीं बोलूं नका ।.—७ त. पं. "ते" नाहीं.—८ पं. वासणाउनि.—९ पं. विठ्ठल.—१० पं. अनावर हे.

॥ ३०७९ ॥

गोहो यावा गांवा । ऐसे नवस करी आवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैंचें[1] पुण्य तयां गांठी । व्रतें[2] वेची लोभासाटीं ॥ ध्रु. ॥
वाढावें संतान । गृहीं[3] व्हावें धनधान्य ॥ २ ॥
मागे गारगोटी । परिसाचीये साटीवाटी ॥ ३ ॥
तुका ह्मणे मोल । देउन घेतला सोमवळ[4] ॥ ४ ॥

॥ ३०८० ॥

बाळपणें ऐसीं वरुषें गेलीं बारा । खेळतां या[5] पोरा नानामतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विटू दांडू चेंडू लगोऱ्या[6] वाघोडीं[7] । चंपे पेंड खेडी एकीबेकी ॥ ध्रु. ॥
हमामा हुंबरी पकट्याच्या बारे । खेळे जंगीभोंवरे चुंबाचुंबी ॥ २ ॥
सेलडेरा आणि निसरभोंवडी । उचली बाले धोंडी अंगबळें ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसें बाळपण गेलें । मग तारुण्य आलें गर्वमूळ ॥ ४ ॥

॥ ३०८१ ॥

तारुण्याच्या मदें न मनी कोणासी । सदा मुसमुसी घुळी[8] जैसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अठोनी[9] वेठोनी बांधला मुंडासा । फिरतसे ह्मैसा जनामधीं ॥ ध्रु. ॥
हातीं दीडपान वरती चें मान । नाहीं तो सन्मान भलियांसी ॥ २ ॥
श्वानाचिया परी हिंडे दारोदारीं[10] । पाहे परनारी पापदृष्टी ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसा[11] थोर हा गयाळी । करितां टवाळी जन्म गेला ॥ ४ ॥

॥ ३०८२ ॥

ह्मातारपणीं थेटे पडसें खोकला । हात[12] कपाळाला लावुनि बैसे ॥ १ ॥

---

१ पं. तिचे.—२ पं. व्रत.—३ दे. त. पं. ग्रहीं.—४ पं. सोमोल. (दोन्हीरूपें "सोमल" यावद्दल असावीं).—५ पं. वाघोऱ्या.—६ पं. घडी.—७ दे. त. खूळ.—८ दे. अंठोनी वेंठोनीं. पं. आटोनी वेटोनी.—९ पं. करी.—१० पं. दारोदार । पाहे परनार०.—११ पं. ऐसी थोर ह्माण झाली.—१२ त. हात हा कपाळा लावुनि बैसे ।.

॥ ध्रु. ॥ खोबरियाची वाटी जालें असे मुख । गळतसे नाक श्लेष्मपुरी ॥ध्रु॥
बोलों जातां शब्द नये चि हा नीट । गडगडी कंठ कफ भारी ॥ २ ॥
सेजारी ह्मणती मेरेना कां मेला । आगिला कांटाळा येणें आह्मां ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां सांडुनी[1] सर्वकाम । स्मरा राम राम क्षणक्षणा ॥ ४ ॥

॥ ३०८३ ॥

जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळां ॥ ध्रु ॥
तटावृषभासी दाणा । तृण मागों नये जाणा ॥ २ ॥
तुका ह्मणे द्रव्य घेती । देती[2] ते ही नरका जाती ॥ ३ ॥

॥ ३०८४ ॥

लंकेमाजी घरें किती तीं आइका । सांगतसें संख्या जैसीतैसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांच लक्ष घरें पाषाणांचीं जेथें । सात लक्ष तेथें विटेबंदी ॥ ध्रु ॥
कोटि घरें जेथें कांशा आणि तांब्याचीं । शुद्ध कांचनाचीं सप्त कोटी ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्याची संपदा एवढी । सांगातें कवडी गेली नाहीं ॥ ३ ॥

॥ ३०८५ ॥

व्यभिचारिणी गणिका कुंटणी । विश्वास चि मनीं राघोबाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी ही पापिणी वाहिली[2] विमानी । अचळ भुवनीं ठेवियेली ॥ध्रु॥
पतितपावन तिहीं लोकीं ठसा । कृपाळू कोंवसा अनाथांचा ॥ २ ॥
तुका ह्मणे विठोबाची धरा सोय । आणिक उपाय नेणों किती ॥ ३ ॥

॥ ३०८६ ॥

गजेंद्र तो हस्ती सहस्र[3] वरुषें । जळामाजी नक्रें पीडिलासे ॥ १ ॥

---

१ पं. सांडुनियां काम.—२ दे. वाइली.—३ त. वरुषें सहस्र.

॥ ध्रु. ॥ सुहृदीं[1] सांडिलें कोणी नाहीं साहे । अंतीं वाट पाहे विठो तुझी ॥ ध्रु ॥
कृपेच्या सागरा माझ्या नारायणा । तया दोघांजणा तारियेलें ॥ २ ॥
तुका ह्मणे नेले वाऊनि विमानी । मी ही आईकोनी विश्वासलों ॥३॥

॥ ३०८७ ॥

ब्रह्मयाचे वेद शंखासुरें नेले । त्यासाटीं धरिलें मत्स्यरूप ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेणें आत्मा नव्हता नेला ब्रह्मांडासी । काय ब्रह्मयासी नव्हतें ज्ञान ॥ ध्रु ॥
परि तेणें धावा केला आवडीनें । जाले नारायण कृपासिंधु ॥ २ ॥
तुका ह्मणे विठोबा मी नामधारक । पोसनें[2] सेवक भेटी देई ॥ ३ ॥

॥ ३०८८ ॥

देवीं आणि दैतीं सिंधू गुसळिला । भार पृथ्वीस[3] जाला साहावेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जालासी कासव धरिली पाठीवरी । चिंता तुज हरी सकळांची ॥ ध्रु ॥
नये काळीं[4] देव करिताती स्तुती । कृपाळु श्रीपती ह्मणोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे उदंड पवाडे । ज्यासी सहस्र तोंडें सिणला तो ही ॥३॥

॥ ३०८९ ॥

हिरण्याक्ष दैत्य मातला जे काळीं । वरदानें बळी शंकराच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ इंद्रपदराज्य घेतलें हिरोनी । देवा चक्रपाणी ह्मणती धांवें[5] ॥ ध्रु ॥
तदं पांडुरंगा शूकर जालेती । तया दैत्यपती मारियेलें[6] ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्यांचीं राज्यें त्यांसी दिलीं । ऐसी तूं माउली पांडुरंगा ॥३॥

---

१ दे. त. सुहृदीं.—२ पं. पोसणें.—३ गं. "पृथ्वीस जाला" पावद्दल "पृथ्वीला".—४ त. वेळीं.—५ पं. धांवा.—६ त. दे. मारविले.

॥ ३०९० ॥

प्रल्हादाकारणें नरसिंह[1] जालासी । त्याचिया बोलासी सत्य केलें ॥१॥
॥ ध्रु. ॥ राम कृष्ण गोविंदे[2] नारायण हरि । गर्जे राजद्वारीं भक्तराज ॥ ध्रु ॥
विठ्ठल माधव मुकुंद केशव । तेणें दैत्यराव दचकला[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे तयां कारणें सगुण । भक्तांचें[4] वचन सत्य केलें ॥ ३ ॥

॥ ३०९१ ॥

नामाचें सामर्थ्य कां रे दवडीसी । कां[5] रे विसरसी पवाडे हे ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ खणखणां हाणती खेगें[6] प्रल्हादासी । न रुपे आंगासी किंचित ही ॥ध्रु॥
राम कृष्ण हरी ऐसी मारी ह्याक । तेणें पडे धाक बळियासी ॥ २ ॥
असों द्यावीं[7] सामर्थ्यें ऐसिया कीर्तीचीं । आवडी तुक्याची भेटी देई ॥ ३ ॥

॥ ३०९२ ॥

वाटीभर विष दिलें प्रल्हादासी । निर्भय[8] मानसीं तुझ्याबळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भोक्ता नारायण केलें तें प्राशन । प्रतापें[9] जीवन जालें तुझ्या ॥ध्रु॥
नामाच्या चिंतनें विषाचें तें आप । जाहालें देखत नारायणा ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे तुझे बडिवार । सिणला फणीवर वर्णवेना ॥ ३ ॥

॥ ३०९३ ॥

अग्निकुंडामाजी घातला प्रल्हाद । तरी तो गोविंद विसरेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पितियासी ह्मणे व्यापक श्रीहरि । नांदतो मुरारी सर्वां ठायीं ॥ध्रु॥
अग्निरूपें माझा सखा नारायण । प्रल्हाद गर्जून हाक मारी ॥ २ ॥
तुका ह्मणे अग्नि जाहाला शीतळ । प्रताप सबळ[10] विठो तुझा ॥ ३ ॥

---

१ दे. नरसिंहीं.—२ दे. त. गोविंदा नारायणा०.—३ पं. दचके 'मनीं.—४ पं. काय विसरलासी०.—५ दे. खर्ग.—६ पं. द्या.—७ त. पं. निर्भर.—८ दे.० मध्यें.—९ पं. प्रतापें सबळ विठो तुझ्या.—१० त. सकळ.

॥ ३०९४ ॥

कोपोनियां पिता बोले[1] प्रल्हादासी । सांग त्वद्वीकेशी कोठें आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येरू ह्मणे काष्ठीं पाषाणीं सकळीं । आहे वनमाळी जेथें तेथें ॥ ध्रु ॥
खांबावरी लात मारिली दुर्जनें । खांबीं नारायण ह्मणतां चि ॥ २ ॥
तुका ह्मणे कैसा[2] खांब कडाडिला । ब्रह्मा दचकला सत्यलोकीं ॥ ३ ॥

॥ ३०९५ ॥

डळमळिला मेरु आणि तो मांदार । पाताळीं फणिवर डोई झाडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लोपे तेजें सूर्य आणीक हो[3] चंद्र । कांपतसे इंद्र थरथरां ॥ ध्रु ॥
ऐसें रूप उग्र हरीनें धरिलें । दैत्या मारियेलें[4] मांडीवरी ॥ २ ॥
तुका ह्मणे भक्तांकारणें श्रीहरि । बहु दुराचारी निर्दाळिले ॥ ३ ॥

॥ ३०९६ ॥

बहुत कृपाळु दीनाचा दयाळु । जगीं भक्तवत्सळु नाम तुझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मानियेला चित्तीं बळीचा उपकार । अझूनि त्याचें द्वारें[5] राखसील ॥ ध्रु ॥
काय त्याच्या भेणें बैसलासी[6] द्वारीं । नाहीं तुज हरि कृपा बहु ॥ २ ॥
तुका ह्मणे भक्तजनाची ममता । तुह्मांसी अनंता अलोलिक ॥ ३ ॥

॥ ३०९७ ॥

पांडुरंगा तुझे काय वाणूं गुण । पवाडे हे धन्य जगीं तुझे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दंडिलें दुर्वासा सुरा असुरानें । तो आला[7] गाऱ्हाणें सांगावया ॥ ध्रु ॥
बळिचिये द्वारीं तुह्मी बैसलेती[6] । दुर्वास विनंती करी भावें ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपासागरा श्रीहरी । तुझी भक्तावरी प्रेमच्छाया ॥ ३ ॥

---

१ पं. पुसे.—२ पं. ऐसा.—३ त. तो.—४ पं. मर्दियेले.—५ पं. दार.—६ पं. बैसलेती.—७ पं. आला तो.

॥ ३०९८ ॥

दुर्वासया[1] स्वामी गुंतलों भाकेसी । पुसा जा बळीसी निरोप द्यावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचे आज्ञेविण आह्मां येतां नये । द्वारपाळ राहें होऊनियां ॥ ध्रु. ॥
पुसे दुर्वासया बळीसी जाऊनि । येरू ह्मणे झणी बोलों नका ॥ २ ॥
तुका ह्मणे केला अन्यत्राचा त्याग । तेव्हां पांडुरंग सखा जाला ॥ ३ ॥

॥ ३०९९ ॥

बळी ह्मणे आजि दुर्वासया स्वामी । मागों नका तुह्मी नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहुतां प्रयासीं[2] जोडला श्रीहरी । बैसविला द्वारीं राखावया ॥ ध्रु. ॥
परतला दुर्वास मग हो तेथूनि । चिंतातुर मनीं उद्वेगला ॥ २ ॥
काय तूं एकाचा आहेसी अंकित । होई कृपावंत तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३१०० ॥

त्रैलोकींचा[3] नाथ सकळांचा आधार । बळिचें तुवां[4] घर धरियेलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मां मोकलिलें कोणां निरविलें । कोणा हातीं दिले तिन्ही लोक ॥ ध्रु. ॥
अनाथांचा बंधु दासांचा कैवारी । ब्रिदें तुझीं हरी जाती वांयां ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें[5] बोलिला दुर्वास । वाटला संतोष पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३१०१ ॥

बोलिलें[6] ते देवऋषी दुर्वासया । जाय पुसावया मागत्यानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागुता दुर्वास पुसे बळिराया । निरोप जावया देई देवा ॥ ध्रु. ॥
बळी ह्मणे त्यासी जाय मी न ह्मणें । जाईल नारायण लागला ची ॥ २ ॥
मजपाशीं राहें कोठें तरीं जाय । तुका ह्मणे पाय न सोडीं मी ॥ ३ ॥

---

१ "दुर्वास्या" या संबोधनरूपाबद्दल.—२ त. प्रवासीं.—३ पं. त्रैलोक्याचा.—४ पं. त्वां द्वार.—५ पं. ऐसा.—६ त. दे. "बोलिले ते" याबद्दल "बोलिले ती."

॥ ३१०२ ॥

दुर्वासें निरोप आणिला ये रिती । मग वाढलेसी नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठेविलें चरण बळिचिये द्वारीं । शीर अंगावरी लांबविलें ॥ ध्रु ॥
पाडियेलें द्वार द्वारावतियेसी । वरि ह्रृषीकेशी निघालेती ॥ २ ॥
तेथूनियां नाम पडिलें द्वारका । वैकुंठनायका तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३१०३ ॥

मुरुकुंश दोन्ही मारिले आसुर । दुर्वास ऋषीश्वर सुखी केला ॥ १ ॥
॥ध्रु.॥मारियेला मुरु ह्मणोनी मुरारी । नाम तुझें हरी पडियेलें॥ ध्रु ॥
पूर्वीहुनी ऐसा भक्तिप्रतिपाळ । केला त्वां सांभाळ नारायणा ॥ २ ॥
तुका ह्मणे ये चि वेळे काय जालें । कां सोंग धरिलें मोहनाचें ॥ ३ ॥

॥ ३१०४ ॥

गुरुपादाग्रींचें जळ । त्यास मानी जो विटाळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संतीं वाळिला जो खळ । नरकीं पचे चिरकाळ ॥ ध्रु ॥
गुरुतीर्थीं अनमान । यथासांग मद्यपान ॥ २ ॥
गुरुअंगुष्टा न चोखी । मुख घाली वेश्येमुखीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे सांगों किती । मुखीं पडो त्याचे माती ॥ ४ ॥

॥ ३१०५ ॥

वाढविलें कांगा । तुह्मी एवढें पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कार्य होती मज चाड । एवढी करावया बडबड ॥ ध्रु ॥
ब्रह्मसंतर्पण । लोकीं करावें कीर्तन ॥ २ ॥
निमित्याचा धणी । तुका ह्मणे नेणे कोणी ॥ ३ ॥

॥ ३१०६ ॥

साही शास्त्रां अतिदुरी तो परमात्मा श्रीहरि ।
तो दशरथाचे घरीं क्रीडतो राम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शिवाचें निजध्येय[1] वाल्मीकाचें निजगुह्य ।
तो भिल्लटीचीं फळें खाय श्रीराम तो ॥ ध्रु ॥
योगियांचे मनीं नातुडे चिंतनीं ।
तो[2] वानरांचे कानीं गोष्टी सांगे ॥ २ ॥
चरणीं शिळा उद्धरी नामें गणिका तारी ।
तो कोळियाचा[3] घरीं पाहुणा राम ॥ ३ ॥
क्षण एक सुरवरा नातुडे नमस्कारा ।
तो रिसा आणि वानरा क्षेम[4] दे राम ॥ ४ ॥
राम सांवळा सगुण राम योगियाचें ध्यान ।
राम राजीवलोचन तुका चरण वंदितो ॥ ५ ॥

॥ ३१०७ ॥

विठ्ठल माझा जीव विठ्ठल माझा भाव । कुळधर्म देव विठ्ठल माझा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठल माझा गुरु विठ्ठल माझा तारू । उतरील पारु भवनदीचा ॥ ध्रु ॥
विठ्ठल माझी माता विठ्ठल माझा पिता । विठ्ठल चुलता बहिणी बंधु ॥ २ ॥
विठ्ठल हे जन विठ्ठल माझें मन । सोयरा सज्जन विठ्ठल माझा ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा विठ्ठल विसावा । नैश्वरित[5] गांवा जाइन त्याच्या ॥ ४ ॥

---

१ दे. निजदेह वाल्मीकाचें निजगुहे.—२ दे. त. "तो" नाहीं.—३ पं. कोळियाचें.—४ दे. त. क्षम.—५ पं. नसंवरित.

॥ ३१०८ ॥

न मनावी चिंता । कांहीं माझेविशीं आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्याणें लौकिक हा केला । तो हें निवारिता भला ॥ ध्रु ॥
माझे इच्छे काय । होणार[1] ते एक ठाय ॥ २ ॥
सुखा आणि दुःखा । ह्मणे वेगळा मी तुका ॥ ३ ॥

॥ ३१०९ ॥

माझा पाहा अनुभव । केला देव आपुला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बोलविलें तें चि द्यावें । उत्तर व्हावें ते काळीं ॥ ध्रु ॥
सोडिलिया जग निंद्य । मग गोविंद ह्मणियारा ॥ २ ॥
तुका ह्मणे धीर केला । तेणें याला गोविलें ॥ ३ ॥

॥ ३११० ॥

जिंकावा संसार । येणें[2] नांवें तरी शूर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येरें काय तीं बापुडीं । कीर अहंकाराचीं घोडीं ॥ ध्रु ॥
पण ऐशा नांवें । देव धरिजेतो भावें ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्यावें । सत्य कीर्तीनें वरवें ॥ ३ ॥

॥ ३१११ ॥

सरे ऐसें ज्याचें दान । त्याचे कोण उपकार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नको वाढूं ऐसें काचें । दे[3] वो साच विठ्ठला ॥ ध्रु ॥
रडत मागें सांडी पोर । ते काय थोर माउली ॥ २ ॥
तुका ह्मणे कीर्ति वाढे । धर्म गाढे ते[4] ऐसे ॥ ३ ॥

---

१ पं. जाणार.—२ पं. तेणें.—३ पं. देई वो सांच विठ्ठले ।.—४ पं. ऐसे ते.

॥ ३११२ ॥

तुटे, मायाजाळ विघडे भवसिंधू । जरि लागे छंदु[1] हरिनामें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येर कर्म धर्म करितां ये कळी । मोजी[2] तरला बळी कोण सांग ॥ ध्रु ॥
न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध । नामाचें प्रबंध पाठ करा ॥ २ ॥
न साधवे योग न करवे वैराग्य । साधा भक्तिभाग्य संतसंगें ॥ ३ ॥
नव्हे अनुष्ठान न कळे ब्रह्मज्ञान । करावी सोपान कृष्णकथा ॥ ४ ॥
तुका ह्मणे वर्म दाविलें संतीं । यापरती विश्रांति आणिक नाहीं ॥ ५ ॥

॥ ३११३ ॥

लोभावरी ठेवुनि हेत । करी[3] असत्य न्याय नीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याच्या पूर्वजां पतन । नरकीं किडे होती जाण ॥ ध्रु ॥
कोटिगोहत्यापातक । त्यासी घडेलें[4] निष्टंक ॥ २ ॥
मासां श्रवे[5] जे सुंदरा । पाजी विटाळ पितरां ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसियासी । यम गांजील सायासी ॥ ४ ॥

॥ ३११४ ॥

देह जाईल जाईल । यासी काळ बा खाईल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे नुमजसी दगडा । कैचे हत्ती घोडे वाडा ॥ ध्रु ॥
लोडें बालिस्तें सुपती । जरा आलिया फजिती ॥ २ ॥
शरीरसंबंधाचें नातें । भोरड्या बुडविती सेतातें[6] ॥ ३ ॥
अझुनि तरी होई जागा । तुका ह्मणे पुढें दगा ॥ ४ ॥

---

१ दे. सिंधु. (दोन वेळ).—२ त. माजी कोण वळी तरला सांगा ।—३ पं. त. असत्य करी.—४ पं. घडलें.—५ पं. सवे.—६ पं. सेत.

॥ ३११५ ॥

मागें बहुतां जनां राखिलें आडणी । धांवसी निर्वाणी नाम घेतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें ठावें जालें मज बरव्या परी । ह्मणऊनि करीं धांवा तुझा ॥ ध्रु ॥
माझेविशीं तुज पडिला विसरु । आतां काय करूं पांडुरंगा ॥ २ ॥
अझुनि कां नये तुह्मासी करुणा । दुरि नारायणा धरिलें मज ॥ ३ ॥
तुका ह्मणे जीव[1] जाऊं पाहे माझा । आतां केशीराजा घालीं उडी ॥ ४ ॥

॥ ३११६ ॥

कळलें माझा तुज नव्हे रे आठव । काय काज जीव ठेवूं आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तूं काय करिसी माझिया संचितां । धिग हे अनंता जालें जिणें ॥ ध्रु ॥
पतितपावन राहिलों या[2] आशा । आइकोनि ठसा कीर्ती तुझी ॥ २ ॥
आतां कोण करी माझा अंगीकार । कळलें निष्ठुर जालासी तूं ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी मांडिली निरास । करितों जीवा नास तुजसाटीं ॥ ४ ॥

॥ ३११७ ॥

तरि कां मागें वांयां कीर्ती वाढविली । जनांत आपुली ब्रिदावळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साच करितां आतां फिरसी माघारा । ठायींचें दातारा नेणवे चि ॥ ध्रु ॥
संतांसी श्रीमुख कैसें दाखविसी । पुढें मात त्यांसी सांगईन ॥ २ ॥
घईन डांगोरा तुझिया नामाचा । नव्हे अनाथांचा नाथ ऐसा ॥ ३ ॥
तुका ह्मणे आंधीं[3] राहिलों मरोनि । तूं कां होसी धनी निमित्याचा ॥ ४ ॥

॥ ३११८ ॥

आह्मी तुझ्या दासीं । जरि जावें पतनासी[4] ॥ १ ॥

---

१ पं. जाऊं पाहे प्राण माझा.—२ पं. हे.—३ पं. आह्मी.—४ त. नरकासी.

॥ ध्रु. ॥ तरि हें दिसे विपरीत । कोठें बोलिली हे नीत ॥ ध्रु ॥
तुझें नाम कंठीं । आह्मां संसार आटी ॥ २ ॥
तुका ह्मणे काळ । करी आह्मांसी विटाळ ॥ ३ ॥

॥ ३१९९ ॥

लाजती पुराणें । वेदां येऊं पाहे उणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मी नामाचे धारक । किंविलवाणीं दिसों रंक ॥ ध्रु ॥
बोलिले ते संतीं । बोल वांझांविण जाती ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । रोकडी हे मोडे सेवा ॥ ३ ॥

॥ ३१२० ॥

आहारनिद्रे न लगे आदर । आपण सादर ते चि होय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परिमितीविणें[1] बोलणें तें वांयां । फार थोडें[2] काया पिंड पीडी ॥ ध्रु ॥
समाधान त्याचें तो चि एक जाणे । आपुलिये खुणे पावोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे होय पीडा ते न करीं । मग राहें परी भलतिये ॥ ३ ॥

॥ ३१२१ ॥

भूमि अवघी शुद्ध जाणा । अमंगळ हे वासना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसे वोसपले जीव । सांडी नसतां अंगीं घाव ॥ ध्रु ॥
जीव अवघे देव । खोटा नागवी संदेह ॥ २ ॥
तुका ह्मणे शुद्ध । मग तुटलिया भेद ॥ ३ ॥

॥ ३१२२ ॥

सरतें[3] माझें तुझें । तरि हें उतरतें ओझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे सांडावें मांडावें । आहे शुद्ध चि स्वभावें ॥ ध्रु ॥

---

१ दे. त. परमिते विण.—२ पं. थोर काया पिडापीडी.—३ त. सरे.

घातला तो आशा । मोहोजाळें गळां फासा ॥ २ ॥
सुखाचा[1] तो मान । नाहीं दुःखाचा तो शीण ॥ ३ ॥
करितां नारायण । एवढें वेचितां वचन ॥ ४ ॥
लाभ हानि हे[2] समान । तैसा मान अपमान ॥ ५ ॥
तुका ह्मणे याचें । नांव सोंवळें साचें[3] ॥ ६ ॥

॥ ३१२३ ॥

तुज करितां होती ऐसे । मूढ चतुर पंडित पिसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि[4] वर्म नेणे तें कोणी । पीडाखाणी भोगितील ॥ ध्रु ॥
उलंघितें पांगुळ गिरी । मुकें करी अनुवाद ॥ २ ॥
पापी होय[5] पुण्यवंत । न करी घात दुर्जन ॥ ३ ॥
अवघें हेळामात्रें हरि[6] । मुक्त करी ब्रह्मांड ॥ ४ ॥
तुका ह्मणे खेळे[7] लीळा । पाहे वेगळा व्यापूनि ॥ ५ ॥

॥ ३१२४ ॥

पिकवावें धन । ज्याची आस करी जन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुरोनि उरे खातां देतां । नव्हे खंडन मवितां ॥ ध्रु ॥
खोलीं पडे ओली बीज । तरीं च होता[8] लागे निज ॥ २ ॥
तुका ह्मणे धणी । विठ्ठल अक्षरें या तिन्ही ॥ ३ ॥

॥ ३१२५ ॥

करिसी लाघवें । तूं हें खेळसी आघवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अहंकार[9] आड । आह्मां जगासी हा नाड ॥ ध्रु ॥

---

१ दे. सुखदुःखाचा.—२ पं. हा.—३ पं. तयाचें.—४ पं. परि हें वर्म नेणती कोण ।.—५ पं. होती.—६ पं. तारी.—७ त. "खेळे" नाहीं.—८ पं. हातीं.—९ पं. केला अहंकार०.

येथें[1] भुतें यावें । दावूं लपों ही जाणावें ॥ २ ॥
तुका ह्मणे हो श्रीपती । आतां चाळवाल क्रिती ॥ ३ ॥

॥ ३१२६ ॥

घालिती पठ्हया । वाटे अनाथांच्या[2] दया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें कां[3] हें नये करूं । पांडुरंगा आह्मां तारूं ॥ ध्रु ॥
रोगियासी काढा । देउनि वारितील[4] पीडा ॥ २ ॥
बुडत्यासाटीं उडी । घालितील[5] कां हे जोडी ॥ ३ ॥
सारितील[6] कांटे । पुढें मागिलांचे वाटे ॥ ४ ॥
तुका ह्मणे भार । घेती भागल्यांचा फार ॥ ५ ॥

॥ ३१२७ ॥

नका[7] दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनुभव येथें व्हावा[8] शिष्टाचार । न चलती चार आह्मांपुढें ॥ध्रु ॥[9]
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं[10] ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें पाहिजे जातीचें । येरा गाबाळाचें काय[11] काम ॥ ३ ॥

॥ ३१२८ ॥

न करि त्याचें गांढेपण । नारायण सिद्ध उभा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भवसिंधूचा थडवा केला । बोलाविला पाहिजे ॥ ध्रु ॥
याचे सोई पाउल वेचे । मग कैचे ओडथळे[12] ॥ २ ॥
तुका ह्मणे खरें खोटें । न ह्मणे मोटें लहान ॥ ३ ॥

---

१ पं. इत्थंभूत यावें.—२ पं. अनाथाची.—३ पं कांहो नये०.—४ पं. वारितातीं.—५ पं. घालितातीं काय जोडी ।.—६ पं. झाडितातीं.—७ पं. नको.—८ पं. पाहिजे साचार ।.—९ पं. "वरी कोणी मानी रसाळ बोलणें । नाहीं जाली मनें ओळखी तों ॥." हें कडवें जास्त आहे.—१० पं. वेगळाची.—११ पं. "काय काम" याबद्दल "काम नाहीं".—१२ पं. आडताळे.

॥ ३१२९ ॥

रिकामें तूं[1] नको मना । राहों क्षणक्षणा ही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेळोवेळां पारायण । नारायण हें करीं ॥ ध्रु ॥
भ्रमणांच्या मोडीं वाटा । न भरें फाटा आडरानें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझ्या जीवें । हें चि घ्यावें धगीवरी ॥ ३ ॥

॥ ३१३० ॥

पंचभूतांचिये सांपडलों संदीं[2] । घातलोंसे बंदीं अहंकारें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपल्या आपण बांधविला गळा। नेणें चि निराळा असतां हो ॥ध्रु॥
कासया हा सत्य लेखिलों[3] संसार । कां हें केले चार माझें माझें ॥ २ ॥
कां नाहीं शरण गेलों नारायणा । कां नाहीं वासना आवरिली ॥ ३ ॥
किंचित सुखाचा धरिला अभिळांस[4] । तेणें बहु नांस[5] केला पुढें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां देह देऊं बळी । करुनि सांडूं होळी संचिंताची[6] ॥ ५ ॥

॥ ३१३१ ॥

देव जाले अवघे जन । माझे[7] गुण दोष हारपले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरवें जालें बरवें जालें । चित्त धालें महालाभें ॥ ध्रु ॥
दर्पणीचें दुसरें भासे । परि तें असे एक तें ॥ २ ॥
तुका ह्मणे सिंधुभेटी । उदका तुटी वाहाळासी[8] ॥ ३ ॥

॥ ३१३२ ॥

बहु[9] प्रकार गव्हाचे । जिव्हा नाचे आवडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सरलें परि आवडी नवी । सिंधु दावी तरंग ॥ ध्रु ॥

---

१ पं. तों.—२ पं. त. संधी.—३ पं. मानिला.—४ पं. अभिलाष.—५ पं. नाश.—६ पं. संसारचीं.—७ पं. "माझे" नाहीं.—८ पं. वोहळासी.—९ त. दे. बहुत प्रकार परिते गव्ह ाचे.

घेतलें ध्यावें वेळोवेळां । माय बाळा न विसंबे ॥ २ ॥
तुका ह्मणे रस राहिला[2] वचनीं । तो चि[3] पडताळूनि सेवीतसें ॥ ३ ॥

॥ ३१३३ ॥

आह्मां सोइरे हरिजन । जनीं[4] भाग्य निकंचन[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्याच्या धैर्या नाहीं भंग । भाव एकविध रंग ॥ ध्रु ॥
भुके[6] तान्हे चित्तीं[7] । सदा देव आठविती ॥ २ ॥
तुका ह्मणे धन । ज्याचें निर्जन[8] नारायण ॥ ३ ॥

॥ ३१३४ ॥

ह्मणवितों दास न करितां सेवा[9] । लंडपणें देवा पोट भरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खोटें कोठें सरे तुझे पायांपाशीं । अंतर जाणसी पांडुरंगा ॥ ध्रु ॥
आचरण खोटें आपणासी ठावें । लटिकें बोलावें दुसरें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसा आहें अपराधी । असो कृपानिधी तुह्मां ठावा ॥ ३ ॥

॥ ३१३५ ॥

जळालें[8] तें बाह्य सोंग । अंतर व्यंग पडिलिया[9] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कारण तें अंतरलें । वाइट भलें ह्मणवितां[10] ॥ ध्रु ॥
तांतडीनें नासी । तांतडीनें च संतोषी ॥ २ ॥
तुका ह्मणे धीर[11] । नाहीं बुद्धि[12] एक स्थिर ॥ ३ ॥

॥ ३१३६ ॥

चित्ताचें बांधलें जवळी तें वसे । प्रकाशीं प्रकाशे सर्वकाळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतरीं वसावी उत्तम ते भेटी । होऊं कांहीं तुटी न सके चि ॥ ध्रु ॥

---

१ पं. बाया.—२ पं. "राहिला" नाहीं.—३ पं. पडताळूनी तोची सेवीं.—४ पं. जनभाग्य.—५ प. निःकिंचन.—६ पं. तान्हेभुके.—७ दे. त. वित्त.—८ पं. जळो.—९ पं. पडिलें.—१० पं. ह्मणतां.—११ पं. धर.—१२ पं. एकी बुद्धि.

ब्रह्मांड कवळे[1] आठवणेसाटीं । धरावा तो पोटीं वाव बरा ॥ २ ॥
तुका ह्मणे लाभ घरिचिया घरीं । प्रेमतंतु दोरी न तुटतां[2] ॥ ३ ॥

॥ ३१३७ ॥

दुखवलें[3] चित्त आजिच्या प्रसंगें । बहु पीडा जगें केली देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कधीं हा संबंध तोडिसी तें नेणें । आठवूनि मनें पाय असें ॥ ध्रु ॥
आणिकांची येती अंतरा अंतरें । सुखदुःख बरेंवाइट तीं[4] ॥ २ ॥
तुका ह्मणे घडे एकांताचा वास । तरिच या नास संबंधाचा ॥ ३ ॥

॥ ३१३८ ॥

धनवंत एक बहिरे[5] अंधळे । शुभ्र कुष्ठ काळे भोग अंगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रारब्धाची[6] गति न कळे विचित्र । आहे हातीं सूत्र विठोबाचे ॥ ध्रु ॥
आणीक रोगांचीं नांवें घेऊं[7] किती । अखंड असती जडोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे नष्ट संचिताचें दान । पावे खातां पण सुख नेदी ॥ ३ ॥

॥ ३१३९ ॥

भेदाभेदताळा न घडे घालितां । आठवा रे आतां नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येणें एक केलें अवघें होय सांग । अच्युताच्या योगें[8] नामें छंदें ॥ ध्रु ॥
भोंवरे खळाळ चोर वाटा घेती । पावलें मारिती सिवेपाशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें भावेंविण पार । न पविजे सार हें चि आहे ॥ ३ ॥

॥ ३१४० ॥

जे गाती अखंड विठ्ठलाचे गीत । त्यांचे पायीं चित्त ठेवीन मी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जयांसी आवडे विठ्ठलाचें नाम । ते माझे परम प्राणसखे ॥ ध्रु ॥

---

१ पं. कवळ आठवण साटी.—२ दे. सुटतां.—३ त. पं. दुःखवलें.—४ पं. तें.—५ पं. वहिरट.—६ त "प्रारब्धगति० हातीं आहे सूत्र०." दे. परारब्धगति.—७ पं. सांगों.—८ पं. संगें नामच्छंदें. त. योगें नामच्छंदें.

जयांसी विठ्ठल[1] आवडे लोचनीं । त्यांचें पायवणी स्वीकारीन ॥ २ ॥
विठ्ठलासी जिहीं दिला सर्व भाव । त्यांच्या पायीं ठाव[2] मागईन ॥ ३ ॥
तुका ह्मणे रज होईन चरणींचा । ह्मणविती त्यांचा हरिचें दास ॥ ४ ॥

॥ ३१४१ ॥

*काय तो विवाद असो भेदाभेद । साधा परमानंद एका भावें ॥ १ ॥
निघोनि आयुष्य जातें हातोहात । विचारीं पां हित लवलाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भावभक्ति हे कारण । नागवी भूषण दंभ तो चि ॥ ३ ॥

॥ ३१४२ ॥

देवकीनंदनें । केलें आपुल्या चिंतनें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज आपुलिया ऐसें । मना लावूनियां पिसें ॥ ध्रु ॥
गोवळे गोपाळां । केलें लावूनियां चाळा ॥ २ ॥
तुका ह्मणे संग । केला दुरि नव्हे मग ॥ ३ ॥

॥ ३१४३ ॥

माझिया जीवासी[3] हे चि पैं विश्रांति । तुझे पाय चित्तीं पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भांडवल गांठी आलें[4] सपुरतें । समाधान चित्तें मानियेलें ॥ ध्रु ॥
उदंड उच्चारें[5] घातला पसरु । रूपावरी भरु आवडीचा ॥ २ ॥
तुका ह्मणे मज भक्तीची आवडी । अभेदीं[6] तांतडी नाहीं ह्मूण[7] ॥ ३ ॥

॥ ३१४४ ॥

एकविध आह्मी न धरूं पालट । न संडूं ते[8] वाट सांपडली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणवूनि केला पाहिजे सांभाळ । माझें बुद्धीबळ पाय तुझे ॥ ध्रु ॥

---

१ पं. आवडे विठ्ठल.—२ पं. जीवठेवीन मी ।.—३ पं. जीवाची.—४ पं. जालेंसे पुरतें.—५ पं. उच्चारु.—६ पं. अभेद०.—७ पं. ह्मणे.—८ पं. हे.

* दे. त. या दोहोंप्रतींत हा अभंग दुवार आहे. अक्षरवटिका ह्मणजे शुद्धाशुद्धलेख मात्र सारखा नाहीं.

बहुत न कळे बोलतां प्रकार । अंतरा अंतर साक्ष असे ॥ २ ॥
तुका ह्मणे आगा जीवींच्या[1] जीवना । तूं चि नारायणा साक्षी माझा ॥ ३ ॥

॥ ३१४५ ॥

राहो ये चि ठायीं । माझा भाव तुझे पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करीन नामाचें चिंतन । जाऊं नेदीं कोठें मन ॥ ध्रु ॥
देईन ये रसीं । आतां बुडी सर्वविशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । साटी करोनियां जीवा ॥ ३ ॥

॥ ३१४६ ॥

तैसे नव्हों[2] आह्मी विठ्ठलाचे[3] दास । यावें आणिकांस काकुलती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्वामिचिया सत्ता ठेंगणें सकळ । आला कळिकाळ हाताखालीं ॥ ध्रु ॥
अंकिताचा असे अभिमान देवा । समर्पूनि हेवा असों पायीं २ ॥
तुका ह्मणे आह्मां इच्छेचें खेळणें । कोडें[4] नारायणें पुरवावें ॥ ३ ॥

॥ ३१४७ ॥

मोक्ष देवापाशीं नाहीं । लटिक्या घाईं विळवतें[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय खरें न धरी शुद्धी । गेली बुद्धी भ्रमलें ॥ ध्रु ॥
अहंकारास[6] उरलें काई । पांचांठायीं हें वांटे ॥ २ ॥
तुका ह्मणे कुंथे भारें । लटिकें खरें मानुनियां ॥ ३ ॥

॥ ३१४८ ॥

आपला तो एक देव करुनि घ्यावा । तेणेंविण जीवा सुख नव्हे[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येर[8] तीं माइकें दुःखाचीं जनितीं । नाहीं आदिअंतीं अवसान[9] ॥ ध्रु ॥

---

१ दे. जीवांच्या.—२ पं. नव्हे. दे. नहों.—३ पं. विठोबाचे.—४ पं. कोडें नारायण.—५ प. विवळतो.—६ पं. अहंकारा.—७ पं. नाहे.—८ दे. तें.—९ पं. अवसानीं.

अविनाश करी आपुलिया ऐसें । लावीं मना पिसें गोविंदाच्या[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे एका मरणें चि सरें । उत्तम चि उरे कीर्ति मागें ॥ ३ ॥

॥ ३१४९ ॥

आजिचें हें मज तुह्मीं कृपादान । दिलें संतजन मायबापीं ॥ १ ॥
आलीं मुखावाटा अमृतवचनें । उत्तीर्ण[2] तीं येणें नव्हे जन्में ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मीं उदार कृपाळ । शृंगारिलें बाळ कवतुकें ॥ ३ ॥

॥ ३१५० ॥

स्तुती अथवा निंदा करावी देवाची । अधम तो वेची व्यर्थ वाणी ॥१॥
॥ ध्रु. ॥ आइकोनि होती बहिर हे बोल । वेचूनि ते मोल नरका जाती ॥ध्रु॥
इह लोकीं थुंका उडे[3] तोंडावरी । करणें अघोरीं वास लागे ॥ २ ॥
तुका ह्मणे साप वाचेऐसें निकें । भरलें नरकें निंदेसाटीं ॥ ३ ॥

॥ ३१५१ ॥

लोह कफ गारा सिद्ध हें सामुग्री । अग्नि[4] टणत्कारी दिसों येतो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांगावें तें काई सांगावें तें काई । चित्ता[5] होय ठायीं अनुभव तो ॥ ध्रु ॥
अन्नें सांगों येतो तृप्तीचा अनुभव । करूनि उपाव घेऊं हेवा ॥ २ ॥
तुका ह्मणे मिळे जीवनीं जीवन । तेथें कोणा कोण नांव[6] ठेवी ॥ ३ ॥

॥ ३१५२ ॥

बाळाचें जीवन । माता जाणें भूक तान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करूं विनवणी । असो मस्तक चरणीं ॥ ध्रु ॥

---

१ पं. गोविंदाचें.—२ पं. उत्तीर्णता येणें०.—३ पं. पडो.—४ दे. त. आग्न.—५ त. वेत्ता.—६ पं. नांवें.

ठेविलिये ठायीं । चित्त ठेवुनि असें पायीं ॥ २ ॥
करितों हे सेवा । चिंतन सर्वां ठायीं देवा ॥ ३ ॥
न्यून तें चि पुरें । घ्यावें[1] करोनि दातारें ॥ ४ ॥
तुका ह्मणे बुद्धि । अल्प असे अपराधी ॥ ५ ॥

॥ ३१५३ ॥

जाणतों समये । परि[2] मत कामा नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी सांगावें तें बरें । देवा सकळ विचारें[3] ॥ ध्रु ॥
फुकाचिये पुसी । चिंता नाहीं होते ऐसी ॥ २ ॥
तुका ह्मणे आहे । धर पाय मज साहे ॥ ३ ॥

॥ ३१५४ ॥

द्वारपाळ विनंती करी । उभे द्वारीं राउळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलिया शरणागता । वाहों चिंता नेदावी[4] ॥ ध्रु ॥
वचना या चित्त द्यावें । असो ठावें पायांसी ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपासिंधू । दीनबंधू केशवा ॥ ३ ॥

॥ ३१५५ ॥

दोहीं बाहीं आह्मां वास । असों कास घालूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बोल बोलों उभयतां । स्वामीसत्ता सेवेची ॥ ध्रु ॥
एकसरें आज्ञा केली । असों चाली ते नीती[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे जोहारितों । आहें होतों ते ठायीं ॥ ३ ॥

॥ ३१५६ ॥

एका जी देवा माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥

---

१ पं. करोनि घ्यावें.—२ पं. परमित.—३ पं. विचार.—४ पं. न द्यावी.—५ पं. गीति.

॥ ध्रु.॥ सन्निध पातलों सांडूनियां शंका। सन्मुख चि एकाएकीं पुढें ॥ध्रु॥
जाणविलें कोठें पावे पायांपाशीं। केली या जिवासी साटी ह्मूण ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें हातीं द्या उद्धार। करीं करकर ह्मणघूनि ॥ ३ ॥

॥ ३१५७ ॥

बैसलों तों कडियेवरी। नव्हें दुरी वेगळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घडलें हें बहुवा दिसां। आतां इच्छा पुरवीन ॥ ध्रु ॥
बहु होतां जाला सीण। नाहीं क्षण विसांवा ॥ २ ॥
दुःखी केलें मीतूंपणें। जवळी नेणें होतें तें ॥ ३ ॥
पाहात जे होतों वास। ते चिं आस पुरविली ॥ ४ ॥
तुका ह्मणे मायबापा। झणी कोपा विठ्ठला ॥ ५ ॥

॥ ३१५८ ॥

तुझें नाम मुखीं तयासी विपत्ति। आश्चर्य हें चित्तीं वाटतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय जाणों कायं होसील निजला। नेणों जी विठ्ठला मायबापा ॥ध्रु॥
भवबंधनाचे तुटतील फांसे। तें कां येथें असे अव्हेरिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें दचकलें मन। वाटे वांयांविण श्रम केला ॥ ३ ॥

॥ ३१५९ ॥

सेवकें करावें सांगितलें काम। सिक्याचा तो धर्म स्वामी राखे ॥ १॥
॥ ध्रु. ॥ काय देवा नेणों आलें गांढेपण। तुह्मी शक्तिहीन जाले दिसां ॥ध्रु॥
विष्णुदास आह्मी निर्भर ज्याबळें। तें दिसे या काळें अव्हेरिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे मूळ पाठवा लौकरी। किंवा करूं हरी काय सांगा ॥ ३ ॥

---

१ पं. टाकोनियां.—२ पं. बहुता.—३ पं. जाला होता.—४ पं. देवा.—५ पं. ऐसें.—६ पं. सीण.

॥ ३१६० ॥

खेळतां[1] न भ्यावें समर्थाच्या बळें । तयाच्या सकळ सत्तेखालीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी लेवविला शोभे अळंकार । नाहीं तरी भार मानाविण[2] ॥ध्रु ॥
अवघी च दिशा असावी मोकळी । मायबाप बळी ह्मणऊनि ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें ऐसें आहे देवा । ह्मणऊनि सेवा समर्पिली ॥ ३ ॥

॥ ३१६१ ॥

निरंजनीं[3] एकटवाणें । संग नेणें दुसरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहा चाळविलें कैसें । लावुनि पिसें गोवळें ॥ ध्रु ॥
लपलें[4] अंगें अंग । दिला संग होता तो ॥ २ ॥
तुका ह्मणे नव्हतें ठावें । जालें भावें वाटोळें ॥ ३ ॥

॥ ३१६२ ॥

नव्हती भेटी तों चि बरें । होतां चोरें नाडिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघियांचा केला झाडा । रिता वाडा खोंकर ॥ ध्रु ॥
चिंतनाचें मूळ चित्त । नेलें वित्त हरूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे मूळा आलें । होतें केलें तैसें चि ॥ ३ ॥

॥ ३१६३ ॥

जये ठायीं आवडी ठेली । मज ते बोली न संडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुरवावें जीवींचें कोडें[5] । भेटी गोड तुज मज ॥ ध्रु ॥
आणिलें सें[6] येथवरी । रूप दुरी न करावें ॥ २ ॥
तुका ह्मणे नारायणा । सेवाहीना विग वृत्ति ॥ ३ ॥

---

१ पं. खेळतां निजभावें समर्थाचें बाळ ।—२ पं. मानाविणें.—३ दे. त. निरांजनीं.—४ त. लपविलें.—५ पं. कोडें.—६ पं. "तें" नाहीं.

॥ ३१६४ ॥

सरलियाचा सोस मनीं । लाजोनियां राहिलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडीनें बोलावितों । येथें तें तों लपावें ॥ ध्रु ॥
माझें तें चि मज द्यावें । होतें भावें जोडिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे विश्वंभरा । आळीकरा बुझावा ॥ ३ ॥

॥ ३१६५ ॥

नाचावेंसें वाटे मना । छंद गुणा अधीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चेष्टविलीं माझीं गात्रें । सत्तासूत्रें हालती[1] ॥ ध्रु ॥
नामरूपें रंगा आलीं । ते चि चाली स्वभावें ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगे । अंग संगें कवेळिलें[2] ॥ ३ ॥

॥ ३१६६ ॥

खेळतों ते[3] खेळ पायांच्या प्रसादें । नव्हती हीं[4] छंदें नासिवंतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझा मायबाप उभा विटेवरी । कवतुकें करी कृपादान ॥ ध्रु ॥
प्रसादाची वाणी वदे[5] तीं उत्तरें । नाहीं मतांतरें जोडियेलीं ॥ २ ॥
तुका ह्मणे रस वाढितिया[6] अंगें । छाया पांडुरंगें केली वरी ॥ ३ ॥

॥ ३१६७ ॥

अखंड मुडतर । सासुरवास करकर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ याची जाली[7] बोळवण । आतां न देखों तो शीण ॥ ध्रु ॥
बहुतांची दासी । तये घरीं सासुरवासी ॥ २ ॥
तुका ह्मणे मुळें । खंड जाला एका वेळें[8] ॥ ३ ॥

---

१ त. हालविती.—२ पं. कवळिलीं.—३ पं. "ते" नाहीं.—४ पं. ते.—५ पं. वदती उत्तरें.—६ पं. वाढी तया.—७ पं. जालिया.—८ पं. एक वेळे.

॥ ३१६८ ॥

अवघा भार वाटे देवा । संतसेवा न घडतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कसौटी हे असे हातीं । सत्य भूतीं भगवंत ॥ ध्रु ॥
चुकलोंसा दिसें पंथ । गेले संत तो ऐसा ॥ २ ॥
तुका ह्मणे सोंग वांयां । कारण या अनुभवें ॥ ३ ॥

॥ ३१६९ ॥

आतां तुह्मी कृपावंत । साधु संत जिवलग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गोमटें तें करा माझें । भार ओझें तुह्मांसी ॥ ध्रु ॥
वंचिलें तें पायांपाशीं । नाहीं यासीं वेगळें ॥ २ ॥
तुका ह्मणे सोडिल्या गांठी । दिली मिठी पायांसी ॥ ३ ॥

॥ ३१७० ॥

सुख वाटे परी वर्म । धर्माधर्म न कळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गायें नाचें एवढें जाणें । विठ्ठल ह्मणे निर्लज्ज ॥ ध्रु ॥
अवघें माझें एवढें धन । साधन ही[1] सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे पायां पडें । तुमच्या कोडें संतांच्या ॥ ३ ॥

॥ ३१७१ ॥

धरिलीं जीं होतीं चित्तीं । डोळां [2]तीं च दिसती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आलें [3]आवडीस फळ । जालें कारण सकळ ॥ ध्रु ॥
घेईन भातुकें । मागोनियां कवतुकें ॥ २ ॥
तुका ह्मणे [4]लांड । विठोबा [5]पुरवील कोड ॥ ३ ॥

---

१ पं. हें.—२ पं. ते.—३ पं. आवडीसी.—४ दे. लंड.—५ पं. पुरविलें कोडें.

॥ ३१७२ ॥

बहुतां दिसांची आजि जाली भेटी । जाली होती तुटी काळगती ॥ १ ॥
॥ध्रु.॥ येथें सावकाश[1] घेईन ते धणी । गेली अडचणी उगवोनि ॥ ध्रु ॥
बहु दुःख दिलें होतें घरीं कामें । वाढला हा श्रमें[2] श्रम होता ॥ २ ॥
बहु दिस होता पडिला[3] मारग । क्लेशाचा त्यां[4] त्याग आजि जाला ॥३॥
बहु होती[5] केली सोंगसंपादणी । लौकिकापासूनि निर्गमलें ॥ ४ ॥
तुका ह्मणे येथें जालें अवसान । परमानंदीं मन विसावलें ॥ ५ ॥

॥ ३१७३ ॥

पुत्र जाला चोर । मायबापा हर्ष थोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां काशासाटीं जोडी । हाट धांटे[6] गुंडगे घडी ॥ ध्रु ॥
ऐते अपाहार । आणूनियां भरी घर ॥ २ ॥
मानिली निश्चिंती । नरका जावया उभयतीं ॥ ३ ॥
झोडाझोडगीचे पोटीं । फळें बीजें तीं[7] करंटीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे बेटया । भांडवल न लगे खटया ॥ ५ ॥

॥ ३१७४ ॥

एवढी अपकीर्ती । ऐकोनियां फजीती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जरि दाविल[8] वदन । थुंका थुंका तो देखोन ॥ ध्रु ॥
काळिमेचें जिणें । जीऊनियां राहे सुनें ॥ २ ॥
तुका ह्मणे गुण । दरुषणें अपशकुन ॥ ३ ॥

---

१ दे. सावकासें.—२ दे. श्रमश्रमें.—३ पं. सांडिला.—४ पं. तो.—५ पं. केली होती.—६ स. दाटे. पं. धोटे गुडघे घडी०.—७ पं. ते करंटीं.—८ पं. दाखवील.

॥ ३१७५ ॥

पुंडलीक भक्तराज । तेणें साधियेलें काज ।
वैकुंठींचें निज । परब्रह्म आणिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांडुरंग बाळमूर्ति । गाईगोपाळां[1] संगती ।
येऊनियां प्रीति । उभें सम चि राहिलें ॥ ध्रु ॥
एका आगळें अक्षरें[2] । भूवैकुंठ चि दुसरें ।
ह्मणविती येरें । परि तीं ऐसीं नव्हेती ॥ २ ॥
पाप पंचक्रोशीमधीं । येऊं[3] न सके चि कधीं ।
कैंची तेथें विधि- । निषेधाची वसति ॥ ३ ॥
पुराणें वदंती[4] ऐसें । चतुर्भुज तीं मानसें ।
सुदर्शनावरी[5] वसे । रोगें न घडे कल्पांतीं ॥ ४ ॥
महाक्षेत्र हें पंढरी । अनुपम्य इंची[6] थोरी ।
धन्य धन्य वारकरी । तुका ह्मणे तेथींचे ॥ ५ ॥

॥ ३१७६ ॥

देह मृत्याचें भातुकें । कळों आलें कवतुकें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय मानियेलें सार । हें चि वाटतें आश्चर्य ॥ ध्रु ॥
नानाभोगांचीं संचितें । करूनि ठेविलें[7] आइतें ॥ २ ॥
तुका ह्मणे कोडीं । उगवूं न सकती बापुडीं ॥ ३ ॥

॥ ३१७७ ॥

त्यागें[8] भोग माझ्या येतील अंतरा । मग मी दातारा काय करूं ॥ १ ॥

---

१ पं. गाईगोपाळ सांगातीं.—२ दे. त. अक्षर वैकुंठ०.—३ दे. त. येऊ न सकेचिना आधीं.—४ प. बोलती.—५ पं. परि ते न बुडे कल्पांतीं. त. न बुडे कल्पांतीं.—६ दे. इथे-ची.—७ पं. ठेविली.—८ पं. त्याग.

॥ ध्रु. ॥ आतां असो तुझे पायीं हें मोटळें[1] । इंद्रियें सकळें[2] काया मन ॥ ध्रु ॥
सांडीमांडी[3] विधिनिषेधाचा ठाव । न कळतां भाव जाइल वांयां ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां नको उजगरा । लपवीं दातारा अंगीं मज ॥ ३ ॥

॥ ३१७८ ॥

दावूनियां बंड[3] । पुरे न करी तें भांड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जळो जळो तैसें जिणें । फटमरे[4] लाजिरवाणें ॥ ध्रु ॥
घेतलें तें[5] सोंग । बरवें संपादावें सांग ॥ २ ॥
तुका ह्मणे धीरें । देवें[6] नुपेक्षिलि खरें ॥ ३ ॥

॥ ३१७९ ॥

न पालटे जाती जीवाचिये साटीं । बाहे[7] तें चि पोटीं दावी वरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतरीं[8] सबाहीं सारिखा चि रंग । वीट आणि भंग नाहीं रसा ॥ ध्रु ॥
घणाचिया[9] घायें पोटीं शिरे हिरा । सांडूं नेणे धीरा आपुलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे कंढे[10] करावी शीतळ । ऐसें जातिबळ चंदनाचें ॥ ३ ॥

॥ ३१८० ॥

दिली मान तरी नेघावी[11] शत्रूची । शरण आलें त्यासी[12] जतन जीवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ समर्थासी असे विचाराची आण । भलीं पापपुण्य विचारावें ॥ ध्रु ॥
काकुळतीसाटीं सत्याचा विसर । पडिलें अंतर न पाहिजे ॥ २ ॥
तुका ह्मणे यश कीर्ति आणि मान । करितां जतन देव जोडे ॥ ३ ॥

---

१ पं. मोटाळें.—२ पं. सकळ काया मनें.—३ पं. मांड । पुरे न करिती भांड ॥.—४ पं. फटमर.—५ पं. तैसें.—६ दे. देवें नुपेक्षिलें खरें.—७ पं. बाह्य.—८ पं. अंतर सबाह्य.—९ पं. घणाचिये घाईं.—१० पं. कढ.—११ पं. न घ्यावी.—१२ त. त्याची.

॥ ३१८१ ॥

विचारिलें आधीं आपुल्या मानसीं । वांचों येथें कैसीं कोण्या द्वारें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तंव जाला[1] साह्य त्वदयनिवासी । बुद्धि दिली ऐसी नास[2] नाहीं ॥ ध्रु ॥
उद्वेगाचे होतों पडिलों समुद्रीं । कोणे रीती तरीं पाविजेल ॥ २ ॥
तुका ह्मणे दुःखें आला आयुर्भाव । जाला बहु जीव कासावीस ॥ ३ ॥

॥ ३१८२ ॥

आपुलें वेचूनि खोडा घाली पाव । ऐसे[3] नया भाव हीनबुद्धि ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विषयांच्या संगें आयुष्याचा नास । पडियेलें ओस स्वहिताचें ॥ ध्रु ॥
भुलल्याचें अंग आपणा[4] पारिखें । छंदा च सारिखें वर्त्तसे ॥ २ ॥
तुका ह्मणे दुःख उमटे परिणामीं । लंपटासी कामीं रतालिया ॥ ३ ॥

॥ ३१८३ ॥

केलें शकुनें प्रयाण । आतां मागें फिरे कोण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होय तैसें होय आतां । देहें[5] बळी काय चिंता ॥ ध्रु ॥
पडिलें पालवीं । त्याचा धाक वाहे जीवीं ॥ २ ॥
तुका ह्मणे जीणें । देवा काय हीनपणें ॥ ३ ॥

॥ ३१८४ ॥

आळणी ऐसें कळों आलें । त्यासी भलें मौन[6] चि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नये कांहीं वेचूं वाणी । वेडे घाणीसांगातें ॥ ध्रु ॥
वेगळें तें देहभावा । भ्रम जीवा माजिरा ॥ २ ॥
तुका ह्मणे कवतुक केलें । किंवा भलें दवडितां ॥ ३ ॥

---

१ पं. साह्य जाला –२ पं. नाश.–३ पं. ऐसा तो हा जीव हीनबुद्धि ।.–४ दे. पं. आपण्या.–५ पं. देहबळ.–६ दे. त. मौन्य.

३१८५

चित्ताचा चाळक । त्याचें उभय सूत्र एक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाचवितें नानाछंदें[1] । सुखें आपुल्या विनोदें ॥ ध्रु ॥
चंद्र कमळणी । नाहीं धाडीत सांगोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे उठी । लोह चुंबकाचे दृष्टी ॥ ३ ॥

॥ ३१८६ ॥

करितां तडातोडी । वत्सा माते सोई ओढी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कारित्यांचा[2] आग्रह उरे । एक एकासाटीं झुरे ॥ ध्रु ॥
भुके इच्छी अन्न । तें हि त्यासाटीं निर्माण ॥ २ ॥
तुका ह्मणे जाती । एक एकांचिये चित्तीं ॥ ३ ॥

॥ ३१८७ ॥

निघालें दिवाळें । जालें देवाचें वाटोळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां वेचूं नये वाणी । विचारावें मनिच्या मनीं ॥ ध्रु ॥
गुंडाळिलीं पोतीं । भीतरी लावियेली वाती ॥ २ ॥
तुका ह्मणे करा । ऐसा राहे[3] माजी घरा ॥ ३ ॥

॥ ३१८८ ॥

तीर्थाचिये पंथें[4] चाले तो निदैव । पाविजेतो ठाव अंतराय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि भलें निश्चळ चि स्थळीं । मनाचिये मुळीं बैसोनियां ॥ ध्रु ॥
संकल्पारूढ तें प्रारब्धें[5] चि जिणें । कार्य चि कारणें[6] वाढतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे कामा[7] नाहीं एक मुख । जिरवितां सुख होतें पोटीं ॥ ३ ॥

---

१ पं. नाचछंदें.—२ पं. वारित्याचा.—३ पं. राहो.—४ दे. तीर्थाचिये आस । पंथ तो निट देव ।.—५ पं. पराधीन जीणें.—६ पं. कारण.—७ पं. नाहीं कामा एक०.

॥ ३१८९ ॥

क्षणक्षणा हा चि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाशिवंत देह जाणार[1] सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥ ध्रु ॥
संतसमागमीं धरूनि आवडी । करावी तांतडी परमार्थीं ॥ २ ॥
तुका ह्मणे यहलोकींच्या[2] वेव्हारें । नये डोळे धुरें भरूनि राहों ॥ ३ ॥

॥ ३१९० ॥

कोणाशीं विचार करावा सेवटीं । एवढ्या लाभें तुटी जाल्या तरे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांभाळितो शूर आला घावडाव । पुढें दिला पाव न करी मागें ॥ ध्रु ॥
घात तो या नांवें येथें अंतराय । अंतरल्या पाय गोविंदाचे ॥ २ ॥
तुका ह्मणे गडसंदीचा[3] हा ठाव । केला तो उपाव कार्या येतो ॥ ३ ॥

॥ ३१९१ ॥

असा जी सोंवळे । आहां तैसे चि निराळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मीं नयों तुमच्या वाटा । काय लठिका चि ताठा[4] ॥ ध्रु ॥
चिंतन चि पुरे । काय सलगी सवें धुरे ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । नका नावडे ते सेवा ॥ ३ ॥

॥ ३१९२ ॥

अहंकार[5] तो नासा भेद । जगीं निंद्य[6] ओंवळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नातळे तो धन्य यांसी[7] । जाला वंशीं[8] दीपक ॥ ध्रु ॥
करवितो आत्महत्या । नेदी सत्या आतळों ॥ २ ॥
तुका ह्मणे गुरुगुरी । माथां थोरी धरोनि ॥ ३ ॥

---

१ पं. जाणा रे.—२ दे. त. येह लोकीच्या.—३ पं. गडसंधीचा.—४ पं. ताटा.—५ दे. निंदे.—६ पं. त्यासी.—७ दे. वंशीं. त. वंसीं.—८ पं. ब्रह्महत्या । नेदी आत्या आतळों ॥.

॥ ३१९३ ॥

इच्छिलें ते शकुनवंती । होय देती तात्काळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्षीरा नीरा निवाड करी । वरावरी विठ्ठल ॥ ध्रु ॥
भाग्याविण कैचें फळ । अंतर मळमूत्राचें ॥ २ ॥
तुका ह्मणे संचित कुडें । तें बापुडें करीतसे ॥ ३ ॥

३१९४

काशासाटीं आह्मी जाळिला संसार । न करा[1] विचार ऐसा देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसें नेणों तुह्मां करवतें उदास । माझा प्रेमरस भंगावया ॥ध्रु॥
समर्पूनि ठेलों देह हा सकळ । धरितां विटाळ न लजा माझा ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघी मोकलूनि आस । फिरतों उदास कोणासाटीं ॥ ३ ॥

३१९५

नाहीं तुह्मां कांहीं लाविलें मागणें । कांटाळ्याच्या भेणें त्रासलेती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एखादिये परी टाळावी करकर । हा नका विचार देखों कांहीं ॥ध्रु॥
पायांच्या वियोगें प्राणासवसाटी[2] । नेघेवेसी[3] तुटी जाली आतां ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मां मागणें[4] तें आतां । हें चि कृपावंता चरणीं वास ॥ ३ ॥

॥ ३१९६ ॥

जग अमंगळ । लागे देखतां विटाळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धर्म भूतांची ते दया । सत्य[5] कारण ऐसीया ॥ ध्रु ॥
नव्हे माझें मत । साक्षी करूनि सांगें संत ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवें । दावी उमटूनि अनुभवें ॥ ३ ॥

---

१ पं. करावा.—२ दे. त. प्राणासवें साटी.—३ दे. पं. ने घवेसी.—४ दे. मागेन.—५ पं. संत.

॥ ३१९७ ॥

दंड अन्यायाच्या माथां । देखोनि करावा सर्वथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नये उगे बहुतां घाटूं । सिसें सोनियांत आटूं ॥ ध्रु ॥
पापपुण्यासाटीं । नीत केली सत्ता[1] खोटी ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । दोष कोणाचा तो दावा ॥ ३ ॥

॥ ३१९८ ॥

आह्मी पापी[2] तूं पावन । हें तों पूर्वापार[3] जाण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नवें करूं नये जुनें । सांभाळावें ज्याचें तेणें ॥ ध्रु ॥
राखावा[4] तो ठाव । मिरासी करोनि उपाव ॥ २ ॥
वादें मारी हाका । देवा ऐकवी[5] तुका ॥ ३ ॥

॥ ३१९९ ॥

पाडावी ते बरी । गांठी धुरेसवें खरी[6] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नये मरों लंडीपणें । काय बापुडें तें जिणें ॥ ध्रु ॥
लुटावें भांडार । तरी जया नाहीं पार ॥ २ ॥
तुका ह्मणे नांवें । कीर्ती आगळीनें ज्यावें ॥ ३ ॥

॥ ३२०० ॥

भजनें[7] चि जालें । मग जीवाचें काय आलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येऊं नेदावी पुढती । आड भयाची ते जाती ॥ ध्रु ॥
करितां सरोबरी[8] । कांहीं न ठेवावी उरी ॥ २ ॥
तुका ह्मणे शूर । व्हावे धुरेसीं च धुरें[9] ॥ ३ ॥

---

१ पं. आतां.—२ पं. आह्मी पतितपावन ।.—३ पं. पूर्वापर.—४ पं. मिरासीचा ठाव । राखा करोनि उपाव॥.—५ पं. ऐकवीतो.—६ पं. करी.—७ पं. भोजन.—८ पं. सरोभरी.—९ दे. धुरे.

॥ ३२०१ ॥

जन्मांतरीं शुद्ध नाहीं आचरण । यालागीं चरण अंतरले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वोडवलें संचित येणें जन्में पाहतां । आतां पंढरिनाथा कृपा करीं ॥ ध्रु ॥
पतितपावन ब्रिद[1] साच करीं देवा । यालागीं कुढावा[2] करीं माझा ॥ २ ॥
अपराधी पातकी दुष्ट दुराचारी । आहाळलों[3] भारी संवसारें ॥ ३ ॥
कामक्रोध आदि कल्पनेच्या त्रासें । तुज न पवें ऐसें जालें[4] देवा ॥ ४ ॥
हा ना तोसा ठाव जाला पांडुरंगा । नये चि उपेगा काय करूं ॥ ५ ॥
आपुलिया नांवा धांवणिया धांवें । लवकरी यावें तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ ३२०२ ॥

प्रथमभेटी[5] आळिंगण । मग चरण वंदावे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा माझा भोळा बाप । हरी ताप कवळोनि ॥ ध्रु ॥
न सांगतां[6] सीण भाग । पांडुरंग जाणतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपावंतें । द्यावें भातें न मागतां ॥ ३ ॥

॥ ३२०३ ॥

वचनाचा अनुभव हातीं । बोलविती देव मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि हें न कळे अभाविकां । जडलोकां जिवांसी ॥ ध्रु ॥
अश्रुत[7] हे प्रसादिक । कृपा भीक स्वामीची ॥ २ ॥
तुका ह्मणे वरावरी । जातों तरी सांगत ॥ ३ ॥

---

१ पं. "ब्रिद" नाहीं.—२ पं. कुडावा.—३ दे. पं. अहाळलों.—४ पं. जालों.—५ दे. प्रेमभेटी.—६ दे. त. संगवां.—७ पं. अनश्रुत.

॥ ३२०४ ॥

कां रे तुह्मीं ठेवा बहुतां निमित्तें । माझिया संचितें वोडवलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भक्तिप्रेमगोडी बैसली जिव्हारीं । आनंद अंतरीं येणें झाला ॥ ध्रु ॥
पुसिलें पडळ तिमिर[1] विठ्ठलें । जग चि भरलें ब्रह्मानंदें ॥ २ ॥
तुका ह्मणे केलों कामनेवेगळा । आवडी गोपाळावरी वसे ॥ ३ ॥

॥ ३२०५ ॥

आसन शयन भोजन गोविंदें । भरलें आनंदें त्रिभुवन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघियां केली काळें तडातोडी । अवसर[2] घडी पुरों नये ॥ ध्रु ॥
वांटणी घातले शरीराचे भाग । दुजियाचा लाग खंडियेला ॥ २ ॥
आवडीच्या आलें आहारासी रूप । पृथक संकल्प मावळले ॥ ३ ॥
काम तरी क्रोध बुद्धि मन नासे । भ्रमाचे वोळसे गिळिले शांती ॥ ४ ॥
तुका ह्मणे मना श्रीरंगाचा रंग । बैसला अभंग एकविध ॥ ५ ॥

॥ ३२०६ ॥

ज्वरल्यासी काढा औषध पाचन । मूढां नारायण स्मरवितो[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भवव्याधि येणें तुटेल रोकडी[4] । करूनियां झाडी[5] निश्चयेसी ॥ ध्रु ॥
आणिकां उपायां अनुपान कठिण । भाग्यें बरें सीण शीघ्रवत ॥ २ ॥
तुका ह्मणे केला उघडा पसारा । भाग्य आलें घरा दारावरी ॥ ३ ॥

॥ ३२०७ ॥

जपाचें निमित्त झोपेचा पसरु । देहाचा[6] विसरू पाडूनियां ॥ १ ॥

---

१ दे. त. पं. त्रिमिर.—२ दे. त. अवश्वरु.—३ दे. श्रमवितो.—४ पं. रोकडा.—५ पं. झाडा.—६ पं. देतां हा विचारु पाडूनियां.

॥ ध्रु. ॥ ऐसीं[1] तीं भजनें अमंगळवाणी । सोंगसंपादणी बहुरूप्याची[2] ॥ ध्रु. ॥
सेवेसी[3] विकिलें लोभाचिये आंसे[4] । तया कोठें असे उरला देव ॥ २ ॥
तुका ह्मणे मानदंभ जया चित्तीं । तयाची फजीती करूं आह्मी ॥ ३ ॥

॥ ३२०८ ॥

परद्रव्य परकांता । नातळे जयाचिया चित्ता ।
आणि कर्मीं तो तत्वता । बांधला न वजाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा अनुभव रोकडा । विश्वासीतो जीवा जोडा ।
एकांत त्या पुढां । अवघा करी उकल ॥ ध्रु. ॥
सकट आंबलें तें[5] अन्न । शोधी तें चि मद्यपान ।
विषमानें भिन्न । केलें शुद्धाशुद्ध ॥ २ ॥
तुका ह्मणे नित । बरवें अनुभवें उचित ।
तरी काय हित । मोलें घ्यावें लागतें ॥ ३ ॥

॥ ३२०९ ॥

भूक पोटापुरती । तृष्णा भरवी[6] वाखती ।
करवी फजीती । हांवें भार वाढला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कुळिकेसी लांस फांस । डोई[7] दाढी बोडवी दोष ।
अविहितनाश । करवी वजर्न[8] चुकतां ॥ ध्रु. ॥
विधिसेवनें[9] विहितें । कार्यकारणापुरतें ।
न बाटे जो चित्तें । अधर्माच्या तो त्यागी ॥ २ ॥
आज्ञापालणें ते सेवा । भय धरोनियां जीवा ।
तुका ह्मणे ठेवा । ठेविला तो जतन ॥ ३ ॥

---

१ पं. ऐसें तें भजन.—२ पं. भोरप्याची.—३ दे. त. सेवेविशीं केलें लोभा०.—४ पं. आशे.—५ पं. "तें" नाहीं.—६ पं. भरी.—७ पं. दाढी डोई.—८ पं. वचन.—९ त. विधिसेवन.

॥ ३२१० ॥

कळे न कळे त्या धर्म । ऐका सांगतों रे वर्म ।
माझ्या विठोबाचें नाम । अटाहासें उच्चारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो या दाखवील वाटा । तया[1] पाहिजे त्या नीटा ।
कृपावंत मोटा । पाहिजे तो कळवळा ॥ ध्रु ॥
पुसतां चुका होतो वाटा । सर्वें बोळावा[2] गोमटा ।
मोडों नेदी कांटा । घेऊं सांटा चोरासी ॥ २ ॥
तुका ह्मणे मोल । न लगे द्यावें वेचावे[3] बोल ।
विठ्ठल विठ्ठल । ऐसा छंद मनासी ॥ ३ ॥

॥ ३२११ ॥

तरी कां वोळगणे । राजद्वारीं होती सुने ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंगीं दावुनि निष्कामता । पोकळ पोकळी तें वृथा ॥ ध्रु ॥
कासया मोकळ । भोंवतें शिष्यांचें गाबाळ ॥ २ ॥
तुका ह्मणे ढाळे । बाहेर[4] गुदे तें निराळें ॥ ३ ॥

॥ ३२१२ ॥

हरिच्या दासां सोपें वर्म । सर्व धर्म पाउलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कडिये देव बाहेर[5] खांदी । वैष्णव मांदी क्रीडेसी ॥ ध्रु ॥
सरती[6] येणें आटाआटी । नाहीं तुटी लाभाची ॥ २ ॥
तुका ह्मणे समाधान । सदा मन आमुचें ॥ ३ ॥

---

१ पं. जया.—२ पं. वोळवा.—३ त. वेचा.—४ पं. बाह्य ग ते निराळे. ।—५ पं. वाहे खांदी.—६ दे. सतत ते आटा०.

॥ ३२१३ ॥

भूतांचिये नांदे जीवीं । गोसावी च सकळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्षणक्षणां जागा ठायीं । दृढ पायीं विश्वास ॥ ध्रु ॥
दावूनियां सोंग दुजें । अंतर बीजें वसतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे जाणे धर्म । धरी तें वर्म चिंतन ॥ ३ ॥

॥ ३२१४ ॥

संत आले घरा । तों मी अभागी दातारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासयानें पूजा करूं । चरण ह्रदयीं च धरूं ॥ ध्रु ॥
काया कुरवंडी । करुन ओंवाळून सांडी ॥ २ ॥
तुका ह्मणे भावें । हात जोडीं असो ठावें ॥ ३ ॥

॥ ३२१५ ॥

भेद तुटलियावरी । आह्मी तुमचीं च हो[1] हरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां पाळावे पाळावे । आह्मां लाडिवाळांचे लळे ॥ ध्रु ॥
आणिकांची देवा । नाहीं जाणत चि सेवा ॥ २ ॥
तुका ह्मणे हेवा । माझा हेत पायीं देवा ॥ ३ ॥

॥ ३२१६ ॥

आमुची विश्रांति । तुमचें[2] चरण कमळापती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुढती पुढती नमन । घालूंनियां लोटांगण ॥ ध्रु ॥

---

१ पं. "हो" नाहीं.—२ पं. तुझे. त. 'आमुची विश्रांति०' हा अभंग दुबार (अभंग ३२२६ व ३९६७ पाहा) आहे, त्यापैकीं दुसऱ्या ठिकाणीं 'तुझे' असें आहे. दे. 'आमुची विश्रांति०' हा अभंग दुबार (दे. भा. २, अ. १०७ व ९०५ पाहा.) आहे, त्यापैकीं दुसऱ्या ठिकाणीं 'तुझारूपें कमळापति' असें आहे.

हें चि एक जाणें । काया वाचा आणि मनें ॥ २ ॥
नीच जनालोकां । तेळिले पायेरीस तुका ॥ ३ ॥

॥ ३२१७ ॥

विनवितों सेवटीं । आहे तैसें माझे पोटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कंठीं राहावें राहावें । हें चि मागतसें भावें ॥ ध्रु ॥
पुरली वासना । येणें होइल नारायणा ॥ २ ॥
तुका ह्मणे जो देहाडा । तो चि वर्णीन पवाडा ॥ ३ ॥

॥ ३२१८ ॥

आवडीची सलगी पूजा । विषम दुजा भाव तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसीं उफराटीं वर्मे । कळों भ्रमें न येती ॥ ध्रु ॥
न लगे समाधान मोल । रुचती बोल प्रीतीचे ॥ २ ॥
तुका ह्मणे एका जीवें । सूत्र व्हावें गुंतलें ॥ ३ ॥

॥ ३२१९ ॥

बाळ माते लाते वरी । मारी तेणें संतोषे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुख वसे चित्ता अंगीं । तें हें रंगीं मिळालें ॥ ध्रु ॥
भक्षी त्याचा जीवमाग । आला भाग तो बरा ॥ २ ॥
तुका ह्मणे ऋणानुबंधें । सांगे सुदें सकळां ॥ ३ ॥

॥ ३२२० ॥

शिजल्यावरी जाळ । वांयां जायाचें तें मूळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा वारावा तो श्रम । अतिशयीं नाहीं काम ॥ ध्रु ॥

---

१ दे. हा अभंग दोनदां आढळतो (मागच्या पृष्ठावरील टीप पाहा) त्यांपैकीं दुसऱ्या ठिकाणीं 'जाणा' असें आहे.—२ पं. तळील.—३ दे. व्होवें.—४ पं. जीव मागे.—५ त. अतित्याई.

सांभाळावें वर्म । उचिताच्या काळें धर्म ॥ २ ॥
तुका ह्मणे कळे । ऐसें कारणाचे वेळे ॥ ३ ॥

॥ ३२२१ ॥

उभा ऐल थडी । तेणें घालूं नये उडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुढें गेल्याचे उपाय । करावें ते केले काय ॥ ध्रु ॥
दिसतें आहारीं । नये जाऊं ऐशावरी ॥ २ ॥
अळसाची धाडी । तुका ह्मणे बहु नाडी ॥ ३ ॥

॥ ३२२२ ॥

शक्ती द्याव्या[1] देवा । नाहीं पार्थिवांची[2] सेवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुख्य आहे ऐसा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥ ध्रु ॥
मना पोटीं देव । जाणे जैसा तैसा भाव ॥ २ ॥
तुका ह्मणे सोसें । लागे लाविल्याचें पिसें ॥ ३ ॥

॥ ३२२३ ॥

कार्य चि कारण । तृष्णा पावविते[3] सीण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करुनि ऐसा संग । सोसें चि तूं पांडुरंग ॥ ध्रु ॥
रूपीं नाहीं गोडी । हांवें हांवें ऊर फोडी ॥ २ ॥
तुका ह्मणे पडे भरी । ऐशा वरदळाचे थोरी ॥ ३ ॥

॥ ३२२४ ॥

संसाराच्या नांवें घालूनियां शून्य । वाढता हा पुण्य केला धर्म ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हरिभजनें हें धवळिलें जग । चुकविला लाग कळिकाळाचा ॥ ध्रु ॥

---

१ पं. द्यावी.—२ दे. पदार्थीं.—३ पं. वाढविते.

कोणां ही नलगे साधनांचा पांग । करणें केला त्याग देहबुद्धी ॥ २ ॥
तुका ह्मणे सुख समाधि हरिकथा । नेणें भवव्यथा[1] गाईल तो ॥ ३ ॥

॥ ३२२५ ॥

विश्वासिया नाहीं लागत सायास । रंगे[2] अनायासें अंगा येतो ॥१ ॥
॥ ध्रु. ॥ लेंकराच्या हातें घास मागे माता । वोरसोनि चित्ता सुख पावे ॥ध्रु॥
गौरव त्यां[3] मानी आरुषा वचनीं । भूषण ते वाणी मिरवावी ॥ २ ॥
तुका ह्मणे आहे सकळ ही साक्षी । माझा कईं पक्षी पांडुरंग ॥ ३ ॥

॥ ३२२६ ॥

वैभवाचे धणी सकळां[4] शरणागत । सत्यभावें चित्त अर्पिलें तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेदी उरों देव आपणावेगळें । भावाचिया बळें ठायाठाव ॥ ध्रु ॥
जाणोनि नेणोनि अंगा आली दशा । मग होय इच्छा आपणच ॥ २ ॥
तुका ह्मणे बरें धाकट्याचें जिणें । माता स्तनपानें[5] वाढविते ॥ ३ ॥

॥ ३२२७ ॥

कईं[6] ऐसी दशा येइल माझ्या आंगा । चित्त पांडुरंगा झुरतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाठवुनि देह पायांचें चिंतन । अवसान तें क्षण नाहीं मधीं ॥ ध्रु॥
काय[6] ऐसा पात्र होईन लाभासी । नेणों त्वृषीकेशी तुष्टईल ॥ २ ॥
तुका ह्मणे धन्य मानीन संचित । घेईन तें नित्य प्रेमसुख ॥ ३ ॥

॥ ३२२८ ॥

नाहीं वागवीत जाणिवेचें ओझें । स्वामिसेवा[7] काज निर्धारु हा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आज्ञा ते प्रमाण हा मनीं निर्धार । येणें फिटे भार निश्चयेसी ॥ध्रु॥

---

१ दे. त. भववेथा.—२ पं. अनायासे रस अंगा०.—३ पं. तो.—४ पं. सकळ.—५ पं. स्तनपान.—६ पं. कईं.—७ दे. त. स्वामिसेवेकाजें.

ओळीकरें[1] आह्मी एकविध चित्तें । तैसें होऊं येतें मायबापें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी ये जातीची सेवा । घातलासे देवावरी भार ॥ ३ ॥

३२२९

काय नाहीं माझे अंतरीं वसति । व्यापक हा भूतीं सकळां[2] नांदे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चित्तासी प्रसाद होईल चळण । तें चि तें वळण मनासही ॥ध्रु॥
सर्व शक्ति जीवीं राहिल्या कुंटित । नाहीं केलें होतें[3] आपुलें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे दोरी खांब सूत्र्या हातीं । नाचवी नाचती जडें तैसीं ॥ ३ ॥

३२३०

देवाचें निर्माल्य कोण शिवे हातीं । संकल्पासी होती विकल्प ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाहिलें देह हें देवा एकसरें । होईल तें बरें तेणें[4] द्वारें ॥ ध्रु ॥
होता भार त्याची निवारली खंती । येथें आतां रिती साटवण ॥ २ ॥
तुका ह्मणे इच्छे पावविले कष्ट । ह्मणऊनि नष्ट दुरावली ॥ ३ ॥

॥ ३२३१ ॥

देव तीर्थ[5] येर दिसे जया ओस । तोचि तया दोष जाणतिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तया बरें फावे देवा चुकवितां । संचिताची सत्ता अंतराय[6] ॥ध्रु॥
शुद्धाशुद्धठाव पापपुण्यबीज । पावविल[7] दुजे फळभोग ॥ २ ॥
तुका ह्मणे विश्वंभराऐसें वर्म । चुकालिया धर्म अवघे मिथ्या ॥ ३ ॥

३२३२

काय करूं सांगतां ही न[8] कळे वर्म । उपस्थित भ्रम उपजवितों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मन आधीं ज्याचें आलें होइल हातां । तयावरी सत्ता केली चाले ॥ध्रु॥

---

१ पं. आळीकर.—२ पं. सकळांच्या.—३ त. हीत.—४ त. कोण्या.—५ पं. तीर्थी.—६ पं. अंतराया.—७ पं. पावविलें.—८ पं. नकळे तें वर्म ।—

अभुकेचे[1] अंगीं चवी ना सवाद । मिथ्या ऐसा वाद दुराग्रह ॥ २ ॥
तुका ह्मणे आप राखावें आपणा । संकोचों चि कोणा नये आतां ॥ ३ ॥

॥ ३२३३ ॥

अमृत अव्हेरें उचळलें[2] जातां । विष आर्त्तभूतां आवश्यक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आदरासी मोल नये लावूं केजें । धीर शुद्धबीजें गोमटा तो ॥ ध्रु ॥
खऱ्याचिये अंगीं आपणाचि[3] चाली । लावणी लाविली[4] काय लागे ॥ २ ॥
तुका ह्मणे चांडे[5] करा वेवसाव । आह्मांसी तो वाव धीर आहे ॥ ३ ॥

॥ ३२३४ ॥

अनुभवाचे रस देऊं आर्त्तभूतां । सोडूं चोजवितां पुढें पोतीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवाचा प्रसाद रत्नाच्या ओवणी । शोभतील गुणीं आपुलिया ॥ ध्रु ॥
आधीं भाव सार शुद्ध ते भूमिका । बीज आणि पिका चिंता नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्याचें नाम गुणवंत । तें नाहीं लागत पसरावें ॥ ३ ॥

॥ ३२३५ ॥

काय मज एवढा भार । हे वेव्हार चालवाया[6] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उकल तो जाणे धणी । मज भोजनीं कारण ॥ ध्रु ॥
चिंता ज्याची तया शिरीं । लेंकरीं तें खेळावें ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवट झाला । देव धा बोला भोगिता ॥ ३ ॥

॥ ३२३६ ॥

नं[7] गमे न गमे न गमे हरिविण ।
न गमे न गमे न गमे मेळवा शाम कोणी गे ॥ १ ॥

---

१ त. पं. आभुकेचे.—२ पं. उंचवळे.—३ दे. पं. आपणे.—४ पं. लागली.—५ पं. चाड.—६ दे. त. चाळवाया.—७ दे. न गमे न गमे न गमे हरिविण । न मगे न मगे न मगे मेळवा०.

॥ ध्रु. ॥ तळमळ करी तैसा जीव जळाविण मासा ।
दिसती दिशा ओसा वो ॥ ध्रु ॥
नाठवे भूक तान विकळ जालें मन ।
घडी जाय प्रमाण जुगा एकी वो ॥ २ ॥
जरी तुह्मी नोळखा सांगतें ऐका ।
तुकयाबंधूचा सखा जगजीवन ॥ ३ ॥

॥ ३२३७ ॥

विठ्ठला रे तुझे वर्णितां गुणवाद । विठ्ठला रे दग्ध जालीं पापें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठला रे तुझें पाहातां श्रीमुख । विठ्ठला रे सुख जालें नयना ॥ ध्रु ॥
विठ्ठला रे तुज देतां आलिंगन । विठ्ठला तनमन निवाल्या बाह्या ॥ २ ॥
विठ्ठला रे तुझी ऐकतां कीर्त्ति । विठ्ठल हे[1] विश्रांति पावले स्मरणें ॥ ३ ॥
विठ्ठला रे तुकयाबंधु ह्मणे देहभाव । विठ्ठला जीवीं पाव धरितां गेला ॥ ४ ॥

॥ ३२३८ ॥

एकांतीं लोकांतीं करूं गदारोळ । लेश तो ही मळ नाहीं येथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घ्यावें द्यावें आह्मीं आपुलिया सत्ता । न देखों पुसता दुजा कोणी ॥ ध्रु ॥
भांडाराची किली माझे हातीं आहे । पाहिजे तो पाहें वान येथें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां विश्वासाच्या बळें । ठेविलें मोकळें देवें येथें ॥ ३ ॥

॥ ३२३९ ॥

स्मरणाचे वेळे । व्हावें सावेध[2] न कळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पडिलों विषयांचे ओढीं । कोणी न दिसेसें काढी ॥ ध्रु ॥

---

१ त. "हे" नाहीं.—२ पं. सावधान कळे.

भांडवल माझें । वेच जालें भूमी ओझें ॥ २ ॥
तुका ह्मणे कळे । तूं चि धावें ऐसे वेळे ॥ ३ ॥

॥ ३२४० ॥

पाहा हो देवा कैसे जन । भिन्न भिन्न संचितें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक नाहीं एका ऐसे । दावीं कैसे शुद्ध हीन ॥ ध्रु ॥
पंचभूतें एकी रासी । सूत्रें कैसीं खेळवी[1] ॥ २ ॥
तुका[2] ह्मणे जे जे जाती । तैसी स्थिति येतसे ॥ ३ ॥

॥ ३२४१ ॥

कोणाचिया न पडों छंदा । गोविंदासी आळवूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहुतांचीं बहु[3] मतें । अवघे रिते[4] पोकळ ॥ ध्रु ॥
घटाफ्टा ढवळी मन । होय सीण न करूं तें ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंग । भरूं भाग[5] आला तो ॥ ३ ॥

॥ ३२४२ ॥

एकवेळ करीं या दुःखावेगळें । दुरिताचें जाळें उगवूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आठवीन पाय हा माझा नवस । रात्री ही[6] दिवस पांडुरंगा ॥ध्रु॥
बहु दूरवरी भोगविलें[7] भोगा । आतां पांडुरंगा सोडवावें ॥ २ ॥
तुका ह्मणे काया करीन कुरवंडी । ओंवाळूनि सांडीं मस्तक हें ॥ ३ ॥

॥ ३२४३ ॥

आणीक म्यां कोणा यावें काकुळती । कोण कामा येती अंतकाळीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तूं वो माझी सखी होसी[8] पांडुरंगे । लवकरी येगे वाट पाहें ॥ ध्रु॥

---

१ पं. ओळखावीं.—२ पं. तुका ह्मणे जो जे जाती । त्याची स्थिति तैसी ते॥.—३ पं. बहुत.—४ पं. रिती.—५ पं. भागा आलें तें.—६ पं. वो.—७ त. भोगविले भोगे । आतां पांडुरंगे०. दे. भोगविले भोग । आतां पांडुरंग.—८ पं. येसी.

काया वाचा मनें हें चि काम[1] करीं । पाउलें गोजिरीं चिंतीतसें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी पुरवीं हे आस । घालीं ब्रह्मरस भोजन हें ॥ ३ ॥

॥ ३२४४ ॥

आह्मांसी[2] सकळ । तुझ्या नामाचें चि बळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करूं अमृताचें पान । दुजें नेणों कांहीं आन ॥ ध्रु ॥
जयाचा जो भोग । सुख दुःख पीडा[3] रोग ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । तुझे पायीं माझा हेवा ॥ ३ ॥

॥ ३२४५ ॥

आर्त माझ्या बहु पोटीं । ठ्हावी भेटी पायांशी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ यासी तुह्मी कृपावंता । माझी चिंता असों द्या ॥ ध्रु ॥
तळमळ करी चित्त । अखंडित वियोगें ॥ २ ॥
तुका ह्मणे पंढरिनाथा । जाणें[4] वेथा अंतरींची ॥ ३ ॥

॥ ३२४६ ॥

बहु जन्मांतरें फेरे । केले येरे सोडवीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आळवितों करुणाकरे । विश्वंभरे दयाळे ॥ ध्रु ॥
वाहवतों मायापुरीं । येथें करीं कुढावा[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे दुजा कोण । ऐसा सीण निवारी ॥ ३ ॥

॥ ३२४७ ॥

कराल तें काय नव्हे जी विठ्ठला । चित्त द्यावें बोला बोबडिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सोडवूनि घ्यावें काळचक्रा[6] हातीं । बहुत विपत्ती भोगविल्या ॥ ध्रु ॥

---

१ पं. आस.—२ दे. हें आह्मां सकळा ।.—३ दे. त. पीडी.—४ पं. जाणां.—५ पं. कुडावा.—६ पं. काळाचक्राहातीं.

ज्यालें जीवों नेदी मारिलें चि मरे। प्रारब्ध तें उरे मागुतालें ॥ २ ॥
तुका ह्मणे दुजा खुंटला उपाय। ह्मणऊनि पाय आठविले ॥ ३ ॥

॥ ३२४८ ॥

डौरलों भक्तिसुखें। सेवूं अमृत हें मुखें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संतसंगें सारूं काळ। प्रेमसुखाचा कल्लोळ ॥ ध्रु ॥
ब्रह्मादिकांसी शिराणी[1]। तो हा आनंद मेदिनी ॥ २ ॥
नाहीं वैकुंठींचा पांग। धांवे कथे पांडुरंग ॥ ३ ॥
मुक्त व्हावें काशासाटीं। कैची येणें रसें भेटी[3] ॥ ४ ॥
तुका ह्मणे गोड। हें चि पुरे[4] माझें कोड[5] ॥ ५ ॥

३२४९

फोडिलें[5] भांडारें। माप घेऊनियां खरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केली हरिनामाची वरो। मागितलें आतां सरो ॥ ध्रु ॥
देशांत सुकाळ। जाला हारपला काळ ॥ २ ॥
घ्यावें धणीवरी। तुका ह्मणे लाहान थोरीं ॥ ३ ॥

३२५०

आनंदाचे डोहीं आनंदतरंग। आनंद चि अंग आनंदाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय सांगों जालें कांहींचियाबाही। पुढें चाली नाहीं आवडीनें ॥ ध्रु ॥
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा। तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ॥ २ ॥
तुका ह्मणे तैसा ओतलासे ठसा। अनुभवें[6] सरिसा मुखा आला ॥ ३ ॥

---

१ दे. ज्यालें जेऊं नेदी मारिलें चि मरो। प्रारब्धा उरो मागुतालीं. त. ज्यालें जेऊं नेदी मारिलें चि मरे। प्रारब्धा उरे मागुतालें ॥.—२ त. दे. सुराणी.—३ पं. तुटी.—४ पं. माझें पुरे.—५ दे. त. फोडिलें भांडार।.—६ त. अनुभवा.

३२५१

ह्मणऊनि धरिले पाय । अवो माय विठ्ठले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलें चि करूनि घ्यावें । आश्वासावें नाभीसें[1] ॥ ध्रु ॥
वाढली ते तळमळ चित्तीं[2] । शम आतां करावी ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवीं वसे । मज नसे वेगळीं ॥ ३ ॥

॥ ३२५२ ॥

कल्याण या आशीर्वादें । जासी द्वंद्वें नासोनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आश्वासिलें नारायणें । प्रेमदानें अंतरिंच्या ॥ ध्रु ॥
गेली निवारोनि आतां । सकळ चिंता यावरि ॥ २ ॥
तुका ह्मणे गातां गीत । आलें हित सामोरें ॥ ३ ॥

॥ ३२५३ ॥

हरिनामवेली[3] पावली विस्तार । फळीं पुष्पीं भार वोल्हावली[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें[5] माझ्या मना होई पक्षिराज । साधावया काज तृप्तीचें या[6] ॥ ध्रु ॥
मुळींचिया बीजें दाखविली गोडी । लवकर[7] चि जोडी जालियाची ॥ २ ॥
तुका ह्मणे क्षणक्षणां जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ॥ ३ ॥

३२५४

बरवें ऐसें आलें मना । नारायणा या काळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव आह्मा प्राणसखा । जालें दुःखा खंडण ॥ ध्रु ॥
जन्मांतरिंच्या पुण्यरासी । होत्या त्यांसी फळ आलें ॥ २ ॥
तुका ह्मणे निजठेवा । होईल देवा[8] लाधलों ॥ ३ ॥

---

१ दे. आह्मास.—२ दे. चिंता.—३ पं. हरिनामवल्ली.—४ दे. बोल्हावला.—५ पं. येथें.—६ पं. तृप्तीच या.—७ पं. लाहो करीं जोडी०.—८ दे. त. हेवा.

॥ ३२५५ ॥

जरि हे आड येती लाज । कैसें काज साधतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करणें[1] केलें उठाउठी । पायीं मिठी घातली ॥ ध्रु ॥
समर्पिला जीव भाव । धरिला भाव अखंड ॥ २ ॥
तुका ह्मणे आड कांहीं । काळ नाहीं घातला ॥ ३ ॥

॥ ३२५६ ॥

पात्र शुद्ध चित्त ग्वाही[2] । न लगे कांहीं सांगणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शूर तरी सत्य चिं[3] व्हावें । साटी जीवें करूनि ॥ ध्रु ॥
अमुप च सुखमान । स्वामी जन मानावें[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे जैसी वाणी । तैसें[4] मनीं परिपाक ॥ ३ ॥

॥ ३२५७ ॥

प्रगटलें ज्ञान । नारायण भूतीं तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनुभव च घेऊं व्हावा । विनंती देवा करूनियां ॥ ध्रु ॥
देखोवेखीं वदे वाणी । पडिल्या कानीं प्रमाणें ॥ २ ॥
तुका ह्मणे योगक्षेम । घडे तें वर्म साधावें ॥ ३ ॥

॥ ३२५८ ॥

मुख्य आधीं विषयत्याग । विधिभाग पाळणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मन पावे समाधान । हें चि दान देवाचें ॥ ध्रु ॥
उदासीन वृत्ति देहीं । चाड नाहीं पाळणें ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं भय । सम सोय विषमाची ॥ ३ ॥

---

१ दे. कारण.—२ दे. गोही.—३ पं. " चि " नाहीं.—४ पं. तैसा.—५ पं. मना.

॥ ३२५९ ॥

आतां हें चि सार हें चि, सार । मूळबीज रे आइका[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडीनें आवडी उरे । जें ज्या झुरे तें त्यासी ॥ ध्रु ॥
प्रेमाचिया सूत्रदोरी । नाहीं उरी उरवी ॥ २ ॥
तुका ह्मणे चिंतन बरें । आहे[2] खरें खऱ्यापें ॥ ३ ॥

॥ ३२६० ॥

केला तैसा अंगीकार । माझा भार चालवीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होऊं अंतराय बुद्धी । कृपानिधी नेदावी ॥ ध्रु ॥
आह्मी तरी जड जीव । कैंचा भाव पुरता ॥ २ ॥
अनन्यभावें ध्यावी सेवा । आह्मां देवा घडेसी ॥ ३ ॥
तुझीं आह्मी शरणागतें । कृपावंतें रक्षीजे ॥ ४ ॥
तुका ह्मणे भाकूं कींव । असों जीवें[3] जड आह्मी ॥ ५ ॥

॥ ३२६१ ॥

सोसें बहुगर्भवासीं । मेलों असों उपवासीं ।
नाहीं सखीं ऐसीं । तेथें कोणी भेटलीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करीं करीं रे स्वहित । देह तंव हे अनित्य ।
नाहीं दिलें चित्त । सोडवूं मोहापासोनि ॥ ध्रु ॥
पाळी तोंडींचिया घांसें । तें चि होय अनारिसें ।
ज्या नव्हे ऐसें । खेदी परि सोडवीना ॥ २ ॥
तुका ह्मणे धनमानें । माझ्या बाटलों[4] मीपणें ।
नाहीं दिला जनें । देखों लाभें[5] हा लाभ ॥ ३ ॥

---

१ पं. ऐका.—२ आहो.—३ पं. जडजीव.—४ त. बाटविलों.—५ पं. लाभ आलाभ.

॥ ३२६२ ॥

इच्छिती तयांसी व्हावें जी अरूप । आह्मांसी स्वरूपस्थिती चाड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां नव्हे माझा भाव अनारिसा । पाउलांनीं इच्छा गोवियेली ॥ ध्रु ॥
लेंकरासी कोठें जाणत्याची परी । क्रूरू येते दुरी धरावया[1] ॥ २ ॥
लागली न सुटे नामाची आवडी । माझी भावजोडी भंगूं नको[2] ॥ ३ ॥
घेसीलें[3] वेढे मुक्तीच्या अभिळासें । चाळवीं जा पिसे ब्रह्मज्ञानी ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझा कोठें भक्तिरस । पाडावया ओस चाळविसी ॥ ५ ॥

॥ ३२६३ ॥

आह्मां भाविकांची जाती । एकविध जी श्रीपती ।
अळंकारयुक्ति । सरों तेथें[4] शके चि ना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाणें माउली त्या खुणा । क्षोभ उपजों नेदी मना ।
शांतवूनि स्तना । लावीं अवो कृपाळे ॥ ध्रु ॥
तुज अवघें होऊं येतें । मज बाटों नये चित्तें ।
उपासने परतें । नये कांहीं आवडों[5] ॥ २ ॥
करूं रूपाची कल्पना । मुखीं नाम उच्चारणा[6] ।
तुका ह्मणे जना । जल स्थल देखतां ॥ ३ ॥

॥ ३२६४ ॥

ज्यावें हीनपणें । कासयाच्या प्रयोजनें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रारब्धीं संसार । बरी हिमतीची थार ॥ ध्रु ॥

---

१ पं. धरायाचे.—२ पं. नको.—३ पं. घेसी आढे वेढे०.—४ दे. त. "तेथें" नाहीं.—५ पं. आवडे.—६ पं. नारायणा.

होणार ते कांहीं । येथें अवकळा नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे देवें । कृपा केलिया बरवें ॥ ३ ॥

॥ ३२६५ ॥

किती रांडवंडे । घालूनि व्हाल रे बापुडे ।
संसाराचे भिडे । कासावीस जालेती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझ्या स्वामी शरण रिघा । कृपाळुवा पांडुरंगा ।
ठेवी अंगसंगा । विश्वासियां जवळी ॥ ध्रु ॥
कांहीं न मागतां भलें । होईल तें चि काम केलें ।
नसावें आथिलें । कांहीं एका[1] संकल्पें ॥ २ ॥
तुका ह्मणे भाव । पाववील ठायाठाव ।
एकविध जीव । ठेविलिया सेवेसी ॥ ३ ॥

॥ ३२६६ ॥

बाप करी जोडी लेंकराचें[1] ओढी । आपुली करवंडी[2] वाळवूनी ॥ १ ॥
॥ ध्रु. एकाएकीं केला[3] मिरासीचा धनी । कडिये वागवूनी[4] भार खांदीं ॥ ध्रु ॥
लेवूनी[5] पाहे डोळा अळंकार । टेवा[6] दावी थोर करूनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे नेदी गांजूं आणिकांसी । उदार जीवासी आपुलिया ॥ ३ ॥

॥ ३२६७ ॥

या रे हरिदासानो जिंकों काळिकाळा । आमुचिया बळा पुढें किती बापुडें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रंग सुरंग घमंडी नाना छंदें । हास्यविनोदें मनाचिये आवडी ॥ ध्रु. ॥
येणें तेणें प्रकारें बहुतां सुख जोडे । पूजन तें घडे नारायणा अंतरीं ॥ २ ॥

---

१ पं. एक संकल्पें.—२ त. करवडी.—३ दे. त. केलों.—४ पं. वाऊनी.—५ पं. घालूनियां.—६ दे. त. ठेवा.

वांकड्या माना बोल बोलावे आर्ष । येईल तो त्यांस छंद पढीयें गोविंदा ॥ ३ ॥
आपुलालें आवडी एकापुढें एक नटा । नाहीं थोर मोठा लहान या प्रसंगीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे येथें प्रेम भंगूं नये कोणीं । देव भक्त दोन्ही निवडितां पातक ॥ ५ ॥

॥ ३२६८ ॥

अवघा च अन्यायी । तेथें एकल्यांचें काई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां अवघें एकवेळें । जळोनि सरो तें निराळें ॥ ध्रु ॥
काय माझें खरें । एवढें च राखों बरें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । परिहार न लगे चित्ता ॥ ३ ॥

॥ ३२६९ ॥

काय वृंदावन[1] मोहियेलें गुळें । काय जिरें काळें उपचारिलें ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ तैसी अधमाची जाती च अधम । उपदेश श्रम करावा तो ॥ध्रु॥
न कळे विंचासी कुरवाळिलें अंग । आपले ते रंग दावीतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे नये पाकासी दगड । शूकरासी गोड जैसी विष्ठा ॥ ३ ॥

॥ ३२७० ॥

स्तवूनियां नरा । केला आयुष्याचा[2] मातेरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नारायणाचिया[3] लोपें । घडलीं अवघीं चि पापें ॥ ध्रु ॥
जीव ज्याचें दान । त्याचा खंडूनियां[4] मान ॥ २ ॥
तुका ह्मणे वाणी । आइके त्या दोष कानीं ॥ ३ ॥

॥ ३२७१ ॥

संतां नाहीं मान । देव मानी मुसलमान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसे पोटाचे मारिले । देवा[5] आशा विटंबिले ॥ ध्रु ॥
घाली लोटांगण । वंदी नीचाचे चरण ॥ २ ॥
तुका ह्मणे धर्म । न कळे माजल्याचा भ्रम ॥ ३ ॥

---

१ दे. त. इंद्रावण.—२ पं. आयुष्या.—३ पं. नारायणाचिई.—४ पं. खंडूं नये.—५ पं. देवे.

॥ ३२७२ ॥

अवो कृपावंता । होई बुद्धीचा ये[1] दाता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेणें पाविजे उद्धार । होय तुझे पायीं थार ॥ ध्रु ॥
वदवीं हे वाचा । भाव पांडुरंगीं साचा ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । माझे अंतर वसवा[2] ॥ ३ ॥

॥ ३२७३ ॥

नाहीं म्या वंचिला मंत्र कोणापाशीं । राहिलों जीवासीं धरूनि[3] तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठेवरी भावें[4] ठेवियेलें मन । पाउलें समान चिंतितसें ॥ ध्रु ॥
पावविलों[5] पार धरिला विश्वास । घालूनियां कास बळकट ॥ २ ॥
तुका ह्मणे मार्गें पावले उद्धार । तिहीं हा आधार ठेविलासे ॥ ३ ॥

॥ ३२७४ ॥

चंचळीं[6] चंचळ निश्चळीं निश्चळ । वाजवी खळाळ उदकासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सोपें वर्म परि मन नाहीं हातीं । हा हा भूत चित्तीं भ्रम गाढा ॥ ध्रु ॥
रविबिंब नाहीं तुटत उदका । छायेची ते नका सरी धरूं ॥ २ ॥
तुका ह्मणे भय धरी रज्जूसाटीं । नाहीं साच पोटीं कळलें तों ॥ ३ ॥

॥ ३२७५ ॥

आवडी येते[7] कळों । गुणें चिन्हें उमटती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पोटीचें ओठीं उभें राहे । चित्त साहे मनासी ॥ ध्रु ॥
डोहोळियाची[8] भूक गर्भा । तातीं प्रभा प्रतिबिंबे ॥ २ ॥
तुका ह्मणे मानोन घ्यावें । वाटे खावें वाटतें ॥ ३ ॥

---

१ पं. तूं.—२ पं. त. वसावा.—३ पं. धरूनियां.।—४ दे. भाव.—५ दे. पावविला.—६ दे. चंचळ चंचळ निश्चळ निश्चळ । पं. चंचळें.—७ पं. ०येते गुणे । कळों चिन्हें०.—८ दे. डाहोळे याची. पं. डोहळे याची.

॥ ३२७६ ॥

काय ऐसी वेळ । वोडवली अमंगळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आजि दुखवलें मन । कथाकाळीं जाला सीण ॥ ध्रु ॥
पापाचिया गुणें[1] । त्यांचिया वेळे दर्षणें[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे कानीं । घालूं आले दुष्टवाणी ॥ ३ ॥

॥ ३२७७ ॥

कितीवेळां[3] जन्मा यावें । नित्य व्हावें फजीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि जीव भ्याला । शरण गेला विठोबासी[4] ॥ ध्रु ॥
प्रारब्ध पाठी गाढें । न सरे पुढें चालतां[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे रोकडी[6] हे । होती[7] पाहें फजीती ॥ ३ ॥

॥ ३२७८ ॥

होतों[8] सांपडलों वेठी । जातां भेटी संसारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तों या वाटे कृपा केली । भेटी जाली विठोबासी[9] ॥ ध्रु ॥
होता भार माथां माझे । बहु ओझें अमुप ॥ २ ॥
तुका ह्मणे केली चिंता । कोण दाता भेटेल ॥ ३ ॥

॥ ३२७९ ॥

भुंकुनियां सुनें लागे हस्तीपाठी । होऊनि हिंपुटी दुःख पावे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय त्या मशकें तयाचें करावें । आपुल्या स्वभावें पीडतसे ॥ध्रु॥
मातलें बोकडें[10] विटवी पंचानना । घेतलें मरणा धरणें तें[11] ॥ २ ॥
तुका ह्मणे संतां पीडितील खळ । घेती तोंड काळें करूनियां ॥ ३ ॥

---

१ त. मुळें.—२ पं. दर्शनें.—३ पं. किती.—४ पं. विठोसी.—५ दे. चालत.—६ दे.० रोकडीं हे । होती पिहें काढीत ॥.—७ पं. होऊं.—८ पं. होती.—९ पं. विठोसी.—१० पं. माकड.—११ पं. तेणें.

॥ ३२८० ॥

जा रे तुह्मी पंढरपुरा । तो सोयरा दीनांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गुण दोष नाणी मना । करी आपणासारिखें ॥ ध्रु ॥
उभारोनि उभा कर । भवपार उतराया ॥ २ ॥
तुकाह्मणे तांतड मोठी । जाली भेटी उदंड ॥ ३ ॥

॥ ३२८१ ॥

गर्जत जावें नामावळी । प्रेमें टाळी वाहोनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येणें सुखें पुढती धांवे । भेटी सवें गोपाळा ॥ ध्रु ॥
लोटांगणें[1] घाला तळीं । वंदा धुळी संतांची ॥ २ ॥
तुका ह्मणे विठ्ठल लाहो । ऐसा बाहो उभारा ॥ ३ ॥

॥ ३२८२ ॥

अनुसरे तो अमर जाला । अंतरला संसारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न देखती गर्भवास । कधीं दास विष्णूचे ॥ ध्रु ॥
विसंभेना माता बाळा । तैसा लळा पाळावा ॥ २ ॥
त्रिभुवनीं ज्याची सत्ता । तुक्यो[2] रक्षिता तो जाला ॥ ३ ॥

॥ ३२८३ ॥

आतां केशीराजा हे चि विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देह असो माझा भलतिये ठायीं । चित्त तुझ्या पायीं असों द्यावें ॥ ध्रु ॥
काळाचें खंडण घडावें चिंतन । धनमानजनविन्मुख[3] तो ॥ २ ॥

---

१ पं. लोटांगणें.—२ दे. पं. तो रक्षिता जालिया. (या अभंगांत "तुका" नाहीं).—३ पं. तनमनधन विन्मुखता. ।

कफवातापित्त देहअवसानीं । ठेवावीं वारूनि दुरितें हीं ॥ ३ ॥
सावध तों माझीं इंद्रियें सकळें[1] । दिलीं एकां[2] वेळे हाक आधीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे तूं या सकळांचा जनिता । येथें ऐकतां[3] सकळांसी ॥ ५ ॥

॥ ३२८४ ॥

चित्त तें चिंतन कल्पनेची धांव । जे जे वाढे हांव इंद्रियांची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हात पाव दिसे शरीर चालतां । नावें भेद सत्ता जीवाची ते ॥ ध्रु ॥
रवीचिये अंगीं प्रकाशक[4] कळा । वचनें निराळा भेद दिला ॥ २ ॥
तुका ह्मणे माप वचनाच्या अंगीं । मौन्य काय रंगीं निवडावें ॥ ३ ॥

॥ ३२८५ ॥

बोलोनियां काय दावूं । तुह्मी जीऊ जगाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे चि आतां माझी सेवा । चिंतन देवा करितों ॥ ध्रु ॥
विरक्तासी देह तुच्छ । नाहीं आस काशाची[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे पायापाशीं । येइन ऐसी वासना ॥ ३ ॥

॥ ३२८६ ॥

निजों नेदी[6] सकाळवेळीं । रातीकाळी चिनचिनी[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वोंगळानें घेतली पाठी । केली आटी जीवासी ॥ ध्रु ॥
मेळऊनि सर्वें[8] जन । चिंता नेणे देवळीं च ॥ २ ॥
तुका ह्मणे आलों घरा । तोंडा घोरा बाइलेच्या ॥ ३ ॥

॥ ३२८७ ॥

मायबाप सर्वें नये धनावित्त । करावें संचित भोगावें तें ॥ १ ॥

---

१ पं. सकळ.—२ पं. एक.—३ त. आहिक्येता.—४ पं. प्रकाश सकळा.—५ दे. त. देहाची.—६ दे. त. नव्हें.—७ त. चिणचिणी. दे. चिंन चिंनी.—८ पं. कथा करणें.

॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि लाभ काय तो विचारीं । नको चालीवरी चित्त ठेवूं ॥ ध्रु ॥
आयुष्य सेवटीं सांडूनि जाणार । नव्हे चि साचार शरीर हें[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे काळें लावियेलें माप । जमा[2] धरी पापपुण्याची ही ॥ ३ ॥

॥ ३२८८ ॥

मोटळें हाटीं सोडिल्या गांठी । विकऱ्या घातलें[3] कण ।
ज्याचे भाग त्यासी देऊनि वारिलें । सारूनि लिगाड दानें[4] ।
खरें माप हातीं घेऊनि[5] बैसलों । मानिती ते चौघे जनें[6] ।
खरें वित्त तेथें आलें चोजवीत । गिऱ्हाइक संतजन ॥ १ ॥
॥ध्रु.॥ झाडिला पालव केला हाट वेच । जाली सकाळीं[7] च अराणूक ।
याल तरि तुह्मी करा लगबग । आमचे ते कोणी लोक ॥ ध्रु ॥
एक ते[8] उत्तम मध्यम कनिष्ठ । वित्ताचे प्रकार तीन ।
बहुतां जनाचे बहुत प्रकार । वेगळाले वाण ।
लाभ हाणि कोणा मुदल जालें । कोणासी पडिलें खाण ।
अर्धमर्ध कोणी गुंतोनि राहिले । थोडे तैसे बहु जन ॥ २ ॥
एके सांते आले एके गांवीहून । येकामे चि नव्हे जाणें ।
येतां जातां रुजू नाहीं दिवाणा । काळतोंडीं एकें तेणें ।
लाग भाग एकी एकानीं गोविलें । मागील पुढिलां ऋणें ।
तुका ह्मणे आतां पाहूं नये वास । साधावें आपुलें पेणें ॥ ३ ॥

---

१ दे. त. हें.—२ दे. त. जमे.—३ दे. घातलें केण.—४ पं. दाणें.—५ पं. "घेऊनि" नाहीं.—६ पं. जणे.—७ पं. सकळी.—८ पं. "एक" नाहीं.—९ पं. एक.

॥ ३२८९ ॥

करा करा लागपाट । धरा पंढरीची वाट ।
जंव नाहीं चपेट । घात पडिला काळाचा ॥ १ ॥
दुजा ऐसा नाहीं कोणी । जो या काढी भयांतूनि ।
करा ह्मणऊनि । हा विचार ठायींचा ॥ ध्रु ॥
होती गात्रें बेंबळीं । दिवस अस्तमाना[1] काळीं ।
हातपायटाळीं । जों[2] मोकळीं आहेती ॥ २ ॥
कां रे घेतलासी सोसें[3] । तुज वाटताहे कैसें ।
तुका ह्मणे ऐसें । पुढें कैं लाहासी ॥ ३ ॥

॥ ३२९० ॥

यत्न आतां तुह्मी करा । मज दातारा सत्तेनें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विश्वास तो पायांवरि । ठेवुनि हरी राहिलों ॥ ध्रु ॥
जाणत चि दुजें नाहीं । आणीक कांहीं प्रकार ॥ २ ॥
तुका ह्मणे शरण आलों । नेणें बोलों विनवितां ॥ ३ ॥

॥ ३२९१ ॥

अनाथां जीवन । आह्मां तुमचे चरण ।
करूनि सांटवण । धरीयेलें त्वदर्यीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुष्ट जाली अंगकांति । आनंद न समाये चित्तीं ।
कथतुकें प्रीती । गाऊं नाचों उल्हासें ॥ ध्रु ॥
करुणाउत्तरीं । करूं आळवण हरी ।

---

१ पं. अस्तमानकाळीं । हातें वाहा टाळी । जों मोकळी आहे तों. ॥—२ त. दे. जें.—
३ पं. सोस । तुज वाटसे.

जाऊं नेदूं दुरी । प्रेमप्रीतिपडिभरें ॥ २ ॥
मोहो मांते[1] करी गोवा, । ऐसें आहे जी केशवा ।
तुका ह्मणे सेवा । आणीक नाहीं जाणत ॥ ३ ॥

॥ ३२९२ ॥

सुखाची वसति जाली माझे जीवीं । तुमच्या गोसावी कृपादानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रूप वेळोवेळां आठवीं अंतरीं । बैसोनि जिव्हारीं राहिलें तें ॥ ध्रु ॥
विसांवलें मन विठ्ठलें प्रपंचा । गोडावली वाचा येणें रसें ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं नाठवेसें केलें[2] । दुसरें विठ्ठलें मज आतां ॥ ३ ॥

॥ ३२९३ ॥

आह्मां कांहीं आह्मां कांहीं । आतां नाहीं या बोलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मोल सांगा मोल सांगा । वेणें तिहीं गा पुसावें ॥ ध्रु ॥
कैसें घडे कैसें घडे । बडबड तुज मज ॥ २ ॥
मुदलें साटी मुदलें साटी । लाभ पोटीं त्या चें[3] मधीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे साटवूं घरीं । आडल्या काळें पुसती तरी ॥ ४ ॥

॥ ३२९४ ॥

घ्या रे भाई घ्या रे भाई । कोणी कांहीं थोडें बहु ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ये च हाटीं ये च हाटीं । बांधा गाठी पारखून ॥ ध्रु ॥
वेच आहे वेच आहे । सरलें पाहे मग खोटें ॥ २ ॥
उघडें दुकान उघडें दुकान । रात्री[4] जाली कोण सोडी मग ॥ ३ ॥
तुका ह्मणे अंतकाळीं । जाती टाळीं बैसोनि ॥ ४ ॥

---

१ पं. ममते.—२ पं. जालें.—३ पं. "च" नाहीं.—४ पं. रात्र.

॥ ३२९५ ॥

मार्ग चुकले विदेशीं एकले । तयावरि ताले दिशाभुली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हातीं धरूनियां पावविले घरा । त्याच्या उपकारा काय द्यावें ॥ ध्रु ॥
तैसा मी कुडकुडा होतों केशीराजा । सेवा न घडे लाजा ह्मणऊनि ॥२॥
सांडियेला गर्भ उबगोनि माउली । नाहीं सांभाळिली भूमि शुद्ध ॥ ३ ॥
उष्ण तान भूक एवढिये अकांतीं । वोसंगा लावितो काय ह्मणिजे ॥ ४ ॥
खांद्यावरी शूळ मरणाचे वाटे । अन्याय हि मोटे साच केले ॥ ५ ॥
हातींचें हिरोनि घातला पाठीसी । तुका ह्मणे ऐसी परी जाली ॥६॥

॥ ३२९६ ॥

जैसी तैसी तरि वाणी । मना आणी माउली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लेकरांच्या स्नेहें गोड । करी कोड त्या गुणें ॥ ध्रु ॥
मागें पुढें रिघे पोटीं । साहे खेटी करीतें[1] ॥ २ ॥
तुका विनवी पांडुरंगा । ऐसें पैं गा आहे हें ॥ ३ ॥

॥ ३२९७ ॥

गुणांची[2] आवडी वाचेचा पसरु । पडिला विसरु इतरांचा[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आदिमध्यअंतीं नाहीं अवसान । जीवनीं जीवन मिळोनि गेलें ॥ ध्रु ॥
रामकृष्णनाममाळा हे साजिरी । ओविली गोजिरी कंठाजोगी ॥ २ ॥
तुका ह्मणे तनु जालीसे शीतळ । अवघी सकळ ब्रह्मानंदें ॥ ३ ॥

---

१ पं. करीतसे.—२ दे. गुणांचे.—३ पं. सर्वरसां.

॥ ३२९८ ॥

देवाची भांडारी । आदा, विनियोग करी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां न माखे हातपाय । नेणों होतें ऐसें काय ॥ ध्रु ॥
देवें नेली चिंता । जाला सकळ करिता ॥ २ ॥
तुका ह्मणे धणी । त्यासी अवघी पुरवणी ॥ ३ ॥

॥ ३२९९ ॥

पेणावलें ढोर मार खाय पाठी । बैसलें तें नुठी तेथूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसी माझ्या मना परीं जाली देवा । धावें अहंभावा सांडावलों ॥ ध्रु ॥
कडां घालीं उडी मागिलांच्या भेणें । मरणामरण न कळे चि ॥ २ ॥
तुका ह्मणे जालों त्यापरी दुःखित । असें बोलावीत पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३३०० ॥

जालिया दर्शन करीन मी सेवा । आणीक ही देवा न लगे दुजें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रारब्धा अधीन अन्न आच्छादन । स्थिर करोनि मन ठेवीं पायीं ॥ ध्रु ॥
ये गा ये गा ये गा कृपाळुवा हरी । निववीं अभ्यंतरीं देउनि भेटी ॥ २ ॥
आसावलें मन जीवनाचे ओढी । नामरूपें गोडी लावियेली ॥ ३ ॥
काय तुह्मांपाशीं नाहीं भांडवल । माझे मिथ्या बोल जाती ऐसे ॥ ४ ॥
काय लोखंडाचे पाहे गुण दोष । सिवोनि परिस सोनें करी ॥ ५ ॥
तुका ह्मणे माझें अवघें असों द्यावें । आपुलें करावें ब्रीद साच ॥ ६ ॥

---

१ पं. नेणें.—२ पं. येणावले.—३ त. सांडवलें. पं. सांडवलों.—४ पं. पेरणें मरणें.—५ पं. कांहीं.—६ दे. त. अंगीं.

॥ ३३०१ ॥

येथें आड कांहीं न साहे आणीक । प्रमाण तें एक हें चि जालें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गाऊं नाचूं टाळी वाऊं[1] गीत छंदें । डोलवूं विनोदें अंग तेणें ॥ ध्रु ॥
मथुनियां सार काढिलें बाहेरी । उपाधि ते येरी निवडिली ॥ २ ॥
तुका ह्मणे जगा लाविली शिराणी । सेवितां हे धणी होत नाहीं ॥ ३ ॥

॥ ३३०२ ॥

शरणागत जालों । तेणें मीपणा मुकलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां दिल्याची च वाट । पाहों नाहीं खटपट ॥ ध्रु ॥
नलगे उचित । कांहीं पाहावें संचित ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवा । मोने[2] तैसी करूं देवा ॥ ३ ॥

॥ ३३०३ ॥

वाचेचिया आळा कवळिलें ब्रह्म । चुकविला श्रम पृथक तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुलभ[3] जालें सुलभ जालें । जवळी आलें पंढरिये ॥ ध्रु ॥
नामरूपाचें बांधलें मोटळें । एक एका वेळे सारियेलें ॥ २ ॥
तुका ह्मणे वाटे चुकली[4] वसती । उद्धार[5] तो हातीं आणियेला ॥ ३ ॥

॥ ३३०४ ॥

सवंग जालें सवंग जालें । घरा आलें बंदरींचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां हेवा करा[6] सोस । भक्तिरस बहु गोड ॥ ध्रु ॥
पाउल वेचे चिंता नाहीं । आड कांहीं मग नये ॥ २ ॥
तुका ह्मणे संचिताचें । नेणें काचें राहों तें[7] ॥ ३ ॥

---

१ दे. गाऊं (दोन वेळ).—२ पं. मौन्य.—३ पं. सुलभ तें जालें सुलभ तें जालें । जवळी तें आलें पंढरीये॥.—४ पं. चुकविली.—५ दे. त. पं. उधार.—६ दे. त. करावा.—७ पं. हें.

॥ ३३०५ ॥

तुह्मी संत मायबापकृपावंत । काय मी पतित कीर्ती वाणूं[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवतार तुह्मां धरोया[2] कारण[3] । उद्धरावे जन जड जीव ॥ ध्रु ॥
वाढविलें सुख भक्ति भाव धर्म । कुळाचार नाम विठोबाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे गुण चंदनाचे अंगीं । तैसे तुह्मी जगीं संतजन ॥ ३ ॥

॥ ३३०६ ॥

पाठी लागे तया दवडीं दुरी । घालीं यां[4] बाहेरी संवसारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येउनि दडें तुमच्या पायीं । धांवें तईं छो ह्मणा ॥ ध्रु ॥
पारखियाचा वास पडे । खडबडे[5] उठी तें ॥ २ ॥
तुका ह्मणे लाविला धाक । नेदी ताक खाऊं कोणी[6] ॥ ३ ॥

॥ ३३०७ ॥

सांखळिलों[7] प्रीती गळां । भुंके वेळा जाणोनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमचें मी केशीराजा । सुनें या काजा पाळिलों[8] ॥ ध्रु ॥
आलें गेलें कळे वाटा । कोण निटा वाकडिया ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें वारी । दुरितें दुरी नातळतां ॥ ३ ॥

॥ ३३०८ ॥

सुनियांचा हा चि भाव । आपला ठाव राखावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दुजियाचा येऊं[8] वारा । नेदूं घरावरी येऊं[8] ॥ ध्रु ॥
केली याची फाडाफाडी । तडामोडी[9] क्षेत्रांची[10] ॥ २ ॥
पातेजत नाहीं लोकां । तुका देवावांचूनि ॥ ३ ॥

---

१ पं. काय पतित कीर्ती वर्णूं.—२ पं. ध्यावया०.—३ दे. पं. कारणें.—४ पं. "या" नाहीं.—५ दे. खटवड.—६ पं. कोणा.—७ पं. पाळिलें.—८ दे. देऊं.—९ पं. कडातोडी.—१० दे. पं. क्षत्राची,

॥ ३३०९ ॥

सुनियांची आवडी देवा । धेत सेवा नाहीं कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सिकविलें जवळी बैसों । जेथें असों तेथें चि ॥ ध्रु ॥
नेदी दुजें बोलों करूं । गुरुगुरु न साहे ॥ २ ॥
तुका ह्मणे कुर्वाळितां[1] । अंग सत्ता संगाची[2] ॥ ३ ॥

॥ ३३१० ॥

सिळें खातां आला वीट । सुनें धीट पाय[3] धरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कान्होबा ते जाणे खूण । उन उन घास घाली ॥ ध्रु ॥
आपुलिये[4] ठायींचें घ्यावें । लाड भावें पाळावा ॥ २ ॥
तुका ह्मणे मी जुनाट[5] । मोहो आट परतला ॥ ३ ॥

॥ ३३११ ॥

लागलें भरतें । ब्रह्मानंदाचें[6] वरतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाला हरिनामाचा तारा । सीड लागलें फरारा ॥ ध्रु ॥
बैसोनि सकळ । बाळ चालिले[7] गोपाळ ॥ २ ॥
तुका ह्मणे वाट । बरवी सांपडली नीट[8] ॥ ३ ॥

॥ ३३१२ ॥

धनें[9] वित्तें कुळें । अवघियानें ते आगळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्याचे नारायण गांठीं । भरला हृदय संपुटीं ॥ ध्रु ॥
अवघें चि गोड । त्याचें पुरलें[10] सर्व कोड ॥ २ ॥
तुका ह्मणे अस्त । उदय त्याच्या तेजा नास्त ॥ ३ ॥

---

१ दे. त. कुर्वाळितां.—२ पं. संतांची.—३ दे. पावि.—४ पं. आपुले ठाईचे द्यावें.—५ पं. जुनाट सुनें । मीहो तेणें परतला.—६ त. पं. ब्रह्मानंदाही.—७ पं. चाले.—८ पं. वाट (ह्म. चवथ्या ओळीच्या दोन्ही चरणांचा अंतशब्द एकच आहे).—९ पं. धन वित्तें कुळें. दे. धनें वित्त कुळें.—१० पं. पुरे.

॥ ३३१३ ॥

बोलावें तें आतां आह्मी अबोलणे[1] । एका चि वचनें सकळांसी ॥ १ ॥
मेघवृष्टि कांहीं न विचारी ठाव । जैसा ज्याचा भाव त्यासी फळे[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं समाधानें चाड । आपणा ही नाड पुढिलांसीं ॥ ३ ॥

॥ ३३१४ ॥

अधिकार तैसा[2] करूं उपदेश । साहे ओझें त्यास तें चि द्यावें ॥ १ ॥
मुंगीवरी भार गजाचें पाळण[4] । घालितां तें कोण कार्यसिद्धि ॥ २ ॥
तुका ह्मणे फांसे वाघुरा कुऱ्हाडी । प्रसंगीं तों काढी पारधी तो ॥ ३ ॥

॥ ३३१५ ॥

नव्हों वैद्य आह्मी अर्थाचे भुकेले । भलते द्यावे पाले भलत्यासी ॥ १ ॥
कुपथ्य करूनि विटंबावे रोगी । काय हे सलगी भीड त्याची ॥ २ ॥
तुका ह्मणे लासूं[5] फांसूं देऊं डाव । सुखाचा उपाव पुढें आहे ॥ ३ ॥

॥ ३३१६ ॥

नव्हें परि ह्मणवीं दास । कांहीं निमित्तास मूळ केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमचा तो धर्म कोण । हा आपण विचारा ॥ ध्रु ॥
नाहीं शुद्ध आचरण । परी चरण चिंतितों ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । ऐसें कां गा नेणां हें ॥ ३ ॥

॥ ३३१७ ॥

मागें चिंता होती आस । केला नास या काळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी आह्मां उदासीन । भिन्नाभिन्न वारिलें ॥ ध्रु. ॥

---

१ पं. बोलणें.—२ त. तैसा.—३ दे. फळो.—४ दे. त. पालाण.—५ दे. लांस फांस.

मोहजाळें दुःख वाढे[1] । ओढे ओढे त्यास तें ॥ २ ॥
तुका ह्मणे कोण देवा । आतां हेवा वाढवी ॥ ३ ॥

॥ ३३१८ ॥

आहो उभा[2] विटेवरी । भरोवरी चुकविली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निवारलें[3] जाणें येणें । कोणा कोणें रुसावें ॥ ध्रु ॥
संकल्पासी वेचे बळ । भारे[4] फळ निर्माण ॥ २ ॥
तुका ह्मणे उभयतां । भेटी सत्ता लोभाची ॥ ३ ॥

॥ ३३१९ ॥

असो खटपट । आतां वाउगे बोभाट[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परिसा हे विनवणी । असो मस्तक चरणीं ॥ ध्रु ॥
अपराध करा । क्षमा घडले दातारा ॥ २ ॥
तुका ह्मणे वेथा । तुह्मा कळे पंढरिनाथा ॥ ३ ॥

॥ ३३२० ॥

वारकरी पायांपाशीं । आले त्यांसी विनविलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय काय तें आइका । विसरों नका रंकासी ॥ ध्रु ॥
चिंतावोनि चिंता केली । हे राहिली अवस्था ॥ २ ॥
तुका ह्मणे संसारा । रुसलों खरा यासाठीं ॥ ३ ॥

॥ ३३२१ ॥

जीवींचें कां नेणां । परि हे आवडी नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाढवावें हें उत्तर । कांहीं लाज करकर ॥ ध्रु ॥

---

१ पं. वाढे । वाढे वाढे.—२ पं. उभे या विटे०.—३ पं. निवारिलें.—४ त. भार.—५ पं. लाड.

कोठें वांयां गेले । शब्द उत्तम चांगले ॥ २ ॥
तुका ह्मणे बाळा । असतात[1] प्रिय खेळा ॥ ३ ॥

॥ ३३२२ ॥

वोडविलें[2] अंग । आतां करूनि[3] घ्यावें सांग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय पूजा ते मी नेणें । जाणावें जी सर्वजाणें ॥ ध्रु ॥
पोटा आलें बाळ । त्याचें जाणावें सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे हरी । वाहावें जी कडियेवरी ॥ ३ ॥

॥ ३३२३ ॥

सेवटींची हे विनंती । पाय चित्तीं रहावे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें करा कृपादान । तुह्मां मन सन्निध ॥ ध्रु ॥
भाग्याविण कैंची भेटी । नव्हे तुटी चिंतनें ॥ २ ॥
तुका ह्मणे कळसा आलें । हें विठ्ठलें परिसावें ॥ ३ ॥

॥ ३३२४ ॥

करूनियां शुद्ध मन । नारायण स्मरावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरीच हा तरिजे सिंधु । भवबंधू तोडोनियां ॥ ध्रु ॥
तेथें[4] सरे शुद्ध साचें । अंतरींचें बीज तें ॥ २ ॥
तुका ह्मणे लवणकळी । पडतां जळीं तें होय ॥ ३ ॥

॥ ३३२५ ॥

जिकडे पाहे तिकडे देव । ऐसा भाव दे कांहीं ॥ १ ॥

---

१ पं. असे तात्पर्य या खळा. त. असता तत्पर या खेळा.—२ दे. हाच अभंग पुनः एक वेळ लिहिला आहे (दे. भा. २, अ. २०९ व ९०३ पाहा) तेथें 'वाढविलें' असें आहे.—३ दे. त. दुसऱ्यानदा (त. अ. ३३३२ व ३९६६ पाहा.) लिहिला आहे तेथें 'करूंद्या संग' असें आहे.—४ पं. येथें.

॥ ध्रु. ॥ काय केलों एकदेशी । गुणदोषीं संपन्न ॥ ध्रु ॥
पडें तेथें तुझ्या पायां । करीं वांयां न वजें तें[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे विषमें सारी । ठाणें धरी जीवासी ॥ ३ ॥

॥ ३३२६ ॥

जिकडे जाय[2] तिकडे सर्वें । आतां यावें यावरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझ्या अवघ्या भांडवला । तूं एकला जालासी ॥ ध्रु ॥
आतां दुजें धरा झणी । पायांहूनि वेगळें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां देवा । नका गोवा यावरी ॥ ३ ॥

॥ ३३२७ ॥

स्मरतां कां घडे नास । विष्णुदास यावरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी सीमा जाली जगीं । तरी मी वेगीं अनुसरलों ॥ ध्रु ॥
धरिलें तें निवडे[3] आतां । न घडे चित्तावेगळें ॥ २ ॥
तुका ह्मणे नाश नाहीं । पुराणें ही गर्जती ॥ ३ ॥

॥ ३३२८ ॥

आधीं नाहीं कळों आला हा उपाय । नाहीं तरी काय चुकी होती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घालितों पायांसी मिठी एकसरें । नेदीं तों दुसरें आड येऊं ॥ ध्रु ॥
कासया पडतों लटिक्याचे भरीं । नव्हता का शिरीं भार घेतों ॥ २ ॥
तुका ह्मणे कां हे घेतों गर्भवास । कां या होतों दास कुटुंबाचा[4] ॥ ३ ॥

॥ ३३२९ ॥

आतां बरें जालें । माझें मज कळों आलें ॥ १ ॥

---

१ पं.० वजेसें. दे.० वजतें.—२ पं: जावें.—३ पं. निवडी.—४ पं. "संसाराचा हाट कां करतों दुकान । भरो वरी धन मिळवितों ॥" हें कडवें जास्त आहे.

॥ ध्रु. ॥ खोटा ऐसा संवसार । मज पायीं द्यावा थार ॥ ध्रु ॥
उघडले डोळे । भोग देताकाळीं कळे ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवा । होतां तडातोडी देवा ॥ ३ ॥

॥ ३३३० ॥

बोलिलों ते धर्म अनुभव अंगें । काय पांडुरंगें उणें केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्व सिद्धि पायीं वोळगती दासी । इच्छा नाहीं ऐसी व्हावें कांहीं ॥ ध्रु ॥
संतसमागमें अळंकार वाणी । करूं हे पेरणी शुद्ध बीजा ॥ २ ॥
तुका ह्मणे रामकृष्णनामें गोड । आवडीचें कोड माळ ओऊं ॥ ३ ॥

॥ ३३३१ ॥

करूनि उचित खेळें भोवतालें । चित्त येथें आलें पायांपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें नाहीं खोटा चालत परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा ॥ ध्रु ॥
सुख दुःख तुज देऊनि सकळ । नाहीं ऐसा काळ केला आह्मी ॥ २ ॥
तुका ह्मणे जाला देहाचा विसर । नाहीं आतां पर आप कोणी ॥ ३ ॥

॥ ३३३२ ॥

परिसाचे अंगें सोनें जाला विळा । वाकणें या कळा हीन नव्हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतरीं पालट धडला कारण । मग समाधान तें चि गोड ॥ ध्रु ॥
पिकली हे सेंद पूर्वकर्मा नये । अव्हेरु तो काये घडे मग ॥ २ ॥
तुका ह्मणे आणा पंगती सुरण । पृथक ते गुण केले पाकें ॥ ३ ॥

---

१ दे. पं. द्यावी.—२ पं. त. समागम.—३ पं. आवडीच्या कोडे.—४ दे. त. देहेचा.—५ त. नाहीं आपपर कोणी आतां. पं. आतां आपपर नाहीं कोणी.—६ पं. घडावा.—७ पं. गोडी.—८ दे. पिकली सेंद. पं. पिकलीया सेंद.

॥ ३३३३ ॥

ज्याचे माथां जो जो भार । तें चि फार तयासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागें पुढें अवघें रितें । कळों येतें अनुभवें ॥ ध्रु ॥
परिसा अंगीं अमुपसोनें । पोटीं हीन धातु[1] चि ॥ २ ॥
आपुला तो करी धर्म । जाणे वर्म तुका तें ॥ ३ ॥

॥ ३३३४ ॥

पाहें तिकडे दिशा ओस । अवघी आस पायांपें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मनें[2] चि साच होइल कईं । प्रेम देईं भेटोनि ॥ ध्रु ॥
सर्वांपरी पांगुळ असें । न कळे कैसें तें तुह्मा ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपावंता । तूं तों दाता दीनाचा ॥ ३ ॥

॥ ३३३५ ॥

चालवणें काय । ऐसें अंगे[3] माझे माय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धांव धांवें[4] लवलाहें । कंठीं प्राण वाट पाहे ॥ ध्रु ॥
पसरूनि कर । तुज चालिलों समोर ॥ २ ॥
देसील विसांवा । तुका ह्मणे ऐशा हांवा ॥ ३ ॥

॥ ३३३६ ॥

आवडीच्या ऐसें जालें । मुखा आलें हरिनाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां घेऊं धणीवरि । मागें उरी नुरेतों ॥ ध्रु ॥
सांटवण मनाऐसी । पुढें रासी अमुप ॥ २ ॥
तुका ह्मणे कारण जालें । विठ्ठल[5] तीं अक्षरीं ॥ ३ ॥

---

१ पं. धातुचें.—२ पं. मनीचे.—३ दे. त. अंगे.—४ पं. पाव.—५ पं. विठ्ठल या ती०.

॥ ३३३७ ॥

त्यांचिया चरणा माझें दंडवत । ज्यांचें धनवित्त पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें माझा जीव पावला विसांवा । ह्मणऊनि हांवा भरलासि[1] ॥ ध्रु ॥
चरणींचे रज लावीन कपाळा । जीं पदें राउळा सोई जाती ॥ २ ॥
आणिक तीं[2] भाग्यें येथें कुरवंडी । करूनियां सांडीं इंद्राऐसी ॥ ३ ॥
वैष्णवांचे घरीं देवाची वसति । विश्वास हा चित्तीं सत्यभावें[3] ॥ ४ ॥
तुका ह्मणे सखे हरिचे ते दास । आतां पुढें आस नाहीं[4] दुजी ॥ ५ ॥

॥ ३३३८ ॥

उपजोनियां मरें । परि हें चि वाटे बरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं आवडीसी पार । न ह्मणावें जालें[5] फार ॥ ध्रु ॥
अमृताची खाणी । उघडली नव्हे धणी ॥ २ ॥
तुका ह्मणे पचें । विठ्ठल हें मुखा साचें[6] ॥ ३ ॥

॥ ३३३९ ॥

सत्य[7] तूं सत्य तूं सत्य तूं विठ्ठला । कां गा हा दाविला जगदाकार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांभाळीं[8] आपुली हाक देतो माया । आह्मांसी कां भयाभीत केलें ॥ ध्रु ॥
रूप नाहीं त्यासी ठेवियेलें नाम । लटका[9] चि श्रम वाढविला ॥ २ ॥
तुका ह्मणे कां गा नाह्मसी चतुर । होतासी निसुर निर्विकार ॥ ३ ॥

॥ ३३४० ॥

अमच्या कपाळें तुज ऐसी बुद्धि । धरावी ते शुद्धी योगा नये ॥ १ ॥

---

१ पं. भरिलोसें.—२ पं. तें भाग्य.—३ पं. सर्व भावें.—४ त. दुजी नाहीं. दे. नाहीं दुजें.—५ पं. न ह्मणवे.—६ पं. रुचे.—७ पं. "लटिके चि साच दाविले आचळ । पीडतसे कळ किती ह्मूण ॥" हें कडवें आरंभींच जास्त आहे.—८ पं. सांभाळीं सांभाळीं आपुली हे माया।—९ पं. मिथ्याचि का भ्रम वाढविला ।.

॥ ध्रु. ॥ काय या राहिलें विनोदावांचून । आपुलिया भिन्न केलें आह्मां ॥ ध्रु ॥
कोठें मूर्त्तिमंत दावीं पुण्यपाप । काशासी संकल्प वाहाविसी ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां आवरावा चेडा । लटिकी च[1] पीडा पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३३४१ ॥

नो[2] बोलावें ऐसें जनासी उत्तर । करितों विचार बहु वेळा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कोण पाप आड ठाकतें येऊन । पालटी[3] तो गुण अंतरींचा ॥ ध्रु ॥
संसारा हातीं सोडवूनि गळा । हे[4] कां अवकळा येती[5] पुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवे घडे[6] अंतराय । यास करूं काय पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३३४२ ॥

आतां हें उचित माझें[7] जना हातीं । पाहिजे फजीती केली कांहीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मग हे[8] तुमचे न सोडीं चरण । त्रासोनियां मन येइल ठाया ॥ ध्रु ॥
वाउगे वाणीचा न धरीं कांटाळा । ऐसी कां चांडाळा बुद्धि मज ॥ २ ॥
तुका ह्मणे जरि माथां बैसे घाव । तरि मग वाव नेघे पुढें ॥ ३ ॥

॥ ३३४३ ॥

मायेवरी सत्ता आवडीची बाळा । संकोचोनि लळा प्रतिपाळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अपराध माझे न मनावे मनीं । तुह्मी संतजनीं मायबापीं ॥ ध्रु ॥
आरुष वचन लेंकुराची आळी । साहोनि कवळी मागुताली ॥ २ ॥
तुका ह्मणे अंगीं काय नाहीं सत्ता । परि निष्ठुरता उपजेना ॥ ३ ॥

---

१ पं. ते.—२ त. पं. न.—३ दे. त. पालटिति.—४ दे. त. हें.—५ पं. येत.—६ दे. त. घडेल.—७ पं. माझी.—८ पं. मी

॥ ३३४४ ॥

कैसा होतो कृपावंत । बहुसंत सांगती ।
पुसणें नाहीं यातीकुळ । लागी वेळ[1] नेदोवा[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी काय जाणों किती । उतरती उतरले[3] ॥ ध्रु ॥
दावी वैकुंठींच्या वाटा । पाहातां[4] मोठा संपन्न ।
अभिमान तो नाहीं अंगी । भक्तालागी न बैसे ॥ २ ॥
तुकां[5] ह्मणे आळस निद्रा । नाहीं थारा त्या अंगीं ।
आलें द्यावें[6] भलत्या काळें । विठ्ठल बळें आगळा ॥ ३ ॥

॥ ३३४५ ॥

सदैव हे वारकरी । जे पंढरी देखती ।
पदोपदीं विठ्ठल वाचां[7] । त्यांसी कैचा संसार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दोष[8] पळाले पळाले । पैल आले हरिदास ॥ ध्रु ॥
प्रेमभातें भरलें अंगीं । निर्लज्ज रंगीं नाचती ।
गोपीचंदनाची उटी । तुळसी कंठीं मिरवती ॥ २ ॥
तुकां[10] ह्मणे देव चित्तीं । मोक्ष हातीं रोकडा ।
दुर्बळा यां[11] शक्तिहीना । त्या ही जना पुरता ॥ ३ ॥

॥ ३३४६ ॥

ऐसीं ठावीं वर्मे । तरी सांडवलों भ्रमें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखें नाचतों कीर्तनीं । नाहीं आशंकित मनीं ॥ ध्रु ॥

---

१ त. मळ.—२ पं. नेदावी.—३ पं. उतरली.—४ पं. पाहा.—५ पं. "तुका ह्मणे०" व "आलें द्यावें०" ह्या अर्धांच्या जागा परस्पराशीं बदलल्या आहेत.—६ पं. घ्यावें.—७ दे. वाचे.—८ पं. तया.—९ दे. दोष पळाले दोष पळाले।.—१० पं. "तुका ह्मणे०" व "दुर्बळा०" हीं अर्धें मागें पुढें बदललीं आहेत.—११ पं. ही.

ऐसें आलें हाता । बळ तरी गेली चिंता ॥ २ ॥
सुख येथें जालें तरी । नाहीं आणिकांची उरी ॥ ३ ॥
ऐसें केलें देवें । पुढें कांहीं चि न व्हावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे मन । आतां जालें समाधान ॥ ५ ॥

॥ ३३४७ ॥

चित्तीं बैसलें चिंतन । नारायण नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे गोड कांहीं आतां । आणीक दुसरें सर्वथा ॥ ध्रु ॥
हरपला द्वैतभाव । तेणें देह जाला वाव ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे आह्मी । जालों निष्काम ये कामीं ॥ ३ ॥

॥ ३३४८ ॥

व्यापिलें सर्वत्र । बाहेरी भीतरी अंतर[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें गोविंदें गोविलें । बोलें न वजाये बोलिलें ॥ ध्रु ॥
संचिताची होळी । करूनि जीव घेतला बळी ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे नाहीं । आतां संसारा[2] उरी कांहीं ॥ ३ ॥

॥ ३३४९ ॥

तुह्मांआह्मांसी दरुषण । जालें दुर्लभ भाषण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि करितों आतां । दंडवत घ्या समस्तां ॥ ध्रु ॥
भविष्याचें माथां देह । कोण जाणें होइल काय ॥ २ ॥
ह्मणे तुकयाचा बांधव[3] । आमचा तो जाला भाव ॥ ३ ॥

---

१ दे. अंत.—२ पं. संसार.—३ दे. त. बंधव.

॥ ३३५० ॥

अनंतजन्में जरी केल्या, तपरासी ! तरी हा न पवसी[1] ह्मणे देह ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें जें निधान लागलेंसें[2] हातीं। त्याची केली मांती भाग्यहीना ॥ ध्रु ॥
उत्तमाचें सार वेदाचें भांडार । ज्याच्यानें पवित्र तीर्थें होती ॥ २ ॥
ह्मणे तुकयाबंधु आणीक उपमा । नाहीं या तों जन्मा द्यावयासी ॥ ३ ॥

॥ ३३५१ ॥

आह्मांपाशीं सरे एक[3] शुद्ध भाव । चतुराई जाणींव न लगे कळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्वजाण[4] माझा स्वामी पांडुरंग' । तया अंगसंग[5] गोपाळासी ॥ २ ॥
तुका ह्मणे कर्मे[6] धर्मे[6] नये हातां[7] । 'तयावरि सत्ता भाविकांची ॥ ३ ॥

॥ ३३५२ ॥

प्रीति करी सत्ता । बाळा भीती मातापिता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय चाले त्याशीं बळ । आळी करितां कोल्हाळ ॥ ध्रु ॥
पदरीं घाली मिठी । खेदी मागें पुढें लोटी ॥ २ ॥
बोले मना आलें । तुका साहिला[8] विठ्ठलें ॥ ३ ॥

॥ ३३५३ ॥

आवडीचे भेटी निवे । चित्त पावे विश्रांती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरावियाचा छंद मना । नारायणा अवीट ॥ ध्रु ॥
तुळणे[8] कांहीं साम्या पुरे । हें तों नुरे ये रुचि ॥ २ ॥
तुका ह्मणे बरवें जालें । फावलें हें कळे त्या ॥ ३ ॥

---

१ दे. पं. पवे.—२ त. लागलें जें.—३ पं. शुद्ध,एक.—४ पं. सर्व जाणे.—५ दे. अंगसंगें.—६ दे.कर्मधर्मे.—७ पं. साहिलें.—८ दे. पं. तळणें.

॥ ३३५४ ॥

केलियाचें दान । करा आपुलें जतन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझी बुद्धि स्थिर देवा । नाहीं विषयांचा हेवा ॥ ध्रु ॥
भावा अंतराय । येती अंतरती पाय ॥ २ ॥
तुका ह्मणे जोडी । आदीं अंतीं राहो गोडी ॥ ३ ॥

॥ ३३५५ ॥

माझे हातीं आहे करावें चिंतन । तुह्मी कृपादान प्रेम द्यावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागति यां भांडवल आळवण । नामाची जतन दातियासी ॥ ध्रु ॥
बाळक धांवोनि आड निघे स्तनीं । घालावा जननी कृपे पान्हां ॥ [२]२ ॥
तुका ह्मणे करीं कासवाचे परी । आहे सूत्रदोरी तुझे हातीं ॥ ३ ॥

॥ ३३५६ ॥

वाट दावी त्याचें गेलें काय । नागवला जो वारितां जाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसीं मार्गें ठकलीं किती । सांगतां खातीं विषगोळा ॥ ध्रु ॥
विचारोनि पाहे त्यास । न वजे जीवें नव्हे नास ॥ २ ॥
तुका ह्मणे जो रुसला जीवा । तयासी केशवा काय चाले ॥ ३ ॥

॥ ३३५७ ॥

अनुभवावांचून सोंग संपादणें । नव्हे हें करणें स्वहिताचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा नको भुलों बाहिरल्या रंगें । हित तें चि वेगें करूनि घेईं ॥ ध्रु ॥
बहुरूपी रूपें नटला नारायण । सोंग संपादून जैसा तैसा ॥ २ ॥

---

१ पं. राहे/—२ पं. "तैशापरी पुढें तुझिया मी आशे । धांवोनि वोरसे देईं भेटी ॥" हें कडवें जास्त आहे.

पाषाणाचें[1] नांव ठेवियेलें[2] देव । आणिका तारी भाव परि तो तैसा ॥३॥
कनक झाड हुण वंदियेलें[3] माथां । परि तें[4] अर्था न मिळे माजी ॥ ४ ॥
तुका ह्मणे त्याचा भाव तारी त्यास । अहंभावीं नास तो चि पावे ॥ ५ ॥

॥ ३३५८ ॥

मज नष्टा माया मोह नाहीं लोभ । अधिक हो[5] क्षोभ आदराचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धिग हें शरीर अनउपकार । न मनी आभार उपकाराचा ॥ ध्रु ॥
मजहून नष्ट आहे ऐसा कोण । नावडे मिष्टान्न बहुमोलें[6] ॥ २ ॥
न दिसती[7] मज आपलेसे गुण । संचित तें कोण जाणे मागें ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझें[8] देखोनियां काई । पांडुरंगा पायीं राखियेलें ॥ ४ ॥

॥ ३३५९ ॥

मतिविण[9] काय वर्णू तुझें ध्यान । जेथें[10] पडिलें मौन[11] वेदश्रुती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करूनि गोजिरा आपुलिये मती । धरियेलें चित्तीं चरणकमळ ॥ ध्रु ॥
सुखाचें ओतिलें पाहों तें श्रीमुख । तेणें हरे भूक तान माझी ॥ २ ॥
रसना गोडावली[12] ओव्या गातां गीत । पावलेंसे चित्त समाधान ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी दृष्टि चरणांवरी । पाउलें गोजिरीं कुंकुमाचीं ॥ ४ ॥

॥ ३३६० ॥

ओस जाल्या दिशा मज भिंगुळवाणें[13] । जीवलग नेणें मज कोणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भय वाटे देखें श्वापदांचे भार । नव्हे मज धीर पांडुरंगा ॥ ध्रु ॥

---

१ पं. "पाषाणाचें०" व "कनक झाड०" हीं कडवीं मागें पुढें आहेत.—२ पं. ठेविलें तें देव । दे. ठेविलें देव ।.—३ दे. वंदिलें.—४ पं. तें ही अर्था०.—५ पं. तो. दे. अधिक क्षोभ.०—६ पं. बहु बोल.—७ पं. दिसेचि.—८ त. आतां. दे. ह्मणे देखानियां.—९ पं. मतिहीण.—१० पं. तेथें पडे.—११ दे. त. मौन्य.—१२ त. पं. वोडावली.—१३ दे. त. हिंगुळवाणें.

अंधकारापुढें न चलवे वाट । लागतील खुंटे कांटे अंगीं ॥ २ ॥
एकला निःसंग फांकती मारग । भितों नव्हे लाग चालावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे वाट दाविनि सद्गुरु । राहिला हा दुरुं पांडुरंग ॥ ४ ॥

॥ ३३६१ ॥

उदार कृपाळ सांगसी जना । तरी कां त्या रावणा मारियेलें ।
नित्य नित्य पूजा करी श्रीकमळीं । तेणें तुझें काय केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय बडिवार सांगसी वांयां । ठाया पंढरिराया आहेसि आह्मां ।
एकला चि जरी देऊं परिहार । आहे दुरिवरी सीमा ॥ ध्रु ॥
कर्णाऐसा वीर उदार जुंझार । तो तुवां जर्जर केला बाणीं ।
पडिला भूमी परी नयेची करुणा । दांत पाडियेले दोन्ही ॥ २ ॥
श्रियाळ बापुडे सात्विकवाणी । खादलें कापूनि त्याचें पोर ।
ऐसा कठिण कोण होईल दुसरा । उखळीं कांडविलें शिर ॥ ३ ॥
शिबी चक्रवर्ती करितां यज्ञयाग । त्याचें चिरिलें अंग ठायीं ठायीं ॥
जाचउनि प्राण घेतला मागें । पुढें न पाहतां कांहीं ॥ ४ ॥
बळीचा अन्याय सांग होता काय । बुडविला तो पाय देउनि माथां ।
कौडिलें दार हा काय कहार । सांगतोसी चित्र कथा ॥ ५ ॥
हरिश्चंद्राचें राज्य घेउनियां सर्व । विकविला जीव डोंबाघरीं ।
पाडिला विघड नळा दमयंतीमधीं । ऐसी तुझी बुद्धि हरि ॥ ६ ॥
अणिकही गुण सांगावे किती । केलिया विपत्ति माउसीच्या ।
वधियेला मामा सखा पुरुषोत्तमा । ह्मणे बंधु तुकयाचा ॥ ७ ॥

---

१ पं. अंधःकारापुढें.—२ दे. खुंटे.—३ पं. अंगीं.—४ दे. होतों.—५ पं. दुरी.—६ दे. त. सिंधी.

॥ ३३६२ ॥

जे केली आळी ते अवघी गेली वांयां । उरला पंढरिराया श्रम माझा ॥१॥
॥ ध्रु. ॥ कार्य समाधान केलें कोणें वेळे । कोणें माझे लळे पाळियेले ॥ध्रु॥
आभास ही नाहीं स्वप्नीं दुश्चिता । प्रत्यक्ष बोलतां कंइचा तो ॥ २ ॥
आतां पुढें लाज वाटे पांडुरंगा । भक्त ऐसे जगामाजी जाले ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां नाहीं भरवसा । मोकलीसी ऐसा वाटतोसी ॥ ४ ॥

॥ ३३६३ ॥

समश्रुळित असतां वाचा । घोष न करिसी कां नामाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे वैष्णव नव्हेसी । कवण्या दंभें नागवलासी ॥ ध्रु ॥
हरि हरि ह्मणतां लाजसी । गर्वें फुगोनि चालसी ॥ २ ॥
तारुण्यें उताणा । पुंसेंविण बांडा सुना ॥ ३ ॥
जालेंसि महिमेचें वेडें । नाचों लाजसी दिंडीपुढें ॥ ४ ॥
अळंकारांच्यानि बळें । वंचलासी तुळसीमाळें ॥ ५ ॥
कैसा सकुमार जालासी । ह्मणसी न टकें एकादशी ॥ ६ ॥
स्नान न करिसी आंघोळी । विभुती न लाविसी कपाळीं ॥ ७ ॥
वरिवरि न्याहाळिसी त्वचा । उपेग नाहीं मांसाचा ॥ ८ ॥
पद्मनाभी विश्वनाथ । तुका अझून रडत ॥ ९ ॥

॥ ३३६४ ॥

वाघाचा कोल्हभूत दिसे वाघाऐसा । परी नाहीं दशा साच अंगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बाहेरील रंग निवडी कसोटी । संघट्टणें भेटी आपेआप ॥ध्रु॥

---

१ पं. कोण.—२ दे. पं. काळभूत.

सिकविलें तैसें नाचावें माकडें । न चले त्यापुढें युक्ति कांहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे करी लटिक्याचा सांटा । फरित तो खोटा शीघ्र होय ॥३॥

॥ ३३६५ ॥

सिंदळीचे सोरे[1] चोराची दया । तो ही जाणा तया संवसर्गें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फुकासाटीं भोगे दुःखाचा तो[2] वाटा । उभारोनि[3] कांटा वाटेवरी ।
॥ ध्रु ॥
सर्प पोसूनियां दुधाचा ही[4] नास । केलें थीता विष अमृताचें ॥ २ ॥
तुका ह्मणे यासी न करितां दंडण । पुढिल्यां[5] खंडण नव्हे दोषा ॥ ३ ॥

॥ ३३६६ ॥

तेणें सुखें माझें निवालें हें[6] अंग । विठ्ठल हें जग देखियेलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कवतुकें करुणा भाकीतसें लाडें । आवडी बोबडें बोलोनियां ॥ध्रु॥
मज नाहीं दशा अंतरीं दुःखाची । भावना भेदाची समूळ गेली ॥ २ ॥
तुका ह्मणे सुख जालें माझ्या जीवा । रंगलें केशवा तुझ्या रंगे ॥ ३ ॥

॥ ३३६७ ॥

विठ्ठल सोयरा सज्जन विसांवा । जाइन त्याच्या गांवा भेटावया ॥१॥
॥ ध्रु. ॥ सीण भाग त्यासी सांगेन आपुला । तो माझा बापुला सर्व जाणे
॥ ध्रु ॥
माय माउलिया बंधुवर्गा[7] जाणा । भाकीन करुणा सकळिकांसी ॥ २ ॥
संत महंत सिद्ध[8] महानुभाव मुनि । जीवभाव जाऊनि सांगेन त्या ॥ ३ ॥
माझिये माहेरीं सुखा काय उणें । न लगे येणें जाणें तुका ह्मणे ॥४॥

---

१ पं.० सोयर चोराचिया दया।—२ दे. त. "तो" नाहीं.—३ दे. वाटेवरि उभा रोवियेला कांटा । त. वाटे कांटा उभा रोवी ।—४ दे. त. "ही" नाहीं.—५ दे. त. पुढिल।—६ दे. त. "हें" नाहीं.—७ दे. वंधुवर्गा जना. पं. वंधुवर्ग जाणा.—८ पं. "सिद्ध" नाहीं

॥ ३३६८ ॥

ध्याइन[1] तुझें रूप गाइन[2] तुझें नाम। आणीक[3] न करीं काम जिव्हामुखें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ पाहिन तुझे पाय ठेविन तेथें[4] डोय। पृथक तें काय न करीं मनीं[5] ॥
तुझे चि गुणवाद आइकेन कानीं। आणिकांची वाणी पुरे आतां ॥ २ ॥
करिन सेवा करीं[6] चालेन मी पायीं। आणीक न वजें ठायीं तुजविण ॥ ३ ॥
तुका ह्मणे जीव ठेविला[7] तुझ्या पायीं। आणीक तो काई देऊं कोणा ॥ ४ ॥

॥ ३३६९ ॥

देवाचें भजन कां रे न करीसी[8]। अखंड हव्यासीं पीडतोसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवासी शरण कां रे न वजवे[9] तैसा ॥ बक[10] मीना जैसा मनुष्यालागीं ॥ ध्रु ॥
देवाचा विश्वास कां रे नाहीं तैसा। पुत्रस्नेहें जैसा गुंतलासी ॥ २ ॥
कां रे नाहीं तैसी देवाची[11] हे गोडी। नागवूनि सोडी पत्नी जैसी[12] ॥ ३ ॥
कां रे नाहीं तैसे देवाचे उपकार। माया मिथ्या भार पितृपूजना ॥ ४ ॥
कां रे भय वाहासी लोकांचा[13] धाक। विसरोनि[14] एक नारायण ॥ ५ ॥
तुका ह्मणे कां रे घातलें[15] वांयां। अवघें[16] आयुष्य जाया भक्तिविण ॥ ६ ॥

॥ ३३७० ॥

माझें चित्त तुझे पायीं। राहे ऐसें करीं कांहीं।
धरोनियां बाहीं। भव[17] तारीं दातारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चतुरा तूं शिरोमणि। गुणलावण्याची खाणी।

---

१ दे. गाइन तुझें नाम। ध्याइन तुझें नाम.—२ पं. ध्याइन.—३ पं. आन.—४ पं. मी.—५ पं. आन.—६ पं. करें.—७ पं. ठेवीन मी पायीं.—८ पं.० 'करिसी तैसें। अखंड हव्यासें०.—९ पं. नवजसी तैसा॥. त. नवजे तैसा.—१० दे. वदके मीन जैसा०.—११ दे. त. देवाची गोडी.—१२ दे. त. तैसी.—१३ पं. लोकांचा तूं धाक।.—१४ त. नाठवोनि.—१५ पं. घातलेंसे.—१६ पं. सर्व.—१७ पं. भव हा तारीं०.

मुगुट सकळां मणि । तूं[1] चि धन्य विठोबा ॥ ध्रु ॥
करीं[2] तिमिराचा[3] नाश । दीप होउनि प्रकाश ।
तोडीं आशापाश । करीं वास त्वदयीं ॥ २ ॥
पाहें[4] गुंतलों नेणतां । तुज असो माझी चिंता ।
तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ॥ ३ ॥

॥ ३३७१ ॥

आमुचें उचित हे चि उपकार । आपला चि भार घालूं तुज ॥ १ ॥
॥ध्रु.॥ भूक लागलिया भोजनाची आळी । पांघुरणें[5] काळीं शीताचिये ॥ध्रु॥
जेणें काळें उठी मनाची आवडी । ते चि मागों[6] घडी आवडे[7] तें ॥ २ ॥
दुःख येऊं नेदी आमचिया घरा । चक्र[8] करी फेरा भोंवताला ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं मुक्तीसवें चाड । हें चि आह्मां गोड जन्म घेतां ॥ ४ ॥

॥ ३३७२ ॥

मी दास तयाचा जया चाड नाहीं । सुख दुःख दोहींविरहित जो ॥ १ ॥
॥ध्रु.॥ राहिलासे उभा भीवरेच्या[8] तीरीं । कट दोहीं[9] करीं धरोनियां ॥ध्रु॥
नवल काई तरी पाचारितां पावे । न स्मरित[10] धांवे भक्तिकाजें[11] ॥ २ ॥
सर्व भार माझा त्यासी आहे चिंता । तो चि माझा दाता स्वहिताचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्यास गाईन मी गीतीं । आणीक तें चित्तीं न धरीं कांहीं ॥ ४ ॥

॥ ३३७३ ॥

यासी कोणी ह्मणे निंदेचीं उत्तरें । नागवला खरें तो चि एक ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आड वाटे जातां लावी नीट सोई[12] । धर्मनीत ते ही[13] ऐसी आहे ॥ध्रु॥

---

१ पं. धन्य तूं चि.—२ पं. करीं या त्रिमिराचा.—३ दे. त. त्रिमिराचा.—४ पं. मी हें.—५ त. मागें.—६ पं. आवडतें.—७ त. चक्रें.—८ दे. भीमरेच्या.—९ पं. दोन्ही.—१० त. संवरित. दे. इमरित. पं. न खरीत (न स्वरित).—११ त. पं. भक्ति काजा.—१२ पं. सोये.—१३ पं. हे.

नाइकतां सुखें करावें ताडण । पाप नाहीं पुण्य असे फार ॥ २ ॥
जन्म व्याधि फार चुकतील दुःखें । खंडावा हा सुखें मान त्याचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे [1]जिब दिलियावांचन । अंतरींचा सीण कैसा[2] जाय ॥ ४ ॥

॥ ३३७४ ॥

निवडे जेवण सेवटींच्या घांसें । होय त्यांच्या ऐसें सकळ ही ॥ १ ॥
॥ध्रु.॥ न पाहिजे जाला बुद्धीचा पालट । केली खटपट जाय वांयां ॥ ध्रु ॥
संपादिलें होय धरिलें तें सोंग । विटंबणा व्यंग[3] पडिलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे वर्म नेणतां जो[4] रांधी । पाववी ते बुद्धि अवकळा ॥ ३ ॥

॥ ३३७५ ॥

न लगे मरावें । ऐसा ठाव दिला देवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझ्या उपकारासाटीं । वागविला ह्मूण कंठीं ॥ ध्रु ॥
घरीं दिला ठाव । अवघा सकळ ही वाव ॥ २ ॥
तुका ह्मणे एके ठायीं । कोठें[5] माझें तुझें नाहीं ॥ ३ ॥

॥ ३३७६ ॥

नाहीं लाग माग । न देखेंसें[6] केलें जग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां बैसोनियां खावें । दिलें आइतें या देवें ॥ ध्रु ॥
निवारिलें भय । नाहीं हुसऱ्याची सोय ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं । बोलायाचें काम नाहीं ॥ ३ ॥

॥ ३३७७ ॥

दिली हाक मनें नव्हे ती जतन । वेंटाळिल्यां[7] गुणें धांव घेती ॥ १ ॥

---

१ पं. दिधल्या०.—२ पं. केवी.—३ दे. सांग पडियेली।.—(पूर्वी "वेंग पडियाली") —४ दे. जे.—५ त. पं. केलें.—६ पं. देखें हें.—७ पं. वेगळाले गुण.

॥ ध्रु. ॥ काम क्रोध मद मत्सर अहंकार । निंदा द्वेष[1] फार माया तृष्णा ॥ ध्रु ॥
इंद्रियांचे भार फिरतील चोर । खोन[2] घ्यावया घर फोडूं पाहे ॥ २ ॥
माझा येथें कांहीं न चले पराक्रम । आहे त्याचें वर्म तुझे हातीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां करितों उपाय । जेणें तुझे पाय आतुडती ॥ ४ ॥

॥ ३३७८ ॥

तुझा दास मज ह्मणती अंकित । अवघे सकळिक लहान थोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें चि आतां लागे करावें जतन । तुझें थोरपण तुज देवा ॥ ध्रु ॥
होउनी निर्भर राहिलों निश्चितें[3] । पावनपतित नाम तुझें ॥ २ ॥
करितां तुज होय डोंगराची राई । न लगतां कांहीं पाल्या पातें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज काय ते आशंका[4] । तारितां मशका मज दीना ॥ ४ ॥

॥ ३३७९ ॥

काय मागावें कवणासी । ज्यासी मागों तो मजपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जरी मागों पद इंद्राचें । तरी शाश्वत नाहीं त्याचें ॥ ध्रु. ॥
जरी मागों ध्रुवपद । तरी त्यासी येथील छंद ॥ २ ॥
स्वर्गभोग मागों पूर्ण । पुण्य सरल्या मागुती येणें ॥ ३ ॥
आयुष्य मागों चिरंजीव । जीवा मरण नाहीं स्वभावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे एक मागें । एकपणा[6] नाहीं भंग ॥ ५ ॥

॥ ३३८० ॥

आह्मी ज्याचे दास । त्याचा पंढरिये वास ॥ १ ॥

---

१ पं. हिंसा.—२ पं. खाणें.—३ पं. निश्चित.—४ पं. अशक्य । तारितां मश्यक मर्ज०.—५ पं. "मागावें जरि पद वैकुंठ । तें तंव एकदेसी करंटें ॥" हें कडवें जास्त आहे.—६ दे. तं. एक पणें (दे. पूर्वी "एक पणा" होतें).

॥ ध्रु. ॥ तो हा देवांचा ही देव । काय कळिकाळाचा भेव ॥ ध्रु ॥
वेद जया गाती । श्रुति ह्मणती नेति नेति ॥ २ ॥
तुका ह्मणे निज । रूपडें हें तत्त्वबीज ॥ ३ ॥

॥ ३३८१ ॥

भक्तवत्सल दिनानाथ । तिहीं लोकीं ज्याची मात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो हा पुंडलिकासाटीं । आला उभा वाळवंटीं ॥
गर्भवास धरी । अंबऋषीचा कैवारी ॥ २ ॥
सकळां देवां अधिष्ठान । एका मंत्रासी कारण ॥ ३ ॥
तुका ह्मणे ध्यानीं । ज्यासि ध्यातो शूळपाणी ॥ ४ ॥

॥ ३३८२ ॥

फटकाळ देव्हारा फटकाळ अंगारा । फटकाळ विचारा चालविलें ॥ १ ॥
फटकाळ तो देव फटकाळ तो[1] भक्त । करवितो घात आणिका जीवा[2] ॥२॥
तुका ह्मणे अवघें फटकाळ हें जन । अनुभविये[3] खूण जाणतील ॥ ३॥

॥ ३३८३ ॥

लावुनियां गोठी । चुकवूं आदरिली दिठी ।
देउनियां मिठी । पळे महिमा थुलिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुढें तो चि करी आड । तिचा लोभ तिसी नाड ।
लावूंनी[4] चरफड । हात गोऊनि पळावें ॥ ध्रु ॥
आधीं काकुलती । मोहो घालावा पुढती ।
तोंडीं पडे माती । फिरतां मागें[5] कैचा[6] तो ॥ २ ॥

---

१ पं. "तो" नाहीं.—२ दे. देवां.—३ पं. अनुभव्री.—४ पं. पुरवी.—५ दे. "फिरतां मागें कैचा तो" हें नसून याची जागा कोरी टाकली आहे.—६ त. मग.

तुका[1] ह्मणे देवा । यासी रडवी याचा हेवा ।
भावें कां हे सेवा । सुखें तुह्मां नार्पिती ॥ ३ ॥

॥ ३३८४ ॥

नेत्राची वासना । तुज पाहावें नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करीं यांचें[2] समाधान । काय पहातोसी[3] अनुमान ॥ ध्रु ॥
भेटावें पंढरिराया । हें चि इच्छिताती बाह्या ॥ २ ॥
ह्मणतों[4] जावें पंढरीसी । हें चि ध्यान चरणांसी ॥ ३ ॥
चित्त ह्मणे पायीं । तुझे राहीन निश्चयीं ॥ ४ ॥
ह्मणे बंधु तुकयाचा । देवा भाव पुरवीं साचा[5] ॥ ५ ॥

॥ ३३८५ ॥

मन उतावीळ । जालें न राहे निश्चळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दे रे भेटी पंढरिराया । उभारोनि चारी बाह्या ॥ ध्रु ॥
सर्वांग तळमळी । हात पाय रोमावळी ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे कान्हा । भूक लागली नयना ॥ ३ ॥

॥ ३३८६ ॥

ह्मणसी दावीन अवस्था । तैसें नको रे अनंता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होऊनियां सहाकार । रूप दाखवीं सुंदर ॥ ध्रु ॥
मृगजळाचियापरी । तैसें न करावें हरी ॥ २ ॥
तुकयाबंधु[6] ह्मणे हरी । कामा नये बाह्यात्कारी ॥ ३ ॥

---

१ दे. तुका ह्मणे देवा । यासी नाडी यांची सेवा । (कोरी जागा.—पुढें) भावें कांहीं यास नार्पितां ॥.—२ पं. त्याचें.—३ पं. पाहासी.—४ पं. जावें पंढरीसी । हें चि ध्यान या मानसीं.—५ पं. याचा.—६ पं. तुका ह्मणे.

॥ ३३८७ ॥

आकारवंत मूर्ति । जेव्हां देखेन मी दृष्टी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग मी राहेन निवांत । ठेवूनियां तेथें चित्त ॥ ध्रु ॥
श्रुति वाखाणिती । तैसा येसील प्राचिती ॥ २ ॥
ह्मणे तुकयाचा सेवक । उभा देखेन सन्मुख ॥ ३ ॥

॥ ३३८८ ॥

जेणें तुज जालें रूप आणि नांव । पतित हें दैव तुझें आह्मी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तरी तुज कोण हें पुसतें । निराकारी तेथें एकाएकी ॥ ध्रु ॥
अंधारें[1] दीपका आणियेली शोभा । माणिकासी प्रभा कोंदणाची[2] ॥ २ ॥
धन्वंतरी रोगें आणिला उजेडा । सुखी[3] काय चाडा जाणावें तें[4] ॥ ३ ॥
अमृतासी मोल विषाचिया गुणें । पितळें[5] तरी सोनें उंच निंच ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मी असोनियां जाण[6] । तुज देवपण आणियेलें ॥ ५ ॥

॥ ३३८९ ॥

सुखवाटे ये चि ठायीं । बहु पायीं संतांचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि केला वास । नाहीं नास ते ठायीं ॥ ध्रु ॥
न करवे हाली चाली । निवारिली चिंता हे ॥ २ ॥
तुका ह्मणे निवे तनु । रजकणु लागती[7] ॥ ३ ॥

॥ ३३९० ॥

देऊं[8] कपाट । कीं कोण काळ राखों वाट ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय होईलें[9] तें शिरीं । आज्ञा धरोनियां करीं ॥ ध्रु ॥

---

१ पं. अंधारें ते दीपा. दे. अंधारे दीपा.—२ दे. त. कोंदणासी.—३ दे. सुखा.—४ पं. "तें" नाहीं.—५ पं. पिंवळें.—६ दे.० जना । तुज देव पणा०.—७ पं. लागतें.—८ पं. देऊनि कपाट । कोण०.—९ पं. यत्न.

करूं कळे ऐसी मात । किंवा राखावा एकांत ॥ २ ॥
तुका ह्मणे जागों । किंवा कोणा नेदूं[1] वागों ॥ ३ ॥

॥ ३३९१ ॥

मायबापापुढें लेंकराची आळी । आणीक हे पाळी कोण लाडे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ सांभाळा जी माझीं[2] विषमें अनंता। जवळी असतां अव्हेर कां ॥ ध्रु ॥
आणिकांची चाले सत्ता आह्मांवरी । तुमची ते थोरी काय मग ॥ २ ॥
तुका ह्मणे आलों दुरोनि जवळी । आतां टाळाटाळी करूं नये ॥ ३ ॥

॥ ३३९२ ॥

माझ्या मुखें मज बोलवितो हरि । सकळां अंतरीं नारायण ॥ १ ॥
न करावा द्वेष भूतांचा मत्सर । हा तंव विचार जाणों आह्मी ॥ २ ॥
तुका ह्मणे दोष नाहीं या विचारें । हिताचीं उत्तरें शिकवितां ॥ ३ ॥

॥ ३३९३ ॥

मांस खातां हौउस[3] करी । जोडुनि वैरी ठेवियेला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोण त्याची करिल कींव । जीवें जीव नेणती ॥ ध्रु ॥
पुढिलांसाटीं पाजवी[4] सुरी । आपुली चोरी अंगुळी ॥ २ ॥
तुका ह्मणे कुटिती हाडें । आपुल्या नाडें रडती[5] ॥ ३ ॥

॥ ३३९४ ॥

तुज जाणें तान्हें[6] नाहीं पांडुरंगा । कां जी मज सांगा उपेक्षिलें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तुज ठावें होतें मी पातकी थोरें । आधीं च कां थारें[8] दिधली पायीं ॥ ध्रु ॥
अंक तो पडिला हरिचा मी दास । भेद पंगतीस करूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी जिंतिलें तें खरें[7] । आतां उणें पुरें तुह्मां अंगीं[9] ॥ ३ ॥

---

१ पं. नेदीं.—२ पं. माझें विषम.—३ पं. हर्षभारी।.—४ पं. पाजळी.—५ पं. रडतील.—६ दे. पं. तानें.—७ पं. खरा.—८ पं. थारा दिला.—९ पं. लागीं.

॥ ३३९५ ॥

आह्मां घरीं धन शब्दाचीं च[1] रत्नें। शब्दाचीं च शस्त्रें[2] यत्न करूं ॥ १ ॥
शब्द चि आमुच्या जीवाचें जीवन। शब्दें वांटूं धन जनलोकां ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहा शब्द चि हा देव । शब्दें[3] चि गौरव पूजा करूं ॥ ३ ॥

॥ ३३९६ ॥

ब्रह्मज्ञान दारीं येतें काकुलती । अव्हेरिलें संतीं विष्णुदासीं ॥ १ ॥
रिघों पाहे माजी[4] बळें त्याचें घर । दवडिती दूर ह्मणोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें न चले सायास । पडिलें उदास त्याच्या गळां ॥ ३ ॥

॥ ३३९७ ॥

कासया लागला यासी चौघाचार । मुळींचा[5] वेव्हार निवडिला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ग्वाही बहुतांची[6] घालूनियां वरि । महजर करीं आहे माझ्या ॥ ध्रु ॥
तुह्मां वेगळा[7] लागें आपल्या च ठायीं । होतें करुनि तें ही माझें माझें ॥ २ ॥
भांडण सेवटीं जालें एकवट । आतां कटकट करूं नये ॥ ३ ॥
ठेविला ठेवा तो आला माझ्या हाता। आतां नाहीं सत्ता तुज देवा ॥ ४ ॥
तुका ह्मणे वांयांविण खटपटा । राहिलों मी वांटा घेऊनियां ॥ ५ ॥

॥ ३३९८ ॥

देहबुद्धि वसे जयाचिये अंगीं । पूज्यता ते[9] जगीं सुख मानी ॥ १ ॥
॥ध्रु.॥थोर असे दगा जाला त्यासी हाटीं। सोडोनियां गांठी चोरीं नेली ॥ध्रु॥
गांठीचें जाउनि नव्हे तो मोकळा । बांधिलासे[10] गळा दंभलोभें ॥ २ ॥

---

१ त. हीं.– दे. शब्दाचीं रत्नें । शब्दाचीं शस्त्रें०.–२ पं. शास्त्रें यत्नें करूं।–३ पं. शब्द०.–४ पं. "माजी" नाहीं.–५ पं. मुक्तीचा–६ पं. भक्ताचीं।–७ पं.० वेगळे आपुले ठायीं।–८ पं. तो ठेवा.–९ दे. त. त्या.–१० पं. बांधविला.

पुढिल्या उदिमा जालेंसे खंडण। दिसे नागवण पडे गांठी ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे बोलतील संत । जाणूनियां घात कोण करी ॥ ४ ॥

॥ ३३९९ ॥

निंबाचिया झाडा साकरेचें आळें । आपलीं तीं फळें न संडी[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करुनि सांडी ॥ ध्रु ॥
परिसाचे अंगीं लाविलें खापर । पालट अंतर नेघे त्याचें ॥ २ ॥
तुका ह्मणे वेळू चंदना संगतीं । काय ते नसती जवळिकें[2] ॥ ३ ॥

॥ ३४०० ॥

दुबळें सदैवा । ह्मणे नागवेल केव्हां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपणासारिखें[3] त्या पाहे । स्वभावासी करिल काये ॥ ध्रु ॥
मूढ सभे आंत । इच्छी पंडिताचा घात ॥ २ ॥
गांढें देखुनि शूरा[4] । उगें[5] करितें बुरबुरा ॥ ३ ॥
आणिकांचा हेवा । न करीं शरण जाईं देवा ॥ ४ ॥
तुका ह्मणे किती । करूं दुष्टाची फजिती ॥ ५ ॥

॥ ३४०१ ॥

माझी[6] आतां लोक सुखें निंदा करूं[7] । ह्मणती विचारू सांडियेला ॥ १ ॥
कारण होय तो करावा[8] विचार । काय भीड भार करूं देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे काय करूं लापनिक । जनाचार सुख नासिवंत ॥ ३ ॥

॥ ३४०२ ॥

ढेंकणाचे संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला तैसा साधु ॥ १ ॥

---

१ पं. तें.—२ पं. जवळिका.—३ पं. आपणा ऐसें करूं पाहे.।—४ पं. शूर.—५ पं. उगी करी बुरबुर.—६ दे. मज.—७ दे. त. करो । ह्मणती विचार०.—८ पं. करीन

॥ध्रु. ॥ओढाळाच्या संगें सात्विक नासलीं । क्षण एक नाडलीं समागमें ॥ ध्रु ॥
डांकाचे संगती सोनें हीन जालें । मोल तें तुटलें लक्ष कोडी ॥ २ ॥
विषानें पक्वान्नें गोड कडू जालीं । कुसंगानें केली तैसी परी ॥ ३ ॥
भावें तुका ह्मणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्याशीचा ॥ ४ ॥

॥ ३४०३ ॥

भलते जन्मीं मज घालिसील तरी । न सोडीं मी हरी नाम तुझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुख दुःख तुज देईन भोगितां । मग मज चिंता कासयाची ॥ ध्रु ॥
तुझा दास ह्मणवीन मी अंकिला । भोगितां विठला गर्भवास ॥ २ ॥
कासया मी तुज भाकितों करुणा । तारीं नारायणा ह्मणऊनि ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज येऊं पाहे उणें । तारिसील तेणें आह्मां तया ॥ ४ ॥

॥ ३४०४ ॥

गातों नाचतों आनंदें । टाळघागरिया छंदें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझी तुज पुढें देवा । नेणों भाव कैसी सेवा ॥ ध्रु ॥
नेणों ताळ घात मात । भलते सवां पाय हात ॥ २ ॥
लाज नाहीं शंका । प्रेमें घाला ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ ३४०५ ॥

रुसलों आह्मीं आपुलिया संवसारा । तेथें जनाचारा काय पाड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मां इष्ट मित्र सज्जन सोयरे । नाहीं या दुसरें देवाविण ॥ ध्रु ॥
दुराविले बंधु सखे सहोदर । आणीक विचार काय तेथें ॥ २ ॥
उपाधिवचन नाइकती कान । त्रासलें हें मन बहु माझें ॥ ३ ॥
तुका ह्मणे करा होईल ते दया । सुख दुःख वांयां न धरावें ॥ ४ ॥

---

१ पं. सात्विकें.—२ पं. प्रेमें घालों ह्मणे०.—३ पं. रुसलों या आह्मी आपुल्या संसारा ।—४ पं. कोण.—५ पं. ठाकेल.

॥ ३४०६ ॥

सांडुनि सुखाचा वांटा । मुक्ति मागे तो करंटा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे न[1] घ्यावा जन्म । प्रेम लुटावें नाम ॥ ध्रु ॥
येथें मिळतो दहीं भात । वैकुंठीं[2] ते नाहीं मात ॥ २ ॥
तुका[3] ह्मणे आतां । मज न लगे सायुज्यता ॥ ३ ॥

॥ ३४०७ ॥

पदोपदीं पायां पडणें । करुणा जाण भाकावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ये गा ये गा विसांवया । करुणा दयासागरा ॥ ध्रु ॥
जोडोनियां करकमळ । नेत्र जळ भरोनि ॥ २ ॥
तुका[4] उभें दारीं पात्र । पुरवीं आर्त विठोबा ॥ ३ ॥

॥ ३४०८ ॥

आतां हें[5] सेवटीं असो पायांवरी । वदती वैखरी वागपुष्प ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नुपेक्षावें आह्मां दीना पांडुरंगा । कृपादानीं जगामाजी तुह्मीं ॥ ध्रु ॥
बोळवुनी देह सांडियेली शुद्ध । सारियेला[6] भेद जीव शिव ॥ २ ॥
तुका ह्मणे मन तुमचे चरणीं । एवढी आयणी पुरवावी ॥ ३ ॥

॥ ३४०९ ॥

तरि च होय[7] वेडी । नग्न होय धडफुडी[8] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय बोलाचें गौरव । आंत वरी दोन[9] भाव ॥ ध्रु ॥
मृगजळा न्याहाळितां । तान न वजाये[10] सेवितां ॥ २ ॥

---

१ पं. नेघ्यावे हे जन्म । काय वैकुंठा जाऊन॥.—२ पं. नाहीं वैकुंठीं ते मात.—३ पं. तुका ह्मणे मुक्ति नलगे । राहेन संताचिये संगें॥.—४ त. तुका उभें दान पात्र. पं. तुका उभा दान पात्र।.—५ त. "हें" नाहीं.—६ पं. तोडियेले.—७ पं. शोभे.—८ पं. धड फाडी.—९ पं. दोनी.—१० पं. वजो.

न पाहे आणिकांची आस । शूर बोलिजे तयास ॥ ३ ॥
तुका ह्मणे या लक्षणें । संत अळंकार लेणें ॥ ४ ॥

॥ ३४१० ॥

आग्रहा नांवें पाप । योगीं सारावे संकल्प ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सहजा ऐसें भांडवल । असोनि कां सारा बोल ॥ ध्रु ॥
तैं न भेटे तें काय । मना अंगींचे उपाय ॥ २ ॥
तुका ह्मणे धरीं सोय । वासनेंची फोडा डोय ॥ ३ ॥

॥ ३४११ ॥

न करीं पठन घोष अक्षरांचा । बीजमंत्र आमुचा पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्वकाळ नामचिंतन मानसीं । समाधान मनासी समाधि हे ॥ ध्रु ॥
न करीं भ्रमण न रिघें कपाटीं । जाईन तेथें दाटी वैष्णवांची ॥ २ ॥
अनु नेणें कांहीं न वजें तपासी । नाचें दिंडीपाशीं जागरणीं ॥ ३ ॥
उपवास व्रत न करीं पारणें । रामकृष्ण ह्मणें नारायण ॥ ४ ॥
आणिकांची सेवा स्तुती नेणें वाणूं । तुका ह्मणे आणु दुजें नाहीं ॥ ५ ॥

॥ ३४१२ ॥

पुंडलिकाचे निकटसेंव । कैसा धांवे बराडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलें थोरपण । नारायण विसरला ॥ ध्रु ॥
उभा कटीं ठेवुनि कर । न ह्मणे पर बैससें ॥ २ ॥
तुका ह्मणे जगदीशा । करणें आशा भक्तांची ॥ ३ ॥

---

१ दे. त. हें लक्षण.—२ पं. आन.—३ पं. कांहीं.

॥ ३४१३ ॥

बाळ काय जाणे जीवनउपाय । मायबा[1] वाहे सर्व चिंता ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आइतें भोजन खेळणें अंतरीं । अंकिताचे[2] शिरीं भार नाहीं ॥ध्रु॥
आपुलें शरीर रक्षितां न कळे । सांभाळूनि लळे पाळी माय ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा विठ्ठल जनिता । आमुची[3] ते सत्ता तयावरी ॥ ३ ॥

॥ ३४१४ ॥

काय करितील[4] केलीं नित्य पापें । वसे नाम ज्यापें विठोबाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तृणीं हुताशन लागला[5] ते रासी । जळतील तैसीं क्षणमात्रें ॥ध्रु॥
विष्णुमूर्तिपाद पाहतां चरण । तेथें कर्म कोण राहूं शके ॥ २ ॥
तुका ह्मणे नाम जाळी महादोष । जेथें होय घोष कीर्तनाचा ॥ ३ ॥

॥ ३४१५ ॥

वेद नेले शंखासुरें । केलें ब्रह्यानें गाऱ्हाणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धांव धांव झडकरी[6] । ऐसें[7] कृपाळुवा हरी ॥ ध्रु ॥
गजेंद्र नाडियें गांजिला । तेणें तुझा धांवा केला ॥ २ ॥
तुका ह्मणे पद्मनाभा । जेथें पाहें तेथें उभा ॥ ३ ॥

॥ ३४१६ ॥

माकडा दिसती कंवटी नारळा[8] । भोक्ता निराळा वरील सारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एका रस एका तोंडीं पडे माती । आपुलाले नेती विभाग ते ॥ध्रु॥
सुनियांसी क्षीर वाढिल्या[9] ओकवी । भोगिल्यां[10] पोसवी धणीवरी ॥ २ ॥
तुका ह्मणे भार[11] वागविती मूर्ख । नेतील तें सार परीक्षक ॥ ३ ॥

---

१ पं. वाहे बापमाय.—२ पं. अंकिताचा.—३ दे. जेथें आमची०.—४ दे. त. करितीं.—५ पं. लागतां.—६ पं. लवकरी.—७ पं. ऐकें.—८ पं. नारेळे । भोक्ता तो निराळें०.—९ पं. चारिल्या ओकवी ॥ भोक्ता तोचि सेपी धणीवरी ॥.—१० त. भोक्ता तो सेवी धणी वरी.—११ पं. मूर्ख वागविती भार । त. वागविती मूर्ख भार.

॥ ३४१७ ॥

भेटीची आवडी उताविळ मन । लागलेंसे ध्यान जीवीं जीवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां आवडीचा पुरवावा सोहळा । येऊनी गोपाळा क्षेम देई ॥ ध्रु. ॥
नेत्र उन्मळोन राहिले तांटस्त । गंगा अश्रुपात वहावली ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी करा साचपणा । मुळींच्या वचना आपुलिया ॥ ३ ॥

॥ ३४१८ ॥

धवळलें जगदाकार । आंधार तो निरसला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लपों जातां नाहीं ठाव । प्रगट पाहें पसारा ॥ ध्रु. ॥
खारियाचा दिवस आला । वाढि बोला न पुरे ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवें साटीं । पडिली मिठी धुरेसी ॥ ३ ॥

॥ ३४१९ ॥

मातेची अवस्था काय जाणे बाळ । तिसी तों सकळ चिंता त्याची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें परस्परें आहे हि विचारा । भोपळ्याचा तारा दगडासी ॥ ध्रु. ॥
भुजंग पोटाळी चंदनाचें अंग । निवे परि संग नव्हे तैसा ॥ २ ॥
तुका ह्मणे करा परिसाचे परी । मज ठेवा सरी लोखंडाचे ॥ ३ ॥

॥ ३४२० ॥

लावूनि कोलित । माझा करितील घात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसे बहुतांचे संधी । सांपडलों खोळेमधीं ॥ ध्रु. ॥
पाहातील उणें । तेथें देती अनुमोदनें ॥ २ ॥
तुका ह्मणे रिघे । पुढें नाहीं जालें धींगे ॥ ३ ॥

---

१ पं. तांतडी.—२ पं. ताटस्ती । गंगा अश्रुपानीं.—३ पं. धवळें.—४ पं. ठाव नाहीं.—५ पं. पाहीं.—६ पं. ऐसा परस्परें आहे हा विचार । भोपळ्याचा तार दगडासी ॥—७ पं. संगें.—८ पं. करीं.—९ दे. सांपडला.

॥ ३४२१ ॥

ऐसी एकां अटी । रीतीं सिणती करंटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साच आपुल्या पुरतें । करून नेघेती कां हितें[1] ॥ ध्रु. ॥
कां हीं वेचितील वाणी । निरर्थक चि कारणीं ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । कांहीं समर्पूनि सेवा ॥ ३ ॥

॥ ३४२२ ॥

चालिले सोबती । काय मानिलीं[2] निश्चिती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करिसी एकला । काळ सन्निध पातला ॥ ध्रु. ॥
कांहीं सावध तो बरवा । करीं आपुला काढावा ॥ २ ॥
चालिलि अगळे । हळू च कान केश डोळे ॥ ३ ॥
वोसरले दांत । दाढा गडवडल्या आंत ॥ ४ ॥
एकली तळमळ । जिव्हा भलेते[3] ठायीं लोळे ॥ ५ ॥
तुका ह्मणे यांणीं । तुझी मांडिली घालणी ॥ ६ ॥

॥ ३४२३ ॥

नका मजपाशीं । वदों[4] प्रपंचाचे विशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां नाइकावी कानीं । मज देवाविण वाणी ॥ ध्रु. ॥
येऊनियां रूपा । कोण पाहे पुण्यपापा ॥ २ ॥
मागे आजिवरी । जालें[5] मांप नेलें चोरीं ॥ ३ ॥
सांडियेलीं पानें । पुढें पिका अवलोकन ॥ ४ ॥
पडों नेदी तुका । आड गुंपूं[6] कांहीं चुका ॥ ५ ॥

---

१ पं. हित.—२ पं. मांडिली.—३ पं. भलतेंच चावळे ।.—४ पं. वदा.—५ पं. जालों मापनेलों०.—६ पं. गुंफूं.

॥ ३४२४ ॥

जाले आतां सांटे । कामयांचे लहान मोटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक एका पडिलों हातीं । जाली तेव्हां चि निश्चिती ॥ ध्रु. ॥
नाहीं फिरों येत मागें । जालें साक्षीचियां अंगें ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । आतां येथें कोठें ह्येवा ॥ ३ ॥

॥ ३४२५ ॥

माझें मज द्यावें । नाहीं करवीत नवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सहस्रनामाचें रूपडें । भक्त कैवारी चोखडें ॥ ध्रु. ॥
साक्षीविण बोलें । तरी मज पाहिजे दंडिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे माल[1] । माझा खरा तो[2] विठ्ठल ॥ ३ ॥

॥ ३४२६ ॥

करूं स्तुती तारि ते निंदा । तुह्मी जाणां हे गोविंदा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मां लडिवाळांचे बोल । करा कवतुकें नवल ॥ ध्रु. ॥
बोबड्या उत्तरीं । तुह्मा रंजवितों हरी ॥ २ ॥
मागतों भातुकें । तुका ह्मणे कवतुकें ॥ ३ ॥

॥ ३४२७ ॥

[3]नें लाहिजे जपें न लाहिजे तपें । आह्मांसी हें सोपें गीतीं गातां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न करितां ध्यान न करितां धारणा । तो नाचे कीर्त्तनामाजी हरि ॥ ध्रु. ॥
जयासी नाहीं रूप आणि आकार । तो चि कटी कर उभा विटे ॥ २ ॥
अनंत ब्रह्मांडें जयाचिया पोटीं । तो आह्मां संपुष्टीं भक्तिभावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे वर्म जाणती लडिवाळें । जें होतीं निर्मळें अंतर्बाहीं ॥ ४ ॥

---

१ पं. मोल.—२ पं. हा.—३ दे. नव्हतील जपें नव्हतील तपें ।

॥ ३४२८ ॥

आह्मी[1] जालों[2] बळिवंत । होऊनियां शरणागत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केला घरांत रिघावा । ठायीं पडियेला ठेवा ॥ ध्रु. ॥
हातां चढलें[3] धन । नेणें[4] रचिलें कारण ॥ २ ॥
तुका ह्मणे मिठी । पायीं देउनि केली सुटी ॥ ३ ॥

॥ ३४२९ ॥

लागपाठ केला । आतां वांटा नित्य त्याला[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करा जोडीचा हव्यास । आलें दुरील घरास ॥ ध्रु. ॥
फोडिलीं भांडारें । मोहोरलीं एकसरें ॥ २ ॥
अवघियां पुरतें । तुका ह्मणे घ्यावें हातें ॥ ३ ॥

॥ ३४३० ॥

एकीं असे[6] हेवा । एक अनावड जीवां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवें केल्या भिन्न जाती । उत्तम कनिष्ठ मध्यस्ती ॥ ध्रु. ॥
प्रीतिसाटीं भेद । कोणी पूज्य कोणी निंद्य ॥ २ ॥
तुका ह्मणे लळा[7] । त्याचा जाणे हा कळवळा ॥ ३ ॥

॥ ३४३१ ॥

स्वामीचें[8] हें देणें । येथें पावलों दर्षणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करूं आवडीनें वाद । तुमच्या सुखाचा संवाद ॥ ध्रु. ॥
कळावया वर्म । हा तों पायांचा चि धर्म ॥ २ ॥
तुका ह्मणे सिद्धी । हे चि पाववावी[9] बुद्धी ॥ ३ ॥

---

१ त. पं. "आह्मी" नाहीं.—२ पं. जाले बळिवंत०.—३ त. पं. चढे.—४ त. पं. ऐसें.—५ पं. नीट.—६ पं. असे एक हेवा । येर अनावड०.—७ दे. कळा । त्याच्या०.—८ पं. तें.—९ पं. पावविली.

॥ ३४३२ ॥

रुसलों संसारा । आह्मीं आणीक व्यापारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि केली सांडी । देउनि पडिलों मुरकंडी ॥ ध्रु ॥
परते चि ना मागें । मोहो निष्ठुर ज़ालों अंगें ॥ २ ॥
सांपडला देव । तुका ह्मणे गेला भेव ॥ ३ ॥

॥ ३४३३ ॥

हें तों वाटलें आश्चर्य । तुह्मां न धरवे धीर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझा फुटतसे प्राण । धांवा धांवा ह्मणऊन ॥ ध्रु ॥
काय नेणों दिशा । जाल्या तुह्मांविण ओशा ॥ २ ॥
तुका ह्मणे कांगा । नाइकिजे पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३४३४ ॥

धांवा केला धांवा । श्रम होऊं नेदी जीवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वर्षे अमृताच्या धारा । घेई वोसंगा लेंकरा ॥ ध्रु ॥
उशीर तो आतां । न करावा हे चिं चिंता ॥ २ ॥
तुका ह्मणे त्वरें । वेग करीं विश्वंभरे ॥ ३ ॥

॥ ३४३५ ॥

जोडिले अंजुळ । असें दानउताविळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहा वाहा कृपादृष्टी । आणा अनुभवा गोष्टी ॥ ध्रु. ॥
तूं धनी मी सेवक । आइक्य तें एका एक ॥ २ ॥
करितों विनंती । तुका सन्मुख पुढती ॥ ३ ॥

---

१ पं. त. आप आणि परा ।.—२ पं. वाटतें.—३ त. पं. तुह्मा धरवला धीर ।.—४ पं. धांवें.—५ दे. त. "चि" नाहीं.—६ पं. दाना उतावीळ.—७ पं. त. पाहा.—८ पं. अनुभवा या गोष्टी ।.—९ पं. स्वामी.—१० पं. एका तो.

॥ ३४३६ ॥

काय तुज कैसें जाणवेल देवा । आणावें[1] अनुभवा कैशा परी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सगुण[2] निर्गुण थोर कीं लहान । न कळे अनुमान मज तुझा ॥ ध्रु ॥
कोण तो निर्धार करूं हा विचार । भवसिंधु पार तरावया ॥ २ ॥
तुका ह्मणे कैसे पाय आतुडती । न पडे श्रीपती वर्म ठावें ॥ ३ ॥

॥ ३४३७ ॥

मी तव बैसलों धरूनियां ध्यास[3] । न करीं उदास पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नको आतां मज दवडूं श्रीहरी । मागाया भिकारी जालों दास ॥ ध्रु ॥
भुकेलों कृपेच्या वचनाकारणें । आशा नारायणें पुरवावी ॥ २ ॥
तुका ह्मणे येऊनियां देई भेटी । कुरवाळुनी पोटीं धरीं मज ॥ ३ ॥

॥ ३४३८ ॥

आतां तुझें नाम गात असें गीतीं । ह्मणोनी मानिती लोक मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अन्नवस्त्राचिंता नाहीं या पोटाची । वारिली देहाची थोर पीडा ॥ ध्रु ॥
सज्जन संबंधी तुटली उपाधी । रोकडी या बंदीं सुटलोंसें ॥ २ ॥
घ्यावा द्यावा कोणें करावा सायास । गेलें[4] आशापाश वारोनियां ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज कळेल तें आतां । करा जी अनंता मायबापा ॥ ४ ॥

॥ ३४३९ ॥

कामक्रोध माझे[5] लावियेले पाठीं । बहुत हिंपुटीं जालों देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवरितां तुझे तुज नावरती । थोर[6] वाटे चित्तीं आश्चर्य हें ॥ ध्रु ॥

---

१ पं. जाणावें गा देवा ।.—२ पं. सगुण कीं निर्गुण.—३ पं. आस.—४ दे. पं. गेलीं.—५ पं. सुने.—६ दे. शून्य.

तुझिया विनोदें आह्मां प्राणसाटी । भयभीत पोटीं सदा दुःखी ॥ २ ॥
तुका ह्मणे माझ्या कपाळाचा गुण । तुला हांसे कोण समर्थासी ॥ ३ ॥

॥ ३४४० ॥

सन्मुख चि[1] तुह्मीं सांगावी जी सेवा । ऐसे माझे देवा मनोरथ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेघों[2] आह्मी कांहीं चित्तावित्त घरें । आपुल्या उदारें जीवावरी ॥ ध्रु ॥
बोलूं[3] परस्परें वाढवावें सुख । पाहावें श्रीमुख डोळेभरी ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्य बोलतों[4] वचन । करुनी चरण साक्ष तुझे ॥ ३ ॥

॥ ३४४१ ॥

मज अनाथाकारणें । करीं येणें केशवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जीव झुरे तुजसाटीं । वाट पोटीं पहातसें ॥ ध्रु ॥
चित्त रंगलें चरणीं । तुजवांचूनि न राहे ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपावंता । माझी चिंता असावी ॥ ३ ॥

॥ ३४४२ ॥

कासया वांचूनि जालों भूमी भार । तुझ्या पायीं थार नाहीं तरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जातां भलें काय डोळियांचें काम । जंव पुरुषोत्तम न देखती ॥ ध्रु ॥
काय मुख पेंव श्वापदाचें धांव । नित्य तुझें नांव नुच्चारितां ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां पांडुरंगाविण । न वांचतां क्षण जीव भला ॥ ३ ॥

॥ ३४४३ ॥

नको मज ताठा नको अभिमान । तुजवांचूनि[5] क्षीण होतो जीव ॥ १ ॥
दुर्धर हे माया न होय सुटका[6] । वैकुंठनायका सोडवीं मज ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझें जालिया दर्शन । मग निवारण होइल सर्व ॥ ३ ॥

---

१ पं. स्वमुखें जी तुह्मी सांगा मज देवा । ऐसें माझें देवा मनोगत ॥ १ ॥.—२ पं. नेघों आह्मी कांहीं आपलें उदार । चित्तावित्त घर जीवावरी ॥.— त. दे. निघों.—३ पं. बालें.—४ पं. बोलतां.—५ पं. तुजाविण.—६ पं. सुटिका.

॥ ३४४४ ॥

चाल घरा उभा राहें नारायणा । ठेवूं दे चरणांवरि माथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेळोवेळां देई क्षेमआलिंगन । वरी अवलोकन कृपादृष्टी ॥ ध्रु ॥
प्रक्षाळूं दे पाय बैसें माजघरीं । चित्त स्थिर करीं पांडुरंगा ॥ २ ॥
आहे त्या संचितें करवीन भोजन। काय न जेवून करिसी आतां ॥ ३ ॥
करुणाकरें नाहीं[1] कळों दिलें वर्म। दुरी होतां भ्रम कोणे[2] वारी ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां आवडीच्या सत्ता । बोलिलों अनंता करवीन तें ॥ ५ ॥

॥ ३४४५ ॥

देवाची ते खूण आला ज्याच्या घरा । त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा[3] ॥१॥
॥ध्रु.॥ देवाची ते खूण करावें वाटोळें। आपणा वेगळें कोणी[4] नाहीं ॥ध्रु॥
देवाची ते खूण गुंतों नेदी आशा । ममतेच्या पाशा शिवों नेदी ॥ २ ॥
देवाची[5] ते खूण गुंतों नेदी वाचा । लागों असत्याचा मळ नेदी ॥ ३ ॥
देवाची[6] ते खूण तोडी मायाजाळ । आणि हें सकळ जग हरी ॥ ४ ॥
पहा देवें तेंचि बळकाविलें स्थळ । तुक्यापें सकळ चिन्हें त्याचीं ॥ ५ ॥

॥ ३४४६ ॥

अनंताचे मुखीं होसील गाइला । अमुप विठ्ठला दास तुह्मां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ माझें कोठें आलें होईल विचारा। तरी च अव्हेरा योग्य जालों ॥ध्रु॥
सर्वकाळ तुह्मी असा जी संपन्न । चतुरा नारायण शिरोमणि ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे कलियुगींचे जीव । तरी नये कीव बहुपापी ॥ ३ ॥

---

१ पं. कांहीं.—२ पं. तो चि वरी.—३ पं. संसारासी.—४ पं. राहों नेदी.—५ पं. "देवाची खुण जाला ज्यासी संग। त्याचा जाला भंग मनुष्यपणा॥" हें कडवें जास्त आहे.—६ त. "देवाची ते खूण गुंतों०" आणि "देवाची ते खूण तोडी०" हीं दोन कडवीं मागेंपुढें आहेत.—७ पं. "देवाची ते खूण तोडी०" हें कडवें नाहीं.—८ दे. होतीं.

॥ ३४४७ ॥

न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दासां साहे नारायण । होय रक्षिता आपण ॥ ध्रु ॥
न लगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ॥ २ ॥
न धरावी शंका । नये बोलों ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ ३४४८ ॥

भांडवल माझें लटिक्याचे गांठी । उदीम[1] तो तुटी यावी हा चि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसी[2] तुझी वाट पाहों कोणा तोंडें । भोंवतीं किं रे[3] भांडे गर्भवास ॥ ध्रु ॥
चहूं खाणीचिया रंगलोंसें संगें[4] । सुष्ट दुष्ट अंगें धरूनियां ॥ २ ॥
बहुतांचे बहु पालटलों सळे[5] । बहु आलों[6] काळें रंग अंगा ॥ ३ ॥
उकलूनि नये[7] दाविता अंतर । घडिचा पदर सारूनियां ॥ ४ ॥
तुका ह्मणे करीं[8] गोंवळें यासाटीं । आपल्या पालटीं संगें देवा ॥ ५ ॥

॥ ३४४९ ॥

संतसंगतीं न करावा वास । एखादे गुणदोष अंगा येती ॥ १ ॥
मग तया दोषा नाहीं परिहार । होय अपहार सुकृताचा[9] ॥ २ ॥
तुका[10] ह्मणे नमस्कारावे दुरून । अंतरीं धरून राहें रूप ॥ ३ ॥

॥ ३४५० ॥

जें ज्याचें जेवण । तें चि याचकासी दान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां जाऊं चौजवीत[11] । जेथें वसतील संत ॥ ध्रु ॥
होतीं धालीं पोटें । मागें उरलीं उच्छिष्टें ॥ २ ॥
तुका ह्मणे धांव । पुढें खुंटईल हांव ॥ ३ ॥

---

१ पं. उदिमासी तुटी यावी ऐसी ।.—२ पं. ऐसी.—३ पं. "किं रे" नाहीं.—४ पं. रंगें.—५ पं. साळे.—६ त. आलो. पं. आले.—७ पं. तये.—८ त. आतां करीं गोळयासाटीं ।. पं. आतां करी गाळे साटीं ।.—९ पं. सुकृतासी.—१० त. तुका ह्मणे ते नम०.—११ पं. चाड.

॥ ३४५१ ॥

धरावा तो बरा । ठाव वसतीचा थारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निंजल्या[1] जागविती । निज पुरवूनि देती ॥ ध्रु. ॥
एक वेवसाव । त्यांचा[2] संग त्यांचा जीव ॥ २ ॥
हितें केलें[3] हित । ग्वाही एक एकां चित्त ॥ ३ ॥
विषमाचें कांहीं । आड तया एक नाहीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे बरीं । घरा येतील त्यापरी ॥ ५ ॥

॥ ३४५२ ॥

धोंडयासवें आदळितां फुटे डोकें । तो[4] तों त्याच्या दुःखें घामेजेना ॥ १ ॥
इंगळासी सन्निधान अतित्याई[6] । क्षेम देतां काई सुख वाटे ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मांसवें जो रुसला । तयाचा अबोला आकाशासीं ॥ ३ ॥

॥ ३४५३ ॥

सरे आह्मांपाशीं एक शुद्धभाव । नाहीं तरी वाव उपचार ॥ १ ॥
कोण मानी वरी रसाळ बोलणें । नाहीं जाली मनें ओळखी तों ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां जाणीवेचें दुःख । न पाहों त्या मुख दुर्जनाचें ॥ ३ ॥

॥ ३४५४ ॥

आतां तळमळ । केली पाहिजे सीतळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करील[8] तें पाहें देव । पायीं ठेवुनियां भाव ॥ ध्रु. ॥
तो चि अन्नदाता । नाहीं आणिकांची सत्ता ॥ २ ॥
तुका ह्मणे दासा । नुपेक्षील[9] हा भरवसा ॥ ३ ॥

---

१ दे. तं. निजविल्या.—२ पं. याचा.—३ पं. कळे.—४ दे. तों तों त्याच्या.०—५ दे. त. सुखें.—६ पं. अतितायी.—७ पं. "सप्रेमें कुरवाळी महाफणी व्याळ । आपुली तो ढाळ सांडी केवी ॥" हें कडवें येथें जास्त आहे.—८ पं. पाहा करील तें देव.—९ पं. नुपेक्षी.

॥ ३४५५ ॥

लांब धांवे पाय चोरी । भरोवरी जनाच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आंतां कैसें होय याचें । सिजतां काचें राहिलें ॥ ध्रु ॥
खोय जैसी वेळोवेळां । कैसी कळा राहिल ॥ २ ॥
तुका ह्मणे भावहीण । त्याचा सीण पावावा[1] ॥ ३ ॥

॥ ३४५६ ॥

माझ्या इंद्रियांसीं लागलें भांडण । ह्मणतील कान रसना धाली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करिती तळमळ हस्त पाद भाळ । नेत्रांसी दुकाळ पडिला थोर ॥ ध्रु ॥
गुण गाय मुख आइकती कान । आमचें कारण तैसें नव्हे ॥ २ ॥
दरुषणें फिटे सकळांचा पांग[2] । नेत्रें ज्याचा भाग[3] घेइल तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे एसें करीं नारायणा । माझी ही वासना ऐसी आहे ॥ ४ ॥

॥ ३४५७ ॥

सिद्धीचा दास[4] नव्हें श्रुतीचा अंकिला । होईन विठ्ठला सर्व[5] तुझा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्वकाळ सुख आमच्या मानसीं । राहिलें जयासी[6] नास नाहीं ॥ ध्रु ॥
नेणें[7] पुण्य पाप न पाहें लोचनीं । आणिका वांचूनि पांडुरंगा ॥ २ ॥
न करीं[8] आस मुक्तीचे सायास । भक्तिप्रेमरस सांडूनियां[10] ॥ ३ ॥
गर्भवासीं धाक[11] नाहीं येतां जातां । त्वदर्थी राहतां[12] नाम तुझें ॥ ४ ॥
तुका ह्मणे जालों[13] तुझा चि अंकिला । न भें मी विठ्ठला कळिकाळासी ॥ ५ ॥

॥ ३४५८ ॥

जन्मा येऊनि तया लाभ जाला । ब्रिडवई भेटला पांडुरंगा ॥ १ ॥

---

१ पं. पावावा.—२ पं. नेत्रांचा तो पांग ।.—३ पं. भोग.—४ पं. दास.—५ पं. सर्व सुख असे माझिये मानसीं.—६ पं. तयासी.—७ पं. तेणें.—८ पं. देखें.—९ पं.० धरीं मी आस साधीना सायास ।.—१० पं. वांचुनियां.—११ पं. दुःख.—१२ पं. असतां.—१३ पं. तुझा होईन अंकिला.

॥ ध्रु. ॥ संसारदुःखें नासिलीं तेणें । उत्तम हें केणें नामघोष ॥ ध्रु ॥
धन्य ते[1] संत सिद्ध महानुभाव । पंढरीचा ठाव[2] टाकियेला ॥ २ ॥
प्रेमदाते ते च पतितपावन । धन्य दरुषण होय त्याला[3] ॥ ३ ॥
पावटणिया पंथें जालिया सिद्धी । वोळगे समाधि सायुज्यता ॥ ४ ॥
प्रेम अराणूक नाहीं भय धाक । मज तेणें सुखें[4] कांहीं चिंता ॥ ५ ॥
तें[5] दुर्लभ संसारासी । जडजीवउद्धारलोकासी ॥ ६ ॥
तुका ह्मणे त्यासी । धन्य भाग्य दरुषणें ॥ ७ ॥

॥ ३४५९ ॥

काय दिवस गेले अवघे चि वऱ्हाडें[6] । तें आलें सांकडें कथेमाजी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्षण एके ठायीं मन स्थिर नाहीं । अराणूक[7] कइं होईल पुढें ॥ ध्रु ॥
कथेचे[8] विसर दोषा मूळ होय । तरण उपाय कैचा मती ॥ २ ॥
काय तें[9] सांचवुनि उरलें हें[10] मागें । घटिका एक संगें[11] काय गेलें ॥ ३ ॥
ते चि वाणी येथें करा उजळणी । काढावी मथूनि शब्दरत्नें ॥ ४ ॥
तुका ह्मणे हें चि बोलावया चाड । उभयतां[12] नाड हित असे ॥ ५ ॥

॥ ३४६० ॥

शुद्धाशुद्ध निवडे कैसें । चर्म मास भिन्न नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं अधिक नाहीं उणें । कवण्या गुणें देवासी ॥ ध्रु ॥
उदक भिन्न असे काई । वाहाळ बावी सरिता नई ॥ २ ॥
सूर्य तेजें निवडी[13] काय । रश्मी रसा सकळा खाय ॥ ३ ॥
वर्णीं भिन्न दुधा नाहीं । सकळा गाई सारखें ॥ ४ ॥

---

१ पं. ते चि.—२ पं. राव ठाकियेला.—३ पं. त्याचें.—४ पं. सुख काय चिंता ।.—५ पं. "तें दुर्लभ०" व "तुका ह्मणे०" या दोन कडव्यांवद्दल दुर्लभ सर्वांसी उद्धार लोकांसी ॥ तुका ह्मणे त्यासीं दरुषण । हें एकच कडवें आहे.—६ पं. वराडें.—७ पं. कथेचा विसर दोषांमुळें होय ।.—८ पं. मग.—९ पं. "तें" नाहीं.—१० पं. तें.—११ पं. सांगें.—१२ पं. नाम घेतां गोड हित असे ।.—१३ पं. निवडे.

करितां भिन्न नाहीं माती । मडक्या गति भिन्न नांवें ॥ ५ ॥
वर्त्ते एकविध अग्नि । नाहीं मनीं शुद्धाशुद्ध[1] ॥ ६ ॥
तुका ह्मणे पात्र चाड । किंवा विषें[2] अमृत गोड ॥ ७ ॥

॥ ३४६१ ॥

न धरी प्रतिष्ठा कोणाची ही[3] यम । ह्मणतां कां रे राम लाजा झणी ॥१॥
॥ध्रु.॥ सांपडे हातींचें सोडवील[4] काळा । तो कां वेळोवेळां नये वाचे ॥ध्रु॥
कोण लोक जो हा सुटला तो एक । गेले कुंभपाक रवरवांत ॥ २ ॥
तुका ह्मणे हित तों[5] ह्मणा विठ्ठल । न ह्मणे तो भोगील कळेल तें ॥ ३ ॥

॥ ३४६२ ॥

ह्मणवितां हरी न ह्मणे तयाला । दरवडा पडिला देहामाजी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आयुष्यधन त्याचें नेलें यमदूतीं । भुलविला निश्चितीं[6] कामरंगें ॥ध्रु॥
नावडे ती कथा देउळासी जातां । प्रियधनसुता लक्ष तेथें ॥ २ ॥
कोण नेतो तयां घटिका दिवसा[7] एका । कां रे ह्मणे तुका नागवसी ॥३॥

॥ ३४६३ ॥

कथे बैसोनि सादरें । सुखचर्चा परस्परें ।
नवल काय तो उद्धरे । आणिक तरे सुगंधें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ पुण्य घेई[8] रे फुकाचें । पाप दुष्टवासनेचें । पेरिल्या बीजाचें । फळ घेई शेवटीं ॥ ध्रु ॥
कथा विरस पाडी आळसें[9] । छळणा करूनि मोडी रस ।
बुडवी आपणासरिसें । विटाळसें नावेसी ॥ २ ॥

---

१ त. शुद्ध भाव.—२ दे. विसें.—३ दे. त. "ही" नाहीं.—४ त. सांडवील.—५ पं. तो ह्मणावा विठ्ठल ।.—६ पं. निश्चिती.—७ पं. दिवस.—८ पं. घ्यावें.—९ पं. आळस.

सज्जन चंदनाचिये परी । दुर्जन देशत्यागें दुरी ।
राहो ह्मणे हरि । विनंती करी तुका हें ॥ ३ ॥

॥ ३४६४ ॥

कळों आलें तुझें जिणें । देवा तूं माझें पोषणें[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाट पाहासी आठवाची[2] । सत्ता सतंत[3] कईची[4] ॥ ध्रु ॥
बोलावितां यावें रूपा । सदा निर्गुणीं चि लपा ॥ २ ॥
तुका ह्मणे तूं परदेशी । येथें आह्मां अंगेजिसी ॥ ३ ॥

॥ ३४६५ ॥

आतां येथें लाजे नाहीं तुझें काम । जाय मज राम आठवूं दे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तुझे भिडे माझे बहु जाले घात । केलों[5] या अंकित दुर्जनाचा ॥ध्रु॥
माझें केलें मज पारिखें माहेर । नटोनी[6] साचार चाळविलें ॥ २ ॥
सुखासाटीं एक वाहियेलें खांदीं । तेणें बहु मांदी मेळविली ॥ ३ ॥
केला[7] चौघाचार नेलों[8] पांचांमधीं । नाहीं दिली शुद्धी धरूं आशा ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां घेईन कांटीवरी । धनी म्यां कैवारी केला देव ॥ ५ ॥

॥ ३४६६ ॥

आजिवरि होतों तुझे सत्ते खालीं । तोंवरी तों[7] केली विटंबणा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आतां तुज राहों नेदीं या देशांत । ऐसा म्यां समर्थ केला धणी ॥ध्रु॥
सापें[8] रिग केला कोठें बाळपणीं । होतीसी पापिणी काय जाणों ॥ २ ॥
तुका ह्मणे म्यां हा बुडविला वेव्हार । तुझे चि ढोपर सोलावया ॥ ३ ॥

---

१ पं. पोसणें.—दे. पोसनें.—२ पं. आमची.—३ पं. सतत.—४ पं. नष्ट तूं.—५ पं. केलों.—६ त. नेला.—७ त. त्वां.—पं. म्यां.—८ पं. सोपें.

॥ ३४६७ ॥

देवाच्या निरोपें पिटितों डांगोरा । लाजे नका थारा देऊं कोणी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मोडिलें या रांडे[1] सुपंथ मारग । चालविलें जग यमपंथें ॥ ध्रु ॥
परिचारीं केली आपुली च रूढी । पोटींची ते कुडी ठावी नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आणा राउळा धरून । फजित करून सोडूं मग ॥ ३ ॥

॥ ३४६८ ॥

कां रे तुह्मी निर्मळ हरिगुण गाना[2] । नाचत आनंदरूप वैकुंठासी जाना[3] ॥ १ ॥
॥ध्रु.॥काय गणिकेच्या याती अधिकार मोटा । दोषी अजामेळ ऐसीं नेलीं वैकुंठा ॥ ध्रु ॥
ऐसे नेणों[4] मागें किती अनंत अपार । पंच महादोषी पातकां नाहीं पार ॥ २ ॥
पुत्राचिया लोभें नष्ट ह्मणे नारायण । कोण कर्तव्य तुका ह्मणे त्याचें पुण्य ॥ ३ ॥

॥ ३४६९ ॥

बैसोनियां खाऊं जोडी । ओढाओढी चुकवूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें केलें नारायणें । बरवें जिणें सुखाचें ॥ ध्रु ॥
घरीच्या घरीं भांडवल । न लगे बोल वेचावे ॥ २ ॥
तुका ह्मणे आटाआटी । चुकली दाटी सकळ ॥ ३ ॥

॥ ३४७० ॥

नाहीं भ्यालों तरी पावलों या ठाया । तुह्मां आळवाया जवळिकें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्ताबळें आतां मागेन भोजन । केलें तें चिंतन आजिवरी ॥ ध्रु ॥
नवनीतासाटीं खादला हा जीव । थोड्यासाटीं कीव कोण करी ॥ २ ॥
तुका ह्मणे ताक न लगे हें घाटे । पांडुरंगा खोटें चाळवण ॥ ३ ॥

---

१ पं. रांडेनें सुपंथ०.—२ दे. त. गाणा.—३ दे. त. जाणा.—४ पं. मागें नेणों.

॥ ३४७१ ॥

सारीन तें आतां एकाचि भोजनें । वारीन मागणें वेळोवेळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सेवटींचा[1] धास गोड करीं माते । अंगे[2] कृपावंते पांडुरंगे ॥ ध्रु. ॥
वंचूं नये आतां कांहीं च प्रकार । धाकल्याचें थोर जाल्यावरी ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां बहु चाळवावें । कांहीं नेदीं ठावें[3] उरों मागें ॥ ३ ॥

॥ ३४७२ ॥

पोट धालें मग न लगे परंती[4] । जालिया निश्चिती खेळ गोड ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आपुलिया हातें देईं वो कवळ । विठ्ठल[5] शीतळ जीवन वरी ॥ध्रु.॥
घराचा विसर होईल आनंद । नाचेन मी छंदें प्रेमाचिया ॥ २ ॥
तुका ह्मणे तों च वरी करकर । मग[7] हें उत्तर खंडईल ॥ ३ ॥

॥ ३४७३ ॥

बोलविसी[6] तरी । तुझ्या येईन[7] उत्तरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं कोड कर्वतुकें[8] । हातीं द्यावया भातुकें ॥ ध्रु. ॥
बोलविसी तैसें । करीन सेवन सरिसें ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । माझें चळण तुजे[9] सवा ॥ ३ ॥

॥ ३४७४ ॥

दिला जीवभाव । तेव्हां सांडिला म्यां ठाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां वर्ते तुझी सत्ता । येथें सकळ अनंता ॥ ध्रु. ॥
माझिया मरणें । तुह्मी बैसविलें ठाणें ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं[10] । मी हें माझें येथें नाहीं ॥ ३ ॥

---

१ त. सेवटींच्या घासें.— दे. पूर्वी असें होतें.—२ पं. अंगे.—३ त. ठाव.—४ पं. पंगती.—५ पं. विठ्ठला.—६ पं. बोलाविसी.—७ पं. येईल.—८ दे. कवतिकें.—९ पं. तुझे.—१० दे. त. काईं.

३४७५

एकाचिये वेठी । सांपडलों फुकासाटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घेतों काम सताबळें । माझें करूनि मेंडोळें ॥ ध्रु ॥
धांवे मागें मागें । जाय तिकडे चि लागे ॥ २ ॥
तुका ह्मणे नेलें । माझें सर्वस्वें विठ्ठलें ॥ ३ ॥

॥ ३४७६ ॥

बराडियाची आवडी पुरे । जया झुरे साटीं तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें जालें माझ्या मना । नुठी चरणावरूनि ॥ ध्रु ॥
मागलिया पेणें पावे । विसांवे तें ठाकणीं ॥ २ ॥
तुका ह्मणे छाया भेटे । बरें वाटे तापे त्या ॥ ३ ॥

॥ ३४७७ ॥

आतां द्यावें अभयदान । जीवन ये कृपेचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उभारोनि बाहो देवा । हात ठेवा मस्तकीं ॥ ध्रु ॥
नाभी नाभी या उत्तरें । करुणाकरें सांतवीजे ॥ २ ॥
तुका ह्मणे केली आस । तो हा दिस फळाचा ॥ ३ ॥

॥ ३४७८ ॥

बहुजन्में सोस केला । त्याचा जाला परिणाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठलसें नाम कंठीं । आवडी पोटीं संचितें ॥ ध्रु ॥
येथुन तेथवरी आतां । न लगे चिंता करावी ॥ २ ॥
तुका ह्मणे धालें मन । हें चि दान शकुनाचें ॥ ३ ॥

---

१ पं. चालत लागे ।—२ पं. सर्वस्व.—३ पं. संचली.

॥ ३४७९ ॥

उसंतिल्या कर्मवाटा । बहु मोटा आघात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शीघ्र गावें शीघ्र यावें । हातीं न्यावें धरूनि ॥ ध्रु ॥
भागलों या खटपटें । घटपटें करितां ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपावंता । माझी चिंता खंडावी[1] ॥ ३ ॥

॥ ३४८० ॥

तुह्मांसी हें अवघें ठावें । किती द्यावें स्मरण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां बा तुह्मी ऐसें नेणें[2] । निष्ठुरपणें टाळित असां ॥ ध्रु ॥
आळविता[3] मायबापा । नये कृपा अझूनि ॥ २ ॥
तुका म्हणे जगदीशा । काय असां निजेलें ॥ ३ ॥

॥ ३४८१ ॥

नेलें सळेंबळें । चित्तावित्ताचें[4] गांठोळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साह्य जालीं घरिच्या घरीं । होतां ठायीं च कुठोरी ॥ ध्रु ॥
मी[5] पातलों या भावा । कपट तें नेणें देवा ॥ २ ॥
तुका म्हणे उघडें केलें । माझें माझ्या हातें नेलें ॥ ३ ॥

॥ ३४८२ ॥

जाला[6] हा डांगोरा । मुखीं लहानांचे[7] थोरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नागविलों[8] जनाचारीं । कोणी बैसों नेदी दारीं[9] ॥ ध्रु ॥
संचिताचा ठेवा । आतां[10] आला तैसा घ्यावा ॥ २ ॥
तुका ह्मणे देवें । ह्मणें[11] केलें हें बरवें ॥ ३ ॥

---

१ पं. न संडावी.—२ पं. नेणां.—३ पं. आळवितों.—४ पं. चित्त वित्ताचें.—५ पं. "मी" नाहीं.—६ पं. जाहला डांगोरा ।.—७ पं. लाहान ही.—८ पं. नागविलें.— त. नागविला.—९ पं. द्वारीं.—१० पं. आला आतां.—११ पं. केलें आतां हें बरवें.

॥ ३४८३ ॥

किती चौघाचारें । येथें गोविलीं वेव्हारें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अैसे बांधविले गळे । होऊं न सकती निराळे ॥ ध्रु ॥
आपलें आपण । केलें कां नाहीं जतन ॥ २ ॥
तुका ह्मणे खंडदंडें । येरझारीं लपती लुंडें ॥ ३ ॥

॥ ३४८४ ॥

पांडुरंगा ऐसा सांडुनि वेव्हारा । आणिकांची करा आस वांयां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहुतांसी दिला उद्धार उदारें । निवडीना खरें खोटें कांहीं ॥ ध्रु ॥
याचिया अंकिता वैकुंठ बंदर । आणीक वेव्हार चालतीना ॥ २ ॥
तुका ह्मणे माझे हातींचें वजन । यासी बोल कोण ठेवूं सके ॥ ३ ॥

॥ ३४८५ ॥

ठेवूनि इमान राहिलों चरणीं । ह्मणउनि धणी कृपा करी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मांसी भांडार करणें जतन । आलें गेलें कोण उंच निंच ॥ ध्रु ॥
करूनि सांभाळीं राहिला निराळा । एक एक वेळा आज्ञा केली ॥ २ ॥
तुका ह्मणे योग्यायोग्य विनीत । देवा नाहीं चित्त येथें देणें ॥ ३ ॥

॥ ३४८६ ॥

आतां नव्हे गोड कांहीं करितां संसार । आणीक संचार जाला माजी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ब्रह्मरसें गेलें भरूनियां अंग । आधील तो रंग पालटला ॥ ध्रु ॥
रसनेचिये रुची कंठीं नारायण । बैसोनियां मन निवविलें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां बैसलों ठाकणीं । इच्छेची ते धणी पुरईल ॥ ३ ॥

---

१ पं. ऐसे.—२ पं.० सारिखा.—३ पं. वास.—४ पं. बहुतां.—५ दे. त. चालितना.—६ पं. आला गेला.—७ त. पं. "कांहीं" नाहीं.

॥ ३४८७ ॥

आतां काशासाटीं दुरी । अंतर उरी राखिली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करीं लवकरी मुळ[1] । लहानें[2] तीळ मुळीचिया ॥ ध्रु ॥
दोहीं ठायीं उदेगवाणें । दरुषणें निश्चिती ॥ २ ॥
तुका ह्मणे वेग व्हावा । ऐसी जीवा उत्कंठा ॥ ३ ॥

॥ ३४८८ ॥

पडिली हे रूढि जगा परिचार[3] । चालविती वेव्हार सत्य ह्मूण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मरणाची कां[4] रे नाहीं आठवण । संचिताचा[5] धन लोभ हेवा ॥ ध्रु ॥
देहाचें भय तें काळाचें भातुकें । ग्रासूनि तें एकें ठेविलेंसे ॥ २ ॥
तुका म्हणे कांहीं उघडा रे डोळे । जाणोनि अंधळे होऊं नका ॥ ३ ॥

॥ ३४८९ ॥

हित नाहीं ठावें जननीजनका । दाविला लौकिकाचार तिंहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंधळ्याचे[6] काठी लागले अंधळें । घात एकी वेळे पुढेंमागें[7] ॥ ध्रु ॥
न धरावी चाली करावा विचार । वरील आहार गळी लावी ॥ २ ॥
तुका ह्मणे केला निवाडा रोकडा । राउत हा घोडा हातोहातीं ॥ ३ ॥

॥ ३४९० ॥

जेथें पाहें तेथें कांडिती भूस । चिपाडें चोखूनि पाहाती रस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय सांगों देवा भुलले जीव । बहु यांची येतसे कींव ॥ ध्रु ॥
वेठीचें[8] मोटळें लटिकें चि फुगे ॥ पेणिया जाऊनि भिक्षामागे ॥ २ ॥
तुका ह्मणे कां उगे चि खोल । जवळी दाखवी आपणां बोल ॥ ३ ॥

---

१ पं.० मुळा । लहानें तळा.०—२ त. लाहाणे.—३ पं. परिहार.—४ पं. कांहीं नाहीं०.—५ पं. सचिताचें धन लाभ हेवा ।.—६ पं. "अंधळवाचे०" व "न धरावी०" हीं कडवीं मागें पुढें झालीं आहेत.—७ त. मागें पुढें.—८ पं. वैकुंठींचें.

॥ ३४९१ ॥

जाणिवेच्या भारें चेंपला[1] उर । सदा बुरबुर सरे चि ना ॥ १ ॥
॥ध्रु.॥ किती[2] याचें ऐकों कानीं । मारिलें घाणीं नाळेकरी[3] ॥ ध्रु ॥
मिठेंविण[4] आळणी बोल । कोरडी फोल घसघस ॥ २ ॥
तुका ह्मणे डंगा न कळे[5] हित । किती[6] फजित करूं तरी ॥ ३ ॥

॥ ३४९२ ॥

अनुतापयुक्त गेलिया अभिमान । विसरूं वचन मागिलांचा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ त्याचे पाय माझे लागोत कपाळीं । भोग उष्टावळी धन्यकाळ ॥ध्रु॥
षड उर्मी जिहीं हाणितल्या लाथा । शरण या संता आल्या वेगीं ॥२॥
तुका ह्मणे जाती वोळे लवकरी । ठायीं चि अंतरीं शुद्ध होती ॥ ३ ॥

॥ ३४९३ ॥

खोल ओलें[7] पडे तें पीक[8] उत्तम । उथळाचा श्रम वांयां जाय ॥ १ ॥
॥ध्रु.॥ लटिक्याचे आह्मी नव्हों[9] सांटेकरी । थीतें घाली भरी पदरीचें ॥ध्रु॥
कोणा इहलोकीं पाहिजे पसारा । दंभ पोट भरायाचे चाडे ॥ २ ॥
तुका ह्मणे कसीं अगी जें उतरे । तें चि येथें सरे जातिशुद्ध ॥ ३ ॥

॥ ३४९४ ॥

गोमट्या बीजाचीं फळें ही गोमटीं । बांहे[10] तें चि पोटीं समतुक ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जातीच्या संतोषें चित्तासी विश्रांति । परतोनि मागुती फिरों नेणें ॥ध्रु॥
खऱ्याचे पारखीं येत नाहीं तोटा । निवडे तो खोटा ढाळें दुरी ॥ २ ॥
तुका ह्मणे मज सत्याचि आवडी । करितां तांतडी येत नाहीं ॥ ३ ॥

---

१ पं. चेपलासे.—२ पं. किती याचे बोल एकावे कानीं ।—३ पं. नाळेकरी.—४ पं. मिठेंविण काय आळणी हे बोल । कोरडीच फोल०.—५ पं. कळे हें हित ।—६ पं. किती हे फजित.—७ पं. ओली.—८ त. पिके.—९ पं. नव्हे.—१० पं. बाह्य.

॥ ३४९५ ॥

मन जालें भाट । कीर्त्ति मुखें घडघडाट ।
पडियेली वाट । ये चि चाली स्वभावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बोलें देवाचे पवाडे । नित्य नवे चि रोकडे ।
ज्या परी आवडे । तैसा तैसा करूनि ॥ ध्रु ॥
रोखीं रहावें समोर । पुढें मागें चाले भार ।
करावें उत्तर । सेवा रुजू करूनि ॥ २ ॥
पूर[1] वर्षला देकारें । संतोषाच्या अभयें[2] करें ।
अंगींच्या उत्तरें । तुकया स्वामी शृंगारी ॥ ३ ॥

॥ ३४९६ ॥

दूरि तों चि होतों आपुले आशंके । नव्हतें ठाउकें मूळभेद ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ आतां जेथें तेथें येईन[3] सांगातें । लपावा पुरतें उरों[4] नेदीं ॥ ध्रु ॥
मिथ्या मोहें[5] मज लाविला उशीर । तरी हें अंतर जालें होतें ॥ २ ॥
तुका ह्मणे कां रे दाखविसी भिन्न । लटिका चि सीण लपंडाई ॥ ३ ॥

॥ ३४९७ ॥

कळों नये तों चि चुकावितां[6] बरें । मग पाठमोरें काय काज ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ धरिलेती आतां द्या जी माझा डाव । सांपडतां[7] भाव ऐसा आहे ॥ ध्रु ॥
होतासी अंतरें झाकिलिया डोळीं । तो[8] मी हा न्याहाळीं धरुनी दृष्टी ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज रंडीची[9] च खोडी । अहाच बराडी तो मी नव्हे ॥ ३ ॥

---

१ पं. पुरवला देकारें ।—२ त. पं. अभयंकरें.—३ पं. होईन.—४ पं. राहों.—५ पं. मोहो.—६ पं. चुकावितां.—७ पं. सांपडला.—८ पं. तो चि मी न्याहाळी.—९ पं. रंडीची.

॥ ३४९८ ॥

करिसी[1] लाघवें । तूं हें खेळसी औघवें[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केला अहंकार आड । आह्मां जगासी हा नाड ॥ ध्रु ॥
इत्थंभूतें[3] यावें । दावूं लपों ही ज्ञाणावें ॥ २ ॥
तुका ह्मणे हो श्रीपती । आतां चाळवाल किती ॥ ३ ॥

॥ ३४९९ ॥

विश्वास तो देव । ह्मणुनि धरियेला भाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझी वदविती वाणी । ज्याणें धरिली धरणी ॥ ध्रु ॥
जोडिलीं अक्षरें । नव्हती[4] बुद्धीचीं[5] उत्तरें ॥ २ ॥
नाहीं केली आटी । कांहीं मानदंभासाटीं ॥ ३ ॥
कोणी भाग्यवंत । तया कळेल[6] उचित ॥ ४ ॥
तुका ह्मणे झरा । आहे मुळींचा चि खरा ॥ ५ ॥

॥ ३५०० ॥

सुराणीचीं जालीं लाडिकीं एकलीं । वडील धाकुलीं आह्मी देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि कांहीं न घडे अव्हेर । गोमटें उत्तर भातुकें ही ॥ ध्रु ॥
कांहीं एक नाहीं वंचिलें वेगळें । मुळींचिया मुळें स्थिरविलें[7] ॥ २ ॥
लेवविलीं अंगीं आपुलीं भूषणें । अळंकार लेणें सकळ ही ॥ ३ ॥
सारितां न सरे आमुप भांडार । धना अंतपार नाहीं लेखा ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मी आळवूं आवडी । ह्मणऊनी जोडी[8] दाखविली ॥ ५ ॥

---

१ त. दाविसी.—२ त. अवघें.—३ दे. यथंभुतें त. येथें भूतें.—४ दे. त. नव्हेती.—५ पं. बुद्धीच्या विचारें.—६ पं. कळे हें उचित.—७ पं. स्थिरावलों.—८ त. गोडी.

॥ ३५०१ ॥

एका[1] वेळे केलें रितें कलिवर । आंत दिली थार पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाळण पोषण लागलें ते सोई । देहाचें ते काई सर्वभावें[2] ॥ ध्रु ॥
माझिया मरणें जाली हे वसति । लागली ते ज्योती अविनाशा ॥ २ ॥
जाला ऐसा एका घायें येथें नाहीं । तुका ह्मणे[3] कांहीं बोलों नये ॥ ३ ॥

॥ ३५०२ ॥

पावतों ताडन । तरी[4] हें मोकलितों[5] जन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग मी आठवितों दुःखें । देवा सावकाश मुखें ॥ ध्रु. ॥
होती अप्रतिष्ठा । हो तों[6] वरपड़ा कष्टा ॥ २ ॥
तुका ह्मणे मान । होतां उत्तम खंडन ॥ ३ ॥

॥ ३५०३ ॥

धरावें तों[7] भय । अंतरोनि जाती पाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाल्या तुटी देवासवें । काय वांचोनि करावें ॥ ध्रु ॥
कोणासी पारिखें । लेखूं आपणासारिखें ॥ २ ॥
तुका ह्मणे असो । अथवा हें आतां नसो[8] ॥ ३ ॥

॥ ३५०४ ॥

आह्मांसी सांगाती । होतीं[9] अराले ते[10] होती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येती आइकतां हाक । दोन[11] मिळोन ह्मणती एक ॥ ध्रु ॥
आणिकां उत्तरीं । नसे गोविली[12] वैखरी ॥ २ ॥
तुकां ह्मणे बोल । खूण पहाती विठ्ठल ॥ ३ ॥

---

१ पं. एक वेळ केलें०.—२ पं. सर्व भाव.—३ पं. ऐसें.—४ पं. जरी.—५ त. पं. मोकलितें.—६ पं. कांहीं.—७ पं. तें.—८ दे. त. नासो.—९ पं. "होती" नाहीं.—१० पं. ते चि होती.—११ पं. दोन्ही न ह्मणती एक.—१२ दे. त. गोवी.

॥ ३५०५ ॥

आनंदाचा थारा । सुखें मोहरला झरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी प्रभुची ज्या कळा । त्याच्या कोण पाहे बाळा[1] ॥ ध्रु ॥
अंकिता ऐसया । होइल पावविलें ठायां ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें[2] । दिलें आभंड प्रकाशें[3] ॥ ३ ॥

॥ ३५०६ ॥

काहे लकडा घांस कटावे । खोद हि जुमीन मठ बनावे[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवलवासी तरवरछाया । घरघर माई खपरिबसमाया[5] ॥ ध्रु ॥
कां छांडियें भार फेरे सीर भागें । मायाको दुःख मिटलिये अंगें ॥२॥
कहे तुका तुम सुंनो हो सिद्धां । रामबिना और झुटा कछु धंदा ॥ ३ ॥

॥ ३५०७ ॥

आणीक पाखांडें[6] असती उदंडें । तळमळिती पिंडें[7] आपुलिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचिया बोलाचा नाहीं विश्वास । घातलीसे कास तुझ्या नामीं ॥ ध्रु ॥
दृढ एक चित्तें जालों या जीवासी । लाज सर्वविशीं तुम्हांसी हे ॥ २ ॥
पीडों नेदी पशु आपुले अंकित । आहे जें उचित तैसें करा ॥ ३ ॥
तुका ह्मणे किती भाकावी करुणा । कोप नारायणा येइल तुह्मां ॥ ४ ॥

॥ ३५०८ ॥

व्हावया भिकारी हें[8] आह्मां कारण । अंतरोनि जन जावें दुरी ॥ १ ॥
संबंध तुटावा शब्दाचा ही स्पर्श । ह्मणऊनि आस मोकलिली ॥ २ ॥
तुका ह्मणे दुःखें उबगला जीव । ह्मणऊनी कीव भाकीं देवा ॥ ३ ॥

---

१ दे. पं. बळा.—२ त. असे.—३ दे. प्रकासे.—४ पं. बनाये.—५ पं. खपरबनाया.—६ पं. पाषांड.—७ पं. पिंड. त. पीडे.—८ पं. हें चि, आह्मा०.

॥ ३५०९ ॥

कोरडिया ऐशा[1] सारूनियां[2] गोष्टी । करा उठाउठीं हित आधीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खोळंबला रहि आपुला मारग । पहावी ते मग तुटी कोठें ॥ ध्रु ॥
लौकिकाचा आड येईल पसारा । मग येरझारा दुःख देती ॥ २ ॥
तुका ह्मणे डांख लागे अळंकारें । मग नव्हे खरें पुटांविण[3] ॥ ३ ॥

॥ ३५१० ॥

ऐसें ठावें नाहीं मूढा । सोस काकुलती पुढां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझीं नकां[4] जाळूं भांडीं । पोटीं भय सोस तोंडीं ॥ ध्रु ॥
पातलिया[5] काळ । तेव्हां काय चालें बळ ॥ २ ॥
संचितें[6] तें करी । नरका जायां[7] मेल्यावरी ॥ ३ ॥
परउपकार । न घडावा हा विचार ॥ ४ ॥
तुका ह्मणे लांसी । आतां भेटों नये ऐसी ॥ ५ ॥

॥ ३५११ ॥

करूनी चिंतन खेळों[8] भोवतालें । चित्त येथें आलें पायांपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें नाहीं खोटा चालत परिहार । जाणसी अंतर पाडुरंगा ॥ ध्रु ॥
सुखदुःखें तुज देऊनी सकळ । नाहीं ऐसा काळ केला आह्मी ॥ २ ॥
तुका ह्मणे जाला देहाचा विसर । नाहीं[9] आतां पर आप दोन्ही ॥ ३ ॥

॥ ३५१२ ॥

काळा च सारिखीं वाहाती [10]क्षेत्रें । करितां दुसरें फळ नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें करत्यानें ठेविलें करून । भरिलें भरून माप नेमें ॥ ध्रु ॥

---

१ त. आशा.—२ दे. सारून०. पं. काय सारूं गोष्टी.—३ पं. पुढें विण.—४ पं. जाळूं नका.—५ पं. पाहतील या०.—६ पं. संचितातें.—७ पं. जाय.—८ पं. खेळें.—९ पं. आतां आपपर नाहीं दोन्ही.—१० पं. नक्षत्रें.

शीतउष्णकाळीं मेघ[1] वरुषावे । वरुषतां वाव होय शीण ॥ २ ॥
तुका ह्मणे विष अमृताचे किडे । पालट न घडे जीणें तया ॥ ३ ॥

॥ ३५१३ ॥

बोलणें तें आह्मी बोलों उपयोगीं । पांडलें प्रसंगीं कोळाऐसें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जयामध्यें देव आदि मध्यें अंतीं । खोल पाया भिंती न खंचेसी[3] ॥ध्रु॥
करणें तें आह्मी करूं एका वेळे । पुढिलिया बळें वाढी खुंटे ॥ २ ॥
तुका ह्मणे असों आज्ञेचीं धारकें । ह्मणऊनि एकें घायें[4] सारूं ॥ ३ ॥

॥ ३५१४ ॥

तुझिया विनोदें आह्मांसी मरण । सोसियेला सीण बहु फेरे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आतां आपण[5] चि येसी तें करीन । नाम हें धरीन तुझें कंठीं ॥ध्रु॥
वियोगें चि आलों उसंतति वनें । संकल्प हे मनें वाहोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे वर्म सांपडलें सोपें । गोवियेलों पापें पुण्यें होतों ॥ ३ ॥

॥ ३५१५ ॥

पाठीलागा[6] काळ येतसे या लागें । मी माझें वाउगें मेंढीऐसें[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां अगी लागो ऐसिया वेव्हारा । तूं माझा सोइरा पांडुरंगा ॥ ध्रु ॥
वागविला माथां नसता[8] चि भार । नव्हे तें साचार जाणिलें[9] तों ॥ २ ॥
तुका ह्मणे केलें जवळील दुरी । मृगजळ वरी आड आलें ॥ ३ ॥

॥ ३५१६ ॥

आपुलिये टाकीं । करीन[10] कांहीं तरी एकी ॥ १ ॥

---

१ त. मेघ वरुषावें. पं. मेघावरुषावे.—२ पं. कळे.—३ पं. खचे ते.—४. पं. वोलें. त. खा. यें.—५ दे. आपणें.—६ त. पाठीलागे.—७ पं. मध्यें ऐसें.—८ दे. नसतां.—९ पं. देखिलें तों. दे. जातिल तों.—१० त. करोनि.

॥ ध्रु. ॥ करीन पायांशीं वोळखी । करिसी तें करीं सुखीं ॥ ध्रु ॥
कायाक्लेशगंगाजळ । समर्पीन तुळसीदळ ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । कर जोडीन ते सेवा ॥ ३ ॥

॥ ३५१७ ॥

माझे तों स्वभाव मज अनावर । तुज ही देतां भार कांहीं नव्हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृती स्वपना ताळ नाहीं ॥ ध्रु ॥
संपादितों तो हा[1] अवघा बाह्य रंग । तुझा नाहीं संग अभ्यंतरीं ॥ २॥
तुका ह्मणे सत्या नाहीं पाठी पोट । असतें[2] निर्घोट एकी जाती ॥ ३ ॥

॥ ३५१८ ॥

नव्हावा तो बरा मुळीं च संबंध । विश्वासिकां[3] वध बोलिलासे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझें हित काय तें विचारा । सत्यत्वें दातारा पांडुरंगा ॥ध्रु॥
नाहीं भाव परी ह्मणवितों दास । नका[4] देऊं यास उणें येऊं ॥ २ ॥
तुका ह्मणे कां हो उद्धरितां दीन । मानीतसां सीण मायबापा ॥ ३ ॥

॥ ३५१९ ॥

कायें[5] तुमचिया सेवे न वेचते गांठोळी । मोहें[6] टाळाटाळी करीतसां ॥१॥
॥ ध्रु. ॥ चतुराच्या राया आहो पांडुरंगा । ऐसें तरी सांगा निवडूनि ॥ध्रु॥
कोण तुह्मां सुख असे या कौतुकें । भोगितां अनेकें दुःखें आह्मीं[7] ॥ २॥
तुका ह्मणे काय जाळासी निर्गुण । आह्मां येथें कोण सोडवील ॥ ३॥

---

१ दे. त. "हा" नाहीं.—२ पं. आहे तें निर्घोट एक जाती ।.—३ पं. विश्वासी तो वद्ध बोलिलासें.—४ पं. नको.—५ पं. काय तुमची यास वेचते०.—६ त. पं. माहे.—७ दे. त. आह्मा.

॥ ३५२० ॥

निष्ठुर यासाटीं करितों भाषण । आहेसी तूं[1] सर्वजाण दाता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें कोण दुःख आहे निवारिता । तो मी जाऊं आतां शरण त्यासी ॥ ध्रु ॥
बैसलासी केणें[2] करुनि एक घरीं । नाहीं येथें उरी[3] दुसऱ्याची ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें अवघें चि पायापें । आतां मायबापें नुपेक्षावें ॥ ३ ॥

॥ ३५२१ ॥

पायांपासीं चित्त । तेणें भेटी अखंडित ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असे खेळे भलते ठायीं । प्रेमसूत्रदोरी पायीं ॥ ध्रु ॥
केलेंसे जतन । मुळीं काय तें वचन ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्वजाणा । ठायीं विचारावें मना ॥ ३ ॥

॥ ३५२२ ॥

तुझे मजपाशीं मन । माझी येथें[4] भूक तान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जिव्हा रतें एके ठायीं । दुजें बोलायाचें काई ॥ ध्रु ॥
माझिया कवतुकें । उभा पहासी भातुकें ॥ २ ॥
तुका ह्मणे साचें । तेथें मागील कईचें ॥ ३ ॥

॥ ३५२३ ॥

तुह्मां आह्मां सरी । येथें[5] कईच्या या परी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्वामिसेवा अळंकार । नाहीं आवडिये थार ॥ ध्रु ॥

---

१ पं. सर्वज्ञ जाणता तूं ।.—२ पं. कोण करुनियां धीर. त. कोण धरुनियां धीर.—३ पं. ऊर.—४ पं. तुज.—५ पं. आतां.

खुंटलिया वाचा । मग हा आंनद कइचा ॥ २ ॥
तुका ह्मणे कोडें । आह्मी नाचों तुज पुढें ॥ ३ ॥

॥ ३५२४ ॥

कैचें भांडवल खरा हातीं भाव ? कळवळ्यानें माव दावीतसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझा अंत नको सर्वजाणा । पाहों नारायणा निवडूनि ॥ ध्रु ॥
संतांचें उच्छिष्ट मागिले पंगती । करावें संगती लागे ऐसें ॥ २ ॥
तुका ह्मणे आलों दावूनि विश्वास । संचित तें नास पावे ऐसें ॥ ३ ॥

॥ ३५२५ ॥

थोडे तुह्मी मागें होती उद्धरिले । मज ऐसे गेले वांयां जीव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां याचा कांहीं न मनावा भार । कृपेचा सागर आहेसी तूं ॥ ध्रु ॥
तुज आळवितां पापाची वसति । राहे अंगीं किती बळ त्याचें ॥ २ ॥
तुका ह्मणे उदकीं तारिले दगड । तैसा मी ही जड एक देवा ॥ ३ ॥

॥ ३५२६ ॥

आह्मी ह्मणों कोणी नाहीं तुज आड । दिसतोसी भ्याड पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हागे माझ्या भोगें केलासी परता । विश्वंभरीं सत्ता नाहीं ऐसी ॥ ध्रु ॥
आह्मी तुज असों देऊनि आधार । नाम वारंवार उच्चारितों ॥ २ ॥
तुका ह्मणे मज धरियेलें बळें । पंचभूतीं खळें करूनियां ॥ ३ ॥

॥ ३५२७ ॥

आहेतें सकळ प्रारब्धा हातीं । यावें काकुलती यासी आतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा माझ्या मनें सांगितला भाव । तोंवरीच देव दुजा नाहीं ॥ ध्रु ॥

---

१ पं. " लागे" नाहीं.—२ पं. काळें.

अवघियांची जेव्हां सारावी करकर । भावबळें थार धरूं येसी ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज ठेवावें पूजून । आणीक ते[1] गुण नाहीं येथें ॥ ३ ॥

॥ ३५२८ ॥

सेवट तो होतो तुझियानें गोड । ह्मणऊनि चाड धरीतसों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देऊं[2] भोगाभोग कलिवराचा[3] भार । साहों तुज थार त्याचमधीं[4] ॥ ध्रु. ॥
तुझ्या बळें कांहीं खटपट काम । वाढवावा श्रम न लगे तो ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी चेंपलों या भारें । तुमचें तें खरें देवपण ॥ ३ ॥

॥ ३५२९ ॥

ऐसा चि तो गोवा । न पाहिजे केला देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु आंली[5] दुरिवरी । ओढत हे भरोवरी ॥ ध्रु. ॥
आह्मांसी, न कळे । तुह्मी झाकूं नये डोळे ॥ २ ॥
तुका ह्मणे संगें । असों एक एका अंगें ॥ ३ ॥

॥ ३५३० ॥

मायलेंकरांत भिन्न । नाहीं उत्तराचा सीण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धाडीं धाडीं वो भातुकें । रंजविल्याचें कौतुकें ॥ ध्रु. ॥
करूनि नवल । याचें बोलिलों ते बोल ॥ २ ॥
तुका ह्मणे माते । पांडुरंगे कृपावंते ॥ ३ ॥

॥ ३५३१ ॥

आवडी कां ठेवूं । बैसोनियां संगें जेवूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागें नको ठेवूं उरी । माझी आण तुजवरी ॥ ध्रु. ॥

---

१ पं. तो.—२ पं. देऊनि.—३ पं. कलिवरा.—४ पं. त्याजमधीं.—५ पं. ०आह्मीं दुरवरी ।

देखिले प्रकार । त्यांचे पाहेन साचार ॥ २ ॥
तुका ह्मणे बाळीं । केली चाहाडी सकळीं ॥ ३ ॥

॥ ३५३२ ॥

नव्हेसी तूं लांसी । मायां आणिकां त्या ऐसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जें हे वांयां जाती बोल । होती निर्फळ चि फोल ॥ ध्रु ॥
नव्हेसी दुबळी । कांहीं नाहीं तें जवळी ॥ २ ॥
तुका ह्मणे खोटी । कांहीं नव्हेसी करंटी ॥ ३ ॥

॥ ३५३३ ॥

आह्मां बोल लावा । तुह्मां अनुचित हें देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें सांगा कां व्यालेती । काय नाहीं तुह्मां हातीं ॥ ध्रु ॥
आतां धरा दुरी । वांयां दवडाया थोरी ॥ २ ॥
तुका ह्मणे ठायीं । ऐसें विचारावें कांहीं ॥ ३ ॥

॥ ३५३४ ॥

मरोनियां गेली माया । मग तया कोण पुसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पोरटियांची दाद कोणा । ऐसा जाणा प्रवाहो ॥ ध्रु ॥
निढळास निढळ जोडा । होय कोडा कवतुकां ॥ २ ॥
तुका ह्मणे देवाऐसी । आहों सरसीं आपण ॥ ३ ॥

॥ ३५३५ ॥

संसाराची कोण गोडी । दिली जोडी करूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निष्ठुर तूं बहु देवा । पुरे हेवा न ह्मणवी ॥ ध्रु ॥

---

१ पं. याचे.—२ पं. नाहींत जवळी.—३ दे. पायीं.—४ दे. जाना. त. नेणा.—५ त. कौतुक.

पाहोनियां कर्म डोळां । निराळा तो वर्जीना ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज माझें । ह्मणतां ओझें फुकट ॥ ३ ॥

॥ ३५३६ ॥

नव्हतें[1] तें कळों आलें । तरी बोलें अबोला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुज मज घातली तुटी । एके भेटीपासूनि ॥ ध्रु ॥
आतां याची न धरीं चाड । कांहीं कोड कवतुकें ॥ २ ॥
तुका ह्मणे यावें जावें । एका भावें खंडलें ॥ ३ ॥

॥ ३५३७ ॥

आतां दोघांमध्यें काय । उरलें होय जाणीजेसें[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निष्ठुर हें केलें[3] मन । समाधान न[4] करूनि ॥ ध्रु ॥
झुरावें तें[5] तेथींच्या परी । घरिच्याघरीं अवघिया ॥ २ ॥
तुका ह्मणे देवपण[6] । गुंडाळून असों दे ॥ ३ ॥

॥ ३५३८ ॥

मागितल्यास[7] आस करा । उरी धरा कांहींबाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि सारिली आस । होती यास[8] मूळ तें ॥ ध्रु ॥
माझ्या मोहें तुज पान्हा । लोटे स्तना वोरस ॥ २ ॥
तुका ह्मणे आळवणे[9] । माझ्या देणें उत्तर[10] ॥ ३ ॥

॥ ३५३९ ॥

आतां बरें घरिच्याघरीं । आपली उरी आपणापें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाइटबरें न पडे दृष्टी । मग कष्टी होइजेना ॥ ध्रु ॥

---

१ दे. नव्हेत तें०. पं. नव्हे तें.—२ पं. जाणिजेसें.—३ पं. कळे.—४ मं. "न" नाहीं.—५ दे. त्यें.—६ दे. त. देवपणे.—७ पं. मागितल्या.—८ पं. वास.—९ पं. आळवण.—१० पं. उत्तरा.

बोलों जातां वाढे बोल । वांयां फोल खटखट ॥ २ ॥
काकुलती यावें देवा । तो तों सेवा इच्छितो ॥ ३ ॥
हिशोबाचे खटखटे[1] । चढे तुटे घडेना[2] ॥ ४ ॥
तुका ह्मणे कळों आलें । दुसरें भलें तों नव्हे ॥ ५ ॥

॥ ३५४० ॥

आधीं सोज्वळ करावा मारग । चालतां तें मग गोवी नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा चालोनियां आला शिष्टाचार । गोवीचा वेव्हार पापपुण्य ॥ ध्रु ॥
पळणें तों[3] पळा सांडुनि कांबळें । उपाधीच्या मुळें लाग पावे ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें शूर तो निवडे । पडिले बापुडे कालचक्रीं ॥ ३ ॥

॥ ३५४१ ॥

उद्धत त्या जाती । द्रवें[4] रंगल्या उद्धती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि बहु फार । त्यांसी असावें अंतर ॥ ध्रु ॥
कैंचें पाठी पोट । गोडविषासी सेवट ॥ २ ॥
तुका ह्मणे सापा । न कळे कुरवाळिलें बापा ॥ ३ ॥

॥ ३५४२ ॥

आह्मां कथा आवश्यक । येर संपादूं लौकिक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जैसी तैसी माय बरी । मानिल्या त्या मानूं[5] येरी ॥ ध्रु ॥
व्यालीचा कळवळा । जीव बहुत कोंवळा ॥ २ ॥
कवतुकें वावरें । तुका ह्मणे या आधारें ॥ ३ ॥

---

१ पं. खटपटे.—२ त. घटेना.—३ पं. तें पळो सांडुनि०.—४ पं. द्रव्य.—५ पं. मानूं.

॥ ३५४३ ॥

पाळितों वचन । परि बहु भीतें मन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करितों पायांशीं सलगी । नये बैसों अंगसंगीं ॥ ध्रु ॥
जोडोनियां कर । उभें असावें समोर ॥ २ ॥
तुका ह्मणे संत । तुह्मी मी बहु पतित ॥ ३ ॥

॥ ३५४४ ॥

जैसा तैसा आतां । मज प्रमाण अनंता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पायां पडणें न संडीं । पोटीं तें च वर तोंडीं ॥ ध्रु ॥
एका भावें चाड । आहे तैसें अंतीं गोड ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां । टळणें चि नाहीं नेमा ॥ ३ ॥

॥ ३५४५ ॥

चुकलों या ऐशा वर्मां । तरी कर्मा सांपडलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाठी लागे करी नास । गर्भवास भोगवीं ॥ ध्रु ॥
माझें तुझें भिन्नभावें । गळां दावें मोहाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे पाठेळ केलों । नसत्या भ्यालों छंदासी ॥ ३ ॥

॥ ३५४६ ॥

देह प्रारब्धा शिरीं । असोन करी उद्वेग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धांव घालीं नारायणा । माझ्या मना जागवीं ॥ ध्रु ॥
ऐसी चुकोनियां वर्मे । पीडा भ्रमें पावलों ॥ २ ॥
तुका ह्मणे कैंचा भोग । नव्हे रोग अंगींचा ॥ ३ ॥

---

१ पं. तें सोडीं.—२ पं. आदि.

॥ ३५४७ ॥

अनंताच्या ऐकों[1] कीर्ती । ज्यांच्या चित्तीं हरिनाम ।
उलंघूनि गेले सिंधु । हा भवबंधु तोडोनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां[2] हळुहळु ते चि वाहीं । चालों कांहीं अधिकारें ॥ ध्रु ॥
खुंटूनियां गेले नावा । नाहीं हेवां खोळंबला ।
न लगे मोल द्यावा[3] रुका । भावें एका कारण[4] ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहतों वाट । उभा नीट पाउलीं ।
भीमातिरीं थडवा केला । उठा चला लवलाहें ॥ ३ ॥

॥ ३५४८ ॥

तरीं च म्यां देवा । साटी करूनियां जीवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें बैसलों धरणें । दृढ कायावाचामनें ॥ ध्रु ॥
आवरिल्या वृत्ति । मन घेउनियां हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे जरा । बाहेर येऊं नेदीं घरा ॥ ३ ॥

॥ ३५४९ ॥

हें[6] तों एक संतांठायीं । लाभ पायीं उत्तम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणवितां त्याचे दास । पुढें आस उरेना ॥ ध्रु ॥
कृपादान केलें संतीं । कल्पांतीं ही सरेना ॥ २ ॥
तुका ह्मणे संतसेवा । हा[7] चि हेवा उत्तम ॥ ३ ॥

॥ ३५५० ॥

नारायणा ऐसा । सेवूं नेणतील रसा ॥ १ ॥

---

१ पं. ऐकोनिं.—२ पं. "आतां" नाहीं.—३ पं. यावा.—४ दे. कारणें.—५ पं. "तुका ह्मणे०" आणि "भीमा तिरी०" हीं दोन अर्धें मागें पुढें आहेत.—६ पं. होतों०.—७ पं. हे चि देवा उत्तम ।.

॥ ध्रु. ॥ जेणें भवव्याध तुटे । दुःख मागुतें न भेटे ॥ ध्रु ॥
न लगे कांहीं आटी । बाधा राहों न सके पोटीं ॥ २ ॥
कैवल्य तें जोडे । पालट लवक्करी घडे ॥ ३ ॥
जन्ममरणदुःख अटे । जाळें अवघें चि तुटे ॥ ४ ॥
तुका ह्मणे जाला । याचा गुण बहुताला ॥ ५ ॥

॥ ३५५१ ॥

अनेक दोषांचे काट । जे जे गादले निघोंट ।
होती हरिनामें चोखट । क्षण एक न लगतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी हरि ह्मणा हरि ह्मणा । महादोषांचे छेदना ॥ ध्रु ॥
अतिप्रीतीचा बांधला । नष्ट चांडाळीं रतला ।
क्षण न लगतां नेला । वैकुंठासी हरि ह्मणतां ॥ २ ॥
अनंत दोषाचें मूळ । जालें वाल्मीका सबळ ।
जाला हरिनामें निर्मळ । गंगाजळ पैं जैसा ॥ ३ ॥
हरि ह्मणतां तरले । महादोषी गणिके नेलें ।
कुंटणी मिली उद्धरिलें । वैकुंठासी हरि ह्मणतां ॥ ४ ॥
हरिविण जन्म नको वांयां । जैसी दर्पणींची छाया ।
ह्मणोनि तुका लागे पायां । शरण तया हरीसी ॥ ५ ॥

॥ ३५५२ ॥

भजन यां नासिलें हेंडि । दंभा लंडा आवडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेवीतें ना आइता पाक । नासी ताक घुसळूनि ॥ ध्रु ॥

---

१ पं. कृपा.—२ दे.० दुखें । जाड अवघें०.—३ पं. दोषांची.—४ दे. अमित्य (अमित). पं. अमित्या.—५ दे. वाल्मीकास सबळ.—६ पं. "गणिके नेलें" याबद्दल उद्धरिले.—७ पं. "कुंटणी मिली उद्धरिलें" याबद्दल गणिकेसी नेलें'।.—८ पं. नको जन्म.—९ पं. हे.—१० दे. हेडि.—११ पं. दंभ.—१२ पं. जेवितांना०.

एकाएकीं इच्छी[1] पाठ । नेणे चाट कां जेवूं ॥ २ ॥
तुका ह्मणे मुलाम्याचें । बंधन साचें सेवटीं ॥ ३ ॥

॥ ३५५३ ॥

जैसा निर्मळ गंगाओघ । तैसा आग वोगरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेम वाढे ग्रासोग्रासीं । ब्रह्मरसीं भोजन ॥ ध्रु ॥
तृप्तीवरि आवडी उरे । ऐसे बरे प्रकार ॥ २ ॥
तुका ह्मणे पाख मन । नारायण तें भोगी ॥ ३ ॥

॥ ३५५४ ॥

सुख सुखा विरजणें[2] जालें । तें मथलें नवनीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हाले डोले हरुषे काया । निवती बाह्या नयन ॥ ध्रु ॥
प्रबल तो नारायण । गुणें गुण वाढला ॥ २ ॥
तुका ह्मणे भरली सीग । वरी मग वोसंडे ॥ ३ ॥

॥ ३५५५ ॥

कां रे न भजसी हरी । तुज[3] कोण अंगीकारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होइल यमपुरी । यमदंड यातना[4] ॥ ध्रु ॥
कोण जाली लगबग । काय करिसि तेथें मग ॥ २ ॥
कां रे भरला ताठा । करिती[5] वोज नेतां वाटा ॥ ३ ॥
तोंडा पडिली खिळणी । जिव्हा पिटिती वोढूनि ॥ ४ ॥
कां रे पडिली जनलाज । कोण सोडवील तुज ॥ ५ ॥
लाज धरीं ह्मणे तुका । नको वांयां जाऊं फुका ॥ ६ ॥

---

१ पं. इच्छा पाट०.—२ त. वीर. दे. "विरजण" असतां मागून "वीर" केलें आहे.—३ पं. तरी.—४ पं. यातना थोरी ।.—५ पं. करी.

॥ ३५५६ ॥

देवों कपाट । कों कोणें काळें राखों वाट ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय येईल तें शिरीं । आज्ञाधरूनियां करीं ॥ ध्रु ॥
करूं कळे तैसी मात । किंवा राखावा एकांत ॥ २ ॥
तुका ह्मणे जागों । किंवा कोणा नेदुं वागों ॥ ३ ॥

॥ ३५५७ ॥

क्षरला सागर गंगा ओघीं मिळे । आपण चि खेळे आपणाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मधील ते वाव अंधघी उपाधि । तुह्मां आह्मांमधीं ते चि परी ॥ध्रु॥
घट मठ जाले आकाशाचे पोटीं । वचनें चि तुटी तेथें चि तें ॥ २ ॥
तुका ह्मणे बीजें बीज दाखविलें । फळ पुष्प आलें गेलें वांयां ॥ ३ ॥

॥ ३५५८ ॥

एक आतां तुह्मी करा । मज दातारा सत्तेनें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विश्वास तो पायांवरी । ठेवुनि हरी राहिलों ॥ ध्रु ॥
जाणत चि दुजें नाहीं । आणिक कांहीं प्रकार ॥ २ ॥
तुका ह्मणे शरण आलों । काय बोलों विनावितों ॥ ३ ॥

॥ ३५५९ ॥

काय विनवावें कोणें तो निवाड । केलें माझ्या कोड वचनाचें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आहो कृपानिधी गुणांच्या निधाना । माझ्या अनुमाना नये चि हें॥ध्रु॥
बहुत करुणा केलेंसे भाषण । एक ही वचन नाहीं आलें ॥ २ ॥
माझी कांहीं सेवा होईल पावली । निश्चिती मानिली होती ऐसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी उरली ते आटी । अभय कर कटी न देखें चि ॥ ४ ॥

---

१ पं. पत्र.—२ पं. निवडावें.—३ दे. कोणें.—४ त. करोनि.—५ दे. भासेन.

॥ ३५६० ॥

लाजोनियां काळें राहिलें लिखित । नेदितां ही चित्त समाधान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसें सुख वाटे वचनाचे तुटी । प्रीतिविण भेटी रुचि नेदी ॥ ध्रु ॥
एकाचिये भेटी एकाचा कोंपर । भावेंचा पदर कळों येतो ॥ २ ॥
होत्या आपल्या त्या वेचूनियां शक्ती । पुढें जालों युक्तिकळाहीन ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुह्मी समर्थ जी देवा । दुर्बळाची सेवा कोठें पावे ॥ ४ ॥

॥ ३५६१ ॥

आशाबद्ध बहु असें निलाजिरें । होय ह्मणें धीरें फळ टोंकें[1] ॥ १ ॥
कारणापें चित्त न पाहें अपमान । चित्त समाधान लाभासाटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे हातें लोटिलें न कळे । झांकितसें[2] डोळे पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३५६२ ॥

सातां पांचां तरीं वचनां सेवटीं । निरोप कां भेटी एक तरी ॥ १ ॥
कां नेणें निष्ठुर केलें नारायणा । न देखें हें मना येतां कांहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसा न देखें निवाड । कडू किंवा गोड फळ पोटीं ॥ ३ ॥

॥ ३५६३ ॥

वांयां ऐसा जन्म गेला । हें विठ्ठला दुःख वाटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं सरता जालों पायीं । तुह्मी जईं न पुसा[3] ॥ ध्रु ॥
कां मी जीतों संवसारीं । अद्यापवरी भूमिभार ॥ २ ॥
तुका ह्मणे पंढरिनाथा । सबळ व्यथा भवरोग ॥ ३ ॥

---

१ त. फळा.—२ पं. झांकितसां.—३ पं. पुसतां.

॥ ३५६४ ॥

कासया हो माझा राखिला लौकिक । निवाड कां एक केला नाहीं ॥ १ ॥
मग तळमळ न करितें मन । जालें तें कारण कळों येतें ॥ २ ॥
तुका ह्मणे केला पाहिजे निवाड । वैद्यासी ते भीड मरण रोग्या ॥ ३ ॥

॥ ३५६५ ॥

ऐसें कोण पाप बळी । जें जवळी येऊं नेदी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मां तंव होइल ठावें । नेदावें कां कळों हें ॥ ध्रु ॥
कोण जाला अंतराय । कां ते पाय अंतरले ॥ २ ॥
तुका ह्मणे निमित्याचा । आला सुचा अनुभव ॥ ३ ॥

॥ ३५६६ ॥

ब्रह्मज्ञानाची भरोवरी । पुढिला सांगे आपण न करी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ थू थू त्याच्या तोंडावरी । व्यर्थ सिणवी वैखरी ॥ ध्रु ॥
कथा करी वारिवरी । प्रेम नसे चि अंतरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे कवित्व करी । मान वस्तु हे आदरी ॥ ३ ॥

॥ ३५६७ ॥

कधीं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धांवणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भेटी लागीं पंढरीनाथा । जीवीं लागली तळमळ व्यथा ॥ ध्रु ॥
सिणलें माझें मन । वाट पाहतां लोचन ॥ २ ॥
तुका ह्मणे लागली भूक । तुझें पहावया श्रीमुख ॥ ३ ॥

---

१ दे. त. वइदासी भीड मरणें रोग्या ।.—२ पं. 'ब्रह्मज्ञान.—३ पं. "पुढिला" नाहीं.—४ पं. सिणविली.—५ पं. मान लोभ हे अंतरीं ।,

॥ ३५६८ ॥

उच्चारूं यासाटीं । आह्मी नाम तुझें कंठीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येसी धांवत धांवत । माउलियें कृपावंते ॥ ध्रु ॥
पाय चित्तीं धरूं । क्रीडा भलते ठायीं करूं ॥ २ ॥
तुका ह्मणे माझे गंगे । प्रेमभरित पांडुरंगे ॥ ३ ॥

॥ ३५६९ ॥

दगडाच्या देवा बगाड[1] नवस । बाईल कयेस जाऊं नेदी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेची धनरासी बांधलें स्मशान । दारीं वृंदावन द्वाड मानी ॥ ध्रु ॥
चोरें नागविला न करी त्याची खंती । परी द्विजा हातीं नेदी रुका ॥ २ ॥
करी पाहुणेर व्याह्योजावयासी[2] । आल्या[3] अतीतासी पाठमोरा ॥ ३ ॥
तुका ह्मणे जळो धिग त्याचें जिणें । भार वाही सीण वर्म[4] नेणें ॥ ४ ॥

॥ ३५७० ॥

करूनि विनवणी । माथा ठेवितों चरणीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होतें तें चि असों द्यावें । रूप सौम्य चि बरवें ॥ ध्रु ॥
भया भेणें तुमचा ठाव । तुमच्या कोपें कोठें जावें ॥ २ ॥
तुका पायां लागे । दान समुदाय मागे ॥ ३ ॥

॥ ३५७१ ॥

प्रेम नये सांगतां बोलतां दावितां । अनुभव चित्ता चित्त जाणे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासवीचें बाळ वाढे कृपादृष्टी । दुधा नाहीं भेटी अंगसंगें ॥ ध्रु ॥
पोटामध्यें कोणें[5] सांगितलें सर्पा[6] । उपजत लपा ह्मणऊनि ॥ २ ॥

---

१ पं. बगाडी.—२ दे. त. विव्हाया जा०.—३ दे. "पाठमोरा आल्या अतीतासी।" असे शब्द मागें पुढें करून मागून फिरविलें आहे.—४ पं. धरातळीं । .—५ दे. कोण.—६ पं. त. सर्पा.

बोलों नेणें परी जाणे गोड क्षार । अंतरीं विचार त्यासी ठावा ॥ ३ ॥
तुका ह्मणे बरें विचारावें मनीं । आणिक भल्यांनीं पुसों नये ॥ ४ ॥

॥ ३५७२ ॥

आतां मी पतित ऐसा साच भावें । कळों अनुभवें आलें देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करावें तें सेकडें चि करीं । राहिली हे उरी नाहीं दोघां ॥ ध्रु ॥
येरें येरा दृष्टी द्यावया उत्तरा । यासी काय करा गोही आतां ॥ २ ॥
तुका ह्मणे मेलों सांगतसांगतां । तें चि आलें आतां कळों तुम्हां ॥ ३ ॥

॥ ३५७३ ॥

काय तुज मागें नाहीं जाणवलें । माझें नाहीं केलें हित कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ डोळे झांकुनियां होसी अबोलणा । तेव्हां नारायणा आतां कैसा ॥ ध्रु ॥
न कळे उचित न संगतां स्पष्ट । ऐसा क्रियानष्ट काय जाणें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा घात तुम्हां ठावा । तरि कां आधीं देवा वारूं नये ॥ ३ ॥

॥ ३५७४ ॥

नये ऐसें बोलों कठिण उत्तरें । सलगी लेंकुरें केली पुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अपराध कीजे घडला तो क्षमा । सिकवा उत्तमा आमुचिया ॥ ध्रु ॥
धरूं धावें आगी पोळेलें तें नेणे । ओढिलिया होणें माते बाळा ॥ २ ॥
तुका ह्मणे भारें ज्याचा जार त्यासी । प्रवीण येविशीं असा तुह्मी ॥ ३ ॥

॥ ३५७५ ॥

लडिवाळ ह्मणोनी निष्ठुर न बोला । परी सांभाळिला लागे घात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु वागवीत आणिलें दुरूनि । दासांची पोसनी बहु आहे ॥ ध्रु ॥

---

१ दे. त. येर येरा समदृष्टी द्यावें या उत्तरा ।.—२ त. जाणविलें.—३ त. पं. सांगतां.—४ दे. त. पोळलें.—५ दे. फार.—६ पं. दिसांचीं पोसणीं बहु आहों ।.

नाहीं लागों दिला आघाताचा वारा । निष्ठुर उत्तरां कोमेजतों[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी कृपावंत हरि । शांतवा उत्तरीं अमृताच्या ॥ ३ ॥

॥ ३५७६ ॥

आत्मस्थिति मज नको हा विचार । देईं निरंतर चरणसेवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जन्मोजन्मीं तुझा दास पुरुषोत्तमा । हे चि गोडी माझ्या[2] देईं जीवा[3] ॥ ध्रु ॥
काय सायुज्यता मुक्ति[4] हे चि गोड । देव भक्त कोड तेथें नाहीं ॥ २ ॥
काय तें निर्गुण पाहों कैशा परी । वर्णूं तुझी हरी कीर्ती कैसी ॥ ३ ॥
गोड चरणसेवा देवभक्तपणें[5] । मज देवा झणें दुराविसी ॥ ४ ॥
जाणिवेपासूनि सोडवीं माझ्या[6] जीवा । देईं चरणसेवा निरंतर ॥ ५ ॥
तुका ह्मणे गोडा गोड न लगे प्रीति[7] । सेवेविण चित्तीं सार नाहीं ॥ ६ ॥

॥ ३५७७ ॥

चालें दंडवत घालीं नारायणा । आपुल्या कल्याणा लागूनियां ॥ १ ॥
बैसविला पदीं पुत्र राज्य करी । पिता वाहे शिरीं आज्ञा त्याची ॥ २ ॥
तुका ह्मणे आहे ठायींचा चि मान । आतां अनुमान कायसा तो ॥ ३ ॥

॥ ३५७८ ॥

समर्थाचें बाळ पांघरे वाकळ । हसती सकळ लोक कोणा ॥ १ ॥
समर्थासी लाज आपुल्या नांवाची । शरण आल्याची लागे चिंता ॥ २ ॥
जरी तुज कांहीं होईल उचित । तरी हा पतित तारीं तुका ॥ ३ ॥

---

१ पं. कोमजतों.—२ पं. आह्मां. दे. "माझ्या" असतां मागून "प्रेमा" केलें आहे.—३ पं. देवा.—४ पं. मुक्तीची हे चाड।—५ दे. त. देवभक्तपण.—६ पं.० सत्वर। देईं निरंतर चरण सेवा।.—७ दे. ०प्रीतिकर। प्रीति ते ही सार सेवा हे रे।. त.० प्रीति। सेवेविण चित्तीं सार नेणें।.

॥ ३५७९ ॥

न करीं रे मना कांहीं च कल्पना । चिंतीं या चरणां विठोबाच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें सुखाचिया अमुप[1] चि रासी । पुढें[2] कल्पनेसी ठाव नाहीं ॥ ध्रु ॥
सुखाचें ओतिलें साजिरें श्रीमुख । शोक मोह दुःख पाहातां नाहीं[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें होईल विसांवा । तुटतील हांवा[4] पुढिलिया ॥ ३ ॥

॥ ३५८० ॥

काय[5] करूं मज नागविलें आळसें । बहुत या सोसें पीडा केली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हिरोनियां[6] नेला मुखींचा उच्चार । पडिलें अंतर जवळी च ॥ ध्रु ॥
द्वैताचिया कैसा सांपडलों हातीं । बहुत करती ओढाओढी ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां आपुलिया सर्वें[8] । न्यावें मज देवें[7] सोडवूनि ॥ ३ ॥

॥ ३५८१ ॥

नाहीं देवाचा विश्वास । करी संतांचा उपहास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचे तोंडीं पडे माती । हीन शूकराची जाती ॥ ध्रु ॥
घोकुनी अक्षर । वाद छळणा करीत फिरे ॥ २ ॥
ह्मणे देवासी पाषाण । तुका ह्मणे भावहीन ॥ ३ ॥

॥ ३५८२ ॥

हें चि सर्वसुख जपावा विठ्ठल । न दवडावा पळ क्षण वांयां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें चि एक सर्वसाधनांचें मूळ । आतुडे गोपाळ येणें पंथें ॥ ध्रु ॥
न लगती कांहीं तपांचिया रासी । करणें वाराणसी नाना तीर्थें ॥ २ ॥

---

१ दे. त. "अमुप चि" नाहीं.—२ दे. त. पुढें ठाव नाहीं कल्पनेसी ।.—३ पं. नासे.—४ पं. धांवा.—५ पं. "काय करूं०" व "हिरोनियां" हीं कडवीं मागें पुढें आहेत.—६ पं. सवा.—७ पं. देवा.—८ पं. सर्व.

कल्पना हे तिळ देहीं अभिमान । नये नारायण जवळी त्यांच्या[1] ॥ ३ ॥
तुका ह्मणे नामें देव नेदी भेटी । ह्मणे त्याचे होंटीं कुष्ट होय ॥ ४ ॥

॥ ३५८३ ॥

माझे विषयीं तुज पडतो[2] विसर । नको धरूं दूर पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझा ह्मणवितों हे चि लाज तुला[3] । आतां झणी मला[4] विसरेसी ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझी माझी नाहीं उरी । आतां केली खरी देवराया ॥ ३ ॥

॥ ३५८४ ॥

अभक्ताचे गांवीं साधु ह्मणजे काय । व्याघ्रवाडां[5] गाय सांपडली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कसाबाचे आळी मांडिलें प्रमाण । बस्वणाची आण तया काई ॥ ध्रु. ॥
केळी आणि बोरी वसती सेजारी । संवाद कोणे परी घडे येथें[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे खीर केली काग्हेळ्याची । शुद्ध गोडी कैची वसे तेथें ॥ ३ ॥

॥ ३५८५ ॥

भागल्यांचा तूं विसांवा । करीं[8] नांवा निंबलोण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परमानंदा पुरुषोत्तमा । हरीं या श्रमापासूनि ॥ ध्रु. ॥
अनाथांचा अंगीकार । करितां भार न मनिसी[9] ॥ २ ॥
तुका ह्मणे इच्छा पुरे । ऐसे[10] धुरे गे विठ्ठले ॥ ३ ॥

॥ ३५८६ ॥

घालूनियां कास । बळें आलों मागायास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेमें देई पाठवूनि । पांडुरंगा सेवाऋणी ॥ ध्रु. ॥
होई रे शाहाणा । कळों नेदावें या जना ॥ २ ॥
तुका ह्मणे पायीं । जडलों मग उरलें काई ॥ ३ ॥

---

१ पं. त्यां ।.—२ दे. त. पडतां.—३ पं. तुज.—४ पं. मज.—५ दे. व्याघ्रें वाडां.—६ पं. "मोतियाची गोणी माळे ओळी नेली । पुसती केवढ्या केली पांसरी हे ॥." हें कडवें जास्त आहे.—७ पं. तेथें.—८ पं. करीन.—९ त. न मनी.—१० दे. ऐसें धुरेगे विठ्ठल ।. पं. ऐसी धुर विठ्ठल ।.

॥ ३५८७ ॥

भेटीलागीं पंढरिनाथा । जीवीं लागली तळमळ व्यथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैं कृपा करिसी नेणें । मज दीनाचें धांवणें ॥ ध्रु ॥
क्षीणलें माझें मन । वाट पाहातां लोचन ॥ २ ॥
तुका ह्मणे भूक । तुझें पाहावया मुख[1] ॥ ३ ॥

॥ ३५८८ ॥

सांडियेली काया । वरी ओंवाळूनी पायां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शरण शरण नारायणा । मज अंगीकारा दीना ॥ ध्रु ॥
आलों लोटांगणीं । रुळें तुमचे चरणीं ॥ २ ॥
तुका ह्मणे कैंई[2] । डोई ठेवीन हे पायीं ॥ ३ ॥

॥ ३५८९ ॥

तुझे दारींचा कुतरा । नको मोकलूं दातारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धरणें घेतलें घरांत[3] । नको धरून[4] उठवूं हात ॥ ध्रु ॥
घेतली मुरकुंडी[5] । थोर जालों मी लंडी ॥ २ ॥
तुका ह्मणे जगजीवना । ब्रिदें[6] पाहें नारायणा ॥ ३ ॥

॥ ३५९० ॥

पडिलों बाहेरि आपल्या कर्तव्यें । संसाराचा जीवें वीट आला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एकामध्यें एक नाहीं मिळों येत । ताक नवनीत निवडलिया[7] ॥ ध्रु ॥
दोनी जालीं नांवें एकाच्या[8] मथनें । भुस सार गुणें वेगळालीं ॥ २ ॥
तुका ह्मणे कोठें वसे मुक्ताफळ । सिंपल्याचें स्थळ खंडलिया ॥ ३ ॥

---

१ त. श्रीमुख.—२ पं. शिर । ठेवियेलें पायांवर ॥.—३ पं. दारांत ।.—४ पं. उठवूं धरून.—५ पं. मुरकुंड । जालों शिरमणी लंड ॥. त. "थोर जालों" या पुढें "शिरोमणी" असा वाहेर शोध घालून "मी लंडी" हें कायम ठेविलें आहे.—६ पं. ब्रीद.—७ दे. निडाळिया.—८ पं. एका चि.

॥ ३५९१ ॥

पाहातां हें बरवें जालें । कळों आलें यावरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागिलांचा[1] जाला झाडा । त्या निवाडास्तव[2] ॥ ध्रु ॥
विसांवलें अंग दिसे । सरिसे[3] बुद्धि अनुभव ॥ २ ॥
तुका ह्मणे बरें जालें । देवें नेलें[4] गंवसूनि ॥ ३ ॥

॥ ३५९२ ॥

चक्रफेरीं[5] गळीं गळा । होता गोवियेला माळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फुटोनियां गेला कुंभ । जालों निष्काम[9] स्वयंभ ॥ ध्रु ॥
चरित चि नाहीं थारा । वेठी[6] भ्रमण खोंकरा ॥ २ ॥
तुका ह्मणे कौतुक[7] कोडें । आग्नि काय ताणे मढें ॥ ३ ॥

॥ ३५९३ ॥

श्रमपरिहारा । मूळ[8] हें जालें दातारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देह निवेदूनि पायीं । जालों रिकामा[1] उतराई ॥ ध्रु ॥
आपली ते[10] सत्ता । येथें असों नेदीं आतां ॥ २ ॥
राहिला निराळा । तुका कटकटे[11] वेगळा ॥ ३ ॥

॥ ३५९४ ॥

पाठवाल तेथें गर्जेन पवाडे । कांयीं[12] देहाकडे नावलोकीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनि मागें कंठींचा सौरस । पावतील नास विघ्नें पुढें ॥ ध्रु ॥
कृपेच्या कटाक्षें नें[13] में कळिकाळा । येतां येत बळ शक्तीपुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे गुढी आणीन पायांपें । जगा[14] होइल सोंपें नाम तुझें ॥ ३ ॥

---

१ पं. मागिल्यांचा.—२ पं. निवाडास्तव हे । त. निवाडा यास्तव.—३ पं. सरिसेसरिसे अनुभव ।. दे. सरिसें अनुभव ।.—४ पं. दिलें.—५ दे. त. चक्रपेरीं.—६ पं. ठेवी.—७ पं. "कौतुक" नाहीं.—८ त. जालें मूळ हे दातारा ।. पं. मूळ जाहालें दातारा ।.—९ पं. निष्कामस.—१० पं. तों.—११ पं. खटपटे.—१२ त. पं. कांहीं.—१३ दे. निमें. पं. नमियें.—१४ पं. होईल तें सोपें नामें तुझ्या.

॥ ३५९५ ॥

उपजल्या काळें शुभ कां शकुन । आतां आवरोन राहिलेती ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नाहीं मागितलीं वचनाची जोडी । निष्काम रोकडी[1] वरिघरि ॥ ध्रु॥
सत्याविण काय उगी च लांबणी । कारियाची वाणी येर भूस ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसी कोणा चाळवणी । न विचारा मनीं पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३५९६ ॥

नव्हें मी आहाच आशेचें बाधलें । जें हें टोंकविलें नारायणा[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतर तों तुह्मां बरें कळों येतें । वेव्हार उचितें चाळवीजे ॥ ध्रु॥
मनें कल्पीलें आवरितां पाप । संकल्पीं[3] विकल्प याचि नांवें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां न[4] सोसे जळजळ । सिंजल्यांवरी[5] जाळ कढ[6] खोटा ॥३॥

॥ ३५९७ ॥

ताकें कृपण हो जेवूं काय घाली । आहाच ते चोंलीवरुनि[7] कळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तुह्मां वेचे घातलें सांकडें । माझें[8] आलें कोडें आजिवरि ॥ध्रु
सेवेविण आह्मी न लिंपों हे[9] काया । जाला देवराया निर्धार हा ॥ २॥
तुका ह्मणे तुझीं राखावया ब्रीदें । येणें अनुवादें कारियासी[10] ॥ ३ ॥

॥ ३५९८ ॥

वृत्तीवरि आह्मां येणें काशासाटीं । एवढी हे आटी सोसावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाणतसां परी नेणते[11] जी देवा । भ्रम चि बरवा राखावा तो ॥ध्रु॥
मोडूनि क्षरलों अभेदाची मूस । तुह्मां कां अळस वोडवला ॥ २ ॥
तुका ह्मणे होई लवकरि उदार । लांबणीचें फार काम नाहीं ॥ ३ ॥

---

१ दे. कोरडी.—२ पं. नारायणें.—३ पं. संकल्प विकल्प याही नांवें ।—४ त. अनेक जळजळ ।—५ त. नसोसे केवळ कढ खोटा ।—६ पं. कड.—७ त. वोलीवरुनि. पं. चालीवरी न कळे.—८ त. दे. माहें.—९ दे. "हे" नाहीं. पं, त्या कार्या ।—१० पं. गर्जतसों.—११ दे. नेणें तजीं०.

॥ ३५९९ ॥

सुलभ [1]कीर्तनें दिलें ठसावूनि । करितां धरणी उरी कोण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां न टळावें कोलिया नेमासी । उदाराचा होसी हीन काय ॥ध्रु॥
एका नेमें कोठें दुसरा पालट । [2]पादेर तो धीट ह्मणती त्यासी ॥ २ ॥
तुका ह्मणे किती [3]बोलसील उणें । एका च वचनें खंड करीं ॥ ३ ॥

॥ ३६०० ॥

जेथें माझी दृष्टि राहिली बैसोन । तेथें चि हें मन [4]गुंडाळतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ टाळावी ते पीडा आपुल्यापासून । [5]दिठावलें अन्न ओकवितें ॥ध्रु॥
तुह्मांसी कां कोडें कोणे ही विशिचें । नवलाव याचें वाटतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे वेगीं उभारा जी कर । [6]कीर्ति [7]मुखें थोर गर्जईन ॥ ३ ॥

॥ ३६०१ ॥

इच्छेपाशीं आलों फिरोनि मागुता । स्वामिसेवकता [8]आवडीचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ द्यावें लवकरी मागितलें दान । मुळींचें जतन करूनि असें ॥ध्रु॥
उपाय हे करीं एका चि वचना । दावूनियां खुणा ठाया येतों ॥ २ ॥
तुका ह्मणे गांठी किती तुजपाशीं । जगाच्या तोडिसी चिंतनानें ॥ ३ ॥

॥ ३६०२ ॥

कोठें [9]आतां आह्मी वेचावी हे वाणी । कोण मना आणी जाणोनियां ॥१॥
॥ ध्रु. ॥ न करावी सांडी आतां टाळाटाळी । देइगे ये कळी होइल माजी ॥ध्रु॥
घरोघरीं[10] जाल्या ज्ञानाचिया गोष्टी । सत्यासवें गांठी न [11]पडावी ॥ २ ॥
तुका ह्मणे आम्हां भाकितां करुणा । भलता चि शाहाणा शोध काढी ॥ ३ ॥

---

१ पं. कीर्तन.—२ दे. पादिर.—३ दे. बोलसी.—४ दे. गुंडाळातें.—५ दे. दिठावेलें.—६ पं. कीर्ती.—७ पं. आवडीची.—८ पं. आह्मी आतां.—९ पं. देईन हे कळी०. त. दइनये.—१० पं. घरापार.—११ दे. पडवी.

॥ ३६०३ ॥

डगमगी मन[1] निराशेच्या गुणें । हें तों नारायणें सांतवीजे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धीरें[2] तूं गंभीर जीवनें[3] जगाचें । जळो विभागाचें[4] आंत्रीतंत्या ॥ ध्रु. ॥
भेईल जीव हें देखोनि काठिण । केला[5] जातो सीण तो तो वांयां ॥ २ ॥
तुका ह्मणे आवश्यक हें वचन । पाळावें चि दान समयो आहे ॥ ३ ॥

॥ ३६०४ ॥

आह्मी पाहा कैसीं एकतत्त्व जालों । राखणे लागलों वासनेसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मांविण कांहीं नावडावें जीवा । केला तो चि देवा केलों पण ॥ ध्रु. ॥
वर्म नेणों[6] परि वृत्ती भंगों नेदुं । वंदिलें चि वंदूं आवडीनें ॥ २ ॥
तुका ह्मणे कळे नामाचें जीवन । वारता ही भिन्न नेणों आतां ॥ ३ ॥

॥ ३६०५ ॥

आपण तों असा । समर्थ जी ह्रृषीकेशा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करा करा बुझावणीं । काय विलंब वचनीं ॥ ध्रु. ॥
हेंगे[7] ऐसें ह्मणा । उठूनि लागेन चरणा ॥ २ ॥
घेऊनियां सुखें । नाचेलें[8] तुका कवतुकें ॥ ३ ॥

॥ ३६०६ ॥

घाल ऐसें दिसे । तुमचें साचपण इच्छे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि न भंगे निर्धार । केलें[9] लोचनें सादर ॥ ध्रु. ॥
मुखाची च वास । पुरला पाहे अवकाश ॥ २ ॥
तुका ह्मणे कळे । काय लाभ कोणें[10] वेळे ॥ ३ ॥

---

१ दे. त. मान.—२ दे. जीवनें.—३ पं. आहाच, ते.—४ दे. वान.—५ पं. दृढ—६ पं. नेणे.—७ त. हें घे.—८ पं. नाचे.—९ दे. केलें लोचनें.—१० दे. कोण वेळ.

॥ ३६०७ ॥

तुह्मी तों सदैव । अधीरपणें[1] माझी हांव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जळो आशेचें तें जिणें । टोंकतेसों[2] दीनपणें ॥ ध्रु. ॥
येथूनि सोडवा । आतां अनुभवेंसी[3] देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे जालें । एक मग हें मिमालें ॥ ३ ॥

॥ ३६०८ ॥

कैसें भलें देवा अनुभवा कां नये । उसीर तो काय तुह्मांपाशीं[4] ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आहे तें मागतों[5] दिसतें जवळी । केल्यामध्यें कळि कोणें[6] साध्य ॥ध्रु.॥
नाहीं सांडीत मी सेवेची मर्यादा । लाविला तो धंदा नित्य करीं ॥ २ ॥
तुका ह्मणे हात आवरिला गुंती[7] । माझे देव चित्तीं नाहीं दुजें ॥ ३ ॥

॥ ३६०९ ॥

हुंदकी पिसवी हलवी दाढी । मणी[8] वोढी निंदेचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचें फळ पाकीं यमाचे[9] दंड । घर केलें कुंड कुंभपाक ॥ ध्रु. ॥
क्रोध पोटीं मांग आणिला अंतरा । भुंकोनि कुतरा जप करी ॥ २ ॥
तुका ह्मणे स्नान केलें मळमूत्रें । जेवविलीं[10] पितरें अमंगळें ॥ ३ ॥

॥ ३६१० ॥

अंगीं[11] भरला ताठा । नये वळणी जैसा खुंटा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसें न कळे त्या डेंगा । हित आदळलें अंगा ॥ ध्रु. ॥
जीव जाते वेळे । भरे[12] लकडा ताठी डोळे ॥ २ ॥
मुसळाचें धनु । तुका ह्मणे नव्हे अनु[13] ॥ ३ ॥

---

१ दे. आधरपणें.—२ दे. टोंकतसावें.—३ पं. अनुभवें.—४ पं. आह्मांपाशीं.—५ दे. मागों तों दिसातें०. त. मागतों दिसातें.—६ दे. कोणें.—७ पं. हळवितो.—८ पं. मणी मनीं ओढी निंदेचे ते ।.—९ पं. यमाचे ते दंड ।.—१० पं. जेविलीं.—११ पं. अंगीं.—१२ पं. भरल्या कडे.—१३ त. आणु.

॥ ३६११ ॥

करूनि कडविड । जमा घडिली लगड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां[1] होतें तें चि जालें । नाम ठायींचें चांगलें[2] ॥ ध्रु ॥
उतरलें डाई । उत्तम ते सुलाख ताई ॥ २ ॥
हिंडवितां देशें[3] । तुका ह्मणे नाहीं नाश ॥ ३ ॥

॥ ३६१२ ॥

पढीयंतें मागा पांडुरंगापाशीं । मज दुर्बळासी काय पीडा ॥ १ ॥
॥ध्रु.॥याँ[4] च साटीं दुराविला संवसार । वाढे हे अपार माया तृष्णा ॥ ध्रु ॥
कांहीं करितां कोठें नव्हे समाधान । चिचारितां पुण्य तें चि पाप ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां निश्चळ चि भलें । तुज आठविलें पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३६१३ ॥

नव्हे मी शाहाणा । तरी ह्मणा नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मां बोलवाया[5] कांहीं । ये च भरलोंसे वाहीं ॥ ध्रु ॥
आणावेति रूपा । कोपलेती तरी कोपा ॥ २ ॥
कळोनि आवडी । तुका ह्मणे जाते घडी ॥ ३ ॥

॥ ३६१४ ॥

आह्मी भाविकें हे काय जाणों खोडी । आइकोनि प्रौढी विनविलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं ऐसें[6] येथें जालेती असतां । वाढविली चिंता अधिक सीसें ॥ ध्रु ॥
न कळे चि आधीं करितां विचार । न धरितां धीर आहाचता[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां वचनें वर्चन[8] । वाढले तीक्षण बुद्धि जाली ॥ ३ ॥

---

१ पं. "आतां" नाहीं.—२ पं. पाडिलें.—३ पं. देशोदेश.—४ पं. याजसाटीं.—५ दे. बोलावया.—६ पं. येथें ऐसें.—७ त. अधीरता.—८ दे. °वचनें । वाढले तिक्षीण°.

॥ ३६१५ ॥

कोठें देवा बोलों । तुह्मां भीड घालूं गेलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करावया[1] सत्त्वहाणी । भांडवलाची टांचणी ॥ ध्रु ॥
दुर्बळा मागतां । त्याच्या प्रवर्तला[2] घाता ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं । मज कळलें ऐसें कांहीं ॥ ३ ॥

॥ ३६१६ ॥

काय त्यां[3] दिवस उचिताचा आला । मागील जो केला श्रम होता ॥ १॥
॥ ध्रु. ॥ ठेवियेलां[4] पूर्ण करूनि संकेत । तयापाशीं चित्त लागलें से ॥ ध्रु ॥
जाणसी गे माते लेंकरांचे[5] लाड । नये पडों आड निष्ठुरता ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मीं करावें वचन । तुह्मांसी जतन करणें[6] तें ॥ ३ ॥

॥ ३६१७ ॥

पडिला प्रसंग कां मी ऐसा नेणें । संकल्प ते मनें जिरवले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चेष्टविलें तरी सांगावें कारण[7] । भक्ती तें[8] उजवण करावया ॥ध्रु॥
लावूनियां दृष्टि घेतली[9] सामोरी । बैसलें जिव्हारीं डसोन तें ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवा लाविला तो चाळा । करावें गोपाळा शीघ्र दान ॥ ३ ॥

॥ ३६१८ ॥

मागील विसर होईल सकळ । केली तळमळ दुःखाची ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दोहींचें अहिक्य घालीं[10] गडसंदीं । स्थिरावेल बुद्धि पायांपाशीं ॥ ध्रु॥
अहाच यां[11] केलों देहपरिचारें । तुमचें तें खरें वाटों नये ॥ २ ॥
तुका ह्मणे व्हावें लवकरी उदार । मी आहें[12] सादर प्रतिग्रहासी ॥ ३ ॥

---

१ दे. करावाया.—२ पं. प्रवर्तल्या.—३ पं. "त्या" नाहीं.—४ पं. ठेवियेली खूण करूनि०.—५ पं. लेंकराचा.—६ त. करावें तें. पं. करूं देवा.—७ दे. कारणें.—८ पं. तें जीवन करावया ॥ दे. ते उजेवन.—९ पं. घातली समोरी । बैसलों०.—१० पं. धाडी गडसंधीं । स्थिरावली०.—११ पं. त्या.—१२ पं. मी असें सादर प्रतिग्रहीं ।.

॥ ३६१९ ॥

वाढवावा[1] पुढें आणीक प्रकार । एक चि तें फार रुचि नेदी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निचें[2] नवें लेणें देह हा पत्राडा । पालट रोकडा वरावरी ॥ ध्रु ॥
दिसे शोभिवंत सेवेनें सेवक । स्वामीची ते लोकत्रयीं कीर्ति ॥ २ ॥
तुका ह्मणे आजी पाववा संतोष । करुनि कीर्तिघोष नाचईन ॥ ३ ॥

॥ ३६२० ॥

क्षोभ आणि कृपा मातेची समान । विभाग जतन करुनि ठेवी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्षणभंगुर ते उपजली[3] चिंता । खरी अखंडता आवडीची ॥ ध्रु ॥
सिकवूं जाणे ते गोमाटियासाटीं । लोभें नाहीं तुटी निश्चयेंसी ॥ २ ॥
अवघें[4] चि मिथ्या समया आरसें[5] । देता तो[6] उचितें काळ जाणे ॥ ३ ॥
न करी वेव्हार नेदी[7] गांजूं कोणा । भेडसावी[8] तान्हें[9] हाऊ आला ॥ ४ ॥
तुका ह्मणे करी जिवांची[10] जतन । दचकूनि मन जवळी आणी ॥ ५ ॥

॥ ३६२१ ॥

संसाराचे धांवे वेठी । आवडी पोटीं केवढी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हागों जातां दगड सांची[11] । अंतरीं ही संकल्प ॥ ध्रु ॥
लाज तेवढी नारायणीं । वांकडी वाणी पोरांपें ॥ २ ॥
तुका ह्मणे बेशरमा । श्रमावरी[12] पडिभरू ॥ ३ ॥

॥ ३६२२ ॥

मी त्यांसी अनन्य तीं कोणीं[13] असती । ऐसें तंव चित्तीं विचारावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आहे तो विचार आपणयापाशीं । कळा बिंबाऐसी प्रतिबिंबीं[14] ॥ ध्रु ॥

---

१ पं. वाढवावे.—२ त. पं. नीच.—३ पं. उपजवी.—४ दे. अघवें.—५ त. तें.—६ पं. जाणो.—७ पं. गांजूं नेदी.—८ दे. भेटसावी.—९ पं. तान्हा वाऊ.—१० पं. जीवाचें.—११ दे. "सांचि" याचें "सुंचि" केलें आहे.—१२ पं. वरी श्रमा.—१३ पं. कोणासी.—१४ पं. प्रतिबिंबे.

शुभ शकून तो शुभ लाभें फळे । पुढील तें कळे अनुभवें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा असेल आठव । तैसा माझा भाव तुझ्या पायीं ॥ ३ ॥

॥ ३६२३ ॥

बहु कृपावंतें माझीं मायबापें । मी माझ्या संकल्पें अंतरलों[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संचितानें नाहीं चुकों दिली वाट । लाविलें अदृष्ट[2] मजसवें ॥ ध्रु ॥
आतां मी रुसतों न कळतां वर्म । परी ठावे धर्म सर्व देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे उभा राहिला न बैसे । आमची[3] माय असे उद्वेग त्या ॥ ३ ॥

॥ ३६२४ ॥

कैसीं दिसों बरीं । आह्मी आळवितां हरि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं सोंग अळंकार । दास जाला संवसार ॥ ध्रु ॥
दुःख आह्मां नाहीं चिंता । हरिचे दास ह्मणवितां ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । ऐसीं जालों[4] करितां सेवा ॥ ३ ॥

॥ ३६२५ ॥

आतां सांडूं तरी हातीं ना पदरीं । सखीं सहोदरीं मोकळिलों[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जनाचारामध्यें उडाला पातेरा । जालों[6] निलाजिरा ह्मणऊनि ॥ध्रु
कोणाचिया दारा जावेनासें[7] जालें । म्यां च विटंबिलें आपणासी ॥२॥
कोर्ण जाला माझे बुद्धीसी संचार । नाहीं कोठें थार ऐसें जालें ॥ ३॥
तुका ह्मणे तुज भक्त जाले फार । ह्मणोनियां थार नाहीं येथें ॥ ४ ॥

॥ ३६२६ ॥

जेथें जातों तेथें पडतो मतोळा । न देखिजे डोळां लाभ कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कपाळीची रेखा असती उत्तम । तरि कां[8] हा श्रम पावतों मी ॥ ध्रु ॥

---

१ पं. अवतरलों.—२ दे. अदट. त. आदट.—३ पं. आमचिया ऐसे उद्वेग त्या.—४ दे. जळो करितां०. त. जाली करीतां.—५ पं. मोकाळिला.—६ पं. जालों मी निला०.—७ त. न जावेंसें. पं. जानवेसें.—८ दे. कां न.

नव्हे चि तुह्मांस माझा अंगीकार । थीता संवसार अंतरला ॥ २ ॥
भोग तंव जाला खरा भोगावया तो[1] । भांडवलें नेतो आयुष्य काळ ॥३॥
कोठें तुझी कीर्ती आइकिली देवा । मुकतों कां जीवा तुका ह्मणे ॥४॥

॥ ३६२७ ॥

कां जी आह्मां होतें दोषाचें दर्शन । तुज समर्पून देहभाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांडुरंगा कृपाळुवा दयावंता । धरसील सत्ता सकळ ही ॥ ध्रु ॥
कां जी आह्मांवरि आणिकांची सत्ता । तुह्मांसी असतां जवळिकें[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे पायीं केलें निवेदन । उचित तें दान करीं सत्ता[3] ॥ ३ ॥

॥ ३६२८ ॥

निंदावें हें जग । ऐसा भागा आला भाग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होतें तैसें आलें फळ । गेलें निवडूनि सकळ ॥ ध्रु ॥
दुसऱ्याच्या मता । मिळेनासें जालें चित्ता ॥ २ ॥
तुका जाला सांडा । विटंबिती पोरें रांडा ॥ ३ ॥

॥ ३६२९ ॥

माझे माथां तुझा हात । तुझे पायीं माझें चित्त ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी पडियेली गांठी । शरीरसंबंधाची मिठी ॥ ध्रु ॥
येरयेरांपाशीं । सांपडोनि गेलों ऐसीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवा । माझी कृपा तुझी देवा ॥ ३ ॥

॥ ३६३० ॥

सत्य त्यागा चि समान । नलगे वेचावें वचन ॥ १ ॥

---

१ पं. भोगावा तो।.—२ पं. जवळीक.—३ पं. सदा.

॥ ध्रु. ॥ नारायणा ऐसे[1] दास । येरयेरांची च आस ॥ ध्रु ॥
मळ नाहीं चित्ता । तेथें देवाची च सत्ता ॥ २ ॥
तुका ह्मणे जाण । तें च भल्याचें वचन ॥ ३ ॥

॥ ३६३१ ॥

माझिये बुद्धीचा खुंटला उपाव । करिसिल काय पाहेन तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सूत्रधारी तूं हें सकळचाळिता । कासया अनंता भार वाहों ॥ध्रु॥
वाहिले संकल्प न पवती सिद्धी । येऊं देहबुद्धीवरि नेये[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे दुःखी करिती तरंग । चिंतूं पांडुरंग आवरून ॥ ३ ॥

॥ ३६३२ ॥

देखिलें तें धरिन[3] मनें । समाधानें राहेन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाव माझी सांटवण । जगजीवन कळावया ॥ ध्रु ॥
बोळवीन एकसरें । उत्तरें या करुणेच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे नयों[4] रूपा । काय बापा करिसी[5] ॥ ३ ॥

॥ ३६३३ ॥

वांयां जाय ऐसा । आतां उगवावा फांसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें परिसावें गाऱ्हाणें । सुखदुःखाचीं वचनें ॥ ध्रु ॥
हा चि आह्मां ठाव । पायीं[6] निरोपाया भाव ॥ २ ॥
तुका ह्मणे जार । तुझा तुज देवा भार ॥ ३ ॥

॥ ३६३४ ॥

खादलें च खावें वाटे । भेटलें भेटे आवडी ॥ १ ॥

---

१ पं. ऐसा.—२ दे. नयों.—३ पं. धरीं.—४ पं. नयो न रूपा ।.—५ पं. करिसील.—६ पं. कांहीं.

॥ ध्रु. ॥ वीट नाहीं पांडुरंगीं[1] । वाढे अंगीं आर्त तें ॥ ध्रु ॥
इंद्रियांची[2] हांव पुरे । परि हें उरे चिंतन ॥ २ ॥
तुका ह्मणे पोट भरे । परि ते उरे भूक पुढें ॥ ३ ॥

॥ ३६३५ ॥

सत्य आठवितां देव । जातो[3] भेव पळोनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे कांहीं करणें चिंता । धरी सत्ता सर्व तो ॥ ध्रु ॥
भावें भाव राहे पायीं । देव तें संनिध ॥ २ ॥
तुका ह्मणे कृष्णनामें । शीतळ प्रेम सर्वांसी ॥ ३ ॥

॥ ३६३६ ॥

ब्रीद ज्याचें[4], जगदानी[5] । तो चि मनीं[6] स्मरावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सम पाय कर कटी । उभा तटीं भीवरेच्या ॥ ध्रु ॥
पाहिलिया वेध लावी । बैसे जीवीं जडोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे भक्तिकाजा । धांवे लाजा लवलाहें ॥ ३ ॥

॥ ३६३७ ॥

माझिया मनाची[6] बैसली आवडी । अवसान घडी एकी नेघे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाय चित्तीं रूप डोळां च राहिलें । चिंतनें गोविलें मुख सदा ॥ ध्रु ॥
अवघियांचा जाला विसर हा मार्गें । वेध हा श्रीरंगें लावियेला ॥ २ ॥
तुका ह्मणे कानीं आइकली मात । तो चि जाला घात जीवपणा ॥ ३ ॥

॥ ३६३८ ॥

याची कोठें लागली चट । बहु तट जालेंसे ॥ १ ॥

---

१ पं. पाडुरंगा । वाढ अंगा०.—२ पं. इंद्रियाची. त. इंद्रियींची.—३ पं. जातें.—४ दे. त. याचें.—५ त. जगदाणी.—६ पं. त. मनासी.—७ पं. बैसलें.

॥ ध्रु. ॥ देवपिसीं देवपिसीं । मजऐसीं जग म्हणे ॥ ध्रु ॥
एकांताचें बाहेर आलें । लपविलें झांकेना ॥ २ ॥
तुका म्हणे याचे भेटी । जाली तुटी आपल्यांसी[1] ॥ ३ ॥

॥ ३६३९ ॥

दीनें[2] आणि दुर्बळांसी । सुखरासी हरिकथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तारूं भवसागरींचें । उंचनीच[3] अधिकार[4] ॥ ध्रु ॥
चरित्र तें उच्चारावें । केलें देवें गोकुळीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आवडी धरीं । कृपा करी ह्मणऊनी ॥ ३ ॥

॥ ३६४० ॥

संतोषें[5] माउली आरुषा वचनीं । वोरसोनि स्तनीं लावी बाळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें प्रेमळाचें[6] अवघें चि गोड । पुरवितो कोड पांडुरंग ॥ ध्रु ॥
सेवा करी साहे निष्ठुर उत्तरें । त्याचे[7] वाहे बरें तें च मनीं ॥ २ ॥
तुका ह्मणे इच्छावसे खेळ खेळें । चिंता ते सकळ कांहीं नेणें ॥ ३ ॥

॥ ३६४१ ॥

विनवीजे ऐसें कांहीं । उरलें नाहीं यावरि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां असो पंढरीनाथा । पायीं माथा तुमचिये ॥ ध्रु ॥
मागें सारियेली युक्ती । कांहीं होती जवळी ते ॥ २ ॥
निराशेची न करी आस । तुका दास माघारी ॥ ३ ॥

॥ ३६४२ ॥

आतां येथें जाली जीवासवेंसाटी । होतें तैसें पोटीं फळ आलें ॥ १ ॥

---

१ पं. आपुल्यांची.—२ दे. दीनें.—३ दे. उंच निंचें.—४ पं. अधिकारीं.—५ दे. संतोष.६— दे. त. परिमळाचें.—७ त. त्याचें तें चि बरें वाहे मनीं । दे. त्याचें वाहे मनीं वेंच बरें.

॥ ध्रु. ॥ आतां धरिले ते न[1] सोडीं चरण । सांपडलें धन निजठेवा ॥ ध्रु॥
आतां हा अळस असो परता दुरी । नेदावी ते उरी उरों कांहीं ॥ २ ॥
आतां याचा[2] मज न व्हावा विसर । भरोनी अंतर राहो रूप ॥ ३ ॥
आतां लोकलाज नयो येथें[3] आड । बहु जालें[4] गोड ब्रह्मरस ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां जन्म हा सफळ । अंतरीं गोपाळ स्थिरावला ॥ ५ ॥

॥ ३६४३ ॥

अनंतां[5] जीवांची तोडिलीं बंधनें । मज हि येणें[6] काळें कृपा कीजे ॥ १॥
॥ ध्रु. ॥ अनंत पवाडे तुझे विश्वंभरा । भक्तकरुणाकरा नारायणा ॥ ध्रु॥
अंतरींचें[7] कळों देई गुह्य गुज । अंतरीं तें बीज राखईन[8] ॥ २ ॥
समदृष्टी तुझीं[9] पाहेन पाउलें । धरीन संचलें हृदयांत ॥ ३ ॥
तेणें यां[10] चिंताची राहेल तळमळ । होतील शीतळ सकळ गात्रें ॥ ४॥
तुका ह्मणे शांति करील प्रवेश । मग नव्हे नाश अखंड तो ॥ ५ ॥

॥ ३६४४ ॥

पराधीन माझें करूनियां जीणें । सांडी काय गुणें केली देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उदार हे कीर्ति असे जगामाजी । कां तें ऐसें आजि पालटिलें ॥ ध्रु॥
आळवितों परी न पुरे चि रीग । उचित तो[11] त्याग नाहीं तुह्मां ॥ २॥
तुका म्हणे कां बा मुळीं च व्यालासी । ऐसें कां नेणसी पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३६४५ ॥

नेणपणें नाहीं केला हा बोभाट । आतां आली वाट कळों खरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां बहु शीघ्र यावें लवकरी । वाट पाहें हरी भेटी देई ॥ ध्रु॥

---

१ दे. नो.—२ पं. मज याचा.—३ पं. तेथें.—४ पं. जालों गोड ब्रह्मरसा ।.—५ पं. अनंत.—६ त. काळें येणें. पं. मज काळें येणें कृपा केली ।.—७ त. अंतरींचें.—८ पं. राखेन मी.—९ दे. तुझे पाहेन पाउले ।.—१० पं. याची त्याची.—११ पं. ते.

समर्थाच्या बाळा करुणेचें भाषण । तरी त्याची कोण नांदणूक ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु बोलिले बडिवार । पडिलें अंतर लौकिकीं तें ॥ ३ ॥

॥ ३६४६ ॥

जें जें केलें तें तें साहे । कैसें पाहें भाविक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ओंवाळूनि माझी काया । सांडिली यावरूनि ॥ ध्रु ॥
काय होय नव्हे करूं । नेणें धरूं सत्ता ते ॥ २ ॥
तुका ह्मणे कटीं कर । उभें धीर धरूनि ॥ ३ ॥

॥ ३६४७ ॥

नाहीं मज कृपा केली पांडुरंगें । संताचिया संगें पोट भरीं ॥ १ ॥
चतुराचे सभे पंडित कुशळ । मी काय दुर्बळ विष्णुदास ॥ २ ॥
तुका ह्मणे नेणें करूं समाधान । धरिले चरण विठोबाचे ॥ ३ ॥

॥ ३६४८ ॥

तुह्मी माझा देवा करिजे[1] अंगीकार । हा नाहीं विचार मजपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां दोहीं पक्षीं लागलें लंछेन[2] । देवभक्तपण लाजविलें ॥ ध्रु ॥
एकांतीं एकलें न राहे निश्चळ । न राहे[3] च पळ मन ठायीं ॥ २ ॥
पायीं महत्वाची पडिली शृंखळा[4] । बांधविला गळा स्नेहा हातीं ॥ ३ ॥
शरीर सोंकलें देखिलिया सुखा । कदान्न हें मुखा[5] मान्य नाहीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे जाला अवगुणांचा थारा । वाढली[6] हे निद्रा अळस बहु ॥ ५ ॥

---

१ पं. करा.—२ दे. त. लक्षणें.—३ पं. बैसे.—४ दे. त. शंकळा.—५ पं. तें मुखा रुचि नेदी.—६ पं. वाढविली निद्रा०.

॥ ३६४९ ॥

बोलिलिया गुणीं नाहीं पाविजेत । देवा नाहीं होत हित तेथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कवतुक तुझें नेंवळ यावारि । घेसील तें शिरीं काय नव्हे ॥ ध्रु ॥
नाहीं मिळें येत संचितोच्या मता । पुराणीं पाहतां अघटित ॥ २ ॥
तुका ह्मणे पायीं निरोपिला भाव । न्याळे तैसा जाओ सिद्धी देवा ॥ ३ ॥

॥ ३६५० ॥

हा तों नव्हता दीन । टाळायाचा ऐसा क्षण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां जी नेणों राखा हात । कैसें देखावें रडत ॥ ध्रु ॥
दावूनियां आस । दूर पळवितां कांस ॥ २ ॥
तुका ह्मणे धांव । घेतां न पुरे चि हांव ॥ ३ ॥

॥ ३६५१ ॥

आर्तभूतां, धावें दान । खरें पुण्य त्या नांवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होणार तें सुखें घडो । लाभ जोडो महाबुद्धि ॥ ध्रु ॥
सत्य संकल्पा च साटीं । उजळा पोटीं रविबिंब ॥ २ ॥
तुका ह्मणे मनीं वाव । शुद्ध भाव राखावा ॥ ३ ॥

॥ ३६५२ ॥

कवतुकवाणी बोलतसें लाडें । आरुष वांकडें करुनि मुख ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दुजेपणीं भाव नाहीं हे आशंका । जननीबाळकामध्यें भेद ॥ ध्रु ॥
सलगी दुरूनि जवळीं प्राचारूं । धांवोनियां करूं अंगसंग ॥ २ ॥
धरूनि पालव मागतों भातुकें । आवडीचें निकें प्रेमसुख ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज आमची च गोडी । ऐसी हे आवडी कळों आली ॥ ४ ॥

---

१ पं. न कळें.—२ पं. संताचिया.—३ त. दे. जाव.—४ दे. त. टाळियाच्या.—५ पं. काशास—६ पं. कवतुकावाणी.— त. कवतुकवाणें.

॥ ३६५३ ॥

ऐकें पांडुरंगा वचन माझें एक। जालों मी सेवक दास तुझा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कळे तैसा आतां करावा उद्धार। खुंटला विचार माझा पुढें ॥ध्रु॥
दंभ मान माझा करूं पहे घात। जालिया ही थीत कारणाचा ॥ २ ॥
हीन बुद्धि माझी अधम हे याती। अहंकार चित्तीं वसों पाहे ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज विघडतां क्षण। न लगे जतन करीं देवा ॥ ४ ॥

॥ ३६५४ ॥

जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं। अखंड तें देई प्रेमसुख ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ देहभाव राख[1] दीन करूनियां। जनाचारी वायां जाय तैसा ॥ध्रु॥
द्रव्य दारा नको मानाची आवडी। कवणेविशीं गोडी प्रपंचाची ॥ २ ॥
तुझें नाम माझें धरूनियां चित्त। एकांत लोकांत सदा राहो ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझे जडोनियां पायीं। जालों उतराई पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ३६५५ ॥

काय सांगों आतां[2] संतांचे उपकार। मज निरंतर जागविती ॥१ ॥
॥ ध्रु.॥ काय द्यावें त्यांचें[3] व्हावें उतराई। ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥ध्रु॥
सहज बोलणें हितउपदेश। करूनि सायास शिकविती ॥ २ ॥
तुका ह्मणे वत्स धेनुवेचा चित्तीं। तैसे मज येती सांभाळीत ॥ ३ ॥

॥ ३६५६ ॥

देव जाणता देव जाणता। आपली च सत्ता एकाएकीं ॥ १ ॥
देव चतुर देव चतुर। जाणोनि अंतर वर्ततसे ॥ २ ॥
देव निराळा देव निराळा। अलिप्त विटाळा तुका ह्मणे ॥ ३ ॥

---

१ पं. राखा.—२ दे. त. या.—३ पं. त्यांसी.—

॥ ३६५७ ॥

आपण चाळक बुद्धीच्या संचारा । आह्मांसि वेव्हारा पात्र केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय मालें तरी नेघा तुह्मी भार । आणीक कोणां भोर ह्मणों सांगा ॥ ध्रु. ॥
पंच भूतें तंव चर्माचिया मोटा । येथें खरा खोटा कोण भाव ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं बोलावया जागा । कां देवा वाउगा श्रम करूं ॥ ३ ॥

॥ ३६५८ ॥

एका एक वर्मे लावूनियां अंगीं । ठेवितों प्रसंगीं सांभाळीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेघावा जी तुह्मी वाव बहु फार । धरूनि अंतर ठायाठाव ॥ ध्रु. ॥
वेव्हारें आलें तें समान चि होतें । बळ नाहीं येथें चालों येत ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां निवाडा च साटीं । संवसारें तुटी करूनि ठेलों ॥ ३ ॥

॥ ३६५९ ॥

आतां येथें खरें । नये फिरतां माघारें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होयें तैसी हों आबाळी । देहनिमित्य या बळी ॥ ध्रु. ॥
तुह्मांसवें गांठी । देवा जीवाचिये साटीं ॥ २ ॥
तुका नव्हे लंड । करूं चौघांमध्यें खंड ॥ ३ ॥

॥ ३६६० ॥

कां हो वाढवितां देवा । मज घरीं समजावा ।
केवढा हो गोवा । फार केलें थोडयाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठेविन पायांवरी डोई । यासी तुमचें वेचे काई ।
जालों उतराई । जाणा एकएकांचे ॥ ध्रु. ॥

---

१ दे. कर्माच्या या.—२ पं. घ्यावा.—३ दे. समानें.—४ पं. वेळ नाहीं तेथें चालों येतां.—५ दे. त. होईल हो तैसी आबाळी ।.—६ पं. ह्मणे.—७ पं. हा.—८ पं. थोकडें.—९ पं. त्यासी.

निवाड आपणियांपाशीं । असोन कां व्हावें अपेसी ।
होती गांठी तैसी । सोडूनियां ठेविली ॥ २ ॥
तुका ह्मणे गोड । होतें जालिया[1] निवाड ।
दर्शनें ही चाड । आवडी[2] च वाढेल ॥ ३ ॥

॥ ३६६१ ॥

नव्हों सभाधीट । समोर बोलाया[3] नीट ।
एकलीं एकट । दुजें नाहीं देखिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां अवघें तुह्मी जाणां । तुमचें माझें नारायणा ।
येईल करुणा । ते चि पहा तुम्हांसी ॥ ध्रु ॥
ताळ नाहीं माझे बुद्धी । धरली न धरवे शुद्धी ।
आतां बळ[4] कधीं ॥ कोण्या[5] जन्में निवाड ॥ २ ॥
आतां शेवटीचें । उत्तर तें[6] हें चि साचें ।
शरण आलें त्याचें । तुका ह्मणे सांभाळा ॥ ३ ॥

॥ ३६६२ ॥

ऐसा तंव मोळा । तुमचा नसेल गोपाळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागत्याची टाळाटाळी । झिंज्या ओढोनि कपाळीं ॥ ध्रु ॥
नसेल ना नवें । ऐसें धरियेलें देवें ॥ २ ॥
तुका ह्मणे जाला । उशीर नाहीं तो विठ्ठला ॥ ३ ॥

॥ ३६६३ ॥

माझ्या कपाळाच्या गुणें । किंवा सरलेंसे नेणें ॥ १ ॥

---

१ पं. जाले या निवाडे । २ पं. अवघी.—३. पं. बोलावयानीट । येकलें येकट ।—४ दे. बळें.—५ पं. कोण.—६ पं. "तें" नाहीं.

॥ ध्रु. ॥ नये वचन बाहेरी । उभें तिष्ठतसें दारीं ॥ ध्रु ॥
काय सांगायास वेचे । रीदें आरंभीं ठायींचे ॥ २ ॥
तुका ह्मणे, किती । भीड धराबी पुढती ॥ ३ ॥

॥ ३६६४ ॥

कांहीं एक तरी असावा आधार । कासयानें धीर उपजावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणविल्यासाटीं कैसें पडे रुजु । धणी नाहीं उजू सन्मुख तो ॥ ध्रु ॥
वेचल्या दिसांचा कोणावरी लेखा । घालावा हा सुखासुखा आह्मीं ॥ २ ॥
नाहीं मनोगत तोंवरि हे देवा । तुका ह्मणे सेवा नेघीजे तों ॥ ३ ॥

॥ ३६६५ ॥

मनाचिये साक्षी जाली सांगों मात । सकळ वृत्तांत आपला तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मां परामृश घेणें सत्ताबळें । धरितां निराळें कैसीं वांचों ॥ ध्रु ॥
मी माझें सांडून यावया पसारा । आणीक दातारा काय काज ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी तुजविण एका । निढळ लौकिका माजी असों ॥ ३ ॥

॥ ३६६६ ॥

घालूनि लोळणी पडिलों अंगणीं । सिंचा सिंचवणी तीर्थ वरि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वोल्हावेल तनु होईल शीतळ । जाली हळहळ बहुतापें ॥ ध्रु ॥
पावेन या ठाया कधीं जालें होतें । आलों अवचितें उष्टयावरि ॥ २ ॥
तुका ह्मणे कोणी जाणवा राउळीं । येइल जवळी पांडुरंग ॥ ३ ॥

॥ ३६६७ ॥

तरीं भलें वांयां गेलों । जन्मा आलों मागुता ।

---

१ पं. रीतें.—२ पं. सुखासुखें. त. सुखादुःखा.—३ पं. नघी जों तों.— त. नेघोजेतों.—४ पं. परामृष घेतां.—५ पं. यावा याच पसारा.—६ दे. निढळें.

ह्मणऊनि ठेलों दास । सावकास निर्भयें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उणें पुरें काय माझें । त्याचें ओझें तुह्मांसी ॥ ध्रु ॥
सांभाळावें तें म्या काई । अवो आई विठ्ठले ।
भांगें[1] जया जोइन[2] स्थळा । तुज गोपाळा विसरेंना ॥ २ ॥
आपलें म्यां एकसरें । करूनि बरें घेतलें ।
तुका ह्मणे नारायणा । आतां जाणां आपुलें ॥ ३ ॥

॥ ३६६८ ॥

उरलें तें भक्तिसुख । डोळां मुख पाहावें ।
अंतरींचें कां हो नेणां । नारायणा माझिये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुरवां तैसी केली आळी । बळी जगदानियां ॥ ध्रु ॥
हातीं घेउनि चोरां भातें । दावां रितें बाळका ।
साजत[3] हें थोरपण । नाहीं विण वत्सळा[4] ॥ २ ॥
शाहणें तरीं लाड दावी । बाळ जेवीं मातेसी ।
तुका ह्मणे पांडुरंगा । ऐसें पैं गा आहे हें ॥ ३ ॥

॥ ३६६९ ॥

धरूनि हें आलों जीवीं । भेटी व्हावी विठोबासी[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संकल्प तो नाहीं दुजा । महाराजा विनवितों ॥ ध्रु ॥
पायांवरि ठेविन भाळ । येणें सकळ[6] पावलें[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे डोळेभरी । पाहिन हरी श्रीमुख ॥ ३ ॥

---

१ पं. भाग्य.—२ दे. जाईं नें.—३ दे. साजतें.—४ त. पं. दीनवत्सळा.—५ पं. विठोसी.—६ पं. समूळ पावलों.—७ त. पावलों.

॥ ३६७० ॥

तुह्मां उद्धरणें फार । मज दुसरी नाहीं थार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां जैसें तैसें सोसा । काय करूं त्वृषीकेशा ॥ ध्रु ॥
बरें न दिसेल ओळी । एका अन्न एका गाळी ॥ २ ॥
लावितो आभार । तुका विसरलेली[1] फार ॥ ३ ॥

॥ ३६७१ ॥

न कळे जी भक्ती काय करूं सेवा । संकोचोनि देवा राहिलोंसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जोडोनियां कर राहिलों निवांत । पायांपाशीं चित्त ठेवूनियां ॥ ध्रु ॥
दिशाभुली करीं स्थळीं प्रदक्षणा । भ्रमें नारायणा कष्टविलें ॥ २ ॥
तुका ह्मणे जालों आज्ञेचा पाळक । जीवनासी एक ठाव केला ॥ ३ ॥

॥ ३६७२ ॥

एकविध वृत्ति न राहे अंतरीं । स्मरणीं च हरी विस्मृति हे[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसा हा नवलाव वाटतो अनुभवें[3] । मज माझ्या जीवें साक्षित्वेसी ॥ ध्रु ॥
न राहे निश्चळ जागवितां मन[4] । किती क्षणेंक्षण[5] सावरावें ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु केले वेवसाव । तेणें रंगें जीवें रंगलासे ॥ ३ ॥

॥ ३६७३ ॥

आतां सोडवणें न,या नारायणा । तरि[6] मी न वंचें जाणा काळा हातीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें सांगोनियां जालों उतराई । आणीक तें काई माझे हातीं ॥ ध्रु ॥
केलियाचें माप नये सेवटासी । करितील नासि अंतराय ॥ २ ॥
तुका ह्मणे भय वाटतसे जीवा । धांवणिया धांवा लवकरी ॥ ३ ॥

---

१ दे. त. विखरलेती.—२ दे. त. "हे" नाहीं—३ पं. अनुभव । मज माझा जीव०.—४ पं. मना । किती क्षणक्षणा.—५ दे. क्षीणेंक्षीणें.—६ पं. तरि मी वांचेना काळा हातीं ।.

॥ ३६७४ ॥

सत्या[1] माप वाढे । गबाळाची[2] चाली खोडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उतरे तें कळे कसीं । विखरोन[3] सर्वदेशीं ॥ ध्रु ॥
घरामध्यें राजा । नव्हे[4] हो वा पाटपूजा ॥ २ ॥
तुका ह्मणे साचें । रूप तें दर्पणाचें[5] ॥ ३ ॥

॥ ३६७५ ॥

नाहीं खंड[6] जाला । माझा तुमचा विठ्ठला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसें कैसें हो दुश्चित । आहे चौघांपाशीं नीत ॥ ध्रु ॥
मुळींचें लिहिलें । मज आतां सांपडलें[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे मज । न लगे बोलणें सहज ॥ ३ ॥

॥ ३६७६ ॥

हेचि वादकाची कळा । नाहीं येऊं येत[8] बळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धीर करावा करावा । तरी तो आहे आह्मां देवा ॥ ध्रु ॥
रिघावें पोटांत । पायां पडोन घ्यावा अंत ॥ २ ॥
तुका ह्मणे वरि । गोडा आणावा उत्तरीं ॥ ३ ॥

॥ ३६७७ ॥

एक परि बहिर[7] बरें । परि तीं ढोरें ग्यानगडें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कपाळास लागली अगी । अभागी कां जीतसे ॥ ध्रु ॥
एके परि बरें वेडें । तार्किक[8] कुडें जळो तें ॥ २ ॥
तुका ह्मणे खातडवासी । अमृतासी नोळखे ॥ ३ ॥

---

१ पं. सत्य.—२ पं. गावाळाची.—३ दे. विखरोणें.—४ पं. नव्हे व्हावी पटपूजा ।. त नव्हे व्हावा.—५ त. दर्पणींचें.—६ पं.—देत.—७ पं. बहिरें.—८ त. दे. तार्कि.

॥ ३६७८ ॥

खेळों मनासवें जीवाच्या संवादें । कौतुक विनोदें निरंजनीं[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पर्वीं पडिलें तें रुचे वेळोवेळां । होतसे डोहळा आवडीस ॥ ध्रु ॥
एकांताचें सुख जडलें[2] जिव्हारीं । वीट परिचारीं बरा आला ॥ २ ॥
जगाऐसी बुद्धि नव्हे आतां कदा । लंपट गोविंदा जालों पायीं ॥ ३ ॥
आणीक ते चिंता न लगे करावी । नित्य नित्य नवी आवडी हे ॥ ४ ॥
तुका ह्मणे धडा राहिला पडोन । पांडुरंगीं मन विसांवलें ॥ ५ ॥

॥ ३६७९ ॥

उचिताचा काळ । साधावया युक्तिबळ ।
आपलें सकळ । ते प्रसंगीं पाहिजे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेमें नाहीं लाभ हानि । अवचित घडती[3] दोनी ।
विचारूनि मनीं । पाहिजे तें प्रयोजावें ॥ ध्रु ॥
जाळ जाळा काळें । करपों नेदावें आगळें ।
जेवितां वेगळें । ज्यांचें[4] त्याचें तेथें शोभे ॥ २ ॥
पाळी नांगर पाभारीं । तन निवडूनि सोंकरी ।
तुका ह्मणे धरी । सेज जमा सेवटीं ॥ ३ ॥

॥ ३६८० ॥

पडिलिया ताळा । मग अवघा चिं[5] निर्वाळा ।
तेथें कोणी बळा । नाहीं[6] येत कोणासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जोडिलें तें लागे हातीं । आपआपली निश्चिती ।

---

१ दे. त. पं. निरांजनी.—२ पं. पडलें.—३ पं. 'घडलीं.—४ पं. ज्याचें तेथें शोभे। दे. ज्याचें त्याचें तेथें तें शोभे। पं. "चि" नाहीं.—६ त. येत नाहीं.

हर्ष आणि खंती । तेथें दोनी नासलीं ॥ ध्रु ॥
सहज सरलिया कारण[1] । मग एकला आपण ।
दिसे तरी भिन्न । वचनाचा प्रसंग ॥ २ ॥
करूनि झाडा पाडा । तुका वेगळा लिगाडा ।
निश्चितीच्या गोडा । गोष्टी ह्मूण लागती[2] ॥ ३ ॥

॥ ३६८१ ॥

जीविता[3] तो माझा पिता । उखता तो उखत्यांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जनार्दनीं सरती कर्में । बाधा[4] भ्रमे अन्यत्रें[5] ॥ ध्रु ॥
अपसव्य सव्यामधीं । ऐसी शुद्धी न धरितां ॥ २ ॥
तुका ह्मणे खांद्या पानें । सिंचतां भिन्न कोरडीं ॥ ३ ॥

॥ ३६८२ ॥

माउलीची चाली लेंकराचे ओढी । तयालागीं काढी प्राणें प्रीती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी बळिवंत आवडी जी देवा । संतमहानुभावा विनवितों ॥ ध्रु ॥
मोहें मोहियेलें सर्वकाळ चित्त । विसरु तो घेत नाहीं क्षणें ॥ २ ॥
तुका ह्मणे दिला[6] प्रेमाचा वोरस । सांभाळिलें दास आपुलें तें ॥ ३ ॥

॥ ३६८३ ॥

केवढा तो अहंकार । माझा तुह्मां नव्हे दूर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां कोण पडे पायां । तुमच्या अहो पंढरिराया ॥ ध्रु ॥
कीं जी कृपेनें कृपण । वेचत असे ऐसें धन ॥ २ ॥
तुका ह्मणे देवें । दुजियाचें पोतें न्यावें ॥ ३ ॥

---

१ दे. कारणें.—२ पं. लागली.—३ दे. त. जेवितो.—४ दे. वाते.—५ दे. त. अनेत्र.—६ पं. दिन्हे.

॥ ३६८४ ॥

अपराधी ह्मणोनि येतों काकुलती । नाहीं तरी होती काय चाड ॥ १ ॥
॥ध्रु.॥ येईल[1] तारूं तरी तारा जी देवा । नाहीं तरी सेवा घ्या वो भार ॥ध्रु॥
कासया मी आतां वंचूं[2] हें शरीर । आहें आरगीर जाईं जनें[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे मन करूनि मोकळें । आहें साळेंढाळें[4] उदार मी ॥ ३ ॥

॥ ३६८५ ॥

माझे तों फुकाचे कायेचे चि कष्ट । नव्हे क्रियानष्ट तुह्मांऐसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं च न वंचीं आजिच्या[5] प्रसंगीं । सकळा ही अंगीं करीन पूजा ॥ ध्रु ॥
द्यावें कांहीं[6] तुह्मी हें तों नाहीं आस । असों या उदास देहभावें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी मावळली खंती । समाधान चित्तीं सर्वकाळ ॥ ३ ॥

॥ ३६८६ ॥

स्वामीचिया सत्ता । आधीं वर्म[7] येतें हाता ।
पुढती विशेषता । लाभें लाभ आगळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करीं कवतुकाचे बोल । परि जिव्हाळ्याची ओल ।
आवडे रसाळ । मायबापा[8] लाडाचें ॥ ध्रु ॥
मनें मेळविलें मना । नाहीं अभावी शाहणा ।
अंतरींच्या खुणा । वरि दिल्या[9] उमटोनि ॥ २ ॥
नाहीं[10] पराश्रमें काळा[11] । अवघ्या जागविल्या वेळा ।
देवासी निराळा । तुका क्षण न सोडी ॥ ३ ॥

---

१ पं. होईल तारूं तरी तारिजोजी देवा ।—२ पं. वंचे.—३ पं. जेणें.—४ पं. साळढाळे.—५ दे. त. आजिचा.—६ पं. तुह्मी कांहीं.—७ पं. वर्मे येती.—८ पं. मायबाप.—९ पं. दिल्हे.—१० पं. "नाहीं" नाहीं.—११ पं. कळा.

॥ ३६८७ ॥

एके ठायीं अन्नपाणी । ग्रासोग्रासीं चिंतनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेळोवेळां जागावितों । दुजें येइल ह्मूण भीतों ॥ ध्रु ॥
नाहीं[1] गुंतत उपचारीं । मानदंभाचें बेव्हारीं ॥ २ ॥
तुका जालासे शाहाणा । आड लपे नारायणा ॥ ३ ॥

॥ ३६८८ ॥

वैरागपाशीं रत्नाचिया खाणी । हे चि घ्यावी धणी फावेल तों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें नाहीं तर्कवितर्काची चाड । होतसे निवाड खेंग्याखोट्यां[2] ॥ ध्रु ॥
उगा च सारावा वाढिला तो ठाव । वाढितिया भाव कळतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे नव्हे टांचणीचें पाणी । येथें झरवणी जैशातैसें ॥ ३ ॥

॥ ३६८९ ॥

समर्थ या नांवें दिनांचा कृपाळ । हें तंव सकळ स्वामीअंगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज काय लागे करणें विनवणी । विदित चरणीं सकळ आहे ॥ ध्रु ॥
दयासिंधु तुह्मां भांडवल दया । सिंचावें आतां या कृपापीयूषें[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे अवो पंढरीनिवासे । बहु जीव आसे लागलासे ॥ ३ ॥

॥ ३६९० ॥

लेखिलें कवित्व माझे सहज बोल । न लगे चि ओल जिव्हाळ्याची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नये[4] चि उत्तर कांहीं परतोनि । जालों नारायणीं न सरतें ॥ ध्रु ॥
लाजिरवाणी कां वदली[5] हे वाचा । नव्हे च ठायींचा मननशीळ ॥ २ ॥
तुका ह्मणे फळ नव्हे चि सायासा । पंढरीनिवासा काय जालें ॥ ३ ॥

---

१ दे. नाहीं ही गुंतत०.—२ दे. त. मोटचा.—३ पं. कृपामृतें.—४ पं. नलगे.—५ पं. वदविली वाचा.

॥ ३६९१ ॥

येणें जाला तुमचे पोतडीचा झाडा । केलासी उघडा पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भरूनियां घरीं राहिलों वाखती । आपुली निश्चिती आपल्यापें ॥ध्रु॥
आतां काय उसि उरली ते सांगा । आणिलेति जगाचिये साक्षी ॥ २ ॥
तुका ह्मणे कोठें पाहोंजासी आतां । माझी जाली सत्ता तुह्मांवरि ॥ ३ ॥

॥ ४२९२ ॥

तुमच्या पाळणा ओढतसे मन । गेलों विसरोन आपणासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लागेल पालटें फेडावें उसणें । येणें चि प्रमाणें[1] पांडुरंगा ॥ध्रु॥
तुमचे आवडी संबंधाचा त्याग । घेतला ये लाग जगनिंदेचा ॥ २ ॥
तुका ह्मणे जैसा माझा जीव ओढे । तैसें च तिकडे पाहिजेल ॥ ३ ॥

॥ ३६९३ ॥

नाहीं मज कोणी उरला दुर्जन । मायबापाविण ब्रह्मांडांत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया जी[2] माझी करणें येविसीं । भयाची मानसीं चिंता संतीं[3] ॥ ध्रु ॥
विश्वंभराचिये लागलों सांभाळीं । सत्तेनें तो चाळी[4] आपुलिये ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें पाळणपोषण । करितां आपण पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३६९४ ॥

मज कांहीं सीण न व्हावा यासाटीं । कृपा तुह्मां पोटीं उपजली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होतें तैसें केलें आपलें उचित । शिकाविलें हित बहु बरें ॥ध्रु॥
आह्मी न मनावी कोणाची आशंका । तुह्मां भय लोकां आहे मनीं ॥२॥
तुका ह्मणे आतां संचिताचा ठेवा । वोडवला घ्यावा जैसा तैसा ॥ ३ ॥

---

१ पं. प्रमाण.—२ पं. °जिकिर करणें०.—३ पं. खंती.—४ पं. चाळी.

॥ ३६९५ ॥

कोणाचें चिंतन करूं ऐशा काळें । पायांचिया बळें कंठीतसें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ पाहातसें वाट येई गा विठ्ठला । मज कां हा केला परदेश ॥ध्रु॥
बहुतांचे सत्ते जालों कासावीस । जाय रात्री[1] दिस वैरियांचा ॥ २ ॥
तुका ह्मणे बैसें मनाचिये मुळीं । तरीं च हीं जाळीं उगवती ॥ ३ ॥

॥ ३६९६ ॥

कां जी तुह्मी ऐसे नव्हा कृपावंत । निवे माझें चित्त ठायींच्या ठायीं ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ कांहीं शम नये विषम अंतरा । शांतीचा तो बरा ऐसा योग ॥ध्रु॥
दुःखी होतों पंचभूतांच्या विकारें । जडत्वें दातारें राखावीं तीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मोडा अहंकाराची मान । धरितों चरण ह्मणऊनि ॥ ३ ॥

॥ ३६९७ ॥

मागत्याची कोठें घडते निरास । लेंकरा उदास नाहीं होतें[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया मी होऊं उता वीळ जीवीं । जाणता गोसावी सर्व आहे ॥ ध्रु ॥
जाला तरी वेळ कवतुकासाटीं । निर्दया तों पोटीं उपजेना ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यासी ठाउकें उचित । होईल संकेत नेमियेला ॥ ३ ॥

॥ ३६९८ ॥

आरुषा वचनीं मातेची आवडी । ह्मणऊनि तांतडी घेती नाहीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ काय होइल माझें मांडिलें कवतुक । आदराची भूक रडारोवी ॥ ध्रु ॥
लपेनियां करी चुकुर माउली । नाहीं होती केली निष्ठासांडी ॥ २ ॥
तुका ह्मणे करी पारखीं वचनें । भेवउनि तान्हें आळवावें ॥ ३ ॥

---

१ पं. रात्रदिवस.— २ पं. होत.

॥ ३६९९ ॥

प्रीतीच्या भांडणा नाहीं शिरपाव । वचनाचे चि भाव निष्ठुरता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जीणें तरि एका जीवें उभयता । पुत्राचिया पिता दुखवे दुःखें ॥ ध्रु ॥
काय जाणे तुटों मायेचें लिगाड । विषम तें आड उरों नेणें ॥ २ ॥
तुका ह्मणे मज करुणा उत्तरें । करितां विश्वंभरें[1] पाविजेल[2] ॥ ३ ॥

॥ ३७०० ॥

नको घालूं झांसां । मना उपाधिवोळसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जे जे वांहावे[3] संकल्प । पुण्य तरी ते चि पाप ॥ ध्रु ॥
उपजतो[4] भेव । होतो कासावीस जीव ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहों । होइल तें नियांत राहों[5] ॥ ३ ॥

॥ ३७०१ ॥

बीजीं फळाचा भरवसा । जतन सिंचनासरिसा[6] ।
चाविलिया[7] आसा । कोकुलती ते नाड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हा तों गडसंदीचा[8] ठाव । पिकें[9] पिकविला भाव ।
संकोचोनि जीव । दशा केली जतन ॥ ध्रु ॥
माती घाली धनावरी । रांडा रोटा वरीवरी ।
सुखाचे सेजारीं । दुःख भ्रमें भोगीतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे दिशाभुली । जाल्या उफराटी[10] चाली ।
निवाडाची बोली । अनुभवें साक्षीसी ॥ ३ ॥

---

१ त. विश्वंभर.—२ दे. त. पं. पाविजेल.—३ पं. पाहावे.—४ पं. उपजतां.— ५ पं. साहों.—६ पं. सिंचनी.—७ पं. चाळविलिया आशा। काकुलतिनें भाड ॥.—८ पं. गडसंधीचा.—९ पं. मीक.—१० पं. उफराट्या.

॥ ३७०२ ॥

काय उरली ते करूं विनवणी । वेचलों वचनीं पांडुरंगा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अव्हेरलों आतां कैचें नामरूप । आदर निरोप तरि तो नाहीं ॥ध्रु॥
माझा मायबाप ये गेलों सलगी । तों हे तुह्मां जगीं सोयइस्किा ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां जोडोनियां हात । करी दंडवत ठायींचाठायीं ॥ ३ ॥

॥ ३७०३ ॥

आवडी धरूनि करूं गेलों लाड । भक्तिप्रेमकोड न पुरे चि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि जीव ठेला आसावोनि । खेद होतो मनीं बहु साल ॥ध्रु॥
वेठीऐसें वाटे निर्फळ कारण । शीतळ होऊन खोडावलों ॥ २ ॥
तुका ह्मणे सरतें नव्हें चि पायांपें । बळ केलें पापें नव्हे चि भेटी ॥ ३ ॥

॥ ३७०४ ॥

प्रीतीचा तो कळवळा । जिव्हाळाचि वेगळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु नेदी रडों माता । दुश्चित होतां धीर नव्हे ॥ ध्रु ॥
वरी वरी तोंडापुरतें । मोहोरी तें कळतसे ॥ २ ॥
जाणोनियां नेणता तुका । नव्हे लोकांसारिखा ॥ ३ ॥

॥ ३७०५ ॥

हा गे हा चि आतां लाहो । माझा अहो विठ्ठला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दंडवत दंडवत । वेगळी मात न बोलें ॥ ध्रु ॥
वेंगळाल्या कोठें भोगें । लाग लागें लावावा ॥ २ ॥
तुका ह्मणे केल्या जमा । वृत्तितमा भाजूनि ॥ ३ ॥

---

१ दे. पं. असावोनि.—२ पं. भोगें.—३ पं. वृत्तिक्षमा.

॥ ३७०६ ॥

तुह्मांसी न कळे सांगा काय एक । कासया[1] संकल्प वोगवूं[2] मी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आहे तेथें सत्ता ठेविलें स्थापूनि[3] । प्रमाणें चि वाणी वंदे[4] आज्ञा ॥ ध्रु ॥
कृपा जाली मग[5] न लगे अंगसंग । निजध्यासें रंग चढता[6] राहे ॥ २ ॥
तुका ह्मणे मागें बोलिलों तें वाव । आतां हा चि भाव दृढ जाला ॥ ३ ॥

॥ ३७०७ ॥

आवडी न पुरे मायबापापासीं । घडों का येविसीं सकईल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होईल नेमलें आपुलिया[7] काळें । आलीयाचा बळें आघ्रो उरे ॥ ध्रु ॥
जाणविलें तेथें थोडें एकवेळा । सकळ ही कळा सर्वोत्तमीं ॥ २ ॥
तुका ह्मणे निवेदिलें गुह्य गुज । आतां तुझी तुज सकळ[8] चिंता ॥ ३ ॥

॥ ३७०८ ॥

वोखटा तरी मी विटलों देहासी । पुरे आतां ऐसीं जोडी पुन्हां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ किती मरमर सोसावी पुढती । राहिलों संगती विठोबाचे ॥ ध्रु ॥
आतां कोण याचा करील आदर । जावो कळिवर विटंबोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां सांडी ते चि सांडीं । कोण फिरे लंडी यासी मागें ॥ ३ ॥

॥ ३७०९ ॥

हें ही ऐसें तें ही ऐसें[10] । उभय पिसें अविचार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अभिमानाचे ठेलाठेलीं[11] । मधीं जाली हिंपुटी[12] ॥ ध्रु ॥
धीरा शांती ठाव नुरे । हा चि उरे आबाळ्या ॥ २ ॥
कौतुक[13] हें पाहे तुका । कढतां[14] लोकां अधणीं[15] ॥ ३ ॥

---

१ दे. असया.—२ पं. वाउगा.—३ पं. व्यापुनी.—४ त. "वदे" याचें "देव" असें केलें आहे.—५ पं. मज.—६ पं. 'चढता राहे' याबद्दल 'चढताहे'.—७ पं. आपुले या काळे.—८ पं. सर्व.—९ दे. सांडि तें चि सांडि. पं. सांडि ते च मांडि.—१० पं. तैसे.—११ त. पं. ठेलाठेली.—१२ पं. हिंपुटी.—१३ कवतुक. पं. कवतुकें.—१४ पं. कढत.—१५ द्रे. अधनि.

॥ ३७१० ॥

हित जाणे चित्त । कळों येतसे उचित ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परिहार तें संपादनी । सत्य[1] कारण कारणीं ॥ ध्रु ॥
वरदळ तें नुतरे कसीं । आगीमध्यें [2]तें रसीं ॥ २ ॥
तुका ह्मणे करुनी खरें । ठेविता तें पुढें बरें ॥ ३ ॥

॥ ३७११ ॥

देवें दिला देह भजना गोमटा । [3]तो या जाला भांटा बाधिकेच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ताठोनियां मान राहिली वरती । अहंकारा हातीं लवों [4]नल्हे ॥ ध्रु ॥
दास ह्मणावया न [5]वळे रसना । सद्वचना[6] बासे गळा ॥ २ ॥
तुका ह्मणे कोठें ठेवावा विटाळ । स्नानें[7] निर्मळ व्हावयासी ॥ ३ ॥

॥ ३७१२ ॥

काय करूं पोरा लागली चट । धरी वाट देउळाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांगितलें नेघे कानीं । दुजें मनीं विठ्ठल ॥ ध्रु ॥
काम घरीं न करी धंदा । येथें सदा दुश्चित ॥ २ ॥
आमचे कुळीं नव्हतें ऐसें । हें च पिसें निवडलें ॥ ३ ॥
लौकिकाची नाहीं लाज । माझें मज पारिखें ॥ ४ ॥
तुका ह्मणे नरका जाणें । त्यां वचनें दुष्टांचीं ॥ ५ ॥

॥ ३७१३ ॥

कारणापें असतां दृष्टी । शंका पोटीं उपजेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शूर मिरवे रणांगणीं । मरणीं च संतोष ॥ ध्रु ॥

---

१ त. सत्ये. दे. सते.—२ पं. तेथें.—३ दे. तों.—४ पं. नेदी.५ पं. चले.—६ पं. सयीर वचना वासकळ.—७ दे. स्नानें नीर्मळ. त. श्नानें नीरमळ. पं. स्नानेंची निर्मळ.—८ पं. या.

पाहिजे तो कळवळा । मग बळा काय उणें ॥ २ ॥
तुका ह्मणें उदारपणें । काय उणें मनाचें ॥ ३ ॥

॥ ३७१४ ॥

नव्हती हे उसणे बोल । आहाच फोल रंजवण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनुभव तो वेरावरी । नाहीं दुरी वेगळा ॥ ध्रु ॥
पाहिजे तें आलें रुची । काचाकुची काशाची ॥ २ ॥
तुका ह्मणे लाजे आड । त्याची चाड कोणासी ॥ ३ ॥

॥ ३७१५ ॥

जों जों घ्यावा सोस । माझे वारीं गर्भवास ।
लटिक्याचा दोष । अधिक जडे अंगेसीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां आहे तैसें असो । अनुताप अंगीं वसो ।
येवढें चि नसो । माझें आणि परावें ॥ ध्रु ॥
जागाजालेपणें । काय नासावें स्वप्न ।
शब्दाचिया शिणें । कष्ट मिथ्या मानावे ॥ २ ॥
छाये माकड विटे । धांवे कुपीं काय भेटे ।
तुका ह्मणे फुटे । डोई गुडघे कोंपर ॥ ३ ॥

॥ ३७१६ ॥

गुणांचा चि सांटा । करूं न वजों आणिका वाटा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करिती छंदे नानापरी । भरोन सिणती आडभरी ॥ ध्रु ॥
नेमली पंगती । आह्मां संतांची संगती ॥ २ ॥
तुका ह्मणे लीळा । येर कवतुक पाहे डोळां ॥ ३ ॥

---

१ त. आहांच.—२ पं. वरीवरी.—३ पं. अंगासी.—४ पं. जागा आले पणे । काय असावे स्वप्ने ।—५ पं. छाया.—६ पं. गुढगे.—७ दे. पाहों.

॥ ३७१७ ॥

शिकल्या शब्दांचें उत्पादितों[2] ज्ञान । दरपणींचें धन उपर वाया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनुभव[3] कांई होईन भोगिता । सांकडें तें आतां हें चि आलें ॥ ध्रु ॥
गायें[4] नाचें करीं शरीराचे धर्म । बीजकळावर्म[5] तुमचें दान ॥ २ ॥
तुका ह्मणे केला उशीर न साहे । घाल तरी आहे सर्व सिद्ध ॥ ३ ॥

॥ ३७१८ ॥

सिकविला तैसा पढों जाणे पुंसा[6] । कैंची साच दशा तैसी अंगीं ।
स्वमींच्या[7] सुखें नाहीं होत राजा । तैसा दिसे माझा अनुभव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया हा केला जिव्हे[8] अळंकार । पायांसी अंतर दिसतसे ॥ ध्रु ॥
दर्पणींचें धन हातीं ना पदरीं । डोळां दिसें परी सत्याचिये ।
आस केली तरी लाळ चि घोंटावी । ठकाठकी तेवीं दिसतसे ॥ २ ॥
कवित्वें[9] रसाळ वदविली वाणी । साक्ष ही पुराणीं घडे ऐसी ।
तुका ह्मणे गुरें राखोनि गोंवारी । माझीं ह्मणे परि लाभ नाहीं ॥ ३ ॥

॥ ३७१९ ॥

अनुभव तो नाहीं अमुचिया[10] दर्शनें[11] । अइकिलें[12] कानें वदे वाणी ।
जेविल्याचा कैसा अनुभव अंतरीं । ह्मणतां मांडे पुरी काय होतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहींनाहीं गेली तळमळ दातारा । कां जी हरिहरा चाळविलें ॥ ध्रु ॥
पत्रीं कुशळता भेटी[13] अनादर । काय तें उत्तर[14] येइल मानूं ।
अंतरीं सबाह्यीं[15] कां नाहीं सारिखें । धरूनि पारिखें वर्त्ततसां ॥ २ ॥

---

१ त. पं. बोलाचें.—२ त. उत्पादितां.—३ दे. त. अनुभउ.—४ पं. गायनाचे.०—५ पं. बीजवर्म नाम.—६ पं. पुंसा.—७ पं. स्वमीचिया.— ८ दे. जिहुवे.—९ पं. कवित्व.—१० पं. तुमच्या.—११ दे. दरषणें. त. दरुशनें.—१२ त. आइकिले. पं आयीकिले.—१३ पं. पोटीं.—१४ दे. उदर.—१५ पं. सबाह्य.

आलों आलों ऐसी दाऊनियां आस.। वांहों बुडतयास काय द्यावें।
तुका ह्मणे अहो चतुरा शिरोमणि। किती मांझी वाणी तुह्मी कोठें ॥ ३ ॥

॥ ३७२० ॥

केलें[2] तरी आतां साच चि करावें।.विचारिलें द्यावें कृपादान ॥ १ ॥
॥ध्रु.॥संकल्पासी नाहीं बोलिलें[3] विकल्प। तुह्मां पुण्यपाप कळे देवा ॥ ध्रु॥
उदार[4] शक्ति तव तुमची भूमंडळीं। ऐसी ब्रिदावळी गर्जतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे अहो रकुमादेवीवरा[5]। उपरोध कां धरा माझा आतां ॥ ३ ॥

॥ ३७२१ ॥

अहो पुरुषोत्तमा। तुह्मां काशाची उपमा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सतंत तो. नाहीं बुद्धी। नाळवितां नाहीं शुद्धि ॥ ध्रु ॥
जागविलें तरी। तुह्मां व्यक्तियेणें[6] हरी ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा। तुम्हा नित्य दिसें[7] नवा ॥ ३ ॥

॥ ३७२२ ॥

मथनें भोगे सार। तार्कें घडे उपकार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरवी सायासाची जोडी। अनुभविया ठावी गोडी ॥ ध्रु ॥
पाक आणि रुचि। जेथें तेथें ते कइंची ॥ २ ॥
वाढितो पंगती। तुका आवडी संगती ॥ ३ ॥

॥ ३७२३ ॥

चिंतनाची जोडी। हा चि लाभ घडोघडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी वसूनि अंतरीं। मज जागवा निर्धारीं ॥ ध्रु ॥

---

१ पं. बुडो बुडत्यास.—२ दे. 'कळें' याचें 'कलें' असें केलें आहे.—३ पं. बोलिले.—४ पं. उदार विख्यात तुह्मी भूमंडळीं.—५ पं. रखुमाईच्यावरा। उपरोध धरा.०—६ त. व्येक्ती. पं. दे. वेक्ति.—७ पं. दिवस.

जाय[1] जेथें मन । आड घाला सुदर्शन ॥ २ ॥
तुका ह्मणे भोजें[2] । नाचें हो ऐसें न लजें ॥ ३ ॥

॥ ३७२४ ॥

आवडीची न पुरे धणी । प्रीत मनीं बैसली ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ नित्य नवा कळवळा । माय[3]बाळामध्यें तो ॥ ध्रु ॥
सुख सुखा भेटों आलें । होय वाल्हें पोटींचें ॥ २ ॥
तुका ह्मणें ब्रह्मानंदें । संतवृंदें चरणापें ॥ ३ ॥

॥ ३७२५ ॥

जडलों तों आतां पायीं । होऊं क्षाई वेगळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुम्हीं संतीं कृपा केली । गंगे चाली ओघाची ॥ ध्रु ॥
सांभा[4]ळिलों मायबापा । केलों तापावेगळा ॥ २ ॥
वोरसें या जीव धाला । तुका ठेला मौन्य[5] चि ॥ ३ ॥

॥ ३७२६ ॥

काळावरी सत्ता । ऐशा करितो वारता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो मी हीणाहूनि सांडें । देवा[6] दुर्ह्हें काळतोंडें ॥ ध्रु ॥
मानूनी भर्वसा[7] । होतों दासा मी ऐसा ॥ २ ॥
तुका ह्मणे मान । गेलों वाढवूं थोरपण ॥ ३ ॥

॥ ३७२७ ॥

समर्थाचे सेवे कोठें नाहीं घात । पाहों नये अंत पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आहे तैसी नीत विचारावी बरी । येऊनी भीतरी वास करा ॥ध्रु॥

---

१ पं. जेथें जेथें जाय मन.—२ पं. भोजे । नाचेन ऐसे हो निर्लज्ज.—३ त. माये०—४ पं. सांभाळिलें.—५ त. पं. मौन्ये (मौन्यें ?)—६ दे. देवे. पं. देव.—७ पं. भरवसा। होतों दास ह्मणत ऐसा॥

निढळ राखिलें तरी भयाभीत । हर्षामर्ष चित्त पावतसे ॥ २ ॥
तुका ह्मणे तरी कळेल निवाड । दर्शनाची चाड शुभकीर्ति ॥ ३ ॥

॥ ३७२८ ॥

बहु धीर केला । जाण न होसी[1] विठ्ठला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां धरीन पदरीं । करीन तुज मज सरी ॥ ध्रु. ॥
जालों जीवासी उदार । उभा राहिलों समोर ॥ २ ॥
तुका विनवी[2] संतां । ऐसें सांगा पंढरिनाथा ॥ ३ ॥

॥ ३७२९ ॥

नेदावी सलगी न करावा संग । करी चित्ता भंग वेळोवेळा ॥ १ ॥
सर्प शांतिरूप न ह्मणावा भला । झोंबे खवळला तात्काळ तो ॥ २ ॥
तुका ह्मणे दुरी राखावा दुर्जन । करावें वचन न घडे तें ॥ ३ ॥

॥ ३७३० ॥

मज अभयदान देईं[3] तूं दातारा । कृपेच्या सागरा मायबापा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं । आणीक मी कांहीं दुजें नेणें ॥ ध्रु. ॥
सेवाभक्तिहीन नेणतां[4] पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें सर्व ही साधन । नाम संकीर्तन विठोबाचें ॥ ३ ॥

॥ ३७३१ ॥

करावा वर्षाव । तृषाक्रांत जाला जीव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहें आकाशाची वास । जाणता तूं जगनिवास[5] ॥ ध्रु. ॥
संयोगें विस्तार । वाढी लागे[6] तो अंकूर ॥ २ ॥
तुका ह्मणे फळें । चरणांबुजें तीं सकळें ॥ ३ ॥

---

१ पं. "न होसी" याबद्दल "नव्हेसी".—२ पं. ह्मणे.—३ पं. देईंगा दातारा. दे. देईं दातारा.—४ दे. नेणतां.—५ त. जगन्नीवास. पं. जगदीश.—६ पं. 'लांगे तो' याबद्दल 'लागतो'.

॥ ३७३२ ॥

करीं[1] ऐसी धांवाधांवी । चित्त लावीं चरणापें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग तो माझा मायबाप । घेइल ताप हरूनी ॥ ध्रु ॥
बहुतांच्या मतें गोवा । होऊं जीवा नेदावा ॥ २ ॥
तुका ह्मणे करुणाबोलें । धीर विठ्ठलें निघेना ॥ ३ ॥

॥ ३७३३ ॥

एकविध नारायण । तेथें विषमाचा सीण ।
पालटीं[2] चि भिन्न । नये अणुप्रमाण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघें सारावें गाबाळ । चुकवूनियां कोल्हाळ ।
आनंदाचें स्थळ । एकाएकीं एकांत ॥ ध्रु ॥
कायावाचामन । स्वरूपीं च अनुसंधान ।
लक्ष भेदी बाण । येणें पाडें लवलाहो[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे आळस निद्रा । येथें देउनियां[4] चिरा ।
देउनियां[4] धीरा । मिठी जाणा जागृती ॥ ३ ॥

॥ ३७३४ ॥

हारपोनि गेली निशी । निद्रा कैसी न देखों[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नारायणीं वसलें घर । निरंतर आनंद ॥ ध्रु ॥
अवघा रुधविला ठाव । नेला वाव मी माझें ॥ २ ॥
तुका ह्मणे एके ठायीं । असूं[6] नाहीं क्षण[7] भिन्न ॥ ३ ॥

---

१ पं. करिसी.—२ त. पालटा.—३ पं. लवलाहे.—४ पं. करुनियां.—५ पं. देखे.—६ दे. असूं नाहीं सीनभिन्न ।.—७ त. सीनभीन.

॥ ३७३५ ॥

पाहा[1] कैसेकैसे । देवें उद्धरिले अनयासें[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐका नवल्याची[3] ठेव । नेणतां भक्तिभाव ॥ ध्रु ॥
कैलासासी नेला । भिल्ल पानेडी बैसला ॥ २ ॥
पांखांच्या फडत्कारीं । उद्धरुनी नेली घारी ॥ ३ ॥
चोरें पिंडी दिला पाव । त्या पूजनें धाये[4] देव ॥ ४ ॥
तुका ह्मणे भोळा । स्वामी माझा हो[5] कोंवळा ॥ ५ ॥

॥ ३७३६ ॥

अनुभव ऐसा । मज लागला सरिसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाठी बैसली सेजारीं । नव्हे शांत कोणे परी ॥ ध्रु ॥
कोठें न लगे जावें । कांहीं घालावया ठावें ॥ २ ॥
तुका ह्मणे कोटि । दुःखाच्या च तये पोटीं ॥ ३ ॥

॥ ३७३७ ॥

पाठीवरी भार । जातो वाहूनियां खर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संत नेतील त्या ठाया । माझी आधीन त्यां[6] काया ॥ ध्रु ॥
मोटचौफळ[7] । अंगीं उच्छिष्टाचें बळ ॥ २ ॥
न संडीं मारग । येथें न[8] चोरूनि अंग ॥ ३ ॥
आपुलिया सत्ता । चालविती[9] नाहीं चिंता ॥ ४ ॥
कळंवळिला[10] तुका । घराचार येथें नका ॥ ५ ॥

---

१ पं. देवें कैसे०.—२ पं. आनायासें. दे. आनयासें. त. अनारिसे.—३ त. नवल्या-वयाची. पं. नवलायाची.—४ दे. त. देव धाये.—५ पं. हा.—६ पं. ते.—७ पं. मोटे चौफळ. —८ पं. "न चोरूनि" यावद्दल "चोरुनियां".—९ पं. चालविली.—१० त. हें कडवें तळे-गांवच्या प्रतींत आढळतें. दे. या कडव्याची जागा कोरी टाकली आहे. पं. "तुका ह्मणे संत । तुह्मी बहु कृपावंत ॥" असें त. या कडव्याच्यावद्दल आढळतें.

॥ ३७३८ ॥

मागें पुढें जालों लाटा । अवघा मोटा सरळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं कोठें रितें अंग । नित्य रंग नवा चि ॥ ध्रु. ॥
पोसिंद्याचे पडिलों हातीं । वोझें[1] माती चुकली ॥ २ ॥
जोगावलों पोटीं खर । पाठी भार वारि नाहीं ॥ ३ ॥
अवघिया मोकळ्या दिशा । नाहीं वोळसा कामाचा ॥ ४ ॥
संताचिये लोळें द्वारीं । पळती दुरी गोमांशा ॥ ५ ॥
कांहीं न साहेसा जाला । तुका नेला समर्थ ॥ ६ ॥
पाहातो[2] गे महाद्वारीं । वरि झुलों वाकुळा ॥ ७ ॥

॥ ३७३९ ॥

करणें न करणें वारलें[3] जेथें । जातों[4] तेणें पंथें संतसंगें ॥ १ ॥
संतीं हें पहिलें लाविलें निशाण । ते खुणा पाहोन गर्जें नाम ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी चला या चि वाटे । भरवशानें[5] भेटे पांडुरंग ॥ ३ ॥

॥ ३७४० ॥

कइंचें कारण । तृष्णा वाढविते सीण ॥ १ ॥

---

१ पं. माझे.—२ दे. पातोगें. पं 'पाहातोगे०' हें कडवें अगोदर असून 'कांहीं न साहेसा०' हें कडवें शेजटीं आहे. तुकारामाच्या शैलीस हें ठीक दिसतें तरी दे. त. यांत तसें नाहीं. हाच अभंग चारचरणी धरल्यास दे. व त. यांतील क्रमही शैलीस विरुद्ध नाहीं आणि या साठींच त. हा अभंग चारचरणी धरून मागून कडव्यांचे अंकडे फिरवले आहेत.—३ पं. वारियेलें —४ त. जालों. पं जातों तेणें पंथें सादाबील.—५ दे. पांडुरंग भेटे सर्वसने. त. पांडुरंग भेटे सर्वस्वनें.

॥ ध्रु. ॥ काय करूनि ऐसा संग । सोसें चि तूं पांडुरंग ॥ ध्रु ॥
रूपीं नाहीं गोडी । हांवे हांवे उर फोडी ॥ २ ॥
तुका न पडे भरी । ऐशा वरदळाचे थोरी ॥ ३ ॥

॥ ३७४१ ॥

धन्य तो ग्राम जेथें हरिदास । धन्य तो चि वास[1] भाग्य तया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ब्रह्मज्ञान तेथें[2] असे घरोघरीं । धन्य त्यां[3] नरनारी चतुर्भुज ॥ ध्रु ॥
नाहीं पापा रिघ काळाचें जीवन[4] । हरिनामकीर्त्तन घरोघरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तिहीं तारिलें सकळां । आपल्या कोटिकुळासहित जीवें[5] ॥ ३ ॥

॥ ३७४२ ॥

मारूं नये सर्प संतांचिये दृष्टी । होतील[6] तें कष्टी व्यापकपणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक सूत्र जीवशिवीं आइक्यता । रोम उपडितां अंग कांपे ॥ ध्रु ॥
नाहीं सांहों येत दुखाची ते जाती । परपीडा भूतीं[8] साम्य जालें ॥ २ ॥
तुका ह्मणे दिला नीतीचा संकेत । पुजा नांवें चित्त सुखी[7] तेणें ॥ ३ ॥

॥ ३७४३ ॥

भय होतें आह्मीपणें । पाठी येणें घातलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघा आपुला चि देश । काळा लेशें[9] उरे चि[10] ना ॥ ध्रु ॥
समर्थाचें नाम घेतां । मग चिंता काशाची ॥ २ ॥
तुका ह्मणे नारायणें । जालें जिणें सुखाचें ॥ ३ ॥

॥ ३७४४ ॥

विषम वाटे दुरवरी । चालूनि परती धरी[11] ।

---

१ पं. वंश भक्तिभाग्य.—२ पं. जेथें.—३ पं. 'त्या' नाहीं.—४ पं. खंडन.—५ पं. वंश.—६ पं. होती.—७ पं. सुख.—८ दे. त. देष.—९ दे. लेसे.—१० पं. 'चि' नाहीं.—११ पं. घरी.

मागील ते उरी । नाहीं उरली भयाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुख्य न व्हावा तो नाड । सेवटाचे हातीं गोड ।
सरलिया चाड । मग कैचे उद्वेग ॥ ध्रु ॥
होता पहिला[1] अभ्यास । समयीं घालावया कास ।
तेव्हां लटिके[2] दोष । योगें अनुतापाच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे आहे । बुद्धी केलियानें साहे ।
जवळी च पाहें[3] । देव वाट स्मरणाची ॥ ३ ॥

॥ ३७४५ ॥

आतां कोठें धांवे मन । तुझे चरण देखिलिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाग गेला सीण गेला । अवघा जाला आनंदु ॥ ध्रु ॥
प्रेमरसें बैसली मिठी । आवडी लाठी[4] मुखासी ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां जोगें । विठ्ठल घोगें खरें माप ॥ ३ ॥

॥ ३७४६ ॥

विश्वीं विश्वंभर । बोले वेदांतींचा[5] सार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश[6] ॥ ध्रु ॥
व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जती पुराणें ॥ २ ॥
जनीं जनार्दन । संत बोलती वचन[7] ॥ ३ ॥
सूर्याचिया परी । तुका लोकीं[8] क्रीडा करी ॥ ४ ॥

॥ ३७४७ ॥

निरोधती परि[9] न मोडे विकार । बहु हीं दुस्तर विषयद्वारें ॥ १ ॥

---

१ दे. परजीला.—२ पं.० लटिके ते दोष । योग.—३ त. पं. पाहे.—४ पं. लाटी.—५ पं. वेदांताचें.—६ दे. त. सावकास.—७ दे. वचनें.—८ पं. जगीं.—९ पं. निरोधितो.

॥ ध्रु. ॥ राहातेति तुह्मी भरोनि अंतरीं । होतों तदाकारी निर्विषयचि[1] ॥ध्रु॥
कृपेचिया साक्षी असती जवळी । वचनें मोकळीं सरत नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे ताळा मेळवणीपाशीं । विनंती पायापाशीं हे चि करीं ॥ ३ ॥

॥ ३७४८ ॥

अद्वय चि द्वय जालें चि कारण । धरिलें नारायणें[2] भक्तिसुख ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अपरोक्ष आकार जाला चतुर्भुजे । एकतत्त्व[3] बीज भिन्न नाहीं ॥ध्रु॥
शून्य निरसूनि[4] राहिलें निर्मळ । तें दिसे केवळ विटेवरी[5] ॥ २ ॥
सुखें घ्यावें नाम वदना ही चाड । सरिता वापी आड एक पाणी ॥ ३ ॥
तुका ह्मणे मी च आहें तेणें सुखें । भेद[6] नाहीं मुखें नाम गातों[7] ॥ ४ ॥

॥ ३७४९ ॥

उदार चक्रवर्ती । वैकुंठीचा भूपति ।
पुंडलिकाचिया प्रीती । विटेवरी राहिला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्वसिद्धीचा दातार । सर्वें आणिला परिवार ।
भक्ता अभयंकर[8] । घ्याघ्या ऐसें ह्मणतसे ॥ ध्रु ॥
जेणें हें विश्व निर्मिलें । महर्षीदेवा संस्थापिलें[9] ।
एकवीस स्वर्गांतें धरिलें । सत्तामात्रें आपुलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपावंत । इच्छिले पुरवी अर्थ ।
रिद्धिसिद्धिमुक्ती[10] देत[11] । शेखीं[12] संग आपुला ॥ ३ ॥

॥ ३७५० ॥

सकलगुणें संपन्न । एक देवाचें लक्षण ॥ १ ॥

---

१ दे. निर्विषचि. पं. निर्विषय.—२ त. नारायण.—३ पं. एकतत्वी.—४ दे. त.निरशुन्यो. पं. निरशून्य.—५ दे. इटेवरी.—६ पं. भेट नाहीं मुखें । नाम गातां.—७ पं .अभयकर.—८ पं.० देवातें स्थापिलें.—९ पं. पुरविले मनोरथ.—१० पं. रिद्धीसिद्धी मोक्ष.—११ दे. देतसे.—१२ त. पं. सेखीं.

॥ ध्रु. ॥ वरकड कोठें[1] कांहीं । एक आहे एक नाहीं ॥ ध्रु ॥
षड्गुण ऐश्वर्य संपन्न । एक भगवंतीं जाण ॥ २ ॥
तुका ह्मणे जेंजें बोला । तेंतें साजे या विठ्ठला ॥ ३ ॥

॥ ३७५१ ॥

वैकुंठींचें[2] सुख पंढरिये आलें । अवघें पुंडलिकें सांटविलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घ्या रे घ्या रे माझे बाप । जिव्हा घेउनि खरें माप ।
करा एक खेप । मग[3] करणें न लगे ॥ ध्रु ॥
विषय गुंडोनी ठेवीं[4] पसारा । मग[5] धांव घ्या पंढरपुरा ॥ २ ॥
जंव[6] आहे आयुष्याचा लेश । तंव[7] करीं पंढरीचा वास ॥ ३ ॥
अळस न करीं[8] लाभाचा । तुका विनवी कुणबियाचा ॥ ४ ॥

॥ ३७५२ ॥

देवाचें चरित्र नांठवे[9] सर्वथा । विनोदार्थ कथा गोड वाटे ॥ १ ॥
हातावरि हात हासोनि आफळी । वाजवितां टाळी लाज वाटे ॥ २ ॥
तुका ह्मणे थुंका त्याच्या तोंडावरि । जातो यमपुरी भोगावया ॥ ३ ॥

॥ ३७५३ ॥

अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान । गोड हे चरण सेवा तुझी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करूनी उचित देई हें चि दान । आवडे कीर्तन नाम तुझें ॥ ध्रु ॥

---

१ पं. कोठें कांहीं कोठें काहीं ।.—२ पं. सुख पंढरीये आलें । पुंडलिकें सांटविलें.—३ दे. 'मग करणें न लगे' या पुढें समासावर मागून 'कांहीं खेप' असा शोध घातला आहे. त. 'न लगे' या पुढें 'कांहीं खेप' असें होतें. त्या पैकीं 'खेप' खोडलें आहे. पं. 'मग न लगे हिंडणें,' असें आहे.—४ पं. 'ठेवीं' नाहीं.—५ पं. धांव घाला पंढरपुरा.—६ पं. 'जंव' नाहीं.—७ पं. 'तंव' नाहीं.—८ पं. करीं या लाभाचा.—९ पं. नावडे सर्वथा । विनोदाची कथा०.

देवभक्तपण सुखाचा सोहळा । ठेवुनी निराळा दावी मज ॥ २ ॥
तुका ह्मणे आहे तुझें हें सकळ । कोणी[1] एके काळें देई मज ॥ ३ ॥

॥ ३७५४ ॥

हें चि माझें तप हें चि माझें दान । हें चि अनुष्ठान नाम तुझें ॥१॥
॥ध्रु.॥ हें चि माझें तीर्थ हें चि माझें व्रत । सत्य हें सुकृत नाम तुझें ॥ध्रु॥
हा चि माझा धर्म हें चि माझें कर्म । हा चि नित्यनेम नाम तुझें ॥२ ॥
हा चि माझा योग हा चि माझा यज्ञ । हें चि जपध्यान नाम तुझें ॥३॥
हें[2] चि माझें ज्ञान श्रवण मनन । हें चि निजध्यासन नाम तुझें ॥ ४ ॥
हा चि कुळाचार हा चि कुळधर्म । हा चि नित्यनेम नाम तुझें ॥ ५ ॥
हा माझा आचार हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझें॥ ६ ॥
तुका ह्मणे दुजें सांगायासि[3] नाहीं । नामेंविण कांहीं धनवित्त ॥ ७ ॥

॥ ३७५५ ॥

कोणें[4] साक्षीविण । केलें उद्धारा भजन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें सांगा जी दातारा । माझी भक्ति परंपरा ॥ ध्रु ॥
कोणें नाहीं केली आळी । ब्रह्मज्ञानाहुनि वेगळी ॥ २ ॥
कोणाचें तों[5] कोड । नाहीं पुरविला लाड ॥ ३ ॥
कोणाच्या उद्धारा । केला विलंब माघारा ॥ ४ ॥
तुका ह्मणे भिन्न । कांहो[6] बोलें साक्षीविण ॥ ५ ॥

॥ ३७५६ ॥

सुखरूप चाली । हळूहळू उसंतिली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बाळगोपाळांची वाट । सेव्यसेवकता[7] नीट ॥ ध्रु ॥

---

१ त. कोणे.—२ पं. हें कडवें नाहीं.—३ पं. सांगावया.—४ दे. कोण.—५ त. त्वां. पं. तें.—६ दे. कांहो बोले. पं. कां हे बोला.—७ दे. त. सेवे सेवकता.

जरी झाला श्रम । तरी पडों नये भ्रम ॥ २ ॥
तुका ह्मणे दासां । देव सरिसासरिसा ॥ ३ ॥

॥ ३७५७ ॥

चुकली ते[1] वाट । पुढें सांपडवीं नीट ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनी गर्भवास । नेणती ते[2] हरिचे दास ॥ ध्रु ॥
संचिताचा संग । काय जाणों पावें[3] भंग ॥ २ ॥
तुका ह्मणे दृष्टी । उघडितों नव्हे कष्टी ॥ ३ ॥

॥ ३७५८ ॥

कइं तो दिवस देखेन[4] मी डोळां । कल्याण मंगळामंगळाचें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आयुष्याच्या[5] शेवटीं पायांसवें भेटी । कळिवरें तुटी जाल्या[6] त्वेरे ॥ध्रु॥
सरो हें संचित पदरींचा गोवा । उताविळ[7] देवा मन जालें ॥ २ ॥
पाउलापाउलीं करितां विचार । अनंतविकार चित्ता अंगीं ॥ ३ ॥
ह्मणउनि भयाभीत होतो जीव । भाकितसें कींव अटाहासें[8] ॥ ४ ॥
तुका[9] ह्मणे होइल आइकिलें कानीं । तरि चक्रपाणी धांव घाला ॥ ५ ॥
दुःखाच्या उत्तरीं आळविले पाय । पाहणें तों[10] काय अजून अंत[11] ॥ ६ ॥

॥ ३७५९ ॥

कळों येतें वर्म । तरी न पवतों श्रम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मां शिरीं होता भार । आह्मां कैचा संचार[12] ॥ ध्रु ॥
होतें अभयदान । तरी स्थिर होतें मन ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहें । ऐसी वाट उभा आहें ॥ ३ ॥

---

१ त. ती.—२ पं. हे.—३ दे. पावें.—४ दे. त. देखेन डोळां.—५ पं. आयुष्या.—६ त. पं. जाल्या तरे.—७ दे. उताविळें.—८ पं. अटाहास्यें.—९ पं. 'तुका ह्मणे०' व 'दुःखाच्या उत्तरीं०' यांच्या जागा परस्पराशीं बदलल्या आहेत.—१० पं. तें.—११ पं. आतां.—१२ पं. संसार.

॥ ३७६० ॥

वारंवार हा चि न पडावा विसर। वसावें अंतर तुमच्या गुणीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ इच्छेचा ये दाता तूं एक समर्था। अगा कृपावंता मायबापा ॥ध्रु॥
लाभाचिये वोढी उताविळ[1] मन। त्यापरि चिंतन चरणाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवीं जीवन ओलावा। पांडुरंगे द्यावा शीघ्र आतां ॥ ३ ॥

॥ ३७६१ ॥

आइका माझीं कवतुकउत्तरें। देउनी सादरें चित्त देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वोरसें[2] आवडी आलों पायापासीं। होय तें मनेसीं सुख कीजे ॥ध्रु॥
तुमचें न भंगे सर्वोत्तमपण। करितां समाधान लेंकराचें ॥ २ ॥
तुका ह्मणे जरी बोलतों बोबडें। तरी वांडे[3] कोडें कवतुक ॥ ३ ॥

॥ ३७६२ ॥

जन्मा आलियाचा लाभ। पद्मनाभदरुषणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाठीलागा येतो काळ। तूं कृपाळ[4] माउली ॥ ध्रु ॥
कोण्या उपायें हें घडे। भव आंगडें सुटकेचें ॥ २ ॥
बहु उसंतीत आलों। तया भ्यालों स्थळासी ॥ ३ ॥
तुका ह्मणे तूं जननी। ये निर्वाणी विठ्ठले ॥ ४ ॥

॥ ३७६३ ॥

नाहीं गुणदोष लिंपों देत अंगीं। झाडितां प्रसंगीं वरावरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निकटवासिया आळवितों[5] धांवा। तेथूनियां देवा सोडवूनी ॥ ध्रु ॥
उमटे अंतरीं तें करूं प्रगट। कळोनी बोभाट धांव घालीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तारि वांचलों या काळें। समर्थाचे बळें सुखी असों ॥ ३ ॥

---

१ दे. उताविळें.—२ पं. मानसीं.—३ पं. लाड कोडे. दे. वाडें कोडें.—४ दे. कृपाळु.—५ पं. आळविता.

॥ ३७६४ ॥

आतां येणें पडिपाडें । रस सेवूं हा निवाडें ।
मुंगी नेली गोडें । ठेविलिये अडचणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें होय माझ्या जीवा । चरण न सोडीं केशवा ।
विषयबुद्धि हेवा । वोस पडो सकळ ॥ ध्रु ॥
भुकेलिया श्वाना[1] । गांठ पडे सर्वें अन्ना ।
भुंकों[2] पाहे प्राणा । परि तोंडिची न सोडी ॥ २ ॥
काय जिंकियेलें मन । जीवित्व कामातुरा तृण ।
मागे विभिचारिण[3] । भक्ती तुका ये जाणी ॥ ३ ॥

॥ ३७६५ ॥

न पवीजे तया ठाया । आलों कायाक्लेशेसीं[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझें आणीं मना । नारायणा ओजेचें ॥ ध्रु ॥
बहु रिणें पिडिलों फार । परिहार करावा ॥ २ ॥
तुका ह्मणे निर्बळशक्ति । काकुलती म्हुण येतों ॥ ३ ॥

॥ ३७६६ ॥

बहु फिरलों ठायाठाव । कोठें भाव पुरे चि ना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ समाधान तों पावलों । उरलों बोलों यावरि ॥ ध्रु ॥
घे[5] गा देवा आशीर्वाद । आमुच्या नांद भाग्यानें ॥ २ ॥
तुका ह्मणे जेवूं आधीं । खवखव मधीं सारावी ॥ ३ ॥

---

१ दे. स्नाना. पं. स्तना.—२ पं. भुंके.—३. पं. अविभिचारिण.—४ पं. कायाक्लेशोचि.—५ पं. घेईगा०

॥ ३७६७ ॥

कोण येथें रिता गेला । जो जो आला या ठाया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तातडी ते काय आतां । ज्याची चिंता तयासी ॥ ध्रु ॥
नांवासाटीं नेघें भार । न लगे फार, विपत्ति ॥ २ ॥
तुका ह्मणे न लगे जावें । कोठें देवें, सुचेने[1] ॥ ३ ॥

॥ ३७६८ ॥

इंद्रियाचें पुरे कोड । तें चि गोड पुढती ही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जावें ह्मणती पंढरपुरा । हा चि बरा संसार ॥ ध्रु ॥
बैसलें तें मनामुळीं । सुख डोळां देखिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे देती कान । वाणावाण निवडूनी ॥ ३ ॥

॥ ३७६९ ॥

आतां देवा मोकळिलें । तुह्मी भलें दिसेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां नाहीं जीवभाव । उरला ठाव वेगळा ॥ ध्रु ॥
सांभाळुन घ्यावें देवा । आपणासवा यावरि ॥ २ ॥
तुका ह्मणे नग्न भाज । तरि ते लाज स्वामीसी ॥ ३ ॥

॥ ३७७० ॥

आशाबद्ध आह्मी भाक्तितसों कींव । तत्पर हा जीव कार्यापाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रतिउत्तराची पाहातसें वाट । करूनि बोभाट महाद्वारीं ॥ ध्रु ॥
आपुल्या उचितें करूनियां ठेवीं । संबंध गोसावी तोडोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे एक जालिया निवाड । कोण बडबड करी मग ॥ ३ ॥

---

१ पं. सुचेना. दे. सुचनें.

॥ ३७७१ ॥

खद्योतें फुलविलें रविपुढें ढुंग । साक्षी तंव जग उभयतां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आपल्या आपण नाहीं शोभों येत। चार करी स्फीत दाखवूनि ॥ध्रु॥
खाणार ताकाचें असे तें माजीरें । आपणें चि अधीर कळों येतें ॥ २ ॥
तुका ह्मणे जळो मैंदाची मवाळी । दावूनियां नळी कापी सुखें ॥ ३ ॥

॥ ३७७२ ॥

नाहीं सरों येत कोरड्या उत्तरीं । जिव्हाळ्याची बरी ओल ठायीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आपुलिया हिता मानिसी कारण। सत्या नारायण साह्य असो ॥ ध्रु॥
निर्वाणीं निवाड होतो आगीमुखें। तप्त लोह सुखें धरितां हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे नेम न टळतां बरें । खऱ्यासी चि खरें ऐसें नांव ॥ ३ ॥

॥ ३७७३ ॥

आलों उल्लंघुनि दुःखाचे पर्वत । पायांपाशीं हित तुमच्या तरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न देखेल लासा दुःखी होतें मन । कठिणें कठिण वाटतसे ॥ध्रु ॥
नव्हे सांडी परि वाटतें निरास । न ये माझा दिस संकल्पाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मीं सदैव जी देवा । माझ्या हा चि जीवा एक ठाव ॥ ३ ॥

॥ ३७७४ ॥

किती सोसिती करंटीं । नेणों संसाराची आटी ।
सर्वकाळ पोटीं । चिंतेची हळहळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रिकामिया तोंडें राम । काय उच्चारितां श्रम ।
उफराटा भ्रम । गोवी विषय माजिरा ॥ ध्रु ॥

---

१ पं. शोभें.—२ दे. आसातें. त. असा तें.—३ दे. त. साहे.—४ पं. ढळतां.—५ पं. असे नाम ।.—६ पं. न देखेचि लासा.—७ दे. काठिणें कठिणें.

कळतां न कळे । उघडे झाकियेले डोळे ।
भरलें त्याचे चाळे । अंगीं वारें मायेचें ॥ २ ॥
तुका ह्मणे जन । ऐसें नांवबुद्धिहीन ।
बहुरंगें भिन्न । एकीं एक निमालें[1] ॥ ३ ॥

॥ ३७७५ ॥

मंगळाचा मंगळ सांटा । विट तोटा नेणे तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें भरा सातें आलें । भलें भलें ह्मणवावें ॥ ध्रु ॥
जनीं जनार्दन वसे । येथें दिसे तें शुद्ध ॥ २ ॥
तुका ह्मणे बहुतां मुखें । खरें सुखें ठेवावें ॥ ३ ॥

॥ ३७७६ ॥

नामाचा महिमा बोलिलों[2] उत्कर्ष । अंगा कांहीं रस[3] न ये चि तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसें समाधान राहे पांडुरंगा । न लगे चि अंगा आणी कांहीं ॥ ध्रु ॥
लाभाचिये अंगीं सोस कवतुकें । फिक्याचें तें फिकें वेवसाव[4] ॥ २ ॥
तुका ह्मणे करा आपुला महिमा । नका जाऊं धर्मावरि माझ्या ॥ ३ ॥

॥ ३७७७ ॥

हें चि वारंवार । पडताळुनी उत्तर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करितों पायांसी विनंती । नुपेक्षावें कमळापती ॥ ध्रु ॥
गंगोदकें[5] गंगे । अर्घ्य[6] द्यावें पांडुरंगे ॥ २ ॥
जोडोनियां हात । करी तुका प्रणिपात ॥ ३ ॥

---

१ दे. निमलें. पं. निर्मिलें.—२ पं. बोलतों.—३ पं. रंग.—४ त. व्येवसाव. पं. व्यवसाव.—५ पं. गंगोदक.—६ पं. आर्घ्ये.

॥ ३७७८ ॥

अवचित या तुमच्या पायां । देवराया पावलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरवें जालें देशाउर । आल्या दुर सारिखें ॥ ध्रु ॥
राहोनियां जातों ठाया । आलियाची निशाणी[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे चरणसेवा । जोडी हेवा लाधली ॥ ३ ॥

॥ ३७७९ ॥

आतां पाविजेल घरा । या दातारा संगती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पायावरि ठेवूं[2] माथा । सर्वथा हा नुपेक्षी ॥ ध्रु ॥
येथून तेथवरि आतां । नाहीं सत्ता आणिकांची ॥ २ ॥
तुका ह्मणे चक्रपाणी । शिरोमणी बळियांचा ॥ ३ ॥

॥ ३७८० ॥

बरवें माझ्या केलें मनें । पंथें येणें निघालें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अभयें च जावें ठाया । देवराया प्रतापें ॥ ध्रु ॥
साधनाचा न लगे पांग । अवघें सांग कीर्तन ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्ता[3] थोरी । कोण करी खोळंबा ॥ ३ ॥

॥ ३७८१ ॥

मागें पुढें नाहीं । दुजें यावेगळें कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं उरलें आणीक । केला झाडा सकळिक ॥ ध्रु ॥
विश्वासावांचून । नांवें दुजियाचे शून्य ॥ २ ॥
हेवाविण[4] कांहीं । तुका ह्मणे उरी नाहीं ॥ ३ ॥

---

१ दे. पं. निशानी.—२ पं. ठेउनी.—३ पं. सत्तेधारी.—४ दे. देवाविण कांहीं । बोलायाची उरी नाहीं ।. पं. तुका ह्मणे काहीं । बोलायाची उरी नाहीं ॥. देहूच्या पाठांत या अभंगांत 'तका" असें नेहमींच्या शैलीप्रमाणें कोठें नाहीं.

॥ ३७८२ ॥

वैराग्याचा अंगीं जालासे संचार । इच्छी वनांतर सेवावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां जी यांचें[1] करूं नये समाधान । वियोगानें मन सिणतसे[2] ॥ ध्रु ॥
नये चि न्यावया[3] पंढरीचें मूळ । न देवे चि माळ कंठींची ही ॥ २ ॥
तुका ह्मणे जालें अप्रीतीचें जिणें । लाजिर हें वाणें सेवा करी ॥ ३ ॥

॥ ३७८३ ॥

आळिकरा कोठें साहातें कठिण । आपुला तें[4] प्राण देऊं पाहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांभाळावें मायबापें कृपादृष्टी । पीडितां तों[5] दृष्टी देखों नये ॥ ध्रु ॥
अंतरलों मागें संवसारा हातीं । मायांपें सरतां जालों नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी विचारा जी देवा । ठेवाल तें ठेवा कोणे परी ॥ ३ ॥

॥ ३७८४ ॥

स्वमींचें हें धन हातीं ना पदरीं । प्रत्यक्ष कां हरि होऊं नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आजुनि कां करा चाळवाचाळवी । सावकाशें द्यावी सत्य भेटी ॥ ध्रु ॥
बोलोनियां फेडा जीवींची काजळी । पाहेन कोमळीं चरणांबुजें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझ्या जीवींचिया जीवा । सारूनियां ठेवा पडदा आतां ॥ ३ ॥

॥ ३७८५ ॥

येतील अंतरा शिष्टाचे अनुभव । तळमळी जीव तया सुखा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझा जीव घेउनियां बळी । बैसवावें वोळी संतांचिये ॥ ध्रु ॥
विस्तारिली वाचा फळेंविण वेल । कोरडे चि बोल फोस वांझे ॥ २ ॥
तुका ह्मणे आलों निर्वाणा च वरी । राहों नेदीं उरी नारायणा ॥ ३ ॥

---

१ पं. माझें.—२ त. दुःखी होतें.—३ दे. यावया.—४ पं. तो.—५ पं. ते.

॥ ३७८६ ॥

ह्मणउनि काय जैऊं[1] भक्तपणें[2] । जायाचीं भूषणें अळंकार ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आपुल्या कष्टाची करूनियां जोडी । मिरवीन उघडी इच्छावसें॥ ध्रु ॥
तुके तरि तुकीं खऱ्याचे उत्तम । मुलाम्याचा भ्रम कोठवरि ॥ २ ॥
तुका ह्मणे पुढें आणि मागें[3] फांस । पावें ऐसा नास न करीं देवा ॥३॥

॥ ३७८७ ॥

आपण चि व्हाल साहे । कैसियाला[4] हे धांवणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाकिली ते उरली कींव । अहि जीव जीवपणें ॥ ध्रु ॥
आहाच कैंचा बीजा मोड । प्रीति कोड वांचूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे दंडिन काय [illegible]ल तया धांवणिया ॥ ३ ॥

॥ ३७८८ ॥

निश्चितीनें होतों करूनियां सेवा । कां जी मन देवा उद्वेगिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनंत उठती चित्ताचे तरंग । करावा हा त्याग वाटतसे ॥ ध्रु ॥
कोण तुह्मांविण मनाचा चाळक । दुजें सांगा एक नारायणा ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा मांडिला विनोद । करऊं नेणें छंद कराल काइ ॥ ३ ॥

॥ ३७८९ ॥

आश्वासावे[5] दास । तरी घडे[6] तो विश्वास ॥ १ ॥

---

१ त. जेऊं. दे. 'जीऊं' असतां 'जेऊं' केलें आहे.—२ दे. भक्तपण.—३ पं. 'मागें' हा शब्द नाहीं.—४ दे. मूळांत दिला आहे असा पाठ होता तोच चांगला आहे. परंतु पुढें कोणीं त. प्रतीवरून 'करीयला हें निर्वाणी' असा केला आहे. पं. कार्य आहे निर्वाणीचें.— ५ 'अश्वासावे०' हा अभंग त. दुबार (अ. ३८०३ व ३९९३ हे पाहा) आहे व दे. ही दुबार (भा. २, अ. ७२६ व ९३७ पाहा) आहे. त्यांत दुसऱ्या ठिकाणीं ह्मणजे ३९९३ व ९३७ यांत 'आश्वासा देवास' आहे.—६ दे. पहिल्या ठिकाणीं ह्मणजे ७२६ यांत 'घडे विश्वास' असें आहे.

॥ ध्रु. ॥ नाहीं चुकत चाकरी । फुटे[1] लाडस्याचे थोरी ॥ ध्रु ॥
स्वामीच्या उत्तरें । सुख वाटे अभयें[2] करें ॥ २ ॥
न मगें परि भातें । तुका ह्मणे निढळें[3] वाटे ॥ ३ ॥

॥ ३७९० ॥

जेणें होय हित । तें तूं जाणसी उचित ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज नको[4] लावूं तैसें । वांयां जायें ऐसें पिसें ॥ ध्रु ॥
धरितोसी[5] सत्ता । होसी सकळ जाणता ॥ २ ॥
चतुराच्या राया । अंगीकारावें[6] तुकया ॥ ३ ॥

॥ ३७९१ ॥

राहे उभा वादावादीं । तरी फंदीं सांपडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लव्हाळ्यासी कोठें बळ । करिल जळ आपुलें ॥ ध्रु ॥
काठिणासी बळजोडा । नम्र[7] पीडा देखेना ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्वरसीं । मिळे त्यासी गोत तें ॥ ३ ॥

॥ ३७९२ ॥

ह्मणउनि जाली तुटी । नाहीं भेटी अहंकारें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दाखविलें देवें वर्म । अवघा भ्रम नासला ॥ ध्रु ॥
हातें मुरगाळितां कान । नाहीं भिन्न वेदना ॥ २ ॥
तुका ह्मणे एकांतसुखें । अवघें गोतें गुंतलें ॥ ३ ॥

॥ ३७९३ ॥

न पडो आतां हाडीं घाव । मध्यें कींव नासक[9] ॥ १ ॥

---

१ दे. (७२६) पुट लाडे शोचे थोरी.—२ त. (दोहीं ठिकाणीं) अभयंकरें.—३ दे. (९३७) निढळि रितें.—४ पं. लाऊं नको.—५ पं. धरितो मी.—६ पं. जांगी करावे.—७ दे. त. नर्म.—८ पं. आवघ्या.—९ पं. नाशक.

॥ ध्रु. ॥ करविली आत्महत्या । जीवा[1] कां त्या द्वंदाच्या ॥ ध्रु ॥
आशापाशीं गुंतला गळा । तेणें कळाहीन जालों ॥ २ ॥
तुका ह्मणे लावूं मुळी । जीवकुळी थारेसी[2] ॥ ३ ॥

॥ ३७९४ ॥

सामावे कारण । नाहीं सोसत धरणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लादी[3] थींके लाजिरवाणी । हीनकमाईची घाणी[4] ॥ ध्रु ॥
पुष्प[5] जवळी नाका । दुर्गंधीच्या नांवें थुंका[6] ॥ २ ॥
तुका ह्मणे किती । उपदेशहीन जाती ॥ ३ ॥

॥ ३७९५ ॥

असाल ते तुह्मी असा । आह्मां सहसा निवडों ना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनुसरलों एका चित्तें । हातोंहातें गीवसीत[7] ॥ ध्रु ॥
गुणदोष[8] काशासाटीं । तुमचे पोटीं वागवूं ॥ २ ॥
तुका ह्मणे दुजें आतां । कोठें चित्ता आतळों ॥ ३ ॥

॥ ३७९६ ॥

सोंवळा होऊं तों वोंवळें जडलें । सांडीमांडी बोलतोंडीं बीजीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एकसरीं केलीं कळिवरें साटी । आतां नका तुटी पायांसवें ॥ ध्रु ॥
संकल्पीं[8] विकल्प पापाचा सुकाळ । रज्जुसर्प मूळ मरणाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे हें[9] तूं ब्रह्मांड चाळिता । मी कां करूं चिंता पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३७९७ ॥

आहें[10] तैसा आतां आहें ठायीं बरा । ठेविलों[11] दातारा उचितें त्या ॥ १ ॥

---

१ दे. कां द्वधाचा. त. कां त्यां द्वंधाचा.—२ त. दे. थोरेसी.—३ पं. लाही थीके.—४ त. धणी. पं. वाणी.—५ पं. पुष्पा.—६ पं. थुं.—७ दे. गींवासित. त. गीवंसीत.—८ संकल्प.—९ पं. त. तूं हें.—१० दे. आहे तैसा आतां आहे०. त. आहे तैसा आतां आहें०.—११ पं. ठेविले.

॥ ध्रु. ॥ वचनाचा भार पडिलिया शिरीं । जालें मग भारी उतरेना॥ ध्रु ॥
अबोल्याची सवे लावुनियां मना । फाकों नेदीं[1] गुणा ऐसें करूं ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां गोंवळ्याचा संग । राखेतें[2] तें अंग जाणतसों ॥ ३ ॥

॥ ३७९८ ॥

तूं माझा कोंवसा । परी न कळे या धंसां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कूट खाती मागें पुढें । जाती निरयगांवा[3] पुढें ॥ ध्रु ॥
मज[4] ह्मणताती कवी । निषेधुनि पापी जीवीं ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । आतां कोण लेखी जगा ॥ ३ ॥

॥ ३७९९ ॥

दर्पणासी बुजे । नखटें[5] तोंड पळवी लाजे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गुण ज्याचे जो अंतरीं । तो चि त्यासी पीडा करी ॥ ध्रु ॥
चोरा रुचे निशी । देखोनियां विटे शशी ॥ २ ॥
तुका ह्मणे जन । देवा असें भाग्यहीन ॥ ३ ॥

॥ ३८०० ॥

ह्मणउनि शरण जावें । सर्वभावें देवासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो हा उतरील पार । भवदुस्तरनदीचा ॥ ध्रु ॥
बहु आहे करुणावंत । अनंत हें नाम ज्या ॥ २ ॥
तुका ह्मणे साक्षी आलें । तरी केलें प्रगट ॥ ३ ॥

॥ ३८०१ ॥

ऐसीं वर्मे आह्मां असोनियां हातीं । कां होऊं नेणतीं दिशाभुली ॥ १ ॥

---

१ त. फाकू नेंदू.—२ पं. राखावें.—३ दे. त. नरये०—४ दे. त. माझी ह्मणती कवी.—५ पं. नकटें.

॥ ध्रु. ॥ पोटाळुनी पाय कवळीन उभा । रूपे पद्मनाभा हालों नेदीं ॥ ध्रु ॥
आपुले इच्छेसी घालीन संपुष्टीं । श्रीमुख तें दृष्टी न्याहाळीन ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु सांडियेलीं मतें । आपुल्या पुरतें धरुनी ठेलीं ॥ ३ ॥

॥ ३८०२ ॥

रत्नाच्या घोवणी कांचे ऐशा धरी । आव्हेरुनी दुरी अधिकारें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जातिस्वभाव आला डोळ्यां आड । तया घडे नाड न कळतां ॥ ध्रु ॥
कामधेनु देखे जैशा गाईह्मैसी । आणिकांतें ऐसी करोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे काय बोलोनियां फार । जयाचा वेव्हार तया साजे ॥ ३ ॥

॥ ३८०३ ॥

तरी च[1] हीं केलीं । दानें वाईट चांगलीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐकें[2] एका शोभवावें । केलें कवतुक देवें ॥ ध्रु ॥
काय त्याची सत्ता । सूत्र आणीक चाळिता ॥ २ ॥
तुका ह्मणे धुरें । डोळे भरिले[3] परि खरें ॥ ३ ॥

॥ ३८०४ ॥

अंधळें तें सांगे सांगितल्या खुणा । अनुभव देखणा प्रगट त्या ॥ १ ॥
नांदणुक सांगे वडिलाचें बळ । कैसा तो दुर्बळ सुख पावे ॥ २ ॥
तुका ह्मणे नांदों आपल्या प्रतापें । तयाची लोकांपें स्तुती सांगों ॥ ३ ॥

॥ ३८०५ ॥

करी[4] आणिकांचा अपमान । खळ छळवादी ब्राह्मण ।
तया देतां दान । नरका[5] जाती उभयतां ॥ १ ॥

---

१ पं. 'च' नाहीं.—२ दे. येक येक. पं. येक येका.—३ पं. भरी.—४ पं. 'करी' नाहीं.—५ त. पं. नर्का.

॥ ध्रु. ॥ तैसें जालें दोघांजणां । मागतिया यजमाना ।
जाळियलें वनां । आपणासहित कांचणी ॥ ध्रु ॥
घडितां दगडाची नाव । मोलें क्लेश गेले वाव ।
तरता नाहीं ठाव । बुडवी तारूं तरतियां ॥ २ ॥
चोरा दिधला सांटा । तेणें मारियेल्या वाटा ।
तुका ह्मणे ताठा । हें तंव दोघे नाडती ॥ ३ ॥

॥ ३८०६ ॥

जळो ते जाणींव जळो ते शाहाणींव । राहो माझा भाव विठ्ठलपायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जळो तो आचार जळो तो विचार । राहो मन स्थीर विठ्ठलपायीं ॥ ध्रु
जळो हा लौकिक जळो दंभमान । लागो जीवा ध्यान विठ्ठलाचें ॥ २ ॥
जळो हें शरीर जळो हा संबंध । राहो परमानंद माझ्या कंठीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें अवघें चि होय । धरीं मना सोय विठोबाची ॥ ४ ॥

॥ ३८०७ ॥

विश्वास धरूनि राहिलों निवांत । ठेवूनियां चित्त तुझे पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरावें बुडावें तुझिया वचनें । निर्धार हा मनें केला माझ्या ॥ ध्रु ॥
न कळे हें मज साच चाळविलें । देसी तें उगलें घेइन देवा ॥ २ ॥
मागणें तें सरे ऐसें करीं देवा । नाहीं तरी सेवा सांगा पुढें ॥ ३ ॥
करावें काहीं कीं पाहावें उगलें । तुका ह्मणे बोलें पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ३८०८ ॥

कोणी एकाचिया परें केली आळी । ठावी नाहीं पोळी मागे देखी ॥ १ ॥

---

१ पं. ताटा.—२ पं. मना. दे. जीव.—३ दे. त. माझा.—४ पं. तेथें.—५ दे. माझा.—६ पं. करावे तें काही की०.

॥ ध्रु. ॥ बुझाविलें हातीं देउनी खापर । छंद करकर वारियेली ॥ ध्रु ॥
तैसें नको[1] करूं मज कृपावंता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मायपाश्यांचें उचित । करावें हें[2] हित बाळकाचें ॥ ३ ॥

॥ ३८०९ ॥

देवाचिये पायीं देईं मना बुडी । नको धांवों वोढी इंद्रियांचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्व सुखें तेथें होती एकवेळे । न सरती काळें कल्पांतीं ही ॥ ध्रु ॥
जाणें येणें खुंटे धांवे[3] वेरजार । न लगे डोंगर उसंतावे ॥ २ ॥
सांगणें[4] तें तुज इतुलें चि आतां । मानीं[5] धन कांता विषतुल्य ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझे होती उपकार । उतरों[6] हा पार भवसिंधु ॥ ४ ॥

॥ ३८१० ॥

आह्मी विठ्ठलाचे दास जालों आतां । न चले हे सत्ता आणिकांची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नांवरे[7] तयासी ऐसें नाहीं दुजें । करितां पंढरिराजें काय नव्हे ॥ ध्रु ॥
कोठें तुज ठाव घ्यावयासी धांवा । मना तूं विसावा घेईं आतां ॥ २ ॥
इंद्रियांची वोढी मोडिला व्यापार । ज्या अंगें संचार चालीं[8] तुज ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी जिंकोनियां काळ । बैसलों निश्चळ होऊनियां ॥ ४ ॥

॥ ३८११ ॥

सांगतों[8] तरि तुह्मी भजा रे विठ्ठला । नाहीं तरि गेला जन्म वांयां ॥ १ ॥
करितां भरोवरी दुरावसी दुरी । भवाचिये पुरीं वाहावसी ॥ २ ॥
कांहीं न लगे एक भाव चि कारण । तुका ह्मणे आण विठ्ठलाची ॥ ३ ॥

---

१ पं. करूं नको.—२ पं. स्व.—३ पं. धाव येरझार.—४ दे. सांगन.—५ दे. त. पं. मानी.—६ त. न वारे.—७ दे. चाळी.—८ पं. सांगतों तुह्मांसी भजा०.

॥ ३८१२ ॥

शब्दज्ञानी[1] येऊं नेदीं दृष्टीपुढें । छळवादी कुडे अभक्त ते ॥ १ ॥
जळो ते जाणींव जळो त्याचे दंभ । जळो त्याचें तोंड दुर्जनाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे येती दाटूनि छळाया । त्यांच्या बोडूं डोया न धरूं भीड ॥ ३ ॥

॥ ३८१३ ॥

अन्यायासी[2] राजा जरि[3] न करी दंड । बहु[4] च ते लंड पीडिती जना ॥ १ ॥
न[5] करी निगा कुणबी न काढितां तण । कैंचे येती कण ह्मातासी ते ॥ २ ॥
तुका ह्मणे संतां करूं नये अनुचित[6] । पाप नाहीं नीत विचारितां ॥ ३ ॥

॥ ३८१४ ॥

भले लोक नाहीं सांडीत वोळखी । हे तों झाली देखी दुसऱ्याची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असो आतां यासी काय चाले बळ । आपुलें कपाळ वोडवलें ॥ ध्रु. ॥
समर्थासी काय कोणें हें ह्मणावें । आपुलिया जावें भोगावरि ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मां बोल नाहीं देवा । नाहीं केली सेवा मनोभावें ॥ ३ ॥

॥ ३८१५ ॥

मुकें होतां तुझ्या[7] पदरीचें जातें । कार्य तें भोगितें मीमीपण ॥ १ ॥
आपुलिये घरीं मैंद होउनी बसे[8] । कवण कवणासी बोलों नका ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मां सांगतों मी खुण । देवासी तें ध्यान लावुनि बैसा[10] ॥ ३ ॥

---

१ पं. शब्द झणी.—२ हा अभंग दे. भा. २ (७५८ व १०६६), त. (३८२७ व ४०९५) असा दुवार आहे. दे. पहिल्या ठिकाणीं आनयासें. त. पहिल्या ठिकाणीं आनयासे. दे. व त. (दुसऱ्या ठिकाणीं) अन्यायासी.—३ दे. व त. (दुसऱ्या) न करितां दंड ।.—४ दे. बहुचक ते लंड. त. बहुचक लंड.—५ दे. त. (दुसऱ्या ठिकाणीं) न करितां.—६ दे. त. (दुसऱ्या ठिकाणीं) अनृत.—७ पं. काय.—८ पं. मूर्ख. दे. पूर्वीं मूर्ख असा पाठ होता.—९ पं. बैसें.—१० पं. बैसा.

॥ ३८१६ ॥

आषाढी निकट । आणि[1] कार्तिकीचा हाट ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुरे दोन्ही च बाजार । न लगे आणीक व्यापार ॥ ध्रु ॥
तें चि घ्यावें[2] तें चि घ्यावें । कैवल्याच्या रासी भावें ॥ २ ॥
कांहीं कोणा नेणे । विठो वांचूनि तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३८१७ ॥

देऊनियां प्रेम मागितलें चित्त । जाली फिटाफिट तुह्मां आह्मां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काशानें उदार तुह्मांसी ह्मणावें । एक नेसी भावें[3] एक देसी ॥ध्रु॥
देऊनियां थोडें नेसील हें[4] फार । कुंटिसी विचार अवघियांचा ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां भांडवल चित्त । देउनी दुश्चित पाडियेलें ॥ ३ ॥

॥ ३८१८ ॥

तातडीची[5] धांव अंगा आणि भाव । खोळंबा तो वावें[6] निश्चयाचा[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनि बरी विचारावी चाली । उरीचि[8] ते बोली कामा येते ॥ध्रु॥
कोरडें वैराग्य माजिरा बडिवार । उतरे तो शूर अंगींचें[9] तें ॥ २ ॥
तुका ह्मणे बरी झ्याची ते चाली । सांचवण्या खोली[10] कैसीयांची ॥३॥

॥ ३८१९ ॥

मी तों बहु सुखी आनंदभरिता । आहें साधुसंतां मेळीं सदा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं[11] व्हावें ऐसें नाहीं माझ्या जीवा । आणीक केशवा तुजविण ॥ध्रु॥
न लगे वैकुंठ मोक्ष सायुज्यता । सुख वाटे घेतां जन्म ऐसें ॥ २ ॥
मृत्युलोकीं कोण धरिलें[11] वासना । पावावया जनासवें दुःख ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझा दास ऐसें लोकां । कांहीं सकळिकां कळों यावें ॥ ४ ॥

---

१ पं. आला.—२ पं. घ्यावें० द्यावें ।—३ पं. भाव.—४ पं. वो.—५ पं. उचित.—६ दे. मंग.—७ पं. निश्चितीचा.—८ पं. उरली.—९ पं. चाली.—१० दे. देवा कांहीं०.—११ दे. धरिलें.

॥ ३८२० ॥

घ्या रे लुटी प्रेम सुख । फेडा आजि धणी ।
चुकला तो मुकला । जाली वेरझार हाणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घाला घातला वैकुंठीं । करूनियां जीवें साटी ।
पुरविली पाठी । वैष्णवीं काळाची[1] ॥ ध्रु. ॥
अवघें आणिलें अंबर । विठोसहित तेथें धुर ।
भेदूनि जिव्हार । नामबाणीं धरियेला ॥ २ ॥
संचित प्रारब्ध क्रियमाण । अवघीं जालीं गहन ।
केलीं पापपुण्यें । देशधडी बापुडीं ॥ ३ ॥
आनंदें गर्जती निर्भर । घोष करिती निरंतर ।
कांपती असुर । वीर कवणा नांगवती ॥ ४ ॥
जें दुर्लभ ब्रह्मादिकां । आजि सांपडलें फुका ।
घ्या रे ह्मणे तुका । सावचित्त होउनी ॥ ५ ॥

॥ ३८२१ ॥

तुझिया दासांचा हीन[2] जालों दास । न धरीं उदास मायबापा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुजविण प्राण कैसा राहों पाहे । वियोग न साहे क्षणभरि ॥ ध्रु. ॥
आणिक माझ्या जीवें मोकलिली आस । पाहे तुझी वास पांडुरंगा ॥ २ ॥
सर्वभावें तुज आणिला उचित । राहिलों निश्चित[3] तुझे पायीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज असो माझा भार । बोलतों मी फार काय जाणें ॥ ४ ॥

॥ ३८२२ ॥

ते चि करीं मात । जेणें होइल तुझें हित ॥ १ ॥

---

१ पं. काळीचि.—२ त. हीण. प. नाहीं.—३ पं. त. निश्चीत.

॥ ध्रु. ॥ काय बडबड अमित[1] । सुख जिव्हारीं सिणविसी ॥ ध्रु ॥
जो मुळव्याधी पीडिला । त्यासी देखोन हांसे खरजुला ॥ २ ॥
आरथकरी[2]* सोसी । त्यासि हांसे तो आळसी ॥ ३ ॥
क्षयरोगी ह्मणे परता । सर रोगिया तूं[3] आतां ॥ ४ ॥
वडस दोहीं डोळां वाढले । आणिकां कानें कोंचें[4] ह्मणे ॥ ५ ॥
तुका[5] ह्मणे लागों पायां । शुद्ध करा आपणियां ॥ ६ ॥

॥ ३८२३ ॥

कळों आला भाव माझा मज देवा । वांयांविण जीवा आटविलें[6] ॥ १ ॥
जोडूनि अक्षरें केलीं तोंडपिटी[7] । न लगे शेवटीं हातीं कांहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे माझे गेले दोन्ही ठाय । संसार[8] ना पाय तुझे मज ॥ ३ ॥

॥ ३८२४ ॥

आतां तरी मज सांगा साच भावें[9] । काय म्यां करावें ऐसें देवा ॥ १ ॥
चुकावया कर्म नव्हतें कारण । केला होय सीण अवघा चि ॥ २ ॥
तुका ह्मणे नको[10] पाहूं निरवाण । देईं कृपादान याचकासी ॥ ३ ॥

॥ ३८२५ ॥

बोल नाहीं तुझ्या दातृत्वपणासी । आह्मी[11] अविश्वासी सर्वभावें ॥ १ ॥

---

१ दे. आमित्य. त. आमित्ये. पं. निमित्य.—२ पं. आरायकरी. दे. 'आराथकरी' याचें 'आरथकरी' केलें आहे. —३ पं. कुष्टता.—४ पं. "आणीकाचे कोचे बोले" यांतील 'बोले' हें यमकास जुळतें खरें, परंतु तें दे. व त. यांत आढळत नाहीं.—५ पं. तुका लागे पायां।—६ दे. त. आठविलें. पं. आटी केली —७ दे. संवसार.—८ दे. त. भाव.—९ पं. या कडव्याच्या पूर्वी 'कळे ह्मणऊन करीतसें वाद। दिसे भेदाभेद अंतरींचा ॥' हें कडवें आहे —१० दे. नको पानिखाण. त. देवा नको पाणी खाण. या दोन्ही पाठांत अर्थ दिसत नसून हे लेखकप्रमा दानें होण्याचा फारच संभव दिसतो.—११ दे. अह्मां नष्टवीसि.

* आरथकरी=आर्तकरी ?

दंभें करी भक्ती सोंग दावी जना । अंतरीं भावना वेगळिया ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा तूं काय करिसी । कर्मा दुस्तरासी आमुचिया ॥ ३ ॥

॥ ३८२६ ॥

नामधारकासी नाहीं वर्णावर्ण । लोखंड प्रमाण नाना जात ॥ १ ॥
॥ध्रु.॥ शस्त्र अथवा गोळे भलता प्रकार । परिसीं संस्कार सकळ ही हेम ॥ध्रु॥
पर्जन्य वर्षतां जीवना वाहावट । तें समसकट गंगे मिळे ॥ २ ॥
सर्व तें हें जाय गंगा चि होऊन । तैसा वर्णावर्ण नाहीं नामीं ॥ ३ ॥
महापुरीं जैसें जातसे उदक । मध्यें तें तारक नाव जैसी ॥ ४ ॥
तये नावेसंगें ब्राह्मण तरती । केवीं ते बुडती अनामिक ॥ ५ ॥
नाना काष्ठजात पडतां हुताशनीं । ते जात होईनी एकरूप ॥ ६ ॥
तेथें निवडेना घुरे कीं चंदन । तैसा वर्णावर्ण नामीं नाहीं ॥ ७ ॥
पूर्वानुवोळख तें चि पैं मरण । जरि पावे जीवन नामामृत ॥ ८ ॥
नामामृतें जालें मुळीचें स्मरण । सहज साधन तुका ह्मणे ॥ ९ ॥

॥ ३८२७ ॥

काय वांचोनियां जालों भूमिभार । तुझ्या पायीं थार नाहीं तरि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जातां भलें काय डोळियांचें काम । जरि पुरुषोत्तम न देखती ॥ध्रु॥
काय मुख बिळ श्वापदाचे धांमें । नित्य तुझें नांमें नुच्चारितां ॥ २ ॥
तुका ह्मणे पैं या पांडुरंगाविण । न वचे चि क्षण जीव भला ॥ ३ ॥

॥ ३८२८ ॥

सोइंयासी करी पाहुणेर बरा । कांडितो ठोंबरा संतांलागीं ॥ १ ॥

---

१ पं. याच्यापूर्वीं 'चित्ता तूं रे साक्षी तुज कळे सर्व । किती करू गर्व आतां पुढें ॥' हें कडवें आहे.—२ दे. कर्म दृष्ट गासि०. पं कर्म दुस्तरगाशी.—३ पं. 'ही' नाहीं—४ दे. त. प्रजन्य.—५ पं. जैसेंतैसें.—६ प. नाम मृतें—७ दे. त. धांव.—८ दे. त. नांव.—९ पं. आतां. पांडु०.—१० पं. सोयऱ्यासी.—११ दे. संता सांटीं.

॥ ध्रु. ॥ गाईसी[1] देखोनी बदबदा मारी । घोडयाची चाकरी गोड वाटे ॥ ध्रु ॥
पान[2] फुल नेतो वेश्येसी उदंड । ब्राह्मणासी खांड देऊं नेदी ॥ २ ॥
पर्वकाळीं धर्म न करी नासरी[3] । वेची राजद्वारीं उदंड[4] चि ॥ ३ ॥
कीर्तना[5] जावया होतसे हींपुष्टी । खेळतो सोंकटीं रात्रंदिवस ॥ ४ ॥
बाइलेच्या गोता आवडीनें पोसी । मातापितियासी दवडितो ॥ ५ ॥
तुका ह्मणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ६ ॥

॥ ३८२९ ॥

कां हो पांडुरंगा न करा धांवणें । तरि मज कोणें सोडवावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझा ह्मणऊनि आणिकांपें उभा । राहों हें तों शोभा नेदी आतां ॥ ध्रु ॥
काळें पुरविली पाठी दुरवरी[6] । पुढें पायां धीरी राहों नेदी ॥ २ ॥
नको आणूं माझें संचित मनासी । पावन आहेसी पतितां[7] तूं ॥ ३ ॥
तुका ह्मणे चाले आणिकांची सत्ता । तुज आळंपितां[8] नवल हें ॥ ४ ॥

॥ ३८३० ॥

कावळयाच्या गळां मुक्ताफळमाळा । तरी काय त्याला भूषण शोभे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गजालागीं केला कस्तुरीचा लेप । तिचें तो स्वरूप काय जाणे ॥ ध्रु ॥
बकापुढें सांगे[9] भावार्थवचन[10] । वाउगा चि सीण होय त्यासी ॥ २ ॥
तुका ह्मणे तैसे अभाविक जन । त्यांसी वांयां सीण करूं नये ॥ ३ ॥

---

१ पं. गाई देखोनियां.—२ पं. पान फुल वेश्येसी नेतसे उदंड । देखों नेदी खांड ब्राह्मणासी ॥.—३ दे. कवडी.—४ पं. द्रव्यराशी ।.—५ पं. पुराणीं वैसावया नाहीं रिकामटी ।.—६ पं. दुरवर । पुढें पाय स्थिर राहों०.—७ पं. पतित तूं.—८ पं. आठवितां.—९ दे. त. सोंग.—१० दे. भावार्थें वचन ।

॥ ३८३१ ॥

आतां धरितों पदरीं । तुज मज करीन सरी ॥ १ ॥
जालों जीवासी उदार । उभा ठाकलों समोर ॥ २ ॥
तुका विनवीतसे संतां । ऐसें सांगा पंढरिनाथा ॥ ३ ॥

॥ ३८३२ ॥

न कळसी[1] ज्ञाना न कळसी ध्याना । न कळसी दर्शना धुंडाळितां ॥ १ ॥
न कळसी आगमा न कळसी निगमा । न बोलवे सीमा वेदां पार ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझा नाहीं अंतपार । ह्मणोनि विचार पडिला मज ॥ ३ ॥

॥ ३८३३ ॥

पायां लावुनियां दोरी । भृंग बांधिला लेंकुरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा पावसी बंधन । मग सोडवील कोण ॥ ध्रु ॥
गळां बांधोनियां दोरी । वांनर हिंडवी घरोघरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहें । रीस धांपा देत आहे ॥ ३ ॥

॥ ३८३४ ॥

मायबापें सांभाळिती । लोभाकारणें पाळिती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा नव्हे देवराव । याचा कृपाळु स्वभाव ॥ ध्रु ॥
मनासारिखें न होतां । बाळकासी मारी माता ॥ २ ॥
तुका ह्मणे सांगूं किती । बाप लेंकासी मारिती ॥ ३ ॥

॥ ३८३५ ॥

धन मेळवूनि कोटी । सर्वें नये रे लंगोटी ॥ १ ॥

---

१ दे. या अभंगांत सर्वत्र 'कळसी' याच्याबद्दल 'कळेसि' असें आहे.

॥ ध्रु. ॥ पानें[1] खाशील उदंड । अंतीं जासी सुकल्या तोंडें[2] ॥ ध्रु ॥
पलंग न्याहाल्या सुपती । शेवटीं गोवऱ्या सांगाती ॥ २ ॥
तुका ह्मणे राम । एक विसरतां श्रम ॥ ३ ॥

॥ ३८३६ ॥

विनवितों चतुरा तुज विश्वंभरा । परियेसी दातारा पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझे दास ऐसें जगीं वाखाणिलें । आतां न व्हे भलें मोकलितां ॥ ध्रु ॥
माझे गुणदोष कोण जाणे मात । पावनपतित नाम तुझें ॥ २ ॥
लोभ मोह माया आह्मां बांधवितां । तरि हा अनंता बोल कोणा ॥ ३ ॥
तुका ह्मणे मी तों पतित चि खरा । परि आलों दातारा शरण तुज ॥ ४ ॥

॥ ३८३७ ॥

त्राहे त्राहे त्राहे सोडवीं अनंता । लागों दे ममता तुझे पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक चि मागणें देई तुझी गोडी । न लगे[3] आवडी आणिकाची ॥ ध्रु ॥
तुझें नाम[4] गुण वर्णीन पवाडे । आवडीच्या कोडें नाचों रंगीं ॥ २ ॥
बापा विठ्ठलराया हें चि देई दान । जोडती चरण जेणें तुझे ॥ ३ ॥
आवडीसारिखें मागितलें जरी । तुका ह्मणे करीं समाधान ॥ ४ ॥

॥ ३८३८ ॥

सुगरणीबाई थिता नास केला । गुळ तो घातला भाजीमध्यें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्षीरीमध्यें हिंग दुधामध्यें बोळ । थितें चि वोंगळ कैसें[5] केलें ॥ ध्रु ॥
दळण[6] दळोनी भरूं[7] गेली पाळी । भरडोनि वोंगळी नास केला ॥ २ ॥
कापुराचे सांते आणिला लसण । वागवितां सीण दुःख होय ॥ ३ ॥

---

१ पं. पानें.—२ पं. तोंड—३ पं. लवीं.—४ पं. गुण नाम.—५ पं. नाश केला.—६ पं. याच्या पूर्वीं 'हीरयाच्या पेठे आणियेल्या गारा । खांदीं शिरीं भारा व्यर्थ वाहे ॥' हें कडवें आहे.—७ पं. भरियेली.

रत्नाचा जोहारी रत्न चि पारखी । येर देखोदेखीं[1] हातीं घेती ॥ ४ ॥
तुका ह्मणे जरी योग घडे[2] निका । न घडतां थुंका तोंडावरी ॥ ५ ॥

॥ ३८३९ ॥

बाप माझा दिनानाथ । वाट भक्तांची पाहात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कर ठेवुनियां कटी[2] । उभा चंद्रभागे तटीं[3] ॥ ध्रु ॥
गळां वैजयंतीमाळा । रूपें डोळस सांवळा ॥ २ ॥
तुका ह्मणे भेटावया । सदा उभारिल्या बाह्या ॥ ३ ॥

॥ ३८४० ॥

माझें जीवन तुझे पाय । कृपाळु तूं माझी माय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेदीं दिसों किविलवाणें । पांडुरंगा तुझें तान्हें ॥ ध्रु ॥
जन्ममरण तुजसाटीं । आणीक नेणें दुजी गोष्टी ॥ २ ॥
तुका ह्मणे तुजविण । कोण हरिल माझा सीण ॥ ३ ॥

॥ ३८४१ ॥

कां रे पुंडया[4] मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा कैसा रे तूं धीट । मागें भिरकाविली विट ॥ ध्रु ॥
युगें जालीं अठ्ठावीस । अजुनी न ह्मणसी बैस ॥ २ ॥
भाव[5] देखोनि निकट । देवें सोडिलें वैकुंठ ॥ ३ ॥
तुका ह्मणे पुंडलिका । तूं[6] चि बळिया एक निका ॥ ४ ॥

॥ ३८४२ ॥

तुज पाहातां समोरी । दृष्टि न फिरे मागारी ॥ १ ॥

---

१ त. देखोवखीं.—२ दे. करीं.—३ दे. तिरीं.—४ पं. प्रेमें.—५ त. हें सर्व कडवें नाहीं.—६ पं. तूं चि भक्त बळिया निका.

॥ ध्रु. ॥ माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडिली पंढरिराया ॥ ध्रु ॥
नव्हे सारितां[1] निराळें । लवण मेळवितां जळें ॥ २ ॥
तुका ह्मणे बळी । जीव दिला पायांतळीं ॥ ३ ॥

॥ ३८४३ ॥

उपदेश किती करावा खळासी । नावडे तयासी बरें कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शुद्ध कां[2] वासना नव्हे चांडाळाची । होळी संचिताची केली तेणें ॥ ध्रु ॥
नाहीं भाव मनीं नाइके वचन । आपला[3] आपण उणें[4] घेतों ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यासी काय व्याली रांड[5] । करी बडबड रिती दिसे ॥ ३ ॥

॥ ३८४४ ॥

समर्थासी लाज आपुल्या नामाची । शरण आल्याची[6] लागे चिंता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न पाहे तयाचे गुण दोष अन्याय । सुख देउनि साहे दुःख त्याचें ॥ ध्रु ॥
मान भलेपण नाहीं फुकासाटीं । जयावरि[7] गांठी झीज साहे ॥ २ ॥
तुका ह्मणे हें तूं सर्व ही जाणसी । मज अधिरासी धीर नाहीं ॥ ३ ॥

॥ ३८४५ ॥

आनंदें कीर्तन कथा करीं घोष । आवडीचा रस प्रेमसुख ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज या आवडे वैष्णवांचा संग । तेथें नाहीं लाग कळिकाळा ॥ ध्रु ।
स्वल्प मंत्र[8] वाचे बैसलासे निका । राम कृष्ण सखा नारायण ॥ २ ॥

---

१ दे. सरितां.—२ पं. 'कां' नाहीं.—३ पं. आपुल्या.—४ पं. नाडियेलें ।.—५ पं. करितो बडबड रात्र दिवस ।.—६ पं. आली त्याची.—७ पं. जवत्री.—८ दे. त. मात्र.

विचारितां दुजें वाटे मज लाज । उपदेशें काज आणीक नाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे चित्त रंगलेंसे ठायीं । माझें तुझ्या पायीं पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ३८४६ ॥

ब्रह्मज्ञान जेथें आहे घरोघरीं । सर्व निरंतरी चतुर्भुज ॥ १ ॥
पापा नाहीं रोग काळाचें खंडण । हरिनामकीर्तन परोपरी ॥ २ ॥
तुका ह्मणे हा चि भाव माझ्या चित्तीं । नाहीं आणिकां गती चाड मज ॥३॥

॥ ३८४७ ॥

मज नाहीं कोठें उरला दुर्जन । मायबापाविण ब्रह्मांडीं ही[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया[3] जिकीर करणें येविशीं[4] । भयाची मानसीं चिंता खंती ॥ ध्रु ॥
विश्वंभराचिये[5] लागलों सांभाळीं । संत नेती चाली आपुलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें पाळण पोषण । करी नारायण सर्वस्वेंसी ॥ ३ ॥

॥ ३८४८ ॥

नाहीं हित ठावें जननीजनका । दाविले लौकिकाचार तेंहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंधळ्याचे काठी लागलें[6] आंधळे । घात एकवेळे मागेंपुढें ॥ध्रु॥
न ठेवावी चाली करावा विचार । वरील आहार गळी लावी ॥ २ ॥
तुका ह्मणे केला निवाडा रोकडा । राऊत हा घोडा हातोहातीं ॥ ३ ॥

॥ ३८४९ ॥

आतां पहाशिल काय माझा अंत । आलों शरणागत तुज देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करीं अंगीकार राखें पायांपाशीं । झणीं दिसों देसी कीविलवाणें ॥ ध्रु ॥

---

१ दे. विचारितां मज दुजें वाटे लाज.—२ दे. त. हें.—३ पं. कासया जिकर करणें०.—४ पं. भयचि.—५ दे. त. पाळणें पोषणें.—६ दे. अंधळें लागलें.

नाहीं आइकिली मागें ऐसी मात । जे त्वां शरणागत उपेक्षिले ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां धरीं अभिमान । आहेसी तूं दानशूर दाता ॥ ३ ॥

॥ ३८५० ॥

होईल तो भोग भोगीन आपुला । न घलीं विठ्ठला भार तुज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मांपासाव हें इच्छीतसें दान । अंतरींचें ध्यान मुखीं नाम ॥ध्रु॥
नये काकुलती गर्भवासांसाटीं । न धरीं हें पोटीं भय कांहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मज उदंड एवढें । न वांचावें पुढें मायबापा ॥ ३ ॥

॥ ३८५१ ॥

माझा तों स्वभाव आहे अह्मावर । तुज देतां भार कांहीं नव्हे[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृती हि स्वप्ना ताळ नाहीं ॥ध्रु॥
संपादिला तो हा अवघा बाह्य रंग । तुझा नाहीं संग अभ्यंतरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्या नाहीं पोटी[2] पोट । असोनि[3] निघोट काय जाती ॥ ३ ॥

॥ ३८५२ ॥

काय तुझी ऐसी वेचते गांठोळी । माझी[4] टाळाटाळी करीतसां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चतुराच्या राया आहो पांडुरंगा । ऐसें तरि सांगा निवडूनि ॥ध्रु॥
कोण तुह्मां सुख असे या कवतुकें । भोगितां अनेकें दुःखें आह्मी ॥ २ ॥
तुका ह्मणे काय जालासी निगुर्ण । आह्मां येथें कोण सोडवील ॥ ३ ॥

॥ ३८५३ ॥

देवाची पूजा हे भूताचें पाळण । मत्सर तो सीण बहुतांचा ॥ १ ॥
रुसावें फुगावें आपुलियावरि । उरला तो हरि सकळ ही ॥ २ ॥
तुका ह्मणे संतपण यां चि नांवें । जरि होय जीव सकळांचा ॥ ३ ॥

---

१ प. काय.—२ पं. पाट.—३ प. असे तें नीघोट एकजाती.—४ दे. त. मांहे.

॥ ३८५४ ॥

नाहीं जप तप जीवाची[2] आटणी । मनासी दाटणी नाहीं केली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निजलिया ठायीं पोकारिला धांवा । सांकडें तें देवा निवारावें[3] ॥ध्रु॥
नाहीं आणूनियां समर्पिलें जळ । सेवा ते केवळ चिंतनाची ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मीं वेचिलीं उत्तरें । घेतलीं उदारें साच भावें ॥ ३ ॥

॥ ३८५५ ॥

देहें[4] तंव आहे प्रारब्धा अधीन । याचा मी कां सीण वाहूं भार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सरो माझा काळ तुझिया चिंतनें । कायावाचामनें इच्छीतसें ॥ध्रु॥
लाभ तो न दिसे याहूनि दुसरा । आणीक दातारा येणें जन्में ॥ २ ॥
तुका ह्मणे 'आलों सोसीत संकटें । मी माझें वोखटें आहे देवा ॥ ३ ॥

॥ ३८५६ ॥

सकळ तुझे पायीं मानिला विश्वास । न करीं उदास आतां मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जीवीं[5] गातां गोड आइकतां कानीं । पाहातां लोचनीं मूर्ती तुझी ॥ ध्रु॥
मन स्थिर माझें जालेंसे निश्चळ । वारिलीं सकळ आशापाश ॥ २ ॥
जन्मजराव्याधि निवारलें दुःख । वोसंडलें सुख प्रेमें[6] धरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज जाला हा निर्धार । आतां वांयां फार काय बोलों ॥ ४ ॥

॥ ३८५७ ॥

नये[7] माझा तुह्मां होऊं शब्दस्पर्श । विप्रवृंदा[8] तुह्मां ब्राह्मणांसी ॥ १ ॥

---

१ त. नेणें—२ पं. जीवासी.—३ पं. तुज माझें. दे. तुझें मज.—४ दे. त. दंड तंव, पं. देह तंव असे. हाच अभंग दे. (भा. २ अ. ८०२—१३४६ पाहा) व त. (अ. ३८६९—४३१३ पाहा) या दोन्ही प्रतींत दुवार आहे. तेथें दोन्ही ठिकाणी 'दह तंव' असाच पाठ आहे व हाच चांगला आहे.—५ पं. वाचे.—६ पं. प्रेम धणी.—७ दे. यांत अक्षरांवर अंक घालून 'होऊं शब्दस्पर्श नये माझा तुह्मां' असें केलें आहे.—८ त. विप्र तुह्मी वृंदा ब्राह्मणासी. पं. विप्र तुह्मी विद्वांस ब्राह्मणांसी.

॥ ध्रु. ॥ ह्मणोनियां तुह्मां करितों विनंती । द्यावें शेष हातीं उरलें तें ॥ ध्रु॥
वेदीं कर्म जैसें बोलिलें विहित । करावी ते नीत विचारूनि ॥ २ ॥
तुगचा स्वधर्म माझा अधिकार । भोजन उत्तर तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३८५८ ॥

बहुत असती मागें सुखी केलीं । अनाथा माउली जिवांची तूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझिया संकटा न धरीं अळस । लावुनियां कास पार पावीं ॥ ध्रु ॥
कृपावंता करा ज्याचा अंगीकार । तया संवसार नाहीं पुन्हां ॥ २ ॥
विचारितां नाहीं दुजा बळिवंत । ऐसा सर्वगत व्यापी कोणी ॥ ३ ॥
ह्मणउनि दिला मुळीं जीवभाव । देह केला वाव समाधिस्थ ॥ ४ ॥
तुका ह्मणे नाहीं जाणत आणीक । तुजविण एक पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ३८५९ ॥

वैभवाचे धनी सकळ शरणागत । सत्यभावें चित्त अर्पिलें तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेदी उरों देव आपणांवेगळें । भावाचिया बळें ठायाठाव ॥ ध्रु ॥
जाणोनि नेणती अंगा आली दशा । मग होय इच्छा आपणे चि ॥ २ ॥
तुका ह्मणे बरे धाकट्याचें जिणें । माता स्तनपानें वाढविते ॥ ३ ॥

॥ ३८६० ॥

आह्मां देणें धरा सांगतों तें कानीं । चिंता पाय मनीं विठोबाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेणें माझें चित्त होय समाधान । विलास मिष्टान्न न लगे सोनें ॥ ध्रु ॥
व्रत एकादशी दारीं वृंदावन । कंठीं ल्या रे लेणें तुळसीमाळा ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याचे घरींची उष्टावळी । मज ते दिवाळी दसरा सण ॥ ३ ॥

---

१ दे. शरा.—२ पं. हें कडवें नाहीं.—३ त. भाषणाचिये.—४ पं. माझ्या चित्ता.

॥ ३८६१ ॥

आतां मी अनन्य येथें[1] अधिकारी । होईन[2] कोणे परी नेणें देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुराणींचा अर्थ ऐकतां मानस । होतो कासावीस जीव माझा ॥ध्रु॥
इंद्रियांचे आह्मी पांगिलों अंकित । त्यांच्या संगें चित्त रंगलें तें ॥ २ ॥
एकाचें ही जेथें[3] न घडे दमन । अवघीं नेमून कैसीं[4] राखों ॥ ३ ॥
तुका ह्मणे जरी मोकळिसी आतां । तरी मी अनंता वांयां गेलों ॥ ४ ॥

॥ ३८६२ ॥

आवडी धरोनी आलेती आकारा । केला हा पसारा याजसाटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तें मी तुझें नाम गाईन आवडी । क्षण, एक घडी विसंबेना ॥ध्रु॥
वर्म जाणावें[5] हा मुख्यधर्मसार । अवघे प्रकार[6] तयापासीं ॥ २ ॥
वेगळ्या[7] विचारें वेगळाले भाव । धरायासी ठाव बहु नाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे घालूं इच्छेचिये पोटीं । कवळुनी[8] धाकुटी मूर्ती जीवें ॥ ४ ॥

॥ ३८६३ ॥

भागलों मी आतां आपुल्या स्वभावें । कृपा करोनि देवें आश्वासीजे ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ देउनि आलिंगन प्रीतीच्या पाडिभरें[9] । अंगें हीं दातारें निववावीं ॥ध्रु॥
अमृताची दृष्टी घालूनियां वरी । शीतळ हा करीं जीव माझा ॥ २ ॥
घेई उचलूनि पुसें तानभूक । पुसीं माझें मुख पीतांबरें ॥ ३ ॥
बुझावोनि माझी धरीं हनुवटी[10] । ओवाळुनी दिठी करुनी सांडीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे बापा आहो विश्वंभरा । आतां कृपा करा ऐसी कांहीं ॥ ५ ॥

---

१ पं. त. नव्हे.—२ पं. होईल.—३ पं. मज.—४ पं. राखूं कैसी.—५ दे. धरावें.—६ पं. तया पोटीं.—७ पं. वेगळाल्या.—८ पं. कवतुकें.—९ पं. बैसोनियां.—१० दे. हनुवंटी.

॥ ३८६४ ॥

न सरे लुटितां मार्गें बहुतां जनीं । जुनाट हे खाणी उघडिली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सिद्ध महामुनि साधक संपन्न । तिंहीं हें जतन केलें होतें ॥ ध्रु
पायाळाच्या गुणें पडिलें ठाउकें । जगा पुंडलिकें दाखविलें ॥ २ ॥
तुका ह्मणे तेथें[1] होतों मी दुबळा । आलें या कपाळा थोडें बहु ॥ ३ ॥

॥ ३८६५ ॥

भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथें अनुभवाचा काय पंथ ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ वाढवुनी जेटा[2] फिरे दाही दिशा । तरी जंबुवेषा सहज स्थिति ॥ध्रु॥
कोरोनियां भूमी करिती[3] मर्दी वास । तरी उंदरास काय वाणी ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें कासया करावें[4] । देहासि दंडावें वाउगें चि ॥ ३ ॥

॥ ३८६६ ॥

धन्य दिवस आजि डोळियां लाधला । आनंद देखिला धणीवरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्य जालें मुख निवाली[4] रसना । नाम नारायणा घोष करूं ॥ध्रु
धन्य हें मस्तक सर्वांग[5] शोभलें । संताचीं पाउलें लागतातीं ॥ २ ॥
धन्य आजि पंथें चालतीं पाउलें । टाळिया[6] शोभले धन्य कर ॥ ३ ॥
धन्य तुका ह्मणे आह्मांसी फावलें । पावलों पाउलें विठोबाचीं ॥ ४ ॥

॥ ३८६७ ॥

बरवी हे वेळ सांपडली संधि । साह्य जाली बुद्धि संचितासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येगें पंथें माझीं चालिलीं पाउलें । दरुषण जालें संतां पायीं ॥ध्रु

---

१ दे. येथें होतों मी दुबळें । आलें या कपाळें०.—२ दे. त. चटा.—३ पं. मर्दी करी वास । त. मर्दी करिती वास ।.—४ पं रंगली.—५ पं. सर्वांगा.—६ दे. 'टाळिया शोभले०' व 'पावलों पाउलें०' या चारणांच्या जागा परस्पराशीं बदलल्या आहेत.

त्रासिलें दरिद्रें दोषा जाला खंड । त्या चि काळें पिंड पुनीत जाला ॥ २
तुका ह्मणे जाला अवघा व्यापार । आली वेरझार फळासी हे ॥ ३ ॥

॥ ३८६८ ॥

आपणा लागे काम वाण्याघरीं गुळ । त्याचे याति कुळ काय कीजे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उकरड्यावरी वाढली तुळसी । टाकावी ते कैसी ठायागुणें ॥ ध्रु ॥
गाईचा जो भक्ष अमंगळ खाय । तीचें दुध काय सेवूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे काय सलपटासी काज । फणसांतील बीज काढुनि घ्यावें ॥ ३

॥ ३८६९ ॥

जयासी नावडे वैष्णवांचा संग । जाणावा तो मांग जन्मांतरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अपवित्र वाचा जातीचा अधम । आचरण धर्म नाहीं जया ॥ ध्रु ॥
मंजुळवदनीं बचनागाची कांडी । शेवटीं विघडी जीवप्राणा ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्याचा पिता नाहीं शुद्ध । तयासी गोविंद अंतरला ॥ ३ ॥

॥ ३८७० ॥

वांझेनें दाविलें गरुहवार लक्षण । चिरगुटें घालून वाथयाला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेवीं शब्दज्ञानी करिती चावटी । ज्ञान पोटासाटीं विकूनियां ॥ ध्रु ॥
बोलाचि च कढी बोलाचा चि भात । जेवुनियां तृप्त कोण जाला ॥ २ ॥
कागदीं लिहितां नामाची साकर । चाटितां मधुर गोडी नेदी ॥ ३ ॥
तुका ह्मणे जळो जळो ते महंती । नाहीं लाज चित्तीं आठवग. ॥ ४ ॥

॥ ३८७१ ॥

तुझिया पाळणा ओढे माझें मन । गेलों विसरोन देहभाव ॥ १ ॥

---

१ पं. आपण्या.—२ त. ठाया गुण—३ प. सालपटासी.—४ पं. जन्मांतरींचा.—५ पं. सेवटीची घडी.—६ दे. त.० लक्षणें.—७ पं शब्द ज्ञानी.—८ पं. निसुगाला.

लागला पालट फेडणें उसणें । येणें चि प्रमाणें पांडुरंगा ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा जीव जैसा ओढे । तैसा चि तिकडे पाहिजेल ॥ ३ ॥

॥ ३८७२ ॥

मी दास तयांचा जयां चाड नाहीं । सुखदुःख दोहीं विरहित ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राहिलासे उभा भीवरेच्या तीरीं । कट दोहीं करीं धरोनियां ॥ ध्रु
नवल काय तरी पाचारितां पावे । न स्मरत[1] धांवे भक्तकाजा ॥ २ ॥
सर्व भार माझा त्यासी आहे चिंता । तो चि माझा दाता स्वहिताचा ॥३॥
तुका ह्मणे त्यासी गाईन मी गीतीं । आणीक तें चित्तीं न धरीं कांहीं ॥४॥

॥ ३८७३ ॥

जुंझायाच्या गोष्टी ऐकतां चि सुख । कांसिां हें[2] दुःख थोर आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसी हरिभक्ति सुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर
॥ ध्रु ॥
पिंड पोसिलियां विषयांचा पाइक । वैकुंठनायक कैंचा तेथें ॥ २ ॥
तुका ह्मणे व्हावें देहासी उदार । रुकुमादेवीवर जोडावया ॥ ३ ॥

॥ ३८७४ ॥

पाषाण प्रतिमा सोन्याच्या पादुका । हें हो[3] हातीं एका समर्थाचे ॥ १ ॥
अनामिका हातीं समर्थाचा सिक्का । न मानितां लोकां येइल कळों ॥२॥
तुका ह्मणे येथें दुराग्रह खोटा । आपुल्या अदृष्टा शरण जावें ॥ ३ ॥

॥ ३८७५ ॥

बहु या प्रपंचें भोगविल्या खाणी । टाकोनियां मनीं ठेविला सीण ॥ १ ॥

---

१ त. न संवरत. पं. न श्वरीता.--२ पं. देहे दुःख.--३ पं. तो.

॥ ध्रु. ॥ आतां पायांपाशीं लपवावें देवा । नको पाहूं सेवा भक्ती माझी ॥ध्रु॥
बहु भय वाटे एकाच्या बोभाटें । आली घायवटे फिरोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे सिगे भरूं आलें माप । वियोग संताप जाला तुझा ॥ ३ ॥

॥ ३८७६ ॥

धरूनियां मनीं बोलिलों संकल्प । होसी तरि बाप सिद्धी पावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उत्कंठा हे आजी जाली माझे पोटीं । मोकळिली गोष्टी टाळाटाळ ॥ ध्रु ॥
माझा मज असे ठाउका निर्धार । उपाधि उत्तर न साहे पैं ॥ २ ॥
तुका ह्मणे जरि दिली आठवण । तरि आभिमान धरीं याचा ॥ ३ ॥

॥ ३८७७ ॥

आजिवरी होतों संसाराचे हातीं । आतां ऐसें चित्तीं उपजलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुला शरणागत व्हावें नारायणा । अंगीकारा दिना आपुलिया ॥ध्रु॥
विसरलों काम याजसाटीं धंदा । सकळ गोविंदा माझें तुझें ॥ २ ॥
तुका ह्मणे विज्ञापना परिसावी । आवडी हे जीवीं जाली तैसी ॥ ३ ॥

॥ ३८७८ ॥

धन्यधन्य ज्यास पंढरीसी वास । धन्य ते जन्मास प्राणी आले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चहु खाणीमध्यें होत कोणी एक । त्रिगुण कीटक पक्षिराज ॥ध्रु॥
उत्तम चांडाळ नर नारी बाळ । अवघे चि सकळ चतुर्भुज ॥ २ ॥
अवघा विठ्ठल तेथें दुजा नाहीं । भरला अंतर्बाहीं सदोदीत ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेथें होउनी राहेन । सांडोवां पाषाण पंढरीचा ॥ ४ ॥

---

१ पं. आलीया.—२ पं. भरी आसें माप । आतां चुकवा पाप मागील तें.—३ पं. होसील.—४ पं. नेई.—५ पं. माझा.—६ पं. अंगीकारी.—७ दे. बहु.—८ दे. अर्तबाहिं. त. अंतरबाही.—९ दे. येथें.—१० त. साडोवा पाषाण.

॥ ३८७९ ॥

असंत लक्षण भूतांचा मत्सर । मनास निष्ठुर अतिवादी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतरीचा रंग उमटे बाहेरी । वोळखियापरी आपेंआप ॥ ध्रु ॥
संत ते समय वोळखती वेळ । संतुष्ट निर्मळ चित्त सदा ॥ २ ॥
तुका ह्मणे हित उचित अनुचित । मज लागे नित आचरावें ॥ ३ ॥

॥ ३८८० ॥

आतां काय खावें कोणीकडे जावें । गावांत रहावें कोण्या बळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोपला पाटील ये गांवींच्या लोकां । आतां मज भिका कोण घाली ॥ ध्रु ॥
आतां येणें चवी सांडिली ह्मणती । निवाडा करिती दिवाणांत ॥ २ ॥
भल्या लोकां यासी सांगितली मात । केला माझा घात दुर्बळाचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे याचा संग नव्हे भला । शोधीत विठ्ठला जाऊं आतां ॥ ४ ॥

॥ ३८८१ ॥

विठ्ठलावांचोनि ब्रह्म जें बोलती । वचन तें संतीं मानूं नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठलावांचूनी जेजे उपासना । अवघा चि जाणा संभ्रमु तो ॥ ध्रु ॥
विठ्ठलावांचूनि सांगतील गोष्टी । वांयां ते हिंपुटी होत जाणा ॥ २ ॥
विठ्ठलावांचूनि जें कांहीं जाणती । तितुल्या वित्पत्ति वाउगीया ॥ ३ ॥
तुका ह्मणे एक विठ्ठल चि खरा । येर तो पसारा यांउगा चि ॥ ४ ॥

॥ ३८८२ ॥

सर्व काळ डोळां बैसो नारायण । नयो अभिमान आड मध्यें ॥ १ ॥

---

१ पं. संतुष्ट.—२ पं. नित्य.—३ त. पं. गांवींचे हे लोक । आतां मज भीक०.—४ पं. लोकापासी सांगि०.—५ पं. श्रमचि.—६ पं. तितुक्या.

॥ ध्रु. ॥ धाड पडो तुझ्या[1] थोरपणावरि । वाचे नरहरि उच्चारीना ॥ ध्रु ॥
जळो अंतरींचें सर्व जाणपण । विवादवचन अहंतेचें ॥ २ ॥
सकळां चरणीं गळित माझा जीव । तुका ह्मणे भाव एकाविध ॥ ३ ॥

॥ ३८८३ ॥

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं धाड भाव[2] असो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्राणाविगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख बरा ॥ध्रु॥
जनानिंदा होय [3]तो बरा विचार । थोरवीचा भार कामा नये ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्तीं[4] भाव निष्ठावंत । दया क्षमा शांत[5] सर्वां भूतीं ॥ ३ ॥

॥ ३८८४ ॥

झाडा[6] वरपोनि खाऊनियां पाला । आठवी विठ्ठला वेळोवेळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वल्कलें नेसुनि ठुंगा[7] गुंडाळुनी । सांडी जवळुनी देहभान[8] ॥ध्रु॥
लोकमान, वमनासमान[9] मानणें । एकांतीं राहणें विठोसाटीं ॥ २ ॥
सहसा करूं नये प्रपंचीं सौजन्य । सेवावें अरण्य एकांतवास ॥ ३ ॥
ऐसा हा निर्धार करी जो मनाचा । तुका ह्मणे त्याचा पांग फिटे ॥ ४ ॥

॥ ३८८५ ॥

भक्तिभावें करी बैसोनि निश्चित । नको गोवूं चित्त प्रपंचासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक दृढ करीं[10] पंढरीचा राव । मग तुज उपाव पुढिल सुचे ॥ ध्रु ॥
नको करूं कांहीं देवतापूजन । जप तप ध्यान तें ही नको ॥ २ ॥
मानिसीलि झणी[11] आपलिक[12] कांहीं । येरझार पाहीं न चुके कदा ॥ ३ ॥
ऐसे जन्म किती पावलासी देहीं । अझूनि कां नाहीं कळली[13] सोय ॥ ४ ॥

---

१ पं. माझ्या.—२ पं. प्रेम.—३ पं. तो न करावा व्यापार.—४ पं. भाव निष्ठावंत चित्तीं.—५ पं. शांती.—६ पं. झाडें वोरपोनि.—७ पं. चिंधिया वेढुनी.—८ त. देहभाव. दे. देहभान जवळुनी.—९ पं. वमनसमान.—१० पं. धरीं.—११ त. जनी.—१२ पं. आपलीया.—१३ पं. नकळे.

सोय धरीं आतां होयें पां सावध । अनुभव आनंद आहे कैसा ॥ ५ ॥
सहज कैसें आहे तेथीचें तें[2] गुज । अनुभवें निज पाहे तुकीं ॥ ६ ॥
तुका ह्मणे आतां होई[1] तूं सावध । तोडीं भवबंध एका जन्में ॥ ७ ॥

॥ ३८८६ ॥

दोराच्या आधारें पर्वत चढला । पाउलासाटीं[3] केला अपघात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अष्टोत्तरशें व्याधि ज्या[4] वैद्यें[5] दवडुनी । तो वैद्य मारूनि उत्तीर्ण[6] जाला ॥ ध्रु ॥
नव मास माया वाइलें उदरीं । ते माता चौबारीं नग्न केली ॥ २ ॥
गायत्रीचें क्षीर पिळुनी घेउनी । उपवासी बांधोनी ताडन करी ॥ ३ ॥
तुका ह्मणे दासां निंदी त्याचें तोंड[7] । प्रह्लातां नरककुंड पूर्वजांसी ॥ ४ ॥

॥ ३८८७ ॥

न कळे ब्रह्मज्ञान आचार विचार । लटिका वेव्हार करीतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विश्वामित्री[8] पोटीं तयाचा अवतार । नांव महाखर चांडाळाचें ॥ ध्रु ॥
द्रव्यइच्छेसाटीं करीतसे कथा । काय त्या पापिष्ठा न मिळे खाया ॥ २ ॥
पोट पोसावया तोंडें बडबडी । नाहीं धडफुडी एक[9] गोष्टी ॥ ३ ॥
तुका ह्मणे तया काय व्याली रांड । येउनियां भंडें[10] जनामध्यें ॥ ४ ॥

॥ ३८८८ ॥

नित्य उठोनियां खायाचीच[11] चिंता । आपुल्या तूं हिता नाठवीसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जननीचे पोटीं उपजलासी जेव्हां । चिंता तुझी तेव्हां केली तेणें ॥ ध्रु ॥

---

१ पं. होई तू.—२ पं. हें.—३ पं. पाउलासी.—४ दे. ज्य. त. जे. पं. 'ज्या' नाहीं.—५ पं. वैद्य.—६ पं. "उत्तीर्ण जाला" याबद्दल उत्तीर्णता.—७ पं. गुरुनिंदकाचें तोंड.—८ पं. विश्वामित्र°. —९ पं. येकी.—१० पं. भांडं.—११ पं. खावयाची चिंता. दे. खायाची चिंता.

चातकां लागूनि मेघ नित्य वर्षे । तो तुज उदास करील केवीं ॥ २ ॥
पक्षी वनचरें आहेत भूमीवरि । तयांलागीं हरि उपेक्षीना ॥ ३ ॥
तुका ह्मणे भाव धरून राहें चित्तीं । तरि तो श्रीपति उपेक्षीना ॥ ४ ॥

॥ ३८८९ ॥

जेजे आळी केली तेते गेली वांयां । उरला पंढरिराया श्रम माझा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय समाधान केलें कोणे वेळे । कोणे[1] माझे लळे पाळियेले ॥ ध्रु ॥
अभ्यास[2] तो नाहीं स्वप्नीं ही दुश्चिता । प्रत्यक्ष बोलतां कैंचा[3] चि तो ॥ २ ॥
आतां पुढें लाज वाटे पांडुरंगा । भक्त ऐसें जगामाजी जालें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां नाहीं भरवसा । मोकलिसी ऐसा वाटतोसी ॥ ४ ॥

॥ ३८९० ॥

पूर्वीहूनि बहु भक्त सांभाळिले । नाहीं अव्हेरिले दास कोणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेजे शरण आले तेते आपंगिले । पवाडे विठ्ठले ऐसे तुझे ॥ ध्रु ॥
मिरवे[4] चरणीं ऐसीये गोष्टीचें । भक्तसांभाळाचें ब्रीदें[5] ऐसें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मांसाटीं येणें रूपा । माझ्या मायबापा पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३८९१ ॥

दर्दुराचें पिलुं ह्मणे रामराम । नाहीं उदक उष्ण होऊं दिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कढेमाजी बाळ करी तळमळ । गोविंद गोपाळ पावें वेगीं ॥ ध्रु ॥
आज्ञा तये काळीं केली पावकासी । झणी पिलीयासी तापवीसी ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझे ऐसे हे पवाडे । वर्णितां निवाडे सुख वाटे ॥ ३ ॥

---

१ दे. त. कोणें.—२ पं. आभास.—३ पं. कैचा तो.—४ पं. मिरवी चरणी ब्रीद ऐसियां गोष्टीचें.—५ पं. प्रेम.

॥ ३८९२ ॥

करुणा बहुत तुझिया अंतरीं । मज विश्वंभरा केळीं आलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पक्षीयासी तुझें नाम जें ठेविलें । तेयें[1] उद्धारिलें गणिकेसी ॥ ध्रु॥
कुंटिणी ते दोषें[2] बहु आचरली । नाम घेतां आली करुणा तुज ॥ २ ॥
त्हृदय कोमळ तुझें नारायणा । ऐसें बहुता जनां तारियेलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे सीमा नाहीं तुझे दये । कोमळ त्हृदय पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ३८९३ ॥

आजामीळ[3] अंत मरणासी आला । तोंवरि स्मरला नाहीं तुज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्राण जातेवेळे ह्मणे नारायण । त्यासाटीं विमान पाठविलें ॥ध्रु॥
बहुत कृपाळु होसी जगन्नाथा । त्रैलोक्यसमर्था सोइरिया ॥ २ ॥
तुका ह्मणे भक्तकाज तूं कैवारी । तुज साही चारी वर्णिताती ॥ ३ ॥

॥ ३८९४ ॥

धर्म रक्षावया अवतार घेशी । आपुल्या पाळिसी भक्तजना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंबऋषीसाटीं जन्म सोसियेलें[4] । दुष्ट निर्दाळिले किती एक ॥ध्रु॥
धन्य तुज कृपासिंधु ह्मणतील । आपुला तूं[5] बोल साच करीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज वर्णिती पुराणें । होय नारायण[6] दयासिंधु ॥ ३ ॥

॥ ३८९५ ॥

येउनी जाउनी पाहें तुजकडे । पडिल्या सांकडें नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक कोणाचा मज नाहीं आधार । तुजवरि भार जीवें भावें ॥ध्रु॥
निष्ठुर अथवा होई तूं कृपाळ । तुज सर्वकाळ विसरेंना ॥ २ ॥

---

१ पं. तिये.—२ पं. °ते बहु दोष आच०.—३ त. दे. आजामेळा.—४ दे. त. सोसियेलें.—५ पं. तो.—६ दे. नारायणें.

आपुलें वचन राहावें सांभाळून । तुह्मां आह्मां जाण पडिपाडु ॥ ३ ॥
ज्याच्या वचनासी अंतर पडेल । बोल तो होईल तयाकडे ॥ ४ ॥
तुह्मां आह्मां तैसें नाहीं ह्मणे तुका । होशील तूं सखा जीवलग ॥ ५ ॥

॥ ३८९६ ॥

आइक नारायणा वचन माझें खरें । सांगतों निर्धारें तुजपासीं ॥ १ ॥
नाहीं भाव मज पडिली लोकलाज । राहिलेंसे काज तुझे पायीं ॥ २ ॥
जरि तुज कांहीं करणें उचित । तारीं तूं पतित तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३८९७ ॥

अनाथ परदेशी हीन दीन भोळें । उगलें चि लोळे तुझे रंगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलें ह्मणावें मज नुपेक्षावें । प्रेमसुख द्यावें मायबापा ॥ ध्रु ॥
कासवीचे परि दृष्टी पाहें मज । विज्ञानीं उमज दावुनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझा जालों शरणागत । काया वाचा चित्त दुजें नाहीं ॥ ३ ॥

॥ ३८९८ ॥

पावलों पंढरी वैकुंठभुवन । धन्य आजि दिन सोनियाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पावलों पंढरी आनंदगजरें । वाजतील तुरें शंख भेरी ॥ ध्रु ॥
पावलों पंढरी क्षेमआलिंगनीं । संत या सज्जनीं निवविलें ॥ २ ॥
पावलों पंढरी पार नाहीं सुखा । भेटला हा सखा मायबाप ॥ ३ ॥
पावलों पंढरी येरझार खुंटली । माउली वोळली प्रेमपान्हा ॥ ४ ॥
पावलों पंढरी आपुलें माहेर । नाहीं संवसार तुका ह्मणे ॥ ५ ॥

---

१ पं. हा.—२ दे. दक्षी.—३ पं. निववीलों.

॥ ३८९९ ॥

अभयदान मज देई गा उदारा । कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं । आणीक मी कांहीं नेणें दुजें ॥ध्रु॥
सेवा भक्ति भाव नेणें मी पतित । आतां माझें हित तुझ्या पायीं ॥ २ ॥
अवघा निरोपिला तुज देहभाव । आतां मज पाव पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझें नाम दिनानाथ । तें मज उचित करीं आतां ॥ ४ ॥

॥ ३९०० ॥

लागो तुझी सोय ऐसे कोणी[1] करी । माझे विठाबाई जननिये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पतितपावन ह्मणविसी जरी । आवरण[3] करीं तरी माझें ॥ ध्रु ॥
नाहीं तरी ब्रीद टाकीं सोडूनियां । न धरिसी माया जरी माझी ॥ २ ॥
बोलिला तो बोल करावा साचार । तरि लोक बरें ह्मणतील ॥ ३ ॥
करावा संसार लोक लाजे भेणें । वचनासी उणें येऊं नेदीं ॥ ४ ॥
तुह्मां आह्मां तैसें नाहीं ह्मणे तुका । होशील तूं सखा जीवलग ॥ ५ ॥

॥ ३९०१ ॥

तूं आह्मां सोयरा सज्जन सांगाति । तुजलागीं प्रीति चालो सदा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तूं माझा जिव्हाळा जीवाचा जिवलग । होसी अंतरंग अंतरींचा ॥ ध्रु ॥
गुण गोत मित्र तूं माझें जीवन । अनन्यशरण तुझ्या पायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्वगुणें तुझा दास । आवडे अभ्यास सदा तुझा ॥ ३ ॥

---

१ त. ऐसें कोणी करी । लागो तुझी सोई ।. पं. लागे.—२ पं. करी कांहीं.—३ पं. अव्हेरु न करीं तरी माझा ।.—४ दे. चालीतप्त.

॥ ३९०२ ॥

आवडेल तैसें तुज आळवीन । वाटे समाधान जीवा तैसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं येथें कांहीं लौकिकाची चाड । तुजविण गोड देवराया ॥ ध्रु ॥
पुरवीं मनोरथ अंतरींचें आर्त । धायेवारि गीत गाईं तुझे ॥ २ ॥
तुका ह्मणे लेंकी आळवी माहेरा । गाऊं या संसारा तुज तैसें ॥ ३ ॥

॥ ३९०३ ॥

माझें मुख नामीं रंगो सर्वकाळ । गोविंद गोपाळ राम कृष्ण ॥ १ ॥
अबद्ध चांगलें गाऊं भलतैसें । केळलें हें जैसें मायबापा ॥ २ ॥
तुका ह्मणे मज न लगे वांकडें । मी तुझें बोलडें बाळ तान्हें ॥ ३ ॥

॥ ३९०४ ॥

यालागीं आवडी ह्मणा राम कृष्ण । जोडा नारायण सर्वकाळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सोपें हें साधन लाभ येतो घरा । वाचेसी उच्चारा राम हरि ॥ ध्रु ॥
न लगती कष्ट न लगे सायास । करावा अभ्यास विठ्ठलाचा ॥ २ ॥
न लगे तप तीर्थ करणें महादान । केल्या एक मन जोडे हरि ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं न वेचितां धन । जोडे नारायण नामासाटीं ॥ ४ ॥

॥ ३९०५ ॥

झांकूनियां नेत्र काय जपतोसी । जों नाहीं मानसीं प्रेमभाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रामनाम ह्मणा उघड मंत्र जाणा । चुकती यातना गर्भवास ॥ ध्रु ॥
मंत्र यंत्र संध्या करिसी जडीबुटी । तेणें भूतसृष्टी पावसील ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐक सुंदर मंत्र एक । भवसिंधुतारक रामनाम ॥ ३ ॥

---

१ पं. वाकुडें.—२ पं. वाळ वदे जैसें मायबापा.—३ त. दे. जंव.—४ पं. रामकृष्ण ह्मणा उघडा०.

॥ ३९०६ ॥

पापिया चांडाळा हरिकथा नावडे । विषयांलागीं[1] आवडे गाणें त्याला ॥१॥
॥ ध्रु.॥ ब्राह्मणा दक्षणा देतां रडे रुका । विषयालागीं फुका लुटीतसे[2] ॥ध्रु॥
वीतभरि लंगोटी नेदी अतीताला । खीरम्या[3] देतो शाला भोरप्यासी ॥२॥
तुका ह्मणे त्याच्या थुंका तोंडावरि । जातो यमपुरीं भोगावया ॥ ३ ॥

॥ ३९०७ ॥

क्षुधार्थी[4] अन्नें दुष्काळें पीडिलें । मिष्टान्न देखिलें तेणें जैसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें तुझे पायीं लांचावलें मन । झुरे माझा प्राण भेटावया ॥ध्रु॥
मांजरें देखिला लोणियांचा गोळा । लाळुनियां डोळा बैसलेंसे ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां झडी घालूं पाहें । पांडुरंगे माये तुझे पायीं ॥ ३ ॥

॥ ३९०८ ॥

स्वामीसी संकट पडे जे गोष्टीचें । काय त्या प्रेमाचें सुख मज ॥ १ ॥
॥ध्रु.॥ दुःखवीना चित्त तुझें नारायणा । कांहीं च मागेना तुजपासीं ॥ध्रु॥
रिद्धि सिद्धि मोक्ष संपत्ति विलास । सोडियेली आस याची जीवें ॥ २॥
तुका ह्मणे एके वेळे देईं भेटी । वोरसोनि पोटीं आलिंगावें ॥ ३ ॥

॥ ३९०९ ॥

देव तिहीं बळें धरिला सोयासें[5] । करूनियां नास उपाधीचा ॥ १ ॥
पर्वपक्षी[6] धातु धिःकारिलें जन । स्वयें जनार्दन ते चि जाले ॥ २ ॥
तुका ह्मणे यासी न चले तांतडी । अनुभवें गोडी येइल कळों ॥ ३ ॥

---

१ पं. विषयीं आवडे.—२ पं. लुटी धन.—३ पं. भोरप्यासी शाला वाटीतसे ।.—४ दे. क्षुधारथी. पं. क्षधार्थी दुष्काळ अन्ने पीडियेले.—५ पं. सायास.—६ पं. पूर्वपक्ष.

॥ ३९१० ॥

भेटीवांचोनियां दुजें नाहीं चित्तीं । येणें काकुलती याजसाटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भेटोनियां बोलें आवडीचें गुज । आनंदाच्या भोजें जेवूं संगें ॥ध्रु॥
मायलेकरासी नाहीं दुजी परि । जेऊं बरोबरी बैसोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें अंतरींचें आर्त । यावें जी त्वरित नारायणा ॥ ३ ॥

॥ ३९११ ॥

आमिषाचे आसे गळ गिळी मासा । फुटोनियां घसा मरण पावे ॥ १ ॥
मरणाचे वेळे करी तळमळ । आठवी कृपाळ तये वेळीं ॥ २ ॥
अंतकाळीं ज्याच्या नाम आलें मुखा । तुका ह्मणे सुखा पार नाहीं ॥ ३ ॥

॥ ३९१२ ॥

जायाचें शरीर जाईल क्षणांत । कां हा गोपिनाथ पावे चि ना ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तुह्मी संत सारे कृपेचे सागर । माझा निरोप फार सांगा देवा ॥ध्रु॥
अनाथ अज्ञान कोणी नाहीं त्याला । पायापें विठ्ठला ठेवीं मज ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें करावें निर्वाण । मग तो रक्षण करिल माझें ॥ ३ ॥

॥ ३९१३ ॥

त्रासला हा जीव संसारींच्या सुखा । तुजविण सखा नाहीं कोणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें माझे मनीं वाटे नारायणा । घालावी चरणावरि मिठी ॥ध्रु॥
कइं तें सुंदर देखोनि रूपडें । आवडीच्या कोडें आळंगीन ॥ २ ॥
नाहीं पूर्व पुण्य मज पापरासी । ह्मणोनी पायांसी अंतरलों ॥ ३ ॥
अलभ्य लाभ कैंचा संचितावेगळा । विनवी गोपाळा दास तुका ॥ ४ ॥

---

१ द. त. पं. आविसाचे.—२ त. दे. कृपेचे सागर तुह्मी संत सारें । निरोप हा फार सांगा देवा ॥.—३ दे. त्यासि.—४ पं. ऐसी करा निरवण ।.—५ पं. देखेन.—६ पं. पामरासी.

॥ ३९१४ ॥

मोलाचें आयुष्य वेचुनियां जाय । पूर्वपुण्यें होय लाभ याचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनंतजन्मींचे[1] शेवट पाहतां । नर देह हातां आला तुझ्या ॥ध्रु॥
कराल ते जोडी येईल कार्यासी । ध्यावें विठ्ठलासी सुखालागीं ॥ २ ॥
सांचलिया धन होईल ठेवणें । तैसा नारायण जोडी करा ॥ ३ ॥
करा हरिभक्ती परलोकीं ये[2] कामा । सोडवील यमापासोनियां ॥ ४ ॥
तुका ह्मणे करा आयुष्याचें मोल । नका वेचूं बोल नामेंविण ॥ ५ ॥

॥ ३९१५ ॥

काय सुख आहे वाउगें बोलतां । ध्यातां पंढरिनाथा कष्ट नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्वकाळ[3] वाचे उच्चारितां हरि । तया सुखा सरि पाड नाहीं ॥ध्रु॥
रामकृष्णरंगीं[4] रसना रंगली । अमृताची उकळी नाम तुझें ॥ २ ॥
तुका ह्मणे धन्य तयाचें वदन । जया नारायण ध्यानीं मनीं ॥ ३ ॥

॥ ३९१६ ॥

कीर्त्तनाच्या सुखें सुखी होय देव । पंढरीचा राव संगीं आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भक्त जाय[5] सदा हरि कीर्ति गात । त्यांसवें[6] अनंत हिंडतसे ॥ ध्रु ॥
त्रैलोक्य भ्रमण फिरत नारद । त्यांसंगें[7] गोविंद फिरतसे ॥ २ ॥
नारद मंजुळ सुस्वरें गीत गाये । मार्गीं चालताहे संगें हरि ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्याला गोडी कीर्त्तनाची । नाहीं आणिकांची प्रीति ऐसी ॥ ४॥

॥ ३९१७ ॥

बाळेंविण माय क्षणभरि न राहे । न देखतां होये कासाविस ॥ १ ॥

---

१ पं. अनंता जन्मींचा.—२ 'ये' नाहीं.—३ पं. 'सर्वकाळ'० हें कडवें 'रामकृष्ण रंगीं' या 'कडव्याच्या मागून आहे.—४ पं. रामकृष्ण रसीं.—५ पं. जाई.—६ दे. नित्यसेवे.—७ पं. त्यासवें.

॥ ध्रु. ॥ आणिक उदंड बुझाविती ज़री । छंद त्या अंतरीं माउलीचा ॥ ध्रु ॥
नावडती तया बोल आणिकाचे । देखोनियां नाचे माय दृष्टी ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी विठ्ठल माउली । आणिकांचे बोलीं चाड नाहीं ॥ ३ ॥

॥ ३९१८ ॥

हरिचिया भक्ता नाहीं भयचिंता । दुःखनिवारिता नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे वाहणें संसारउद्वेग । जडों नेदी पांग देवराया[1] ॥ ध्रु ॥
असों[2] द्यावा धीर सदा समाधान । आहे नारायण जवळी च ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा सखा पांडुरंग । व्यापियेलें जग तेणें एकें ॥ ३ ॥

॥ ३९१९ ॥

दसरा दिवाळी तो चि आह्मां सुण[3] । सखे संतजन[4] भेटतील ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आमुप ज़ोडल्या सुखाचिया राशी[5] । पार या भाग्यासी न दिसे आतां ॥ ध्रु ॥
धन्य दिवस आजि जाला सोनियाचा । पिकली हे वाचा रामनामें ॥ २ ॥
तुका[6] ह्मणे काय होऊं उतराई । जीव ठेऊं पायीं संतांचिये ॥ ३ ॥

॥ ३९२० ॥

खिस्तीचा उदीम[7] ब्राह्मण कलयुगीं । महारवाडीं मांगीं हिंडतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेवसाव करितां[8] पर्वत मांगासी । ते पैं विटाळासी न मानिती[9] ॥ ध्रु ॥
मांगिणीशीं नित्य करीतसे लेखा । तोंडावरि थुंका पडतसे ॥ २ ॥
आशा माया रांडा नांव हें कागदीं । आठवीना कधीं नारायण ॥ ३ ॥
तुका ह्मणे देह जाला[10] पराधीन । पांडुरंगाविण गति नाहीं ॥ ४ ॥

---

१ पं. देवराव.—२ पं. 'असों द्यावा०' हें कडवें नाहीं.—३ दे. सन.—४ पं. हरिजन.—५ पं. पुण्याचिया रासी । पार त्या भाग्यासी नाहीं लेखा ।.—६ पं. 'तुका ह्मणे०' या कडव्याच्या अगोदर 'दुःख हें दारिद्र गेलें हारपोनी । मशक होउनि ठेला काळ ॥' हें कडवें अधिक आहे.—७ पं. °उदीम उदिमांत हीण । करिती ब्राह्मण कलयुगीं ।.—८ पं. करी.—९ पं. मानिती.—१० दे. पं. जालें.

॥ ३९२१ ॥

[1]अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार । हिंडे [2]घरोघर चांडाळाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंत्यजा[3] खिचडी घेताती मागून । [4]गांळियाप्रदान मायबहिणी ॥ध्रु॥
उत्तमकुळीं जन्म क्रिया अमंगळ । बुडविलें कुळ उभयतां ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसी कलयुगाची चाली । स्वार्थें बुडविलीं आचरणें ॥ ३ ॥

॥ ३९२२ ॥

हा चि माझा नेम धरिला हो[5] धंदा । यावरि गोविंदा भेटी द्यावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हा चि माझा ध्यास सदा सर्वकाळ । न्यावयासी मळ येसी कधीं ॥ ध्रु ॥
डोळियांची भूक पहातां श्रीमुख । आलिंगणें सुख निवती भुजा ॥ २ ॥
बहु चित्त ओढे तयाचिये सोई । पुरला हा कांहीं[6] नवस नेणें ॥ ३ ॥
बहुबहु[7] काळ जालों कासावीस । वाहिलें बहुवस कळेवर ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां पाडावें[7] हें ओझें । पांडुरंगा माझें इयावरि ॥ ५ ॥

॥ ३९२३ ॥

जेणें माझें हित होइल तो उपाव । करिसील भाव जाणोनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज नाहीं सुख दुःख तया खंती । भावना हे चित्तीं नाना छंदें ॥ध्रु॥
तोडीं हे संबंध तोडीं आशापाश । मज हो साथास न करितां ॥ २ ॥
तुका ह्मणे मी तों राहिलों निश्चित[8] । कवळोनि एकांतसुख तुझें ॥ ३ ॥

॥ ३९२४ ॥

शिखा सूत्र तुझा गुंतला जमान । संववारि तूं जाण श्रुतिदास ॥ १ ॥

---

१ दे. जगीं.—२ त. दारोदार.—३ पं. अंत्यजाची. दे. आंतेजा.—४ दे. गाळिप्रधानि.—५ पं. हा.—६ पं. काई दिवस.—७ पं. पडावें.—८ पं. निश्चित.

॥ ध्रु. ॥ त्याची तुज कांहीं चुकतां झि नीत । होसील पतित नरकवासी ॥ ध्रु ॥
बहुत जालासी चतुर शाहणा । शुद्ध आचरणा चुकों नको ॥ २ ॥
शिखा सूत्र याचा तोडीं तूं संबंध । मग तुज बाध नाहीं नाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तरि वर्त्तूनि निराळा । उमटती कळा ब्रह्मींचिया ॥ ४ ॥

॥ ३९२५ ॥

पतिव्रता ऐसी जगामध्यें मात । भोगी पांच सात अंधारीं ते ॥ १ ॥
भ्रतारासी लेखी श्वानाचे समान । परपुरुषीं जाण संभ्रम तो ॥ २ ॥
तुका ह्मणे तिच्या दोषा नाहीं पार । भोगील अघोर कुंभपाक ॥ ३ ॥

॥ ३९२६ ॥

सिंदळीसी नाहीं पोराची पैं आस । राहे बीज त्यास काय करी ॥ १ ॥
अथवा सेतीं बीज पेरिलें भाजोन । सारा देइल कोण काका त्याचा ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं खायाची तें चाड । तरि कां लिगाड करुनी घेतो ॥ ३ ॥

॥ ३९२७ ॥

संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाये विठोबाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येणें होय सर्व संसार सुखाचा । न लगे दुःखाचा लेश कांहीं ॥ ध्रु ॥
घेतील तयांसी सोपें आहे सुख । बोलियेले मुखें नारायण ॥ २ ॥
सांगितली सोय करुणासागरें । तुह्मां कां हो बरें न वाटे तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेणें उपकार केला । भोळ्याभाविकाला तरावया ॥ ४ ॥

---

१ पं. बहु तूं जालासी. दे. बहु जालासी.—२ पं. भोगीते.—३ दे. त. सांटविल्याबीजास.—४ पं. राखायाची चाड.—५ दे. त. घेतोस.—६ दे. तुका ह्मणे बरें. तं. तुह्माला कांहो बरें.—७ पं. वाटतें.—८ दे. केला उपकार. ९ पं. तरायासी.

॥ ३९२८ ॥

चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलविते हरीविण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देखवी दाखवी[1] एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥ध्रु॥
मानसाची देव चालवी अहंता । मी चि एक कर्त्ता ह्मणोनियां[2] ॥ २ ॥
वृक्षाचें[3] ही पान हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ॥ ३ ॥
तुका ह्मणे विठो भरला सर्वांहीं[4] । तया उणें कांहीं चराचरीं ॥ ४ ॥

॥ ३९२९ ॥

मायारूपें ऐसें मोहिलेंसे[5] जन । भोगिती पतन नानाकर्मे[6] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय याची[7] प्रीती करितां आदर । दुरावितां दूर तें चि भलें ॥ध्रु॥
नाना छंद अंगीं बैसती विकार । छळियेले फार तपोनिधि ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें सिकवितों तुज । आतां धरीं लाज मना पुढें ॥ ३ ॥

॥ ३९३० ॥

जेजे कांहीं मज होईल वासना । तेते नारायणा व्हावें तुह्मीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय भाव एक निवडूं निराळा । जाणसी तूं कळा अंतरींची ॥ध्रु॥
तुजविण मज कोण आहे सखा । जें सांगों[7] आणिकां जीवभाव ॥ २ ॥
अवघें पिशुन जालें असे जन । आपपर कोण नाठवे हें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तूं चि जीवांचें जीवन । माझें समाधान तुझे हातीं ॥ ४ ॥

॥ ३९३१ ॥

कैसी करूं आतां सांग तुझी सेवा । शब्दज्ञानें देवा नाश केला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां तुझें वर्म न कळे अनंता । तुज न संगतां[8] बुडूं पाहें ॥ ध्रु ॥

---

१ पं. ऐकवी.—२ पं. ह्मणों नये.—३ दे. त. वृक्षाचीं हीं पानें.—४ पं. सबाह्य । उणें काय आहे चराचरीं. त. सवाही । उणा कोठें आहे चराचरीं.—५ पं. मोहियेलें.—६ पं. त्याची.—७ दे. सांगा.—८ पं. सांगतां.—९ दे. बहु.

संध्या स्नान केली आचाराची नासी । काय तयापासीं ह्मणती एक ॥ २ ॥
बुडविली भक्ति ह्मणती[1] पाषाण । पिंडाचें पाळणं स्थापुनियां ॥ ३ ॥
न करावी कथा ह्मणती एकादशी । भजनाची नासी[2] मांडियेलीं ॥ ४ ॥
न जावें देउळा ह्मणती देवघरीं । बुडविलें या परी तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ३९३२ ॥

नमोनमो तुज माझें हें कारण । काय जालें उणें करितां स्नान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संतांचा मारग चालतों झाडूनि[3] । हो का लाभ हानि कांहींतरि ॥ ध्रु ॥
न करिसी तरि हें चि कोडें मज । भक्ति गोड काज आणीक नाहीं ॥ २ ॥
करीं सेवा कथा गाचेन रंगणीं । प्रेमसुखधणी पुरेल तों ॥ ३ ॥
महाद्वारीं सुख वैष्णवांचे मेळीं । वैकुंठ जवळी वसे तेथें ॥ ४ ॥
तुका ह्मणे नाहीं मुक्तिसवें चाड । हें चि जन्म गोड घेतां मज ॥ ५ ॥

॥ ३९३३ ॥

होऊनि संन्यासी भगवीं लुगडीं । वासना न सोडी विषयांची ॥ १ ॥
निंदिती कदान्न इच्छिती देवान्न । पाहाताती मान आदराचा ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें दांभिक भजन । तया जनार्दन भेटे केवीं ॥ ३ ॥

॥ ३९३४ ॥

लांबवूनि जटा नेसोनि कासोटा । अभिमान मोटा करिताती ॥ १ ॥
सर्वांगा करिती विभूतिलेपन । पाहाती मिष्टान्न भक्षावया ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यांचा नव्हे हा स्वधर्म । न कळतां वर्म मिथ्यावाद ॥ ३ ॥

---

१ दे. पं. ह्मणीते.—२ पं. निशी.—३ दे. सांडूनि.

॥ ३९३५ ॥

कान फाडूनियां मुद्रा ते घालिती । नाथ ह्मणविती जगामाजी ॥ १ ॥
घालोनियां फेरा मागती द्रव्यासी । परि शंकरासी नोळखती ॥ २ ॥
पोट भरावया शिकती उपाय । तुका ह्मणे जाय नर्क लोका ॥ ३ ॥

॥ ३९३६ ॥

कौडीकौडीसाटीं[1] फोडिताती शिर । काढूनि रुधिर मलंग ते ॥ १ ॥
पांघरती चर्म लोहाची सांकळी । मारिती आरोळी धैर्यबळें ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यांचा नव्हे चि स्वधर्म । न कळे चि वर्म गोविंदाचें ॥ ३ ॥

॥ ३९३७ ॥

दाढी डोई मुंडी मुंडुनियां सर्व । पांघुरती बरवें वस्त्र काळें ॥ १ ॥
उफराटी काठी घेउनियां हातीं । उपदेश देती सर्वत्रासी ॥ २ ॥
चाळवुनी रांडा देउनियां भेष । तुका ह्मणे त्यास यम दंडी ॥ ३ ॥

॥ ३९३८ ॥

होउनी जंगम विभूती लाविती । शंख वाजविती घरोघरीं ॥ १ ॥
शिवाचें निर्माल्य तीर्था न सेविती । घंटा वाजविती पोटासाटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यासी नाहीं शिवभक्ति । व्यापार करिती संसाराचा ॥ ३ ॥

॥ ३९३९ ॥

लावूनियां मुद्रा बांधोनियां कंठीं । हिंडे पोटासाटीं देशोदेशीं ॥ १ ॥
नेसोनि कोपीन शुभ्रवर्ण जाण[2] । पहाती पक्वान्न क्षेत्रींचें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे मावेचे मइंद । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ३ ॥

---

१ त. कवडीकवडीसाटीं. दे. कडवीकडीसाटीं.—२ पं. नेसोनियां कौपीन शुभ्र वस्त्र जाणा ।

॥ ३९४० ॥

ऐसे नाना भेष घेउनी, हिंडती । पोटासाटीं घेती प्रतिग्रह ॥ १ ॥
परमार्थासी कोण त्यजी संवसार । सांगापा साचार नांव त्याचें ॥२॥
जन्मतां संसार त्यजियेला शुकें । तोचि निष्कळंक तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३९४१ ॥

स्त्रिया पुत्र कळत्र हें तंव मायावंत । शेवटींचा अंत नाहीं कोणी ॥ १ ॥
यमाचिये हातीं बांधोनियां देती । भूषणें ही घेती काढूनियां ॥ २ ॥
ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास । धरिली तुझी कास तुका ह्मणे ॥३ ॥

॥ ३९४२ ॥

नें लगती मज शब्दब्रह्मज्ञान । तुझिया दर्शनावांचूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि तुझें करितों चिंतन । नावडे वचन आणिकांचें ॥ ध्रु ॥
काय ते महत्वीं करावी मान्यता । तुज न देखतां पांडुरंगा ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज दिधल्यावांचूनि । न राहे त्याहूनि होइन वेडा ॥ ३ ॥

॥ ३९४३ ॥

तुझा ह्मणोनियां दिसतों गा दीन । हा चि अभिमान सरे तुझा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अज्ञान बाळका कोपली जननी । तयासी निर्वाणीं कोण पावे॥ध्रु॥
तैसा विठो तुजविण परदेशी । नको या दुःखासीं गोऊं मज ॥ २ ॥
तुका ह्मणे मज सर्व तुझी आशा । अगा जगदीशा पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३९४४ ॥

जन्म मृत्यु फार जाले माझ्या जीवा । एक माझा धांवा पांडुरंगा ॥ १ ॥

---

१ पं. सांगपा. दे. सांगापां.—२ त. पांडुरंगा.—३ पं. नलगे तें मज.—४ पं. महत्वें. दे. त. महत्वी.—५ पं. देतां.—६ पं. भेटल्या०.—७ पं. याहुनी.

सिणलों बहुत करितां येरझारा। रखुमाईच्या वरा पावें वेगीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तूं गा पतितपावन । घेई माझा सीण जन्मांतर ॥ ३ ॥

॥ ३९४५ ॥

आतां माझ्या दुःखा कोण होसांगाती। रखुमाईचा पति पाते चि ना ॥१॥
कायाविधा त्यानें घातलीसे रेखा। सुटका या दुःखा न होय चि ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी विसरूं नेको चिंता । अगा पंढरिनाथा पाव वेगी॥३॥

॥ ३९४६ ॥

पंढरीसी जावें ऐसें माझे मनीं । विठाई जननी भेटे केव्हां ॥ १ ॥
न लगे त्याविण सुखाचा सोहळा । लागे मज ज्वाळा अग्निचिया ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याचे पाहिलिया पाय । मग दुःख जाय सर्व माझें ॥ ३ ॥

॥ ३९४७ ॥

तन मन धन दिलें पंढरिराया । आतां सांगावया उरलें नाहीं ॥ १ ॥
अर्थचाड चिंता नाहीं मनीं आशा । तोडियेला फांसा उपाधीचा ॥२ ॥
तुका ह्मणे एक विठोबाचें नाम । आहे जवळी दाम नाहीं रुका ॥३ ॥

॥ ३९४८ ॥

आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देह हें देवाचें धन कुबेराचें । तेथें मनुष्याचें काय आहे ॥ ध्रु॥
देता देविता नेता नेविता । येथें याची सत्ता काय आहे ॥ २ ॥
निमित्याचा धनी केला असे प्राणी । माझेंमाझें ह्मणोनि व्यर्थ गेला ॥ ३ ॥
तुका ह्मणे कां रे नाशवंतासाटीं । देवासवें आटी पाडितोसी ॥ ४ ॥

---

१ दे. माझा.—२ पं. नका.—३ पं. आर्त चाड.—४ पं. काळाचें.—५ पं. येथें.—६ दे. त. येथ.—७ दे. झणी.—८ पं. तुका ह्मणे मी ह्मणोनि व्यर्थ गेला।.—९ पं. 'तुका ह्मणे कां रे०' हें कडवें नाहीं. त. 'तुका ह्मणे देव जोडलीया साटीं । न लगे आटाआटी करणें कांहीं,' असें आहे.

॥ ३९४९ ॥

माय वेनीं धाल्या धाये[1] । गर्भ आंवतणें न पाहें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें पूजितां वैष्णव । सुखें संतोषतो देव ॥ ध्रु ॥
पुत्राच्या विजयें । पिता सुखातें जाये ॥ २ ॥
तुका ह्मणे अमृतसिद्धि । हरे क्षुधा आणि व्याधि ॥ ३ ॥

॥ ३९५० ॥

तुझें[3] अंगभूत । आह्मी जाणतों समस्त ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येरा वाटतसे जना । गुढारसें नारायणा ॥ ध्रु ॥
ठावा थारा मारा । घरचिया[4] संवे चोरा ॥ २ ॥
तुका ह्मणे भेदा[5] । करुनि करितों संवादा ॥ ३ ॥

॥ ३९५१ ॥

तुज दिला देह । आजूनि वागवितों भय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा विश्वासघातकी । घडली कळतां हे चुकी ॥ ध्रु ॥
बोलतों जें तोंडें । नाहीं अनुभविलें लंडें ॥ २ ॥
दंड लाहे केला । तुका ह्मणे जी विठ्ठला ॥ ३ ॥

॥ ३९५२ ॥

माते[6] लेकरांत भिन्न । नाहीं उत्तरांचा सीणें[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धाडींधाडीं वो भातुकें । रंजविल्याचें कौतुकें ॥ ध्रु ॥
करुनि नवल । याचे बोलिलों ते बोल ॥ २ ॥
तुका ह्मणे माते । पांडुरंगे कृपावंते ॥ ३ ॥

---

१ त. माहे.—२ वणी.—३ त. तुझीं अंग भूतें । आह्मी जाणतों समस्तें ॥.—४ दे. परचिया. त. असे घरचिया०.—५ पं. भेदाभेद । करुनि करितसे वाद ॥.—६ पं. मात.—७ दे. सीन

॥ ३९५३ ॥

जरि न भरे पोट । तरि सेवूं दरकूट ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ परि न पालूं तुज भार । हा चि आमुचा निर्धार ॥ ध्रु ॥

तुझें नाम अमोलिक । नेणती हे ब्रह्मादिक ॥ २ ॥

ऐसें नाम तुझें खरें । तुका ह्मणे भासे पुरें ॥ ३ ॥

॥ ३९५४ ॥

सर्वस्वाची साटी । तरि च देवासवें गांठी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नाहीं तरी जया तैसा । भोग भोगवील इच्छा ॥ ध्रु ॥

द्यावें तें चि घ्यावें । ह्मणउनि जीवें जावें ॥ २ ॥

तुका ह्मणे उरी । मागें नुरवितां बरी ॥ ३ ॥

॥ ३९५५ ॥

सुख पंढरीसी आलें । पुंडलिकें साटविलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां धांवा माझे बाप । जिव्हा घेउनियां माप ॥ ध्रु ॥

करा एक खेप । मग न लगे हिंडावें ॥ २ ॥

विषयें गुंडूनि पसारा । धांव घ्या रे पंढरपुरा ॥ ३ ॥

आयुष्य वेचें जंव आहे । तों चि धांवोनियां जायें ॥ ४ ॥

आळस न करीं या लाभाचा । तुका विनवी कुणबियाचा ॥ ५ ॥

॥ ३९५६ ॥

गाढव शृंगारिलें कोडें । कांहीं केल्या नव्हे घोडें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ त्याचें भुंकणें न राहे । स्वभावासी करील काये ॥ ध्रु ॥

---

१ पं. भरे चि.—२ पं. अलोलिक.—३ दे. घ्यावें जीवें. पं. जीवेंभावें.—४ दे. उगवितां.—५ दे. अवघें पुंडलिकें.—६ पं. घेउनि खरें माप.—७ दे. करा एक खेप सभावें ।.—८ दे. विभव.—९ पं. 'आहे आयुष्याचा लेश । करीं पंढरीचा वास ॥.'—१० दे. कुणब्याचा.

श्वान शिबिके बैसविलें । भुंकतां न राहे उगलें ॥ २ ॥
तुका ह्मणे स्वभाविकर्म । कांहीं केल्या न सुटे धर्म ॥ ३ ॥

॥ ३९५७ ॥

सेकीं[1] हें ना तैसें जालें । बोलणें तितुकें वांयां गेलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्वयें[2] आपण चि रिता । रडे पुढिलांच्या हिता ॥ ध्रु. ॥
सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ॥ २ ॥
तुका ह्मणे गाढव लेखा । जेथें भेटेल तेथें ठोका ॥ ३ ॥

॥ ३९५८ ॥

आवडे सकळां मिष्टान्न । रोग्या विषा[3] त्यासमान ॥ १ ॥
दर्पण[4] नावडे तया एका । ठाव नोहीं ज्याच्या नाका[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे तैशा[6] खळा । उपदेशाचा[7] कांटाळा ॥ ३ ॥

॥ ३९५९ ॥

अखंड संत निंदी । ऐसी दुर्जनाची बुद्धि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय ह्मणावें तयासी । तो केवळ पापरासि ॥ ध्रु. ॥
जो स्मरे रामराम[8] । तयासी ह्मणावें रिकामें ॥ २ ॥
जो[9] तीर्थव्रत करी । तयासी ह्मणावें भिकारी ॥ ३ ॥
तुका ह्मणे विंच्वांची[10] नांगी । तैसा दुर्जन सर्वांगीं ॥ ४ ॥

॥ ३९६० ॥

या रे नाचों अवघेजण[11] । भावें प्रेमें परिपूर्ण ॥ १ ॥

---

१ पं. सेखी हेना तैसे.—२ त. सेकीं.—३ पं. विष ते.—४ पं. 'दर्पण' याच्या पूर्वी 'काय तया एक साटीं । काम केली अवघी खोटी ॥' हें कडवें जास्त आहे.—५ पं. न लगे एका.—६ पं. 'तैशा' नाहीं.—७ पं. उपदेशाचा तो कांटाळा.—८ पं. रामनामा । त्यासी ह्मणतो रिकामा ॥.—९ पं. तीर्थें व्रतें करी । त्यासी ह्मणतो भीकारी ॥.—१० पं. विंचा नांगी.—११ पं. आवघे जन । भावें आनंदें करून ॥.

॥ ध्रु. ॥ गाऊं पंढरीचा राणा । क्षेम देउनि संतजना ॥ ध्रु ॥
सुख[1] साधु सुखासाटीं । नाम हरिनाम बोभाटीं ॥ २ ॥
प्रेमा[2] वाटितो उदार । देतां नाहीं सानाथोर ॥ ३ ॥
पापें पळालीं बापुडीं । काळ झाला देशधडी ॥ ४ ॥
तुका ह्मणे धन्य काळ । आजि प्रेमाचा सुकाळ ॥ ५ ॥

॥ ३९६१ ॥

उपजलों[3] मनीं । हे तों स्वामीची करणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होइल प्रसादाचें[4] दान । तरि हें कवतुक पाहेन ॥ ध्रु ॥
येइल अभय जरि । तरि हे आज्ञा वंदिन शिरीं ॥ २ ॥
भक्तिप्रयोजना । प्रयोजावें बंदिजना ॥ ३ ॥
यश स्वामिचिये शिरीं । दास्य करावें किंकरीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे आळीकरा । त्यासी योजावें उत्तरा ॥ ५ ॥

॥ ३९६२ ॥

माझें मन पाहे कसून । चित्तें[5] न ढळे तुजपासून ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कापुनि[6] देइन शिर । पाहा कृपण कीं उदार ॥ ध्रु ॥
मजवरि घालीं घण । परि मी न सोडीं चरण ॥ २ ॥
तुका ह्मणे अंतीं । तुजवांचूनि नाहीं गति ॥ ३ ॥

॥ ३९६३ ॥

भूमीवरि कोण ऐसा । गांजूं शके हरिच्या दासा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखें नाचा[7] हो कीर्त्तनीं । जयजयकारें गर्जा वाणी ॥ ध्रु ॥

---

१ पं. सुख फुकासाटी । साधे हरिनाम बोभाटीं.—२ पं. प्रेम वाटितो. दे. प्रेमासाटीं तो.—३ पं. उपजले.—४ पं. प्रेमाचें.—५ दे. परिचित्त.—६ त. तुज कापुनि.—७ पं. नाचावें कीर्तनीं ।.

कोळा सुटे पळ । जाती दुरितें सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्तीं । साच मानाहे निश्चिती ॥ ३ ॥

॥ ३९६४ ॥

जातीचा ब्राह्मण । न करितां संध्यास्नान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो एक नांवाचा ब्राह्मण । होय हीनाहूनि हीन ॥ ध्रु ॥
सांडुनियां शाळिग्राम । नित्य वेश्येचा समागम ॥ २ ॥
नेघे संतांचें जो तीर्थ । अखंड वेश्येचा जो आर्थ ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे पापी । पाहूं नका पुनरपि ॥ ४ ॥

॥ ३९६५ ॥

जाला जीवासी उदार । त्यासी काय भीडभार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करीन आडक्या घोंगडें । उभें बाजारीं उघडें ॥ ध्रु ॥
जोंजों धरिली भीड । तोंतों बहु केली चीड ॥ २ ॥
तुका ह्मणे मूळ । तुझें उच्चारीन कुळ ॥ ३ ॥

॥ ३९६६ ॥

आह्मां हें चि काम । वाचे गाऊं तुझें नाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आयुष्य मोलाची हे घडी । धरूं पायांची आवडी ॥ ध्रु ॥
अमृताची खाणी । याचे ठायीं वेचूं वाणी ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । माझ्या जिवाच्या जिवलगा ॥ ३ ॥

॥ ३९६७ ॥

मिळे हरिदासांची दाटी । रीग न होय शेवटीं ॥ १ ॥

---

१ दे. सांगूं मानाची हे निति.—२ पं. वेश्या जोडे अर्थ.—३ दे. जालों.—४ त. उभे.—५ पं. रोकडे.—६ त. आतां आह्मां.—७ पं. जीविच्या.

॥ ध्रु. ॥ तेथें म्यां[1] काय करावें । माझें कोणें आइकावें ॥ ध्रु ॥
कैसें तुज लाजवावें । भक्त ह्मणोनियां भावें ॥ २ ॥
नाचतां नये टाळी । मेज[2] वाजवितां टाळी ॥ ३ ॥
अंति[3] मंडित भुषणें । शरीर माझें दैन्य वाणें ॥ ४ ॥
तुका ह्मणे कमळापति । मज न द्यावें त्या हातीं ॥ ५ ॥

॥ ३९६८ ॥

जाणों नेणों काय । चित्तीं धरूं तुझे पाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां हें चि वर्म[4] । गाऊं धरूनियां प्रेम ॥ ध्रु ॥
कायें[5] सांडूं मांडूं । भावें[6] त्हदयीं च कोंडूं ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । जन्मोजन्मीं मागें सेवा ॥ ३ ॥

॥ ३९६९ ॥

जाळें घातलें सागरीं । बिंदु न राहे भीतरीं[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें पापियाचें मन । तया नावडे कीर्त्तन ॥ ध्रु ॥
गाढव गंगेसी न्हाणिलें । जाउनि उकरड्यावरि[8] लोळे ॥ २ ॥
प्रीती[9] पोसिलें काउळें । जाउनि विष्ठेवरी लोळे ॥ ३ ॥
तुका ह्मणे तैसी हरी । कीरव्या नावडे कस्तुरी ॥ ४ ॥

॥ ३९७० ॥

तरलों ह्मणुनि[10] धरिलों[11] ताठा । त्यासी चळ जाला फांटा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांयांविण तुटे दोड । मान सुख इच्छी भांड ॥ ध्रु ॥
ग्वाहीविण मात । स्थापी आपुली सतत[12] ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसीं किती । नरका गेलीं अधोगती ॥ ३ ॥

---

१ पं. काय म्यां—२ पं. वाजवितां नये टाळी.—३ दे. त. अंतीं मांडिती भुषणें भूषणे.—४ त. एक वर्म.—५ दे. कासया.—६ दे. भाव.—७ त. अंतरीं.—८ पं. उकरंड्या लोळे.—९ पं. 'प्रीती पोसिलें०' हें कडवें नाहीं.—१० दे. त. ह्मणउनि.—११ पं. धरियेला.—१२ दे. स्वतंत्र. त. सतंत.

॥ ३९७१ ॥

आतां येथें खरें नये फिरतां माघारें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होईल तैसी हो[1] आबाळी । देह निमित्त यो बळी ॥ ध्रु ॥
तुह्मांसवें गांठी । देहाजिवाचिये साटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे लंड[2] । करूं चौघांमध्यें भंड ॥ ३ ॥

॥ ३९७२ ॥

काठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरी तें चांग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा करी कां विचार । शुद्ध कारण अंतर ॥ ध्रु ॥
वरि कांटे फणसफळा । माजि अंतरीं जिव्हाळा ॥ २ ॥
ऊंस[3] बाहेरी काठिण काळा । मांजी रसाचा जिव्हाळा ॥ ३ ॥
मिठें रुचविलें अन्न । नये सतत[4] कारण ॥ ४ ॥

॥ ३९७३ ॥

सकळतीर्थांहूनि[5] । पंढरीनाथ मुगुटमणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्यधन्य पंढरी[1] । जे मोक्षाची अक्षय पुरी ॥ ध्रु ॥
विश्रांतीचा ठाव । तो हा माझा पंढरीराव ॥ २ ॥
तुका ह्मणे सांगें[6] स्पष्ट । दुजी पंढरी वैकुंठ ॥ ३ ॥

॥ ३९७४ ॥

भाते भरूनि हरिनामाचे । वीर गर्जती विठ्ठलाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनंतनामाची[7] आरोळी । एक एकाहूनि बळी ॥ ध्रु ॥
नाहीं आणिकांचा गुमान । ज्याचे अंकित त्यावांचून ॥ २ ॥
रिद्धि सिद्धि ज्या कामारी । तुका ह्मणे ज्याचे घरीं ॥ ३ ॥

---

१ दे. त. 'हो' नाहीं.—२ खंड.—३ पं. 'ऊंस बाहेरी' हें कडवें नाहीं.—४ त. तुका ह्मणे नये०. दे. पं. यांत नेहेमींप्रमणें या अभंगांत 'तुका ह्मणे' असें नाहीं. त. तीं अक्षरें आहेत तरी छंदास जास्त होत आहेत.—५ पं. सर्वां.—६ दे. सांगतों.—७ पं ब्रह्मनामाची.

॥ ३९७५ ॥

ज्याची जया आस । तयाजवळी त्या वास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येरें[1] जवळी तें दुरी । धेनु वत्स सांडी घरीं ॥ ध्रु ॥
गोडी प्रियापाशीं । सुख उपजे येरासी ॥ २ ॥
तुका ह्मणे बोल । घडे तयाठायीं मोल ॥ ३ ॥

॥ ३९७६ ॥

बाळ माते निष्ठुर होये । परि ते[2] स्नेह करीत आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा तूं गा पुरुषोत्तमा । घडी न विसंबसि[3] आह्मां ॥ ध्रु ॥
नेणती भागली । कडे घेतां अंग घाली ॥ २ ॥
भूक साहे तान्हें[4] । त्याचें राखे समाधान ॥ ३ ॥
त्याच्या दुःखें धाये । आपला जीव देऊं पाहे ॥ ४ ॥
नांवें घाली उडी । तुका ह्मणे प्राण काढी ॥ ५ ॥

॥ ३९७७ ॥

हे[5] तों टाळाटाळी । परि भोवंता[6] हा कळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरें नव्हेल शेवटीं । भय असों द्यावें पोटीं ॥ ध्रु ॥
मुरगाळिल[7] कान । गोसमाळी सावधान ॥ २ ॥
धन्य[8] ह्मणे आतां । येथें नुधवा माथां ॥ ३ ॥
अबोलणा[9] तुका । ऐसें कांहीं लेखूं नका ॥ ४ ॥

॥ ३९७८ ॥

किती लाजिरवाणा । मरे उपजोनि शाहाणा ॥ १ ॥

---

१ पं. येरें.—२ दे. तें.—३ दे. विसंवेसि. त. विसंभसी.—४ दे. पं. ताहान.—५ त. होते.—६ दे. भोवताहे कळी.—७ दे. मुरगाळिला कान । समाडिलें समाधान ॥.—८ त. 'धन्य ह्मणे' हें कडवें नाहीं.—९ दे. 'अबोलणा०' हें कडवें नाहीं पं. 'हे तो टाळाटाळी०' हा अभंगच आढळत नाहीं.

॥ ध्रु. ॥ एका घाईं न करीं तुटी । न निघें देवासोई भेटी ॥ ध्रु ॥
सासूनि आबाळी । घायाळ तें ढुंग चोळी ॥ २ ॥
सावध करी तुका । ह्मणे निजले हो आइका ॥ ३ ॥

॥ ३९७९ ॥

दाता लक्षुमीचा पति । माझें मागणें तें किती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाणे तान्हेल्याची तान । पितां गंगा नव्हे न्यून ॥ ध्रु ॥
कल्पतरु जाला देता । तेथें पोटाचा मागता ॥ २ ॥
तुका ह्मणे संतत[1] ध्यातां । परब्रह्म चि आलें हातां ॥ ३ ॥

॥ ३९८० ॥

कुरुवंडी करीन काया । वेरोनि[2] पायां गोजिरियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बैसलें तें रूप डोळां । मन चाळा लागलें ॥ ध्रु ॥
परतें न सरवे दुरि । आवडी पुरी बैसली ॥ २ ॥
तुका ह्मणे विसावलों । येथें[3] धालों[4] धणीवरि ॥ ३ ॥

॥ ३९८१ ॥

साधनाचे कष्ट मोटे । भयें[5] वाटे थोर हें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुखें गावें भावें गीत । सर्व हित बैसलिया ॥ ध्रु ॥
दासा नव्हे कर्म दान । तन मन निश्चळ ॥ २ ॥
तुका ह्मणे आत्मनिष्ठा[6] । भागे चेष्टा[7] मनाची ॥ ३ ॥

॥ ३९८२ ॥

घेतां आणिकांचा जीव । तेव्हां कींव कराना ॥ १ ॥

---

१ त. सतंत. पं. संता.—२ पं. वरी.—३ त. तेथें.—४ दे. आलों.—५ दे. येथें.—६ दे. आत्मनिष्ट.—७ दे. चेष्ट.

॥ ध्रु. ॥ आपलें तें वरदळ नेदा । हे गोविंदा कृपणता ॥ ध्रु ॥
सेवा तरी इच्छा सांग । चोरिलें अंग साहेना ॥ २ ॥
तुका ह्मणे अरे धन्या । निसंतान्या विठोबा ॥ ३ ॥

॥ ३९८३ ॥

आह्मां कैलें गुणवंत । तें उचित राखावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मांसी तों चाड नाहीं । आणिकां कांहीं सुखदुःखा ॥ ध्रु ॥
दासांचें तें देखों नये । उणें काय होइल तें ॥ २ ॥
तुका ह्मणे विश्वंभरा । दृष्टि करा सामोरी ॥ ३ ॥

॥ ३९८४ ॥

अगत्य ज्या नरका जाणें । कीर्तनीं तो वीट मानी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नावडेसा जाला बाप । आलें पाप वस्तीसि ॥ ध्रु ॥
नारायण नाहीं वाचे । ते यमाचे अंदण ॥ २ ॥
तुका ह्मणे अभक्तासी । माता दासी जग झोडी ॥ ३ ॥

॥ ३९८५ ॥

आह्मी हरिचे हरिचे । शूर कळिकाळा यमाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नामघोष बाण साचे । भाले तुळसी मंजुरेचे ॥ ध्रु ॥
आह्मी हरिचे हरिचे दास । कलिकाळावरि घालूं कास ॥ २ ॥
आह्मी हरिचे हरिचे दूत । पुढें पळती यमदूत ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मांवरी । सुदर्शन घरटी करी ॥ ४ ॥

---

१ पं. आणीक.—२ पं. विट माननें कीर्तनीं.—३ दे. सुर. त. शुर.—४ त. पं. आह्मी हरिचे दास।—५ त. पं. आह्मा हरिचे दूत।—६ दे. सुद्रसेन.

॥ ३९८६ ॥

हिवाचिये पायीं लेचों सर्व शक्ती । होतिल विपत्ति ज्याज्या कांहीं ॥१ ॥
॥ ध्रु. ॥ नेघे[1] माझी वाचा पुढें कांहीं वाव । आणि दुजे भाव बोलायाचे ॥ ध्रु ॥
मनाची[2] वांटणी चित्ताचा विक्षेप । राहो हा अनुताप आहे तैसा ॥ २ ॥
तुका ह्मणे घेई विठ्ठलाचा छंद । आनंदाचा कंद विस्तारिल[3] ॥ ३ ॥

॥ ३९८७ ॥

पांडुरंगा आतां ऐका हे विनंती । बहु माझे चित्तीं भय वाटे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नाहीं आइकिलें संतांचिया मुखें । तें या मज लोकें भेडसाविलें[4] ॥ २ ॥
विष्णुदासां गति नाहीं तरावया । ह्मणती[5] गेले वांयां कष्टत[6] ही ॥ ३ ॥
धिक्कारिती मज करितां कीर्तन । काय सांगों शीण ते काळिचा ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज वाटतें उदास । काय करूं यास पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ३९८८ ॥

वेढा वेढा रे पंढरी । मोर्चे लावा भीमातिरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चलाचला संत जन । करा देवासी भांडण ॥ ध्रु ॥
लुटालुटा पंढरपुर । धरा रखुमाईचा वर ॥ २ ॥
तुका ह्मणे चला । घाव निशाणी[7] घातला ॥ ३ ॥

॥ ३९८९ ॥

पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्यां देवासी आठविती ॥ १ ॥
॥ध्रु.॥ प्रल्हादासी[8] पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनीं नारायण ॥ ध्रु ॥

---

१ दे. न घेई.—२ त. दे. मनाचे.—३ पं. विस्तारला.—४ दे. भडसाविलें.—५ पं. ह्मणतील वांयां.—६ त. पं. कष्टति.—७ दे. पं. निशानी.—८ पं. प्रल्हादासी.

सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । नाहीं विसरला पांडुरंगा ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर जाले तरी ॥ ३ ॥

॥ ३९९० ॥

निजसेजेची अंतुरी । पादलिया कोण मारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा आह्मासी उबगतां । तुका विनवितो संतां ॥ ध्रु ॥
मूळ मांडीवरी हागलें । तें बा कोणें रे त्यागिलें ॥ २ ॥
दासी कामासी चुकली । ते बा कोणें रे विकली ॥ ३ ॥
पांडुरंगाचा तुका पापी । संतसाहें काळासि दापी ॥ ४ ॥

॥ ३९९१ ॥

श्वानाचियापरी लोळें तुझ्या द्वारीं । भुंकों हरिहरि नाम तुझें ॥ १ ॥
भुंकीं उठीं बैसें न वजायें वेगळा । लुडबुडीं गोपाळा पायांपाशीं ॥२॥
तुका ह्मणे आह्मां वर्म आहे ठावें । मागेन तें द्यावें प्रेमसुख ॥ ३ ॥

॥ ३९९२ ॥

सोइरे धाइरे दिल्याघेतल्याचे । अंत हें काळीचें नाहीं कोणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सख्या गोत्रबहिणी सुखाचे संगती । मोकलुनी देती अंतकाळीं ॥ ध्रु ॥
आपुलें शरीर आपणा पारिखें । परावीं होतील नवल काई ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां सोड यांची आस । धरीं रे या कास पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ३९९३ ॥

जन्ममरणांची कायसी चिंता । तुझ्या शरणागतां पंढरीराया ॥ १ ॥

---

१ दे. पांडुरंग.—२ पं. तुह्मी.—३ पं. सांगाति.—४ दे. त. आपुल्यासी.—५ पं. परावे सारिखे नवल०.

भोगतील एक दुःख संवसारीं[1] । काय सांगों परी वेगळाल्या ॥ ८१ ॥
त्यावें खावें बरें असावें सदैव । हे चि करीं हांव संवसारीं[2] ॥ ८२ ॥
संसारें[3] जन गिळिले सकळ[4] । भोगवितो फळ[6] गर्भवासा ॥ ८३ ॥
वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । नव्हे या[7] खंडण गर्भवासा ॥ ८४ ॥
सायास केलियावांचुनि तें नाहीं[8] । भोगावरी पाहीं[9] घालूं नये ॥ ८५ ॥
नये बळें धड घालूं कांट्यावरि । जाये जीवें धरी सर्प हातीं ॥ ८६ ॥
हातीं आहे[10] हित करील तयासी । ह्मणउनि ऋषीं सांगितलें[11] ॥ ८७ ॥
सांगती[11] या लोका फजित करूनि । आपण जे कोणी तरले[12] ते ॥ ८८ ॥
तेणें[13] वाळवंटीं उभारिले कर । कृपेचा सागर पांडुरंग ॥ ८९ ॥
गंगाचरणीं करी पातकांची धुनी । पाउलें तीं मनीं चिंतिलिया ॥ ९० ॥
चिंतनें जयाच्या तारिले[14] पाषाण । उद्धरी[15] चरण लावूनियां ॥ ९१ ॥
लावूनियां टाळी नलगे बैसावें । प्रेमसुख घ्यावें संतसंगें ॥ ९२ ॥
संतसंगें कथां करावें कीर्तन । सुखाचें साधन रामराम[16] ॥ ९३ ॥
मग[17] कोठें देव जाऊं न[18] सके दुरी । बैसोनि भीतरी राहे कंठीं ॥ ९४ ॥
राहे व्यापुनियां सकळ शरीर । आपुला विसर पडों नेदी ॥ ९५ ॥
नेदी दुःख देखों आपुलिया दासा । वारी गर्भवासा यमदूता ॥ ९६ ॥
तान भूक त्यासी वाहों नेदी चिंता । दुश्चित हे घेतां नाम होती ॥ ९७ ॥
होती जीव त्यांचे सकळ ही जंत । परि ते अंकित संचिताचे[19] ॥ ९८ ॥
चेवले जे कोणी देहअभिमानें । त्यांसी नारायणें कृपा केली ॥ ९९ ॥
कृपाळू हा देव अनाथां कोंवसा । आह्मी त्याच्या आशा लागलोंसों[20] ॥ १०० ॥
लावियेले कांसे येणें पांडुरंगें । तुका ह्मणे संगें संतांचिया ॥ १०१ ॥

---

१ पं. संसारीं.—२ पं. संसाराची.—३ पं. संसारें.—४ त. सगळे ।.—५ पं. भोगतील.—६ त. पं. फळे.—७ पं. नव्हे चि खंडण.—८ पं. नाहीं.—९ पं. काई.—१० पं. हित आहे,—११ पं. सांगितलें.—१२ त. तरलें जें.—१३ पं जेणें.—१४ त. तरले. पं. तरती.—१५ पं. उद्धरिले.—१६ पं. रामनाम.—१७ पं. मग देव कोठें.—१८ पं. "न" नाहीं.—१९ त. संचिताचें.—२० पं. आशे.

॥ ३ ॥

विचार करिती बैसोनि गौळणी । ज्या कृष्णकामिनी कामातुरा ॥ १ ॥
एकांत एकल्या एका[1] च सुखाच्या । आवडती त्यांच्या गोष्टी त्यांला ॥२॥
तर्कवितर्किणी दुराविल्या दुरी । मौन त्यां[2] परिचारी आरंभिलें ॥ ३ ॥
कुशळा कवित्या कथित्या लोभिका । त्या ही येथें नका आह्मांपाशीं ॥ ४॥
बोलक्या वाचाळा कृष्णरता नाहीं । यां[3] चोरोनि तींहीं खेट केली ॥ ५ ॥
भेऊनियां जना एकी सवा जाल्या । वाती विझविल्या दाटोबळें ॥ ६ ॥
कृष्णसुख नाहीं कळलें मानसीं । निंदिती त्या त्यासी कृष्णरता ॥ ७ ॥
तो नये जवळी देखोनि कोल्हाळ । क्षणउनि समेळ मेळविला ॥ ८ ॥
अंतरीं कोमळा बाहेरी निर्मळा । तल्लीन त्या बाळा कृष्णध्यानीं ॥ ९॥
हरिरूपीं दृष्टि कानीं त्या च गोष्टी । आळंगिती कंठीं एका एकी ॥ १०॥
न सहि वियोग करिती रोदना । भ्रमिष्ट भावना देहाचिया ॥ ११ ॥
विसरल्या मागें गृह सुत पती । अवस्था याचिती[7] गोविंदाची ॥ १२ ॥
अवस्था लागोनि निवळ चि ठेल्या । एका एकी जाल्या कृष्णरूपा[4] ॥१३॥
कृष्णा[5] क्षणोनियां देती आलिंगन । विरहताप तेणें निवारेना ॥ १४ ॥
ताप कोण वारी गोविंदावांचूनि । साच तो नयनीं न देखतां ॥ १५ ॥
न देखतां त्यांचा प्राण रिघों पाहे । आजि कामास ये उसिर केला[6] ॥१६॥
रित्या ज्ञानगोष्टी तयां नावडती । आळिंगण प्रीती कृष्णाचिया ॥ १७ ॥
मागें कांहीं आह्मी चुकलों त्यांची सेवा । असेल या देवा राग आला ॥१८॥
आठविती मागें पापपुण्यदोष । परिहार एकीस एक देती ॥ १९ ॥
अनुतापें जाल्या संतप्त त्या बाळा । टाकुनि[8] विव्हळा धरणी अंग ॥ २० ॥

---

१ पं. एकाच्या सुखाच्या.—२ त. मौन्यें त्यापरि चोरी.—३ पं. त्या चोरोनियां.—४ पं. कृष्णरूप.—५ पं. कृष्ण.—६ पं. जालां.—७ त. याची.—८ पं. टाकिती वेल्हाळा.

आणोनि चरित्र जवळी च होता । आली त्या अनंता कृपा मग ॥ २१ ॥
होउनी प्रगट दाखविलें रूप । तापत्रय ताप निववीले ॥ २२ ॥
[1]मियालेया देखोनि कृष्णाचें श्रीमुख । शोक मोह दुःख दुरावला ॥ २३ ॥
साच भाव त्यांचा आणुनियां मना । आळंगितो राणा वैकुंठींचा ॥ २४ ॥
हरिअंगसंगें हरिरूप जाल्या । बोलीं विसरल्या तया सुखा ॥ २५ ॥
व्यभिचारभावें भोगिलें अनंता । वर्तोनि असतां घराचारी ॥ २६ ॥
सकळा चोरोनि हरि जयां चित्तीं । धन्य त्या नांदती तयामध्यें ॥ २७ ॥
उणें पुरें त्यांचें पडों नेंदी कांहीं । राखे सर्वां ठायीं देव तयां ॥ २८ ॥
न कळे लाघव ब्रह्मादिकां मांव । भक्तिभावें देव केला तैसा ॥ २९ ॥
तुका ह्मणे त्यांचा धन्य व्यभिचार । साधिलें अपार निजसुख ॥ ३० ॥

बाळक्रीडा प्रारंभ अभंग—१००.

देवा आदिदेवा [3]जगत्रयजीवा । परियेसीं केशवा विनंती माझी ॥ १ ॥
माझी वाणी तुझे वर्णीं गुण नाम । ऐसें[4] देईं प्रेम कांहीं कळा ॥ २ ॥
कळा तुजपाशीं आमुचें जीवन । उचित करून देईं आह्मां ॥ ३ ॥
आह्मां शरणागतां तुझा चि आधार । तूं तव सागर कृपासिंधु ॥ ४ ॥
सिंधु पायवाट होय तुझ्या नामें । जोंळीं महाकर्मे[5] दुस्तरें तीं ॥ ५ ॥
तीं[6] फळें उत्तमें तुझा निजध्यास । नाहीं गर्भवास सेविलिया ॥ ६ ॥
सेविलिया राम कृष्ण नारायण । नाहीं त्या बंधन संसाराचें ॥ ७ ॥
संसार तें काय तृणवतमय । अग्नि त्यासी खाय क्षणमात्रें ॥ ८ ॥
क्षणमात्रें जाळी दोषांचिया रासी । निंद्य उत्तमासी वंद्य करी ॥ ९ ॥

---

१ पं. 'या' नाहीं.—२ पं. सखे.—३ त. जनत्रयजीवा. दे. जगत्रया जीवा.—४ दे. ऐसी.—५ पं. जळतील कर्मे दुस्तर ते.—६ पं. ते फळ उत्तम. त. तीं फळें उत्तम.

करीं ब्रिदें[1] साच आपलीं आपण । पतितपावन दिनानाथ ॥ १० ॥
नाथ अनाथाचा पति[2] गोपिकांचा । पुरवी चित्तींचा मनोरथ ॥ ११ ॥
चित्तीं जें धरावें तुका ह्मणे दासीं । पुरविता होसी मनोरथ ॥ १२ ॥

॥ २ ॥

मनोरथ जैसे गोकुळींच्या जना । पुरवावी वासना तयापरी ॥ १ ॥
रिण फेडावया अवतार केला । अविनाश आला आकारासी ॥ २ ॥
सीण जाला वसुदेवदेवकीस । वधी बाळें[3] कंस दुराचारी ॥ ३ ॥
दुराचारियासी नाहीं भूतदया । आप पर तया पाप पुण्य ॥ ४ ॥
पुण्यकाळ त्याचा राहिलासे उभा । देवकीच्या गर्भा देव आले ॥ ५ ॥
गर्भासी तयांच्या आला नारायण । तुटलें[4] बंधन आपेंआप ॥ ६ ॥
आपेंआप बेडया तुटल्या शृंखळा[5] । बंदाच्या आगळा[6] किलिया कोंडे ॥ ७ ॥
कोंडमारू केला होता बहु[7] दिस । सोडवी निमिष्य नलगतां ॥ ८ ॥
न कळे तो त्यासी[8] सांगितला भाव । आपणासी ठाव नंदाघरीं ॥ ९ ॥
नंदाघरीं जातां येतां वसुदेवा । नाहीं जाला गोवा सर्वें देव ॥ १० ॥
सर्वें देव तया आड नये कांहीं । तुका ह्मणे नाहीं भय चिंता ॥ ११ ॥

॥ ३ ॥

चिंता ते पळाली गोकुळाबाहेरी । प्रवेश भीतरी केला देवें ॥ १ ॥
देव आला घरा नंदाचिया गांवा । धन्य त्याच्या दैवा दैव आलें ॥ २ ॥
आलें अविनाश धरूनि आकार । दैत्याचा संहार करावया ॥ ३ ॥
करावया भक्तजनाचें पालण । आले रामकृष्ण गोकुळासी ॥ ४ ॥
गोकुळीं आनंद प्रगटलें सुख । निर्भर हे[9] लोक घरोघरीं ॥ ५ ॥

---

१ पं. ब्रीद साच आपुलें.—२ त. गोपिकांचा पति.—३ त. पं. बाळ—४ पं. तुटलीं बंधनें.—५ दे. त. शंकळा.—६ पं. आर्गळा किल्येकोंडे.—७ त. बहुत दिवस.—८ पं. तयां.—९ पं. ते.

घरोघरीं जाला लक्ष्मीचा[1] वास । दैन्यदारिद्रास[2] त्रास आला ॥ ६ ॥
आला नारायण तयांच्या अंतरा । दया क्षमा नरा नारीलोकां ॥ ७ ॥
लोकां गोकुळींच्या जालें ब्रह्मज्ञान । केलियावांचून जपतपें[3] ॥ ८ ॥
जपतपें[3] काय करावीं साधनें । जवें[4] नारायणें कृपा केली ॥ ९ ॥
केलीं नारायणें आपुलीं अंकित । तो चि त्यांचें हित सर्व जाणे ॥ १० ॥
सर्व जाणे एक विष्णु साच खरा । आणीक दुसरा नाहींनाहीं ॥ ११ ॥
नाहीं भक्ता दुजें तिहीं त्रिभुवनीं । एका चक्रपाणिवांचूनियां ॥ १२ ॥
याच्या[5] सुखसंगें घेती गर्भवास । तुका ह्मणे आस त्यजूनियां ॥ १३ ॥

॥ ४ ॥

यांच्या[6] पूर्वपुण्या कोण लेखा करीं । जिहीं तो मुरारी खेळविला ॥ १ ॥
खेळविला जिहीं अंतर्बाह्यसुखें । मेळवूनि मुखें चुंबन दिलें ॥ २ ॥
दिलें त्यांसी[7] सुख अंतरीचें देवें । जिहीं एका भावें जाणितला ॥ ३ ॥
जाणितला तिहीं कामातुर[8] नारी । कृष्णभोगावरी चित्त ज्यांचें ॥ ४ ॥
ज्यांचें कृष्णीं तन मन जालें रत । गृह[9] पति सुत विसरल्या ॥ ५ ॥
विष तयां जालें धन मान जन । वसविती वन एकांतीं[10] त्या ॥ ६ ॥
एकांतीं त्या जाती हरीसी घेउनि । भोगइच्छाधणी फेडावया ॥ ७ ॥
वयाच्या संपन्ना तैसा त्यांकारणें । अंतरींचा देणें इच्छाभोग ॥ ८ ॥
भोग त्याग नाहीं[11] दोन्ही जयापासीं । तुका ह्मणे जैसी स्फटिकशिळा ॥ ९ ॥

॥ ५ ॥

शिळा स्फटिकाची न पालटे भेदें[12] । दाउनियां छंदें[13] जैसी तैसी ॥ १ ॥

---

१ दे. लक्ष्मीचा.—२ दे. ०दाळिद्रास. पं. ०दारिद्र्यास .—३ त. जपतप.—४ पं. जे त्या.—५ पं. त्याच्या.—६ पं. त्यांच्या.—७ पं. सुख त्यांसी.—८ पं. कामातुरा.—९ दे. त. पं. ग्रह.—१० त. एकांत.—११ दोन्ही नाहीं. १२ पं. भेद—.१३ पं. छंद.

जैसा केला तैसा होय क्षणक्षणा । फेडावी वासना भक्तिभावें ॥ २ ॥
फेडावया आला अवघियांचीं धणी । गोपाळ गौळणी मायबापा ॥३॥
मायबापा सोडविलें बंदीहुनि । चाणूर मर्दुनी कंसादिक ॥ ४ ॥
दिक नाहीं देणें अरिमित्रा एक । पूतना कंटक मुक्त केली ॥ ५ ॥
मुक्त केला मामा कंस महादोषी । बाळहत्या रासी पातकांच्या ॥६॥
पाप कोठें राहे हरी आठवितां । भक्ती द्वेषें चिंता जैसा तैसा ॥ ७ ॥
साक्षी तयापाशीं पूर्वीलकर्माच्या । बांधला सेवेच्या ऋणें[1] देव ॥ ८ ॥
देव भोळा धांवे भक्ता पाठोवाठी । उच्चारितां कंठीं मार्गेमार्गें ॥ ९ ॥
मानाचा कंटाळा तुका ह्मणे त्यासीं । धांवे[2] तो घरासी भाविकांच्या ॥१०॥

॥ ६ ॥

चारी वेद ज्याची कीर्ती वाखाणिती । बांधवी तो हातीं गौळणीच्या ॥१॥
गौळणिया गळा बांधिती धारणीं । पायां चक्रपाणी लागे तया ॥ २ ॥
तयाघरीं रिघे चोरावया लोणी । रितें पाळतूनि शिरे माजी ॥ ३ ॥
माजी शिरोनियां नवनीत खाये । कवाड तें आहे जैसें तैसें ॥ ४ ॥
जैसा तैसा आहे अंतर्बाह्यात्कारीं । ह्मणउनि चोरी नसंपडे ॥ ५ ॥
नसंपडे तयां करितां खटपट । वाउगे बोभाट वर्माविण ॥ ६ ॥
वर्म जाणती त्या एकल्या एकटा । बैसतील वाटा निरोधूनि ॥ ७ ॥
निवांत राहिल्या निःसंग होऊनि । निश्चळ ज्या[3] ध्यानीं[4] कृष्णध्यान ॥ ८ ॥
न ये क्षणभरी योगियांचे ध्यानीं । धरिती गौळणी भाविका त्या ॥९॥
भाविका तयांसी येतो काकुलती । शाहाण्या मरती नसंपडे ॥ १० ॥
नलगे वेचावी टोली[5] धनानांवें । तुका ह्मणे भावें चाड एका ॥११॥

---

१ दे. रुणी. त. पं. रुणें.—२ त. पं. धांवतो.—३ पं. त्या ध्यानीं.—४ त. कृष्णध्यानें.—५ दे. टोळी.

॥ ७ ॥

चाड अनन्याची धरी नारायण । आपणासमान करी रंका ॥ १ ॥
रंक होती राजें यमाचिये घरीं । आचरणें बरीं नाहीं ह्मणे ॥ २ ॥
नसंपडे इंद्रचंद्रब्रह्मादिकां । अभिमानें एका तिळमात्रें ॥ ३ ॥
तिळमात्र जरी होय अभिमान । मेरु तो समान भार देवा ॥ ४ ॥
भार पृथिवीचा वाहिला सकळ । जड होती खळ दुष्ट लोक ॥ ५ ॥
दुष्ट अभक्त जे निष्ठुर मानसीं । केली हे तयांसी यमपुरी ॥ ६ ॥
यमदूत त्यांसी करिती यातना । नाहीं नारायणा भजिजेलें ॥ ७ ॥
जे नाहीं भजले एका भावें हरी । तयां दंड करी यमधर्म ॥ ८ ॥
यमधर्म ह्मणे तयां दोषियांसी । कां रे केशवासी चुकलेती ॥ ९ ॥
चुकलेती कथा पुराणश्रवण । होते तुह्मां कान डोळे मुख ॥ १० ॥
कान डोळे मुख संतांची संगति । न धरा च चित्तीं सांगितलें ॥ ११ ॥
सांगितलें संतीं तुह्मां उगवूनि । गर्भासी येऊनि यमदंड ॥ १२ ॥
दंडूं आह्मीं रागें ह्मणे यमधर्म । देवा होय श्रम दुर्जनाचा ॥ १३ ॥
दुर्जनाचा येणें करूनि संहार । पूर्णअवतार रामकृष्ण ॥ १४ ॥
रामकृष्णनामें रंगले जे नर । तुका ह्मणे घर वैकुंठीं त्यां ॥ १५ ॥

॥ ८ ॥

वैकुंठींच्या लोकां दुर्लभ हरिजन । तया नारायण समागमें ॥ १ ॥
समागम त्यांचा धरिला अनंतें । जिहीं चित्तवित्त समर्पिलें ॥ २ ॥
समर्थ तीं गाती हरीचे पवाडे । येर ते बापुडे रावराणे ॥ ३ ॥

---

१ दे. ह्मणवोनि. पं. ह्मणोनी.—२ पं. अभिमान.—३ त. यमपुरी.—४ त. जे भजले. पं. भजले जे.—५ पं. नाहीं जे.—६ त. गर्भाद. दे. 'गर्भाद' असतां 'गर्भासी' केलें आहे.—७ दे. यांणें.—८ त. जीं त्या.—९ त. चित्तवित्तें.—१० पं. समर्थ वे.

रामकृष्णें केलें कौतुक[1] गोकुळीं । गोपाळांचे मेळीं गाई चारी ॥ ४॥
गाई चारी मोहोरी पांवा वाहे[2] पाठीं । धन्य जाळीं[3] काठी कांबळी[4] ते ॥ ५ ॥
काय गौळियांच्या होत्या पुण्यरासी । आणीक त्या ह्लैसी गाई पशु ॥ ६ ॥
सुख तें अमुप लुटिलें सकळीं । गोपिका[5] गोपाळीं धणीवरि ॥ ७ ॥
धणीवरि त्यांसी सांगितली मात । जयाचें[6] जें आर्त तयापरी ॥ ८ ॥
परी याचें[7] तुह्मी आइका नवल । दुर्गम जो खोल साधनासि ॥ ९ ॥
शिक लावूनियां घालिती बाहेरी । पाहाती भीतरी सर्वे चि तो ॥ १०॥
तोंडाकडे त्यांच्या पाहे कवतुकें । शिव्या देतां सुखें हांसतसे[8] ॥ ११ ॥
हांसतसे शिव्या देतां त्या गौळणी । मरतां जपध्यानीं न बोले तो ॥ १२ ॥
तो जेंजें करिल तें दिसे उत्तम । तुका ह्लणे वर्म दावी सोपें[9] ॥ १३ ॥

॥ ९ ॥

दावी वर्म[10] सोपें भाविकां गोपाळां । वाहे त्यांच्या गळां पाले माळा ॥ १ ॥
मान देती आधीं मागतील[10] डाव । देवा तें[11] गौरव माने सुख ॥ २ ॥
मानती ते मंत्र हमामा हुंबरी । सिंतोडिती वरि स्नान तेणें ॥ ३ ॥
वस्त्रें घोंगडिया घालुनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥ ४ ॥
तिहीं लोकांसी जो दुर्लभ चिंतना । तो धांवे गोधना वळतियां ॥ ५ ॥
यांच्या[12] वचनाचीं पुष्पें वाहे शिरीं । नैवेद्य त्यांकरीं कवळ मागे ॥ ६ ॥
त्यांचिये मुखींचें हिरोनियां घ्यावें । उच्छिष्ट तें खावें धणीवरी ॥ ७ ॥
वरी माथां गुंफे मोरपिसांवेटी[13] । नाचे टाळी पिटी त्यांच्या छंदें ॥८॥
छंदें नाचतील जयासवें हरी । देहभाव वरी विसरलीं ॥ ९ ॥

---

१ त. चरित्र.—२ त. वाये.—३ त. जाळे.—४ त 'कांवळीचे' दे. 'कांवळीचें' असतां 'कांवळीतें' केलें आहे.—५ दे. 'गोपिका गोपाळीं' असतां 'गोपिका गौळणी' केलें आहे.—६ पं. ज्याचें जैसें आर्त०.—७ दे. याचि. त. याची.—८ दे. त. हासतुसे.—९ पं. वर्म दावी.—१० पं. मागती ते डाव.—११ पं. तो.—१२ पं. त्यांच्या.—१३ त. मोरविसांवेठीं.

विसरली वरी देहाची भावना । ते चि नारायणा सर्वपूजा ॥ १० ॥
पूजा भाविकांची न कळतां[1] घ्यावी । न मागतां दावी निज ठाव ॥ ११ ॥
ठाव पावावया[2] हिंडे मागें मागें । तुका ह्मणे संगें भक्तांचिया ॥ १२ ॥

॥ १० ॥

भक्तजनां दिलें निजसुख देवें । गोपिका त्या भावें आळंगिल्या ॥ १ ॥
आळंगिल्या गोपी गुणवंता नारी । त्यांच्या जन्मांतरीं हरि ऋणी ॥ २ ॥
रुसलिया त्यांचें करी समाधान । करविता आण[3] क्रिया करी ॥ ३ ॥
क्रिया करी तुह्मां न वजे पासुनि । अवघियाजणी गोपिकांसी ॥ ४ ॥
गोपिकांसी ह्मणे वैकुंठींचा पति । तुह्मी माझ्या[4] चित्तीं सर्वभावें ॥ ५ ॥
भाव जैसा माझ्याठायीं[5] तुह्मी धरा । तैसा चि मी खरा तुह्मांलागीं ॥ ६ ॥
तुह्मां कळों[6] द्या हा माझा साच भाव । तुमचा चि जीव तुह्मां ग्वाही ॥ ७ ॥
ग्वाही तुह्मां आह्मां असे नारायण । आपली च आण वाहातसे ॥ ८ ॥
सत्य बोले देव भक्तिभावें जैसा । अनुभवें[6] रसा आणूनियां ॥ ९ ॥
यांसी बुझावितो वेगळाल्या भावें । एकीचें हें[7] ठावें नाहीं एकी ॥ १० ॥
एकी क्रिया नाहीं आवघियांचा भाव । पृथक हा देव घेतो[8] तैसें ॥ ११ ॥
तैसें कळों नेदी जो मी कोठें नाहीं । अवघियांचे ठायीं जैसा तैसा ॥ १२ ॥
जैसा मनोरथ जये चित्तीं काम । तैसा मेघश्याम[9] पुरवितो ॥ १३ ॥
पुरविले मनोरथ गोपिकांचे । आणीक लोकांचे गोकुळींच्या ॥ १४ ॥
गोकुळींच्या लोकां लावियेला छंद । बैसला गोविंद त्यांचे[10] चित्तीं १५ ॥
चित्तें[11] ही चोरूनि घेतलीं सकळा । आवडी गोपाळांवरी तयां ॥ १६ ॥

---

१ पं. कळत.—२ पं. पाहावया.—३ पं. आपण.—४ पं. तुह्मी माझाठायीं.—५ पं. तुह्मांसी कळों द्या माझा०.—६ पं. अनुभव.—७ पं. तें.—८ पं. देतो.—९ दे. त. ०शाम.—१० दे. त्याचा.—११ पं. चित्त चोरुनियां घेतलें०.

आवडे[1] तयांसी वैकुंठनायक । गेलीं सकळिक विसरोनि ॥ १७ ॥
निंदा स्तुती कोणी न करी कोणाची । नाहीं या देहाची शुद्धि कोणा॥१८॥
कोणासी नाठवे कन्या पुत्र माया । देव ह्मणुनि[2] तया चुंबन देती ॥ १९ ॥
देती[3] या टाकून भ्रतारांसी घरीं । लाज ते[4] अंतरीं आथी च ना ॥ २० ॥
नाहीं कोणा[5] धाक कोणासी कोणाचा । तुका ह्मणे वाचा काया मनें॥२१॥

॥ ११ ॥

मनें हरिरूपीं गुंतल्या वासना । उदास या[6] सुना गौळियांच्या ॥ १ ॥
यांच्या[7] भ्रतारांचीं धरूनियां रूपें । त्यांच्या घरीं त्यांपें भोग करी ॥ २ ॥
करी कवतुक त्याचे तयापरी । एकां दिसे हरि एकां लेंक ॥ ३ ॥
एक भाव नाहीं सकळांच्या चित्तीं । ह्मणऊनि प्रीति तैसें रूप ॥ ४ ॥
रूप याचें आहे अवघें चि एक । परि कवतुक दाखविलें ॥ ५ ॥
लेंकरूं न कळे स्थूल कीं लहान । खेळे नारायण कवतुकें ॥ ६ ॥
कवतुक केलें सोंग बहुरूप । तुका ह्मणे बाप जगाचा हा ॥ ७ ॥

॥ १२ ॥

जगाचा हा बाप दाखविलें माये । माती खातां जाये मारावया ॥ १ ॥
मारावया तिणें उगारिली काठी । भुवनें त्या पोटीं चौदा देखे ॥ २ ॥
देखे भयानक झांकियेले डोळे । मागुता तो खेळे तियेपुढें ॥ ३ ॥
पुढें रिघोनियां घाली गळां कव । कळों नेदी माव मायावंता ॥ ४ ॥
मायावंत विश्वरूप[10] काय जाणे । माझें माझें ह्मणे बाळ देवा ॥ ५ ॥
बाळपणीं रिठा रगडिला दाढे । मारियेले गाढे कागबग ॥ ६ ॥

---

१ पं. तयासी आवडे.—२ त. ह्मूण. पं. ह्मणूनियां चुं०.—३ पं. देती टाकोनियां.—४ पं. त्या.— ५ पं. धाक कोणा.—६ पं. त्या.—७ पं. त्यांच्या.—८ त. माये०. दे. तये०.—९ पं. गळां घाली.—१० पं. हरिरूप.

गळां बांधऊनि उखळासी दावें । उन्मळी त्या भावें विमळार्जुन ॥ ७ ॥
न कळे जुनाट जगाचा जीवन । घातलें मोहन गौळियांसी ॥ ८ ॥
सिंकां उतरूनि खाय नवनीत । न कळे बहुत होय तरी ॥ ९ ॥
तरी दुधें डेरे भरले रांजण । खाय ते भरून दावी दुणी ॥ १० ॥
दुणी जालें त्याचा मानिती संतोष । दुभत्याची आस धरूनियां ॥ ११ ॥
आशाबद्धा देव असोनि जवळी । नेणती ते काळीं स्वार्थामुळें ॥ १२ ॥
मुळें याच देव न कळे तयांसी । चित्त आशापाशीं गोवियेलें ॥ १३ ॥
लेंकरूं आमचें ह्मणे दसवंती । नंदाचिये चित्तीं तो चि भाव ॥ १४ ॥
भाव जाणावया चरित्र दाखवी । घुसळितां रवी डेरियांत ॥ १५ ॥
डेरियांत लोणी खादलें रिघोनि । पाहे तों जननी हातीं लागे ॥ १६ ॥
हातीं धरूनियां काढिला बाहेरी । देखोनियां करी चोज त्यासी ॥ १७ ॥
सिकवी विचारे नेणे त्याची गती । होता कोणे रीती डेरियांत ॥ १८ ॥
यांसी पुत्रलोभें न कळे हा भाव । कळों नेदी माव देव त्यांसी ॥ १९ ॥
त्यांसी मायामोहजाळ घाली फांसें । देव आपणास कळों नेदी ॥ २० ॥
नेदी भावें राहों लोभिकांचे चित्तीं । जाणतां चि होती अंधळीं तीं ॥ २१ ॥
अंधळीं तीं तुका ह्मणे संवसारीं । जिहीं नाहीं हरि ओळखिला ॥ २२ ॥

॥ १३ ॥

ओळखी तयांसी होय एका भावें । दुसरिया देवें न पविजे ॥ १ ॥
न पविजे कदा उन्मत्त जालिया । डंबु तो चि वांयां नागवण ॥ २ ॥
वनवास देवाकारणें एकांत । करावीं हीं व्रततपें याग ॥ ३ ॥

---

१ दे. दुधडेरे.—२ पं. मुळयाचा. दे. 'मुळें याचें' असतां 'मुळें याचा' केलें आहे.—३ पं. दावावया.—४ पं. गौळणी.—५ पं. काढिती.—६ पं. फासा.—७ पं. आपणसा.—८ दे. राहों भाव.—९ पं. संसारीं.—१० पं. तयाची.—११ पं. दंभ.—१२ त. वृतें तपें.

व्रत याग यांसी फळलीं[1] बहुतें । होतीं या संचितें गौळियांचीं ॥४॥
यांसी देवें तारियेलें न कळतां । मागील अनंता ठावें होतें ॥ ५ ॥
होतें तें बावया आला नारायण । मायबापां रीण गौळियांचें ॥ ६ ॥
गौळियांचें सुख दुर्लभ आणिकां । नाहीं ब्रह्मादिकां तुका ह्मणे ॥७॥

॥ १४ ॥

नेणतियांसाटीं नेणता लाहान । थिकोनी भोजन मागे माये ॥ १ ॥
माया दोनी यास बाप नारायणा । सारिखी[2] भावना तयांवरी ॥ २ ॥
तयांवरी त्याचा समचित्त भाव । देवकीवसुदेव नंद दोघे ॥ ३ ॥
घेउनियां एके ठायीं अवतार । एकीं केला थोर वाढवूनि ॥ ४ ॥
उणा पुरा यासी नाहीं कोणी ठाव । सारिखा चि देव अवघियांसी ॥५॥
यासी दोनी ठाव सारिखे अनंता । आधेंल मागुता वाढला तो ॥ ६ ॥
वाढला तो सेवाभक्तिचिया गुणें । उपचारमिष्टान्नें करूनियां ७ ॥
करूनि[3] सायास मेळविलें धन । तें ही कृष्णार्पण केलें तीहीं ॥ ८ ॥
कृष्णासी सकळ गाई घोडे ह्मैसी । समर्पिल्या दासी जीवें भावें[4] ॥९॥
जीवें भावें त्याचीं करितील सेवा । न विसंबती नांवा क्षणभरी ॥ १० ॥
क्षणभरी होतां वेगळा[5] तयांसी[6] । होती कासावीस प्राण त्यांचे ॥ ११ ॥
त्यांचे ध्यानीं मनीं सर्वभावें हरि । देह काम करी चित्त त्यापें ॥ १२ ॥
त्याचें चि चिंतन कृष्ण कोठें गेला । कृष्ण हा जेविला नाहीं कृष्ण ॥१३॥
कृष्ण आला घरा कृष्ण गेला दारा । कृष्ण हा सोयिरा[7] भेटों कृष्णा ॥१४॥
कृष्ण गातां ओंव्या दळणीं कांडणीं । कृष्ण हा भोजनीं पाचारिती ॥१५॥
कृष्ण तयां ध्यानीं आसनीं शयनीं । कृष्ण देखे स्वप्नीं कृष्णरूप ॥ १६ ॥
कृष्ण त्यांस दिसे आभास दुश्चितां । धन्य मातापिता तुका ह्मणे ॥ १७ ॥

---

१ दे. त. कळलीं.—२ पं. सारिख्या.—३ दे. त. करोनियां.—४ दे. भाव.—५ त. वेगळे.—६ पं. तयासी । होती कासाविसी०.—७ पं. सोयरा.—८ पं. कृष्ण.

॥ १५ ॥

कृष्ण हा परिचारी कृष्ण हा वेव्हारी । कृष्ण घ्या वो नारी आणिकी ह्मणे ॥ १ ॥
ह्मणे कृष्णाविण कैसें[2] तुह्मां गमे । विळ हा करमे वांयांविण ॥ २ ॥
वांयांविण तुह्मीं पिटितां[3] चावटी । घ्या गे जगजेठी क्षणभरी ॥ ३ ॥
क्षणभरी याच्या सुखाचा सोहळा । पाहा एकवेळा घेऊनियां ॥ ४ ॥
याचें सुख तुह्मां कळालियावरि । मग दारोदारीं न फिराल ॥ ५ ॥
लटिकें हें तुह्मां वाटेल खेळणें । एका कृष्णाविणें आवघें चि ॥ ६ ॥
अवघ्यांचा तुह्मीं टाकाल सांगात । घेऊनि अनंत जाल राना ॥ ७ ॥
नावडे तुह्मांस आणिक बोलिलें । मग हें लागलें हरिध्यान[4] ॥ ८ ॥
न करा हा मग या जीवा वेगळा । टोंकवाल बाळा आणिका ही ॥ ९ ॥
आणिका ही तुह्मा येती काकुलती । जवळी इच्छिती क्षण बैसों ॥ १० ॥
बैसों चला पाहों गोपाळाचें मुख । एकी एक सुख सांगतील ॥ ११ ॥
सांगे जंव ऐसी माता[6] दसवंती । तंव त्या धरिती चित्तीं बाळा ॥ १२ ॥
बाळा एकी घरा घेउनियां जातीं । नाहीं त्या परती तुका ह्मणे ॥ १३ ॥

॥ १६ ॥

तुका ह्मणे पुन्हा न येती मागुत्या । कृष्णासीं खेळतां दिवस गमे ॥ १ ॥
दिवस राती कांहीं नाठवे तयांसी । पाहातां मुखासी कृष्णाचिया ॥ २ ॥
याच्या मुखें नये डोळयासी वीट । राहिले हे नीट ताटस्त चि ॥ ३ ॥
ताटस्थ राहिलें सकळ शरीर । इंद्रियें व्यापार विसरलीं ॥ ४ ॥
विसरल्या[9] तान भुक घर दार । नाहीं हा विचार असों[10] कोठें ॥ ५ ॥

---

१ पं. आणिका.—२ पं. तुह्मां कैसें.—३ त. पीटीत्या. दे. पिटीत्या चाकटी.—४ पं. कृष्णध्यान.—५ पं. आणीक ही.—६ पं. माता.—७ दे. धरिती चित्तीं बाळा । त. तंव धरी चि ती चित्तीं बाळा.—८ दे. त. ताटस्थ चि.—९ पं. विसरली.—१० दे. त. आहों.

कोठें असों कोण जाला वेळ[1] काळ । नाठवे सकळ विसरल्या ॥ ६ ॥
विसरल्या आह्मीं कोणीये जातीच्या । वर्णा ही चहूंच्या एक जाल्या ॥ ७ ॥
एकें[2] जाल्या तेव्हां कृष्णाचिया सुखें । निःशंकें[3] भातुकें खेळतील ॥ ८ ॥
खेळती भातुकें कृष्णाच्या[4] सहित । नाहीं आशंकित चित्त त्यांचें ॥ ९ ॥
चित्तीं तो गोविंद लटिकें दळण । करिती[5] हें जन करी[6] तैसें ॥ १० ॥
जन करी तैसा खेळतील खेळ । अवघा गोपाळ करूनियां ॥ ११ ॥
करिती[7] आपला आवघा गोविंद । जना साच फंद लटिका त्या[8] ॥ १२ ॥
त्यांणीं केला हरि सासुरें माहेर । बंधु हे कुमर दीर भावें ॥ १३ ॥
भावना राहिली एकाचिये ठायीं । तुका ह्मणे पायीं गोविंदाचे ॥ १४ ॥

॥ १७ ॥

गोविंद भ्रतार गोविंद मुळहारी । नामें भेद परि एक चि तो ॥ १ ॥
एकाचीं च नामें ठेवियेलीं दोनी । कल्पितील[9] मनीं यावें जावें ॥ २ ॥
जावें यावें तिहीं घरींचिया घरीं । तेथिची सिदोरी तेथें न्यावी ॥ ३ ॥
विचारितां दिसे येणें जाणें खोटें । दाविती गोमटें लोका ऐसें ॥ ४ ॥
लोक करूनियां साच वर्तताती[10] । तैशा त्या खेळती लटिक्याची ॥ ५ ॥
लटिकीं करिती मंगळदायकें । लटिकीं च एकें एकां व्याही ॥ ६ ॥
व्याही भाई हरि सोयरा[11] जावायी । अवघियांच्या[12] ठायीं केला एक ॥ ७ ॥
एकासि च पावे जें कांहीं करिती । उपचार संपत्ति नाना भोग ॥ ८ ॥
भोग देती सर्व एका नारायणा । लटिक्या भावना व्याही भाई ॥ ९ ॥
लटिका च त्यांणीं केला संवसार । जाणती साचार वेगळा[13] त्या ॥ १० ॥

---

१ त. वेळाकाळ.—२ त. एकी.—३ त. निःशंख.—४ त. कृष्णा त्या सहित.—५ त. करीती हीं जन.—६ त. करिती.—७ त. करूनि.—८ त. त्यां.—९ त. कळविती.—१० त. वरतती.—११ त. सोइरा.—१२ पं. अवघीयाठाईं.—१३ त. वेगळे त्या.

त्यांणीं मृत्तिकेचें करूनि अवघें । खेळतील दोघें पुरुषनारी ॥ ११ ॥
पुरुषनारी त्यांणीं ठेवियेलीं नावें । कवतुकभावें विचरती ॥ १२ ॥
विचरती जैसे साच भावें लोका । तैसें नाहीं सुख खेळतीया[1] ॥ १३ ॥
यांणीं जाणितलें आपआपणया । लटिकें हें वांयां खेळतों तें[2] ॥ १४ ॥
खेळतों ते आह्मी नव्हों[3] नारीनर । ह्मणोनि विकार नाहीं तयां ॥ १५ ॥
तयां ठावें आहे आह्मी अवघीं[4] एक । ह्मणोनि निःशंक खेळतील ॥ १६ ॥
तयां ठावें नाहीं हरिचिया गुणें । आह्मी कोणकोणें काय खेळों ॥ १७ ॥
काय खातों आह्मी कासया सांगातें । कैसें हें लागतें नेणों मुखीं ॥ १८ ॥
मुखीं चवी नाहीं वरी अंगीं लाज । वर्ण[5] याती काज न धरिती ॥ १९ ॥
न[6] धरिती कांहीं संकोच त्या मना । हांसतां याजना नाइकती ॥ २० ॥
नाइकती बोल आणिकांचे कानीं । हरि चित्तीं[7] मनीं बैसलासे ॥ २१ ॥
बैसलासे हरि जयांचिये चित्तीं । तयां नावडती मायबापें ॥ २२ ॥
मायबापें त्यांचीं नेती पाचारूनि । बळें परि मनीं हरि वसे ॥ २३ ॥
वसतील बाळा आपलाले घरीं । ध्यान त्या अंतरीं गोविंदाचें ॥ २४ ॥
गोविंदाचें ध्यान निजलिया जाग्या । आणीक वाउग्या न बोलती ॥ २५ ॥
न बोलती निजलिया हरिविण । जागृति[8] सपन एक जालें ॥ २६ ॥
एकविध सुख घेती नित्य[9] बाळा । भ्रमर परिमळालागीं तैसा[10] ॥ २७ ॥
तैसा त्यांचा[11] भाव घेतला त्यांपरी । तुका ह्मणे हरि बाळलीला ॥ २८ ॥

॥ १८ ॥

लीलाविग्रही तो लेववी खाववी । यशोदा[12] बैसवी मांडीवरी ॥ १ ॥

---

१ पं. खेळतिल्या.—२ पं. तो.—३ पं. न हो.—४ पं. अवघे.—५ दे. वरणा०.—६ दे. त. धरितील.—७ पं. ध्यानीं.—८ पं. जागृती हे स्वप्न.—९ पं. नित्या—१० दे. तैशा, पं. जैसा.—११ पं. त्या भाव घेतील—१२ त. एश्वदा.

मांडीवरी भार पुष्पाचिये परी । बैसोनियां करी स्तनपान ॥ २ ॥
नभाचा ही साक्षी पाताळापरता । कुर्वाळिते माता हातें त्यासि ॥ ३ ॥
हातें कुर्वाळुनी मुखीं घाली घांस । पुरे ह्मणे तीस पोट धालें ॥ ४ ॥
पोट धालें मग देतसे ढेंकर । भक्तीचें तें फार तुळसीदळ ॥ ५ ॥
तुळसीदळ भावें सहित देवापाणी । फार तें[1] त्याहुनि क्षीरसागरा[2] ॥ ६ ॥
क्षीराचा कांटाळा असे एकवेळ । भक्तीचें तें जळ गोड देवा ॥ ७ ॥
देवा भक्त जिवाहुनि आवडती । सकळ हि प्रीति त्यांच्याठायीं ॥ ८ ॥
त्यांचा[3] हा अंकित सर्व भावें हरि । तुका ह्मणे करी सर्व काज ॥ ९ ॥

॥ २९ ॥

जयेवेळीं[4] चोरूनियां नेलीं वत्सें । तयालागीं तैसें होणें लागे ॥ १ ॥
लागे दोहीं ठायीं करावें पाळण । जगाचा जीवन मायबाप ॥ २ ॥
माय जाल्यावरी[5] अवघ्या वत्सांची । घरीं वत्सें जीचीं तैसा जाला ॥ ३ ॥
जाला तैसा[6] जैसे घरींचे गोपाळ । आणिक सकळ मोहरी पांवे ॥ ४ ॥
मोहरी पांवे सिंगें वाहिल्या काहाळा । देखिला सोहाळा ब्रह्मादिकीं ॥ ५ ॥
ब्रह्मांदिकां[7] सुख स्वपनीं ही नाहीं । तैसें दोहीं ठायीं वोसंडलें ॥ ६ ॥
वोसंडल्या क्षीर अमुप त्या गायी । जैसी ज्याची आई तैसा जाला ॥ ७ ॥
लाघव कळलें ब्रह्मयासी[8] याचें । परब्रह्म साचें अवतरलें ॥ ८ ॥
तरले हे जन सकळ ही आतां । ऐसें तो विधाता बोलियेला ॥ ९ ॥
लागला हे स्तुती करूं अनंताची । चतुर्मुख वाची भक्ती स्तोत्रें ॥ १० ॥
भक्तिकाजें[9] देवें केला अवतार । पृथ्वीचा भार फेडावया ॥ ११ ॥

---

१ दे. त. "तें" नाहीं.—२ पं. त. क्षीरसागर.—३ त. तयाचा अंकित. दे. त्यांचा अंकित.—४ पं. जिये.—५ पं. त. जाला वरि.—६ पं. जैसातसा.—७ पं. ब्रह्मादिका.—८ पं. भक्तिकाजा.

॥ ४०४८ ॥

भोळे भक्त[1] भाव धरिती मानसीं । त्यांसी[2] हृषीकेशी जवळी च ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाव नाहीं मनीं अभाविक सदा । त्याचिया मी खेदा काय सांगों ॥ ध्रु. ॥
गणिकेसारिखीं[3] नामें उद्धरिलीं । सज्ञानें पडिलीं खटाटोपीं ॥ २ ॥
तुका ह्मणे काय शुद्ध माझी जाति । थोर केली ख्याती हरिनामें ॥ ३ ॥

॥ ४०४९ ॥

आड पडे काडी । तरि ते बहुत[4] पाणी खोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दुर्जनाचे[5] संगती । बहुतांचे घात होती ॥ ध्रु. ॥
एक पडे मासी । तरी ते बहु अन्न नासी ॥ २ ॥
तुका ह्मणे रांड । ऐसी कां ते व्याली भांड ॥ ३ ॥

॥ ४०५० ॥

पंढरीचें बा[6]भूत मोटें । आल्या गेल्या झडपी वाटे[7] ॥ १ ॥
तेथें[8] जाऊं नका कोणी । गेले नाहीं आले परतोनि ॥ २ ॥
तुका पंढरीसी गेला । पुन्हा जन्मा नाहीं आला ॥ ३ ॥

॥ ४०५१ ॥

बरवे दुकानीं बैसावें । श्रवण मनन असावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सारअसाराचीं[9] पोतीं । ग्राहिक पाहोनि करा[10] रितीं ॥ ध्रु. ॥
उगे चि फुंगवूं[11] नका गाल । पूर्ण सांठवावा माल ॥ २ ॥
सत्य तराजू पैं धरा । नका कृत्रिम[12] विकरा ॥ ३ ॥
तुका जाला वाणी । चुकवुनि चौऱ्यासीच्या खाणी ॥ ४ ॥

---

१ दे. त. भक्तिभाव.—२ पं. तया.—३ पं. गणिकेसारिखीं.—४ पं. वहु पाणी कोंडी.—५ पं. ऐसी दुर्जनाची संगती ।—६ पं. "बा" नाहीं.—७ त. नेटें.—८ पं. "तेथें जाऊं नका०" या कडव्याच्या पूर्वीं 'वहु खेचरीचे रान । जातां वेडें होय मन ॥' हें कडवें अधिक आहे.—९ दे. त. सारासाराचीं.—१० पं. "करा रितीं" यावदल "करीसी."—११ दे. पं. फुगों. त. फुगऊं.—१२ दे. त. कुडत्रिम.

॥ ४०५२ ॥

काय करूं आतां या मनां । न संडी विषयांची वासना[1] ।
प्रार्थितां ही राहेना । आदरें पतना नेऊं पाहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां धांवें[2] धावें गा श्रीहरी । गेलों वांयां नाहीं तरी ।
न दिसे कोणी आवरी । आणीक दुजा तयासी ॥ ध्रु ॥
न राहे एके ठायीं एकी घडी । चित्त तडतडा तोडी ।
भरलें[3] विषयभोवडीं । घालूं पाहे उडी भवडोहीं ॥ २ ॥
आशा तृष्णा कल्पना पापिणी[4] । घात मांडला माझा यांणीं ।
तुका ह्मणे चक्रपाणी । काय अजोनि पाहातोसी ॥ ३ ॥

॥ ४०५३ ॥

पाषाण परिस भूमि जांबूनद[5] । वंशाचा संबंध धातयाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सोनियाची पुरी समुद्राचा वेढा । समुदाय गाढा[6] राक्षसांचा ॥ ध्रु ॥
ऐसी सहस्र त्या सुंदरा कामिनी । माजी मुखरणी[7] मंदोदरी ॥ २ ॥
पुत्रपौत्राचा लेखा कोण करी । मुख्य पुत्र हरी इंद्रा आणी ॥ ३ ॥
चौदा चौकडिया आयुष्यगणना । बंधुवर्ग जाणा कुंभकर्ण ॥ ४ ॥
तुका ह्मणे ज्याचे देव बांदवडी । सांगातें कवडी गेली नाहीं ॥ ५ ॥

॥ ४०५४ ॥

पापाचीं संचितें देहासी दंडणा[8] । तुज नारायणा बोल नाहीं ॥ १ ॥

---

१ पं. विषयवासना.—२ दे. त. धांवधावें.—३ त. भरले विषयांचे वोढीं । देऊं पाहे बुडी भवडोहीं. ॥ दे. घालूं पाहे वा हे वुडि । या भवडोहीं.—४ पं. पापाणी.—५ पं. त. जां वुनद.—६ पं. रोकडा.—७ पं. मुख्य राणी.—८ दे. दंडण.

॥ ध्रु: ॥ पेरी कडू जिरें मागे अमृतफळें । अर्का वृक्षा केळें कैसीं येती ॥ ध्रु ॥
सुख अथवा दुःख भोग हा[2] देहाचा । नास हा ज्ञानाचा न[3] करावा ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां देवा कां रुसावें । मनासी पुसावें काय केलें ॥ ३ ॥

॥ ४०५५ ॥

लाभ पुढें करी । घात नारायण वारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी भक्ताची माउली । करी कृपेची साउली ॥ ध्रु ॥
माय बाळकासी । जीव भाव वेची तैसी ॥ २ ॥
तुका ह्मणे नाड । नाहीं शरणागता आड ॥ ३ ॥

॥ ४०५६ ॥

आपुलेंसें करुनी घ्यावें । आश्वासावें नाभीसें[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनि धरिले पाय । आवो माय विठ्ठले ॥ ध्रु ॥
कळलासे[5] सीणें[6] चित्ता । शम आतां करावा ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवीं वसें । मज नसें वेगळाँ[7] ॥ ३ ॥

॥ ४०५७ ॥

तुजविण कांहीं । स्थिर राहे ऐसें नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कळों आलें बहुता रीती । पांडुरंगा माझ्या चित्तीं ॥ ध्रु ॥
मोकलिली आस । सर्वभावें जालों दास ॥ २ ॥
तुका ह्मणे तूं चि खरा । येर[8] वाउगा पसारा ॥ ३ ॥

॥ ४०५८ ॥

खोंकरी आधणें[9] होय पाकसिद्धि । हें तों घडों कधीं शके चि ना ॥ १ ॥

---

१ त. अमतफळ । आर्की वृक्षा केळ०. दे. अमृतफळ । आर्का वृक्षफळें ०—२ दे. त. हो देहेचा.—३ पं. करूं नये.—४ त. नाभीसी.—५ त. वाढविली हे तळमळ चित्ता.—६ दे. सीन चिंता.—७ दे. त. वेगळे—८ पं. येका उगा०.—९ दे. आधन. पं. आंधण.

खापराचे अंगीं घासितां परिस । न पालटे कीस काढिलिया ॥ २ ॥
पालथे घागरी रिचवितां जळ । तुका ह्मणे खळ तैसे कथे ॥ ३ ॥

॥ ४०५९ ॥

नागलें देखोनि चांगलें बोले । आपुलें वेचूनि त्याजपुढें खुलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अधमाचे आंगळ गुण । उचित नेणें तो धर्म कोण ॥ ध्रु ॥
आर्तभूता न घाली[1] पाण्याचा चुळ । न मागे त्यासी घाली साखर गुळ ॥ २ ॥
एकासी[3] आड पडोनी होंकरी । एकासी देखोनि लपवी भाकरी ॥ ३ ॥
एकासी धड न बोले वाचा । एकासी ह्मणे मी तुझे[4] बांदीचा ॥ ४ ॥
तुका ह्मणे ते गाढवपशु[5] । लाभविण केला आयुष्यनाशु ॥ ५ ॥

॥ ४०६० ॥

पिंडपोषकाच्या[6] जळो ज्ञानगोष्टी । झणी दृष्टिभेटी न हो त्याची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं संतचिन्ह उमटलें अंगीं । उपदेशालागीं पात्र जाला ॥ २ ॥
पोहों नेणे[7] कासे लावितो आणिका । ह्मणावें त्या मूर्खा काय आतां ॥ ३ ॥
सिणलें तें गेलें सिणलियापासीं । जाली त्या दोघांसी एक गति ॥ ४ ॥
तुका ह्मणे अहो[9] देवा दिनानाथा । दरुषण[10] आतां नको त्याचें ॥ ५ ॥

॥ ४०६१ ॥

संतचिन्हें लेउनि अंगीं । भूषण मिरविती जगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाडिले दुःखाचे सागरीं । वहावले ते[11] शिवपुरीं ॥ ध्रु ॥

---

१ दे. घली.—२ पं. न मागत्यास देई साकर गुळ.—३ पं. 'एकासी आड०' याच्या अधीं पुढचें कडवें 'एकासी धड' हें आहे; आणि 'एकासी आड' हें कडवें 'येका देखोनी लपवी भाकरी । येकासी आड पडोनी हो करी' । असें आहे.—४ पं. तुमच्यावंदीचा. पं. —५गावपशु.—६ पं.०पोसकाच्या. दे. त. पोशकाच्या.—७ दे. नये.—८ पं. ऐसें.—९ पं. देवा अहो.—१० पं. दर्शन मागुता नको०.—११ पं. 'ते' नाहीं.

कामक्रोधलोभ चित्तीं । वरिवरि दाविती विरक्ती ॥ २ ॥
आशापाशीं बांधोनि चित्त । ह्मणती जालों आह्मी मुक्त ॥ ३ ॥
त्यांचें लागले संगती । जाली त्यांसी ते चि गति ॥ ४ ॥
तुका ह्मणे शब्दज्ञानें । जग नाडियेलें तेणें ॥ ५ ॥

॥ ४०६२ ॥

दोष करूनि आह्मी पतित सिद्ध जालों । पावन मार्गीं आलों ब्रीद तुझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां पतिता तारावें कीं ब्रीद हें सोडावें । यांत जें पुरवे तें चि सांगा ॥ ध्रु ॥
उद्धार तुमच्यानें नव्हे हो श्रीहरि । सोडा झडकरी ब्रीद आतां ॥ २ ॥
तें ब्रीद घेउनी हिंडों दारोदारीं । सांगूं तुझी कीर्ती रे पांडुरंगा ॥ ३ ॥
देवें हारविलें ब्रीद हें सोडिलें । पतितें जिंकिलें आह्मीं देवा ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मीं उठलों दैन्यवरि । विचारा श्रीहरी तुह्मी आतां ॥ ५ ॥

॥ ४०६३ ॥

राम कृष्ण ऐसीं उच्चारितां नामें । नाचेन मी प्रेमें संतांपुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय घडेल तें घडो ये सेवटीं । लाभ हांणी तुटी देव जाणे ॥ ध्रु ॥
चिंता मोह आशा ठेवुनि निराळीं । देईन हा बळी जीव पायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं उरों नेदीं उरी । सांडीन हे थोरी ओवाळोनी ॥ ३ ॥

॥ ४०६४ ॥

देव धरी नाना सोंगें । नाम श्रेष्ठ पांडुरंग ॥ १ ॥

---

१ पं. वरी दाविती.—२ पं. आह्मी जालों.—३ पं. त्यांची.—४ पं. त. 'हें' नाहीं.—५ पं. तो.—६ पं. तुझी हरि कीर्ति जगा.—७ पं. उठों—८ पं. उच्चारीन.—९ पं. या सेवटीं.—१० पं. आणि.—११ पं. ठेवीन.—१२ पं. सोंग.

॥ ध्रु. ॥ तो हा गवळियाचे घरीं । नाम सारितो मुरारि ॥ ध्रु ॥
धन्य यशोदेचें[1] प्रारब्ध । नाचे अंगणीं गोविंद ॥ २ ॥
ऐशीं[2] भक्तांसाटीं देवें । नाना धरियेलीं नांवें ॥ ३ ॥
होय दासांचा जो दास । तुका ह्मणे विठ्ठलास ॥ ४ ॥

॥ ४०६५ ॥

आइत्या भाग्या[3] धणी व्हावें । केणें[4] घ्यावें न सरे तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केणें[4] आलें पंढरपुरीं[6] । उधाराचें लाभीक ॥ ध्रु ॥
बाखराची करुनी रीती । भरा पोतीं लवलाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे संतांपाडें । करूं फुडें वाखती ॥ ३ ॥

॥ ४०६६ ॥

जन्मोजन्मीं दास । व्हावें हे[7] चि माझी आस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदीं हरी ॥ ध्रु ॥
संतसमागम । अंगीं स्थिरावलें[8] प्रेम ॥ २ ॥
स्नान चंद्रभागे । तुका ह्मणे हें चि मागें ॥ ३ ॥

॥ ४०६७ ॥

कांगा कोणी न ह्मणे पंढरीची आई । बोलाविते पाहीं चाल नेटें ॥ १ ॥
तेव्हां माझ्या मना होईल[9] समाधान । जाइल[10] सर्व शीण जन्मांतरींचा ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी होशिलें[11] माउली । वोरसोनि घाली प्रेमपान्हा ॥ ३ ॥

॥ ४०६८ ॥

वेद अनंत[12] बोलिला । अर्थ इतका चि साधिलें[13] ॥ १ ॥

---

१ पं. यशोदा प्रारब्ध.—२ दे. ऐशा.—३ पं. भागाधीन व्हावें । कोणें घ्यावें मस्तकीं ॥—४ दे. केनें.—५ दे. आहे.—६ पं. पंढरपुरा.—७ पं. 'हे' नाहीं.—८ दे. त. थिरावलें—९ पं. होय.—१० पं. जाय.—११ पं. होईल.—१२ दे. त. अनंता.—१३ दे. त. शोधिला.

॥ ध्रु. ॥ विठोबासी[1] शरण जावें । निजनिष्ठा[2] नाम गावें ॥ ध्रु ॥
सकळशास्त्रांचा विचार ।, अंतीं इतका चि निर्धार ॥ २ ॥
अठरापुराणीं सिद्धांत । तुका ह्मणे हा चि हेतु[3] ॥ ३ ॥

॥ ४०६९ ॥

मायेचा मारिला अंगीं नाहीं घाव । दुःखें तरी लव धडधडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लभे हा काळ[4] न सुटे हातींचा । न बोलवे वाचा खोडावली[5] ॥ध्रु॥
न पवे धांवणें न[6] पवे चि लाग । न[7] चलतां माग धरावया ॥ २ ॥
भेणें तरि अंगा लावियेल्या राखा । परी[8] त्यासी वाखा करितसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे नेदी हाका मारूं देवा । लोकापाठी हेवा लागलासे ॥ ४ ॥

॥ ४०७० ॥

धिग तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माया प्रसवली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कठिण[9] त्हदय तया चांडाळाचें । जो नेणे[10] पराचें दुःख कांहीं ॥ध्रु॥
आपुला हा प्राण तैसे सकळ लोक । न करी विवेक पशु जैसा ॥ २॥
तुका ह्मणे सुखें[11] कापीतसें गळे । आपुलिया वेळे[12] रडतसे ॥ ३ ॥

॥ ४०७१ ॥

गरुडावरि बैसोनि येतो जगजेठी । त्याचे चरणीं मिठी घालूं चला ॥१ ॥
॥ ध्रु. ॥ सांवळें रूपडें देखिलें लोचनीं । शंख चक्र दोन्ही शोभताहे ॥ध्रु ॥
पीतांबर झळके हें चि त्याची खूण । वाकी रुणझुण करिताती ॥ २ ॥
गरुडाचा चपेटा येत असे नेटें । कस्तुरीमळवट शोभताहे ॥ ३ ॥
पदक[13] एकावळी शोभताहे कंठीं । तुका ह्मणे मिठी घालूं चला ॥ ४ ॥

---

१ पं. विठोवाला.—२ दे. निजनिष्ट.—३ त. होत.—४ पं. कळ.—५ पं. वेडावली.—६ पं. न लपवे चि लाग । न लगे च माग०.—७ पं. तरी यासी.—८ त. दे. 'जो' नाहीं.—९ त. नेणे चि पराचें.—१० त. हीण. पं., कांहीं.—११ पं. सुख कापीतसे गळा ।.—१२ पं. बेळा.—१३ पं. पद.

॥ ४०७२ ॥

नाहीं पाक होत उफराटे चाली । बोलिली ते केली व्हावी नीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं मानू येत वांजटाचे[1] बोल । कोरडे च फोल चवी नाहीं ॥ ध्रु ॥
तरुवरा[2] आधीं कोठें आहे फळ । चावटा बरळ ह्मणा त्यासी ॥ २ ॥
तुका ह्मणे किती ठकलीं[3] बापुडीं । गव्हा आहे[4] गोडी मांडे पुऱ्या ॥ ३ ॥

॥ ४०७३ ॥

जाली हरिकथा रंग वोरसला । उचितासी आला पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांटितो[5] हें प्रेम उचिताचा दाता । घेई रे तूं आता धणीवरि ॥ ध्रु ॥
प्रेम देऊनियां अवघीं सुखीं केलीं । जीं[6] होतीं रंगलीं[7] विटलीं तीं ॥ २ ॥
तुकें हें दुर्बळ देखियलें संतीं । ह्मणउनि पुढती आणियेलें ॥ ३ ॥

॥ ४०७४ ॥

संकल्पिलें तुज सकळ[8] ही भाव । कोण एक ठाव उरला तेथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ इंद्रियव्यापार जेंजें कांहीं कर्म । करितों ते धर्म सकळ तुझे ॥ ध्रु ॥
माझें हित फार लागला विचार । तुज सर्व भार चालवणें ॥ २ ॥
जो कांहीं लौकिक करिसी तो तुझा । अपमान पूजा कांहींतरि ॥ ३ ॥
तुका ह्मणे मी तों राहिलों निश्चिंत[10] । तुज कळे हित तैसें करीं ॥ ४ ॥

॥ ४०७५ ॥

भय नाहीं भेव । अनुतापीं नव्हतां जीव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेथें देवाची तळमळ । तेथें काशाचा विठ्ठाळ ॥ ध्रु ॥
उच्चारितां दोष । नाहीं उरों देत लेश ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्तें[11] । होय आवडी मिश्रित ॥ ३ ॥

---

१ पं. वाजटाचे.—२ पं तरुवरामधीं कोटे० । चावाटा०.—३ पं. ठकिली तातडी ।.—४ पं. नाहीं.—५ पं. वाटीता —६ दे. त. जें.—७ त. वीठली रंगलीं तीं.—८ पं. सकळ देहभाव.—९ पं. सुख दुःख धर्म०.—१० पं. निश्चित.—११ पं. चित्ता । होय आवडी मिश्रिता ॥.

॥ ४०७६ ॥

ध्यानीं ध्यातां पंढरिराया । मनासहित[1] पालटे काया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें बोला कैंची उरी । माझें मीपण जालें हरि ॥ ध्रु ॥
चित्तचैतन्यीं पडतां मिठी । दिसे हरिरूप अवघी सृष्टि ॥ २ ॥
तुका ह्मणे सांगों काय । एकाएकीं हरिवृत्तिमय ॥ ३ ॥

॥ ४०७७ ॥

कोणा ही केंडावें[2] हा आह्मां अधर्म । जोजो पावे श्रम तोतो देव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनि चित्ता सिकविलें वोजें । आतां हें चि दुजें न बोलावें ॥ ध्रु ॥
हालविलें[3] जरि परउपकारें । जिव्हे पाप खरें उपाधीचें ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव प्रारब्धा आधीन । कोण वाहे सीण करुणा शोभे ॥ ३ ॥

॥ ४०७८ ॥

देव तिळीं आला । गोडें[4] गोड जीव धाला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साधला हा पर्वकाळ । गेला अंतरींचा मळ ॥ ध्रु ॥
पापपुण्य गेलें । एका स्नानें चि खुंटलें[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे वाणी । शुद्ध जनार्दनीं जनीं[6] ॥ ३ ॥

॥ ४०८९ ॥

काय उणें मज पांडुरंगा पायीं । रिद्धिसिद्धि ठायीं वोळगती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोण पाहे सुखा नासिवंताकडे । तृष्णेचें बापुडें नव्हों[7] आह्मी ॥ ध्रु ॥
स्वर्गसुखें[8] आह्मीं केलीं पावटणी । पापपुण्यें दोन्ही उलंडिलीं[9] ॥ २ ॥
तुका ह्मणे घरीं आणिलें वैकुंठ । वसविली पेठ वैष्णवांची ॥ ३ ॥

---

१ पं. मनेसहित.—२ पं. केडाव.—३ पं. बोलविले जरी परउपकारे ।—४ दे. गोडगोड.—५ पं. खंडलें.—६ पं. 'जनीं' नाहीं.—७ दे. नहों.—८ पं. सर्व सुखें.—९ पं. उडविलीं.

॥ ४०८० ॥

माझें मागणें तें किती । दाता लक्ष्मीचा[1] पति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तान्हेल्यानें पीतां पाणी । तेणें[2] गंगा नव्हे उणी ॥ ध्रु ॥
कल्पतरु जाला देतां[3] । तेथें पोटाचा मागता ॥ २ ॥
तुका ह्मणे संतां[4] ध्यातां । परब्रह्म आलें हाता ॥ ३ ॥

॥ ४०८१ ॥

अर्भकाचे साटीं । पंतें हातीं धरिली पाटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसे संत जगीं । क्रिया करुनी दाविती अंगीं ॥ ध्रु ॥
बालकाचे चाली । माता जाणुनि पाउल घाली ॥ २ ॥
तुका ह्मणे नाव । जनासाटीं उदकीं ठाव ॥ ३ ॥

॥ ४०८२ ॥

जन्मोजन्मींची[5] संगत । भेटी जाली अकस्मात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां सोडितां सुटेना । तंतु प्रीतीचा तुटेना ॥ ध्रु ॥
माझें चित्त तुझ्या पायां । मिठी पडिली पंढरिराया ॥ २ ॥
तुका ह्मणे अंतीं । तुझी माझी एक गति[6] ॥ ३ ॥

॥ ४०८३ ॥

सांग पांडुरंगा मज हा उपाव । जेणें तुझे पाव आतुडति ॥ १ ॥
न कळे हा निर्धार[7] ब्रह्मादिकां पार । कायसा विचार माझा तेथें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां धरुनियां धीर । राहूं कोठवर मायबापा ॥ ३ ॥

---

१. दे. लक्ष्मीचा.—२ पं. तेव्हां.—३ पं. दाता.—४ त. सतंत.—५ पं. जन्मोजन्मीचें संचित—६ पं. ज्योति.—७ त. पार.

॥ ४०८४ ॥

काय फार जरी जालों मी शाहाणा । तरी[1] नारायणा नातुडसी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ काय जालें[2] जरी मानी मज जन । परि नातुडति चरण तुझे देवा ॥ ध्रु ॥
काय जालें[2] जरी जालों उदासीन । परि[3] वर्म भिन्न तुझें देवा ॥ २ ॥
काय जालें[4] जरी केले म्यां सायास । ह्मणवितों दास भक्त तुझा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज दाविल्यावांचून । तुझें वर्म कोण जाणे देवा ॥ ४ ॥

॥ ४०८५ ॥

जातां पंढरीच्या मार्गें । काय वर्णू सुखा[5] मग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घडे लाभ लक्षकोटि । परब्रह्मीं होईल भेटी ॥ ध्रु ॥
नाम गर्जत येतीं संत । त्यांच्या दर्शनें[5] होईजे मुक्त ॥ २ ॥
जो अलक्ष्य ब्रह्मादिकां । आला संनिध ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ ४०८६ ॥

सारासार[6] विचार करा उठाउठी । नाम धरा कंठीं विठोबाचें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तयाच्या चिंतनें निरसलें[7] संकट । तरलों दुर्घट भवसिंधु ॥ ध्रु ॥
जन्मोनियां कुळीं वाचे स्मरे राम । धरी हा चि नेम अहिर्निशीं ॥२॥
तुका ह्मणे कोटी कुळें तीं पुनीत । भावें गातां गीत विठोबाचे ॥ ३ ॥

॥ ४०८७ ॥

मोल[8] घेऊनियां कथा जरी करीं । तरी भंगो हरी देह माझा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ माझी कथा करा ऐसें ह्मणें कोणा । तरी[9] झडो जाणा जिव्हा माझी ॥ ध्रु ॥

---

१ त. काय जालों जरी. पं. काय जाले तरी.—२ त. जालों जरीं०. पं. जालों तरी.—३ पं. तरी.—४ पं. जालों तरी.—५ पं. दर्शनें चि मुक्त.—६ दे. 'सारासार०' हें कडवें नाहीं.—७ पं. निरसेल० । तराल दुर्घट०.—८ पं. द्रव्य.—९ पं. तरी नारायणा जिव्हा झडो ।

साह्य तूं जालासी काय उणें तुपें । आणीक भूतांपें काय मागों[1] ॥२ ॥
तुका ह्मणे सर्व सिद्धि तुझे पायीं । तूं माझा गोसावी पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ४०८८ ॥

जरि हा हो कृपा करिल नारायण । तरी हें चि ज्ञान ब्रह्म होय ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कोठोनियां कांहीं न लगे आणावें । न लगे कोठें जावें तरावया ॥ध्रु॥
जरी देव कांहीं धरिल पैं चित्तीं । तरि हे चि होती दिव्य चक्षु[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे देव दावील आपणा । तरि जीवपणा ठाव नाहीं ॥ ३ ॥

॥ ४०८९ ॥

पांडुरंगा कृपाळुवा दयावंता । धरिसील सत्ता सकळ ही ॥ १ ॥
कां जी आह्मांवरी आणिकांची सत्ता । तुह्मासी[3] असतां जवळिक ॥ २॥
तुका ह्मणे पायीं केलें निवेदन । उचित हें दान करीं आतां ॥ ३ ॥

॥ ४०९० ॥

रात्री दिवस आह्मां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥ १ ॥
जीवा ही आगोज पडती आघात । येऊनियां नित्य[4] नित्य करी ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचें काळें केलें तोंड ॥ ३ ॥

॥ ४०९१ ॥

होइन खडे गोटे । चरणरज साने मोठे ।
पंढरीचे वाटे । संतचरणीं लागेन ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आणीक[5] काय दुजें । म्यां[6] मागणें तुजपासीं ।
अविट[7] तें सुख । भय नास नाहीं ज्यासी ॥ ध्रु ॥

---

१ पं. पांगों.—२ पं. वस्तु.—३ पं. तु होसी.—४ पं. नित्या नित्य वारु ।.—५ पं. आणि.—६ पं. मी मागेन तुजपासी ।.—७ पं. आठवितीं सुख ।.

होइन मोचे वाहणा । पायीं सकळां[1] संतजनां ।
मांजर सुकर[2] सुणा । जवळी शेष घ्यावया ॥ २ ॥
सांडोवा पायरी । वाहळ बावी गंगातिरी ।
होइन तयावरी । संतसज्जन चालती ॥ ३ ॥
लागें[3] संतां पायीं । ऐसा ठेवीं भलते[4] ठायीं ।
तुका ह्मणे देई । धाक नाहीं जन्माचा ॥ ४ ॥

॥ ४०९२ ॥

माझिया जीवाचा[5] मज निरधार । न[6] करीं उत्तर जनासवें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आपुलें कारण साधों जी विचार । करावा हा धीर धरूनियां ॥ध्रु॥
काय करावियां आणिका[7] या युक्ति । काय नव्हे भक्ति विठोबाची ॥ २ ॥
एक पुढें गेले वाट दावूनियां । मारग तो वांयां कोण सांडी ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझी विठोबासी चिंता । भेईना सर्वथा न घडे तें ॥ ४ ॥

॥ ४०९३ ॥

कासयासी[8] व्हावें जीतांचि मुक्त । सांडुनियां थीतें[9] प्रेमसुख ॥ १ ॥
॥ध्रु.॥ वैष्णवांचा दास जाला नारायण । काय त्या मिळोन असे[10] काम ॥ध्रु॥
काय त्या गांठीचें पडलें सुटोन । उगला[11] चि बैसोन धीरु धरीं ॥ २ ॥
सुख आह्मांसाटीं केलें हें निर्माण । निर्दैव तो कोण हाणे लाता ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज न लगे सायुज्यता[12] । राहेन या संतां समागमें ॥ ४ ॥

---

१ त. सकळ.—२ दे. पं. शुकर.—३ त. लागेन.—४ दे. त. भलता.—५ पं. मनाचा.—६ पं. 'न करीं० व 'आपुलें आरण'०, हे दोन चरण नाहींत.—७ पं. आणिकाच्या युक्ति.—८ त. कासया होआवें. दे. कासया व्हावें.—९ दे. पं. थीतें.—१० पं. असों सुखी।.—११ पं. उगेचि बैसोन धीर धरूं।.—१२ दे. त. पं. सायोज्यता.

॥ ४०९४ ॥

आवडे पंढरी भीमा पांडुरंग[1] । चंद्रभागा लिंग पुंडलीक ॥ १ ॥
कामधेनु कल्पतरु चिंतामणी । आवडीची धणी पुरवीती ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवा थोर जालें सुख । नाठवे हे भूक तान कांहीं ॥ ३ ॥

॥ ४०९५ ॥

लाडें[2] भाकितों करुणा । तूं रे उदाराचा राणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करिसी आमुचा सांभाळ । तूं रे माउली स्नेहाळ ॥ ध्रु ॥
नाहीं चिंता रे आह्मांसी । तूं चि भार चालविसी ॥ २ ॥
आह्मी जालों उदासीन । तूं चि करिसी जतन ॥ ३ ॥
आह्मां नाहीं जीवनास[3] । तूं चि पुरविसी घास[4] ॥ ४ ॥
तुका ह्मणे भलते सर्वे । जातां मागें मागें धांवे ॥ ५ ॥

॥ ४०९६ ॥

आह्मां हें सकळ । तुझ्या पायांचें चि बळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करूं अमृताचें पान । दुजें नेणों कांहीं आन ॥ ध्रु ॥
जयाचा जो भोग । सुख दुःख पीडा रोग ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । तुझे पायीं माझा ठेवा ॥ ३ ॥

॥ ४०९७ ॥

प्रपंच परमार्थ संपादोनि[5] दोन्ही । एक ही निदानीं न[6] घडे त्यासी ॥ १ ॥
दोहीं पैंवावरी ठेवूं जातां हात । शेवटीं[7] अपघात शरीराचा ॥ २ ॥
तुका ह्मणे तयां दोहींकडे धका । शेवटीं तो नरकामाजी पडे ॥ ३ ॥

---

१ द. पांडुरंग.—२ त. लाड.—३ पं. जीवानास.—४ पं. आस.—५ पं. संपादिन.—६ पं. नन्हे त्यासी.—७ पं. होय.—८ पं. त्यासी.

॥ ४०९८ ॥

संसारा आलिया एक सुख आहे । आठवावे पाय विठोबाचे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ येणें होय सर्व संसार सुखाचा । न लगे दुःखाचा लेश कांहीं ॥ध्रु॥
घेईल तयासी सोपें आहे सुख । बोलियेलें मुखें नारायण ॥ २ ॥
सांगितली सोय करुणासागरें । तुह्मां कांहो बरें न वाटतें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेणें उपकार केला । भोळ्या भाविकाला तरावया ॥ ४ ॥

॥ ४०९९ ॥

आह्मां भय धाक कोणाचा रे पाहें । काळ मशक काय मानव हे ॥१॥
॥ध्रु.॥ आह्मांसी ते काय चिंता या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥ध्रु॥
काय करावी हे कोणाची मान्यता । करितां अनंता कोण वारी ॥ २ ॥
नाहीं शीण आह्मां जालें कवतुक । पुनीत हे लोक करावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे खातों आनंदाचे लाडू । नका चरफडूं घ्या रे तुह्मी ॥ ४ ॥

॥ ४१०० ॥

तांबियाचें[1] नाणें न चले खऱ्या मोलें । जरी हिंडविलें देशोदेशीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ करणीचें कांहीं न मने सज्जना । यावें लागे मना वृद्धांचिया ॥ध्रु॥
हिरियासारिखा[2] दिसे शिरगोळा[3] । पारखी ते डोळां न पाहाती ॥ २ ॥
देऊनियां भिंग कामाविलें मोतीं । पारखिया हातीं घेतां नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय नष्टोनियां व्यर्थ । आपुलें हें चित्त आपणा ग्वाही ॥ ४ ॥

॥ ४१०१ ॥

चित्ता मिळे त्याचा संग रुचिकर । क्षोभवितां[4] दूर तोंचि भलें ॥ १ ॥

---

१ दे. तांबगी हें नाणें.—२ दे. पं. हिरया०.—३ पं. ब्रह्मगोळा.—४ पं. क्षोभविते दुर ते चि०.

॥ ध्रु. ॥ ऐसी परंपरा आलीसे चालत । भलेत्याची[1] नीत त्यागावरी ॥ ध्रु ॥
हो कां पिता पुत्र बंधु कोणी तरि । विजाति[2] संग्रहीं धरूं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्य पाळावें वचन । अन्यथा आपण करूं नये ॥ ३ ॥

॥ ४१०२ ॥

आपुली[3] कसोटी शुद्ध राखी कारण । आगीनें भूषण अधिक पुट[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं कोणासवें बोलणें लागत । निश्चितीनें[5] चित्तसमाधान ॥ ध्रु ॥
लपविलें तें ही ढेंकरें उमटे । खोटियाचें खोटें उर फोडी ॥ २ ॥
तुका ह्मणे निंदा स्तुति दोन्ही वाव । आपुलाला भाव फळा[6] येतो ॥ ३ ॥

॥ ४१०३ ॥

आणिकांच्या घातें मानितां संतोष । सुखदुःख दोष अंगीं[7] लागे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें मनीं वाहूं नयेती[8] संकल्प । करूं नये पाप भांडवल ॥ ध्रु ॥
क्लेशांची[9] हे[10] चित्तीं राहाते कांचणी । अंग्नीत[11] टाकोनी ठाव जाळी ॥ २ ॥
तुका ह्मणे येणें[12] घडे पुण्यक्षय । होणार तें होय प्रारब्धें[13] चि ॥ ३ ॥

॥ ४१०४ ॥

अज्ञानाची भक्ति इच्छिती संपत्ती । तयाचिये मती[14] बोध कैंचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैंचा ॥ ध्रु ॥
अज्ञानाचें कर्म फळीं ठेवी मन । निष्काम साधन तया कैंचें ॥ २ ॥
अज्ञानाचें ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैंचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे जळो ऐसियांचें तोंड । अज्ञानाचें बंड वाढविती ॥ ४ ॥

---

१ पं. भले त्या०.—२ त. इजा ती. दे. इंजाति.—३ पं. आपुलिया.—४ पं. पुढा.—५ दे. निश्चितीनें.—६ पं. कळों.—७ पं. आणी.—८ पं. न ये चि.—९ पं. किल्मिषाची चित्तीं राहतां०—१० दे: 'हे' नाहीं.—११ पं. आगीतें.—१२ पं. कोपें.—१३ पं. प्रारब्धीचें।.—१४ पं. चित्तीं.

॥ ४१०५ ॥

गुळें माखोनियां दगड ठेविला । वर दिसे भला लोकाचारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतरीं विषयाचें लागलें पैं पिसें । बाहिरल्या वेषें भुलवी लोकां ॥ ध्रु ॥
ऐसिया डांभिकां[1] कैची हरिसेवा । नेणे चि सद्भावा कोणे काळीं ॥ २ ॥
तुका ह्मणे येणें कैसा[2] होय संत । विटाळलें चित्त कामक्रोधें ॥ ३ ॥

॥ ४१०६ ॥

आयुष्य वेचूनि कुटुंब पोसिलें । काय हित केलें सांग बापा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फुकाचा चाकर जालासी काबाडी । नाहीं सुख घडी भोगावया ॥ ध्रु ॥
दुर्लभ मनुष्यजन्म[3] कष्टें पावलासी । दिला कुटुंबासी कामभोग ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें आयुष्य नासिलें । पाप तें सांचिलें पतनासी ॥ ३ ॥

॥ ४१०७ ॥

अनंत लक्षणें वाणितां अपार । संताचें तें घर सांपडेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जये घरीं संत राहती आपण । तें तुह्मां ठिकाणं आंतुडेना ॥ ध्रु ॥
ठिकाण धरूनी पाहवे ते संत । उगा च अकांत करूं नये ॥ २ ॥
संत होऊनियां संतांसी पाहावें । तारि च तरावें तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ४१०८ ॥

संतांचा पढीयां[4] कैशापरि लाहो । नामाचा आठवो कैसा राहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हे चि थोर चिंता लागली मनासी । निजतां निद्रेसी न लगे डोळा ॥ ध्रु ॥

---

१ पं. दांभिका.—२ पं. कैचा.—३ पं. मनुष्यदेह.—४ दे. त. पढीया वो कैशा०.

जेवितां जेवणीं न लगे गोड धड । वाटतें काबाड विषयसुख ॥ २ ॥
ऐसिया संकटीं पाव कृपानिधी । लावीं संतपदीं प्रेमभावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी नेणों कांहीं हित । तुजविण अनाथ पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ४१०९ ॥

पंढरीचा वास धन्य ते चि प्राणी । अमृताची वाणी दिव्य देह[1] ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मूढ मतिहीन दुष्ट अविचारी । ते होती पंढरी दयारूप ॥ ध्रु ॥
शांति क्षमा अंगीं विरक्ति सकळ । नैराश्य निर्मळ नारी नर ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं वर्णा अभिमान । अवघे[2] जीवनमुक्त लोक ॥ ३ ॥

॥ ४११० ॥

जेणें तुझी कास भावें धरियेली । त्याची नाहीं केली सांडी देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय माझा भोग आहे तो न कळे । सुखें तुह्मी डोळे झांका देवा[3]
॥ ध्रु ॥
राव रंक तुह्मां सारिके चि जाणा । नाहीं थोर साना तुह्मांपासीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मीं आपंगिलें भक्तां । माझिया संचिता कृपा नये ॥ ३ ॥

॥ ४१११ ॥

देखीचें तें ज्ञान करावें तें काई । अनुभव नाहीं आपणासी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ इंद्रियांचे[4] गोडी ठकलीं बहुतें । सोडितां मागुतें आवरेना ॥ ध्रु ॥
युक्तीचा आहार नीतीचा वेव्हार । वैराग्य तें सार तरावया ॥ २ ॥
नाव[5] रेवाळितां घाला घाली वारा[6] । तैसा तो पसारा[7] अहंतेचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे बुद्धि आपुले अधीन । करी नारायण आतुडे तों ॥ ४ ॥

---

१ पं. देहे. दे. त. देहो.—२ पं. अवघेचि.—३ पं. वांयां.—४ पं. इद्रियांची.—५ त. पं. नावनावलितां.—६ पं. वर.—७ पं. पसर.

॥ ४११२ ॥

नर नारी बाळें[1] अवघा नारायण । ऐसें माझें मन करीं देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न यो काम क्रोध द्वेष निंदा द्वंद । अवघा गोविंद निःसंदेह ॥ ध्रु ॥
असावें म्यां सदा विषयीं विरक्त । काया वाचा चित्त तुझे पायीं ॥ २ ॥
करोनियां साह्य पुरवीं[2] मनोरथ । व्हावें कृपावंत तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ४११३ ॥

आपुल्या पोटासाटीं । करी लोकांचिया गोष्टी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेणें घातलें संसारीं । विसरलां तो चि हरी ॥ ध्रु ॥
पोटा घातलें[3] अन्न । न ह्मणे पतितपावन ॥ २ ॥
मी कोठीलें[4] आणि कोण । हें न कळे ज्यालागून ॥ ३ ॥
तुका ह्मणे नरस्तुति । करितो भाट त्रिजगतीं ॥ ४ ॥

॥ ४११४ ॥

स्वयें आपण चि रिता । रडे पुढिलांच्या हिता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सेकीं[5] हें ना तेंसें जालें । बोलणें तितुकें वांयां गेलें ॥ ध्रु ॥
सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ॥ २ ॥
तुका ह्मणे गाढव लेखा । जेथें भेटेलें[6] तेथें ठोका ॥ ३ ॥

॥ ४११५ ॥

जगीं कीर्ति व्हावी । ह्मणोनी जालासी[7] गोसावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहुत केलें पाठांतर । वर्म राहिलेंसे[8] दूर ॥ ध्रु ॥

---

१ पं. वाळ.—२ पं. करवीं.—३ पं. घाली.—४ पं. कोटील.—५ पं. सेखीं.—६ त. देखाल. पं. जाइल.—७ पं. जालासे.—८ पं. राहिलें तें.

चित्तीं नाहीं अनुताप । लटिकें भगवें स्वरूप ॥ २ ॥
तुका ह्मणे सिंदळीच्या । व्यर्थ श्रमविली वाचा ॥ ३ ॥

॥ ४११६ ॥

प्राक्तनाच्या योगें आळशावरी गंगा । स्नान काय जगा करूं नये ॥१॥
॥ ध्रु. ॥ उभी कामधेनु मांगाचे अंगणीं । तिसी काय ब्राह्मणीं वंदूं नये ॥ ध्रु ॥
कोढियाचे हातें परिसें होय सोनें । अपवित्र ह्मणोन घेऊं नये ॥ २ ॥
यातिहीन जाला गांवींचा मोकासी । त्याच्या वचनासी मानूं नये ॥३॥
भावारूढ तुका मुद्रा विठोबाची । न मनी तयांचीं तोंडें काळीं ॥ ४ ॥

॥ ४११७ ॥

बोलिलों उत्कर्षें । प्रेमरस दासत्वें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साच करिता नारायण । जया शरण गेलों तो ॥ ध्रु ॥
समर्थ तो आहे ऐसा । धरिली इच्छा पुरवी ॥ २ ॥
तुका ह्मणे लडिवाळाचें । द्यावें साचें करूनियां ॥ ३ ॥

॥ ४११८ ॥

विचा केला ठोबा । ह्मणोनि नांव तो विठोबा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां रे नेणां त्याचें नांव । काय वेदासि नाहीं ठावें ॥ ध्रु ॥
शेष स्तुती प्रवर्तला । जिव्हा चिरूनि पलंग जाला ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्ता । ज्याची काळाचिये माथा ॥ ३ ॥

---

१. दे. मागिलें.—२ पं. दास्यत्वें. दे. त. दाशत्वें.—३ पं. पुरविती.—४ पं. करूनि.—५ त. ठावें.

॥ ४११९ ॥

भ्रतारअंगसंगें सुखाची वेवस्था । आधीं तों सांगतां नये कोणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तथापि सांगणें कुमारिकेपाशीं । ते काय मानसीं सुख मानी ॥ ध्रु ॥
तैसा आत्मबोध आधीं बोलों नये । बोलासी तो काय सांपडेल ॥ २ ॥
तथापि सांगणें बहिर्मुखापाशीं । तो काय संतोषासी मूळ होय ॥ ३ ॥
तुका ह्मणे संत सुखाचे विभागी । ब्रह्मानंद जगीं साधुरूपें ॥ ४ ॥

॥ ४१२० ॥

कलयुगामाजी थोर जालें बंड । नष्ट लोक लंड जाले फार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न धरिती सोय न पुसतीं कोणा । येतें जैसें मना तैसें चाले ॥ ध्रु ॥
सज्जनांचा वारा टेकों नेदी द्वारा । ऐसिया पामरा तारी कोण ॥ २ ॥
विश्वास तयाचा बैसेना कोठें ही । स्तुति निंदा पाहीं जीवीं[1] धरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे कैसें केलें नारायणें । जाणावें हें कोणें तेयाविण[2] ॥ ४ ॥

॥ ४१२१ ॥

आपुली[3] बुटबुट घ्यावी । माझी परताप द्यावी ॥ १ ॥
आपुला[4] मंत्र नव्हे बरा । माझा बईल चुकला मोरा ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐशा न्यरा । परिस न झोंबे खापरा ॥ ३ ॥

---

१ पं. जीवि धरा.—२ पं. तयाविणें.—३ पं. 'आपुली' याच्या पूर्वीं 'गुरु म्यां केला घरवासी । माझ्या चुकल्या दोनी ह्लैंसी ॥' हें कडवें आहे.—४ पं. 'आपुला मंत्र' याबद्दल 'तुझा मंत्र' असें आहे व या कडव्याच्या पूर्वीं 'तुझा मंत्र घेतां कानीं । माझ्या पेवांत शिरलें पाणी ॥ गुरु म्यां भाग्यासाटीं केला । कांहीं फळासि नाहीं आला ॥' हीं दोन कडवीं जास्त आहेत.

॥ ४१२२ ॥

भावभक्तिवादें करावें कीर्तन । आशाबद्ध[1] मन करूं नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अन्न पाणी धन द्रव्य नारायण । विठ्ठला वांचून बोलूं नये ॥ ध्रु ॥
सप्रेम करावें देवाचें कीर्तन । भय द्या सोडून शरीराचें ॥ २ ॥
तरी मग जोडे विठ्ठलनिधान । केलिया कीर्तन सिद्धि पावे ॥ ३ ॥
देव जोडिलिया तया काय उणें । तुका ह्मणे मन धीट करा ॥ ४ ॥

॥ ४१२३ ॥

चोरासी चांदणें वेश्येसी सेजार । परिसेंसी खापर काय होय ॥ १ ॥
दुधाचे आधणीं वैरिले पाषाण । कदा काळीं जाण पाक नव्हे ॥ २ ॥
तुका ह्मणे जरि पूर्वपुण्यें सिद्धि । तरि च राहे बुद्धि संतसंगीं ॥ ३ ॥

॥ ४१२४ ॥

रोगिया मिष्टान्न मर्कटा चंदन । कागासी लेपन कर्पूराचें ॥ १ ॥
निर्नासिका जैसा नावडे आरिसा । मूर्खालागीं तैसा शास्त्रबोध ॥ ध्रु ॥
दास तुका ह्मणे विठ्ठलउदारें । अज्ञानअंधारें दूरी केलें ॥ २ ॥

॥ ४१२५ ॥

मथनासाटीं धर्माधर्म । त्याचें वर्म नवनीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तें चि तें घाटूं नये । आलें जाय नासूनि ॥ ध्रु ॥
सांभाळावें वरावर । वर्म दूर न वजावें ॥ २ ॥
तुका ह्मणे थालें पोट । मग बोटचाटणी[2] ॥ ३ ॥

---

१ दे. त. आशावधी.—२ दे. बोटचांचणी. पं. बोटटाचणी.

॥ ४१२६ ॥

माझा घात पात अथवा हित फार । अवघा[1] विचार तुझ्या हातीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठेवुनि जीव भाव तुझ्या ठायीं चित्त । राहिलों निवांत पांडुरंगा ॥ ध्रु ॥
चित्ताचा चाळक बुद्धीचा जनिता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे काय करिसी तें पाहीन । ठेविसी राहीन सुखें तेथें ॥ ३ ॥

॥ ४१२७ ॥

संतपाउलें साजिरीं । गंगा आली आह्मांवरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेथें पडे रजधुळी । तेथें करावी अंघोळी ॥ ध्रु ॥
स्वेतबंद[2] याराणसी । अवघीं तीर्थें तयापासीं ॥ २ ॥
तुका ह्मणे धन्य जालों । संतसागरीं मिळालों ॥ ३ ॥

॥ ४१२८ ॥

न[3] घडे मायबापें बाळकाचा घात । आपणादेखत होऊं नेदी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कां मी मनीं चिंता वाहूं भय धाक । काय नव्हे एक करितां तुज ॥ ध्रु ॥
वर्म जाणे त्याच्या हिताचे उपाय । तान भूक वाहे कडिये खांदीं ॥२॥
तुका ह्मणे तूं गा कृपावंत भारी । ऐसें मज हरी कळों आलें ॥ ३ ॥

॥ ४१२९ ॥

करावें कीर्तन । मुखीं[4] गावे हरिचे गुण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग कांहीं नव्हे बाधा । काम दुर्जनाच्या[5] क्रोधा ॥ ध्रु ॥

---

१ पं. अवघाची विचार०—२ त. श्वेतबंद.—३ पं. न घडे बाळकांचा मायेबापा' घात ।.—४ पं. मुखे.—५ पं. दुर्जनाची. त. दुर्जनाचा.

शांतिखड्ग हातीं । काळासी ते नागविती ॥ २ ॥
तुका ह्मणे दाता सखा । ऐसा अनंतासारिखा ॥ ३ ॥

॥ ४१३० ॥

तुझी कीर्ती सांगों तुजपुढें जरी । ब्रह्मांडीं[1] ही हरी माईना ते ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मेरूची लेखणी सागराची शाई । कागद हा मही न पुरे चि ॥ध्रु॥
अनंत अपार आपंगिले भक्त । माझें चि संचित ओडवेना ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मां बोल नाहीं देवा । पामरें म्यां सेवा केली नाहीं ॥३॥

॥ ४१३१ ॥

काय[2] साधनाच्या कोटी । केल्या आटी होती[3] त्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव कृपा करी जरी । होय उजरी स्वरूपीं ॥ ध्रु ॥
केले होते व्यर्थ[4] श्रम । उपरम[5] न होतां ॥ २ ॥
तुका ह्मणे कळों आलें । सर्व जालें आपरूप ॥ ३ ॥

॥ ४१३२ ॥

तुज काय करूं मज एक सार । अमृतनागर[6] नाम तुझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय येणें[7] उणें आह्मां तयापोटीं[8] । गोवितां हे कंठीं कामधेनु ॥ध्रु॥
नोळखे तानुलें माय ऐसी कोण । वोरसे देखून शोक त्याचा ॥ २ ॥
जो नाहीं देखिला याचक नयनीं । तो पावे घेउनि लज्जा दानें[9] ॥ ३ ॥
नामासाटीं प्राण सांडियेला रणीं । शूर ते भांडणीं न फिरती ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मी गातां गीतीं भला । भेटूनी विठ्ठला काय चाड ॥ ५ ॥

---

१ पं. ब्रह्मांडा.—२ त. पं. 'काय' नाहीं.—३ पं. होत्या त्या ।.—४ दे. चिंता.—५ त. पं. चित्ता उपरम न होतां ।.—६ त. अमृतसागर. दे. '°सागर' खोडून '°नागर' केलें आहे.—७ पं. 'येणें' नाहीं—८ पं. तयाचिये.—९ दे. दाना.

॥ ४१३३ ॥

कृपेचे सागर हे चि[1] साधुजन । तिहीं कृपादान केलें मज ॥ १ ॥
॥ध्रु.॥ बोबडे वाणीचा केला अंगीकार । तेणें माझा स्थिर केला जीव ॥ध्रु॥
तेणें सुखें मन स्थिर जालें ठायीं । संतीं दिला पायीं ठाव मज ॥ २ ॥
नाभी नाभी ऐसें बोलिले[2] वचनं । तें माझें कल्याण सर्वस्व ही ॥ ३ ॥
तुका ह्मणे जालों आनंदें[3] निर्भर । नाम निरंतर घोष करूं ॥ ४ ॥

॥ ४१३४ ॥

भक्तीचें तें[4] वर्म जयाचिये हातीं । तया घरीं शांति[5] क्षमा दया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अष्ट[6] महा सिद्धि वोळगती द्वारीं । न वजती[7] दुरी दवडितां ॥ ध्रु ॥
तेथें दुष्ट गुण न मिळे निशेष । चैतन्याचा वास जयामाजी ॥ २ ॥
संतुष्ट हें[8] चित्त सदा सर्वकाळ । तुटली हळहळ त्रिगुणाची ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें काय तो संदेह । आमचें गौरव आह्मी करूं ॥ ४ ॥

॥ ४१३५ ॥

साच हा विठ्ठल साच हें करणें । संत जें वचनें बोलियेले ॥ १ ॥
साच तें स्वहित साच ते प्रचित । साच वेद नीत सांगतील[9] ॥ २ ॥
तुका ह्मणे घेती साच साच भावें । लटिकें वर्म ठावें नाहीं त्यांसी ॥ ३ ॥

॥ ४१३६ ॥

संगें वाढे सीण नें[10] घडे भजन । त्रिविध हें जन बहु देवा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ यां[11] चि मुळें आला संगाचा कांटाळा । दिसताती डोळां नानाछंद ॥ध्रु॥
एकविध भाव राहावया ठाव । नेदी हा संदेह राहों चित्तीं ॥ २ ॥

---

१ दे. त. 'चि' नाहीं.—२ दे. बोलिलों.—३ पं. आनदे निर्भर.—४ त. दे. 'तें' नाहीं.—५ दे. होति.—६ दे. अष्टमासिद्धि वोळगती करीं ।.—७ पं. वजाती.—८ दे. त. 'हें' नाहीं.—९ पं. सांगितली.—१० पं. संगें वाढे भजन.—११ दे. त. याचि दुःखें या या जनाचा कांटाळा ।.'

शब्दज्ञानी हित नेणती आपुलें । आणीक देखिलें नावडे त्यां ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां एकलें चि भलें । बैसोनि उगलें राहावें तें ॥ ४ ॥

॥ ४१३७ ॥

तुझें वर्म आह्मां कळों आलें सुखें । संतांचिया मुखें पांडुरंगा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अवघा चि नेट[2] वाउगा पसारा । चेईला[3] तूं खरा तूं चि एक ॥ध्रु॥
ह्मणउनि देहबुद्धि नासिवंतां[4] । नातळे या चित्तां[5] नेदावया ॥ २ ॥
सोय हे लागली पुढिलांची वाट । पावले[6] जे नीट तुजपाशीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं कोणासवें काज । बोलायाचें[7] मज अंतरींचें ॥ ४ ॥

४१३८

पुण्यपापा[8] ठाव नाहीं सुखदुःखा । ह्मणिलाभशंका नासलिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जितां मरण आलें आप पर गेलें । मूळ[9] छेदियेलें संसाराचें ॥ध्रु॥
अधिकार[10] जाती वर्णधर्मयाती । ठाव नाहीं सत्यअसत्याशी[11] ॥ २ ॥
जन वन भिन्न आचेत चळण । नाहीं दुजेपण ठाव यासी ॥ ३ ॥
तुका ह्मणे देहें[12] वाईलें[13] विठ्ठलीं । तेव्हां च घडली सर्व पूजा ॥ ४ ॥

॥ ४१३९ ॥

संकोचतो[14] जीव महत्वाच्या भारें । दासत्व चि बरें बहु वाटे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कळावी जी माझी आवडी हे संतां । देणें तरि आतां हें चि द्यावें ॥ध्रु॥
तुमचे चरण पावविलों सेवा । ह्मणउनि हेवा हा चि करीं ॥ २ ॥
विनउनी तुका वंदितो चरण । लेखा रजरेण चरणींचें[15] ॥ ३ ॥

---

१ पं. ज्या.—२ पं. नठावाउगा.—३ पं. तो.—४ पं. नाशिवंत.—५ पं. चित्त.—६ पं. पाविजे ते नीट०.—७ पं. बोलावया.—8 पं. पुण्यपाप.—९ पं. मूळ हें छेदिलें.—१० पं. अंधःकार ज्योती कुळधर्म यात ।.—११ पं. संतीं.—१२ पं. देव.—१३ त. वाहिला.—१४ दे. संकोचोतो. पं. संकोचित.—१५ पं. चरणीचा.

॥ ४१४० ॥

देव कैंचा तया दुरी । भाका बरी करुणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आळवित्या न लगे धर । माय जाणे रे भातुकें ॥ ध्रु ॥
नावे तरी ज्याचा भार । पैल पार जवळी त्या ॥ २ ॥
आतां परदेशी तुका । जाला लोकांवेगळा ॥ ३ ॥

॥ ४१४१ ॥

भक्ति ज्याची थोडी । पूर्ण विषयांची गोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो नर चि नव्हे पाहीं । खरा जाणावा तो देहीं ॥ ध्रु ॥
भजन पूजन ही नेणे । काय स्वरूपासी जाणें ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याला । भोवंडून बाहेर घाला ॥ ३ ॥

॥ ४१४२ ॥

समुद्र हा पिता बंधु हा चंद्रमा । भगिनी ते रमा शंखाची या ॥ १ ॥
मेहुणा जयाचा द्वारकेचा हरि । शंख दारोदारीं भीक मागे ॥ २ ॥
दुष्ट हें जाणावें आपुलें स्वहित । तुका ह्मणे मात ऐसी आहे ॥ ३ ॥

॥ ४१४३ ॥

भवाचिया संगें बहु च नाडिले । कळिकाळें पाडिले तोंडघसीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तया भवसंगें गुंतलासी वांयां । धन पुत्र जाया भुलों नको ॥ध्रु॥
जेजे घडी जाय तेते काळ खाय । प्राण्या तरणोपाय काय केला ॥ २ ॥
तुका ह्मणे करीं सर्व ही तूं त्याग । अर्पीं हें सर्वांग जगदीशीं ॥ ३ ॥

---

१ पं. नावेवरी.—२ पं. जातां.—३ पं. त. दुष्ट.—४ पं. प्राणतरणो०.

॥ ४१४४ ॥

रुचे सकळा मिष्टान्न । रोग्या विखाच्या समान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि कां तया एकासाटीं । कामें[1] अवघीं करणें खोटीं ॥ ध्रु ॥
दर्पण नावडे एका । ठाव नाहीं ज्याच्या नाका ॥ २ ॥
तुका ह्मणे खळा । उपदेशाचा कांटाळा ॥ ३ ॥

॥ ४१४५ ॥

जागा[2] घरटी फिरे तस्कराची दिवसाराती ।
नीदसुरें नाडिलीं असो[3] ऐसीं मागें किती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हाट करी सकळ जन । वस्तु करा रे जतन ॥ ध्रु ॥
हुशार ठायीं । निजनिजेलिया पाहीं ॥ २ ॥
सावचित्त असे खरा । लाभ घेउन जाये घरा ॥ ३ ॥
तराळ[4] बोंबे उतराई । राखा आपुलिया भाई ॥ ४ ॥
हरिच्या नामीं घालूं जागा । तुका ह्मणे हुशार गा[5] ॥ ५ ॥

॥ ४१४६ ॥

संतांनीं सरता केलों तैसेपरी । चंदनीं[6] ते बोरी व्यापियेली ॥ १ ॥
गुण दोष याती न विचारितां[7] कांहीं । ठाव दिला पायीं आपुलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें समर्थाच्या मना । तरि होय राणा रंक त्याचा ॥ ३ ॥

॥ ४१४७ ॥

चित्तीं तुझे पाय डोळां रूपाचें ध्यान ।
अखंड मुखीं नाम वर्णावे गुण ॥ १ ॥

---

१ दे. काम अवघें.—२ पं. जगा.—३ दे. असो मागों किती. त. असा मांगा किती.—४ दे. तराळ राळ बोंबें.—५ पं. होगा.—६ पं. चंदन.—७ पं. विचारी.

॥ ध्रु. ॥ हें[1] चि एक देवा[2] तुह्मां मागणें दातारा ।
उचित तें करा माझा[3] भाव जाणूनि[4] ॥ ध्रु ॥
खुंटली जाणीव माझें बोलणें[5] आतां ।
करूं यावी तैसी करावी, बाळकाची चिंता ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां नको देऊं अंतर ।
न कळे पुढें काय बोलों विचार ॥ ३ ॥

॥ ४१४८ ॥

संतांच्या पादुका घेईन मोचे खांदीं । हातीं टाळ दिंडी नाचेन पुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भजनविधी नेणें साधन उपाय । सकळ[6] सिद्धि पाय हरिदासांचे ॥ ध्रु ॥
ध्यानगति माति आसन समाधि । हरिनाम गोविंदीं प्रेमसुख ॥ २ ॥
नेणता निर्लज्ज नेणें[7] नादभेद । सुखें हा गोविंद गाऊं गीतीं[8] ॥ ३ ॥
सर्व जोडी भज गोत आणि वित्त । तुका ह्मणे संतमहंतपाय ॥ ४ ॥

॥ ४१४९ ॥

हरिजनीं[9] प्राण विकली हे काया । अंकिला मी तया घरीं जालों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणियें सत्वर करीन सांगतां । घेईन मी देतां शेष त्यांचें ॥ ध्रु ॥
आस करूनियां राहेन अंगणीं । उच्छिष्टाची[10] धणी घ्यावयासी ॥ २ ॥
चालतां तें मार्गीं चरणाचे रज । उडती सहज घेइन आतां ॥ ३ ॥
दुरि त्यांपासूनि न वजें दवडितां । तुका ह्मणे लाता घेइन अंगीं ॥ ४ ॥

॥ ४१५० ॥

पुण्य फळलें बहुतां दिवसां । भाग्यउदयाचा ठसा ।

---

१ पं. हें चि तुह्मां एक मागतों मी दातारा ।.—२ दे. तुह्मां देवा.—३ पं. 'माझा' नाहीं.—४ पं. जाणुनि पुरा ।.—५ पं. बोलणें तें आतां.—६ पं. सकळ हि सिद्धि.—७ पं. नेणो.—८ दे. गीतं.—९ पं. हरिजना.—१० पं. त. दे. उचिष्टाची.

जाला[1] सन्मुख तो कैसा । संतचरण पावलों ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ आजि फिटलें माझें कोडें । भवदुःखाचें सांकडें ।
कोंदाटलें पुढें[2] । परब्रह्म सावळें ॥ ध्रु ॥
आलिंगणें संतांचिया । दिव्य जाली माझी काया ।
मस्तक हा[3] पाया । वरी त्यांच्या ठेवितां[4] ॥ २ ॥
तुका ह्मणे धन्य झालों । सुखें संतांचिया धालों ।
लोटांगणीं आलों । पुढें भार देखोनी ॥ ३ ॥

॥ ४१५१ ॥

ठाव देऊनियां राखें पायापासीं । मी तों आहें रासी पातकाची ॥ १ ॥
॥ध्रु.॥ पातकाची रासी ह्मणतां लागे वेळ । ऐके तो कृपाळ नारायण ॥ध्रु॥
नारायणनामें अवघें सांग जालें । असंग चि केलें एकमय ॥ २ ॥
एकमय जालें विठोबाच्या नामें । भेदाभेद कर्मे[5] आणिक कांहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे चित्तीं चिंतिलें जें होतें । तें होय आपैतें नामें याच्या ॥ ४ ॥

॥ ४१५२ ॥

आतां आह्मां भय नाहीं बा कोणाचें । बळ विठोबाचें जालें असे ॥ १ ॥
धीर दिला आह्मां येणें पांडुरंगें । न पांगों या पांगें संसाराच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा कैवारी हा देव । नाहीं भय भेव त्याच्या संगें ॥ ३ ॥

॥ ४१५३ ॥

भक्ति आह्मी केली सांडुनी उद्वेग । पावलों हें सांग सुख याचें ॥ १ ॥
सुख आह्मां जालें धरितां यांचा संग । पळाले उद्वेग[6] सांडूनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे सुख बहु जालें जिवा । घडली या सेवा विठोबाची ॥ ३ ॥

---

१ पं. जालो.—२ दे. पुढें । ब्रह्म सावळें ॥.—३ दे. 'हा' नाहीं.—४ पं. ठेवितों.—५ दे. कर्म.—६ त. उद्वेग.

शास्त्रज्ञ[1] हो ज्ञाते असती बहुत । परि नाहीं चित्त हाता आलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्षणा एका साटीं न धरवे धीर । तेणें हा रघुवीर अंतरतो ॥ ध्रु ॥
तोळाभर सोनें रतिभार राई । मेळविल्या पाहीं नास होतो ॥ २ ॥
हरीचे अंकित असती विरळागत । तयांसी अच्युत कृपा करी ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय धुंडवण्या[2] गोष्टी । जंव नाहीं गांठी चित्त आलें ॥ ४ ॥

॥ ४१५४ ॥

इंद्रियांसी नेम नाहीं । मुखीं राम ह्मणोनि काई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेविं मासीसंगें अन्न । सुख नेदी तें भोजन ॥ ध्रु ॥
कीर्तन करावें । तैसें करूनी दाखवावें ॥ २ ॥
हें तों अंगीं नाहीं चिन्हें । गाइलें वेश्येच्या ढव्यानें ॥ ३ ॥
तुका ह्मणे रागा[3] । संत शिवूं नेदिती[4] अंगा ॥ ४ ॥

॥ ४१५५ ॥

न लगे देवा तुझें आह्मांसी वैकुंठ । सायुज्याचा[5] पट न लगे मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देई तुझें नाम मज सर्वकाळीं । मागेन[6] वनमाळी हें चि तुज ॥ ध्रु ॥
नारद तुंबर उद्धव प्रल्हाद । बळी रुक्मांगद नाम ध्याती ॥ २ ॥
सिद्ध मुनिगण गंधर्व किन्नर । करिताती गजर रामनामें ॥ ३ ॥
तुका ह्मणे हरी देई तुझें नाम । अखंडित प्रेम हें चि द्यावें ॥ ४ ॥

॥ ४१५६ ॥

पावलों प्रसाद इच्छा केली तैसी । जालें या चित्तासी समाधान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मायबाप माझा उभा कृपादानी । विटे सम जोडूनि पादांबुजें ॥ ध्रु ॥

---

१ दे. शास्त्रज्ञें.—२ पं. उडवण्या.—३ दे. त. ह्मणे नका रागा ।.—४ पं. नेदी.—५. पं. सायुज्यतापट.—६ त. मागे. पं. मागणें.

सांभाळासी येऊं नेदी च[1] उणीव । अधिकारगौरव राखे तैसें ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्व अंतर्बाह्य आहे । जया तैसा राहे कवळूनी ॥ ३ ॥

॥ ४१५७ ॥

होतें तैसें पायीं केलें निवेदन । अंतरलों दिनें[2] बहुत होतों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संबोखुनी केलें समाधान चित्त । वोगरूनि[3] भातें प्रेमरस ॥ ध्रु ॥
नामरत्नमणी करूनी भूषण । अळंकारमंडण माळा दिली ॥ २ ॥
तुका ह्मणे सुखें जालों[4] निरामय । नामीं नामसोय निमग्नता ॥ ३ ॥

॥ ४१५८ ॥

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण । अंतरींची खुण पावूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मीळित । कंठ सद्गदित रोमांच आले ॥ ध्रु ॥
चित्त चाकाटलें स्वरूपा माझारी । न निघे बाहेरी सुखावलों ॥ २ ॥
सुनीळ प्रकाश[5] उदैजला दिन । अमृताचें पान जीवनकळा ॥ ३ ॥
शशिसूर्या जाली जीवें ओंवाळणी । आनंदा[6] दाटणी[7] आनंदाची[8] ॥ ४ ॥
तुका ह्मणे सुखें प्रेमासी डुलत[9] । वीरालों[10] निश्चित[11] निश्चितीनें ॥ ५ ॥

॥ ४१५९ ॥

बौध्यअवतार[12] माझिया अदृष्टा । मौन्य मुखें[13] निष्ठा धरियेली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लोकांचियेसाटीं शाम चतुर्भुज । संतांसवें गुज बोलतसां ॥ ध्रु ॥
आलें कलियुग माझिया संचिता । डोळां हाकलितां न पडेसी[14] ॥ २ ॥
म्यां च तुझें काय केलें नारायणा । कां नये करुणा तुका ह्मणे ॥ ३ ॥

---

१ पं. हा.—२ त. पं. दीन.—३ दे. वोगरुणि भात.—४ पं. जालें.—५ पं. प्रकाशला.—६ पं. आनंदें.—७ दे. दाटली.—८ पं. आनंदची.—९ त. पं. डुल्लत.—१० पं. वीरलो.—११ दे. भिश्चित निश्चितीनें. त. निश्चित निश्चितीनें.—१२ त. दे. बोध्य.—१३ पं. सुख.—१४ पं. पडेसी.

॥ ४१६० ॥

मुखीं विठ्ठलाचें नाम । मग कैचा भवभ्रम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चालतां बोलतां खातां । जेवितां निद्रा करितां ॥ ध्रु ॥
सुखें असों संसारीं । मग जवळीं च हरि ॥ २ ॥
मुक्तिवरील भक्ति जाण । अखंड मुखीं नारायण ॥ ३ ॥
मग देवभक्त जाला । तुका तुकीं उतरला ॥ ४ ॥

॥ ४१६१ ॥

प्रेम जडलें तुझे पायीं । आणीक न सुचे मजला कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रात्रीदिवस[1] तुझें ध्यान । तें चि माझें अनुष्ठान ॥ ध्रु ॥
नामापरतें नेणें दुजें । ऐसें कळलें मजला निज ॥ २ ॥
तुका ह्मणे अंतकाळीं । आह्मां सोडवीं तात्काळीं ॥ ३ ॥

॥ ४१६२ ॥

तुझे पाय माझी काशी । कोण जाय माझें काशी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझें रूप तें चि ध्यान । तें चि माझें अनुष्ठान ॥ ध्रु ॥
तुझ चरण ते चि गया । जालें गयावजर्न देहा ॥ २ ॥
तुका ह्मणें सकळ तीर्थें । तुझे पायीं वसती येथें ॥ ३ ॥

॥ ४१६३ ॥

क्षुधा तृषा कांहीं सर्वथा नावडे । पहावया धांवे[2] कोल्हांटासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कथेसी साक्षेपें पाचारिला[3] जरी । ह्मणे माझ्या घरीं कोणी नाहीं ॥ ध्रु ॥

---

१ पं. रात्रदिवस.—२ दे. धांवें. पं. धांवडे.—३ पं. पाचारिलें.

बेलात्कारें[1] जरी आणिला कथेसी । निद्रा घे लोडेंसी टेंकूनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे थुंका त्याच्या तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ३ ॥

॥ ४१६४ ॥

श्रीराम सखा ऐसा धरीं भाव । मीपणाचा ठाव पुसीं मना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शरण निरंतर ह्मण तूं गोविंदा । वाचे लावीं धंदा नारायण॥ध्रु॥
यापरि सोपान नाहीं रे साधन । वाहातसें आण तुझी मना ॥ २ ॥
नको कांहीं करूं अळस अंतरीं । जपें निरंतरी[2] रघुपती ॥ ३ ॥
तुका ह्मणे मोठा लाभ नरदेहीं । देही[3] च विदेही होती नामें ॥ ४ ॥

॥ ४१६५ ॥

सर्वांपरी तुझे गुण गाँ[4] उत्तम । तुझेठायीं प्रेम राहो माझें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ माउलीपरिस आहेसी उदार । तरि कां निष्ठुर मन केलें ॥ ध्रु ॥
गजेंद्राकारणें केलें त्वां धांवणें । तरि कां निर्वाण पाहातोसी ॥ २ ॥
प्रल्हादा[5] संकटीं रक्षिलें त्वां[6] देवा । तरि कां केशवा सांडी केली ॥३॥
अन्यायी अजामेळ तो जाला पावन । ऐसें हें पुराण हाका मारी ॥ ४ ॥
तुका ह्मणे माझे थोर अपराध । नाम करी छेद क्षणमात्रें ॥ ५ ॥

॥ ४१६६ ॥

आतां वांटों नेदीं आपुलें हें मन । न सोडीं चरण विठोबाचे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ दुजियाचा संग लागों नेदीं वारा । आपुल्या शरीरावरूनियां॥ध्रु॥
यावें जावें आह्मीं देवा च सांगातें । मागूनी करीत हें चि आलों ॥ २ ॥
काय वांयां गेलों तो करूं उद्वेग । उभा पांडुरंग मागें पुढें ॥ ३ ॥
तुका ह्मणे प्रेम मागतों आगळें । येथें भोगूं फळें वैकुंठींचीं ॥ ४ ॥

---

१ दे. बलात्कारीं.—२ दे. निरंतर.—३ दे. त. देहीं.—४ दे. गाऊं.—५ दे. प्रल्हादास कष्टीं.—६ दे. तों.

॥ ४१६७ ॥

आतां आह्मां हें चि काम । वाचे स्मरों[1] रामराम ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ऐसी मोलाची हे घडी । धरूं पायांची आवडी ॥ ध्रु ॥
अमृताची खाणी । तये ठायीं बेचूं वाणी ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । माझ्या जीवींच्या जिवलगा ॥ ३ ॥

॥ ४१६८ ॥

आतां जावें पंढरीसी । दंडवत विठोबासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेथें चंद्रभागातिरीं । आह्मी नाचों पंढरपुरीं ॥ ध्रु ॥
जेथें संतांची दाटणी । त्याचें घेऊं प्रायवणी ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी बळी । जीव दिधला पायां तळीं ॥ ३ ॥

॥ ४१६९ ॥

आह्मी नरका जातां काय येईल तुझ्या हाता । ऐसा तूं अनंता विचारीं पां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुज शरण आलियाचें काय हें चि फळ । विचारा दयाळ कृपानिधी ॥ ध्रु ॥
तुझें पावनपण न चले आह्मांसीं । ऐसें त्वृषीकेशी कळों आलें ॥ २ ॥
आह्मी दुःख पावों जन्ममरण व्यथा[2] । काय तुझ्या हाता येत असे ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुह्मी खादली हो रडी । आह्मी धरली[3] सेंडी नाम तुझें ॥ ४ ॥

॥ ४१७० ॥

पांडुरंगे पाहा खादलीसे रडी । परि[3] नामसेंडी धरिली आह्मी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां संतांनीं करावी पंचाईत । कोण हा फजितखोर येथें ॥ ध्रु ॥

---

१ दे. स्मरा.—२ दे. त. वेथा.—३ पं. धरिले.—४ दे. परिणाम.

कोणाचा अन्याय येथें आहे स्वामी । गर्जतसों आह्मी पातकी ही ॥ २ ॥
याचें पावनपण सोडवा चि[1] तुह्मी । पतितपावन आह्मी आहों खरें ॥ ३ ॥
आह्मी तंव आहों[2] अन्यायी सर्वथा । याची पावन कथा कैसी आहे ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मी मेलों तरी जाणा । परि तुमच्या चरणा न सोडावें ॥ ५ ॥

॥ ४१७१ ॥

घालूनियां मध्यावर्ती[3] । दाटुनि उपदेश देती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसे पोटभरे संत । तयां कैंचा भगवंत ॥ ध्रु ॥
रांडापोरांतें गोविती । वर्षासन ते लाविती ॥ २ ॥
जसे बोलती निरोपणीं । तैसी न करिती करणी ॥ ३ ॥
तुका ह्मणे तया । तमोगुणियाची क्रिया ॥ ४ ॥

॥ ४१७२ ॥

वैभव[4] तें राज्य संपत्ती टाकावी । उदरार्थ मागावी मधोकरी[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलें तें आधीं करावें स्वहित । ऐसी आहे नीत स्वधर्माची ॥ ध्रु ॥
वर्ण कुळ जाति[6] याचा अभिमान । त्यजावा[7] सन्मान लौकिकाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे राहे एकाकी निःशंक । देउनियां हाक कंठीं काळ ॥ ३ ॥

॥ ४१७३ ॥

हातपाय मिळोनि मेळा । चला ह्मणती पाहों डोळां ॥ १ ॥
देखणी नव्हे देखती कैसे । सकळांचा देखणा डोळा चि असे ॥ २ ॥
डोळ्याचा डोळा पाहों गेला । तुका ह्मणे तो पाहों ठेला ॥ ३ ॥

---

१ पं. जि०.—२ त. असों. दे. 'असों' नाहीं.—३ पं. मध्यवर्ती.—४ त. दे. वैभव राज्य०.—५ पं. मधोकरी.—६ पं. याति.—७ दे. त. तजावा.—८ पं. देखणी कैसी.

॥ ४१७४ ॥

मुखें संती[1] इंद्रियें जती । आणिक नेणे भाव भक्ती ॥ १ ॥
देवा हे चि दोन्ही पदें । येर गाइलीं विनोदें ॥ २ ॥
चित्ताचें आसन । तुका करितो कीर्त्तन ॥ ३ ॥

॥ ४१७५ ॥

धांवोनियां आलों पहावया मुख । गेलें माझें दुःख जन्मांतरिंचें ॥ १ ॥
ऐकिलें ही होतें तैसें चि पाहिलें । मन स्थिरावलें तुझ्या पायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी इच्छा पूर्ण जाली । कांहीं न राहिली वासना हे ॥ ३ ॥

॥ ४१७६ ॥

गावलोकिकांहीं लांवियेलें पिसें । काय सांगों ऐसें तुजपासीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तोंड काळें केलें फिरविलें मज । नाहीं धरिली लाज पांडुरंगा ॥ध्रु॥
काय तुजपासीं सांगों हें गाऱ्हाणें । मग काय जिणें तुझें माझें ॥ २ ॥
कोणासाटीं आतां करावा संसार । केली वारावार आपण[2] चि ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी मोडिला घरचार । धरियेला धीर तुझ्या पायीं ॥ ४ ॥

॥ ४१७७ ॥

जीवें जीव नेणे पापी सारिकां[3] चि । नळी दुजयाची कापूं बैसे ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ आत्मा नारायण सर्वां घटीं आहे । पशुमध्यें काय कळों नये ॥ ध्रु॥
देखत हा जीव हुंबरे वरडत[4] । निष्ठुराचे हात वाहाती कैसे ॥ २ ॥
तुका ह्मणे तया चांडाळासी नर्क[5] । भोगिती अनेक[6] महादुःखें ॥ ३ ॥

---

१ दे. संति.—२ दे. आपणें चि.—३ पं. सारिखा चि.—४ पं. वरडेत.—५ पं. नर्का.—६ पं. अनेका.

॥ ४१७८ ॥

मनीं भाव असे कांहीं । तेथें देव [1]येती पाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहा जनाई सुंदरी । तेथें देव पाणी भरी ॥ ध्रु ॥
शुद्ध पाहोनियां भाव । त्याचे [2]हृदयीं वसे देव ॥ २ ॥
तुका ह्मणे विठोबासी । ठाव देई चरणापासीं ॥ ३ ॥

॥ ४१७९ ॥

भागल्याचें तारूं शिणल्याची [3]साउली । भुकेलिया घाली प्रेमपान्हा ॥१॥
॥ध्रु.॥ ऐसी हे कृपाळू अनाथांची वेशी । सुखाची च राशी पांडुरंग ॥ध्रु॥
सकळां सन्मुख कृपेचिया दृष्टी । पाहे बहु भेटी उतावीळां ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें[4] आतां उरला कैंचा । अनंता जन्मींचा शीण भाग ॥३॥

॥ ४१८० ॥

काय न्यून आहे सांगा । पांडुरंगा तुह्मांपें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आमुची तों न पुरे इच्छा । पिता[5] ऐसा मस्तकीं ॥ ध्रु ॥
कैसी तुह्मां होय सांडी । करुणा तोंडीं उच्चारें ॥ २ ॥
आश्चर्य चि करी तुका । हे नायका वैकुंठिचिया ॥ ३ ॥

॥ ४१८१ ॥

चित्त गुंतलें प्रपंचें । जालें वेडें ममतेचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां सोडवीं पांडुरंगा । आलें निवारीं तें आंगा ॥ ध्रु ॥
गुंतली चावटी । नामीं रूपीं जाली तुटी[6] ॥ २ ॥
तुका ह्मणे चाली । पुढें वाट खोळंबली ॥ ३ ॥

---

१ दे. यति.—२ त. हृदई चि.—३ त. माउली.—४ त. आतां येथें.—५ दे. पीतां. त. पीता.—६ दे. भेटी.

॥ ४१८२ ॥

किती[1] एका दिवशीं । बुद्धि जाली होती ऐसीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कांहीं करावें स्वहितं[2] । तों हें न घडे उचित ॥ ध्रु ॥

अवलंबुनी भीक । लाज सांडिली लौकिक ॥ २ ॥

तुका ह्मणे दीन । जालों मनुष्यपणा[3] हीन ॥ ३ ॥

॥ ४१८३ ॥

आतां बरें जालें । सकाळीं च कळों आलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मज न ठेवीं इहलोकीं । आलों तेव्हां जाली चुकी ॥ ध्रु ॥

युगमहिमा ठावा । नव्हता ऐसा पुढें देवा ॥ २ ॥

तुका ह्मणे ठेवीं । भोगासाटीं निरयगांवीं ॥ ३ ॥

॥ ४१८४ ॥

परि आतां माझी परिसावी विनंती । रखुमाईच्या पती पांडुरंगा ॥ १ ॥

चुकालिया बाळा न मारावें जीवें । हित तें करावें मायबापीं ॥ २ ॥

तुका ह्मणे तुझा ह्मणतातो मज । आतां आहे लाज हे चि तुह्मां ॥ ३ ॥

॥ ४१८५ ॥

पापाचिया मुळें । जालें सत्याचें वाटोळें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ दोष जाले बळिवंत । नाहीं ऐसी[4] जाली नीत ॥ ध्रु ॥

मेघ पडों भीती । पिकें सांडियेलीं[5] क्षिती ॥ २ ॥

तुका ह्मणे कांहीं । वेदा वीर्य शक्ति नाहीं ॥ ३ ॥

---

१ दे. त. किता एका दिसीं ।.—२ पं. खचित.—३ पं. मश्यकपण. त. मनुष्यपणे.—४ पं. जाली ऐसी.—५ पं. सांडियेलें.

॥ ४१८६ ॥

ऐसा दुस्तर भवसागर । नेणों कैसा उतरूं पार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कामक्रोधादि सावजें थोर । दिसताती भयंकर ॥ ध्रु ॥
मायाममतेचे भोवरे । येती भयानक फेरे ॥ २ ॥
वासनेच्या लहरी[1] येती । उद्योगहेलकावे बसती ॥ ३ ॥
तरावया एक युक्ति असे । तुका नामनावेमधीं[2] बैसे ॥ ४ ॥

॥ ४१८७ ॥

देव जडला जाइना अंगा । यासी काय करूं सांगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वरकड देव येती जाती । हा देव जन्माचा सांगाती ॥ ध्रु ॥
अंगीं भरलें देवाचें वारें । देव जग चि दिसे सारें ॥ २ ॥
भूत न बोले निरुतें । कांहीं केल्या न सुटे तें ॥ ३ ॥
जीव खादला दैवतें[3] । माझा आणि[4] पंचभूतें ॥ ४ ॥
तुका ह्मणे वाडें कोडें । उभें पुंडलिकापुढें ॥ ५ ॥

॥ ४१८८ ॥

हरिदासाचिये घरीं । मज उपजवा जन्मांतरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणसी कांहीं मागा । हें चि देगा पांडुरंगा ॥ ध्रु ॥
संतां लोटांगणीं । जातां लाजों नको मनीं ॥ २ ॥
तुका ह्मणे अंगीं । शक्ती देई नाचें[5] रंगीं ॥ ३ ॥

॥ ४१८९ ॥

लटिक्यांचें[6] आंवतणें जेविलिया साच । काय त्या विश्वास तो चि खरा ॥ १ ॥

---

१ दे. लहरा.—२ दे. तुकाराम नावे०.—३ त. देवतें.—४ पं. येणें महाभूतें.—५ त. नाचों.—६ पं. लटिकियाचे आवंतणे जेविल्या साच ।

॥ ध्रु. ॥ कोल्हांटिणी लागे[1] आकाशीं खेळत । ते काय पावत अमरपद ॥ ध्रु ॥

जळमंडपयाचे[2] घोडे राउत नाचती । ते काय तडवती युद्धालागीं[3] ॥ २ ॥

तुका ह्मणे तैसें मतवादीयांचें जिणें । दिसे लाजिरवाणें बोलतां चि ॥ ३ ॥

॥ ४१९० ॥

काय आह्मीं केलें ऐसें । नुद्धरीजेसें[4] सांगावें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ हरण कोल्हें[5] वैकुंठवासी । कोण त्यासी अधिकार ॥ ध्रु ॥

गजा नाडया सरोवरीं । नाहीं हरी विचारिलें ॥ २ ॥

तुका ह्मणे गणिका नष्ट । माझे कष्ट त्याहूनि ॥ ३ ॥

॥ ४१९१ ॥

भाग्यासाठीं गुरु केला । नाहीं आह्मांसी फळला ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ याचा मंत्र पडतां कानीं । आमच्या पेवांत गेलें पाणी ॥ ध्रु ॥

गुरु केला घरवासी । आमच्या चुकल्या गाईम्हसी ॥ २ ॥

स्वामी आपुली बुटबुट घ्यावी । आमुची प्रताप टाकुन द्यावी ॥ ३ ॥

तुका ह्मणे ऐसे नष्ट । त्यांसी दुणे होती कष्ट ॥ ४ ॥

॥ ४१९२ ॥

गुणा आला विटेवरी[6] । पीतांबरधारी सुंदर[7] ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ डोळे कान त्याच्या ठायीं । मन पायीं राहो हें ॥ ध्रु ॥

निवारोनी जाय[8] माया । ऐसी छाया जयासी ॥ २ ॥

तुका ह्मणे समध्यान । हे[9] चरण सकुमार ॥ ३ ॥

---

१ पं. लागी.—२ पं. जडमं०.—३ पं. त. युध्यालागी.—४ दे. त. धुनरी०.—५ पं. कोल्हीं.—६ दे. पं. ईटेवरी.—७ दे. सुंदर जो.—८ तं. गेली.—९ पं. ते हे.

॥ ४१९३ ॥

रंगीं रंगें नारायण[1] । उभा करितों कीर्त्तन[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हातीं घेउनियां वीणा । कंठीं राहें[3] नारायणा ॥ ध्रु ॥
देखिलीसे मूर्ती । माझ्या त्ददयांधी[4] विश्रांति ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । देई कीर्त्तनाचा हेवा ॥ ३ ॥

॥ ४१९४ ॥

तुझा भरवसा आम्हां । फार होता पुरुषोत्तमा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भवसागरसंकटीं । तारिशील जगजेठी ॥ ध्रु ॥
नाम आदित्याचें झाड । त्याचा न पडे उजड ॥ २ ॥
सिलंगणीचें सोनें । त्यासी गाहाण ठेवी[5] कोण ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा । ब्रिद सोडूनियां ठेवा ॥ ४ ॥

॥ ४१९५ ॥

जालों आतां दास । माझी पुरवीं हे आस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदीं हरी ॥ ध्रु ॥
संतसमागम । अंगीं भरोनियां प्रेम ॥ २ ॥
चंद्रभागे स्नान । तुका ह्मणे हें चि दान ॥ ३ ॥

॥ ४१९६ ॥

यासाटीं करितों निष्ठुर भाषण । आहेसी तूं जाण सर्वदाता ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ऐसें दुःख कोण आहे निवारिता । तों[6] मी जाऊं आतां शरण त्यासी ॥ ध्रु ॥

---

१ पं. नारायणा.—२ पं. कीर्तना.—३ पं. रोहे.—४ पं. त्ददईचि.—५ पं. ठेविल.—६ दे. त. तें.

बैसलासी[1] केणें करुनि एक घरीं । नाहीं येथें उरी[2] दुसऱ्याची ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें अवघें पायांपें । आतां मायबापें नुपेक्षावें ॥ ३ ॥

॥ ४१९७ ॥

पोरा लागलींसे चट । धरी वाट देवळाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांगितलें नेघे कानीं । दुजें मनी विठ्ठल ॥ ध्रु ॥
काम घरीं न करी धंदा । येथें सदा दुश्चित्त ॥ २ ॥
आमुचे कुळीं नव्हतें ऐसें । हें चि पिसें निवडलें ॥ ३ ॥
लौकिकाची नाहीं लाज । माझें मज पारिखें ॥ ४ ॥
तुका ह्मणे नरका जाणें । यां[3] या वचनें[4] दुष्टाचे ॥ ५ ॥

॥ ४१९८ ॥

देवा बोलें आतां बोला । त्वां कां धरिला अबोला ॥ १ ॥
॥ध्रु.॥ भेऊं नको देईं भेटी । तूं कां पडिलासी संकटीं ॥ ध्रु ॥
तुझ्या जीवींचें मी जाणें । ह्मणसी मुक्ती आह्मां देणें ॥ २ ॥
तुका ह्मणे न लगे कांहीं । चित्त राहो[5] तुझे पायीं ॥ ३ ॥

॥ ४१९९ ॥

यमधर्म आणिक ब्रह्मादिक देव । त्यांचा पूर्ण भाव तुझे पायीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ करिती स्मरण पार्वतीशंकर । तेथें मी किंकर कोणीकडे ॥ ध्रु ॥
सहस्रमुखेंसी घोष फणिवराचा । मज किंकराचा पाड काय ॥ २ ॥
चंद्र सूर्य आणि सर्व तारांगणें । करिती भ्रमण प्रदक्षिणा ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्यांसी स्वरूप कळेना । तेथें मज दीना कोण पुसे ॥ ४ ॥

---

१ दे. बैसलासे. पं. बैसलासी कोण धरूनियां धीर ।.—२ पं. उर.—३ दे. पं. 'या वचनें' याबद्दल 'त्या वचनें'.— ४ त. दे. दुष्टाचीं. त. दुष्टाची.—५ पं. राहे.

॥ ४२०० ॥

विठोबाचे पायीं जीव म्यां ठेविला । भक्तिभावें केला देव ऋणी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ देव माझा ऋणी आहे सहाकारी । परस्परें[1] वारी भवभय ॥ ध्रु ॥
भवभयडोहीं बुडों नेदी पाहीं । धरूनियां बाही तारी मज ॥ २ ॥
तारियेले दास पडिल्या संकटीं । विष केलें पोटीं अमृतमय ॥ ३ ॥
अमृतातें[2] सेवीतसे नामरसा । तोडियेला फांसा बंधनाचा ॥ ४ ॥
बंधनाचा फांसा आह्मीं कांहीं नेणों । पाय तुझे जाणों पद्मनाभा ॥ ५ ॥
पद्मनाभा नाभिकमळीं ब्रह्मादिक । त्रैलोक्यनायक ह्मणविसी ॥ ६ ॥
ह्मणविसी देवा दासाचा[3] अंकित । मनाचा संकेत पाहोनियां ॥ ७ ॥
पाहोनियां दृढ निश्चय तयाचा । तो चि दास साचा जवळीक ॥ ८ ॥
जवळीक जाली ब्रह्मीं सुखावले । मार्ग दाखविले मूढां[4] जना ॥ ९ ॥
मूढां[5] जनामाजी दास तुझा मूढ । कास तुझी दृढ धरियेली ॥ १० ॥
धरियेले तुझे पाय रे विठ्ठला । तुका सुखी जाला तुझ्या नामें ॥ ११ ॥

॥ ४२०१ ॥

बहु क्लेशी जालों या हो[6] नरदेहीं । कृपादृष्टी पाहीं पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांडुरंगा सर्वदेवांचिया देवा । घ्यावी माझी सेवा दिनानाथा ॥ ध्रु ॥
दिनानाथ ब्रिद त्रिभुवनीं तुझें । मायबापा ओझें उतरावें ॥ २ ॥
उतरीं सत्वर पैलथडी नेई । पूर्णसुख देई पायांपाशीं ॥ ३ ॥
पायांपाशीं मज ठेवीं निरंतर । आशा तुझी फार दिवस केली ॥ ४ ॥
केली आस तुझी वाट[7] मी पाहातों । निशिदिनीं ध्यातों नाम तुझें ॥ ५ ॥

---

१ दे. परस्परवरि.—२ पं. अमृतत.—३ त. दासांचे.—४ पं. मूढ.—५ पं. मूढ.—६ त. 'हो' नाहीं.—७ त. वास.

नाम तुझें गोड स्वभक्ता आवडे । भक्तांलागीं कडे खांदा घेसी ॥ ६ ॥
घेसी खांद्यावरी खेळविसी लोभें । पाउल तें[1] शोभे विटेवरि ॥ ७ ॥
विटेवरि उभा देखिलासी डोळां । मनाचा सोहळा पुरविसी ॥ ८ ॥
पुरवीं सत्वर त्रैलोक्यस्वामिया । मिठी घाली पायां तुका भावें ॥ ९ ॥

॥ ४२०२ ॥

एक वेळे तरी जाईन माहेरा । बहुजन्म फेरा जाल्यावरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ [2]चित्ता हे बैसली अविट आवडी । पालट ती घडी नेघे एकी ॥ ध्रु ॥
करावें ते करी कारणशरीर । अंतरीं त्या धीर जीवनाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे तरि होइल विलंब । परि म्हाझा लाभ खरा जाला ॥ ३ ॥

॥ ४२०३ ॥

सांग त्वां कोणासी तारिलें । संतांवेगळें उद्धरिलें ॥ १ ॥
संत शब्द उपदेशी । मग तूं हो ह्मणशी ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं तुझा उपकार । करूं संतांचा उच्चार ॥ ३ ॥

॥ ४२०४ ॥

उमा रमा [3]एकी सरी । वाराणसी ते पंढरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दोघे सारिखे सारिखे । विश्वनाथ विठ्ठल सखे ॥ ध्रु ॥
तेथें असे भागीरथी । येथें जाणा भीमरथी ॥ २ ॥
वाराणशी त्रिशुलावरि । [4]सुदर्शनावरि पंढरी ॥ ३ ॥
मनकर्णिका मनोहर । चंद्रभागा सरोवर ॥ ४ ॥
वाराणशी भैरवकाळ । पुंडलीक क्षेत्रपाळ ॥ ५ ॥

---

१ दे. "ती" नाहीं. पं. त. पाउले ती.—२ दे. चिंता.—३ दे. एके.—४ दे. सुद्रसेनावरि. त. सुदर्शनावरि.

धुंडिराज दंडपाणी । उभा गरुड कर जोडुनी ॥ ६ ॥
गया ते चि गोपाळपुर । प्रयाग निरानरसिंपुर ॥ ७ ॥
तथें असतीं गयावळ । येथें गाई आणि गोपाळ ॥ ८ ॥
शमीपत्रपिंड देती । येथें काला निजसुखप्राप्ति ॥ ९ ॥
संतसज्जनीं केला काला । तुका प्रसाद लाधला ॥ १० ॥

॥ ४२०५ ॥

फटयाचे बडबडे चवी ना सवाद । आपुला चि वाद आपणासी ॥ १ ॥
कोणें या शब्दाचे मरावें घसणी[1] । अंतरें शाहाणी राहिजे हो ॥ ध्रु ॥
गाढवाचा भुंक[2] आइकतां कानीं । काय कोडवाणी ऐसियेचें ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्यासी करावें वचन । त्याचे येती गुण अंगास ते ॥ ३ ॥

॥ ४२०६ ॥

दिवसा व्यापारचावटी । रात्री कुटुंबचिंता मोटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करूं या मनासी । नाठवे कां[3] त्दृषीकेशी ॥ ध्रु ॥
वेश्येपाशीं रात्रीं जागे । हरिकीर्त्तनीं निद्रा लागे ॥ २ ॥
तुका ह्मणे काय जालासी । वृथा संसारा आलासी ॥ ३ ॥

॥ ४२०७ ॥

अहो कृपावंता । होईं बुद्धीचा ये दाता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेणें पाविजे उद्धार । होय तुझे पायीं थार ॥ ध्रु ॥
वंदवी हे वाचा । भाव पांडुरंगीं साचा ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । माझें अंतर वसवा ॥ ३ ॥

---

१ दे. घाणी.—२ दे. भुक.—३ दे. पं. "कां" नाहीं.

॥ ४२०८ ॥

निंदक तो परउपकारी । काय वर्णूं त्याची थोरी ।
जो[1] रजकाहुनि भला[2] परि । सर्व गुणें आगळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेघे मोल धुतो फुका । पाप वरच्यावरि देखा ।
करितसे[3] साधका । शुद्ध सरते तिहीं लोकीं ॥ ध्रु ॥
मुखसंवदणी[4] सांगाते[5] । अवघें सांटविलें तेथें ।
जिव्हा साबण निरुतें । दोष काढी जन्माचे ॥ २ ॥
तया ठाव यमपुरीं[7] । वास करणें अघोरीं ।
त्यासी दंडणें[6] करी । तुका ह्मणे न्हाणी[7] ते ॥ ३ ॥

॥ ४२०९ ॥

विद्या अल्प परी गर्वशिरोमणि । मजहुनी ज्ञानी कोण आहे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अंगीं भरला ताठा कोणातें मानिना । साधूची छळणा स्वयें करी॥ध्रु॥
साधूचे देहाचा मानी जो विटाळ । त्रिलोकीं[8] चांडाळ तो चि एक ॥ २ ॥
संतांची जो निंदा करी[9] मुखें जपे । खतेला सकळ पापें तो चि एक ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे मावेचे मंइंद[10] । त्यापाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ४ ॥

॥ ४२१० ॥

प्रपंचाची पीडा सोसिती[11] अघोरी । जया क्षणभरी नाम नये ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नाम नोठविती[12] आत्मया रामाचें । धिगें[13] जिणें त्याचें भवा मूळ ॥ध्रु॥

---

१ दे. जे. पं. 'जो' नाहीं.—२ दे. भले.—३ दे. करी. त. करितो.—४ पं. मुख्य०.—५ दे. सांगते.—६ पं. दंड.—७ पं. यमधर्म.—८ पं. त्रैलोकीं.—९ पं. करितो या मुखें.—१० पं. मैंद. दे. गोविंद.—११ पं. सोसी तो.—१२ त. न आठविती. दे. आठविती.—१३ त. 'धिग जिणें त्याचें भवा मूळ ॥ मूळ तें पापाचें आचरण तयाचें।' हे दोन कडव्यांतील दोन चरण नाहींत.

मूळ तें पापाचें आचरण तयाचें । नाहीं राघवाचें स्मरण त्या ॥ २ ॥
स्मरण भजन नावडे जयासी । आंदणीया दासी यमदूतां ॥ ३ ॥
चिंतन रामाचें न करी तो दोषी । एकांत तयासीं बोलों नये ॥ ४ ॥
नये त्याचा संग धरूं ह्मणे तुका । धरितां पातका वांटेकरी ॥ ५ ॥

॥ ४२११ ॥

अर्थविण[1] पाठांतर कासया करावें । व्यर्थ चि मरावें घोकूनियां ॥ १ ॥
घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहे । अर्थरूप राहे होऊनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्याला अर्थीं आहे भेटी । नाहीं तरी गोष्टी बोलों नका ॥ ३ ॥

॥ ४२१२ ॥

बसतां[2] चोरापाशीं तैसी होय बुद्धि । देखतां चिं[3] चिंधी मन धांवे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ व्यभिचाऱ्यापासीं बैसतां क्षणभरी । देखतां चि नारी मन धांवे ॥ ध्रु ॥
प्रपंचाचा छंद टांकुनियां गोवा । धरावें केशवा ह्रदयांत ॥ २ ॥
सांडुनियां देई संसाराची बेडी । कीर्तनाची गोडी धरावी गा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुला सांगतों मी एक । रुक्मिणीनायक मुखीं गावा ॥ ४ ॥

॥ ४२१३ ॥

मस्तकीं सहावें ठांकियासी जाणें[4] । तेव्हां देवपण भोगावें गा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुलिये स्तुती निंदा अथवा मान । टाकावा थुंकोन पैलीकडे ॥ ध्रु ॥
सद्गुरुसेवन तें चि अमृतपान । करुनी प्राशन बैसावें[5] गा ॥ २ ॥
आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर । सुखाचें माहेर टाकूं नये ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां[6] सांगूं तुला किती । जिण्याची फजीती करूं नये ॥ ४ ॥

---

१ पं. अर्थाविण.—२ त. पं. बैसतां.—३ पं "चि" नाहीं.—४ पं. जाणा.—५ पं. करावें.—६ त. तुला सांगूं आतां किती ।.

॥ ४२१४ ॥

स्वामिसेवा गोड । माते बाळकाचें कोड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेंजें मागावें भातुकें । तेंतें पुरवी कौतुकें ॥ ध्रु ॥
खेळविलें कोडें[1] । हरुषें बोले कीं बोबडें ॥ २ ॥
तुका ह्मणे लाड । तेथें[2] पुरे माझें कोड ॥ ३ ॥

॥ ४२१५ ॥

तुझें नाम पंढरिनाथा । भावेंविण नये हाता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दाहां नये विसां नये । पंनासां साटां नये ॥ ध्रु ॥
शां नये सहस्रा नये । लक्षकोडीलागीं नये ॥ २ ॥
तुका ह्मणे पंढरिनाथा । भावेंविण नये हाता ॥ ३ ॥

॥ ४२१६ ॥

संतांपायीं विन्मुख जाला । तों जरि संगति मागों आला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि त्याहुनि दुरी जावें । सुखें एकांतीं बैसावें ॥ ध्रु ॥
आत्मचर्चा नाहीं जेथें । अगी लावुनि द्यावी तेथें ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ॥ ३ ॥

॥ ४२१७ ॥

हिरा ठेवितां काळें गाहाण[3] । मोल न तुटे दुकाळीं जाण ॥ १ ॥
तैसे संतजन पाहीं । विनटले श्रीहरिपायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तैसे भक्त । तयांसी जन हें निंदित ॥ ३ ॥

---

१ पं. खेळवि लाडें कोडें।—२ पं. येथें.—३ दे. त. गहन.

॥ ४२१८ ॥

परिसें गे सुनेबाई । नको वेचूं दूध दहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवा चालिली पंढरपुरा । वेसीपासुनि आली घरा ॥ ध्रु ॥
ऐकें गोष्टी सादर बाळे । करीं जतन फुटकें पाळें ॥ २ ॥
माझे हातींचा कलवडू । मजवांचुनि नको फोडूं ॥ ३ ॥
वळवटक्षिरीचें[1] लिंपन । नको फोडूं मजवांचून ॥ ४ ॥
उखळ मुसळ जातें । माझें मन गुंतलें तेथें ॥ ५ ॥
भिक्षुक[2] आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ॥ ६ ॥
भक्षीं परिमित[3] आहारु । नको फारसी वरो सारूं ॥ ७ ॥
सून ह्मणे बहुत निकें । तुह्मी यात्रेसि जावें सुखें ॥ ८ ॥
सासूबाई स्वहित जोडा । सर्व मागील आशा सोडा ॥ ९ ॥
सुनमुखींचें वचन कानीं । ऐकोनि सासू विवंची मनीं ॥ १० ॥
सवतीचे चाळे खोटे । म्यां जावेंसें इला वाटे ॥ ११ ॥
आतां कासया यात्रे जाऊं । काय जाउनि तेथें पाहूं ॥ १२ ॥
मुलें लेंकरें घर दार । माझें येथें चि पंढरपूर ॥ १३ ॥
तुका ह्मणे ऐसें जन । गोवियेलें मायेंकरून ॥ १४ ॥

॥ ४२१९ ॥

एक तें गाढव मनुष्याचे वेषें[4] । हालविती पुसें[5] पुढें दाढी ॥ १ ॥
निंदा हें भोजन जेवण तयांसी । जोडी घरीं[6] रासी पातकांच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे सुखें बैसोनियां खाती । कुंभपाकीं होती नर्कवासी ॥ ३ ॥

---

१ पं. वळकट क्षाराचें.—२ पं. 'भिक्षुक०' हें कडवें नाहीं.—३ दे. त. मपित.—४ पं. बेशे. त. वेशें.—५ पं. 'पुस' नाहीं.—६ पं. घर.

॥ ४२२० ॥

मागत्याची टाळाटाळी । झिंझ्या वोढूनि कपाळीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा तंव मोळा । तुमचा नसेल गोपाळा ॥ ध्रु ॥
नसेल ना नवें । ऐसें धरियेलें देवें ॥ २ ॥
तुका ह्मणे जाला[1] । उशीर नाहीं तो विठ्ठला ॥ ३ ॥

॥ ४२२१ ॥

संसार करितो[2] मोठ्या महत्वानें । दिसे लोका उणें न कळे त्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पवित्रपण आपुलें घरच्यासी च दिसे । बाहेर उदास निंदिताती ॥ध्रु॥
आपणा कळेना आपले अवगुण । पुढिलांचे दोषगुण वाखाणिती ॥ २ ॥
विषयाचे ध्यासें जग बांधियेलें । ह्मणोनी लागले जन्ममृत्यु[3] ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझें संचित[4] चि असें । देवाजीचें पिसें सहजगुण ॥ ४ ॥

॥ ४२२२ ॥

गव्हाराचें ज्ञान अवघा रजोगुण । सुखवासी होऊन विषय भोगी ॥१॥
त्यासी[5] जरी[6] ज्ञानउपदेश केला । संगेविण त्याला राहावेना ॥ २ ॥
तुका ह्मणे संग उत्तम असावा । याविण उपावा काय सांगों ॥ ३ ॥

॥ ४२२३ ॥

भाग्यालागीं लांचावले । देवधर्म ते राहिले ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कथे जातां अळसे मन । प्रपंचाचें मोटें ज्ञान ॥ ध्रु ॥
अखंडप्रीति जाया । नेणे भजनाच्या ठाया ॥ २ ॥
कथाकीर्त्तन धनाचें । सर्वकाळ विषयीं नाचे ॥ ३ ॥
तुका ह्मणे पंढरिराया । ऐसे जन्मविले वांयां ॥ ४ ॥

---

१ पं. आला,—२ पं. करितो.—३ पं. जन्मामृत्य.—४ पं. कपाळीचें ऐसें.—५ पं. त्यासी ज्ञानउपदेश जरी पूर्ण केला।.—६ दे. 'जरी' नाहीं.

॥ ४२२४ ॥

पतिव्रतेची कीर्त्ती वाखाणितां । सिंदळीच्या माथां तिडिक उठे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आमुचें तें आहे सहज बोलणें । नाहीं विचारून केलें कोणीं॥ध्रु॥
अंगें उणें त्याच्या बैसे टाळक्यांत । तेणें ठिणग्या बहुत गाळीतसे॥२॥
तुका ह्मणे आह्मी काय करणें त्यासी । ढका खवंदासी लागतसे ॥ ३ ॥

॥ ४२२५ ॥

आहे ऐसा देव वदवावी वाणी । नाहीं ऐसा मनीं अनुभवावा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आवडी आवडी काळिवराकळिवरी । वरिली अंतरी ताळी पडे॥ध्रु॥
अपूर्व दर्शन मातेपुत्रा भेटी । रडूं मागे तुटी हर्षयोगें ॥ २ ॥
तुका ह्मणे एकें कळतें दुसरें । बरियाचें[1] बरें आहाचाचें आहाच ॥ ३ ॥

॥ ४२२६ ॥

हे चि माझे[2] चित्तीं । राहो[3] भावप्रीति ।
विठ्ठल सुषुप्ती । जागृति स्वप्नासी ॥ १ ॥
॥ध्रु.॥आणिक नाहीं तुज मागणें । राज्यचाड संपत्ति धन ।
जिव्हे सुख तेणें । घेतां देहीं नाम तुझें ॥ ध्रु ॥
तुझें रूप सर्वांठायीं । देखें ऐसें प्रेम देईं ।
नें[4] ठेवावा ठायीं । अनुभव चित्ताचा ॥ २ ॥
जन्ममरणाचा बाध । समुळूनि तुटे कंद ।
लागो हा चि छंद । हरि गोविंद वाचेसी ॥ ३ ॥
काया पालटे दरुषणें । अवघें कोंदाटे[5] चैतन्य ।

---

१ दे. बरियानें.—२ दे. त. माझा.—३ पं. राहो आतां भाव०.—४ पं. ठेवावा हा पायीं.—५ त. कोधाटे.

जीवाशिवा खंडण । होय तेरे चिंतितां ॥ ४ ॥
तुका ह्मणे या चि भावें । आह्मी धालों तुझ्या नावें ।
सुखें होत जन्में । भलते यातीं भलतैसीं ॥ ५ ॥

॥ ४२२७ ॥

मौन कां धरिलें विश्वाच्या जीवना । उत्तर वचना देई माझ्या ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तूं माझें संचित तूं चि पूर्वपुण्य । तूं माझें प्राचिन पांडुरंगा ॥ ध्रु ॥
तूं माझें सत्कर्म तूं माझा स्वधर्म । तूं चि नित्यनेम नारायणा ॥ २ ॥
कृपावचनाची वाट पाहातसें । करुणा वोरसें बोल कांहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे प्रेमळाच्या प्रियोत्तमा । बोल सर्वोत्तमा मजसवें ॥ ४ ॥

॥ ४२२८ ॥

काय करूं आतां धरुनियां भीड । निःशंक हें तोंड वाजविलें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नव्हे जगीं कोणी मुकियाचा जाण । सार्थक लाजोनी नव्हे हित ॥ ध्रु ॥
आलें तें उत्तर बोलें स्वामीसवें । धीट नीट जीवें होऊनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे मना समर्थासीं गांठी । घालावी हे मांडी थापटूनि ॥ ३ ॥

॥ ४२२९ ॥

माझिया तो जीवें घेतला हा सोस । पाहें तुझी वास भेटावया ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मातेविण बाळ न मनी आणिका । सर्वकाळ धोका स्तनपाना ॥ ध्रु ॥
वोसंगा निघाल्या वांचूनि न राहे । त्याचें आर्त माय पुरवीते ॥ २ ॥
तुका ह्मणे माते भक्तां तूं कृपाळ । गिळियेले जाळ वनांतरीं ॥ ३ ॥

---

१ दे. त. ते रे.—२ दे. नामें.—३ दे. त. जन्म.—४ त. पं. मौन्य.—५ त. घेतलासे सोस.—६ त. मानी.—७ पं. ज्वाळ.

॥ ४२३० ॥

ते काय पवाडे नाहीं म्यां ऐकिले । गोपाळ रक्षिले वनांतरीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मावेचा वोंगवा होऊनि राक्षस । लागला वनास चहूंकडे ॥ध्रु॥
गगनासी ज्वाळा लागती तुंबळ । गोधनें गोपाळ वेडावलीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तेथें पळावया वाट । नाहीं बा निपट ऐसें जालें ॥ ३ ॥

॥ ४२३१ ॥

धडकला अग्नि आह्मा येती वरी । गोपाळ श्रीहरी विनविती ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अरे कृष्णा काय विचार करावा । आला रे वोणवा जळों[2] आतां ॥ध्रु॥
अरे कृष्णा तुझें नाम बळिवंत । होय कृपावंत राख आतां ॥ २ ॥
तुका ह्मणे अरे कृष्णा नारायणा । गोपाळ करुणा भाकितिले[3] ॥ ३ ॥

॥ ४२३२ ॥

अर कृष्णा आह्मी तुझे निज गडी । नवनीत आवडी देत होतों ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अरे कृष्णा आतां राखें[4] कैसें तरी । संकटाभीतरीं पडियेलों ॥ध्रु॥
वरुषला इंद्रें[5] जेव्हां शिळाधारीं । गोवर्धन गिरी उचलिला ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझे पवाडे गोपाळ । वर्णिती सकळ नारायणा ॥ ३ ॥

॥ ४२३३ ॥

अरे कृष्णा तुवां काळयां[6] नाथिला । दाढे रगडिला रिठासुर ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अरे कृष्णा तुवां पूतना शोषिली । दुर्बुद्धि कळली अंतरींची ॥ध्रु॥
गोपाळ करुणा ऐसी नानापरी । भाकिती श्रीहरी तुजपुढें ॥ २ ॥
तुझें नाम कामधेनु करुणेची । तुका ह्मणे त्यांची आली कृपा ॥ ३ ॥

---

१ पं. वोनवा.—२ पं. जवळीं.—३ तं. भाकतील. पं. भाकतील.—४ दे. राखेंराखें कैसें तरी।.—५ त. जेव्हां इंद्र.—६ पं. काळिया.

॥ ४२३४ ॥

चहुंकडूनियां येती ते कल्लोळ[1] । सभोंवते जोळ[2] जवळि आले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सकुमार मूर्ति श्रीकृष्ण धाकुटी । घोंगडी आणि काठी खांद्यावरि ॥ ध्रु. ॥
लहान लेंकरूं होतें तें[3] सगुण । विक्राळ वदन पसरिलें ॥ २ ॥
चाभाड तें एक गगनीं लागलें । एक तें ठेविलें भूमीवरि ॥ ३ ॥
तये वेळें[4] अवघे गोपाळ ही भ्याले । तुकें[5] ही लपालें भेऊनियां ॥ ४ ॥

॥ ४२३५ ॥

श्रीमुख वोणवा[6] गिळीत चालिलें । भ्यासुर वासिलें वदनांबुज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विक्राळ त्या दाढा भ्यानें पाहावेना । धाउनी रसना ज्वाळ गिळी ॥ ध्रु. ॥
जिव्हा लांब धांव गोळा करी ज्वाळ । मोटें[7] मुखकमळ त्यांत घाली ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघा वोणवा गीळिला । आनंद जाहाला गोपाळांसी ॥ ३ ॥

॥ ४२३६ ॥

गोपाळ प्रीतीनें कैसे विनविती । विक्राळ श्रीपती होऊं नको ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नको रे बा कृष्णा धरूं ऐसें रूप । आह्मां चळकांप सुटलासे ॥ ध्रु. ॥
होई बा धाकुटा शाम चतुर्भूज । बैसोनियां गुज सुखें बोलों ॥ २ ॥
वोणव्याच्या रागें गिळिशील आह्मां । तुका मेघशामा पायां लागे ॥ ३ ॥

॥ ४२३७ ॥

सांडियेलें रूप विक्राळ भ्यासुर । झालें सकुमार कोडिसवाणें ॥ १ ॥

---

१ दे. कलोळ.—२ पं. ज्वाळ.—३ दे. होत ते. त. जालें तें.—४ पं. वेळीं.—५ त. तुका ही लपाला.—६ पं. वोनवा.—७ पं. मोट.

॥ ध्रु. ॥ शाम चतुर्भुज मुकुट कुंडलें । सुंदर दंडलें नव बाळ ॥ ध्रु ॥
गोपाळ ह्मणती कैसेंरे[1] बा कृष्णा । रूप नारायणा धरियेलें ॥ २ ॥
कैसा वाढलासी विक्राळ जालासी । गटगट्य ज्वाळांसी गिळियेलें[3] ॥ ३ ॥
तुका ह्मणे भावें पुसती गोपाळ । अनाथवत्सल[2] ह्मणोनियां ॥ ४ ॥

॥ ४२३८ ॥

बा रे कृष्णा तुझें मुख कीं कोमळ । कैसे येवढे ज्वाळ ग्रासियेले[3] ॥१॥
॥ध्रु.॥ बा रे कृष्णा तुझी जिव्हा कीं कोवळी । होईल पोळली[4] नारायणा॥ध्रु॥
बैसें कृष्णा तुझें पाहूं मुखकमळ । असेल पोळलें कोणे ठायीं ॥ २ ॥
घोंगडिया खालीं[5] घालूनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥ ३ ॥
तुका ह्मणे भावें आकळिला देव । कृपासिंधुराव त्रैलोक्याचा ॥ ४ ॥

॥ ४२३९ ॥

एक ह्मणती मुख वासीं नारायणा । पाहों दे वदना डोळेभरि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वासुनियां मुख पहाती सकळ । अवघे गोपाळ व्योमाकार ॥ध्रु॥
ह्मणती गोपाळ बेटे हो हा देव । स्वरूपाचा ठाव न कळे याच्या ॥ २॥
तुका ह्मणे अवघे विठोबाभोंवते । मिळाले नेणते लहानथोर ॥ ३ ॥

॥ ४२४० ॥

एक ह्मणती कृष्णा वासिलें त्वां मुख । तेव्हां थोर धाक पडिला आह्मां ॥१॥
॥ध्रु.॥ गिळों लागलासी अग्नीचे कल्लोळ । आह्मी चळचळां[6] कांपतसों॥ध्रु
ज्वाळांबरोबरि गिळशील आह्मां । ऐसें मेघशामा भय वाटे ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे भाग्याचे गोपाळ । फुटकें कपाळ आमुचें चि ॥ ३ ॥

---

१ पं. कैसे बारे कृष्णा.—२ त. पं. अनाथवछळ.—३ त. गिळियेलें.—४ पं. पोवळी—५ दे. घालीं. त. घडी.—६ त. चळचळ.

॥ ४२४१ ॥

गोपाळाचें कैसें केलें समाधान । देउनि आलिंगन निवविले ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ज्वाळाबरोबरि तुह्मां कां ग्रासीन । अवतार घेणें तुह्मांसाटीं ॥ध्रु॥
निर्गुण निर्मय मी सर्वांनिराळा । प्रकृतिवेगळा गुणातीत ॥ २ ॥
चिन्मय चिद्रूप अवघें चिदाकार । तुका ह्मणे पार नेणे ब्रह्मा ॥ ३ ॥

॥ ४२४२ ॥

ऐसा मी अपार पार नाहीं अंत । परि कृपावंत भाविकांचा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ दुर्जनां चांडाळां करीं निर्दाळण । करीं संरक्षण अंकिताचें ॥ध्रु॥
भक्त माझे सखे जिवलग सांगाती । सर्वांग त्यांप्रति वोडवीन ॥ २ ॥
पीतांबरछाया करीन त्यांवरी । सदा त्यांचे घरीं द्वारीं उभा ॥ ३ ॥
माझे भक्त मज सदा जे रातले । त्यांघरीं घेतलें धरणें म्यां ॥ ४ ॥
कोठें हें वचन ठेविलें ये वेळे । तुका ह्मणे डोळे झांकियेले ॥ ५ ॥

॥ ४२४३ ॥

भ्रतारेंसी[1] भार्या बोले गुज गोष्टी । मज ऐसी कष्टी नाहीं[2] दुजी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अखंड तुमचें धंद्यावरी मन । माझें तों हेळण करिती सर्व ॥ ध्रु॥
जोडितसां तुह्मी खाती हेरेंचोरें[3] । माझीं तंव पोरें हळहळीती ॥ २ ॥
तुमची व्याली माझे डाई हो पेटली[4] । सदा दुष्ट बोली सोसवेना ॥ ३ ॥
दुष्टवृत्ति[5] नंदुली सद्रा द्वेष करी । नांदों मी संसारीं कोण्या[6] सुखें ॥ ४ ॥
भावा दीर कांहीं धड हा न बोले । नांदों कोणां खालें कैसी आतां ॥ ५ ॥
माझ्या अंगसंगें तुह्मांसी विश्रांति । मग धडगति नाहीं तुमची ॥ ६ ॥

---

१ पं. भ्रतारासीं.—२ त. दुजी नाहीं.—३ पं. चोरेंपोरें.—४ पं. पडली.—५ दे. दुष्ट भ्रुति. त. दृष्टवृत्ति.—६ पं. कोणा.

ठाकतें ठमकतें जीव मुठी धरूनि । परि तुह्मी अजूनि न धरा लाज ॥७॥
वेगळे निघतां संसार करीन । नाहीं तरी प्राण देतें आतां ॥ ८ ॥
तुका ह्मणे जाला कामाचा अंकित । सांगे मनोगत तैसा वर्ते ॥ ९ ॥

॥ ४२४४ ॥

कामाचा अंकित कांतेतें प्रार्थित । तूं कां हो दुश्चित्त निरंतर ॥ १ ॥
॥ध्रु.॥ माझीं मायबापें बंधु हो बहिण । तुज करी सीण त्यागीन मी ॥ध्रु॥
त्यांचें जरि तोंड पाहेन मागुता । तरि मज हत्या घडो तुझी ॥ २ ॥
सकाळ उठोन वेगळा निघेन । वाहातों तुझी आण निश्चयेंसी ॥ ३ ॥
वेगळें निघतां घडीन दोरे चुडा । तूं तव माझा जोडा जन्माचा कीं ॥४॥
ताईत सांकळी गळांचि दुलडी । बाजुबंदजोडी हातसर ॥ ५ ॥
वेणीचे जे नग सर्व ही करीन । नको धरूं सीण मनीं कांहीं ॥ ६ ॥
नेसावया साडी सेलारी चुनडी । अंगींची कांचोळी जाळिया फुलें ॥७॥
तुका ह्मणे केला रांडेनें गाढव । मनासवें धांव घेतलीसे ॥ ८ ॥

॥ ४२४५ ॥

उजळितां उजळे दीपकाची वाती । स्वयंभ ते ज्योति हिऱ्या अंगीं ॥१॥
॥ ध्रु. ॥ एकीं महाकष्टें मेळविलें धन । एकासी जतन दैवयोगें ॥ ध्रु ॥
परिमळें केलें चंदनाचें चिन्ह । निवडी ते भिन्न गाढव तो ॥ २ ॥
तुका ह्मणे जया अंगीं हरिठसा । तो तरे सहसा वंद्य होय ॥ ३ ॥

॥ ४२४६ ॥

बारावर्षें बाळपण । तें ही वेचलें अज्ञानें ॥ १ ॥

---

१ त. तैसें.—२ पं. करिती.—३ पं. दारेचुडा.—४ पं. गळ्याची दुलडी.—५ पं. आंगाची.—६ पं. नामठसा.

॥ ध्रु. ॥ ऐसा[1] जन्म गेला वांयां । न भजतां पंढरिराया ॥ ध्रु ॥
बाकी उरलीं[2] आठ्याशीं । तीस वेचलीं कामासी ॥ २ ॥
बाकी उरली आठावन्न । तीस वेचलीं ममतेनें ॥ ३ ॥
बाकी उरली आठावीस । देहगेह विसरलास ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसा झाडा । संसार हा आहे थोडा ॥ ५ ॥

॥ ४२४७ ॥

सोवळा तो जाला । अंगीकार देवें केला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येर करिती भोजन । पोट पोसाया दुर्जन ॥ ध्रु ॥
चुकला हा भार । तयाची च येरझार ॥ २ ॥
तुका ह्मणे दास । जाला तया नाहीं नास ॥ ३ ॥

॥ ४२४८ ॥

आजि शिवला मांग । माझें विटाळलें आंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ यासी घेऊं प्रायश्चित्त । विठ्ठलविठ्ठल ह्रदयांत ॥ ध्रु ॥
जाली क्रोधासी[3] भेटी । तोंडावाटे[4] नर्क लोटी ॥ २ ॥
अनुतापीं[5] न्हाऊं । तुका ह्मणे रवी पाहूं ॥ ३ ॥

॥ ४२४९ ॥

ठाव तुह्मांपाशीं । जाला आतां ह्रषीकेशी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे जागावें सतत । येथें स्वभावें हे नीत ॥ ध्रु ॥
चोरट्यासी थारा । येथें कैंचा जी दातारा ॥ २ ॥
तुका ह्मणे मनें । आह्मां जालें समाधान ॥ ३ ॥

---

१ पं. वैसा.—२ पं. राहिली.—३ पं. क्रोधिपासी.—४ त. तोंडावाटा.—५ पं. अनुतापे.

॥ ४२५० ॥

पाळियेले लळे । माझे विठ्ठले कृपाळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहुजन्माचें पोषणें । सरतें पायांपाशीं तेणें ॥ ध्रु ॥
सवे दिली लागों । भातें आवडीचें मागों ॥ २ ॥
तुका ह्मणे भिन्न । नाहीं दिसों दिलें क्षण ॥ ३ ॥

॥ ४२५१ ॥

जो या गेला पंढरपुरा । आणीक यात्रा न मानी[1] तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुलभ माय पंढरिराणा । पुरवी खुणा अंतरींच्या ॥ ध्रु ॥
जन्मांतरिंच्या पुण्यरासी । वारी ह्यासी पंढरी[2] ॥ २ ॥
बाहेर येतां प्राण फुटे । रडें दाटे गहिंवरें ॥ ३ ॥
दधिमंगळभोजन सारा । ह्मणती करा मुरडींव ॥ ४ ॥
मागुता हा पाहों ठाव । पंढरिराव दर्शनें ॥ ५ ॥
तुका ह्मणे भूवैकुंठ । वाळुवंट भींवरा ॥ ६ ॥

॥ ४२५२ ॥

न मिळती एका एक । जये नगरीचे लोक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भलीं तेथें राहूं नये । क्षणें होईल नें[3] कळे काय ॥ ध्रु ॥
न करितां अन्याय । बळें करीती[4] अपाय ॥ २ ॥
नाहीं पुराणाची प्रीति । ठायींठायीं पंचाइती ॥ ३ ॥
भल्या बुंग्या[5] मारी । होतां कोणी न निवारी[6] ॥ ४ ॥
अविचाऱ्या हातीं । देऊनि प्रजा नागविती ॥ ५ ॥
तुका ह्मणे दरी । सुखें सेवावी हे बरी ॥ ६ ॥

---

१ दे. मानी.—२ पं. पंढरीची.—३ पं. जेणो काय।.—४ दे. त. करी.—५ पं. बुरा.—६ पं. विचारी.

॥ ४२५३ ॥

शिकवणें नाक झाडी । पुढीलें[1] जोडी कळेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निरयगांवीं भोग देंता । तेथें सत्ता आणिकांची ॥ ध्रु ॥
अवगुणांचा संटा करीं । ते चि धरी जीवासी[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे जडबुद्धि । कर्मशुद्धी सांडवी ॥ ३ ॥

॥ ४२५४ ॥

गोपीचंदन मुद्रा धरणें[3] । आह्मां लेणें वैष्णवां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मिरवूं अळंकार लेणें । हीं[4] भूषणें स्वामीचीं ॥ ध्रु ॥
विकलों तें[5] सेवाजीवें । एक्या भावें एकविध ॥ २ ॥
तुका ह्मणे शूर जालों । बाहेर आलों संसारा ॥ ३ ॥

॥ ४२५५ ॥

विषयांचे लोलिंगत । ते फजति होतील ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न सरे येथें यातिकुळ । शुद्ध मूळबीज व्हावें ॥ ध्रु ॥
शिखासूत्र सोंग वरि । दुराचारी दंड पावे ॥ २ ॥
तुका ह्मणे अभिमानीं[6] । नारायणा न सोसे ॥ ३ ॥

॥ ४२५६ ॥

वडिलें[7] दिलें भूमिदान । तें जो मागे अभिळासून ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अग्रपूजेचा अधिकारी । श्रेष्ठ दंड यमा घरीं ॥ ध्रु ॥
उभयकुल समवेत । नर्कीं प्रवेश[8] अद्भुत ॥ २ ॥
तप्तलोहें भेटी । तुका ह्मणे कल्पकोटी ॥ ३ ॥

---

१ पं. पुढील ते जोडी.—२ त. जीवेंसी.—३ पं. धारणें.—४ पं. हे.—५ पं. तो सेवे जीव। एका भावें.०—६ पं. अभिमान.—७ पं. वडिलीं.—८ पं. प्रवेशे.

लटिकी ग्वाही समेआंत । देतां पतित आगळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कुंभपाकीं वस्ती करूं । होय धुरु कुळेसी ॥ ध्रु ॥
रजस्वला रुधिर स्रवे । तें चि घ्यावें तृषेसी ॥ २ ॥
तुका ह्मणे जन्मा आला । काळ जाला कुळासी ॥ ३ ॥

॥ ४२५७ ॥

आचरे दोष न धरी धाक । परीपाक दुःखाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चांडाळ तो दुराचारी । अंगीकारी कोण त्या ॥ ध्रु ॥
नव्हे संतान वोस घर । अंधकार कुळासी ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याचें दान । घेतां पतन दुःखासी ॥ ३ ॥

॥ ४२५८ ॥

कींविलवाणा जाला आतां । दोष करितां न विचारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अभिळाषी नारी धन । झकवी जन लटिकें चि ॥ ध्रु ॥
विश्वासिया करी[2] घात । न धरी चित्त कांटाळा ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं आला । वृथा गेला जन्मासी ॥ ३ ॥

॥ ४२५९ ॥

घेऊं नये तैसें दान । ज्याचें धन अभिळाषी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो ही[3] येथें कामा नये । नर्का जाय ह्मणोनि ॥ ध्रु ॥
विकी स्नानसंध्या जप । करी तप पुढिलांचें ॥ २ ॥
तुका ह्मणे दांभिक तो । नर्का जातो स्वइच्छा ॥ ३ ॥

---

१ त. पं. देतो.—२ प. करितां.—३ पं. "ही" नाहीं.

॥ ४२६० ॥

सदा नामघोष करूं हरिकथा । तेणें सदा चित्ता समाधान ॥ १ ॥
॥ध्रु.॥ सर्वसुख ल्यालों सर्व अलंकार । आनंदें निर्भर डुलतसों[1] ॥ ध्रु ॥
असों ऐसो कोठें आठव ही नाहीं । देहीं च विदेही भोगूं दशा ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी जालों अग्निरूप । लागों नेदूं पापपुण्य आतां[2] ॥ ३ ॥

॥ ४२६१ ॥

वरिवरि बोले युद्धांचिया[4] गोष्टी । परसैन्या भेटी नाहीं जाली ॥ १ ॥
॥ध्रु.॥ परांव्याचे[5] भार पाहुनियां दृष्टी । कांपतसे पोटीं थरथरां ॥ ध्रु ॥
मनाचा उदार रायाचा जुंझार । फिरंगीचा[6] मार मारीतसे ॥ २ ॥
धन्य त्याची माय धन्य त्याचा बाप । अंगीं अनुताप हरिनामें ॥ ३ ॥
तुका ह्मणे साधु बोले खर्गधार । खोंचतें[7] अंतर दुर्जनाचें ॥ ४ ॥

॥ ४२६२ ॥

गंधर्वनगरीं क्षण एक राहावें । ते चि पैं करावें मूळक्षेत्र[8] ॥ १ ॥
॥ध्रु.॥ खपुष्पाची पूजा बांधोनि[9] निर्गुणा । लक्ष्मीनारायणा तोषवावें[13] ॥ ध्रु ॥
वंध्यापुत्राचा[10] लग्नाचा सोहळा । आपुलिया डोळां पाहीं[11] वेगीं ॥ २ ॥
मृगजळा[12] पोही घालुनि सज्ञाना । तापलिया जना निवविवावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मिथ्या देहेंद्रियकर्म । ब्रह्मार्पण ब्रह्म होय बापा ॥ ४ ॥

॥ ४२६३ ॥

तुझा ह्मणविलों[14] दास । केली उच्छिष्टाची आस ॥ १ ॥

---

१ पं. डुलतसों.—२ पं. आतां.—३ पं. अंगा.—४ दे. त. पं. युध्याचिया.—५ पं. 'पारिख्याचे.—६ दे. फिरंगेचा (पूर्वी 'फिरंगीचा' होतें,).—७ दे. त. खोचती अंतरें.—८ दे. पं. मुळक्षत्र.—९ त. बांधावी.—१० पं. वंध्यापुत्रा घरीं लग्ना०.—११ पं. पाहा:—१२ दे. "मृग. जळा०" हें कडवें नाहीं.—१३ पं. तोषवावें.—१४ त. ह्मणविले.

मुखीं घालावा कवळ । जरी तूं होशील कृपाळ ॥ २ ॥
सीण भाग माझा पुसें । तुका ह्मणे न करीं हांसें ॥ ३ ॥

॥ ४२६४ ॥

काय मागें आह्मी गुतलों काशानीं । पुढें वाहों मनीं धाक देवा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कीर्त्ति चराचरीं आहे तैसी आहे । भेटोनियां काय द्यावें[1] आह्मां ॥ ध्रु॥
घेउनी धरणें बैसती उपवासी । हेट[2] आह्मांपासीं नाहीं तैसा ॥ २ ॥
तातडी तयांनीं केली विटंबणा । आह्मां नारायणा काय उणें ॥ ३ ॥
नाहीं मुक्तिचाड वास वैकुंठींचा । जीव भाव आमुचा देऊं तुज ॥ ४ ॥
तुका ह्मणे काय मानेल तें आतां । तूं घेई अनंता सर्व माझें ॥ ५ ॥

॥ ४२६५ ॥

जालों बळिवंत । होऊनियां शरणागत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केला घरांत रिघावा । ठायीं पाडियेला ठेवा ॥ ध्रु ॥
हाता चढे धन । ऐसें रचलें कारण ॥ २ ॥
तुका ह्मणे मिठी । पायीं देउनि केली लुटी ॥ ३ ॥

॥ ४२६६ ॥

दासीचा जो संग करी । त्याचे पूर्वज नर्कीं[3] द्वारीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसे सांगों जातां जना । नये कोणाचिया मना ॥ ध्रु ॥
बरें विचारूनी पाहें । तुज अंतीं कोण आहे ॥ २ ॥
तुका ह्मणे रांडलेंका । अंतीं जासिल यमलोका ॥ ३ ॥

॥ ४२६७ ॥

गुळ सांडुनि गोडी घ्यावी । मीठ सांडुनि चवि चाखावी ॥ १ ॥

---

१ दे. घ्यावें.—२ पं. हा हाट.—३ त. नर्कद्वारीं.

॥ ध्रु. ॥ ऐसा प्रपंच सांडुनि द्यावा[1] । मग परमार्थ जोडावा ॥ ध्रु ॥
साकरेचा नव्हे ऊंस । आह्मां[2] कैंचा गर्भवास ॥ २ ॥
बीज भाजुनि केली लाही । जन्ममरण आह्मां नाहीं ॥ ३ ॥
आकारासी कैंचा ठाव । देह प्रत्यक्ष जाला वाव ॥ ४ ॥
तुका ह्मणे अवघें जग । सर्वां घटीं पांडुरंग ॥ ५ ॥

॥ ४२६८ ॥

आमुचें दंडवत पायांवरि डोई । व्हावें उतराई ठेवूनियां ॥ १ ॥
कराल तें काय नव्हे जी विठ्ठला । चित्त द्यावें बोला बोबडिया ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी लडिवाळें अनाथें । ह्मणोनि दिनानाथें सांभाळावें ॥ ३ ॥

॥ ४२६९ ॥

भाग्यवंत आह्मी विष्णुदास जगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तें पुरवीत आणुनि जवळी । गाउनी माउली गीतें[3] सुखें ॥ ध्रु ॥
प्रीति अंगीं असे सदा सर्वकाळ । वोळली सकळ सुखें ठायीं ॥ २ ॥
आपुल्या स्वभावें जैसे[4] जेथें असों । तैसे तेथें दिसों साजिरे चि ॥ ३ ॥
वासनेचा कंद उपडिलें मूळ । दुरितें सकळ निवारिलीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे भक्तजनाची माउली । करील साउली विठ्ठल आह्मां ॥ ५ ॥

॥ ४२७० ॥

तीर्थें फळती काळें जन्में आगळिया । संतदृष्टी पाया हेळामात्रें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखाचे सुगम वैष्णवांचे पाय । अंतरींचा[5] जाय महाभेव[6] ॥ ध्रु ॥
काळें हि न सरे तपें समाधान । कथे मूढजन समाधिस्थ ॥ २ ॥

---

१ दे. ध्यावा.—२ दे. त. आह्मांसि.—३ पं. गातें.—४ त. पं. जेथें जैसें.—५ पं. अंतरी.—६ त. महाभव.

उपमा द्यावया सांगतां आणीक । नाहीं तिन्ही लोक धुंडाळितां ॥ ३ ॥
तुका ह्मणे मी राहिलों येणें सुखें । संतसंगें दुःखें नासावया ॥ ४ ॥

॥ ४२७१ ॥

संतजना माझी यावया करुणा । ह्मणउनी दीन[1] हीन जालों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नेणें योग युक्ती नाहीं ज्ञान भति । गातसें[2] या गीती पांडुरंगा ॥ध्रु॥
भाव भक्ती नेणें तप अनुष्ठान । करितों किर्त्तन विठ्ठलाचें ॥ २ ॥
ब्रह्मज्ञान ध्यान न कळे धारणा । एका नारायणा वांचूनियां ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझा[3] विठोबासी भार । जाणे हा विचार तो चि माझा ॥ ४ ॥

॥ ४२७२ ॥

ऐसें काय उणें जालें तुज देवा । भावेंविण सेवा घेसी माझी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय मज द्यावा[4] न लगे मुशारा । पहावें दातारा विचारूनि ॥ध्रु॥
करितों पाखांडें जोडूनि अक्षरें । नव्हे ज्ञान खरें भक्तिरस ॥ २ ॥
गुणवाद तुझे न बोलवे वाणी । आणिका[5] छळणी वाद सांगें[6] ॥ ३ ॥
तरी आतां मज राखें तुझे पायीं । देखसील कांहीं प्रेमरस ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुज हांसतील लोक । निष्काम[7] सेवक ह्मणोनियां ॥ ५ ॥

॥ ४२७३ ॥

भोंदावया मीस घेऊनि संतांचें । करी कुटुंबाचें दास्य सदा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मनुष्याचे परी बोलें[8] रावा करी । रंजवी नरनारी जगामध्यें ॥ध्रु॥
तिमयाचा बैल करी सिकविलें[9] । चित्रींचें बाहुलें गोष्टी सांगे ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा जळो हे महंती । लाज नाहीं चित्तीं निसुगातें ॥ ३ ॥

---

१ पं. हीन हीन.—२ पं. गातसो.—३ पं. माझया.—४ पं. न लग द्यावा.—५ पं. आणीक.—६ पं. सांगों.—७ दे. निःकाम. पं. नीःकाम.—८ त. बोल.—९ त. सांगितलें.

॥ ४२७४ ॥

अंगीं घेऊनियां वारें दया देती । तया भक्ता हातीं चोट आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव्हारा बैसोनि हालविती सुपें । ऐसीं पापी पापें लिंपताती ॥ ध्रु. ॥
एकीबेकीन्यायें होतसे प्रचित्त । तेणें लोक समस्त भुलताती ॥ २ ॥
तयाचे स्वाधीन दैवतें असती । तरि कां मरती त्यांचीं पोरें ॥ ३ ॥
तुका ह्मणे पाणी अंगारा जयाचा । भक्त कान्होबाचा तो ही नव्हे ॥ ४ ॥

॥ ४२७५ ॥

कोणा एकाचिया पोरें केली आळी । ठावी नाहीं पोळी मागें देखी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बुझाविलें हातीं देउनी खापर । छंद करकर वारियेली ॥ ध्रु. ॥
तैसें नको करूं मज कृपावंता । कांय नाहीं सत्ता तुझे हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मायबापाचें उचित । करावें तें हित बाळकाचें ॥ ३ ॥

॥ ४२७६ ॥

पंढरपुरींचें दैवत भजावें । कायां वाचा जावें शरण त्यां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मनीं ध्यान करी अहंताधरूनी । तया चक्रपाणी दूर ठेला ॥ ध्रु. ॥
मान अभिमान सांडुनियां द्यावे । अवघ्यां नीच व्हावें तरी प्राप्त ॥ २ ॥
तुका ह्मणे हें चि कोणासी सांगावें । सादर होउनि भावें भजें देवा ॥ ३ ॥

॥ ४२७७ ॥

अधमाचें चित्त अहंकारीं मन । उपदेश शीण तया केला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पापियाचें मन नें करी आचार । विधवे शृंगार व्यर्थ केला ॥ ध्रु. ॥
अधमाचें चित्त दुश्चित्त ऐकेना । वांयां सीण मना करूं कांय ॥ २ ॥

---

१ पं. देव ते.—२ पं. त्यासी.—३ पं. दुरी.—४ पं. प्राप्ती.—५ पं. "न" नाहीं.—६ पं. विधवेसी.

गर्धवासी दिली चंदनाची उटी । केशर लल्हाटीं शुकराच्या ॥ ३ ॥
पतिवंचकेसी सांगतां उदंड । परि तें पाषांड तिचे मनीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे तैसें अभाविका[1] सांगतां । वाउगा चि चित्तीं[2] सीण होय ॥ ५ ॥

॥ ४२७८ ॥

किती उपदेश करावा खळासी । नाव्हडे तयासी बरें कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शुद्ध हे वासना नाहीं चांडाळाची । होळी आयुष्याची केली तेणें ॥ ध्रु ॥
नाहीं शुद्ध भाव नायके वचन । आपण्या आपण नाडियेलें ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यासी काय व्याली रांड । करितो बडबड रात्रंदिस[3] ॥ ३ ॥

॥ ४२७९ ॥

संत देखोनियां स्वयें दृष्टीं टाळी । आदरें न्याहाळी परस्त्रीसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वीट ये कर्णासी संतवाक्यामृता । स्त्रीशब्द ऐकतां निवे कर्ण ॥ ध्रु ॥
कथेमाजी निज वाटे नित्यक्षणीं । स्त्रियेचे कीर्त्तनीं प्रेमें जागे ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणीं ॥ ३ ॥

॥ ४२८० ॥

मणि पडिला दाढेसी मकरतोंडीं । सुखें हस्तें चि काढवेल प्रौढीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि मूर्खाचें चित्त बोधवेना । दुधें कूर्माच्या पाळवेल सेना ॥ ध्रु ॥
सकळ पृथ्वी हिंडतां कदाचित । ससीसिंगाची प्राप्त होय तेथें ॥ २ ॥
अतिप्रयत्नें गाळितां वाळुवेतें । दिव्य तेलाची प्राप्त होय तेथें ॥ ३ ॥
अतिक्रोधें खवळला फणी पाहीं । धरूं येतो मस्तकीं पुष्पप्रायी ॥ ४ ॥
पहा ब्रह्मानंदें चि एकीं हेळा । महापातकी तो[4] तुका मुक्त केला ॥ ५ ॥

---

१ दे. त. अभावीं.—२ दे. चिंता.—३ पं. रात्रंदिवस.—४ त. 'तो' नाहीं.

॥ ४२८१ ॥

भोळे भाविक हे जुनाट चांगले । होय तैसें केलें भक्तिभावें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ह्मणउनि चिंता नाहीं आह्मां दासां । न भ्यों गर्भवासा जन्म घेतां ॥ ध्रु ॥
आपुलिया इच्छा करूं गदारोळ । भोगूं सर्वकाळ सर्व सुखें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां देवाचा सांगात । नाहीं विसंबत येर येरां ॥ ३ ॥

॥ ४२८२ ॥

आतां तरी माझी परिसो विनंती । रखुमाईच्या पति पांडुरंगा ॥ १ ॥
चुकलिया बाळा न मारावें जीवें । हित तें करावें मायबापीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझा ह्मणताती मज । आतां आहे लाज हे चि तुह्मां ॥ ३ ॥

॥ ४२८३ ॥

नाहीं बळयोग अभ्यास कराया । न कळे ते क्रिया साधनाची ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तुझिये भेटीचें प्रेम अंतरंगीं । नाहीं बळ अंगीं भजनाचें ॥ ध्रु ॥
काय पांडुरंगा करूं बा विचार । झुरतें अंतर भेटावया ॥ २ ॥
तुका ह्मणे सांगा वडिलपणें बुद्धी । तुजविण दयानिधी पुसों कोणां ॥ ३ ॥

॥ ४२८४ ॥

जिहीं तुझी कास भावें धरियेली । त्यांची नाहीं केली सांड देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय माझा भोग आहे तो न कळे । सुखें तुह्मी डोळे झांकियेले ॥ ध्रु ॥
राव रंक तुज सारिखे चि जन । नाहीं थोर लहान तुजपाशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मागें आपंगिलें भक्तां । माझिया संचिता कृपा नये ॥ ३ ॥

---

१ पं. सुख.—२ दे. परिसा वीनवती. पं. परिसावी विनंती.—३ त. सोयरिया.—४ पं. साडी.—५ दे. सारिके.

॥ ४२८५ ॥

कोणतें कारण राहिलें यामुळें । तें म्यां तुज बळें कष्टवावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं जात जीव नाहीं होत हानि[1] । सहज तें मनीं आठवलें ॥ ध्रु ॥
नाहीं चिंता[2] कांहीं मरतों उपासी[3] ॥ अथवा त्या ह्लैसी गाई व्हाव्या ॥ २ ॥
हें तों तुज कळों येतसे अंतरीं । लाँपणीक[4] वरी साच भाँव[5] ॥ ३ ॥
तुका ह्लणे देवा नासिवंतासाटीं । पायांसवें तुटी करिती तुझ्या ॥ ४ ॥

॥ ४२८६ ॥

पहावया तुझा जरि बोलें अंत । तरि माझे जात डोळे देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्तंबीं[6] तुज[7] नाहीं घातलें प्रल्हादें । आपुल्या आनंदें अवतार ॥ ध्रु ॥
भक्ताचिया काजा जालासी सगुण । तुज नाहीं गुण रूप नाम ॥ २ ॥
ऐसा कोण देवा अधम यातीचा । निर्धार हा साचा नाहीं तुझा ॥ ३ ॥
तुका ह्लणे बोले कवतुकें गोष्टी । नेदीं येऊं पोटीं राग देवा ॥ ४ ॥

॥ ४२८७ ॥

प्रगट व्हावें हे अज्ञानवासना । माझी नारायणा हीनबुद्धि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ खाणीवाणी होसी काष्टीं तूं पाषाणीं । जंतु जीवाजनीं[8] प्रसिद्ध हा ॥ध्रु॥
ज्ञानहीन तुज पाहें अल्पमति । लहान हा चित्तीं धरोनियां ॥ २ ॥
परि तूं कृपाळ होसी देवराणा । ब्रिदें तुझीं जना प्रसिद्ध हें ॥ ३ ॥
उताविळ बहु भक्तांचिया काजा । होसी केशीराजा तुका ह्लणे ॥ ४ ॥

---

१ दे. हाणि. त. पं. हाणी.—२ त. पं. चित्ता.—३ त. उपवासी.—४ दे. त. लाखणीक.—५ पं. भावें.—६ पं. स्तंभीं.—७ त. नाहीं तुज—.८ पं. जीवजनीं.

॥ ४२८८ ॥

जरी तुझा मज नसता आधार । कैसा हा संसार दुर्हावता ॥ १ ॥
॥ध्रु.॥ऐसा[1] बळी कोण होईल पुरता । जो हे वारी चिंता आशापाश ॥ ध्रु.॥
मायामोहफांसा लोकलाजबेडी । तुजविण तोडी कोण एक ॥ २ ॥
हें तों मज कळों आलें अनुभवें । बरें माझ्या जीवें पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका ह्मणे यास तूं चि माझा ग्वाही[2] । परि भाव नाहीं जना[3] लोका ॥ ४ ॥

॥ ४२८९ ॥

तुजविण चाड आणिकांची कांहीं । धरीन हें नाहीं तुज ठावें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तरणउपाय योगक्षेम माझा । ठेवियेला तुझ्या पायीं देवा ॥ ध्रु.॥
कोण मज आळी कार्य[4] हे तांतडी । सोनियाची घडी जाय दिस ॥ २ ॥
तुझिया नामाचें ल्यालोंसें भूषण । कृपा संतजन करितील ॥ ३ ॥
तुका ह्मणे जाला आनंदाचा वास । त्हदया या नास नव्हे[5] कधीं ॥ ४ ॥

॥ ४२९० ॥

हें चि सुख पुढें[6] मागतों आगळें । आनंदाचीं फळें सेवादान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जन्मजन्मांतरीं तुझा चि अंकिला । करूनि विठ्ठला दास ठेवीं ॥ ध्रु.॥
दुजा भाव आड येऊं नेदीं चित्ता । करावा अनंता नास त्याचा ॥ २ ॥
अभय[7] देऊनि करावें सादर । क्षण तो विसर पडों नेदीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी जेजे इच्छा करूं । ते ते कल्पतरु पुरविसी[8] ॥ ४ ॥

---

१ पं. ऐसा हा बळी०.—२ दे. गोही. पं. गाही.—३ पं. जनलोका.—४ पं. कोण.—५ पं. नाहीं.—६ पं. पुढती.—७ पं. 'अभय देऊनि' हें कडवें नाहीं.—८ पं. पुरवावे.

॥ ४२९१ ॥

तुज केलिया नव्हे ऐसें काई । डोंगराची राई क्षणमात्रें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मज या लोकांचा न साहे आघात । देखणें प्रचित जीव घेती ॥ ध्रु॥
सहज विनोदें बोलियेलों गोष्टी । आरंभी[1] तों पोटीं न धराबी ॥ २ ॥
दीनरूप मज करावें नेणता । याहुनी अनंता आहें तैसा ॥ ३ ॥
तुका ह्मणे जेणें मज तूं भोगसी । तें करीं जनासीं चाड नाहीं ॥ ४ ॥

॥ ४२९२ ॥

ऐसा[2] सर्व भाव तुज निरोपिला । तूं मज एकला सर्वभावें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अंतरींची कां हे नेणसील गोष्टी । परि सुखासाटीं बोलविसी ॥ ध्रु॥
सर्व माझा भार तुज चालवणें । तेथें[3] म्यां बोलणें काय एक ॥ २ ॥
स्वभावें स्वहित हिताचें कारण । कौतुक करून निवडिसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे तूं हें जाणसी गा देवा । आमुच्या स्वभावा अंतरींच्या ॥ ४ ॥

॥ ४२९३ ॥

लोखंडाचे न[4] पाहे दोष । शिवोन परीस सोनें करी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जैसी तैसी[5] तरी वाणी । मना आणी माउली ॥ ध्रु ॥
लेकराचें स्नेहे गोड । करी कोड त्यागुणें ॥ २ ॥
मागें पुढें रिघे लोटी । साहे खेटी करी[6] तें ॥ ३ ॥
तुका विनवी[7] पांडुरंगा । ऐसें सांगा आहे हें ॥ ४ ॥

॥ ४२९४ ॥

पर्वकाळीं धर्म न करी नासरी । खर्ची राजद्वारीं द्रव्यरासी ॥ १ ॥

---

१ दे. अरंभी.—२ पं. ऐसा तुज भाव सर्व निरोपिला.।—३ पं. 'तेथेंम्यां० कारण।' हे दोन चरण नाहींत.—४ दे. 'न' नाहीं.—५ पं. 'तैसी' नाहीं.—६ पं. करीतसे.—७ दे. त. विनंती.

॥ ध्रु. ॥ सोइऱ्यासी करी पाहुणेर बरा । कांडवी[1] ठोंबरा संतांलागीं ॥ ध्रु ॥
बाईलेचीं[2] सर्व आवडीनें पोसी । मातापितरांसी[3] दवडोनी ॥ २ ॥
श्राद्धीं कष्टी होय सांगतां[4] ब्राह्मण । गोवार मागून सांवडीतो ॥ ३ ॥
नेतो पानें फुलें वेश्येला, उदंड । ब्राह्मणासी खांड नेदी एक ॥ ४ ॥
हातें मोऱ्या शोधी कष्ट[5] करी नाना । देवाच्या पूजना कांटाळतो ॥ ५ ॥
सारा वेळ धंदा करितां श्रमेना । साधूंच्या दर्शना जातां कुंथे ॥ ६ ॥
हरिच्या कीर्तनीं गुंगायासि लागे । येरवीं तो जागे उगला चि ॥ ७ ॥
पुराणीं बैसतां नाहीं रिकामटी । खेळतो सोंगटी अहोरात्रीं[6] ॥ ८ ॥
देवाच्या विभुती न पाहे सर्वथा । करी पानवथा नेत्रभिक्षा ॥ ९ ॥
गाईला देखोनी बदबदां मारी । घोडयाची चाकरी गोड लागे ॥ १० ॥
ब्राह्मणाचें तीर्थ घेतां त्रास मोटा । प्रेमें घेतो घोंटा घटघटां ॥ ११ ॥
तुका ह्मणे ऐसे प्रपंचीं गुंतले । जन्मोनि मुकले विठोबासी ॥ १२ ॥

॥ ४२९५ ॥

आपुल्या[7] पोटासाटीं लोकांची प्रौढी वाणी । संतांची वदनीं निंदा करी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पोटा घातलें जेणें अन्न । न ह्मणे पतितपावन ॥ ध्रु ॥
जेणें घातलें संसारीं । विसरला तया हरी ॥ २ ॥
मी कोठील आणि कोण । हें न कळे जयालागून ॥ ३ ॥
तुका ह्मणे नरस्तुती । करितो भाट त्रिजगतीं ॥ ४ ॥

॥ ४२९६ ॥

आह्मी रामाचे राऊत । वीर जुंझार बहुत ॥ १ ॥

---

१ पं. कांडितो.—२ पं. बाईलेच्या गोता आवडीनें०.—३ पं. मातापित्रियासी दवडितो.—४ पं. सांगाया.—५ त. करी कष्ट.—६ पं. अहोरात्र.—७ पं. पोटासाटीं प्रौढि लोकासी वाणी.

॥ ध्रु. ॥ मनपवनतुरंग । हातीं नामाची फिरंग ॥ ध्रु ॥
वारू चालवूं चहूंखुरीं । घाला घालूं यमपुरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे पेणें । आह्मां वैकुंठासी जाणें ॥ ३ ॥

॥ ४२९७ ॥

पवित्र तें कुळ पावन तो देश । जेथें हरिचे दास घेती[1] जन्म ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कर्मधर्म त्याचे जाला नारायण । त्याचेनी पावन तिन्ही लोक ॥ध्रु॥
वर्णअभिमानें[2] कोण जाले पावन । ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥ २ ॥
अंत्यजादि योनि तरल्या हरिभजनें[3] । तयाचीं पुराणें भाट जालीं ॥ ३ ॥
वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार[4] । धागा हा चांभार रोहिदास ॥ ४ ॥
कबीर मोमीन लतिफ[5] मुसलमान । सेना[6] न्हावी जाण विष्णुदास ॥ ५ ॥
कान्होपात्र[7] खोदु पिंजारी तो दादु । भजनीं अभेदू हरिचे पायीं ॥ ६ ॥
चोखामेळा वंका जातीचा माहार । त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥ ७ ॥
नामयाची जनी कोण तिचा भाव । जेवीं पंढरीराव तियेसवें[8] ॥ ८ ॥
मैराळा[9] जनक कोण कुळ त्याचें । महिमान तयाचें काय सांगों ॥ ९ ॥
यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥ १० ॥
तुका ह्मणे तुह्मी विचारावे[10] ग्रंथ । तारिले पतित नेणों किती ॥ ११ ॥

॥ ४२९८ ॥

नामासारिखी करणी । हे तों न दिसे त्रिभुवनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सिलंगणीचें सोनें । ठेवूं नये तें गाहाण ॥ ध्रु ॥

---

१ पं. जन्म घेती.—२ पं. वर्णअभिमान.—३ पं. हरिभजनीं.—४ दे. त. लतिव.—५ दे. त. शेणा.—६ पं. कान्होपात्रा. दे. काणोपात्र.—७ पं. तिच्यासवे.—८ पं. मैराळ.—९ पं. नामाचें.—१० त. विवरावे.

आदित्याचीं झाडें । काय त्याचा उजड पडे ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । ब्रिदें सौंडोनियां ठेवा ॥ ३ ॥

॥ ४२९९ ॥

येऊनि संसारा काय हित केलें । आयुष्य नासिलें शिश्नोदरा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ विषय सेवितां कोण तृप्त जाला । इंधनीं निवाला अग्नि कोठें ॥ध्रु॥
देखोनी मृगजळ भांबावलीं वेडीं । विचाराची थडी न टाकिती ॥ २ ॥
ऐसियां जीवांसी सोय न लाविसी । निष्ठुर कां होसी कृपाळुवा ॥३॥
तुका ह्मणे देवा अगाध पैं थोरी । सर्वांचे अंतरीं पुरलासी ॥ ४ ॥

॥ ४३०० ॥

समर्थाचे सेवे बहु असे हित । विचार त्वदयांत करुनी पाहें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वरकडाऐसा नव्हे हा समर्थ । क्षणें चि घडित सृष्टी नासे ॥ध्रु॥
ज्याची कृपा होतां आपणा ऐसें करीं । उरों नेदी उरी दारिद्राची ॥ २ ॥
ऐशालागीं मन वोळगे अहर्निशीं । तेणें वंद्य होशी ब्रह्मांदिकां ॥ ३ ॥
तुका ह्मणे हें चि आहे पैं मुद्दल । सत्य माझा बोल हा चि माना ॥४॥

॥ ४३०१ ॥

पिकलिये सेंदे कडुपण गेलें । तैसें आह्मां केलें पांडुरंगें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काम क्रोध लोभ निमाले ठायीं चि । सर्व आनंदाची सृष्टि जाली ॥ ध्रु ॥
आठव नाठव गेले भावाभाव । जाला स्वयमेव पांडुरंग ॥ २ ॥
तुका ह्मणे भाग्य या नांवें ह्मणजे । संसारीं जन्मीजे या चि लागीं ॥३॥

---

१ दे. नाशें. त. नासें.—२ प. पिकलिया. दे. पिकलिय.

॥ ४३०२ ॥

येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पैं धीर भजनमार्गीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चंचळ चित्तासी ठेवूनियां ठायीं । संतांचिये पायीं लीन व्हावें ॥ ध्रु ॥
भावाचा पैं हात धरावा निश्चयें । तेणें भवभय देशधडी ॥ २ ॥
नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाई सर्वकाळ ॥ ३ ॥
तुका ह्मणे धन्य वंश त्या नराचा । ऐसा निश्चयाचा मेरु जाला ॥ ४ ॥

॥ ४३०३ ॥

षड्रसीं रांधिलें खापरीं घातलें[1] । चोहोटा[2] ठेविलें मध्यरात्रीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्यासी सदाचारी लोक न शिवती । श्वानासी निश्चिती फावलें तें ॥ ध्रु ॥
तैसें दुष्टकर्म[3] जालें हरिभक्ता । त्यागिली ममता विषयासक्ति ॥ २ ॥
इहपरलोक उभय विटाळ । मानिती केवळ हरिचे दास ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा आवडे हे सेवा । अनुदिनीं व्हावा पूर्ण हेतु ॥ ४ ॥

॥ ४३०४ ॥

बीज भाजुनि केली लाही । आह्मां जन्ममरण नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आकारासी कैंचा ठाव । देहप्रत्यक्ष जाला देव ॥ ध्रु ॥
साकरेचा नव्हे उस । आह्मां कैंचा गर्भवास ॥ २ ॥
तका ह्मणे औघा जोग । सर्वां घटीं पांडुरंग ॥ ३ ॥

॥ ४३०५ ॥

वैकुंठींचा देव आणिला भूतळा । धन्य तो आगळा पुंडलीक ॥ १ ॥

---

१ त. वाढिलें.—२ पं. चोहाटा. त. चोहटा.—३ पं. त. दुष्टकर्म.

॥ ध्रु.॥ धारिष्ट धैर्याचा वरिष्ठ भक्तांचा । पवित्र पुण्याचा एकनिष्ठ ॥ ध्रु ॥
पितृसेवा पुण्यें लाधला निधान । ब्रह्म सनातन अंगसंगें ॥ २ ॥
अंगसंगें रंगें क्रीडा करी जाणा । ज्या घरीं पाहुणा वैकुंठींचा ॥ ३ ॥
धन्य त्याची शक्ति भक्तीची हे ख्याति । तुका ह्मणे मुक्ति पायीं लोळे ॥ ४ ॥

॥ ४३४६ ॥

मृगाचिये अंगीं कस्तुरीचा वास । असे ज्याचा त्यास नसे[1] ठावा ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ भाग्यवंत घेती वेचूनियां मोलें[2] । भारवाही मेले वाहतां वोझें ॥ ध्रु ॥
चंद्रामृतें तृप्तिपारणें चकोरा । भ्रमरासी चारा सुगंधाचा ॥ २ ॥
अधिकारी येथें घेती हातवटी । परीक्षवंतां दृष्टी रत्न जैसें ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय अंधळिया हातीं । दिलें जैसें मोतीं वांयां जाय ॥ ४ ॥

॥ ४३०७ ॥

आलिया संसारीं देखिली पंढरी । कीर्ति महाद्वारीं वाणूं[3] तुझी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ पताकांचे भार नामाचे गजर । देखिल्या संसार सफळ जाला ॥ ध्रु ॥
साधुसंतांचिया धन्य जाल्या भेटी । सांपडली लुटी मोक्षाची हे ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां हें चि पैं मागणें[4] । पुढती नाहीं येणें संसारासी ॥ ३ ॥

॥ ४३०८ ॥

ऐसे[5] कैसे जाले भोंदू । कर्म करोनि ह्मणती साधु ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंगा लावूनियां राख । डोळे झांकुनी करिती पाप ॥ ध्रु ॥
दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ॥ २ ॥
तुका ह्मणे सांगों किती । जळो तयांची संगती ॥ ३ ॥

---

१ त. ठावा नाहीं.—२ पं. मोल.—३ दे. त. वानूं.—४ पं. मागेन.—५ ए. 'ऐसे कैसे०' हें कडवें नाहीं.

॥ ४३०९ ॥

कोणी निंदा कोणी वंदा । आह्मां स्वहिताचा धंदा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तुह्मांसी गरज । आह्मी भजूं पंढरिराज ॥ ध्रु ॥
तुह्मांसारिखें चालावें । तेव्हां स्वहिता मुकावें ॥ २ ॥
तुका ह्मणे हो कां कांहीं । गळ दिला विठ्ठल पायीं ॥ ३ ॥

॥ ४३१० ॥

तुझे नामीं दिनानाथा । आह्मी उघडा घातला माथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां न धरावें दुरी । बोल येईल ब्रीदावरी ॥ ध्रु ॥
पतित होतों ऐसा ठावा । आधीं[1] कां न विचारावा ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझे पायीं । आह्मी मिरास केली पाहीं ॥ ३ ॥

॥ ४३११ ॥

रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न । चिन्मय अंजन सुदलें डोळां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तेणें अंजनगुणें दिव्यदृष्टि जाली । कल्पना निवाली द्वैताद्वैत ॥ध्रु॥
देशकालवस्तुभेद मावळला । आत्मा निर्वाळला विश्वाकार ॥ २ ॥
न जाला प्रपंच आहे परब्रह्म । अहंसोहं ब्रह्म ओकळलें[2] ॥ ३ ॥
तत्त्वमसि विद्या ब्रह्मानंद सांग । तें चि जाला अंगें तुका आतां ॥ ४ ॥

॥ ४३१२ ॥

नीत सांडोनि अवनीत चाले । भंडउभंड भलतें चि बोले ॥ १ ॥
॥ध्रु.॥ त्यांत कोणाचें काय बा गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ॥ ध्रु ॥
ज्यासि वंदावें त्यासी निंदी । मैत्री सांडोनि होतसे दंदी ॥ २ ॥

---

१ पं. आधी च कां०.—२ त. कवळलें.

आन यातीचे संगती लागे । संतसज्जनामध्यें ना वागे ॥ ३ ॥
केल्याविण पराक्रम सांगे । जेथें सांगे तेथें चि भीक मागे ॥ ४ ॥
करी आपुला चि संभ्रम । परि पुढें कठीण फार यम ॥ ५ ॥
तुका ह्मणे कांहीं नित्यनेम । चित्तीं न धरी तो अधम ॥ ६ ॥

॥ ४३१३ ॥

मानूं कांहीं आह्मी आपुलिया इच्छा[1] । नाहीं तरि सरिसा रंकरावो[2] ॥ १ ॥
आपुल्या उदास आहों[3] देहभावीं । मग लज्जाजीवीं चाड नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे खेळों आह्मी सहजलीळे । ह्मणोनी निरांळे सुखदुःखा[4] ॥ ३ ॥

॥ ४३१४ ॥

बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाउलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंगें झाडीन अंगण । त्याचें दासत्व करीन ॥ ध्रु. ॥
त्याचा होईन किंकर । उभा ठाकेन जोडोनि कर ॥ २ ॥
तुका ह्मणे देव । त्याचे चरणीं माझा भाव ॥ ३ ॥

॥ ४३१५ ॥

पाण्या निघाली गुजरी । मन ठेविलें दो घागरीं ।
चाले मोकळ्या पदरीं । परी लक्ष तेथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वावडी उडाली अंबरीं । हातीं धरोनियां दोरी ।
दिसे दुरिच्या दुरी । परी लक्ष तेथें ॥ ध्रु. ॥
चोर चोरी करी । ठेवी वनांतरीं । वर्ततसे चराचरीं । परी लक्ष तेथें ॥ २ ॥
व्यभिचारिणी नारी । घराश्रम करी । परपुरुष जिव्हारीं । परी लक्ष तेथें ॥ ३ ॥
तुका ह्मणे असों भलतिये व्यापारीं । लक्ष सर्वेश्वरीं । चुकों नेदी ॥ ४ ॥

---

१ दे. त. स्वइच्छा.—२ त. रंकराव.—३ त. असों.—४ दे. सुख दुःख. त. सुखदुःखें.

॥ ४३१६ ॥

जनाचिया मेना[1] जावें कासियेसी । माझी वाराणसी पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें भागीरथी येथें भीमरथी । अधिक ह्मणती चंद्रभागा ॥ ध्रु ॥
तेथें माधवराव येथें यादवराव । जोणोनियां[2] भाव पुंडलिकाचा ॥ २ ॥
विष्णुपद गया ते चि येथें आहे । प्रत्यक्ष हें पाहे विटेवरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे हे चि प्रपंच उद्धरी । आतां पंढरपुरी[3] घडो बापा ॥ ४ ॥

॥ ४३१७ ॥

नको येऊं लाजे होय तूं परती । भजों दे श्रीपती सखा माझा ॥ १ ॥
तुझे संगतीनें मोटा जाला घात । जालों मी अंकित दुर्जनाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे रांडे घेइन काठीवरी । धनी सहाकारी राम केला ॥ ३ ॥

॥ ४३१८ ॥

भक्तिऋण घेतलें माझें । चरण गाहाण आहेत तुझे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेम व्याज देईं हरी । माझा हिशेब लवकरी करीं ॥ ध्रु ॥
माझें मी न सोडीं धन । नित्य करितों कीर्त्तन ॥ २ ॥
तुझें नाम[4] आहे खत । सुखें करीं पंचाईत ॥ ३ ॥
तुका ह्मणे गरुडध्वजा । यासी साक्ष श्रीगुरुराजा[5] ॥ ४ ॥

॥ ४३१९ ॥

फिरविलें देऊळ जगामाजी ख्याति । नामदेवा हातीं दुध प्याला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भरियेली हुंडी नरसी महंत्याची[6] । धनाजीजाटाचीं सेतें पेरी ॥ ध्रु ॥
मिराबाईसाटीं घेतो विष प्याला । दामाजीचा जाला पांडेवार[7] ॥ २ ॥

---

१ त. संगें जावें कासियासी ।.—२ त, अधिक हा भाव पुंडलीक ।. पं. अधिक तो भाव-पुंडलीक ।.—३ पं. पंढरपुर.—४ पं. नामीं.—५ त. सद्गुरुराजा. पं. गुरुराजा.—६ पं. महंत्याची.—७ दे. पाढेवार.

कबीराचे मागीं विणूं लागे सेले । उठविलें मूल कुंभाराचें ॥ ३ ॥
आतां तुह्मी दया करा पंढरिराया । तुका विनवी पायां वेळोवेळां[1] ॥ ४ ॥

॥ ४३२० ॥

हे चि वेळ[2] देवा नका मागें घेऊं । तुह्मांविण जाऊं शरण कोणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नारायणा ये रे पाहें विचारून । तुजविण कोण आहे मज ॥ ध्रु॥
रात्रं[3] दिवस तुज आठवूनि आहें । पाहातोसी काये सत्त्व माझें ॥ २ ॥
तुका ह्मणे किती येऊं काकुलती । कांहीं माया चित्तीं येऊं द्यावी ॥ ३ ॥

॥ ४३२१ ॥

वृंदावनां[4] केलें साकरेचें आळें । न संडे[5] वेगळें कडुपण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कावळ्याचें पिलूं[6] कौतुकें पोशिलें । न राहे उगलें विष्ठेविण ॥ ध्रु॥
क्षेम देतां अंगा गांधेलाची[7] पोळी । करवी नादाळी महाशब्द[8] ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे न होती ते भले । घालिती ते घाले साधुजना ॥ ३ ॥

॥ ४३२२ ॥

मुसळाचें धनु नव्हे हो सर्वथा । पाषाण पिळितां रस कैंचा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ वांझे बाळा जैसें दुध नाहीं स्तनीं । गारा त्या अंधणीं न सिजती ॥ ध्रु ॥
नवखंड पृथ्वी पिके मृगजळें । डोंगर भेटे बळें असमानासी[9] ॥ २ ॥
नैश्वर[10] देह तैसें तेव्हां होय ब्रह्म । तुका ह्मणे श्रम करूनी काय ॥ ३ ॥

॥ ४३२३ ॥

धन्या[11] आतां काय करूं । माझें तान्हुलें लेकरूं ॥ १ ॥

---

१ दे. त. नमीतसे.—२ पं. वेळा.—३ दे. त. रात्रहि दिवस.—४ दे. त. इंद्रावणा.—५ दे. त. सांडी.—६ त. पिलें.—७ त. गांधणाची.—८ त. महाशब्दें.—९ पं. आंसमानीं.—१० दे. त. नैश्वर ब्रह्म तेव्हां ०.—११ त. धण्या.

॥ध्रु.॥ धन्या[1] अवचित मरण आलें। मज कोणासी निरविलें ॥ ध्रु ॥
माझें दार[2] नका पाडूं । त्याचे हात पाय तोडूं ॥ २ ॥
एकें[3] हातीं धरली दाढी । घे कुऱ्हाडी दुजे हातीं ॥ ३ ॥
येरी घाव घालूं पाहे । तंव तो उठोनि उभा राहे ॥ ४ ॥
तुका ह्मणे अवघीं चोरें । सेखीं[4] रामनाम सोइरें ॥ ५ ॥

॥ ४३२४ ॥

निरंजनीं आह्मीं बांधियेलें घर । निराकारीं निरंतर राहिलों[5] आह्मी ॥ १ ॥
निराभासीं पूर्ण जालों[6] समरस । अखंड ऐक्यास पावलों आह्मी ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां नाहीं अहंकार । जालों[7] तदाकार नित्य शुद्ध ॥ ३ ॥

॥ ४३२५ ॥

पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसोनि संदेह बुद्धिभेद ॥ १ ॥
जीवशिवा सेज रचिली आनंदें । आउठावे[8] पदीं आरोहण ॥ २ ॥
निजीं निजरूपीं निजविला तुका । अनुहाते[9] बाळका हलरु गाती ॥ ३ ॥

॥ ४३२६ ॥

नाना मतांतरें शब्दाची व्युत्पत्ति । पाठांतरें होती वाचाळ ते ॥ १ ॥
॥ध्रु.॥ माझ्या विठोबाचें वर्म आहे दुरी । कैंची तेथें उरी देहभावा ॥ध्रु॥
यज्ञ याग जप तप अनुष्ठान । राहे ध्येय ध्यान आलीकडे ॥ २ ॥
तुका ह्मणे होय उपरति चित्ता । अंगीं सप्रेमता येणें लागें ॥ ३ ॥

॥ ४३२७ ॥

नाहीं शब्दाधीन वर्म आहे दुरी । नव्हे तंत्रीं मंत्रीं अनुभव तो[10] ॥ १ ॥

---

१ धण्या.—२ दे. त. दारवंड.—३ पं. 'एके हातीं०' हें कडवें नाहीं. त. एके हाती घे कुऱ्हाडी । दुजे हाती धरली दाढी ॥.—४ दे. सेकी.—५ पं. राहिलोंसें.—६ पं. जाला.—७ दे. औठावे. पं औटावे.—८ त. हाल्लरुगाति.—९ दे. पं. वित्पाति. त. वीत्पत्ती.—१० पं. "तो" नाहीं.

॥ध्रु.॥ हर्षामर्षें अंगीं आदळती लाटा । कामक्रोधें तटा सांडियेलें ॥ ध्रु ॥
न सरे ते[1] भक्ति विठोबाचे पायीं । उपरति नाहीं जेथें चित्ता ॥ २ ॥
तुका ह्मणे सुख देहेनिरसनें[2] । चिंतनें चिंतनें[3] तद्रूपता ॥ ३ ॥

॥ ४३२८ ॥

शोधूनि अन्वय वंश वंशावळी । परंपरा कुळीं उच्चारण ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ह्मणविलें मागें पुढें चाले कैसें । केला सामरस्यें अभिषेक ॥ ध्रु॥
एकछत्र झळके उन्मनी निशाणी । अनुहात[4] ध्वनी गगन गर्जे ॥ २ ॥
तुकया स्वामी स्थापी निजपदीं[5] दासा । करूनि उल्हासा सप्रेमता ॥ ३ ॥

॥ ४३२९ ॥

प्रवत्तिनिवृत्तीचे आटूनियां भाग । उतरिलें चांग, रसायण ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ज्ञानाग्निहुताशीं कडशिले वोजा । आत्मसिद्धिकाजा लागूनियां ॥ध्रु॥
ब्रह्मीं ब्रह्मरस शीघ्रें जाला पाक । घेतला रुचक प्रतीतीमुखें ॥ २ ॥
स्वानुभवें अंगीं जाला समरस । साधनी निजध्यास ग्रासोग्रासीं ॥ ३ ॥
अरोग्यता तुका पावला अष्टांगीं । मिरविला रंगीं निजात्मरंगें[6] ॥ ४ ॥

॥ ४३३० ॥

काय बा करिशी सोवळें ओवळें । मन नाहीं निर्मळ वाउगें चि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ काय बा करीसी पुस्तकांची मोट । घोकितां त्हदयस्फोट हाता नये ॥ ध्रु ॥
काय बा करीसी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ॥ २ ॥
काय बा करीसी ज्ञानाचिया[7] गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची ॥ ३ ॥
काय बा करीसी दंभलौकिकातें । हित नाहीं मातें[8] तुका ह्मणे ॥ ४ ॥

---

१ पं. हे.—२ त. देहे निरसणें—३ दे. त. चिंतन.—४ दे. त. अनुहाताच्या ध्वनी.—५ पं. सिद्ध.—६ त. निजात्मरंगीं.—७ पं. ज्ञान आणि गोष्टी.—८ दे. मातें. पं. मातु.

॥ ४३३१ ॥

स्वामी[1] तूं ही कैसा न पडसी डोळां । सुंदर सांवळा घवघवीत ॥ १ ॥
॥ध्रु.॥ चतुर्भुज माळा रुळे एकावळी । कस्तुरी निडळीं रेखिलीसे ॥ध्रु॥
शंख चक्र गदा[2] रुळे वैजयंती । कुंडलें तळपती श्रवणीं दोन्ही ॥ २ ॥
तुका ह्मणे स्वामी आतां दावीं पाय । पांडुरंग माय कृपावंते ॥ ३ ॥

॥ ४३३२ ॥

आणीक कोणापुढें वासूं मुख सांग । माझें[3] अंतरंग कोण जाणे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहें तुजकडे येऊनी जाऊनी । पांडुरंगा मनीं विचारावें ॥ ध्रु ॥
भय चिंता[4] अवघे उद्योग सांडिलें । आठवुनी पाउलें असें[5] तुझीं ॥ २ ॥
नका विसरूं मज वैकुंठनायका । विनंविती[6] तुका बंदीजन ॥ ३ ॥

॥ ४३३३ ॥

सद्गुरूचे चरणीं ठेविला मस्तक । देउनियां हस्तक उठविलें ॥ १ ॥
उठविलें मज देउनियां प्रेम । भावार्थें सप्रेमें[7] नमस्कारीं ॥ २ ॥
नमस्कारीं त्याला सद्गुरुरायाला । तुका ह्मणे बोला नाम वाचे ॥ ३ ॥

॥ ४३३४ ॥

सद्गुरूनें मज आशीर्वाद दिला । हरुष भरला ह्रदयीं माझे ॥ १ ॥
ह्रदयींचा भाव कळला गुरूसी । आनंदउल्हासीं बोले मज ॥ २ ॥
बोले मज गुरु कृपा तो करूनि । तुका ह्मणे मनीं आनंदलों ॥ ३ ॥

॥ ४३३५ ॥

आनंदाचा कंद गाइयेला गीतीं । पाहियेला चित्तीं देवराव ॥ १ ॥

---

१ पं. स्वमीं तोही.—२ पं. गळा.—३ त. दे. कीं माझें०.—४ दे. चित्तीं.—५ पं. आहे.—६ पं. विनवीतसे.—७ दे. त. सप्रेमे.

देवराव तो ही आहे निश्चयेसीं । अखंड नामासी बोलवितो ॥ २ ॥
बोलवितो मज कृपा तो करूनि । तुका ह्मणे मनीं धरा भाव ॥ ३ ॥

॥ ४३३६ ॥

सातादिवसांचा जरी जाला उपवासी । तरीं कीर्तनासी टाकूं नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फुटो हा मस्तक तुटो हें शरीर । नामाचा गजर सोडूं नये ॥ ध्रु ॥
शरीराचे होत दोनी ते ही भाग । परि कीर्त्तनाचा रंग सोडों नये ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसा नामीं ज्या निर्धार । तेथें निरंतर देव असे ॥ ३ ॥

॥ ४३३७ ॥

चला आळंदीला जाऊं । ज्ञानदेवा डोळां पाहूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होतिल संताचिया भेटी । सुखाचिया सांगों गोष्टी ॥ ध्रु ॥
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखीं ह्मणतां चुकती फेर ॥ २ ॥
तुम्हां जन्म नाहीं एक । तुका ह्मणे माझी भाक ॥ ३ ॥

॥ ४३३८ ॥

चरणीं नमन सद्गुरूच्या पूर्ण । नित्य हरिगुण गाऊं सदा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गोवर्धन जेणें नखीं हो धरिला । काळया नाथिला महाबळी ॥ ध्रु ॥
ऐसे हरिगुण गातो वाचेवरि । पतितासी तारी जनार्दन ॥ २ ॥
तुका ह्मणे हें चि सज्जनां जीवन । वाचेसी स्मरण गोविंदाचें ॥ ३ ॥

॥ ४३३९ ॥

सद्गुरूवांचूनि प्रेतरूप वाणी । बोलती पुराणीं व्यासऋषि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि तयाचें पाहूं नये तोंड । निगुरा अखंड सुतकाळा ॥ ध्रु ॥

---

१ दे. मथिला.

कोणे परी तया नव्हे चि सुटका। देह त्याचा लटिका जाणा तुह्मी ॥२॥
तुका ह्मणे ऐसीं बोलती पुराणें । संतांचीं वचनें मागिलां हो[1] ॥ ३ ॥

॥ ४३४० ॥

डिवेना डसेना बुजेना[2] निर्मळ । परि अमंगळ स्वीकारीना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परंतु गर्धब अपवित्र जाणा । पर्वकाळीं दाना देऊं नये ॥ ध्रु ॥
डिवी लात्री बुजे बहु नेदी दुध । मुखीं नाहीं शुद्ध विष्ठा खाय[3] ॥ २ ॥
परंतु ते गाय पवित्र हो जाणा । पर्वकाळीं दाना देऊंजेते[4] ॥ ३ ॥
ब्राह्मणें ब्राह्मणा सद्गुरू करावा । परि न करावा शूद्रादिक ॥ ४ ॥
तुका ह्मणे देवें सांगितली सोय । ह्मणोनि त्याचे पाय धरिले जीवें ॥५॥

॥ ४३४१ ॥

संसारींचें[5] ओझें वाहता वाहाविता । तुजविण अनंता नाहीं कोणी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ गीतेमाजी शब्द दुंदुभीचा गाजे । योगक्षेमकाज करणें त्याचें ॥ ध्रु ॥
चतुर्भुजा करीं वारू शृंगारावे । सारथ्य करावें अर्जुनाचें ॥ २ ॥
श्वपच[6] अंत्यज भक्तिस्नेहें जाला । अचळपदीं केला ध्रुव तुका ॥ ३ ॥

॥ ४३४२ ॥

कवणदिस येइल कैसा । न कळे संपत्तीचा भरंवसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चौदा चौकाडिया लंकापति । त्याची कोण जाली गति ॥ ध्रु ॥
लंकेसारिखें भुवन । त्याचें त्यासी पारखें जाण ॥ २ ॥
तेहतीस कोटि बांदवडी । राज्य जातां न लगे घडी ॥ ३ ॥
ऐसे अहंतेनें नाडिले । तुका ह्मणे वांयां गेले ॥ ४ ॥

---

१ त. ही.—२ दे. बुझेना.—३ त. भक्षी.—४ त. देऊं जेंते.—५ पं. संसाराचें.—६ पं. स्वपच.

॥ ४३४३ ॥

लटिका प्रपंच वांझेची संतति । तत्वज्ञा हे भ्रांति बाधूं नेणे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ सूर्यबिंबीं काय अंधार रिघेल । मृगजळें तिंबेल नभ काई ॥ ध्रु ॥
तैसा दृश्यभास नाडळे चि डोळां । प्रकाशसोहळां भोगीतसे ॥ २ ॥
भोग भोग्य भोक्ता नाडळे चि कांहीं । चैतन्यविग्रहीं पूर्णकाम ॥ ३ ॥
तुका ब्रह्मानंदीं आहे तुकब्रह्म । प्रपंचाचें बंड न देखे डोळां ॥ ४ ॥

॥ ४३४४ ॥

न ह्मणे वो आह्मी आपुलेनि चित्तीं । निःशेष अतिप्रीति विषयीं तो ॥ १ ॥
॥ध्रु.॥ खोटा तो विटाळ खोटा तो विटाळ । ह्मणोनि गाबाळ सांडियेलें ॥ ध्रु ॥
भांगतमाखूचा चित्ताचा आदर । कोरडें उत्तर चाटावें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी नव्हों फजितखोर । तुटीचा व्यापार करावया ॥ ३ ॥

॥ ४३४५ ॥

अनाथाचा नाथ पतितपावन । दीनाचें रक्षण करीतसे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ऐसें जाणोनियां नामीं विश्वासलों । भीमातिरा आलों धांवत चि ॥ ध्रु ॥
स्नान हें करितां त्रिताप निवाले । महाद्वारा आलें मन माझें ॥ २ ॥
तेथें अनुमात्र रीग नव्हे याचा । परतलों साचा तेथूनियां ॥ ३ ॥
पुंडलिकापाशीं येऊनि पुसिलें । चिन्मय दाटलें जनार्दन ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां दुजा देव नाहीं । बाप तरी आई तो चि विठो ॥ ५ ॥

॥ ४३४६ ॥

ढालतरवारे गुंतले हे कर । ह्मणे तो जुंझार कैसा झुंजों ॥ १ ॥

---

१ दे. त. वांजेची.—२ पं. 'डोळा । प्रकाश० नाडळे चि' इतकें नाहीं.—३ पं. प्रपंच हें.—४ पं. विषयी.—५ दे. 'खोटा तो विटाळ' हें पुनः नाहीं.—६ त. अनुमानु मात्र.—७ दे. ह्मणे जुंझणार कैसा जुंझे.—८ पं. मी.

॥ध्रु.॥ पेटी[1] पडदळे[2] सिले टोप ओझें । हें तों जालें दुजें मरणमूळ॥ ध्रु॥
बैसविलें मला येणें अश्वावरी । धांवूं पळूं तरी कैसा आतां ॥ २ ॥
असोनि उपाय ह्मणे हे अपाय । ह्मणे हायहाय काय करूं ॥ ३ ॥
तुका ह्मणे हा तों स्वयें परब्रह्म । मूर्ख नेणे वर्म संतचरण ॥ ४ ॥

॥ ४३४७ ॥

किडा अन्नाचें माणुस[3] । त्याचा ह्मणविल्या दास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तें ही त्यासी उपेक्षीना । बोल आपुला सांडीना ॥ ध्रु ॥
तो तूं नराचा नरेंद्र । तुजपासूनि इंद्र चंद्र ॥ २ ॥
तुका ह्मणे विश्वंभर । तुज वर्णी फणीवर ॥ ३ ॥

॥ ४३४८ ॥

कोटिजन्म पुण्यसाधन साधिलें । तेणें हाता आलें हरिदास्य ॥ १ ॥
॥ध्रु.॥ रात्रीं दिवस ध्यान हरीचें भजन । कायावाचामन[4] भगवंतीं ॥ ध्रु ॥
ऐसिया प्रेमळा ह्मणताती वेडा । संसार रोकडा बुडविला ॥ २ ॥
एकवीस कुळें जेणें उद्धरिलीं । हे तों न कळे खोली भाग्यमंदा ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्याची पायधुळी मिळे । भवभय पळे वंदितां चि ॥ ४ ॥

॥ ४३४९ ॥

उपजला प्राणी न राहे संसारीं । बैसला सेजारी काळ उसां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ पाहा तो उंदीर घेउनि जाय बोका । तैसा काळ लोका नेत असे ॥ध्रु॥
खाटिकाचे घरीं अजापुत्र पाहें । कसाबाची गाय वांचे कैसी ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं करा काढाकाढी । जाती ऐसी घडी पुन्हा नये ॥ ३ ॥

---

१ पं. पोटी.—२ त. पडदाळे.—३ दे. मानुस. त. मनुष्य.—४ दे. कायावाचामनें.

॥ ४३५० ॥

पंढरीस जाऊं ह्मणती । यम थोर चिंता करि ती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ या रे नाचों ब्रह्मानंदें । विठ्ठलनामाचिया छंदें ॥ ध्रु ॥
धरिली पंढरीची वाट । पापें रिगालीं कपाट ॥ २ ॥
केलें भीमरेचें स्नान । यमपुरी पडिलें खान ॥ ३ ॥
दुरोनि देखिली पंढरी । पापें गेलीं दुरच्यादुरी ॥ ४ ॥
दुरोनि देखिलें राउळ । हरुषें नाचती गोपाळ ॥ ५ ॥
तुका ह्मणे नाहीं जाणें । अखंड पंढरिये राहाणें[1] ॥ ६ ॥

॥ ४३५१ ॥

पय दधि घृत आणि नवनीत । तैसें दृश्यजात एकपणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कनकाचे पाहीं अलंकार केले । कनकत्वा आले एकपणें[2] ॥ध्रु॥
मृत्तिकेचे घट जाले नानापरी । मृत्तिका अवधारीं एकपणें ॥ २ ॥
तुका ह्मणे एक एक ते अनेक । अनेकत्वीं एक एकपणा ॥ ३ ॥

॥ ४३५२ ॥

पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार जाला । विठोबा भेटला निराकार ॥१॥
॥ध्रु.॥ भांबगिरिपाठारीं वस्ति जाण केली । वृत्ति थिरावली परब्रह्मीं ॥ध्रु॥
निर्वाण जाणोनि आसन घातलें । ध्यान आरंभिलें देवाजीचें ॥ २ ॥
सर्प विंचू व्याघ्र आंगासी झोंबले । पीडूं जे लागले सकळिक ॥ ३ ॥
दीपकीं कर्पूर कैसा तो विराला । तैसा देह जाला तुका ह्मणे ॥ ४ ॥

---

१ दे. पंढरिराहणें.—२ त. एकपणे.

॥ ४३५३ ॥

अज्ञान हा देह स्वरूपीं मीनला । सर्व वोसांवला देहपात ॥ १ ॥
ज्ञानस्वरूपाची सांगड मिळाली । अंतरीं पाहिली ज्ञानज्योती ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्त स्वरूपीं राहिलें । देह विसावलें तुझ्या पायीं ॥ ३ ॥

॥ ४३५४ ॥

दामाजीपंताची रसद गुदरली । लज्जा सांभाळिली देवरायें ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ तयाचें चरित्र परिसा हो सादरें । करितों नमस्कार संतजना ॥ ध्रु॥
मंगळवेढा असे वस्ति कुटुंबेंसी । व्यापारी सर्वांसी मान्य सदा ॥ २ ॥
कर्म काय करी ठाणाचा हवाला । तों कांहीं पडला कठिण काळ ॥३॥
धान्याचीं भांडारें होतीं तीं फोडिलीं । पंढरी रक्षिली दुष्काळांत ॥ ४ ॥
दुबळीं[2] अनाथ तीं[3] हीं वांचविलीं । राष्ट्रांत ते जाली कीर्त्ति मोठी ॥ ५॥
मुजुम करीत होता कानडा ब्राह्मण । फिर्याद लिहून पाठविली ॥ ६ ॥
अविंदाचें राज्य बेदरीं असतां । कागद पाहतां तलब केली ॥ ७ ॥
दामाजीपंतासी धरोनि चालविलें । इकडे या विठ्ठलें माव केली ॥ ८ ॥
विकते धारणे सवाईचें मोल[4] । धान्याचें सकळ द्रव्य केलें ॥ ९ ॥
दामाजीपंताच्या नांवें अर्जदास्त । लिहून खलेती[5] मुद्रा केली ॥ १० ॥
विठो पाडेवार भक्तां साह्य जाला । बेदरासी गेला रायापासीं ॥ ११ ॥
जोहारें मायबाप पुसती कोठील । तंव तो ह्मणे स्थळ मंगळवेढें ॥ १२ ॥
दामाजीपंतांनीं रसद पाठविली । खलेती[6] ओतिली अर्जदास्त ॥ १३ ॥
देखोनियां राजा संतोष पावला । ह्मणे व्यर्थ त्याला तलब केली ॥१४॥

---

१ पं. वोसरला.—२ दे. दुवळें अनाथ तें हि वांचविलें ।.—३ त. ते.—४ त. मोलें.—५ त. खलीतीस.—६ त. खलीतीस.

काय तुझें नांव पुसती यंत्रधारी । तो ह्मणे बेगारी विठा कीं जी ॥१५॥
पावल्याचा जाब द्यावा मायबाप । करोनि घेतों माप ह्मणती ते ॥ १६ ॥
पावल्याचा जाब दिधला लिहून । तसरीफ देऊन पाठविला ॥ १७ ॥
छत्री घोडा शिबिका आभरणांसहित । दिला सर्वे दूत पाठवूनि ॥१८॥
वाटे चुकामुक जाली याची त्यांची । ते आले तैसे चि मंगळवेढा ॥१९॥
दामाजीपंतासी बेदरासी नेलें । राजा ह्मणे जालें कवतुक ॥ २० ॥
काल गेला विठा बेगारी देऊन । तसरीफ देऊन जाब दिला ॥ २१ ॥
काय तुमचें काज सांगा जी सत्वर । बोलाजी निर्धार वचनाचा ॥२२॥
कैंचा विठा कोण पाठविला कधीं । काढोनियां आधीं जाब दिला ॥२३॥
पहातां चि जाब त्हृदय फुटलें । नयन निडारले राजा देखे ॥ २४ ॥
सावळें सुकुमार रूप मनोहर । माथां तेणें भार वाहियेला ॥ २५ ॥
दामाजीपंतासी रायें सन्मानिलें । तो ह्मणे आपुलें कर्म नव्हे ॥ २६ ॥
आतां तुमची सेवा पुरे जी स्वामिया । शिणविलें सखया विठोबासी ॥२७॥
निरोप घेऊनि आला स्वस्थळासी । उदास सर्वांसीं होंता जाला ॥२८॥
दामाजीपंतांनीं सेविली पंढरी । ऐसा त्याचा हरि निकटवृत्ति ॥ २९ ॥
तुका ह्मणे विठो अनाथ कैवारी । नुपेक्षी हा हरि दासालागीं ॥ ३० ॥

॥ ४३५५ ॥

पहिली माझी ओवी ओवीन जगत्र । गाईन पवित्र पांडुरंग ॥ १ ॥
॥ध्रु.॥ दुसरी माझी ओवी दुजें नाहीं कोठें । जनीं वनीं भेटे पांडुरंग ॥ध्रु॥
तिसरी माझी ओवी तिळा नाहीं ठाव । अवघा चि देव जनीं वनीं ॥ २ ॥

---

१ दे. कां.—२ दे. बोला.—३ त. बोलावा'—४ त. बो—५ पं. 'वीरलें दळण० पांडुरंग ।' हें पुढील कडव्यांतलें 'तिसरी०' या कडव्यांत असून या कडव्यांतील 'तिळा नाहीं० जनींवनीं ।' हें पुढच्या कडव्यांत आहे.

चवथी माझी ओवी वैरिलें दळण । गाईन निधान पांडुरंग ॥ ३ ॥
पांचवी माझी ओवी माझिया माहेरा । गाईन निरंतरा पांडुरंगा ॥ ४ ॥
साहावी माझी ओवी साहा ही आटले । गुरुमूर्ति भेटले पांडुरंग ॥ ५ ॥
सातवी माझी ओवी आठवे वेळोवेळां । बैसलासे डोळां पांडुरंग ॥ ६ ॥
आठवी माझी ओवी आठावीस युगें । उभा चंद्रभागे पांडुरंग ॥ ७ ॥
नववी माझी ओवी सरलें दळण । चुकलें मरण संसारींचें ॥ ८ ॥
दाहावी माझी ओवी दाहा अवतारा । न यावें संसारा तुका ह्मणे ॥९॥

॥ ४३५६ ॥

धरोनियां फरश करी । भक्तजनांचीं विघ्नें वारी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ऐसा गजानन महाराजा । त्याचे चरणीं हालो लागो माझा ॥ध्रु॥
सेंदुर शमी बहुप्रिय ज्याला । तुरा दुर्वांचा शोभला ॥ २ ॥
उंदिर असे जयाचें वहन । माथां जडितमुगुट पूर्ण ॥ ३ ॥
नागयज्ञोपवीत रुळे । शुभ्र वस्त्र शोभित साजिरें ॥ ४ ॥
भावमोदक हराभरी । तुका भावें हे पूजा करी ॥ ५ ॥

॥ ४३५७ ॥

नाम आहे जयापाशीं । जेथें राहे तेथें चि काशी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ऐसा नामाचा महिमा । जाणे वाल्मीक शंकर उमा ॥ ध्रु ॥
नाम प्रह्लादबाळ । जाणे पापी आजामेळ ॥ २ ॥
नाम जाणे तो नारद । नामें ध्रुवा अक्षय पद ॥ ३ ॥
नाम गणिकेतें तारी । पशु गजेंद्र उद्धारी ॥ ४ ॥

---

१ दे. वोवी ते माझिया०.—२ पं. गायीं.—३ दे. सार्विअठेली. त. सावीआठेली.—४ दे. त. गुरुमूर्त्त.—५ दे. त. योगें.—६ त. दाही.—७ पं. "चि" नाहीं.—८ पं. त. उद्धरी.

नाम जाणे हणुमंत । जाणताति महासंत ॥ ५ ॥
नाम जाणे शुकमूर्ति । जाणे राजा परिक्षिती ॥ ६ ॥
नाम जाणे तुका । नाहीं संसाराचा धोका ॥ ७ ॥

॥ ४३५८ ॥

बहुतां जन्मां अंतीं जन्मलासी नरा । देव तूं सोइरा करीं आतां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ करीं आतां बापा स्वहिताचा स्वार्थ । अनर्थाचा अर्थ सांडीं आतां ॥ ध्रु ॥
सांडीं आतां कुडी कल्पनेची वाट । मार्ग आहे नीट पंढरीचा ॥ २ ॥
पंढरीस जावें सर्व सुख घ्यावें । रूप तें पाहावें विटेवरि ॥ ३ ॥
विटेवरि नीट आनंदाचा कंद । तुका नाचे छंद नामघोषें ॥ ४ ॥

॥ ४३५९ ॥

किती सांगों तरि नाइकाति बटकीचे । पुढें सिंदळीचे रडतील ॥ १ ॥
नका नका करूं रांडेची संगती । नेवोनी अधोगती घालिल यम ॥ २ ॥
तुका ह्मणे जरी देवीं नाहीं चाड । हाणोनि थोबाड फोडिलें यम ॥ ३ ॥

॥ ४३६० ॥

उधानु काटीवरि चोपडुची आस । नवरा राजस मिरवतसे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जिव्हाळ्याच्या काठी उबाळ्याच्या मोटा । नवरा चोहटा मिरवतसे ॥ ध्रु ॥
तुळसीची माळ नवरीचे कंठीं । नोवरा वैकुंठीं वाट पाहे ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसी नोवऱ्याची कथा । परमार्थ वृथा बुडविला ॥ ३ ॥

---

१ पं. नाम जाणे तुका वाणी । दिलें संसारला पाणी ॥ ६ ॥—२ त. आर्थ.—३ दे. सांडि.—४ पं. नेयील अधोगती घाली यम ।—५ दे. त. अधोपाती.—६ पं. फोडी काळ.—७ दे. जिव्हाळ्याचा.

॥ ४३६१ ॥

न कळे महिमा वेद मौनावले[1] । जेथें पांगुळले मनपवन ॥ १ ॥
॥ध्रु.॥ चंद्र सूर्य ज्याचें तेज वागविती । तेथें माझी मती कोणीकडे ॥ध्रु॥
काय म्यां वाणावें तुझ्या थोरपणा । सहस्रवदना वर्णवेना ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी बाळ तूं माउली । कृपेची साउली करीं देवा ॥ ३ ॥

॥ ४३६२ ॥

संतचरणरज लागतां सहज । वासनेचें बीज जळोन जाय ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मग रामनामीं उपजे आवडी । सुख घडोघडी वाढों लागे ॥ ध्रु ॥
कंठीं प्रेम दाटे नयनीं नीर लोटें । हृदयीं प्रगटे रामरूप ॥ २ ॥
तुका ह्मणे साधन सुलभ गोमटें । परि उपतिष्ठे पूर्वपुण्यें ॥ ३ ॥

॥ ४३६३ ॥

विधवेसि एक सुत । अहर्निशीं तेथें चित्त ॥ १ ॥
। ध्रु. ॥ तैसा तूं मज एकला । नको मोकलूं विठ्ठला ॥ ध्रु ॥
सुपुत्रालागीं बाप । अवघे तेथें चि संकल्प ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्तीं । पतिव्रते जैसा पति ॥ ३ ॥

॥ ४३६४ ॥

ह्मणे विठ्ठल पाषाण । त्याच्या तोंडावरि वाहाण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नको नको दर्शन त्याचें । गलितकुष्ट भरो वाचे[2] ॥ ध्रु ॥
शाळिग्रामासि ह्मणे धोंडा । किडे[3] पडोत त्याच्या तोंडा ॥ २ ॥
भावी सद्गुरु मनुष्य । त्याचें खंडो का आयुष्य[4] ॥ ३ ॥

---

१ दे. मोनावले.—२ त. वाचें.—३ दे. कोड पडो त्याच्या तोंडा. पं. कीडे पडो त्याच्या तोंडा.—४ दे. अयुष्य.

हरिभक्ताच्या करी चेष्टा । त्याचे तोंडीं पडो विष्ठा[1] ॥ ४ ॥
तुका ह्मणे किती ऐकों । कोंठवरी मर्यादा राखों ॥ ५ ॥

॥ ४३६५ ॥

स्वर्गींचे अमर इच्छितासि देवा । मृत्युलोकीं व्हावा जन्म आह्मां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नारायणनामें होऊं जीवन्मुक्त[2] । कीर्त्तनीं अनंत गाऊं गीती ॥ ध्रु ॥
वैकुंठींचे जन सदा चिंतिताति । कइं येथें येती हरिचे दास ॥ २ ॥
यमधर्म वाट पाहे निरंतर । जोडोनियां कर तिष्ठतसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे पावावया पैल पार । नाममंत्र सार भाविकासि ॥ ४ ॥

॥ ४३६६ ॥

व्यापक हा विश्वंभर । चराचर याचेनी[3] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पंढरिराव विटेवरि । त्याचीं[4] धरीं पाउलें ॥ ध्रु ॥
अवघियांचा हा चि ठाव । देवोदेवीं[5] सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे न करीं सोस । भेदें दोष उफराटे ॥ ३ ॥

॥ ४३६७ ॥

पसरोनि मुखें । कैसे धालों बा हारिखें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ब्रह्मादिका दुर्लभ वांटा । आह्मां फावला राणटां ॥ ध्रु ॥
गोड लागे काय तरि । कृपावंत जाला हरि ॥ २ ॥
उडती थेंबुटें । अमृताहुनि गोमटें ॥ ३ ॥
गोडाहुनि गोड । जिव्हा नाचे वाटे कोड ॥ ४ ॥
खुणावुनि तुका । दावी वर्म बोलों नका ॥ ५ ॥

---

१ त. वीष्टा. पं. ईष्ठा.—२ दे. जिवनमुक्त —३ त. याचेनि. पं. ज्याचेनि.—४ दे. त. त्याचीं-च धरीं.०—५ त. देवोदेवी.

॥ ४३६८ ॥

आमुची मिरास पंढरी । आमुचें घर भीमातिरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांडुरंग आमुचा पिता । रुकुमाबाई[1] आमुची माता ॥ ध्रु ॥
भाऊ[2] पुंडलीक मुनि । चंद्रभागा आमुची बहिणी ॥ २ ॥
तुका जुन्हाट मिराशी । ठाव दिला पायांपाशीं ॥ ३ ॥

॥ ४३६९ ॥

गंगा गेली सिंधुपाशीं । जरी तो ठाव नेदी तिशी ॥१ ॥
॥ ध्रु. ॥ तिणें[3] जावें कवण्या ठाया । पज सांगा पंढरिराया ॥ ध्रु ॥
जळ क्षोभलें जलचरां । माता[4] बाळा नेदी थारा ॥ २ ॥
तुका ह्मणे आलों शरण । देवा[5] त्वां कां धरिलें मौन्य ॥ ३ ॥

॥ ४३७० ॥

बैसो आता मनीं । आलें[6] तैसें चि वदनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग अवघें चि गोड । पुरे सकळ हि कोड ॥ ध्रु ॥
बाहेरील भाव । तैसा अंतरीं हि वाव ॥ २ ॥
तुका ह्मणे मणि । शोभा दाखवी कोंदणीं ॥ ३ ॥

॥ ४३७१ ॥

वेठी ऐसा भाव । न करी अहाच उपाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रूप डसवी न जिवा । अवघा ये च ठायीं हेवा ॥ ध्रु ॥
कृपणाचेपरि । लेखा पळनिमिषेवरि[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे असा[8] । संनिध चि जगदीशा ॥ ३ ॥

---

१ पं. "रकुमाबाई" याबद्दल "रखुमाई."—२ दे. त. भाव.—३ पं. "तिणें जावें०" या कडव्याबद्दल "तारें म्यां जावें कवण्या ठायां । सांगा वेगीं पंढरीराया ॥" असें आहे.—४ पं. माय.—५ पं. "देवा त्वां कां" याच्याबद्दल "कां गा विठो."—६ दे. आले.—७ त. पळनिमिष्येवरी.—८ दे. आस.

॥ ४३७२ ॥

सर्वसुखा अधिकारी । मुखें उच्चारी हरिनाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्वांगें तो सर्वोत्तम । मुखीं नाम हरीचें ॥ ध्रु ॥
ऐशी उभारिली बाहे । वेदीं पाहें पुराणीं ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें कांहीं । संदेह नाहीं भरवसा ॥ ३ ॥

॥ ४३७३ ॥

जो का निर्गुण निराकार । तेणें[1] धरियेले अवतार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निर्गुण होता तो सगुणासि आला । भक्तीसाटीं प्रगटला ॥ ध्रु ॥
जो का त्रिभुवनचाळक । तो हा नंदाचा[2] बाळक ॥ २ ॥
सोडविलें वसुदेवदेवकीसि । अवतार धरिला तिचे कुशी ॥ ३ ॥
मारियेला कंसराणा । राज्यीं स्थापिलें उग्रसेना ॥ ४ ॥
तुका ह्मणे देवादिदेव । तो हा उभा पंढरिराव ॥ ५ ॥

॥ ४३७४ ॥

जुनाट हें धन अंत नाहीं पार । खात आले फार सरलें नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नारद हा मुनि शुक सनकादिक । उरलें आमुप तुह्मां आह्मां ॥ ध्रु ॥
येथूनियां धना खाती बहुत[2] जन । वाल गुंज उणें जालें नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे धना नाहीं[3] अंतपार । कुंटित हे[4] चार वाचा तेथें[5] ॥ ३ ॥

॥ ४३७५ ॥

कोडियाचें गोरेपण । तैसें अहंकारीज्ञान[6] ॥ १ ॥

---

१ दे. तेथें.—२ दे. बहु जतन.—३ दे. त. "नाहीं अंत पार" याबद्दल "अंत नाहीं पार".—४ दे. "हें" नाहीं.—५ पं. जेथें.—६ दे. आहे करी ज्ञान. त. आहंकारी ज्ञान.

॥ ४३७६ ॥

॥ ध्रु. ॥ त्यासि अंतरीं रिझे कोण । जवळी जातां चिळसवाण ॥ ध्रु ॥
प्रेतदेह[2] गौरविलें । तैसें विटंबवाणें जालें ॥ २ ॥
तुका ह्मणे खाणें विष्ठा । तैशा देहबुद्धिचेष्टा ॥ ३ ॥

॥ ४३७७ ॥

पाया जाला नारू । तेथें बांधला कापूरु ।
तेथें बिबव्याचें काम । अधमासि तों अधम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रुसला गुलाम । धणी करीतो[3] सलाम ।
तेथें चाकराचें काम । अधमासि तों अधम ॥ ध्रु ॥
रुसली घरची दासी । धणी समजावी तियेसि ।
तेथें बटकीचें काम । अधमासि तों अधम ॥ २ ॥
देव्हाऱ्यावरि विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।
तेथें पैजारिचें काम । अधमासि तों अधम ॥ ३ ॥
तुका ह्मणे जाती । जातीसाटीं खाती माती ॥ ४ ॥

॥ ४३७८ ॥

ब्राह्मणा न कळे आपुलें तें वर्म । गंवसे परब्रह्म नामें एका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लहानथोरासि करितों प्रार्थना । दृढ नारायणा मनीं धरा ॥ ध्रु ॥
सर्वांप्रति माझी हे चि असे विनंती । आठवा श्रीपती मनामाजी ॥ २ ॥
केशव नारायण करितां आचमन । ते चि संध्या स्नान कर्म क्रिया ॥ ३ ॥
नामें करा नित्य भजन भोजन । ब्रह्मकर्म ध्यान याचे पायीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे हें चि निर्वाणींचें शास्त्र । ह्मणोनि सर्वत्र स्मरा वेगीं ॥ ५ ॥

---

१ पं. आता.—२ पं. प्रेतदेहा.—३ त. करीते.

॥ ४३७९ ॥

नरदेह वांयां जाय । सेवीं सद्गुरूचे पाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांडोनियां अहंभाव । धरीं भक्ती पूजीं देव ॥ ध्रु. ॥
थोराचिये वाटे । जातां भवशोक आटे ॥ २ ॥
प्रल्हादातें तारीं । तुका ह्मणे तो कंठीं धरीं ॥ ३ ॥

॥ ४३८० ॥

संचित तैशी बुद्धि उपजे मनामधीं । सांगितलें सिद्धि नव जाय ॥ १ ॥
ज्याचा जैसा ठेवा तो त्यापाशीं धांवे । न लगती करावे उपदेश ॥ २ ॥
घेऊन उठती आपुलाले गुण । भविष्याप्रमाणें तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ४३८१ ॥

कुरंगीपाडस चुकलेंसे वनीं । फुटे दुःखेंकरोनि त्हृदय त्याचें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तैसा परदेशी जालों तुजविण । नको हो निर्वाण पाहूं माझें ॥ ध्रु. ॥
अपराधाच्या कोटि घालीं सर्व पोटीं । नको या शेवटीं उपेक्षूं गा ॥ २ ॥
तुका ह्मणे असों द्यावी माझी चिंता । कृपाळु अनंता पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ४३८२ ॥

धन्य जालों हो संसारीं । आह्मी देखिली पंढरी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ चंद्रभागे करूं स्नान । पुंडलीकाचें दर्शन ॥ ध्रु. ॥
करूं क्षेत्रप्रदक्षिणा । भेटूं संत या सज्जनां ॥ २ ॥
उभे राहूं गरुडपारीं । डोळेंभरुनी पाहों हरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे वाळवंटीं । महालाभ फुकासाटीं ॥ ४ ॥

॥ ४३८३ ॥

पंढरीचा वारकरी । खेपा वैकुंठबंदरीं ॥ १ ॥

---

१ त. धरी.

॥ध्रु.॥ तया नाहीं आणखी पेणें । सदा वैकुंठीं राहाणें ॥ ध्रु ॥
आला गेला केल्या यात्रा । उद्धरिलें कुळा सर्वत्रा ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं । यासि संदेह कल्पांतीं ही ॥ ३ ॥

॥ ४३८४ ॥

सोडियेल्या गाई नवलक्ष गोपाळीं । सवें वनमाळी चालियेला ॥ १ ॥
॥ध्रु.॥ सुदीनसुवेळीं[1] भाग्याच्या उदयीं । चारावया गाई वनामाजी ॥ध्रु॥
गाईगोपाळांच्या संगें चाले[2] हरि । क्रीडा नानापरि खेळताति ॥ २ ॥
काठी कांबळीया मोहरीया पोंवा । सिदोरी गांजिवा खांद्यावरि ॥ ३ ॥
गोधनें संवगडे खेळे नानापरी । आले भीमातीरीं वेणुनादा ॥ ४ ॥
तेथें उभा ठेला गोपाळांसहित । सिदोरिया सोडीत बैसे तेथें ॥ ५ ॥
तुका ह्मणे ज्यांनीं आणिल्या भाकरी । नेऊनियां हरीपुढें देती ॥ ६ ॥

॥ ४३८५ ॥

ज्यां जैसी आवडी त्यां तैसा विभाग । देत पांडुरंग तृप्ति जाली ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मुखींचें उच्छिष्ट हिरोनियां खातां[3] । विस्मित विधाता देखोनियां ॥ध्रु॥
दिलें जें गोपाळां तें नाहीं कोणासि । विस्मित मानसीं सुरवर ॥ २ ॥
देव ऋषि मुनि सिद्ध हे चारण । शिव मरुद्गण चंद्र सूर्य ॥ ३ ॥
तुका ह्मणे आले सकळ हि सुरवर । आनंदें निर्भर पाहावया ॥ ४ ॥

॥ ४३८६ ॥

आले सुरवर नानापक्षी जाले । सकळ अवतरले श्वापदवेषें[4] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ श्वानखररूपी होऊनियां आले । उच्छिष्ट कवळ वेचिताति ॥ध्रु॥

---

१ दे. सुदीन समय भाग्याचा उदय ।—२ दे. चाली.—३ दे. खात.—४ त. श्वापदवेसें.

होऊनियां दीन हात पसरिती । मागोनियां घेती उष्टावळी ॥ २ ॥
अभिमान आड घालोनि बाहेरि । तयां ह्मणे हरि घ्या रे धणी ॥ ३ ॥
तुका ह्मणे धणी लाधली अपार । तया सुखा पार काय सांगों ॥ ४ ॥

॥ ४३८७ ॥

एकमेकीं घेती थडका । पाडी धडक्या[1] देऊनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एकमेका पाठीवरि । बैसोनि करिती ढवाळी ॥ ध्रु ॥
हाता हात हाणे लाही । पळतां घाई चुकविती ॥ २ ॥
तुका ह्मणे लपणी चपणी । एका हाणी पाठीवरी ॥ ३ ॥

॥ ४३८८ ॥

चला वळूं गाई । दूर अंतरल्या भाई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खेळ खेळतां जाला शीण । कोण करी वणवण ॥ ध्रु ॥
गाई हकारी कान्हया । ह्मणोनि लागती ते पायां ॥ २ ॥
तुका ह्मणे द्यावें । नाम संकीर्तन बरवें ॥ ३ ॥

॥ ४३८९ ॥

नाहीं संसाराची चाड । गाऊं हरिचें नाम गोड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हो का प्राणाचा ही घात । परि हा न सोडीं[2] अनंत ॥ ध्रु ॥
जन्मोजन्मीं हा चि धंदा । संतसंग राहो सदा ॥ २ ॥
तुका ह्मणे भाव । तो हा जाणा पंढरिराव ॥ ३ ॥

॥ ४३९० ॥

हरीविण जिणें व्यर्थ चि संसारीं । प्रेत अळंकारीं मिरवत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवाविण शब्द व्यर्थ चि कारणें । भांड रंजवण सभेसिं गा ॥ ध्रु ॥

---

१. त. धक्का.—२ त. सोडी.

आचार करणें देवाविण जो गा । सर्पाचिया अंगा मृदुपण ॥ २ ॥
तुका ह्मणे काय बहु बोलों फार । भक्तीविण नर अभाग्य कीं ॥ ३ ॥

॥ ४३९१ ॥

जालासि पंडित पुराण सांगसी । परि तूं नेणसी मी हें कोण ॥ १ ॥
गाढवभरी पोथ्या उलथिशी पानें। परि गुरुगम्यखुणे नेणशी बापा ॥ २ ॥
तुका कुणबियाचा नेणे शास्त्रमत । एक पंढरिनाथ विसंबेना ॥ ३ ॥

॥ ४३९२ ॥

स्वप्नींच्या व्यवहारा काळांतर लेखा । जागृतीसि रुका गांठी नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेवीं शब्दज्ञानें करिती चावटी । ज्ञान पोटासाटीं विकों नये ॥ध्रु॥
बोलाची च कढी बोलाचा ची भात । जेवूनियां तृप्त कोण जाला ॥२॥
कागदीं लिहिली नांवाची साकर । चाटितां मधुर केवीं लागे ॥ ३ ॥
तुका ह्मणे जळो जळो त्याचें ज्ञान । यमपुरी कोण दंड साहे ॥ ४ ॥

॥ ४३९३ ॥

भूत नावरे कोणासी । पुंडलीकें खिळिलें त्यासि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ समचरण असे विटे । कटिकर उभें नीट ॥ ध्रु ॥
वाळुवंटीं नाचती संत । प्रेमामृतें डुल्लत ॥ २ ॥
तुका ह्मणे पुंडलीका । भक्तिबळें[2] तूं चि निका ॥ ३ ॥

॥ ४३९४ ॥

आपुले वरदळ नेदा । एवढी गोविंदा कृपणता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ याबद्दल बा तुमचा मोळा । हा गोपाळा कळेना ॥ ध्रु ॥

---

१ दे. गांठ.—२ दे. भक्तावळें.

सेवा तरी घेतां सांग । चोरिलें अंग सहावेना ॥ २ ॥
तुका जरी क्रियानष्ट । तरि कां कष्ट घेतसां ॥ ३ ॥

॥ ४३९५ ॥

भीमातिरींचा नाटक । यानें लावियेलें चेटक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मन बुद्धि जाली ठक । नेणे संसाराची टुक ॥ ध्रु ॥
कैशी प्रसंगीक वाणी । प्रत्यादर कडसणी ॥ २ ॥
तुका ह्मणे मोठा ठक । जेथें तेथें उभा ठाके ॥ ३ ॥

॥ ४३९६ ॥

कां रे दाटोन होतां[1] वेडे । देव आहे तुह्मांपुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्यासि पाठ नाहीं पोंट । करी त्रैलोक्याचा घोंट ॥ ध्रु ॥
तुमची तुह्मां नाहीं सोय । कोणाचें बा[2] काय जाय ॥ २ ॥
तुका गातो नामीं । तेथें नाहीं आह्मी तुह्मी ॥ ३ ॥

॥ ४३९७ ॥

नव्हे हें कवित्व टांकसाळी नाणें । घेती भले जन भले लोक ॥ १ ॥
लागलासे झरा पूर्ण नवनीतें । सेविलियां हित फार होय ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा केला बलात्कार । अंगा आलें फार महंतपण ॥ ३ ॥

॥ ४३९८ ॥

सांवळें सुंदर पाहे दृष्टीभरि । ऐसें कांहीं करीं मन माझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मना तुज ठाव दिला त्याचे पायीं । राहें विठाबाईसवें सदा ॥ ध्रु ॥
मना नको धरूं आणिकांचा संग । नाहीं पांडुरंग जयां मनीं ॥ २ ॥
वरपंग भाव नको ह्मणे तुका । करीं प्रागसखा नारायण ॥ ३ ॥

---

१ दे. होतों.—२ दे. "बा" नाहीं.

॥ ४३९९ ॥

एकली वना चालली राना । चोहनि जना घराचारी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कोणी नाहीं संगीसवें । देहभावें उदास ॥ ध्रु ॥
जाउनि पडे दुर्घटवनीं । श्वापदांनीं वेढिली ॥ २ ॥
मार्ग न चले जातां पुढें । भय गाढें उदेलें ॥ ३ ॥
मागील मागें अंतरलीं । पुढील चाली खोळंबा ॥ ४ ॥
तुका ह्मणे चिंतीं यासि । ह्रदयस्थासी आपुल्या ॥ ५ ॥

॥ ४४०० ॥

पडली घोर रजनी । संगी कोणी नसे चि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ पहा हो कैसें चालविलें । पिसें गोवलें लावूनि ॥ ध्रु ॥
कोठें लपविलें तें अंग । होता संग दिला तो ॥ २ ॥
मज कधीं नव्हतें ठावें । दोही भावें वाटोळें ॥ ३ ॥
तुका ह्मणे कैंची उरी । दोहीपरि नाडिलें ॥ ४ ॥

॥ ४४०१ ॥

उदार कृपाळ पतितपावना । ब्रिदें नारायणा जाती वांयां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ वर्णिलासि श्रुति नेणे तुझा पार । राहे मौनाकार नेति ऐसें ॥ध्रु॥
तथें माझा धांवा पावे कोणीकडे । अदृष्ट हें पुढें वोडवलें ॥ २ ॥
कोण ऐसा भक्त लाधला भाग्यासी । आठवण ऐसी द्यावी तुज ॥ ३ ॥
तुका ह्मणे नको पाहों माझा अंत । जाणोनि हे मात उडी घालीं ॥ ४ ॥

---

१ दे. चित्तीं.—२ दे. पतितपावन.

॥ ४४०२ ॥

ज्याचें जैसें भावी मन । त्यासि देणें दरुषण ॥ १ ॥

॥ध्रु.॥ पुरवूं जाणे मनींचि खूण । समाधान करोनि ॥ ध्रु ॥

आपणियातें प्रगट करी । छाया धरी कृपेची ॥ २ ॥

तुका ह्मणे केलें[1] दान । मन उन्मन हरिनामीं ॥ ३ ॥

॥ ४४०३ ॥

कां रे पुंडया मातलासी । उभें केलें विठ्ठलासि ॥ १ ॥

॥ध्रु.॥ वस्ति क्षीरसागरवासीं । आला उभा पंढरीसि ॥ ध्रु ॥

भक्ती देखोनि निकट । देवें सोडिलें वैकुंठ ॥ २ ॥

तुका ह्मणे बळी । तूं चि एक भूमंडळीं ॥ ३ ॥

॥ ४४०४ ॥

शेवटींची विनंती । ऐका ऐका कमळाती ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ काया वाचा मन । चरणीं असे समर्पण ॥ ध्रु ॥

जीवपरमात्मा ऐक्यासि । सदा वसो ह्रदयेंसी ॥ २ ॥

तुका ह्मणे देवा । कंठीं वसावें केशवा ॥ ३ ॥

॥ ४४०५ ॥

माझें परिसावें गाऱ्हाणें । चित्त द्यावें नारायणें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझे ह्रदयींचें वर्म । देवा जाणशी तूं कर्म ॥ ध्रु ॥

सबाह्यअंतरसाक्ष । ऐसा वेदीं केला पक्ष ॥ २ ॥

तुका ह्मणे नेणां । काय सांगों नारायणा ॥ ३ ॥

॥ ४४०६ ॥

गुरुचिया मुखें होइल ब्रह्मज्ञान । न कळे प्रेमखुण विठोबाची ॥ १ ॥

---

१. त. दे. केले.

वेदातें विचारा पुराणातें पुसा । विठोबाचा कैसा प्रेमभाव ॥ २ ॥
तुका ह्मणे सांडा जाणिवेचा शीण । विठोबाची खूण जाणती संत ॥ ३ ॥

॥ ४४०७ ॥

देव आतां आह्मीं केला असे ऋणी । आणिका वांचूनि काय गुंता ॥१॥
॥ध्रु.॥एकाचें आर्जव करूं एकनिष्ठ । आणिकांचा बोभाट कामा नये॥ध्रु॥
बहुतांचें आर्जव केलिया खटपट । नाहीं हा शेवट शुद्ध होत ॥ २ ॥
पुरता विचार आणोनी मानसीं । अंतरलों सर्वांसि पाईं देखा ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा चरणीं असो भाव । तेणें माझा जीव संतोष[1] हा ॥ ४ ॥

॥ ४४०८ ॥

पापाची वासना नको दावूं डोळां । त्याहुनि अंधळा बराच मी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनि ठेवीं देवा ॥ ध्रु ॥
अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहुनि मुका बराच मी ॥ २ ॥
नको मज कधीं परस्त्रीसंगति । जनांतुन माती उठतां भली ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज अवघ्याचा कांटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ॥ ४ ॥

॥ ४४०९ ॥

कीर्त्तनाचा विकरा मातेचें गमन । भाड खाई धन विटाळ तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हरिभक्ताची माता हे हरिगुणकीर्त्ति । इजवर पोट भरिती चांडाळ ते
॥ ध्रु ॥
अंत्यज हा ऐसें कल्पांतीं करीना । भाड हे खाईना जननीची ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याचें दर्शन ही खोटें । पूर्वजासि नेटें नरका धाडी ॥ ३ ॥

॥ ४४१० ॥

पंढरी पावन जालें माझें मन । आतां करूं ध्यान विठोबाचें[2] ॥ १ ॥

---

१. त. संतोश.—२ त. विठ्ठलाचें.

॥ ध्रु. ॥ आतां ऐसें करूं नाम गाऊं गीतीं । सुखाचा सांगाती विठो करूं ॥ ध्रु ॥
संग करूं त्याचा तो सखा आमचा । अनंतां जन्मांचा मायबाप ॥ २ ॥
परतोनि सोई धरीं कां रे मना । विठ्ठलचरणा घालीं मिठी ॥ ३ ॥
घातलीसे मिठी नाहीं भक्तिभाव । उदार पंढरिराव तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ४४११ ॥

येई गे विठ्ठले विश्वजीवनकले । सुंदर घननीळे पांडुरंगे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येई गे विठ्ठले करुणाकल्लोळे । जीव कळवळे[1] भेटावया ॥ ध्रु ॥
न लगती गोड आणीक उत्तरें । तुझें प्रेम झुरे भेटावया ॥ २ ॥
तुका ह्मणे धांव घालीं कृष्णाबाई । क्षेम चहूंबाहीं देई मज ॥ ३ ॥

॥ ४४१२ ॥

कटावरि कर कासया ठेविले । जननी विठ्ठले[2] जीवलगे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ शंखचक्रगदाकमळमंडित । आयुधें मंडित कृष्णाबाई ॥ ध्रु ॥
क्षण एक धीर होत नाहीं चित्ता । केव्हां पंढरिनाथा भेटशील ॥ २ ॥
तुका ह्मणे हें चि करीं देई क्षेमा[3] । तेंचि विश्रामा पावईन ॥ ३ ॥

॥ ४४१३ ॥

आतां मोकलावें नव्हे हें उचित । तरी कृपावंत ह्मणवावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पूर्वीं भक्त जाले सर्व आवंगिले । नाहीं उपेक्षिले तुह्मीं कोणी ॥ ध्रु ॥
माझिया वेळेसि कां गा लपालासि । विश्व पोसितोसि लपोनियां ॥ २ ॥
करावी ह्मणावी सर्वां भूतीं दया । तरी भेटावया येईन मी ॥ ३ ॥
तरी माझे हातीं देई मनबुद्धि । जरि दयानिधि येशिल तूं ॥ ४ ॥
तुका ह्मणे तूं चि अवघा सूत्रधारी । माझी सत्ता हरी काय आहे ॥ ५ ॥

---

१ त. कळवळें.—२ त. विठ्ठलें जीवलगें.—३ दे. 'क्षेमा' नाहीं.

॥ ४४१४ ॥

माझें कोण आहे तुजविण देवा । मुकुंदा केशवा नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाट पाहतसें कृपेच्या सागरा । गोविंदमनोहरा पांडुरंगा ॥ ध्रु ॥
साच करीं हरी आपुली ब्रिदावळी । कृपेनें सांभाळीं महाराजा ॥ २ ॥
क्षमा करीं सर्व अपराध माझा । लडिवाळ मी तुझा पांडुरंगा ॥ ३ ॥
साह्य होसी तरी जाती साही वैरी । मग सुखें अंतरीं ध्यान तुझें ॥ ४ ॥
कृपा करोनि देई दया क्षमा शांती । तेणें तुझी भक्ति लाभईल ॥ ५ ॥
माझें हें सामर्थ्य नव्हे नारायणा । जरी कांहीं करुणा येइल तुज ॥ ६ ॥
तुका ह्मणे मज कैसें आवंगा जी । आपुलेंसें करा जी पांडुरंगा ॥ ७ ॥

॥ ४४१५ ॥

अपराध जाले जरी असंख्यात । तरी कृपावंत नाम तुझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझें लडिवाळ तुज कृपा यावी । म्यां वाट पाहावी कवणाची ॥ ध्रु ॥
मायबाप माझा रुक्मादेवीवर । हा दृढ निर्धार अंतरींचा ॥ २ ॥
तुका ह्मणे कोणे गोष्टीचें संकष्ट । न घालीं मज भेट नारायणा ॥ ३ ॥

॥ ४४१६ ॥

आधीं कां मज लावियेली सवे । आतां न राहावे तुजविण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पहिलें चि तोंडक कां गा नाहीं केलें । आतां उपेक्षिलें न सोडीं मी ॥ ध्रु ॥
कृपेच्या सागरा न पाहें निर्वाण । जालों तुजवीण कासावीस ॥ २ ॥
तुका ह्मणे कोठें गुंतलेति हरी । येई झडकरी पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ४४१७ ॥

बा रे पांडुरंगा केव्हां येशी भेटी । जाहालों हिंपुटी तुजवीण ॥ १ ॥

---

१ त. मायबापा माझ्या.

॥ध्रु.॥ तुजवीण सखें न वटे मज कोणी। वाटतें चरणीं घालूं मिठी ॥ध्रु॥
ओवाळावी काया चरणांवरोनि । केव्हां चक्रपाणी भेटशील ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी पुरवीं आवडी । वेगीं घालीं उडी नारायणा ॥ ३ ॥

॥ ४४१८ ॥

पंचाग्निसाधन करूं धूम्रपान । काय तीर्थाटण करूं सांग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांग कोणे देशीं आहे तुझें गांव । घेऊनियां धांव येऊं तेथें ॥ध्रु॥
सांग कांहीं वृत्त कोण करूं व्रत । जेणें कृपावंत होशिल तूं ॥ २ ॥
वाटतें सेवटीं जालासि निष्ठुर । न देसी उत्तर तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ४४१९ ॥

तुजवीण तीळभरी रिता ठाव । नाहीं ऐसें विश्व बोलतसे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ बोलियेले योगी मुनी साधु संत। आहेसि या आंत सर्वांठायीं ॥ध्रु॥
मी तया विश्वासें आलों शरणागत । पूर्वीचें अपत्य आहें तुझें ॥ २ ॥
अनंत ब्रह्मांडें भरोनि उरलासि । मजला जालासि कोठें नाहीं ॥ ३ ॥
अंतपार नाहीं माझिया रूपासि । काय सेवकासि भेट देऊं ॥ ४ ॥
ऐसें विचारिलें ह्मणोनि न येशी । सांग ह्रृषीकेशी मायबापा ॥ ५ ॥
तुका ह्मणे काय करावा उपाय । जेणें तुझे पाय आतुडति ॥ ६ ॥

॥ ४४२० ॥

काम क्रोध आड पडले पर्वत । राहिला अनंत पलीकडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नुलंघवे मज न सांपडे वाट । दुस्तर हा घाट वैरियांचा ॥ ध्रु ॥
आतां कैंचा मज सखा नारायण । गेला अंतरोन पांडुरंग ॥ २ ॥
तुका ह्मणे व्यर्थ मोलाचें शरीर । गेलें हा विचार कळों आला ॥ ३ ॥

---

१ त. कोण करूं वृती सांग कांहीं वृत.—२ त. बोलतसें.

॥ ४४२१ ॥

नव्हे निष्ठावंत तुज काय बोल । सेवेविण मोल मागतसें ॥ १ ॥
न घडे भजन शुद्ध भावनिष्ठा । आपुल्या अदृष्टावरी बोल ॥ ध्रु ॥
पूर्वीं जाले भक्त असंख्य विरक्त । काम क्रोध अहंते निर्दाळिलें ॥ २ ॥
ऐसी अंगवण नाहीं मज देवा । करितसें हेवा भेटावयाचा ॥ ३ ॥
कृपा करोनियां पुरवीं असोसी । आपुल्या ब्रिदासी राखावया ॥ ४ ॥
तुका ह्मणे एक बाळक अज्ञातें । त्यासि हे पोसित मायबापें ॥ ५ ॥

नाटाचे अभंग २.

॥ ४४२२ ॥

अगा ये मधुसूदना माधवा । अगा ये कमळापती यादवा ।
अगा श्रीधरा केशवा । अगा बांधवा द्रौपदीच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अगा विश्वव्यापका जनार्दना । गोकुळवासी गोपिकारमणा ।
अगा गुणनिधि गुणनिधाना । अगा मर्दना कंसाचिया ॥ ध्रु ॥
अगा सर्वोत्तमा सर्वेश्वरा । गुणातीता विश्वंभरा ।
अगा निर्गुणा निराकारा । अगा आधारा दीनाचिया ॥ २ ॥
अगा उपमन्यसहाकारा । अगा शयना फणिवरा ।
अगा काळकृतांत असुरा । अगा अपारा अलक्षा ॥ ३ ॥
अगा वैकुंठनिवासा । अगा अयोध्यापति राजहंसा ।
अगा ये पंढरिनिवासा । अगा सर्वेशा सहजरूपा ॥ ४ ॥
अगा परमात्मा परमपुरुषा । अगा अव्यया जगदीशा ।
अगा कृपाळुवा आपुल्या दासा । तोडीं भवपाशा तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ४४२३ ॥

कैसी करूं तुझी सेवा । ऐसें सांगावें जी देवा ।
कैसा आणूं अनुभवा । होशि ठावा कैशापरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कर्मभ्रष्ट माझें मन । नेणें जप तप अनुष्ठान ।
नाहीं इंद्रियांसि दमन । नव्हे मन एकविध ॥ ध्रु ॥
नेणें यातीचा आचार । नेणें भक्तीचा विचार ।
मज नाहीं संतांचा आधार । नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥ २ ॥
न सुटे मायाजाळ । नाहीं वैराग्याचें बळ ।
न जिंकवती सबळ । काम क्रोध शरीरीं ॥ ३ ॥
आतां राख कैसें तरि । मज नुपेक्षावें हरी ।
तुझीं ब्रिदें चराचरीं । तैसीं साच करीं तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ४४२४ ॥

भीमातीरवासी । तेथें निश्चयेंसी काशी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मुख्यमुक्तीचें माहेर । ऐसें जाणा पंढरपुर ॥ ध्रु ॥
घडे भींवरेशीं स्नान । त्यासि पुन्हा नाहीं जन्म ॥ २ ॥
भाव धरोनि नेटका । मोक्ष जवळी ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ ४४२५ ॥

जाली गाढवी दुधाळ । महिमा गाईची पावेल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ श्वान जालेंसे चांगलें । तरी कां सांगातें जेवील ॥ ध्रु ॥
जाली सिंदळा चांगली । तरि कां पतिव्रता जाली ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐशा जाति । काय उंचपण पावती ॥ ३ ॥

॥ ४४२६ ॥

काशीयात्रा पांच द्वारकेच्या तीन । पंढरीची जाण एक यात्रा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काशी देह विटंबणें द्वारके जाळणें । पंढरीशी होणें ब्रह्मरूप ॥ ध्रु ॥
अठरापगडयाती सकळ हि वैष्णव । दुजा नाहीं भाव पंढरीसि ॥ २ ॥
तुका ह्मणे असो अथवा नसो भाव । दर्शनें पंढरिराव मोक्ष देतो ॥ ३ ॥

॥ ४४२७ ॥

हें चि मागणें विठाबाई । पायीं ठेवूनियां डोई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शांति दया अंतःकरणीं । रंगो रामनामीं वाणी ॥ ध्रु ॥
मूळ द्वंद्वाचें विघडो । निजानंदीं वृत्ति जडो ॥ २ ॥
तुका ह्मणे हरी । आतां आपुलेंसें करीं ॥ ३ ॥

॥ ४४२८ ॥

करोनि स्नानविधि आणि देवधर्म । क्रिया नित्यनेम तुजसाटीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तुजलागीं दानें तुजलागीं तीर्थें । सकळ हीं व्रतें तुजलागीं ॥ ध्रु ॥
सकळ चित्तवृत्ति दिवस आणि राती । आवडशी प्रीती नारायणा ॥२॥
तुका ह्मणे याहो पवित्राच्या राया । प्राणविसावया पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ४४२९ ॥

पहावा नयनीं विठ्ठल चि एक । कांहीं तरी सार्थक संसाराचें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कोठें पाहों तुज कां गा लपालासि । कांहीं बोल मशीं नारायणा ॥ ध्रु ॥
वाटतें उदास मज दाही दिशा । तुजविण त्वृषीकेशा वांचोनियां ॥ २ ॥
नको ठेवूं मज आपणा वेगळें । बहुत कळवळें तुजलागीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे भेटी देईं नारायणा । घडी कंठवेना तुजविण ॥ ४ ॥

॥ ४४३० ॥

पूर्वीं बहुतांचे केले प्रतिपाळ । तें मज सकळ श्रुत आहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अज अविनाश निर्गुण निरामय । विचारिलें कार्य त्यांचे वेळे ॥ ध्रु ॥
तयांचिये वेळें होशी कृपावंत । माझा चि कां अंत पहातोसि ॥ २ ॥
नारद प्रल्हाद उपमन्यु धुरू । त्यांचा अंगीकारु कैसा केला ॥ ३ ॥
अंबऋषीसाटीं गर्भवास जाले । कां गा मोकलिलें कृपासिंधु ॥ ४ ॥
धर्माचें उच्छिष्ट अर्जुनाचीं घोडीं । आणीक सांकडीं कितीएक ॥ ५ ॥
जालासि लुगडीं तया द्रौपदीचीं । न ये कां आमुची कृपा कांहीं ॥ ६ ॥
तुका ह्मणे कां गा जालासि कठीण । माझा भाग सीण कोण जाणे ॥ ७ ॥

॥ ४४३१ ॥

कासयासि व्यर्थ घातलें संसारीं । होतें तैसें जरी तुझे चित्तीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझिये भेटीची थोर असे आस । दिसोनी निरास आली मज ॥ ध्रु ॥
आतां काय जिणें जालें निरर्थक । वैकुंठनायक भेटे चि ना ॥ २ ॥
आडलासि काय कृपेच्या सागरा । रुकुमादेवीवरा सोइरिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे देई चरणाची सेवा । नुपेक्षीं केशवा मायबापा ॥ ४ ॥

॥ ४४३२ ॥

पक्षीयाचे घरीं नाहीं सामुगरी । त्यांची चिंता करी नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अजगर जनावर वाहळांत राहे । त्याजकडे पाहे पांडुरंग ॥ ध्रु ॥
चातक हा पक्षी नेघे भूमिजळ । त्यासाटीं घननीळ नित्य बर्षे ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी पिप्पलिकांची जात । पुरवीं मनोरथ पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ४४३३ ॥

रामनाम हा चि मांडिला दुकान । आहे वानोवाण घ्यारे कोणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नका कोणी करूं घेतां रे आळस । वांटितों तुह्मांस फुकाचें हें ॥ ध्रु ॥
संचितासारिखें पडे त्याच्या हाता । फारसें मागतां तरी न ये ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मीं सांठविलें सार । उरलिया[1] थार विचारितां ॥ ३ ॥

॥ ४४३४ ॥

बहुजन्मां शेवटीं स्वामी तुझी भेटी । बहु मोह पोटीं थोर जाला ॥ १ ॥
॥ध्रु.॥ बहु पुरें पाहिलीं बहु दिशा शोधिली । बहु चिंता वाहिली दुर्भराची ॥ ध्रु ॥
बहु काळ गेले अनुचित केलें । बहु नाहीं गाइलें नाम तुझें ॥ २ ॥
ऐसा मी अपराधी अगा कृपानिधि । बहु संतां संनिधि ठेवीं तुका ॥ ३ ॥

॥ ४४३५ ॥

कोण तो[2] उपाव करूं भेटावया । जाळावी हे काया ऐसें वाटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सोडोनियां गांव जाऊं वनांतरा । रुकुमादेवीवरा पहावया ॥ध्रु॥
करूं उपवास शोधूं हें शरीर । न धरवे धीर नारायणा ॥ २ ॥
जाती आयुष्याचे दिवस हे चारी । मग केव्हां हरी भेटशील ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं सांगा विचारोनि । विठो तुझे मनीं असेल तें ॥ ४ ॥

॥ ४४३६ ॥

माय बाप बंधु सोयरा सांगाती । तूं चि माझी प्रीति गण गोत ॥ १ ॥

---

१ त. उरलियाची.—२ दे. "तो" नाहीं.

॥ध्रु.॥ शरण आलीं त्यांचीं वारिलीं दुरितें । तारिले पतित असंख्यात॥ध्रु॥
इतर कोण जाणें पावलें विश्रांति । न येतां तुजप्रति शरणागत ॥ २ ॥
तयामध्यें मज ठेवीं नारायणा । लक्षुमीरमणा सोइरिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे देईं दर्शनाचा लाभ । जे पाय दुर्लभ ब्रह्मादिकां ॥ ४ ॥

॥ ४४३७ ॥

पाप ताप माझे गुणदोष निवारीं । कृष्णा विष्णु हरी नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ काम क्रोध वैरी घालोनि बाहेरी । तूं राहें अंतरीं पांडुरंगा ॥ध्रु॥
करिशील तरी नव्हे कांइ एक । निर्मिलें त्रैलोक्य हेळामात्रें ॥ २ ॥
समर्थासि काय आह्मीं शिकवावें । तुका ह्मणे यावें पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ४४३८ ॥

ये गा महाविष्णु अनंतभुजाच्या । आह्मां अनाथांच्या माहेरा ये ॥ १ ॥
॥ध्रु.॥ भेटावया तुज ओढे माझा जीव । एकवेळा पाय दावीं डोळां ॥ध्रु॥
आणीक हें आर्त नाहीं नारायणा । ओढे हे वासना भेटावया ॥ २ ॥
वाटे चित्तीं काय करावा विचार । चरण सुंदर पहावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझे पुरवीं मनोरथ । येईं गा न संवरीत पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ४४३९ ॥

काय पाहतोसि कृपेच्या सागरा । नराच्या नरेंद्रा पांडुरंगा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नामाचा प्रताप ब्रिदाचा बाडिवार । करावा साचार नारायणा ॥ध्रु॥
कलीमाजी देव बौध्यरूप जाला । जगाचिया बोला लागूं नका ॥ २ ॥
माय पुत्रा काय मारूं पाहे कळी । जगाची ढवाळी काय काज ॥ ३ ॥
तुका ह्मणे या हो कृपेच्या सागरा । रुकुमादेवीवरा मायबापा ॥ ४ ॥

॥ ४४४० ॥

रामनामाचे पवाडे । अखंड ज्याची वाचा पढे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ धन्य तो एक संसारीं । रामनाम जो उच्चारी ॥ ध्रु ॥
रामनाम गर्जे वाचा । काळ आज्ञाधारक त्याचा ॥ २ ॥
तुका ह्मणे रामनामीं । कृतकृत्य जालों आह्मी ॥ ३ ॥

॥ ४४४१ ॥

येइल घरा देव न धरीं संदेहा । फकिराचा यावा व्हावा जेव्हां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ होइल फकीर योगी महानुभाव । घडीघडी देव सांभाळील ॥२॥
तुका ह्मणे ऐसें बोलती बहुत । येणें गुणें संत जाले राम ॥ ३ ॥

॥ ४४४२ ॥

भक्तीविण जिणें जळो लाजिरवाणें । संसार भोगणें दुःखमूळ ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ वीसलक्ष योनि वृक्षामाजी घ्याव्या। जलचरीं भोगाव्या नवलक्ष॥ध्रु॥
अकरालक्ष योनि किड्यांमाजी घ्याव्या। दशलक्ष भोगाव्या पक्ष्यांमध्यें॥२॥
तीसलक्ष योनि पशूंचीये घरीं । मानवाभीतरीं चारलक्ष ॥ ३ ॥
एकएक योनि कोटिकोटि फेरा । मनुष्यदेहाचा वारा मग लागे ॥ ४ ॥
तुका ह्मणे तेव्हां नरदेह नरा । तयाचा मातेरा केला मूढें ॥ ५ ॥

॥ ४४४३ ॥

तुजवांचून कोणा शरण । जाऊं आतां कर जोडून ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोण करील माझें साहे । चित्तीं विचारूनि पाहें ॥ ध्रु ॥
तूं तंव कृपेचा सागर । दीनबंधु जगदोद्धार ॥ २ ॥
तुका ह्मणे निका । भवसिंधु तारक नौका ॥ ३ ॥

॥ ४४४४ ॥

हातीं धरिलियाची लाज । देवा असोंदे गा तुज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आहें अमंगळ दुर्बळ । होईं दीन तूं दयाळ ॥ ध्रु ॥
बाळ सेंबडें मातेसि । काय नाबडे तियेसि ॥ २ ॥
तुका ह्मणे जाणें । करीन देहाचें सांडणें ॥ ३ ॥

॥ ४४४५ ॥

जळोजळो तें गुरुपण । जळोजळो तें चेलेपण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गुरु आला वेशीद्वारीं । शिष्य पळतो खिडोरीं ॥ ध्रु ॥
काशासाटीं, जालें येणें । त्याचें आलें वर्षासन ॥ २ ॥
तुका ह्मणे चेला । गुरु दोघे हि नरकाला ॥ ३ ॥

॥ ४४४६ ॥

अगा पंढरीच्या राया । वेगीं येईं तूं सावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दीनबंधु तुझें नाम । देईं आपुलें आह्मां प्रेम ॥ ध्रु ॥
जीवनकळा तूं विश्वाची । तूं चि माउली अनाथाची ॥ २ ॥
तुका ह्मणे पुंडलिका । ठेवीं मस्तकीं पादुका ॥ ३ ॥

॥ ४४४७ ॥

विटेवरी समचरण । तो हा रुक्मिणीरमण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वेदशास्त्रा माहेर । केले दासा उपकार ॥ ध्रु ॥
नामापाशीं चारी मुक्ति । पहा त्वदयीं प्रतीति ॥ २ ॥
तुका ह्मणे कळा । अंगीं जयाच्या सकळा ॥ ३ ॥

॥ ४४४८ ॥

सकळ हे माया नागवे कवणा । भांबाविलें जना दाही दिशा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आशा तृष्णा दंभ लागलीं हीं पाठी । नेदी बैसों हाटीं मोह ठायीं ॥ ध्रु ॥
काम क्रोध घरा लावितील आगी । निंदा हिंसा दोघी पळतां खाती ॥ २ ॥
लाज पुढें उभी राहिली आडवी । ते करी गाढवी थोर घात ॥ ३ ॥
तुका ह्मणे चिंता घाली गर्भवासीं । ओढोनियां पाशीं चहूंकडे ॥ ४ ॥

॥ ४४४९ ॥

सकळतीर्थांहुनि । पंढरी हे मुगुटमणि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय सांगों तेथिल शोभा । रमावल्लभ जेथें उभा ॥ ध्रु ॥
न लभे व्रततीर्थदानीं[1] । तें या विठ्ठलदर्शनीं ॥ २ ॥
साधु संत गाती नाम । सकळ भूतांचा विश्राम ॥ ३ ॥
तुका ह्मणे स्तुती । करूं काय सांगों किती ॥ ४ ॥

॥ ४४५० ॥

गव्हांच्या घुगऱ्या । नाचण्यांच्या पुऱ्या ।
बऱ्या त्या चि बऱ्या । पाषाणी त्या पाषाणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय थोरपण । वांयां जाळावा तो शीण ।
कारणापें भिन्न । निवडे तें निराळें ॥ ध्रु ॥
रुचि वोजेपाशीं । गरज ते जैशीतैशी ।
करूं नका नाशी । खावें खाणें जालें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे मोठा । काय करावा तो ताठा ।
नाहीं वीण नीटा[2] । पाविजेत मारग ॥ ३ ॥

---

१ त. तीर्थव्रतदानीं.—२ दे. निटा.

॥ ४४५१ ॥

आपुलिया ऐसें करी । संग धरी ज्याचा हो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनि परंपरते । वरवरते पळतसें ॥ ध्रु ॥
लोभिक तें लोभा लावी । बांधल्या गोवी वांचूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे नामगोठी । पुरे भेटी तुझी देवा ॥ ३ ॥

॥ ४४५२ ॥

बरें जालीयाचे अवघे सांगाती । वाइटाचे अंतीं कोणी नाहीं ॥ १ ॥
नोहे मातापिता नोहे कांतासुत । इतरांची मात काय सांगों ॥ २ ॥
तुका ह्मणे जन दुतोंडी सांवज । सांपडे सहज तिकडे धरी ॥ ३ ॥

॥ ४४५३ ॥

मिथ्या आहे सर्व अवघें हें मायिक । न कळे विवेक मज कांहीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ सर्व बाजागिरी वाटती ही खरी। पहातां येथें उरी कांहीं नाहीं॥ध्रु
आतां मज दुःख वाटतें अंतरीं । उपाय झडकरी सांग कांहीं ॥ २ ॥
पुढें कोण गति न कळे सर्वथा । तुझे पायीं माथा ठेवियेला ॥ ३ ॥
करणें तें करीं सुखें आतां हरी । तुज म्यां निर्धारीं धरियेलें ॥ ४ ॥
स्वहित तें काय न कळे सर्वथा । तारीं तूं अनंता तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ४४५४ ॥

अवघ्या कोल्ह्यांचें, वर्म अंडीं । धरितां तोंडीं खीळ पडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भुंकूं नका भुंकूं नका । आला तुका विष्णुदास ॥ ध्रु ॥
कवणे ठायीं सादर व्हावें । नाहीं ठावें, गाढवा ॥ २ ॥
दुर्जनासि पंचानन । तुका रजरेणु संतांचा ॥ ३ ॥

---

१ दे. तरीं तुज अनंता०.

॥ ४४५५ ॥

तझे ह्मणों आह्मां । मग उणें पुरुषोत्तमा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा धर्म काय । अमृतानें मृत्यु होय ॥ ध्रु ॥
कल्पवृक्षा तळीं । गांठी बांधलिया झोळीं ॥ २ ॥
तुका ह्मणे परीस । सांपडल्या उपवास ॥ ३ ॥

॥ ४४५६ ॥

कोरडिया गोष्टी नावडती मना । नाहीं ब्रह्मज्ञानाविण चाड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दाखवीं आपुलें सगुण रूपडें । वंदीन मी कोडें पाय तुझे ॥ ध्रु ॥
न लगे तो मोक्ष मज सायुज्यता । नावडे हे वार्ता शून्याकारी ॥ २ ॥
तुका ह्मणे चाड धरीन श्रीमुखें । येशिल कवतुकें जवळीक ॥ ३ ॥

॥ ४४५७ ॥

गणेश सारजा करिती गायना । आणि देवांगना रंभे ऐशा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें आह्मीं मानवांहीं विनवावें तें काय । सुरवर पाय वंदिति जेथें ॥ ध्रु ॥
ज्याच्या गायनासि तटस्थ शंकर । त्या हि परि पार न कळे तुझा ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी किंकर ते किती । इंद्राची हि मति नागविशी ॥ ३ ॥

॥ ४४५८ ॥

डोळियांचें दैव आजि उभें ठेलें । निधान देखिलें पंढरीये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तें वानावें वाचेचे पालवें । वेदा न बोलवे रूप ज्याचें ॥ ध्रु ॥
आनंदाच्या रसें ओंतीव चांगलें । देखतां रंगलें चित्त माझें ॥ २ ॥
तुका ह्मणे मीतों सगळाच विरालों । विठ्ठल चि जालों दर्शनानें ॥ ३ ॥

---

१ त. हे.

॥ ४४५९ ॥

भोगियेल्या नारी । परि तो बाळब्रह्मचारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी ज्याचे अंगीं कळा । पार न कळे वेदाला ॥ ध्रु ॥
बळीबळी थोरथोर । मोडोनियां केले चूर ॥ २ ॥
वांकडी कुबज्या । सरसी आणियेली वोजा ॥ ३ ॥
मल्ल रगडिला पायीं । गज झुगारिला बाहीं ॥ ४ ॥
जिवें मारियेला मामा । धांवे भक्ताचिया कामा ॥ ५ ॥
तुका ह्मणे पूर्ण । दावी भक्तीचीं विंदानें ॥ ६ ॥

॥ ४४६० ॥

वृद्धपणीं आली जरा । शरीर कांपे थरथरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आयुष्य गेलें हें कळेना । स्मरा वेगीं पंढरिराणा ॥ ध्रु ॥
दांत दाढा पडिल्या ओस । हनुवटि भेटे नाकास ॥ २ ॥
हात पाय राहिले कान । नेत्रा पाझर हाले मान ॥ ३ ॥
अंगकांति परतली । चिरगुटा ऐसी जाली ॥ ४ ॥
आड पडे जिव्हा लोटे । शब्द नये मुखा वाटे ॥ ५ ॥
लांब लोंबताती अंड । भरभरा वाजे गांड ॥ ६ ॥
तुका ह्मणे आतां तरी । स्मरा वेगीं हरी हरी ॥ ७ ॥

॥ ४४६१ ॥

वृद्धपणीं न पुसे कोणी । विटंबणी देहाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव द्वारें जाली मोकळीक । गांड सरली वाजती ॥ ध्रु ॥
दंत दाढा गळे थुंका । लागे नाका हनुवटी ॥ २ ॥

शब्द नये मुखावाटा । करिती चेष्टा पोरें तीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे अजून तरि । स्मरें श्रीहरी सोडवील ॥ ४ ॥

॥ ४४६२ ॥

अतित्याई देतां जीव । नये कींव देवासि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ थोड्यासाटीं राग आला । जीव दिला गंगेंत ॥ ध्रु ॥
त्यासि परलोकिं नाहीं मुक्ति । अधोगति चुकेना ॥ २ ॥
तुका ह्मणे कृष्णराम । स्मरतां श्रम वारती ॥ ३ ॥

॥ ४४६३ ॥

तुझें रूप पाहतां देवा । सुख जालें माझ्या जीवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें तों वाचे बोलवेना । काय सांगों नारायणा ॥ ध्रु ॥
जन्मोजन्मींचें सुकृत । तुझे पायीं रमे चित्त ॥ २ ॥
जरी योगाचा अभ्यास । तेव्हां तुझा निजध्यास ॥ ३ ॥
तुका ह्मणे भक्त । गोड गाऊं हरिचे गीत ॥ ४ ॥

॥ ४४६४ ॥

तुजवीण मज कोण आहे देवा । मुकुंदा केशवा नारायणा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जोडोनियां कर कृपेच्या सागरा । गोपीमनोहरा पांडुरंगा ॥ध्रु॥
साच करीं हरी आपुली ब्रिदावळी । कृपेनें सांभाळीं मायबापा ॥२ ॥
साह्य होसी जरी जाती सहा वैरी । मग ध्यान करीं आवडीनें ॥ ३ ॥
सर्व अपराध क्षमा करीं माझा । लडिवाळ तुझा पांडुरंगा ॥ ४ ॥
कृपा करोनियां द्यावी क्षमा शांति । तेणें तुझी भक्ति घडेल देवा ॥५॥
ऐसें तों सामर्थ्य नाहीं नारायणा । जरी तुज करुणा येइल कांहीं ॥६॥
तुका ह्मणे आतां आपंगावें मज । राखें माझी लाज पांडुरंगा ॥ ७ ॥

॥ ४४६५ ॥

नको विद्या वयसा आयुष्य फारसें । नाहीं मज पिसें मुक्तीचें ही ॥ १ ॥
॥ध्रु.॥ रामकृष्ण ह्मणतां नावो माझा प्राण । हें चि कृपादान मागतसें॥ ध्रु॥
नको धन मान, न वाढो संतान । मुखीं नारायण प्राण जावा ॥ २ ॥
तुका ह्मणे दीन काकुलती येतों । तुज निरवितों पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ४४६६ ॥

शिष्या सांगे उपदेश । गुरुपूजा हे विशेष ॥ १ ॥
॥ध्रु.॥ दावी आचार सोवळे । दंड कमंडलु माळे ॥ ध्रु ॥
छाटी भगवी मानसीं । व्यर्थ ह्मणवी संन्यासी ॥ २ ॥
तुका ह्मणे लोभ । न सुटे नाहीं लाभ ॥ ३ ॥

॥ ४४६७ ॥

जिकडे पाहें तिकडे उभा । अवघ्या गगनाचा गाभा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ डोळां बैसलें बैसलें । रूप राहोनि संचलें ॥ ध्रु ॥
न वर्जितां दाही दिशा । जिकडे पाहें तिकडे सरिसा ॥ २ ॥
तुका ह्मणे समपदीं । उभा दिठीचिये आधीं ॥ ३ ॥

॥ ४४६८ ॥

आपटा संवदड रानचारा । दसऱ्याचा होय तुरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा देवामुळें मान । नाहीं तरी पुसे कोण ॥ ध्रु ॥
मृत्तिकेची ते घागरी । पाण्यासाटीं बैसें शिरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे माय जाण । दाण्यासवें घेणें देणें ॥ ३ ॥

॥ ४४६९ ॥

काळ सार्थक केला त्यांणीं । धरिला मनीं विठ्ठल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाम वाचे श्रवण कीर्त्ति । पाउलें चित्तीं समान ॥ ध्रु ॥
कीर्त्तनाचा समारंभ । निर्दंभ सर्वदा ॥ २ ॥
तुका ह्मणे स्वरूपसिद्धि । नित्य समाधि हरिनामीं ॥ ३ ॥

॥ ४४७० ॥

आह्मी जातों आपुल्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुमची आमची हे चि भेटी । येथुनियां जन्मतुटी ॥ ध्रु ॥
आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ॥ २ ॥
येतां निजधामीं कोणी । विठ्ठलविठ्ठल बोला वाणी ॥ ३ ॥
रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ॥ ४ ॥

॥ ४४७१ ॥

कामधेनूचें वासरूं । खाया न मिळे काय करूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें आह्मां मांडियेलें । विठो त्वां कां सांडियेलें ॥ ध्रु ॥
बैसोनि कल्पद्रुमातळीं । पोटासाटीं तळमळी ॥ २ ॥
तुका ह्मणे नारायणा । बरें लोकीं हें दीसेना ॥ ३ ॥

॥ ४४७२ ॥

तुझें नाम माझे मुखीं असो देवा । विनवितों राघवा दास तुझा ॥ १ ॥
तुझ्या नामबळें तरले पतित । ह्मणोनि माझें चित्त तुझे पायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझें नाम हें सादर । गातां निरंतर सुख वाटे ॥ ३ ॥

॥ ४४७३ ॥

उभय भाग्यवंत तरी च समान । स्थळीं समाधान तरी च राहे ॥१॥
॥ध्रु.॥ युक्तीचें गौरव नसतां जिव्हाळा । सांचवणी जळा परी नाश ॥ ध्रु॥
लोखंडा परीस ज्ञानिया, तो शठ । नांवाचा पालट दगड खरा ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघे विनोदाचे ठाव । एकात्मक भाव नाहीं तेथें ॥ ३ ॥

॥ ४४७४ ॥

दो दिवसांचा पाहुणा चालतो उताणा । कां रे नारायणा न भजसी ॥ १ ॥
तूं अखंड दुश्चित्ता तुज नेती अवचिता। मग पंढरीनाथा भजसी केव्हां॥२॥
तुका ह्मणे ऐसे अहित उदंड । तया केशव, प्रचंड केवीं भेटे ॥ ३ ॥

॥ ४४७५ ॥

तुझे पाय माझें भाळ । एकत्रता सर्वकाळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें चि देईं विठाबाई । पांडुरंगे माझे आई ॥ ध्रु ॥
नाहीं मोक्ष मुक्ति चाड । तुझी सेवा लागे गोड ॥ २ ॥
सदा संग सज्जनांचा । नको वियोग पंढरीचा ॥ ३ ॥
नित्य चंद्रभागे स्नान । करीं क्षेत्रप्रदक्षण ॥ ४ ॥
पुंडलीक पाहोन दृष्टि । हर्षें नाचों वाळवंटीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । तुझें स्वरूप चंद्रभागा ॥ ६ ॥

॥ ४४७६ ॥

बाईल चालिली माहेरा । संगें दिधला ह्मातारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सिधा सामग्री पोटाची । सर्वें स्वारी बइलाची ॥ ध्रु ॥
जातां पाडिली ढोरानें । सिव्या देती अन्योविन्ये ॥ २ ॥
न सावरी आपणातें । नग्न सावलें वरतें ॥ ३ ॥

फजित केलें जनलोकीं । मेला ह्मणे पडे नरकीं ॥ ४ ॥
गोहाची हे गेली लाज । गांजितां कां तुह्मी मज ॥ ५ ॥
तुका ह्मणे जनीं । छी[1] थू केली विटंबणी ॥ ६ ॥

॥ ४४७७ ॥

तुळसीवृंदावनीं उपजला कांदा । नावडे गोविंदा कांहीं केल्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसे वंशामध्यें जाले जे मानव । जाणावे दानव अभक्त ते ॥ ध्रु ॥
केवडयामधील निर्गंध कणसें । तैशीं तीं मा[2]णसें भक्तिहीन ॥ २ ॥
तुका ह्मणे जेवीं चंदनांतिल आळी । न चढे निढळीं देवाचिया ॥ ३ ॥

॥ ४४७८ ॥

संचित तैशी बुद्धि उपजे मनामधीं । सांगितलें सिद्धी नव जाय ॥ १ ॥
ज्याचा जैसा ठेवा तो त्याप्रति धांवे । न लगती करावे उपदेश ॥ २ ॥
घेउनियां उठे आपुलाला गुण । भविष्य प्रमाण तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ४४७९ ॥

शिव शक्ति आणि सूर्य गणपति । एक चि ह्मणती विष्णूस ही ॥ १ ॥
॥ध्रु.॥ हिरा गार दोनी मानिती समान । राजस भजनें वांयां जाती ॥ ध्रु ॥
अन्य देवतांसि देव ह्मणऊन । तामस जीवन तमोयोग्या ॥ २ ॥
वांयां जायासाठीं केलासे हव्यास । अन्यदेवतांस देवपण ॥ ३ ॥
आपुलिया मुखें सांगतसे धणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥ ४ ॥
धन्य ते वैष्णव भजती केशव । सात्त्विक हे जीव मोक्षा योग्य ॥ ५ ॥
तुका ह्मणे मोक्ष नाहीं कोणापासीं । एका गोविंदासी शरण व्हा रे ॥ ६ ॥

---

१ त. चीथ.—२ त. मानसें.—३ त. चले.

॥ ४४८० ॥

तुह्मी साधु संत कैवल्यसागर । मोक्षाचे आगर तुह्मां घरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें मतिमंद काय बोलों वाणी । अमृताचे धणी पाणी कां घ्या ॥ ध्रु ॥
कोटी भानु तेजीं खद्योत बापुडें । तैसा तुह्मांपुढें काय बोलों ॥ २ ॥
तुह्मी अवघे चिंतामणि कल्पतरूचीं वनें । त्यापुढें धांवणें मशकांनीं[1] ॥ ३ ॥
वाराणशीक्षेत्र गंगा वाहे कोड । काय तेथें पाड कोकणाचे ॥ ४ ॥
पल्लवाचा वारा हिमकरीं काय । गगनावरी छाय कोण करी ॥ ५ ॥
समुद्राची तृषा हरी ऐसा कोण । जगाची जी तान्ह निववीतो ॥ ६ ॥
मेरूचा पाठार अवघी ते क्षिति । मशकाचें[2] हातीं मुष्टि फावे ॥ ७ ॥
सिंहापुढें काय जंबूक आरोळी । मोतियांचे वोळी कांच काय ॥ ८ ॥
कापुरासि काय लावूनि उटावें । काय ओवाळावें दीपकासि ॥ ९ ॥
तसे[3] तुह्मी निरे ज्ञानाचे भरींव । तेथें म्यां बोलावें पाड काय[4] ॥ १० ॥
कृपानिधि तुह्मीं बोलविलें बोला । सुखें न्याय केला तुमचा मीं ॥ ११ ॥
अज्ञान मी वेडें ह्मणवितों बाळ । माझा प्रतिपाळ करणें तुह्मां ॥ १२ ॥
बोबडें बोलणें न धरावा कोप । क्षमा करा बाप कृपासिंधु ॥ १३ ॥
तुका ह्मणे तुह्मी संत बापमाय । भयें[5] धरिले पाय कृपानिधि ॥ १४ ॥

॥ ४४८१ ॥

देहीं असोनियां देव । वृथा फिरतो निर्दैव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥ ध्रु ॥
नाभीं मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥ २ ॥

---

१ दे. मषकांनीं.—२ दे. मषकाचे.—३ दे. तैशी.—४ त. कायी.—५ दे. भवें.

साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे ॥ ३ ॥
दुधीं असतां नवनीत । नेणे तयाचें माथित ॥ ४ ॥
तुका सांगें मूढजना । देहीं देव कां पाहाना ॥ ५ ॥

॥ ४४८२ ॥

जयजय ह्मणा राम । हातें टाळी वाचे नाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आटाआटी नाहीं ज्यास । न वेचे मोल न पडे खांस ॥ ध्रु ॥
आपण ह्मणे आणिकां हातीं । यज्ञादिकीं नये[1] ते गति ॥ २ ॥
आसन भोजन करितां काम । ध्यानसमाधि ह्मणतां राम ॥ ३ ॥
मंत्र जपा हा चि सार । वर्णा याती जयजयकार ॥ ४ ॥
ह्मणतां राम ह्मणे तुका । वेळोवेळां चुकों नका ॥ ५ ॥

॥ ४४८३ ॥

शिकवणेसाटीं वाटते तळमळ । पुढें येईल काळ फोडों डोई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेव्हां त्यासि काय देशिल उत्तर । मेळउनी अंतर ठेवितोसि ॥ध्रु॥
येथींचिया सोंगें भोरपियाचे[2] परि । होईल तें दुरि शृंगारिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे कां रे राखिलें खरकटें । रागेल्याचे तंट रागेलें का ॥ ३ ॥

॥ ४४८४ ॥

होई आतां माझ्या भोगाचा भोगिता । सकळ अनंता शुभाशुभ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आठवुनी पाय राहिलों त्हदयीं । निवारली तईं सकळ चिंता ॥ध्रु॥
अचळ न चळे देहाचें चळण । आहे हें वळण प्रारब्धें चि ॥ २ ॥
तुका ह्मणे जालें एक चि वचन । केलिया कीर्तन आराणुक ॥ ३ ॥

---

१ त. नयेतें.—२ त. भोरपीयाची.

॥ ४४८५ ॥

लेखी दुखण्यासमान । वेचला नारायणीं क्षण ।
उद्यांचें आजि च मरण । आणोनि ह्मणे हरि भोक्ता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं कांहीं पडीं येत तुटी । जाणें तो आहे सेवटीं ।
लाभ विचारोनि पोटीं । होई सेवटीं जागृत ॥ ध्रु ॥
आहे ते उरे कटा । लावुनि चळ आपुला फाटा ।
पुरे हें न पुरे सेवटा । तरण्या, बळकटा सदा वास ॥ २ ॥
ह्मणोनि मोडावा कांटाळा । अविद्यात्मक, कोंवळा ।
होतील प्रबळा । आशा तृष्णा माया, ॥ ३ ॥
क्षण या देहाच्या अंतीं । जड होउनि राहेल माती ।
परदेश तें परवर होती । चिळसविती नाकडोळे ॥ ४ ॥
जंव या नाहीं पातल्या विपासि । आयुष्य भविष्य आहे हातीं ।
लाभ विचारोनि गुंती । तुका ह्मणे अंतीं सर्व पिसुनें ॥ ५ ॥

॥ ४४८६ ॥

आसावलें मन जीवनाचे ओढी । नामरूपीं गोडी लावियेली ॥ १ ॥
॥ध्रु.॥ काय तुझे पायीं नाहीं भांडवल । माझे मिथ्या बोल जाती ऐसे ॥ध्रु॥
काय लोखंडाचे पाहे गुणदोष । सिवोन परीस सोनें करी ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें अवघें असों द्यावें । आपुलें करावें ब्रीद साच ॥ ३ ॥

॥ ४४८७ ॥

पंढरीची वारी जयांचिये घरीं । पायधुळी शिरीं वंदिन त्यांची ॥ १ ॥
॥ध्रु.॥ दासाचा मी दास पोसणा डोंगर । आतां बहु फार काय बोलों ॥ध्रु॥

जातीचें मी हीन न कळे भजन । ह्मणोनि संतचरण इच्छितसें ॥ २ ॥
तुका ह्मणे मज ह्मणावें आपुलें । बहुतां तारिलें संतजनीं ॥ ३ ॥

॥ ४४८८ ॥

नाम पावन पावन । त्याहून पवित्र आहे कोण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शिव हालाहालें[1] तापला । तो ही नामें शीतळ जाला ॥ ध्रु ॥
शिवास नामाचा आधार । केला कळिकाळ किंकर ॥ २ ॥
मरण जालें काशीपुरी । तेथें नाम चि उद्धरी ॥ ३ ॥
तुका[2] ह्मणे अवघीं चोरें । एक हरिनाम सोइरें[3] ॥ ४ ॥

॥ ४४८९ ॥

अल्प विद्या परि गर्वशिरोमणि । मजहूनि ज्ञानी कोण[4] आहे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अंगीं भरे ताठा कोणासी मानीना । साधूची हेळणा स्वयें करी ॥ ध्रु॥
सज्जनाच्या[5] देहीं मानी जो विटाळ । त्रैलोक्यीं चांडाळ तो चि एक ॥ २ ॥
संतांची जो निंदा करी मुखीं जप । खतेलें तें पाप वज्रलेप ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ४ ॥

॥ ४४९० ॥

नाहीं संतांशीं शरण । काय वाचोनि पुराण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणे विठ्ठलाचा दास । देखोनी परनारीस हांसे ॥ ध्रु ॥
करिती विठोबाची भक्ति । दयाधर्म नाहीं चित्तीं ॥ २ ॥
तेथें नाहीं माझा देव । व्यर्थ श्रमवी हा जीव ॥ ३ ॥
अंगीं नाहीं क्षमा दया । ह्मणती भेट पंढरिराया ॥ ४ ॥

---

१ त. हळहाळे.—२ त. नामा ह्मणे०.—३ त. साइरें.—४ दे. कोणी.—५ त. सज्जनाचा.

नाहीं धर्माची वासना । काय करोनि प्रदक्षिणा ॥ ५ ॥
ऐसें नव्हे भक्तिवर्म । तेथें नाहीं माझा राम ॥ ६ ॥
नये कृपा कांहीं केल्या । नये घाम जीव गेल्या ॥ ७ ॥
जैसी खड्गाची धार । विठ्ठलचरणीं तुका शूर ॥ ८ ॥

॥ ४४९१ ॥

नाहीं रिकामीक परी वाहे मनीं । तया चक्रपाणि साह्य होय ॥ १ ॥
॥ध्रु.॥ उद्वेग जीवासि पंढरीचें ध्यान । तया नारायण साह्य करी ॥ध्रु॥
शरीरासि बळ नाहीं स्वता भाव । तया पंढरिराव साह्य करी ॥ २ ॥
असो नसो बळ राहे पराधीन । तरी अनुमान करूं नका ॥ ३ ॥
तुका ह्मणे येणें करोनि चिंतन । तया नारायण जवळीक ॥ ४ ॥

॥ ४४९२ ॥

दारिद्रानें विप्र पीडिला अपार । तया पोटीं पोर एक असे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ बाहेरी मिष्टान्न मिळे एके दिशीं । घेऊनी छंदासि त्या चि बैसे ॥ध्रु॥
क्षुधाकाळीं रडे देखिलें तें मागे । कांहीं केल्या नेघे दुजें कांहीं ॥ २ ॥
सहज कौतुकें बोले बापमाये । देवापाशीं आहे मागशी तें ॥ ३ ॥
तेव्हां तुजलागीं स्मरे नारायणा । जीवींचिया जीवना पांडुरंगा ॥ ४ ॥
लागली हे क्षुधा जात असे प्राण । काय हें निर्वाण पाहातोसि ॥ ५ ॥
ब्रह्मांडनायक विश्वाचा पाळक । वरी तिन्ही लोक पोसितोसि ॥ ६ ॥
प्राण हा उत्कर्ष जाहला विव्हळ । तेव्हां तो कृपाळ धांव घाली ॥ ७ ॥
सांडूनि वैकुंठ धांव घाली तई । आळंगिला बाहीं कृपावंतें ॥ ८ ॥
तुका ह्मणे दिला क्षीराचा सागर । राहे निरंतर तयापासीं ॥ ९ ॥

---

१ दे. बाळ.—२ दे. चिंतनीं.—३ त. कृपावंते.

॥ ४४९३ ॥

अनाथाचा सखा ऐकिला प्रताप । होसि कृपावंत मजवरि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ माझिया गा चित्ता करिं शिकवण । जेणें तुझे चरण जोडतील ॥ध्रु॥
जोडोनियां कर येतों काकुलती । रकुमाईच्या प्रति कृपावंता ॥ २ ॥
हरुषें निर्भर करीं माझें मन । दाखवीं चरण पांडुरंगा ॥ ३ ॥
तुझे भेटीविण जन्म गेला वांयां । भजन कराया शक्ति नाहीं ॥ ४ ॥
न घडे तुझी सेवा न घडे पूजन । जन्मोनि निष्कारण जाऊं पाहे ॥ ५ ॥
तुका ह्मणे हरि करावें या काय । भजनासि साह्य होई बापा ॥ ६ ॥

॥ ४४९४ ॥

हीनवर बीजवर दोघी त्या गडणी । अखंड कहाणी संसाराची ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ माझा[1] पति बहु लहान चि आहे । खेळावया जाय पोरांसवें ॥ध्रु॥
माझें दुःख जरी ऐकशील सई । ह्मातारा तो बाई खोकतसे ॥ २ ॥
खेळे सांजवरी बाहेरी तो राहे । वाट मी [2]वो पाहें सेजेवरी ॥ ३ ॥
पूर्व पुण्य माझें नाहीं बाई[3] नीट । बहु होती कष्ट सांगों काई[4] ॥ ४ ॥
जवळ मी जातें अंगा अंग लावूं । नेदी जवळ येऊं कांटाळतो ॥ ५ ॥
पूर्व सुकृताचा हा चि बाई ठेवा । तुका ह्मणे देवा काय बोल ॥ ६ ॥

॥ ४४९५ ॥

स्वामीच्या सामर्थ्यें । चाले बोलिला पुरुषार्थ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाठी देवाचें हें बळ । मग लाभे हातीं काळ[5] ॥ ध्रु ॥
देव ज्यासी साह्य । तेणें केलें सर्व होय ॥ ४ ॥
तुका ह्मणे स्वामीसत्ता । मग नाहीं भय चिंता[6] ॥ ५ ॥

---

१ दे. माझे.—२ दे. 'वो' नाहीं.—३ दे. वा.—४ दे. कांहीं.—५ त. फळ.—६ दे. चित्ता.

॥ ४४९६ ॥

नामांचा डांगोरा फिरवीं घरोघरीं । ह्मणा हरिहरी सर्वभावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नामें हरती कर्मे, वैकुंठींची पै वस्ति । संनिध श्रीपति सदोदित॥ध्रु॥
नामाचा महिमा बहुतां कळला । नामें उद्धरिला अजामेळ ॥ २ ॥
गजेंद्राची स्थिति पुराणीं बोलती । नामें चि श्रीपति पावलासे ॥ ३ ॥
तुका ह्मणे नामें घेतां मुक्ति आहे । नामें सर्व पाहें आकळिलें ॥ ४ ॥

॥ ४४९७ ॥

यमाचे हे पाश नाटोपती कोणातें । आह्मां दिनानाथें रक्षियेलें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ यम नेतां तुह्मां रक्षील हें कोण । तुह्मां धन्यधन्य कोण ह्मणती ॥ध्रु॥
संतसज्जनमेळा पवित्र संतकीर्ति । त्यांनीं उत्तम स्थिति सांगितली ॥ २ ॥
तें चि धरोनि चित्तीं तुका हित करी । यमासि पांपरी हाणे आतां ॥ ३ ॥

॥ ४४९८ ॥

देवासीं पैं भांडों एकचित्त करूनि । आह्मांसि सज्जनीं सांगितलें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आह्मां काय आतां देवें आडो परी । भेटी नेदी तरी सुखें नेदो ॥ध्रु॥
तो चि नांदो सदा हरि पैं वैकुंठीं । आह्मां देशवटी देवो सुखें ॥ २ ॥
देवें अभिमान चित्तांत धरिला । तरी तो एकला राहो आतां ॥ ३ ॥
चित्तीं धरोनि नाम असों सुखें येथें । हर्षें गाऊं गीत गोविंदाचे ॥ ४ ॥
तुका ह्मणे सर्व देवाची नष्टाई । आह्मी सुखें पाहीं डुलतसों ॥ ५ ॥

॥ ४४९९ ॥

भरणी आली मुक्त पेठा । करा लाटा व्यापार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उधार घ्या रे उधार घ्या रे । अवघे या रे जातीचे ॥ ध्रु ॥

---

१ दे. 'नाम' नाहीं.—२ दे. 'पाहीं' नाहीं.

येथें पांक्तिभेद नाहीं । मोठें कांहीं लहान ॥ २ ॥
तुका ह्मणे लाभ घ्यावा । मुद्दल भावा जतन ॥ ३ ॥

॥ ४५०० ॥

ग्रासोग्रासीं भाव । तरी देहिं च जेवी देव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धरीं स्मरण तें सार । नाहीं दुरी तें अंतर ॥ ध्रु ॥
भोगितां तूं भावें । देव जेऊं बैसे सवें ॥ २ ॥
तुज पावो देवा । भावें अंतरींची सेवा ॥ ३ ॥
गुंतला साधनीं । देव नाहीं त्रिभुवनीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे हातीं । न धारितां गसाविती ॥ ५ ॥

॥ ४५०१ ॥

कामिनीसी जैसा आवडे भ्रतार । इच्छीत चकोर चंद्र जैसा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तैसीं हे आवडी विठ्ठलाचे पायीं । लागलिया नाहीं गर्भवास ॥ध्रु॥
दुष्काळें पीडिल्या आवडे भोजन । आणिक जीवन तृषाक्रांता ॥ २ ॥
कामातुर जैसा भय लज्जा सांडोनि । आवडे कामिनी सर्वभावें ॥ ३ ॥
तुका ह्मणे तैसी राहिली आवडी । पांडुरंग थडी पाववील ॥ ४ ॥

॥ ४५०२ ॥

ॐ तत्सदिति सूत्राचें सार । कृपेचा सागर पांडुरंग ॥ १ ॥
हरिःॐ सहित उदत[1] अनुदत । प्रचुरीश्वरासहित पांडुरंग ॥ २ ॥
गोब्राह्मणहिता होऊनि निराळे । वेदाचें तें मूळ तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ४५०३ ॥

सांडियेला गर्भ उबगोनि माउली । नाहीं सांभाळिली भूमि शुद्ध ॥१॥

---

१ "उदत अनुदत । प्रचुरीश्वरासहित" हे "उदात्त अनुदात्त । प्रचयस्वरासहित" या अर्थीं आहे असें दिसतें.

॥ध्रु.॥ उष्ण तान भूक एवढिये आकांतीं। ओसंगा लाविती काय ह्मूण ॥१॥
खांद्यावरि शूळ, मरणाचिये वाटे । अन्याय ही मोठे केले साच ॥ २ ॥
हातींचा हिरोनि घातला पाठीसी । तुका ह्मणे ऐसी परी जाली ॥ ३ ॥

ओंव्या प्रारंभ २३१ अभंग ३+.

पांडुरंगा करूं प्रथम नमना । दुसरें चरणा संतांचिया ॥ १ ॥
यांच्या कृपादानें कथेचा विस्तारु । बाबाजीसद्गुरुदास तुका ॥ २ ॥
काय माझी वाणी मानेल संतांसी । रंजवूं चित्तासी आपुलिया ॥ ३ ॥
या मनासी लागो हरिनामाचा छंद । आवडी गोविंद गावयासी ॥ ४ ॥
सीण जाला मज संसारसंभ्रमें । सीतळ या नामें जाली काया ॥ ५ ॥
या सुखा उपमा नाहीं द्यावयासी । आलें आकारासी निर्विकार ॥ ६ ॥
नित्य धांवे तेथें नामाचा गजर । घोष जयजयकार आइकतां ॥ ७ ॥
तांतडी ते काय हरिगुण गाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥ ८ ॥
मूळ नरकाचें राज्य मदें माते । अंतरे बहुत देव दुरी ॥ ९ ॥
दुरी अंतरला नामनिंदकासी । जैसें गोंचिडासी क्षीर राहे ॥ १० ॥
हे वाट गोमटी वैकुंठासी जातां । रामकृष्णकथा दिंडी ध्वजा ॥ ११ ॥
जाणते तयांनीं सांगितलें करा । अंतरासी वारा आडूनियां ॥ १२ ॥
यांसी आहे ठावें परि अंध होती । विषयाची खंती वाटे जना ॥ १३ ॥
नाहीं त्या सुटलीं द्रव्य लोभ माया । भस्म दंड छाया तरुवराची ॥ १४ ॥
चित्त ज्याचें पुत्रपत्नीबंधूवरी । सुटेल हा परि कैसें जाणा ॥ १५ ॥

---

१ दे. पोटासी.—२ दे. त. नमन.—३ पं. त्याच्या.—४ दे. त. विस्तार.—५ दे. संवसार०.—६ दे. राज्यमंदमाते.—७ दे. जाणतयांनीं.—८ पं. तयासी.—९ दे. सुटल. त. सुटला.

* त. ११०० हा अंक आहे. + त. १०३ हा अंक आहे.

जाणते[1] नेणते करा हरिकथा । तराल सर्वथा भाक माझी ॥ १६ ॥
माझी मज असे घडली प्रचित । नसेल पतित ऐसा कोणी ॥ १७ ॥
कोणीं तरी कांहीं केलें[2] आचरण । मज या कीर्तनेंविण नाहीं ॥ १८ ॥
नाहीं भय भक्ता तराया पोटाचें । देवासी तयाचें करणें लागे ॥ १९ ॥
लागे पाठोवाटी पाहे पायांकडे । पीतांबरें[3] खडे वाट झाडी[4] ॥ २० ॥
डिंकोनियां कां[5] रे राहिले हे लोक । हें चि कवतुक वाटे मज ॥ २१ ॥
जयानें तारिले पाषाण सागरीं । तो ध्या रे अंतरीं स्वामी माझा ॥ २२ ॥
माझिया जीवाची केली सोडवण । ऐसा नारायण कृपाळु हा ॥ २३ ॥
हा चि माझा नेम हा चि माझा धर्म । नित्य वाचे नाम विठोबाचें ॥ २४ ॥
चेतवला अग्नि तापत्रयज्वाळ[6] । तो 'करी' शीतळ रामनाम[7] ॥ २५ ॥
मना धीर करीं दृढ चित्तीं धरीं । तारील श्रीहरि मायबाप ॥ २६ ॥
बाप हा कृपाळु भक्तां भाविकांसी । घरीं होय दासी कामारी त्या ॥ २७ ॥
त्याचा भार माथां चालवी आपुला । जिहीं त्या दिधला सर्व भाव ॥ २८ ॥
भावेंविण जाणा[8] नाहीं त्याची प्राप्ति । पुराणें बोलती ऐसी मात ॥ २९ ॥
मात त्याची जया[9] आवडे जीवासी । तया गर्भवासीं नाहीं येणें ॥ ३० ॥
यांवें[10] गर्भवासीं तरी च विष्णुदासीं । उद्धार लोकांसी पूज्य होती ॥ ३१ ॥
होती आवडते[11] जीवाचे ताइत । त्यां घडी अच्युत न विसंभे[12] ॥ ३२ ॥
भेदाभेद नाहीं चिंता दुःख कांहीं । वैकुंठ त्या ठायीं सदा वसे ॥ ३३ ॥

---

१ दे. जाणत नेणत.—२ पं. केलीं आचरणें.—३ दे. पं. पीतांबर.—४ दे. सांडी.—५ पं. 'कांरे' याबद्दल 'काय.'—६ पं. जाळ.—७ त. पं. रामनामें.—८ दे. 'जाणा नाहीं' नाहीं.—९ पं. सदा आवडे जयासी.—१० पं. यावे विष्णुदासी तरीच गर्भवासीं ।.—११ दे. आवडत.—१२ पं. विसबे.

वसे तेथें देव सदा सर्वकाळ । करिती निर्मळ नामघोष ॥ ३४ ॥
संपदा तयांची न सरे कल्पांतीं । मेळविला भक्ती देवलाभ ॥ ३५ ॥
लाभ तयां जाला संसारा येऊनी । भगवंत ऋणी भक्ती केला ॥ ३६ ॥
लागलेंसे पिसें काय मूढजनां । काय[1] नारायणा विसरलीं ॥ ३७ ॥
विसरलीं तयां थोर जाली हाणी । पचेविल्या[2] खाणी चौऱ्यांसीच्या[3] ॥ ३८ ॥
शिकविलें तरी नाहीं कोणा लाज । लागलीसे भाज धन गोड ॥ ३९ ॥
गोड एक आहे अविट गोविंद । आणीक तो[4] छंद नासिवंत ॥ ४० ॥
तळमळ त्याची कांहीं तरी करा । कां रे निदसुरा बुडावया ॥ ४१ ॥
या जनासी भय यमाचें कां[5] नाहीं । सांडियेलीं[6] तिहीं एकराज्यें ॥ ४२ ॥
जेणें अग्निमाजी घातलासे पाव । नेणता तो राव जनक होता ॥ ४३ ॥
तान भूक जिहीं साहिले आघात । तया पाय हात काय नाहीं ॥ ४४ ॥
नाहीं ऐसा तिहीं केला संवसार । दुःखाचे डोंगर तोडावया ॥ ४५ ॥
याच जन्में घडे देवाचें भजन । आणीक हें ज्ञान नाहीं कोठें ॥ ४६ ॥
कोठें[7] पुढें नाहीं घ्यावया विसांवा । फिरोनि या गांवा आल्याविण ॥ ४७ ॥
विनवितां दिवस बहुत लागती । क्षणउनि चित्तीं देव धरा ॥ ४८ ॥
धरा पाय तुह्मी संतांचे जीवासी । वियोग तयांसी देवा नाहीं ॥ ४९ ॥
नाहीं चाड देवा आणीक सुखाची । आवडी नामाची[8] त्याच्या तया ॥ ५० ॥
त्याचीं च उच्छिष्ट बोलतों उत्तरें । सांगितलें खरें व्यासादिकीं ॥ ५१ ॥
व्यासें सांगितलें भक्ति हें[10] चि सार । भवसिंधु[11] पार तरावया ॥ ५२ ॥

---

१ पं. कां.—२ पं. पचतील.—३ दे. चौऱ्यासी.—४ पं. ते.—५ दे. 'कां' नाहीं.—६ पं. सांडियेले तिही एक राज्य.—७ पं. नाहीं कोठें पुढें—८ पं. जीवेसीं.—९ पं. तयाची तैसी तया.—१० दे. त. हे विचार.—११ पं. तरावया पार भवसिंधु।

तरावया जना केलें भागवत । गोवळ गोपी भक्त माता पिता ॥ ५३ ॥
तारुनियां खरे नेली एक्यासरें[2] । निमित्तें उत्तरें[3] ऋषीचिया ॥ ५४ ॥
यासी वर्म ठावें भक्तां तरावया[4] । जननी बाळ माया राखे[5] तान्हें ॥५५॥
तान्हेलें भुकेलें ह्मणे वेळोवेळां । न मगतां लळा[6] जाणोनियां ॥ ५६ ॥
जाणोनियां वर्म[7] देठ लावियेला । द्रौपदीच्या बोलासवें धांवे ॥ ५७ ॥
धांवे सरवता[8] धेनु जैसी वत्सा । भक्तालागीं तैसा नारायण ॥ ५८ ॥
नारायण व्हावा[10] हांव ज्याच्या जीवा । धन्य त्याच्या दैवा पार नाहीं ॥५९॥
पार नाहीं सुखा तें दिलें तयासी । अखंड वाचेसी रामनाम[11] ॥ ६० ॥
रामनाम[11] दोनी उत्तम अक्षरें । भवानीशंकरें[12] उपदेशिलीं ॥ ६१ ॥
उपदेश करी विश्वनाथ कानीं । वाराणसी प्राणी मध्यें मरे ॥ ६२ ॥
मरणाचे अंतीं राम ह्मणे जरी । न लगे यमपुरी जावें[13] तया ॥ ६३ ॥
तयासी[14] उत्तम वास[15] वयकुंठीं । वसे नाम चिंतीं[16] सर्वकाळ ॥ ६४ ॥
सर्वकाळ वसे वैष्णवांच्या घरीं । नसे क्षणभरी स्थिर[17] कोठें ॥ ६५ ॥
कोठें नका पाहों करा हरिकथा । तेथें अवचिता सांपडेल ॥ ६६ ॥
सांपडे हा देव भाविकांचे हातीं । शाहाणे मरती तरी नाहीं ॥ ६७ ॥
नाहीं भलें[18] भक्ती केलियावांचूनि । अहंता पापिणी नागवण ॥ ६८ ॥
नागवलों[19] ह्मणे देव मी आपणा । लाभ दिला जना ठकलों[20] तो ॥ ६९॥

---

१ पं. पुढें.—२ पं. एक सरे.—३ दे. रुसिया.—४ पं. तारावया.—५ दे. त. राख.—६ पं. कळ.—७ पं. देठ वर्म.—८ धांवे सवें तान्ही धेनु जैसी वत्सा।—९ दे. पं. सर्वता.—१० दे. व्होवा. पं. व्हावा हे हांव.—११ पं. रामराम.—१२ पं. भवानीशंकर उपदेशी.—१३ त. पं. जाणें.—१४ पं. तयासी तो ठाव केलासे वैकुंठीं।—१५ दे. ठाव वैकुंठीं.—१६ पं. कंठीं.—१७ दे. त. थिर.—१८ पं. भोळी.—१९ त. नागवेल.—२० पं. ठकला.

तो चि देव येर नव्हे ऐसें कांहीं । जनार्दन ठायीं चंहूं खाणी ॥ ७०॥
खाणी भरूनियां राहिलासे अंत । बोलावया मात ठाव नाहीं ॥ ७१॥
ठाव नाहीं रिता कोणी देवाविण । ऐसी ते सज्जन संतवाणी ॥ ७२॥
वाणी बोलूनियां गेलीं[1] एक पुढें । तयासी वांकुडें जातां ठेंके[2] ॥७३॥
ठेंका[3] नाहीं अर्थ[4] ठाउका वेदांचा । होऊनि भेदाचा दास ठेला ॥ ७४॥
दास ठेला पोटें[4] अर्थ दंभासाटीं । ह्मणउनि तुटी देवासवें ॥ ७५ ॥
सवें देव द्विजातीही दुराविला । आणिकांचा आला कोण पाड ॥ ७६ ॥
पाड करूनियां नांगविलीं फार[5] । पंडित वेव्हार खळवादी ॥ ७७ ॥
वादका निंदका देवाचें दर्शन[6] । नव्हे नाला पूर्ण षडकर्मी[7] ॥ ७८ ॥
षडकर्मीं हीन रामनाम कंठीं । तयासवें भेटी सवें[8] देवा ॥ ७९ ॥
देवासी आवडे[9] भाविक जो भोळा । शुद्ध त्या चांडाळा करूनि मानी ॥८०
मानियेला[10] नाहीं विश्वास[11] या बोला । नाम घेतां मला युक्ति[12] थोडी ८१॥
युक्ति[13] थोडी मज दुर्बळाची वाचा । प्रताप नामाचा बोलावया ॥८२॥
बोलतां पांगल्या श्रुति नेति नेति । खुंटलिया युक्ति पुढें त्यांच्या[12] ॥८३ ॥
पुढें[14] पार त्याचा न कळे चि जातां । पाउलें देखतां ब्रह्मादिकां ॥ ८४॥
काय भक्तीपिसें[15] लागलें देवासी । इच्छा ज्याची जैसी तैसा होय ॥८५॥
होय हा सगुण निर्गुण आवडी । भक्तिप्रिय गोडी फेडावया ॥ ८६ ॥
यां[16] बापासी बाळ बोले लाडें कोडें । करूनि वांकुडें मुख तैसें ॥ ८७ ॥

---

१ पं. एक गेले पुढें.—२ दे. त. ठक.—३ पं. ठकला.—४ त. पाठ.—५ पं. नागवले.—६ दे. दरुशन त. दरुषण.—७ त. षड्कर्मी.—८ पं. सत्य.—९ दे. आवड.—१० दे. मानियेल्या.—११ पं उधार.—१२ दे युक्त.—१३ पं. त्यांची.—१४ पं. त्याचा पार पुढें न कळे०.—१५ पं. भक्तीपिसें.—१६ पं. मायबापासी बाळ बोले लाडें ।

तैसें याचकाचें समाधान दाता । होय हा राखता सत्त्वकाळीं[1] ॥ ८८ ॥
सत्त्वकाळीं[1] कामा न येती आयुवें । बळ[2] हा संबंध सैन्यलोक ॥ ८९ ॥
सैन्यलोक तया दाखवी प्रताप । लोटला हा कोप कोपावरी ॥ ९० ॥
कोपा मरण नाहीं शांत होय त्यासी । प्रमाण भल्यासी सत्त्वगुणीं[3] ॥९१॥
सत्त्वरजतम[4] आपण नासती । करितां हे[5] भक्ति विठोबाची ॥ ९२ ॥
चित्त रंगलिया चैतन्य चि होय । तेथें उणें काय निजसुखा ॥ ९३ ॥
सुखाचा सागरु आहे विटेवरी । कृपादान करी तो चि एक ॥ ९४ ॥
एक चित्त धरूं विठोबाचे पायीं । तेथें उणें कांहीं एक आह्मां ॥ ९५ ॥
आह्मांसी विश्वास याचिया[6] नामाचा । ह्मणउनि वाचा घोष करूं ॥९६॥
करूं हरिकथा सुखाची समाधि । आणिकाची बुद्धि दुष्ट नासे[7] ॥ ९७ ॥
नासे संवसार लोकमोहो माया । शरण जा रे तया विठोबासी ॥ ९८ ॥
सिकविलें मज मूढा संतजनीं । दृढ या वचनीं राहिलोंसें ॥ ९९ ॥
राहिलोंसें दृढ विठोबाचे पायीं । तुका ह्मणे कांहीं न लगे आतां ॥१००॥

॥ २ ॥

गाईन ओविया पंढरिचा देव । आमुचा तो जीवें पांडुरंग ॥ १ ॥
रंगलें हें चित्त माझें तया पायीं । ह्मणउनि घेईं हा चि लाहो ॥ २ ॥
लाहो करीन मी हा चि संवसारीं । राम कृष्ण हरि नारायण ॥ ३ ॥
नारायण नाम घालितां तुकासी । न येती या रासी तपतीर्थें ॥ ४ ॥
तीर्थें रजें[11] माथां वंदिती संतांचे । जे गाती हरिचे गुणवाद ॥ ५ ॥
गुणवाद ज्याचे गातां पूज्य जाले । बेडिवार[12] बोले कोण त्यांचा ॥ ६ ॥

---

१ पं. 'सत्वकाळीं' याबद्दल 'सर्वकाळीं' असें नवीन केलें आहे, ती चूक आहे.—२ पं. 'बळ' याबद्दल 'सोइरीं.'—३ पं. सत्त्वगुण.—४ दे. सत्त्वरजतमा.—५ पं. या.—६ पं. त्याचिया.—७ दे. नास.—८ पं. जातां या०.—९ पं. भाव.—१० पं. ह्मणोनियां.—११ पं. माथां रज.—१२ त. बडिभार.

त्याचा नाहीं पार[1] कळला वेदांसी । आणीक ही ऋषि विचारितां ॥ ७ ॥
विचारितां तैसा होय त्यांच्या भावें । निजसुख[2] ठावें नाहीं कोणा ॥ ८ ॥
कोणा कवतुक न कळे हे माव । निजलिया जीवें[3] करी धंदा ॥ ९ ॥
करुनि कवतुक खेळे हा चि लीळा । व्यापूनि वेगळा पाहातसे[4] ॥ १० ॥
सेवटीं आपण एकला[5] चि खरा । सोंग हा पसारा नट केला ॥ ११ ॥
लावियेलें[6] चाळा मीपणें हें जन । भोग तया[7] कोण भोगविशी ॥ १२ ॥
विषयीं गुंतलीं विसरलीं तुज । कन्या पुत्र भाज धनलोभें[8] ॥ १३ ॥
लोभें गिळी फांसा आमिषाच्या[9] आशा । सांपडोनि[10] मासा तळमळी ॥ १४ ॥
तळमळ याची[11] तरी[12] शम होईल । जरी हा विठ्ठल आठविती ॥ १५ ॥
आठवे[13] हा जरी संतांच्या सांगातें[14] । किंवा हें संचित जन्मांतर[15] ॥ १६ ॥
जन्मांतरें तीन भोगितां कळती । केलें तें पावती करितां[16] पुढें ॥ १७ ॥
पुढें जाणोनियां करावें संचित । पुजावे अतीत देव द्विज ॥ १८ ॥
जन्म तुटे ऐसें नव्हे तुह्मां जना । पुढिल्या पावना धर्म करा ॥ १९ ॥
करा जप तप अनुष्ठान याग । संतीं हा[17] मारग स्थापियेला ॥ २० ॥
लावियेलीं कर्में शुद्ध आचरणें । कोणा[18] एका तेणें काळें पावे ॥ २१ ॥
पावला[19] सत्वर निष्काम उदार । जिंकिली अपार वासना हे ॥ २२ ॥
वासनेचें मूळ छेदिल्या वांचून । तरलोंसें[20] कोणी न ह्मणावें ॥ २३ ॥

---

१ त. अंत.—२ पं. निजरूप.—३ दे. जिवें.—४ दे. त. पाहातुसे.—५ पं. वेगळा.—६ पं. लावियेला.—७ पं. तयाकुना.—८ दे. धनलोभा.—९ दे. त. आविसाच्या. पं. आविशाच्या.—१० दे. पडोनि. त. पडोनियां.—११ पं. त्याची.—१२ पं. तरीच शमेल.—१३ दे. आठव. पं. अठवे हा देव.—१४ पं. सांगात.—१५ दे. जन्मांतरें.—१६ पं. करी.—१७ पं. हे मारग स्थापियेले.—१८ पं कोण्यायेक्या जन्में केलें पावो.—१९ पं. पावेल.—२० दे. तरलेंसें.

न ह्मणावें जाला पंडित वाचक । करो[1] मंत्रघोष अक्षरांचा ॥ २४ ॥
चाळविलीं एकें ते चि आवडीनें । लोक दंभमानें देहसुखें ॥ २५ ॥
सुख तरी चे[2] घडे भजनाचें सार । वाचे निरंतर रामनाम ॥ २६ ॥
राम हा उच्चार तरी च बैसे वाचे । अनंता जन्माचें पुण्य[3] होय ॥ २७ ॥
पुण्य ऐसें कांय[4] रामनामापुढें । काय ते बापुडे यागयज्ञ ॥ २८ ॥
यागयज्ञ तप संसार दायकें । न तुटती एकें नामेंविण ॥ २९ ॥
नामेंविण भवसिंधु पावे पार । अइसा[5] विचार नाहीं दुजा ॥ ३० ॥
जाणती हे भक्तराज महामुनि । नाम सुखधणी अमृताची ॥ ३१ ॥
अमृताचें सार निजतत्त्व बीज । 'गुह्याचें तें गुज रामनाम ॥ ३२ ॥
नामें असंख्यात तारिले अपार । पुराणीं हें सार प्रसिद्ध हे ॥ ३३ ॥
हें चि सुख आह्मी घेऊं सर्वकाळ[6] । करूनि निर्मळ हरिकथा ॥ ३४ ॥
कथाकाळीं[7] लागे सकळा समाधि । तात्काळ हे बुद्धि दुष्ट नासे ॥ ३५ ॥
नासे लोभ मोहो आशा तृष्णा माया । गातां गुण तया विठोबाचे ॥ ३६ ॥
विठोबाचे गुण मज आवडती । आणीक हे चित्तीं न लगे कांहीं ॥ ३७ ॥
कांहीं कोणी नका सांगों हे[7] उपाव । माझ्या[8] मनीं भाव नाहीं दुजा ॥ ३८ ॥
जाणोनियां आह्मी दिला जीवभाव । दृढ याचे पांव धरियेले[9] ॥ ३९ ॥
धरियेले आतां न सोडीं जीवेंसी । केलों[10] ये च विशीं निरधार ॥ ४० ॥
निरधार आतां[11] राहिलों ये नेटीं । संवसारतुटी करूनियां ॥ ४१ ॥
येणें अंगीकार केला पांडुरंगें । रंगविलों[12] रंगें आपुलिया ॥ ४२ ॥
आपुली पाखर घालुनियां वरि । आह्मांसी तो करी यत्न देव ॥ ४३ ॥

---

१ दे. करूं. पं. करूनि.—२ पं. 'च' नाहीं.—३ पं. होय पुण्य.—४ पं. कोण.—५ पं. ऐसा हा.—६ दे. सदाकाळ.—७ पं. हा.—८ दे. त माझ.—९ दे. पाये.—१० पं. केला हा सेवेसी निरधार.—११ पं. आह्मी.—१२ दे. रंगविला. पं. रंगविलें.

देव राखे तया आणिकांचें काय । करितां उपाय चाले तेथें ॥ ४४ ॥
तेथें नाहीं रिघ[1] कळिकाळासी जातां । दास ह्मणवितां विठोबाचे ॥ ४५ ॥
विठोबाचे आह्मी लाडिके डिंगर । कांपती असुर काळ धाकें ॥ ४६ ॥
धाक तिहीं लोकीं जयाचा दरारा । स्मरण हें करा त्याचें तुह्मी ॥ ४७ ॥
तुह्मी निदेसुर[2] नका राहूं कोणी । चुकावया[3] खाणी गर्भवास ॥ ४८ ॥
गर्भवासदुःख[4] यमाचें दंडण[5] । थोर होय शीण येतां जातां ॥ ४९ ॥
तान भूक पीडा जीतां ते आघात । मेल्या यमदूत जाच करिती ॥ ५० ॥
जाच[6] करिती हें कोणा आहे ठावें । नरकीं कौरवें बुडी दिली ॥ ५१ ॥
बुडी दिली कुंभपाकीं दुर्योधनें । दाविनां लाजेनें मुख धर्मा ॥ ५२ ॥
धर्म हा कृपाळू आलासे जवळी । बैसला पातळीं वरि नये ॥ ५३ ॥
न ये वरि कांहीं करितां उपाव । भोगवितो देव ज्याचें[7] त्यासी ॥ ५४ ॥
त्यांसी अभिमान गर्व या देहाचा । नुच्चारिती वाचा नारायण ॥ ५५ ॥
नारायण विसरलीं संवसारीं[8] । तयांसी[9] अघोरीं वास सत्य ॥ ५६ ॥
सत्य मानूनियां संतांच्या वचना । जा रे नारायणा शरण तुह्मी ॥ ५७ ॥
तुह्मी नका मानूं कोणी[10] विसवास । पुत्र पत्नी आस धन वित्त ॥ ५८ ॥
धन वित्त लोभ माया मोहपाश । मांडियेले फांसे[11] यमदूतीं ॥ ५९ ॥
दूतीं याच्या मुखा केलेंसे कुडण । वाचे नारायण येऊं नेदी ॥ ६० ॥
नेदी शुद्धबुद्धि आतळों चित्तासी । नाना कर्मे[12] त्यासी दुरावती ॥ ६१ ॥
दुराविलीं एकें[13] जाणतीं च फार । निंदा अहंकार वादभेद ॥ ६२ ॥

---

१ पं. येतां.—२ पं. निदसुरे.—३ पं. चुकवा, जाचणी गर्भवास.—४ पं. गर्भवासीं.—५ दे. दंडणें.—६ दे. जाच करिती हे ह्मणसी कोणा।०.—७ दे. त्याचें. पं. तो चि.—८ पं. जीवी विसरे संसारीं.—९ दे. तया.—१० पं. कोणाचा विश्वास.—११ दे. त. फासे.—१२ दे. पं. कर्म.—१३ पं. एक.

वाद भेद निंदा हे फंद काळाचे[1] । गोवितील वाचे रिकामिकें[2] ॥ ६३ ॥
रिकामिक देवा होय नव्हे[3] मना । चिंतेचिये[4] घाणा जुंपिजेसी ॥ ६४ ॥
सेवटीं हे गळा लावुनियां दोरी । सांभाळ ये करीं[5] वासनेचा ॥ ६५ ॥
वासनेचा संग होय अंतकाळीं । तरी तपोबळी जन्म धरी ॥ ६६ ॥
धरूनियां देव राहतील चित्तीं । आधींचिया गती आठवाया[6] ॥ ६७ ॥
आठवावा देव मरणाचे काळीं । ह्मणउनि बळी जीव दिले[7] ॥ ६८ ॥
दिले टाकूनियां भोग ऋषेश्वरीं । खाती वनांतरीं कंदमूळें ॥ ६९ ॥
मुळें सुखाचिया देव अंतरला । अल्पासाटीं नेला[8] अधोगती ॥ ७० ॥
गति हे उत्तम व्हावया उपाव । आहे धरा पाव विठोबाचे ॥ ७१ ॥
विठोबाचे पायीं राहिलिया भावें । न लगे कोठें जावें वनांतरा ॥७२॥
तरती दुबळीं विठोबाच्या नांवें । संचित ज्या सर्वें नाहीं शुद्ध ॥ ७३ ॥
शुद्ध तर[9] याचें काय तें नवल । ह्मणतां विठ्ठल वेळोवेळां ॥ ७४ ॥
वेळां[10] कांहीं नाहीं कवणाचे हातीं । न कळे हे[11] गति भविष्याची ॥७५॥
भविष्य न सुटे भोगिल्यावांचूनि । संचित जाणोनि शुद्ध करा ॥ ७६ ॥
करावे सायास आपुल्या हिताचे । येथें आलियाचे मनुष्यपणें[12] ॥ ७७ ॥
मनुष्यपण[13] तरी साधी[14] नारायण । नाहीं तरी हीन पशुहूनी ॥ ७८ ॥
पशु पाप पुण्य काय ते[15] जाणती । मनुष्या या गति ठाउकिया ॥७९॥
ठाउकें हें[16] असे पाप पुण्य लोका । देखती[17] ते एकां भोगितिया ॥८०॥

---

१ दे. त. काळाचें.—२ पं. रिकामिक.—३ पं. नाहे.—४ पं. चिंतेचिया घाणा जुंपियेलें ।.—५ दे. त. पं. करी.—६ त. आठवाव्या. पं. अठवितां.—७ पं. दिल्हा.—८ पं. गेला.—९ दे. तरी याचे. पं. तरायाचें.—१० पं. वेळकाल नाहीं विठोवाचे हातीं ।.—११ त. या.—१२ पं. नरपण.—१३ पं. नरपणें.—१४ पं. साधे.—१५ त. तीं. पं. हे.—१६ पं. आहे.—१७ पं. देखातिल एका०.

भोगतील एक दुःख संवसारीं[1] ।काय सांगों परी वेगळाल्या ॥ ८१ ॥
ल्यावें खावें बरें असावें सदैव । हे चि करी हांव संवसारीं[2] ॥ ८२ ॥
संवसारें[3] जन गिळिले सकळ[4] । भोगविती[5] फळ[6] गर्भवासा ॥ ८३ ॥
वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । नव्हे[7] या खंडण गर्भवासा ॥ ८४ ॥
सायास केलियावांचुनि तें कांहीं[8] । भोगावरी पाहीं[9] घालूं नये ॥ ८५ ॥
नये बळें धड घालूं कांट्यावरि । जाये जीवें धरी सर्प हातीं ॥ ८६ ॥
हातीं आहे[10] हित करील तयासी । ह्मणउनि ऋषीं सांगितलें ॥ ८७ ॥
सांगती[11] या लोका फजित करूनि । आपण जे कोणी तरले[12] ते ॥ ८८ ॥
तेणें[13] वाळवंटीं उभारिले कर । कृपेचा सागर पांडुरंग ॥ ८९ ॥
गंगाचरणीं करी पातकांची धुनी । पाउलें तीं मनीं चिंतिलिया ॥ ९० ॥
चिंतनें जयाच्या तारिले[14] पाषाण । उद्धरी[15] चरण लावूनियां ॥ ९१ ॥
लावूनियां टाळी नलगे बैसावें । प्रेमसुख घ्यावें संतसंगें ॥ ९२ ॥
संतसंगें कथा करावें कीर्तन । सुखाचें साधन रामराम[16] ॥ ९३ ॥
मग[17] कोठें देव जाऊं न[18] सके दुरी । बैसोनि भीतरी राहे कंठीं ॥ ९४ ॥
राहे व्यापुनियां सकळ शरीर । आपुला विसर पडों नेदी ॥ ९५ ॥
नेदी दुःख देखों आपुलिया दासा । वारी गर्भवासा यमदूता ॥ ९६ ॥
तान भूक त्यासी वाहों नेदी चिंता । दुश्चित हे घेतां नाम होती ॥ ९७ ॥
होती जीव त्यांचे सकळ ही जंत । परि ते अंकित संचिताचे[19] ॥ ९८ ॥
चेवले जे कोणी देहअभिमानें । त्यांसी नारायणें कृपा केली ॥ ९९ ॥
कृपाळू हा देव अनाथा कोंवसा । आह्मी त्याच्या आशा लागलोंसों[20] ॥ १०० ॥
लावियेले कांसे येणें पांडुरंगें । तुका ह्मणे संगें संतांचिया ॥ १०१ ॥

---

१ पं. संसारीं.—२ पं. संसाराची.—३ पं. संसारें.—४,त. सगळे ।—५ पं. भोगतील.—६ त. पं. फळे.—७ पं. नव्हे चि खंडण.—८ पं. नाहीं.—९ पं. काई.—१० पं. हित आहे.—११ पं. सांगितलें.—१२ त. तरलें जें.—१३ पं जेणें.—१४ त. तरले. पं. तरती.—१५ पं. उद्धरिले.—१६ पं. रामनाम.—१७ पं. मग देव कोठें.—१८ पं. "न" नाहीं.—१९ त. संचिताचें.—२० पं. आशे.

॥ ३ ॥

विचार करिती बैसोनि गौळणी । ज्या कृष्णकामिनी कामातुरा ॥ १ ॥
एकांत एकल्या एकी च सुखाच्या । आवडती त्यांच्या गोष्टी त्यांला ॥२॥
तर्कवितर्किणी दुराविल्या दुरी । मौन स्यो परिचारी आरंभिलें ॥ ३ ॥
कुशळा कवित्या कथित्या लोभिका । त्या ही येथें नका आह्मांपाशीं ॥ ४॥
बोलक्या वाचाळा कृष्णरता नाहीं । यां चोरोनि तींहीं खेट केली ॥ ५ ॥
भेऊनियां जना एकी सवा जाल्या । वाती विझविल्या दाटोबळें ॥ ६ ॥
कृष्णसुख नाहीं कळलें मानसीं । निंदिती त्या त्यासी कृष्णरता ॥ ७ ॥
तो नये जवळी देखोनि कोल्हाळ । ह्मणउनि समेळ मेळविला ॥ ८ ॥
अंतरीं कोमळा बाहेरी निर्मळा । तल्लीन त्या बाळा कृष्णध्यानीं ॥ ९॥
हरिरूपीं दृष्टि कानीं त्या च गोष्टी । आळंगिती कंठीं एका एकी ॥ १०॥
न साहे वियोग करिती रोदना । भ्रमिष्ट भावना देहाचिया ॥ ११ ॥
विसरल्या मागें गृह सुत पती । अवस्था याचिती गोविंदाची ॥ १२ ॥
अवस्था लागोनि निवळ चि ठेल्या । एका एकी जाल्या कृष्णरूपा ॥१३॥
कृष्णा ह्मणोनियां देती आलिंगन । विरहताप तेणें निवारेना ॥ १४ ॥
ताप कोण वारी गोविंदावांचूनि । साच तो नयनीं न देखतां ॥ १५ ॥
न देखतां त्यांचा प्राण रिघों पाहे । आजि कामास ये उसिर केला ॥१६॥
रित्या ज्ञानगोष्टी तयां नावडती । आळिंगण प्रीती कृष्णाचिया ॥ १७ ॥
मागें कांहीं आह्मी चुकलों त्यांची सेवा । असेल या देवा राग आला ॥१८॥
आठविती मागें पापपुण्यदोष । परिहार एकीस एक देती ॥ १९ ॥
अनुतापें जाल्या संतप्त त्या बाळा । टाकुनि विव्हळा धरणी अंग ॥ २० ॥

---

१ पं. एकाच्या सुखाच्या.—२ त. मौन्यें त्यापरि चोरी.—३ पं. त्या चोरोनियां.—४ पं. कृष्णरूप.—५ पं. कृष्ण.—६ पं. जाला.—७ त. याची.—८ पं. टाकिती वेल्हाळा.

जाणोनि चरित्र जवळी च होता । आली त्या अनंता कृपा मग ॥ २१ ॥
होउनी प्रगट दाखविलें रूप । तापत्रय ताप निववीले ॥ २२ ॥
निवालेया देखोनि कृष्णाचें श्रीमुख । शोक मोह दुःख दुरावला ॥ २३ ॥
साच भाव त्यांचा आणुनियां मना । आळंगितो राणा वैकुंठींचा ॥ २४ ॥
हरिअंगसंगें हरिरूप जाल्या । बोलीं विसरल्या तया सुखा ॥ २५ ॥
व्यभिचारभावें भोगिलें अनंता । वर्तोनि असतां घराचारी ॥ २६ ॥
सकळा चोरोनि हरि जयां चित्तीं । धन्य त्या नांदती तयामध्यें ॥ २७ ॥
उणें पुरें त्यांचें पडों नेंदी कांहीं । राखे सर्वां ठायीं देव तयां ॥ २८ ॥
न कळे लाघव ब्रह्मादिकां माव । भक्तिभावें देव केला तैसा ॥ २९ ॥
तुका ह्मणे त्यांचा धन्य व्यभिचार । साधिलें अपार निजसुख ॥ ३० ॥

बाळक्रीडा प्रारंभ अभंग—१००.

देवा आदिदेवा जगत्रयजीवा । परियेसीं केशवा विनंती माझी ॥ १ ॥
माझी वाणी तुझे वर्णीं गुण नाम । ऐसें देईं प्रेम कांहीं कळा ॥ २ ॥
कळा तुजपाशीं आमुचें जीवन । उचित करून देईं आह्मां ॥ ३ ॥
आह्मां शरणागतां तुझा चि आधार । तूं तव सागर कृपासिंधु ॥ ४ ॥
सिंधु पायवाट होय तुझ्या नामें । जोळीं महाकर्मे दुस्तरें तीं ॥ ५ ॥
तीं फळें उत्तमें तुझा निजध्यास । नाहीं गर्भवास सेविलिया ॥ ६ ॥
सेविलिया राम कृष्ण नारायण । नाहीं त्या बंधन संसाराचें ॥ ७ ॥
संसार तें काय तृणवतमय । अग्नि त्यासी खाय क्षणमात्रें ॥ ८ ॥
क्षणमात्रें जाळी दोषांचिया रासी । निंद्य उत्तमासी वंद्य करी ॥ ९ ॥

---

१ पं. 'या' नाहीं.—२ पं. सखे.—३ त. जनत्रयजीवा. दे. जगत्रया जीवा.—४ दे. ऐसी.—५ पं. जळतील कर्मे दुस्तर ते.—६ पं. ते फळ उत्तम. त. तीं फळें उत्तम.

करीं ब्रिदें[1] साच आपलीं आपण । पतितपावन दिनानाथ ॥ १० ॥
नाथ अनाथाचा पति[2] गोपिकांचा । पुरवी चित्तींचा मनोरथ ॥ ११ ॥
चित्तीं जें धरावें तुका ह्मणे दासीं । पुरविता होसी मनोरथ ॥ १२ ॥

॥ २ ॥

मनोरथ जैसे गोकुळींच्या जना । पुरवावी वासना तयापरी ॥ १ ॥
रिण फेडावया अवतार केला । अविनाश आला आकारासी ॥ २ ॥
सीण जाला वसुदेवदेवकीस । वधी बाळें[3] कंस दुराचारी ॥ ३ ॥
दुराचारियासी नाहीं भूतदया । आप पर तया पाप पुण्य ॥ ४ ॥
पुण्यकाळ त्याचा राहिलासे उभा । देवकीच्या गर्भा देव आले ॥ ५ ॥
गर्भासी तयांच्या आला नारायण । तुटलें[4] बंधन आपेंआप ॥ ६ ॥
आपेंआप बेडया तुटल्या शृंखळा[5] । बंदाच्या आगळा[6] किलिया कोंडे ॥ ७ ॥
कोंडमार[7] केला होता बहु दिस । सोडवी निमिष्य नलगता[8] ॥ ८ ॥
न कळे तो त्यासी सांगितला भाव । आपणासी ठाव नंदाघरीं ॥ ९ ॥
नंदाघरीं जातां येतां वसुदेवा । नाहीं जाला गोवा सर्वे देव ॥ १० ॥
सर्वे देव तया आड नये[9] कांहीं । तुका ह्मणे नाहीं भय चिंता ॥ ११ ॥

॥ ३ ॥

चिंता ते पळाली गोकुळाबाहेरी । प्रवेश भीतरी केला देवें ॥ १ ॥
देव आला घरा नंदाचिया गांवा । धन्य त्याच्या दैवा दैव आलें ॥ २ ॥
आलें अविनाश धरूनि आकार । दैत्याचा संहार करावया ॥ ३ ॥
करावया भक्तजनाचें पालण । आले रामकृष्ण गोकुळासी ॥ ४ ॥
गोकुळीं आनंद प्रगटलें सुख । निर्भर हे लोक घरोघरीं ॥ ५ ॥

---

१ पं. ब्रीद साच आपुलें.—२ त. गोपिकांचा पति.—३ त. पं. बाळ—४ पं. तुटलीं बंधनें.—५ दे. त. शंकळा.—६ पं. आर्गळा किल्येकोंडे.—७ त. बहुत दिवस.—८ पं. तया.—९ पं. ते.

घरोघरीं जाला लक्ष्मीचा[1] वास । दैन्यदारिद्रास[2] त्रास आला ॥ ६ ॥
आला नारायण तयांच्या अंतरा । दया क्षमा नरा नारीलोकां ॥ ७ ॥
लोकां गोकुळींच्या जालें ब्रह्मज्ञान । केलियावांचून जपतपें[3] ॥ ८ ॥
जपतपें काय करावीं साधनें । जंव[4] नारायणें कृपा केली ॥ ९ ॥
केलीं नारायणें आपुलीं अंकित । तो चि त्यांचें हित सर्व जाणे ॥ १० ॥
सर्व जाणे एक विष्णु साच खरा । आणीक दुसरा नाहींनाहीं ॥ ११ ॥
नाहीं भक्ता दुजें तिहीं त्रिभुवनीं । एका चक्रपाणिवांचूनियां ॥ १२ ॥
याच्या[5] सुखसंगें घेती गर्भवास । तुका ह्मणे आस त्यजूनियां ॥ १३ ॥

॥ ४ ॥

यांच्या[6] पूर्वपुण्या कोण लेखा करी । जिहीं तो मुरारी खेळविला ॥ १ ॥
खेळविला जिहीं अंतर्बाह्यसुखें । मेळवूनि मुखें चुंबन दिलें ॥ २ ॥
दिलें त्यांसी[7] सुख अंतरीचें देवें । जिहीं एका भावें जाणितला ॥ ३ ॥
जाणितला तिहीं कामातुर[8] नारी । कृष्णभोगावरी चित्त ज्यांचें ॥ ४ ॥
ज्यांचें कृष्णीं तन मन जालें रत । गृह[9] पति सुत विसरल्या ॥ ५ ॥
विष तयां जालें धन मान जन । वसविती वन एकांतीं[10] त्या ॥ ६ ॥
एकांतीं त्या जाती हरीसी घेउनि । भोगइच्छाधणी फेडावया ॥ ७ ॥
वयाच्या संपन्ना तैसा त्यांकारणें । अंतरींचा देणें इच्छाभोग ॥ ८ ॥
भोग त्याग नाहीं[11] दोन्ही जयापासीं । तुका ह्मणे जैसी स्फटिकशिळा ॥ ९ ॥

॥ ५ ॥

शिळा स्फटिकाची न पालटे भेदें[12] । दाउनियां छंदें[13] जैसी तैसी ॥ १ ॥

---

१ दे. लक्ष्मीचा.—२ दे. ०दाळिद्रास. पं. ०दारिद्र्यास .—३ त. जपतप.—४ पं. जे त्या.—५ पं. त्याच्या.—६ पं. त्यांच्या.—७ पं. सुख त्यांसी.—८ पं. कामातुरा.—९ दे. त. पं. ग्रह.—१० त. एकांत.—११ दोन्ही नाहीं. १२ पं. भेद—.१३ पं. छंद.

जैसा केला तैसा होय क्षणक्षणा । फेडावी वासना भक्तिभावें ॥ २ ॥
फेडावया आला अवघियांची धणी । गोपाळ गौळणी मायबापा ॥३॥
मायबापा सोडविलें बंदीहुनि । चाणूर मर्दुनी कंसादिक ॥ ४ ॥
दिक नाहीं देणें अरिमित्रा एक । पूतना कंटक मुक्त केली ॥ ५ ॥
मुक्त केला मामा कंस महादोषी । बाळहत्या रासी पातकांच्या ॥६॥
पाप कोठें राहे हरी आठवितां । भक्ती द्वेषें चिंता जैसा तैसा ॥ ७ ॥
साक्षी तयापाशीं पूर्वीलकर्माच्या । बांधला सेवेच्या ऋणें[1] देव ॥ ८ ॥
देव भोळा धांवे भक्ता पाठोवाठी । उच्चारितां कंठीं मार्गेमार्गें ॥ ९ ॥
मानाचा कंटाळा तुका ह्मणे त्यासी । धांवे[2] तो घरासी भाविकांच्या ॥ १० ॥

॥ ६ ॥

चारी वेद ज्याची कीर्ती वाखाणिती । बांधवी तो हातीं गौळणीच्या ॥१॥
गौळणिया गळा बांधिती धारणीं । पायां चक्रपाणी लागे तया ॥ २ ॥
तयाघरीं रिघे चोरावया लोणी । रितें पाळतूनि शिरे माजी ॥ ३ ॥
माजी शिरोनियां नवनीत खाये । कवाड तें आहे जैसें तैसें ॥ ४ ॥
जैसा तैसा आहे अंतर्बाह्यात्कारीं । ह्मणउनि चोरी नसंपडे ॥ ५ ॥
नसंपडे तयां करितां खटपट । वाउगे बोभाट वर्माविण ॥ ६ ॥
वर्म जाणती त्या एकल्या एकटा । बैसतील वाटा निरोधूनि ॥ ७ ॥
निवांत राहिल्या निःसंग होऊनि । निश्चळ ज्या[3] ध्यानीं कृष्णध्यान[4] ॥ ८ ॥
न ये क्षणभरी योगियांचे ध्यानीं । धरिती गौळणी भाविका त्या ॥९॥
भाविका तयांसी येतो काकुलती । शाहाण्या मरती नसंपडे ॥ १० ॥
नलगे वेचावी टोली[5] धनानांवें । तुका ह्मणे भावें चाड एका ॥११॥

---

१ दे. रुणी. त. पं. रुणें.—२ त. पं. धांवतो.—३ पं. त्या ध्यानीं.—४ त. कृष्णध्यानें.—५ दे. टोळी.

॥ ७ ॥

चाड अनन्याची धरी नारायण । आपणासमान करी रंका ॥ १ ॥
रंक होती राजे यमाचिये घरीं । आचरणें बरीं नाहीं ह्मणे[1] ॥ २ ॥
नसंपडे इंद्रचंद्रब्रह्मादिकां । अभिमानें[2] एका तिळमात्रें ॥ ३ ॥
तिळमात्र जरी होय अभिमान । मेरु तो समान भार देवा ॥ ४ ॥
भार पृथिवीचा वाहिला सकळ । जड होती खळ दुष्ट लोक ॥ ५ ॥
दुष्ट अभक्त जे निष्ठुर मानसीं । केली हे तयांसी यमपुरी ॥ ६ ॥
यमदूत[3] त्यांसी करिती यातना । नाहीं नारायणा भजिजेलें[4] ॥ ७ ॥
जे नाहीं[5] भजले एका भावें हरी । तयां दंड करी यमधर्म ॥ ८ ॥
यमधर्म ह्मणे तयां दोषियांसी । कां रे केशवासी चुकलेती ॥ ९ ॥
चुकलेती कथा पुराणश्रवण । होते तुह्मां कान डोळे मुख ॥ १० ॥
कान डोळे मुख संतांची संगति । न धरा च चित्तीं सांगितलें ॥ ११ ॥
सांगितलें संतीं तुह्मां उगवूनि । गर्भासी[6] येऊनि यमदंड ॥ १२ ॥
दंडू आह्मीं रागें ह्मणे यमधर्म । देवा होय श्रम दुर्जनाचा ॥ १३ ॥
दुर्जनाचा येणें[7] करूनि संहार । पूर्णअवतार रामकृष्ण ॥ १४ ॥
रामकृष्णनामें रंगले जे नर । तुका ह्मणे घर वैकुंठीं त्यां ॥ १५ ॥

॥ ८ ॥

वैकुंठींच्या लोकां दुर्लभ हरिजन । तया नारायण समागमें ॥ १ ॥
समागम त्यांचा धरिला अनंतें । जिहीं चित्तवित्त समर्पिलें ॥ २ ॥
समर्थ[10] तीं गाती हरीचे पवाडे । येर ते बापुडे रावराणे ॥ ३ ॥

---

१ दे. ह्मणवोनि. पं. ह्मणोनी.—२ पं. अभिमान.—३ त. यमपुरी.—४ त. जे भजले. पं. भजले जे.—५ पं. नाहीं जे.—६ त. गर्भाद. दे. 'गर्भाद' असतां 'गर्भासी' केलें आहे.—७ दे. याणें.—८ त. जीं त्या.—९ त. चित्तवित्तें.—१० पं. समर्थ वे.

रामकृष्णें केलें कौतुक[1] गोकुळीं । गोपाळांचे मेळीं गाई चारी ॥ ४॥
गाई चारी मोहोरी पांवा वाहे[2] पाठीं । धन्य जाळी[3] काठी कांबळी[4] ते ॥ ५ ॥
काय गौळियांच्या होत्या पुण्यरासी । आणीक त्या ह्मैसी गाई पशु ॥ ६ ॥
सुख तें अमुप लुटिलें सकळीं । गोपिका[5] गोपाळीं धणीवरि ॥ ७ ॥
धणीवरि त्यांसी सांगितली मात । जयांचें[6] जें आर्त तयापरी ॥ ८ ॥
परी यांचें[7] तुह्मी आइका नवल । दुर्गम जो खोल साधनासि ॥ ९ ॥
शिक लावूनियां घालिती बाहेरी । पाहाती भीतरी सर्वें चि तो ॥ १०॥
तोंडाकडे त्यांच्या पाहे कवतुकें । शिव्या देतां सुखें हांसतसे ॥ ११ ॥
हांसतसे शिव्या देतां त्या गौळणी । मरतां[8] जपध्यानीं न बोले तो ॥ १२ ॥
तो जेंजें करिल तें दिसे उत्तम । तुका ह्मणे वर्म[9] दावी सोपें ॥ १३ ॥

॥ ९ ॥

दावी वर्म सोपें भाविकां गोपाळां । वाहे त्यांच्या गळां पाले माळा ॥ १ ॥
मान देती आधीं मागतील[10] डाव । देवा तें[11] गौरव माने सुख ॥ २ ॥
मानती ते मंत्र हमामा हुंबरी । सिंतोडिती वरि स्नान तेणें ॥ ३ ॥
वस्त्रें घोंगडिया घालुनियां तळीं । वरि वनमाळी बैसविती ॥ ४ ॥
तिहीं लोकांसी जो दुर्लभ चिंतना । तो धांवे गोधना वळतियां ॥ ५ ॥
यांच्या[12] वचनाचीं पुष्पें वाहे शिरीं । नैवेद्य त्यांकरीं कवळ मागे ॥ ६ ॥
त्यांचिये मुखींचें हिरोनियां घ्यावें । उच्छिष्ट तें खावें धणीवरी ॥ ७ ॥
वरी माथां गुंफे मोरपिसांवेटी[13] । नाचे टाळी पिटी त्यांच्या छंदें ॥८॥
छंदें नाचतील जयासवें हरी । देहभाव वरी विसरलीं ॥ ९ ॥

---

१ त. चरित्र.—२ त. वाये.—३ त. जाले.—४ त 'कांवळीचे' दे. 'कांवळीचें' असतां 'कांबळीतें' केलें आहे.—५ दे. 'गोपिका गोपाळीं' असतां 'गोपिका गौळणी' केलें आहे.—६ पं. ज्याचें जैसें आर्त०.—७ दे. याचि. त. यांचो.—८ दे. त. हासतुसे.—९ पं. वर्म दावी.—१० पं. भागती ते डाव.—११ पं. तो.—१२ पं. त्यांच्या.—१३ त. मोरविसांवेटीं.

विसरली वरी देहाची भावना । ते चि नारायणा सर्वपूजा ॥ १० ॥
पूजा भाविकांची न कळतां[1] घ्यावी । न मागतां दावी निज ठाव ॥ ११ ॥
ठाव पावावया[2] हिंडे मागें मागें । तुका ह्मणे संगें भक्तांचियां ॥ १२ ॥

॥ १० ॥

भक्तजनां दिलें निजसुख देवें । गोपिका त्या भावें आळंगिल्या ॥ १ ॥
आळंगिल्या गोपी गुणवंता नारी । त्यांच्या जन्मांतरीं हरि ऋणी ॥ २ ॥
रुसलिया त्यांचें करी समाधान । करविता आण[3] क्रिया करी ॥ ३ ॥
क्रिया करी तुह्मां न वजे पासुनि । अवघियाजणी गोपिकांसी ॥ ४ ॥
गोपिकांसी ह्मणे वैकुंठींचा पति । तुह्मीं माझ्या चित्तीं सर्वभावें ॥ ५ ॥
भाव जैसा माझ्याठायीं[4] तुह्मी धरा । तैसा चि मी खरा तुह्मांलागीं ॥ ६ ॥
तुह्मां[5] कळों द्या हा माझा साच भाव । तुमचा चि जीव तुह्मां ग्वाही ॥ ७ ॥
ग्वाही तुह्मां आह्मां असे नारायण । आपली च आण वाहातसे ॥ ८ ॥
सत्य बोले देव भक्तिभाव जैसा । अनुभवें[6] रसा आणूनियां ॥ ९ ॥
यांसी बुझावितो वेगळाल्या भावें । एकीचें हें[7] ठावें नाहीं एकी ॥ १० ॥
एकी क्रिया नाहीं आवघियांचा भाव । पृथक हा देव घेतो[8] तैसें ॥ ११ ॥
तैसें कळों नेदी जो मी कोठें नाहीं । अवघियांचे ठायीं जैसा तैसा ॥ १२ ॥
जैसा मनोरथ जये चित्तीं काम । तैसा मेघश्याम[9] पुरवितो ॥ १३ ॥
पुरविले मनोरथ गोपिकांचे । आणीक लोकांचे गोकुळींच्या ॥ १४ ॥
गोकुळींच्या लोकां लावियेला छंद । बैसला गोविंद त्यांचे[10] चित्तीं १५ ॥
चित्तें[11] ही चोरूनि घेतलीं सकळा । आवडी गोपाळांवरी तयां ॥ १६ ॥

---

१ पं. कळत.—२ पं. पाहावया.—३ पं. आपण.—४ पं. तुह्मी माझांठायीं.—५ पं. तुह्मांसी कळों द्या माझा०.—६ पं. अनुभव.—७ पं. तें.—८ पं. देतो.—९ दे. तं. ०शाम.—१० दे. त्याचा.—११ पं. चित्त चोरुनियां घेतलें०.

आवडे[1] तयांसी वैकुंठनायक । गेलीं सकळिक विसरोनि ॥ १७ ॥
निंदा स्तुती कोणी न करी कोणाची । नाहीं या देहाची शुद्धि कोणा ॥ १८ ॥
कोणासी नाठवे कन्या पुत्र माया । देव ह्मणुनि[2] तया चुंबन देती ॥ १९ ॥
देती[3] या टाकून भ्रतारांसी घरीं । लाज ते[4] अंतरीं आथी च ना ॥ २० ॥
नाहीं कोणा[5] धाक कोणासी कोणाचा । तुका ह्मणे वाचा काया मनें ॥ २१ ॥

॥ ११ ॥

मनें हरिरूपीं गुंतल्या वासना । उदास या[6] सुना गौळियांच्या ॥ १ ॥
यांच्या[7] भ्रतारांचीं धरूनियां रूपें । त्यांच्या घरीं त्यांपें भोग करी ॥ २ ॥
करी कवतुक त्याचे तयापरी । एकां दिसे हरि एकां लेंक ॥ ३ ॥
एक भाव नाहीं सकळांच्या चित्तीं । ह्मणऊनि प्रीति तैसें रूप ॥ ४ ॥
रूप याचें आहे अवघें चि एक । परि कवतुक दाखविलें ॥ ५ ॥
लेंकरूं न कळे स्थूल कीं लहान । खेळे नारायण कवतुकें ॥ ६ ॥
कवतुक केलें सोंग बहुरूप । तुका ह्मणे बाप जगाचा हा ॥ ७ ॥

॥ १२ ॥

जगाचा हा बाप दाखविलें माये । माती खातां जाये मारावया ॥ १ ॥
मारावया तिणें उगारिली काठी । भुवनें त्या पोटीं चौदा देखे ॥ २ ॥
देखे भयानक झांकियेले डोळे । मागुता तो खेळे तियेपुढें[8] ॥ ३ ॥
पुढें रिघोनियां घाली[9] गळां कव । कळों नेदी मात्र मायावंता ॥ ४ ॥
मायावंत विश्वरूप[10] काय जाणे । माझें माझें ह्मणे बाळ देवा ॥ ५ ॥
बाळपणीं रीठा रगडिला दाढे । मारियेले गाढे कागबग ॥ ६ ॥

---

१ पं. तयासी आवडे.—२ त. ह्मूण. पं. ह्मणूनियां चुं०.—३ पं. देती टाकोनियां.—४ पं. त्या.— ५ पं. धाक कोणा.—६ पं. त्या.—७ पं. त्यांच्या.—८ त. माये०. दे. तये०.—९ पं. गळां घाली.—१० पं. हरिरूप.

गळां बांधऊनि उखळासी दावें । उन्मळी त्या भावें विमळार्जुन ॥ ७ ॥
न कळे जुनाट जगाचा जीवन । घातलें मोहन गौळियांसी ॥ ८ ॥
सिंकीं उतरूनि खाय नवनीत । न कळे बहुत होय तरी ॥ ९ ॥
तरीं दुधें[1] डेरे भरले रांजण । खाय ते भरून दावी दुणी ॥ १० ॥
दुणी जालें त्याचा मानिती संतोष । दुभत्याची आस धरूनियां ॥ ११ ॥
आशाबद्धा देव असोनि जवळी । नेणती ते काळीं स्वार्थामुळें ॥ १२ ॥
मुळें[2] याच देव न कळे तयांसी । चित्त आशापाशीं गोवियेलें ॥ १३ ॥
लेंकरूं आमचें ह्मणे दसवंतीं । नंदाचिये चित्तीं तो चि भाव ॥ १४ ॥
भाव जाणावया[3] चरित्र दाखवी । घुसळितां रवी डेरियांत ॥ १५ ॥
डेरियांत लोणी खादलें रिघोनि । पाहे तों जननी[4] हातीं लागे ॥ १६ ॥
हातीं धरूनियां काढिला[5] बाहेरी । देखोनियां करी चोज त्यासी ॥ १७ ॥
सिकवी विचार नेणे त्याची गती । होता कोणे रीती डेरियांत ॥ १८ ॥
यांसी पुत्रलोभें न कळे हा भाव । कळों नेदी माव देव त्यांसी ॥ १९ ॥
त्यांसी मायामोहजाळ घाली फांसें[6] । देव आपणास[7] कळों नेदी ॥ २० ॥
नेदी भावें राहों[8] लोभिकांचे चित्तीं । जाणतां चि होती अंधळीं तीं ॥ २१ ॥
अंधळीं तीं तुका ह्मणे संवसारीं[9] । जिहीं नाहीं हरि ओळखिला ॥ २२ ॥

॥ १३ ॥

ओळखी तयांसी[10] होय एका भावें । दुसरिया देवें न पविजे ॥ १ ॥
न पविजे कदा उन्मत्त जालिया । डंबु[11] तो चि वांयां नागवण ॥ २ ॥
वनवास देवाकारणें एकांत । करावीं हीं व्रततपें[12] याग ॥ ३ ॥

---

१ दे. दुधडेरे.—२ पं. मुळयाचा. दे. 'मुळें याच' असतां 'मुळें याचा' केलें आहे.—३ पं. दावावया.—४ पं. गौळणी.—५ पं. काढिती.—६ पं. फासा.—७ पं. आपणसा.—८ दे. राहों भाव.—९ पं. संसारीं.—१० पं. तयाची.—११ पं. दंभ.—१२ त. वृतें तपें.

व्रत याग यांसी फळलीं[1] बहुतें । होतीं या संचितें गौळियांचीं ॥४॥
यांसी देवें तारियेलें न कळतां । मागील अनंता ठावें होतें ॥ ५ ॥
होतें तें द्यावया आला नारायण । मायबापां रीण गौळियांचें ॥ ६ ॥
गौळियांचें सुख दुर्लभ आणिकां । नाहीं ब्रह्मादिकां तुका ह्मणे ॥७॥

॥ १४ ॥

नेणतियांसाटीं नेणता लाहान । थिंकोनी भोजन मागे माये ॥ १ ॥
माया दोनी यास बाप नारायणा । सारखीं[2] भावना तयांवरी ॥ २ ॥
तयांवरी त्याचा समचित्त भाव । देवकीवसुदेव नंद दोघे ॥ ३ ॥
घेउनियां एके ठायीं अवतार । एकीं केला थोर वाढवूनि ॥ ४ ॥
उणा पुरा यासी नाहीं कोणी ठाव । सारिखा चि देव अवघियांसी ॥५॥
यासी दोनी ठाव सारिखे अनंता । आंधीलि मागुता वाढला तो ॥ ६ ॥
वाढला तो सेवाभक्तिचिया गुणें । उपचारमिष्टान्नें करूनियां ७ ॥
करूनि[3] सायास मेळविलें धन । तें ही कृष्णार्पण केलें तीहीं ॥ ८ ॥
कृष्णासी सकळ गाई घोडे ह्मैसी । समर्पिल्या दासीं जीवें भावें[4] ॥९॥
जीवें भावें त्याची करितील सेवा । न विसंबती नांवा क्षणभरी ॥ १० ॥
क्षणभरी होतां वेगळा[5] तयांसं[6] । होती कासावीस प्राण त्यांचे ॥ ११ ॥
त्यांचे ध्यानीं मनीं सर्वभावें हरि । देह काम करी चित्त त्यापें ॥ १२ ॥
त्याचें चि चिंतन कृष्ण कोठें गेला । कृष्ण हा जेविला नाहीं कृष्ण ॥१३॥
कृष्ण आला घरा कृष्ण गेला दारा । कृष्ण हा सोयिरा[7] भेटों कृष्णा ॥१४॥
कृष्ण गातां ओंव्या दळणीं कांडणीं । कृष्ण हा भोजनीं पाचारिती ॥१५॥
कृष्ण तयां ध्यानीं आसनीं शयनीं । कृष्ण देखे स्वप्नीं कृष्णरूप ॥ १६ ॥
कृष्ण त्यांस दिसे आभास दुश्चितां । धन्य मातापिता तुका ह्मणे ॥ १७ ॥

---

१ दे. त. कळलीं.—२ पं. सारिख्या.—३ दे. त. करोनियां.—४ दे. भाव.—५ त. वेगळे.—६ पं. तयासी । होती कासाविसी०.—७ पं. सोयरा.—८ पं. कोण.

॥ १५ ॥

कृष्ण हा परिचारी कृष्ण हा वेव्हारी । कृष्ण घ्या वो नारी आणिकी[1] ह्मणे ॥ १ ॥
ह्मणे कृष्णाविण कैसें[2] तुह्मां गमे । विळ हा करमे वांयांविण ॥ २ ॥
वांयांविण तुह्मीं पिटितां[3] चावडी । घ्या गे जगजेठी क्षणभरी ॥ ३ ॥
क्षणभरी याच्या सुखाचा सोहळा । पाहा एकवेळा घेऊनियां ॥ ४ ॥
याचें सुख तुह्मां कळलियावरि । मग दारोदारीं न फिराल ॥ ५ ॥
लटिकें हें तुह्मां वाटेल खेळणें । एका कृष्णाविणें आवघें चि ॥ ६ ॥
अवघ्यांचा तुह्मीं टाकाल संगात । घेऊनि अनंत जाल राना ॥ ७ ॥
नावडे तुह्मांस आणिक बोलिलें । मग हें लागलें हरिध्यान[4] ॥ ८ ॥
न करा हा मग या जीवा वेगळा । टोंकवाल[5] बाळा आणिका ही ॥ ९ ॥
आणिका ही तुह्मा येती काकुलती । जवळी इच्छिती क्षण बैसों ॥ १० ॥
बैसों चला पाहों गोपाळाचें मुख । एकी एक सुख सांगतील ॥ ११ ॥
सांगे जंव ऐसी माता[6] दसवंती । तंव त्या धरिती चित्तीं बाळा ॥ १२ ॥
बाळा एकी घरा घेउनियां जाती । नाहीं त्या परती तुका ह्मणे ॥ १३ ॥

॥ १६ ॥

तुका ह्मणे पुन्हा न येती मागुत्या । कृष्णासीं खेळतां दिवस गमे ॥ १ ॥
दिवस राती कांहीं नाठवे तयांसी । पाहातां मुखासी कृष्णाचिया ॥ २ ॥
याच्या मुखें नये डोळयासी वीट । राहिले हे नीट ताटस्त[8] चि ॥ ३ ॥
ताटस्थ राहिलें सकळ शरीर । इंद्रियें व्यापार विसरलीं[9] ॥ ४ ॥
विसरल्या तान भुक घर दार । नाहीं हा विचार असों[10] कोठें ॥ ५ ॥

---

१ पं. आणिका.—२ पं. तुह्मां कैसें.—३ त. पीटीत्या. दे. पिटीत्या चाकटी.—४ पं. कृष्णध्यान.—५ पं. आणीक ही.—६ पं. माता.—७ दे. धरिती चित्तीं बाळा ।. त. तंव धरी चि ती चित्तीं बाळा.—८ दे. त. ताटस्थ चि.—९ पं. विसरली.—१० दे. त. आहों.

कोठें असों कोण जाला वेळ[1] काळ । नाठवे सकळ विसरल्या ॥ ६ ॥
विसरल्या आह्मीं कोणीये जातीच्या । वर्णा ही चहूंच्या एक जाल्या ॥ ७ ॥
एक[2] जाल्या तेव्हां कृष्णाचिया सुखें । निःशंकें[3] भातुकें खेळतील ॥ ८ ॥
खेळती भातुकें कृष्णाच्या[4] सहित । नाहीं आशंकित चित्त त्यांचें ॥ ९ ॥
चित्तीं तो गोविंद लटिकें दळण । करिती[5] हें जन करी[6] तैसें ॥ १० ॥
जन करी तैसा खेळतील खेळ । अवघा गोपाळ करूनियां ॥ ११ ॥
करिती[7] आपला आवघा गोविंद । जना साच फंद लटिका त्या[8] ॥ १२ ॥
त्याणीं केला हरि सासुरें माहेर । बंधु हे कुमर दीर भावें ॥ १३ ॥
भावना राहिली एकाचिये ठायीं । तुका ह्मणे पायीं गोविंदाचे ॥ १४ ॥

॥ १७ ॥

गोविंद भ्रतार गोविंद मुळहारी । नामें भेद परि एक चि तो ॥ १ ॥
एकाचीं च नामें ठेवियेलीं दोनी । कल्पितील[9] मनीं यावें जावें ॥ २ ॥
जावें यावें तिहीं घरींचिया घरीं । तेथिची सिदोरी तेथें न्यावी ॥ ३ ॥
विचारितां दिसे येणें जाणें खोटें । दाविती गोमटें लोका ऐसें ॥ ४ ॥
लोक करूनियां साच वर्तताती[10] । तैशा त्या खेळती लटिक्याची ॥ ५ ॥
लटिकीं करिती मंगळदायकें । लटिकीं च एकें एकां व्याही ॥ ६ ॥
व्याही भाई हरि सोयरा[11] जावायी । अवधियांच्या[12] ठायीं केला एक ॥ ७ ॥
एकासि च पावे जें कांहीं करिती । उपचार संपत्ति नाना भोग ॥ ८ ॥
भोग देती सर्व एका नारायणा । लटिक्या भावना व्याही भाई ॥ ९ ॥
लटिका च त्यांणीं केला संवसार । जाणती साचार वेगळा[13] त्या ॥ १० ॥

---

१ त. वेळाकाळ.—२ त. एकी.—३ तं, निःशंख.—४ त. कृष्णा त्या सहित.—५ त. करीती हीं जन.—६ त. करिती.—७ त. करूनि.—८ त. त्यां.—९ त. कळविती.—१० त. वरततो.—११ त. सोइरा.—१२ पं. अवधीयाठाईं.—१३ त. वेगळे त्या.

त्यांणीं मृत्तिकेचें करूनि अवघें । खेळतील दोघें पुरुषनारी ॥ ११ ॥
पुरुषनारी त्यांणीं ठेवियेलीं नावें । कवतुकभावें विचरती ॥ १२ ॥
विचरती जैसे साच भावें लोक । तैसें नाहीं सुख खेळतीया[1] ॥ १३ ॥
यांणीं जाणितलें आपआपणयां । लटिकें हें वांयां खेळतों तें[2] ॥ १४ ॥
खेळतों ते आह्मी नव्हों[3] नारीनर । ह्मणोनि विकार नाहीं तयां ॥ १५ ॥
तयां ठावें आहे आह्मी अवघीं[4] एक । ह्मणोनि निःशंक खेळतील ॥ १६ ॥
तयां ठावें नाहीं हरिचिया गुणें । आह्मी कोणकोणें काय खेळों ॥ १७ ॥
काय खातों आह्मी कासया सांगातें । कैसें हें लागतें नेणों मुखीं ॥ १८ ॥
मुखीं चवी नाहीं वरी अंगीं लाज । वर्ण[5] याती काज न धरिती ॥ १९ ॥
न[6] धरिती कांहीं संकोच त्या मना । हांसतां याजना नाइकती ॥ २० ॥
नाइकती बोल आणिकांचे कानीं । हरि चित्तीं[7] मनीं बैसलासे ॥ २१ ॥
बैसलासे हरि जयांचिये चित्तीं । तयां नावडती मायबापें ॥ २२ ॥
मायबापें त्यांचीं नेती पाचारूनि । बळें परि मनीं हरि वसे ॥ २३ ॥
वसतील बाळा आपलाले घरीं । ध्यान त्या अंतरीं गोविंदाचें ॥ २४ ॥
गोविंदाचें ध्यान निजलिया जाग्या । आणीक वाउग्या न बोलती ॥ २५ ॥
न बोलती निजलिया हरिविण । जागृति[8] सपन एक जालें ॥ २६ ॥
एकविध सुख घेती नित्य[9] बाळा । भ्रमर परिमळालागीं तैसा[10] ॥ २७ ॥
तैसा त्यांचा[11] भाव घेतला त्यांपरी । तुका ह्मणे हरि बाळलीला ॥ २८ ॥

॥ १८ ॥

लीलाविग्रही तो लेववी खावावी । यशोदा[12] बैसवी मांडीवरी ॥ १ ॥

---

१ पं. खेळतिल्या.—२ पं. तो.—३ पं. न हों.—४ पं. अवघे.—५ दे. वरणा०.—६ दे. त. धरितील.—७ पं. ध्यानीं.—८ पं. जागृती हे स्वप्न.—९ पं. नित्या—१० दे. तैशा. पं. जैसा.—११ पं. त्या भाव घेतील.—१२ त. एश्वदा.

मांडीवरी भार पुष्पाचिये परी । बैसोनियां करी स्तनपान ॥ २ ॥
नभाचा ही साक्षी पाताळापरता । कुर्वाळिते माता हातें त्यासि ॥ ३ ॥
हातें कुर्वाळुनी मुखीं घाली घांस । पुरे ह्मणे तीस, पोंट धालें ॥ ४ ॥
पोंट धालें मग देतसे ढेंकर । भक्तीचें तें फार तुळसीदळ ॥ ५ ॥
तुळसीदळ भावें सहित देवापाणी । फार तें[1] त्याहुनि क्षीरसागरा[2] ॥ ६ ॥
क्षीराचा कांटाळा असे एकवेळ । भक्तीचें तें जळ गोड देवा ॥ ७ ॥
देवा भक्त जिवाहुनि आवडती । सकळ हि प्रीति त्यांच्याठायीं ॥ ८ ॥
त्यांचा[3] हा अंकित सर्व भावें हरि । तुका ह्मणे करी सर्व काज ॥ ९ ॥

॥ १९ ॥

जयेवेळीं[4] चोरूनियां नेलीं वत्सें । तेव्हालागीं तैसें होणें लागे ॥ १ ॥
लागे दोहीं ठायीं करावें पाळण । जगाचा जीवन मायबाप ॥ २ ॥
माय जाल्यावरी[5] अवघ्या वत्सांची । घरीं वत्सें जीचीं तैसा जाला ॥ ३ ॥
जाला तैसा[6] जैसे घरींचे गोपाळ । आणिक सकळ मोहरी पांवे ॥ ४ ॥
मोहरी पांवे सिंगें वाहिल्या काहाळा । देखिला सोहाळा ब्रह्मादिकीं ॥ ५ ॥
ब्रह्मांदिकां सुख स्वपनीं ही नाहीं । तैसें दोहीं ठायीं वोसंडलें ॥ ६ ॥
वोसंडल्या क्षीर अमुप त्या गायी । जैसी ज्याची आई तैसा जाला ॥ ७ ॥
लाघव कळलें ब्रह्मयासी[7] याचें । परब्रह्म साचें अवतरलें ॥ ८ ॥
तरले हे जन सकळ ही आतां । ऐसें तो विधाता बोलियेला ॥ ९ ॥
लागला हे स्तुती करूं अनंताची । चतुर्मुख वाची भक्ती स्तोत्रें ॥ १० ॥
भक्तिकाजें[8] देवें केला अवतार । पृथ्वीचा भार फेडावया ॥ ११ ॥

---

१ दे. त. "तें" नाहीं.—२ पं. त. क्षीरसागर.—३ त. तयाचा अंकित. दे. त्यांचा अंकित.—४ पं. जिये.—५ पं. त. जाला वरि.—६ पं. जैसातसा.—७ पं. ब्रह्मादिका.—८ पं. भक्तिकाजा.

पृथिवी दाटीली होती या असुरीं । नासाहावे वरी भार तेये ॥ १२ ॥
तया काकुलती[1] आपल्या दासांची । तयालागीं वेची सर्वस्व ही ॥ १३ ॥
स्वहित दासांचें करावयालागीं । अव्यक्त हें[2] जगीं व्यक्ती आलें ॥ १४ ॥
लेखा कोण करी त्यांचियां[3] पुण्याचा । जयांसवें वाचा बोले हरी ॥ १५ ॥
हरी नाममात्रें पातकांच्या रासी । तो आला घरासि गौळियांच्या ॥ १६ ॥
गौळियें अवघीं जालीं कृष्णमय । नामें लोकत्रय तरतील ॥ १७ ॥
तरतील नामें कृष्णाचिया दोषी । बहुत ज्यांपाशीं होइल पाप ॥ १८ ॥
पाप ऐसें नाहीं कृष्णनामें राहे । धन्य तो चि पाहे कृष्णमुख ॥ १९ ॥
मुख माझें काय जो[4] मी वर्णूं पार । मग नमस्कार घाली ब्रह्मा ॥ २० ॥
ब्रह्मा नमस्कार घाली गोधनासी । कळला तयासि हा चि देव ॥ २१ ॥
देव चि अवघा जालासे सकळ । गाई हा गोपाळ वत्सें तेथें ॥ २२ ॥
तेथें पाहाणें[5] जें आणीक दुसरें । मूर्ख[6] त्या अंतरें दुजा नाहीं ॥ २३ ॥
दुजा भाव तुका ह्मणे जया चित्तीं । रवरव भोगिती कुंभपाक ॥ २४ ॥

॥ २० ॥

कुंभपाक लागे तयासि भोगणें । अवघा चि नेणे देव ऐसा ॥ १ ॥
देव ऐसा ठावा नाहीं जया जना । तयासि यातना यम करी ॥ २ ॥
कळला हा देव तया[7] साच खरा । गाई वत्सें[8] घरा धाडी ब्रह्मा ॥ ३ ॥
ब्रह्मादिकां ऐसा[9] देव अगोचर । कैसा त्याचा पार जाणवेल ॥ ४ ॥
जाणवेल देव गौळियांच्या भावें । तुका ह्मणे व्हावें[10] संचित हें ॥ ५ ॥

---

१ पं. तया.—२ पं. ही.—३ त. दे. यांचिया.—४ पं. जें मी वर्णूं पामर ।.—५ पं. जें पाहाणें.—६ पं. मूर्ख तो चि खरें नाहीं, दुजा.—७ पं. तयासीच खरा ।.—८ पं. वत्स.—९ पं. देव ऐसा.—१० दे. सेवे.

॥ २१ ॥

संचित उत्तम भूमि कसूनियां । जाऊं नेणे[1] वांयां परि त्याचें ॥ १ ॥
त्याचिया पिकासि आलिया घुमरी । आल्या गाईत्तरीं आणिक गाई ॥ २ ॥
गाई दवडुनि घालिती[2] बाहेरी । तंव ह्मणे हरि बांधा त्यां[3] ही ॥ ३ ॥
त्याही तुह्मी[4] बांधा तुमच्या सारिख्या । भोवंडा पारिख्या वाडयांतुनि ॥ ४ ॥
पारिख्या न येती कोणांचिया[5] घरा । सूत्रधारी खरा नारायण ॥ ५ ॥
नारायण नांदे जयाचिये ठायीं । सहज तेथें नाहीं घालमेली ॥ ६ ॥
मेलीं हीं शाहाणीं करितां सायास । नाहीं सुखलेश तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ २२ ॥

तुका ह्मणे सुख घेतलें गोपाळीं । नाचती कांबळीं करूनि ध्वजा ॥ १ ॥
करूनियां टिरी आपुल्या[6] मांदळ । वाजविती टाळ दगडाचे ॥ २ ॥
दगडाचे टाळ कोण त्यांचा नाद । गीतें[7] गातां छंद ताल नाहीं[8] ॥ ३ ॥
ताल नाहीं गातां नाचतां गोपाळां । घननीळ सावळा तयामध्यें[9] ॥ ४ ॥
मध्यें[10] जयां हरि तें सुख आगळें । देहभाव काळें नाहीं तयां ॥ ५ ॥
तयांसि आळंगी आपुलिया करीं । जाती भूमीवरी लोटांगणीं ॥ ६ ॥
निजभाव देखे जयांचिये अंगीं । तुका ह्मणे संगीं क्रीडे तयां ॥ ७ ॥

॥ २३ ॥

तयांसवें करी काला दहींभात । सिदोऱ्या अनंत मेळवुनी ॥ १ ॥
मेळवुनी अवघियांचे एके ठायीं । मागें पुढें कांहीं उरों नेदी ॥ २ ॥
नेदी चोरी करूं जाणे[11] अंतरींचें । आपलें ही साचें द्यावें तेथें ॥ ३ ॥

---

१ पं. नये.—२ त. घालितील दुरी.—३ पं. त्यासी ।—४ पं. बांधा तुह्मी.—५ पं. आणिकाच्या.—६ पं. आपले.—७ पं. गीतें.—८ दे. त. नाहीं ताळ.—९ त. दे. मधीं.—१० त. दे. मधीं.—११ त. जाणे त्या अंतरीचें.

द्यावा दहींभात आपले प्रकार । तयांचा वेव्हार सांडवावा ॥ ४ ॥
वांटी सकळांसि हातें आपुलिया । जैसें मागे तया तैसें द्यावें ॥ ५ ॥
द्यावें सांभाळुनी सम तुकभावें । आपण हि खावें त्यांचें तुकें ॥ ६ ॥
तुक सकळांचें गोविंदाचे हातीं । कोण कोणे गति भला बुरा ॥ ७ ॥
राखे त्यासि तैसें आपलाल्या भावें । विचारुनि द्यावें जैसें तैसें ॥ ८ ॥
तैसें सुख नाहीं वैकुंठींच्या लोकां । तें दिलें भाविकां गोपाळांसि ॥ ९ ॥
गोपाळांचे मुखीं देउनी कवळ । घांस माखे लाळ खाय त्यांची ॥ १० ॥
त्यांचिये मुखींचे काढूनियां घांस । झोंबतां हातांस खाय बळें ॥ ११ ॥
बळें जयाचिया ठेंगणें सकळ । तयातें गोपाळ पाडितील ॥ १२ ॥
पाठी उचलूनि वाहातील खांदीं । नाचतील मांदीं मेळवुनी ॥ १३ ॥
मांदीं मेळवुनी धणी दिली आह्मां । तुका ह्मणे जमा केल्या गाई ॥ १४ ॥

॥ २४ ॥

केला पुढें हरि अस्तमाना दिसा । मागें त्यासरिसा थाट चाले ॥ १ ॥
थाट चाले गाई गोपाळांची धूम । पुढें कृष्ण राम तयां सोयी ॥ २ ॥
सोयी लागलिया तयांची अनंतीं । न बोलावितां येती मागें तया ॥ ३ ॥
तयांचिये चित्तीं बैसला अनंत । घेती नित्यनित्य तें चि सुख ॥ ४ ॥
सुख नाहीं कोणा हरिच्या वियोगें । तुका ह्मणे जुगें घडी जाय ॥ ५ ॥

॥ २५ ॥

जाय फाकोनियां निवडोनि गाई । आपलाल्या सोयी घराचिये ॥ १ ॥
घराचिये सोयी अंतरला देव । गोपाळांचे जीव गोविंदापे ॥ २ ॥
गोविंदें वेधिलें तुका ह्मणे मन । वियोगें ही ध्यान संयोगाचें ॥ ३ ॥

---

१ पं. आपुला.—२ पं. तुकें.—३ पं. कोणा.—४ पं. राखी त्यास तैसें०—५ पं. हिरोनियां.—६ पं. पाडितातीं.—७ पं. दिसे.—८ दे. पं. त्यासरिसे.—९ पं. रामकृष्ण.—१० पं. देवाची आवृत्ति.—११ दे. त. निवडितां.—१२ पं. आपलाली.—१३ पं. गोपाळाचा.

॥ २६ ॥

संयोग सकळां असे सर्वकाळ ॥ दुश्चित्त[1] गोपाळ आला दिसे ॥ १ ॥
गोपाळ गुणाचा ह्मणे गुणमय । निंबलोण माये उतरिलें ॥ २ ॥
उतरूनि होतें[2] धरि हनूवठी । ओवाळूनि दिठी सांडियेली ॥ ३ ॥
दिठी घाली माता विश्वाच्या जनका । भक्तिचिया सुखा गोडावला ॥ ४ ॥
लहान हा थोर जीवजंतु[3] भूतें । आपण दैवतें[4] जाला देवी ॥ ५ ॥
देवी ह्मैसासुर मुंजिया खेचर । लहान हि[5] थोर देव हरि ॥ ६ ॥
हरि तुका ह्मणे अवघा एकला । परि यां[6] धाकुला भक्तीसाटीं[7] ॥ ७ ॥

॥ २७ ॥

भक्तीसाटीं केली यशोदेसी आळी । थिंकोनियां चोळी डोळे देत ॥ १ ॥
देव गिळुनियां धरिलें मोहन । माय ह्मणे कोण येथें दुजें ॥ २ ॥
दुजें येथें कोणी नाहीं कृष्णाविण । निरुते जाणोन पुसे देवा ॥ ३ ॥
देवापाशीं पुसे देव काय जाला[8] । हांसें आलें[9] बोला याचें हरि ॥ ४ ॥
यांचे मी जवळी देव तो नेणती । लटिकें मानिती साच खरें ॥ ५ ॥
लटिकें तें साच साच तें लटिकें । नेणती लोभिकें आशाबद्ध[10] ॥ ६ ॥
सांगें[11] ह्मणे माय येरु वासी तोंड । तंव तें ब्रह्मांड देखे माजी ॥ ७ ॥
माजी जया चंद्र सूर्य तारांगणें । तो भक्तांकारणें बाळलीळा ॥ ८ ॥
लीळा कोण जाणे याचें महिमान । जगाचें[11] जीवन देवादिदेव[12] ॥ ९ ॥
देवें कवतुक दाखविलें तयां । लागतील[13] पायां मायबापें ॥ १० ॥
मायबाप ह्मणे हा चि देव खरा । आणीक पसारा लटिका तो ॥ ११ ॥

---

१ पं. दुश्चिता.—२ पं. हाति.—३ त. दे. जीवजंत.—४ पं. देवत.—५ त. ती. पं. हा.—६ पं. हा.—७ त. दे. भक्तासाटीं.—८ पं. जाले.—९ पं. आशाबद्धे.—१० पं. सांगे.—११ पं. जगाचा.—१२ पं. त. देवा देव.—१३ पं. लागती ते पाया मायबाप.

तो हि त्यांचा देव दिला नारायणें । माझें हें करणें तो हि मी च ॥ १२ ॥
मीं च ह्मणउनि जें जें जेथें ध्याती । तेथें मी श्रीपति भोगिता तें ॥ १३ ॥
तें मज वेगळें मी तयां निराळा । नाहीं या सकळा ब्रह्मांडांत ॥ १४ ॥
तद्भावना तैसें भविष्य तयाचें । फळ देता साचें मी च एक ॥ १५ ॥
मी च एक खरा बोलें नारायण । दाविलें निर्वाण निजदासां ॥ १६ ॥
निजदासां खूण दाविली निरुती । तुका ह्मणे भूतीं नारायण ॥ १७ ॥

॥ २८ ॥

नारायण भूतीं न कळे जयांसि । तयां गर्भवासीं येणें जाणें ॥ १ ॥
येणें जाणें होय भूतांच्या मत्सरें । न कळतां खरें देव ऐसा ॥ २ ॥
देव ऐसा जया कळला सकळ । गेली तळमळ द्वेषबुद्धि ॥ ३ ॥
बुद्धीचा पालट नव्हे कोणे काळीं । हरि जळीं स्थळीं तयां चित्तीं ॥ ४ ॥
चित्त तें निर्मळ जैसें नवनीत । जाणिजे अनंत तयामाजी ॥ ५ ॥
तयामाजी हरि जाणिजे त्या भावें । आपलें परावें सारिखें चि ॥ ६ ॥
चिंतनें तयांच्या तरती आणीक । जो हें सकळिक देव देखे ॥ ७ ॥
देव देखे तो ही देव कसा नव्हे । उरला संदेहे काय त्यासि ॥ ८ ॥
काया वाचा मनें पूजावे वैष्णव । ह्मणउनि भाव धरूनियां ॥ ९ ॥
यांसि कवतुक दाखविलें रानीं । वोणवा गिळूनि गोपाळांसि ॥ १० ॥
गोपाळांसि डोळे झांकविले हातें । धरिलें अनंतें विश्वरूप ॥ ११ ॥
पसरूनि मुख गिळियेलें ज्वाळ । पहाती गोपाळ बोटां सांदी ॥ १२ ॥

---

१ दे. त. ततभावना. पं. तद्भावना इच्छा भावि तैसें त्याचें ।—२ दे. त. होय.—३ पं. कदा.—४ त. जया.—५ पं. जयाच्या.—६ पं. तो.—७ त. दे. कसा देव.—८ पं. मुळचें "ह्मणउनि" असें असतां तें खोडून "मनीं शुद्ध" असें केलें आहे.—९ त.. मुखें.—१० पं. गिळियेली ज्वाळा । पाहाती गोपाळा.

संधि सारूनियां पाहिलें अनंता । ह्मणती[९] ते आतां कळलासी ॥ १३॥
कळला हा तुझा देह नव्हे देवा । गिळिला वोणवा आणीक तो ॥ १४॥
तो तयां कळला आरुषां[२] गोपाळां । दुर्गम सकळां साधनांसि ॥ १५ ॥
सीण ऊरे तुका ह्मणे साधनाचा । भाविकांसि साचा भाव दावी ॥१६॥

॥ २९ ॥

भाव दावी शुद्ध देखोनियां चित्तें[३] । आपल्या अंकित निजदासां ॥ १ ॥
सांगे गोपाळांसि काय पुण्य होतें । वांचलों जळते[४] आगी हातीं ॥ २ ॥
आजि आह्मां येथें राखियेलें[५] देवें । नाहीं तरी जीवें न वांचतों[६] ॥३॥
न वांचत्या[७] गाई जळतों सकळें । पूर्वपुण्यबळें वांचविलें ॥ ४ ॥
पूर्वपुण्य होतें तुमचिये गांठी । बोले जगजेठी गोपाळांसि ॥ ५ ॥
गोपाळांसि ह्मणे वैकुंठनायक । भले तुह्मी एक पुण्यवंत ॥ ६ ॥
करी तुका ह्मणे करवी[८] आपण । द्यावें थोरपण सेवकांसि ॥ ७ ॥

॥ ३० ॥

काय आह्मां चाळविसी वायांविण । ह्मणती[९] दुरून देखिलासि ॥ १ ॥
लावुनियां डोळे नव्हतों दुश्चित । तुज परचित्त मांव[१०] होती ॥ २ ॥
होती दृष्टि आंत[११] उघडी आमची । बाहेरी ते[१२] वांयां चि कुंची झाकूं ॥ ३ ॥
जालासि थोरला थोरल्या तोंडाचा । गिळियेलों[१३] वाचा धूर आगी ॥ ४ ॥
आगी खातो ऐसा आमचा सांगाती । आनंदें नाचती भोंवताली ॥ ५ ॥
भोवतीं आपणा मेळविलीं देवें । तुका ह्मणे ठावें नाहीं ज्ञान ॥ ६ ॥

---

१ पं. ह्मणीतलें आतां०.—२ पं. अरुष.—३ पं. चित्ता ।०अंकिता.—४ पं. जळत.—५ पं. वांचविलें.—६ त. दे. वंचतों.—७ त. दे. वंचत्या.—८ पं. करविता.—९ त. दे. ह्मणसी.—१० त. मान.—११ पं. आता.—१२ पं. तेव्हां साचि कुंची०. त. ते वांचि कुंची०.—१३ पं. गिळियेली.

॥ ३१ ॥

नाहीं त्याची[1] शंका वैकुंठनायका । नेणती ते एकाविण दुजा ॥ १ ॥
जाणतियां सर्वें येऊं नेदी, हरि. । तर्कवादी दुरी दुराविले ॥ २ ॥
वादियासि भेद, निंदा, अहंकार । देऊनियां दूर दुराविले ॥ ३ ॥
दुरावले दूर आशाबद्ध देवा । करितां[2] या सेवा कुटुंबाची ॥ ४ ॥
चित्तीं द्रव्यदारा पुत्रादिसंपत्ती । समान ते होती पशु नर ॥ ५ ॥
नरक साधिले[3] विसरोनि देवा । बुडाले[4] ते भवा नदीमाजी ॥ ६ ॥
जीहीं हरिसंग केला संवसारीं[5] । तुका ह्मणे खरी खेप[6] त्यांची ॥ ७ ॥

॥ ३२ ॥

खेळीमेळीं आले[7], घरा गोपीनाथ । गोपाळांसहित मातेपाशीं ॥ १ ॥
मातेपाशीं एक नवल सांगती । जाली तैसी ख्याती वोणव्याची ॥ २ ॥
ओवाळिलें[8] तिनें करूनि आरती । पुसे दसवंती गोपाळांसि ॥ ३ ॥
पुसे पडताळुनी मागुती मागुती । गोपाळ सांगती कवतुक[9] ॥ ४ ॥
कवतुक कानीं आइकतां[10] त्यांचें । बोलतां ये वाचे वीट नये ॥ ५ ॥
नयन गुंतले श्रीमुख पाहतां । न साहे लवतां आड पातें ॥ ६ ॥
तेव्हां कवतुक कळों आलें कांहीं । हळुहळु दोहीं मायबापां ॥ ७ ॥
हळुहळु त्यांचें[11] पुण्य जालें वाड । वारलें हें जाड तिमिरांचें[12] ॥ ८ ॥
तिमिर[13] हें तेथें राहों शके कैसें । जालियां प्रकाशें[14] गोविंदाच्या ॥ ९ ॥
दावी तुका ह्मणे देव ज्या आपणा । पालटे तें क्षणामाजी एका ॥ १० ॥

---

१ पं. शंका त्यांची.—२ पं. करितां.—३ पं. साधिला.—४ पं. "बुडाले ते" याबद्दल "बुडालेती."—५ पं. संसारी.—६ पं. त्याची खेप.—७ पं. घरा आले.—८ त. ओवाळिलें.—९ त. कवतुक तें.—१० त. ऐकतां.—११ पं. त्यांच्या पुण्या जाली वाड । वारिलें.—१२ त. पं त्रिमिराचें.—१३ त. पं. त्रिमिर.—१४ पं. प्रवेशे.

॥ ३३ ॥

काय आतां यासि ह्मणावें लेंकरूं । जगाचा हा गुरु मायबाप ॥ १ ॥
माया याची यासि राहिली व्यापून[1] । कळों नये क्षण एक होतां ॥२॥
क्षण एक होतां विसरलीं त्यासि । माझेंमाझें ऐसें[2] करी बाळा ॥ ३ ॥
करी[3] कवतुक कळों नेदी कोणा । योजूनि कारणा तें चि खेळे ॥ ४ ॥
तें सुख लुटिलें[4] घरिचिया घरीं । तुका ह्मणे परी आपुलाल्या ॥ ५ ॥

॥ ३४ ॥

आपुलाल्यापरी करितील सेवा । गीतें[5] गातां देवा खेळवूनि ॥ १ ॥
खेळु[6] मांडियेला यमुने पाबळीं । या रे चेंडुफळी खेळूं आतां ॥ २ ॥
आणविल्या डांगा चवगुणां काठी[7] । बैसोनियां वांटी गडिया गडी ॥३॥
गडी जंव पाहे आपणासमान । नाहीं नारायण ह्मणे दुजा ॥ ४ ॥
जाणोनि गोविंदें सकळांचा भाव । तयांसि उपाव तो चि सांगे ॥ ५ ॥
सांगे सकळांसि[8] व्हा रे एकीकडे । चेंडू राखा गडे तुह्मी माझा ॥ ६ ॥
मज[9] हा न लगे आणीक सांगाती । राखावीं बहुतीं हाल माझी ॥ ७ ॥
माझे हाके हाक मेळवा सकळ । नव जा बरळ एकमेकां[11] ॥ ८ ॥
एका समतुकें अवघे चि राहा । जाईल तो पाहा धरा चेंडू ॥ ९ ॥
चेंडू धरा ऐसें सांगतो सकळां । आपण निराळा एकला चि ॥ १० ॥
चिंतुनियां चेंडू हाणे ऊर्ध्वमुखें । ठेलीं सकळिक[12] पाहात चि ॥ ११ ॥
पाहातें[13] चि ठेलीं न चलतां कांहीं । येरू लवलाहीं ह्मणे धरा ॥१२॥
धरावा तयानें[14] त्याचें बळ ज्यासि[15] । येरा आणिकांसि लाग नव्हे ॥ १३ ॥

---

१ पं. लपान.—२ त. ऐसी करी बाळ.—३ पं. करुनि.—४ पं. लोटिलें.—५ पं. गीति.—६ पं. खेळ.—७ पं. एकेठायीं.—८ पं. भाई.—९ त. मज.—१० पं. मग.—११ पं. एकेएक.—१२ त. सकळिकें पाहाते चि.—१३ त. पाहाति चि.—१४ पं. तयांनीं.—१५ त. त्यासी.

नव्हे[1] काम बळ बुद्धि नाहीं त्याचें । न धरवे निंचें उंचाविण[2] ॥ १४ ॥
विचारीं पडिले देखिले[3] गोपाळ । या ह्मणे सकळ मजमागें ॥ १५ ॥
मार्ग[4] देवाविण न दिसे आणिक्रा । चतुर होत का बहुत जन[5] ॥ १६ ॥
चतुर चिंतिती बहुत मारग । हरि जाय लांग पाहोनियां ॥ १७ ॥
यामागें जे गेले[6] गोविंदा[7] गोपाळ । ते नेले सीतळ पंथ ठायां ॥ १८ ॥
पंथ जे चुकले आपले मतीचे । तयांमागें त्यांचे ते चि हाल ॥ १९ ॥
हाल दोघां एक मोहरां[8] मागिलां । चालतां चुकलां वाट पंथ ॥ २० ॥
पंथ पुढिलांसी चालतां न कळे । मागिलांनीं डोळे उघडावे ॥ २१ ॥
वयाचा[9] प्रबोध विचार ज्यां नाहीं । समान तो देहीं बाळकांसी ॥ २२ ॥
सिकविलें हित नायिके जो कोनीं[10] । त्यामागें भल्यांनीं जाऊं नये ॥ २३ ॥
नये तें चि करी श्रेष्ठाचिया मना । मूर्ख एक जाणा तो चि खरा ॥ २४ ॥
रानभरी जाले न कळे मारग । मग तो श्रीरंग आठविला ॥ २५ ॥
लाजसांडूनियां मारितलिं हाका । कळलें नायका वैकुंठींच्या ॥ २६ ॥
चारी वेद ज्याची कीर्ती वाखाणीती । तया अति प्रीति गोपाळांची ॥ २७ ॥
गोपाळांचा धांवा आइकिला कानीं । सोयी चक्रपाणि पालविलें ॥ २८ ॥
सोयी धरूनियां आले हरिपासीं । लहान थोरांसी सांभाळिलें ॥ २९ ॥
सांभाळिलें तुका ह्मणे सकळ हि । सुखी जाले ते ही हरिमुखें ॥ ३० ॥

॥ ३५ ॥

मुखें सांगे त्यांसि पैल चेंडू पाहा । उदकांत डोहाचिये माथां ॥ १ ॥
माथां कळंबाचे अवघडा ठायीं । दावियेला डोहीं जळामाजी ॥ २ ॥

---

१ पं. नव्हे.—२ पं. उंचेविण.—३ पं. देखोनि.—४ त. माग.—५ पं. माग.—६ पं. आले.—७ पं. गोविंद.—८ त. मोहरे.—९ पं. वयाच्या प्रबोधें.—१० पं. कोणी.

जळांत पाहातां हाडति या दृष्टि । ह्मणे जगजेठी ऐसें नव्हे ॥ ३ ॥
नव्हे साच चेंडू छाया दिसे आंत । खरा तेथें चित्त लावा वरी ॥ ४ ॥
वरी देखियेला अवघ्यांनीं डोळां । ह्मणती गोपाळा आतां कैसें ॥ ५ ॥
कैसें करूनियां उतरावा खालीं । देखोनियां भ्यालीं अवघीं डोहो ॥ ६ ॥
डोहो बहु खोल काळया भीतरी । सरलीं माघारीं अवघीं जणें ॥ ७ ॥
जयाचें कारण तयासी च ठावें । पुसे त्याच्या भावें त्यास हरि ॥ ८ ॥
त्यासि नारायण ह्मणे राहा तळीं । चढे वनमाळी झाडावरी ॥ ९ ॥
वरि जातां वरि पाहाती गोपाळ । ह्मणतीं सकळ आह्मी नेणों ॥ १० ॥
नेणों ह्मणती हें करितोसि काई । आह्मां तुझी आई देइल सिव्या ॥ ११ ॥
आपुलिया कानां ठेवुनियां हात । सकळीं निमित्य टाळियेलें ॥ १२ ॥
निमित्याकारणें रचिलें कारण । गेला नारायण खांदीवरी ॥ १३ ॥
खांदीवरी पाव ठेवियेला देवें । पाडावा त्या भावें चेंडू तळीं ॥ १४ ॥
तळील नेणती तुका ह्मणे भाव । अंतरींचा देव जाणों नेदी ॥ १५ ॥

॥ ३६ ॥

नेदी कळों केल्याविण तें कारण । दाखवी आणून अनुभवा ॥ १ ॥
न पुरेसा हात घाली चेंडूकडे । ह्मणीतलें गडे सांभाळावें ॥ २ ॥
सांभाळ करितां सकळां जिवांचा । गोपाळांसि वाचा ह्मणे बरें ॥ ३ ॥
बरें विचारूनी करावें कारण । ह्मणे नारायण बऱ्या बरें ॥ ४ ॥
बरें ह्मणउनि तयांकडे पाहे । सोडविला जाय चेंडू तळा ॥ ५ ॥

---

१ पं. आडतीये दृष्टि.—२ पं. खरें.—३ पं. हरि.—४ पं. सकळ.—५ पं. गोपाळ.—६ त. दे. देउनियां—७ दे. त. वेचिलें.—८ पं. अंतरीचें देव कळों नेदी ।.—९ दे. त. चेंडाकडे.—१० त. ह्मणतील.

तयासवें उडी[1] घातली अनंतें । गोपाळ रडते[2] येती घरा ॥ ६ ॥
येतां त्यांचा[3] लोकीं देखिलां कोल्हाळ । सामोरीं सकळ आलीं पुढें ॥ ७ ॥
पुसती ते[4] मात आपआपल्यासि । हरिदुःखें त्यांसि न बोलवे ॥ ८ ॥
न बोलवे हरि बुडालासें[5] मुखें । कुटितील दुःखें उर माथे ॥ ९ ॥
मायबापें[6] तुका ह्मणे न देखती । ऐसें दुःख चित्तीं गोपाळांच्या ॥ १० ॥

॥ ३७ ॥

गोपाळां उभडु नावरे दुःखाचा । कुंटित हे वाचा जाली त्यांची ॥ १ ॥
जालें काय ऐसें न कळे कोणासी । ह्मणती तुह्मांपासीं देव होता ॥ २ ॥
देवासवें दुःख न पवते[7] ऐसें । कांहीं अनारिसें दिसे आजी ॥ ३ ॥
आजि दिसे हरि फांकला यांपाशीं । ह्मणउनि ऐशी परि जाली ॥ ४ ॥
जाणविल्याविण कैसें कळे त्यांसि । शाहाणे[8] तयांसि कळों आलें ॥ ५ ॥
कळों आलें तीहीं फुंद शांत केला । ठायींचा च त्यांला थोडा होता ॥ ६ ॥
होता तो विचार सांगितला जना । गोपाळ शाहाणा होता त्याणें ॥ ७ ॥
सांगे आतां हरि तुह्मां आह्मां नाहीं । बुडाला[9] तो डोहीं यमुनेच्या ॥ ८ ॥
यासि[10] अवकाश नव्हे चि पुसतां । जालिया अनंता कोणें[12] परि ॥ ९ ॥
परी त्या दुःखाची काय सांगों आतां । तुका ह्मणे माता लोकपाळा[13] ॥ १० ॥

॥ ३८ ॥

पाषाण फुटती तें दुःख देखोनि । करितां गौळणी शोक लोकां ॥ १ ॥

---

१ दे. दडी.—२ पं. रडत.—३ पं. लोकीं त्यांचा.—४ त. दे. पुसतील मात०.—५ पं. तया गोपाळासी.—६ पं. मायबाप.—७ पं. पवती.—८ त. यासी—९ त. शाहाण्या.—१० पं. बुडालासे.—११ पं. त्यासि.—१२ त. काय.—१३ त. दे. लोकपाळ.

काय ऐसें पाप होतें आह्मांपासीं । बोलती एकासी एक एकां[1] ॥ २ ॥
एकांचिये डोळां असुं बाह्यात्कारी । नाहीं तीं अंतरीं जळतील ॥ ३ ॥
जळतील एकें अंतर्बाह्यात्कारें । टाकिलीं लेकुरें काडियेहूनि ॥ ४ ॥
निवांत चि एकें राहिलीं निश्चिंत[2] । बाहेरी ना आंत जीव त्यांचे ॥ ५ ॥
त्यांचे जीव[3] वरी आले त्या सकळां । एका त्या गोपाळांवांचूनियां ॥ ६ ॥
वांचणें तें आतां खोटें[4] संवसारीं । नव्हे भेटी जरी हरिसवें ॥ ७ ॥
सवें घेऊनियां चालली गोपाळां । अवघीं च बाळा नर नारी ॥ ८ ॥
नर नारी नाहीं मनुष्याचें नांव[5] । गोकुळ हें गांव सांडियेलें ॥ ९ ॥
सांडियेलीं अन्नें संपदा सकळ । चिलीं तो गोपाळ धरूनि जाती ॥ १० ॥
तिरीं[6] माना घालूनियां उभ्या गाई । तटस्थ या डोहीं यमुनेच्या ॥ ११ ॥
यमुनेच्या तिरीं झाडें वृक्ष वल्ली । दुःखें कोमाइलीं कृष्णाचिया ॥ १२ ॥
यांचें त्यांचें दुःख एक जालें तिरीं । मग शोक करी मायबाप ॥ १३ ॥
मायबाप तुका ह्मणे सहोदर । तोंवरी च तीर न पवतां ॥ १४ ॥

॥ ३९ ॥

तीर देखोनियां यमुनेचें जळ । कांठीं च कोल्हाळ करिताती ॥ १ ॥
कइवाड नव्हे घालावया उडी । आपणासि ओढी भय मागें ॥ २ ॥
मागें सरे माय पाउला पाउलीं । आपलें[7] च घाली धाकें अंग ॥ ३ ॥
अंग राखोनियां माय[8] खेद करी । अंतरीचें हरी जाणवलें ॥ ४ ॥
जाणवलें मग देवें दिली बुडी । तुका ह्मणे कुडी भावना हे ॥ ५ ॥

---

१ त. एके.—२ पं. निश्चिंतें.—३ पं. जीवावरीं.—४ कोठें.—५ दे. नावें.—६ पं. तीरी उभ्या माना घालूनियां गाई।.—७ त. दे. आपल्या.—८ पं. माया.

॥ ४० ॥

भावनेच्या मुळें अंतरला देव । शिरला संदेह भयें पोटीं ॥ १ ॥
पोटीं होतें मागें जीव द्यावा ऐसें । बोलिल्या सरिसें न करवे ॥ २ ॥
न करवे त्याग या[1] जीवाचा नासे[2] । नारायण त्यास अंतरला ॥ ३ ॥
अंतरला बहु बोलतां वाउगें । अंतरींच्या त्यागेंविण गोष्टी ॥ ४ ॥
गोष्टी सकळांच्या आइकिल्या देवें । कोण कोण्याभावें रडती तीं ॥ ५ ॥
तीं गेलीं घरास आपल्या सकळ । गोधनें गोपाळ लोक माय ॥ ६ ॥
मायबापांची तीं ऐसी जाली गति । तुका ह्मणे अंतीं कळों आलें ॥ ७ ॥

॥ ४१ ॥

आला त्यांचा[3] भाव देवाचिया मना । अंतरीं कारणासाटीं होता ॥ १ ॥
होता भाव त्यांचा पाहोनि निराळा । नव्हता पाताळा गेला आधीं ॥ २ ॥
आधीं पांठीमोरीं जालीं तीं सकळें । मग या गोपाळें बुडी दिली ॥ ३ ॥
दिली हाक त्यांणें[4] जाऊनि पाताळा । जागविलें काळा भुजंगासि ॥ ४ ॥
भुजंग हा होता निजला मंदिरीं । निर्भर अंतरीं गर्वनिधि ॥ ५ ॥
गर्व हरावया आला नारायण । मिस या करून चेंडुवाचें ॥ ६ ॥
चेंडुवाचे मिसें काळया नाथावा । तुका ह्मणे देवा कारण हें ॥ ७ ॥

॥ ४२ ॥

काळयाचे मागे चेंडु पत्नीपाशीं । तेजःपुंज राशी देखियेला ॥ १ ॥
लावण्यपूतळा मुखप्रभाराशी । कोटि रवि शशी उगवले ॥ २ ॥
उगवला खांबें[5] कर्दळीचा गाभा । ब्रीदें वांकी नभा देखे पायीं ॥ ३ ॥

---

१ दे. त. जीवाचा या.—२ पं. नाश.—३ दे. त. यांचा. भाव. पं. भावें त्यांचा.—४ पं. तेणें.—५ पं. खांबा.

पाहिला सकळ तिनें न्याहाळूनि । कोण या जननी विसरली[1] ॥ ४ ॥
विसरु हा तीस कैसा याचा जाला । जीवाहुनि वाला[2] दिसतसे ॥ ५ ॥
दिसतसे रूप गोजिरें लाहान । पाहातां लोचन सुखावले ॥ ६ ॥
पाहिलें पर्तोनि काळा दुष्टाकडे । मग ह्मणे कुडें जालें आतां ॥ ७ ॥
आतां[3] हा उठोनि खाईल या बाळा । देईल वेल्हाळा माय जीव ॥ ८ ॥
जीव याचा कैसा वांचे ह्मणे नारी । मोहिली अंतरीं हरिरूपें[4] ॥ ९ ॥
रूपें अनंताचीं अनंतप्रकार[5] । न कळे साचार तुका ह्मणे ॥ १० ॥

॥ ४३ ॥

ह्मणे चेंडू कोणें आणिला या ठाया । आलों पुरनाया कोड त्याचें ॥ १ ॥
त्याचें आइकोन निष्ठुर वचन । भयाभीत मन जालें तीचें ॥ २ ॥
तिची चित्तवृत्ति होती देवावरी । आधीं ते माघारी फिरली वेगीं ॥ ३ ॥
वेगीं मन गेलें भ्रताराचे सोयी । विघ्न आलें कांहीं आह्मांवरी ॥ ४ ॥
वरि उदकास अंत[6] नाहीं पार । अक्षोभ सागर भरलासे ॥ ५ ॥
संचार करूनि कोण्या वाटे आला । ठायीं च देखिला अवचिता ॥ ६ ॥
अवचिता नेणों येथें उगवला । दिसे[7] तो धाकुला बोल मोठे ॥ ७ ॥
मोठ्यानें बोलतो भय नाहीं मनीं । केला उठवूनी काळ जागा ॥ ८ ॥
जागविला काळसर्प तये वेळीं । उठिला कल्लोळीं विषाचिये ॥ ९ ॥
यमुनेच्या डोहावरी आला ऊत । काळयाकृतांतधुंधुकारें[8] ॥ १० ॥
कारणें ज्या येथें आला नारायण । जालें दरुषण दोघांमध्यें[9] ॥ ११ ॥
दोघांमध्यें जाले[10] बोल परस्परें । प्रसंग[11] उत्तरें युद्धाचिया ॥ १२ ॥

---

१ दे. त. विसंबली.—२ दे. त. वाल्हा.—३ पं. आतां उठोनियां खाईल.—४ पं. हरिरूपीं.—५ पं. अनंत अपार.—६ पं. नाहीं अंतपार.—७ पं. दिसतो.—८ दे. धूदकारें.—९ त. दे. मधीं.—१० पं. बोलजाले.—११ पं. प्रसंगें.

चिंतावला चित्तीं तोंडें बोले काळ । करीन सकळ ग्रास तुझा ॥ १३ ॥
जाला सावकाश झेंप घाली वरी । तंव हाणे[1] हरि मुष्टिघातें ॥ १४ ॥
तेणें काळें त्यासि दिसे काळ तैसा । हरावया जैसा जीव आला ॥ १५ ॥
आठवलें काळा हाकारिलें गोत । मिळालीं बहुतें[2] नागकुळें ॥ १६ ॥
कल्हारीं संधानीं वेष्टियेलीं[3] हरि । अवघा[4] विखारीं व्यापियेला ॥ १७ ॥
यांस तुका ह्मणे नाहीं भक्ताविण । गरुडाचें चिंतन केलें मनीं ॥ १८ ॥

॥ ४४ ॥

निजदास उभा तात्काळ पायांपें । स्वामी देखे सर्पें वेष्टियेलीं[5] ॥ १ ॥
लहानथोरें होतीं मिळालीं अपारें[6] । त्याच्या धुधुकारें[7] निवारलीं ॥ २ ॥
निघतां आपटी[8] धरुनि धांवामधीं । एकाचें[9] चि वधी माथें पायें ॥ ३ ॥
एकीं जीव दिले येतां च त्या धाकें । येतील तीं एकें काकूलती ॥ ४ ॥
यथेष्ट भक्षिलीं[10] पोट धाये वरी । तंव ह्मणे हरि पुरे आतां ॥ ५ ॥
आतां करूं काम आलीं जयासाटीं । हरी घाली मिठी काळयासि ॥ ६ ॥
यासि नाथूनियां नाकीं दिली दोरी । चेडू भार[11] शिरीं कमळांचा ॥ ७ ॥
चालविला वरी बैसे नारायण । गरुडा आलिंगुन[12] बहुडविलें ॥ ८ ॥
विसरु न पडे संवगड्या गाई । यमुनेच्या डोहीं लक्ष त्यांचें ॥ ९ ॥
त्याच्या गोष्टी कांठीं बैसोनि सांगती । बुडाला दाविती येथें हरि ॥ १० ॥
हरीचें चिंतन करितां आठव । तुका ह्मणे देव आला वरी ॥ ११ ॥

॥ ४५ ॥

अवचित[13] त्यांणीं देखिला भुजंग । पळतील मग हाउ आला ॥ १ ॥

---

१ पं. हाणी.—२ दे. बहुतें.—३ दे. त. धरियेला.—४ त. अवघ्या.—५ पं. वेढियेला.—६ त. अपार.—७ दे. धुदकारें.—८ दे. त. आफटी.—९ पं. एका ते चि वधी' 'माथां पाये.—१० पं. भक्षिले.—११ पं भारा.—१२ आलिंगण.—१३ पं. अवचिता.

आला घेऊनियां यमुनेबाहेरी । पालवितो करीं[1] गडियांसि ॥ २ ॥
गडियांसि ह्मणे वैकुंठनायक । या रे सकाळिक मजपाशीं ॥ ३ ॥
मजपाशीं तुह्मां भय काय करी । जवळि या दुरी जाऊं नका ॥ ४ ॥
कानीं आइकिले गोविंदाचे बोल । ह्मणती नवल चला पाहों ॥ ५ ॥
पाहों आले हरीजवळ सकळ । गोविंदें[2] गोपाळ आलिंगिले ॥ ६ ॥
आल्या गाई वरी घालितील माना । वोरसलें[3] स्तनां[4] क्षीर लोटें ॥ ७ ॥
लोटती सकळें[5] एकावरी एक । होउनि पृथक कुर्वाळलीं[6] ॥ ८ ॥
कुर्वाळलीं[6] आनंदें घेती चारापाणी । तिहीं चक्रपाणी देखियेला[7] ॥ ९ ॥
त्यां च पाशीं होता परि केली माव । न कळे संदेह पडलिया ॥ १० ॥
याति वृक्ष वल्ली होत्या कोमेलिया । त्यांसि कृष्णें काया दिव्य दिली ॥ ११ ॥
दिलें गोविंदें त्या पदा नाहीं नाश । तुका ह्मणे आस निरसली ॥ १२ ॥

॥ ४६ ॥

आस निरसली गोविंदाचे भेटी । संवसारा तुटी[8] पुढिलिया ॥ १ ॥
पुढें पाठविलें[9] गोविंदें गोपाळां । देउनि चपळां हातीं गुढी ॥ २ ॥
हाका आरोळिया देउनि नाचती । एक सादाविती हरि आला[10] ॥ ३ ॥
आरंधीं पडिलीं होतीं तयां घरीं । संकीर्ण त्या नारी नरलोक ॥ ४ ॥
लोका भूक तान नाहीं निद्रा डोळा । रूप वेळोवेळां आठविती ॥ ५ ॥
आहाकटा मग करिती गेलिया । आधीं ठावा तयां नाहीं कोणा ॥ ६ ॥
आधीं चुकी मग घडे आठवण । तुका ह्मणे जन परिचयें ॥ ७ ॥

---

१ पं. हरि.—२ पं. गोधनें.—३ पं. वोरसल्या.—४ त. स्थना.—५ पं. सकळ.—६ त. कवाळिलीं. पं. कुरवाळिली.—७ त. देखिलिया.—८ त. संवसार तुटी०.—९ पं. पाठविले गोविंदें गोपाळ । ०चपळहातीं०.—१० त. दे. आले.

॥ ४७ ॥

जननीं हे ह्मणे आहा काय जालें । शरीर रक्षिलें काय काजें ॥ १ ॥
काय काज[1] आतां हरिविण जिणें । नित्य दुःख कोणें सोसावें हें ॥ २ ॥
हें दुःख न सरे हरि न भेटे तों । त्यामागें चि जातों एका वेळे ॥ ३ ॥
एकवेळ जरी देखतें मी आतां । तरी जीवापरता न करितें ॥ ४ ॥
करितां हे मात हरीचें चिंतन । शुभ तो शकुन तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ४८ ॥

शुभ मात तिहीं आणिली गोपाळीं । चेंडू वनमाळी घेउनि आले ॥ १ ॥
आली दारा देखे हरुषाची गुढी । सांगितली[2] पुढी हरुषें[3] मात ॥ २ ॥
हरुषलीं माता केलें निंबलोण । गोपाळांवरून कुरवंडी ॥ ३ ॥
गोपाळां भोवतें मिळालें गोकुळ । अवघीं सकळ लहान थोरें ॥ ४ ॥
थोर सुख जालें ते काळीं आनंद । सांगती[4] गोविंद वरि आला ॥ ५ ॥
आले वरि बैसोनियां नारायण । काळया नाथून वहन केलें ॥ ६ ॥
नगराबाहेरी निघाले आनंदें । लावूनियां वाद्यें नाना घोष ॥ ७ ॥
नारायणापुढें गोपाळ चालती । आनंदें नाचती गाती गीत ॥ ८ ॥
तंव तो देखिला वैकुंठींचा पती । लोटांगणीं जाती[5] सकळ ही ॥ ९ ॥
सकळ ही एका भावें आलिंगिले । अवघियां जाले अवघे हरि ॥ १० ॥
हरि आलिंगनें[6] हरिरूप जालीं । आप विसरलीं आपणास ॥ ११ ॥
सकळांसी सुख एक दिलें देवें । मायबापभावें[7] लोकपाळां ॥ १२ ॥
मायबाप देवा नाहीं लोकपाळ । सारिखीं सकळ तुका ह्मणे ॥ १३ ॥

---

१ त. काजे.—२ त. सांगतील.—३ पं. हरुष.—४ त. सांगतां.—५ पं. येती.—६ पं. आलिंगनीं.७ दे. त. मायबापां भावें

॥ ४९ ॥

नेणें वर्ण[1] धर्म जीं आलीं सामोरीं । अवघीं च हरी आळिंगिलीं[2] ॥ १ ॥
हरि लोकपाळ आले नगरांत । सकळांसहित मायबाप[3] ॥ २ ॥
पारणें तयांचें जालें एका वेळे । देखिलें सांवळें परब्रह्म ॥ ३ ॥
ब्रह्मानंदें लोक सकळ नाचती । गुढियां उभविती घरोघरीं ॥ ४ ॥
घरोघरीं सुख आनंद सोहळा । सडे रंग माळा चौकदारीं ॥ ५ ॥
दारीं वृंदावनें तुळसीचीं बनें । रामकृष्णगाणें नारायण ॥ ६ ॥
नारायण तिहीं पूजिला बहुतीं । नाना पुष्पयाती करूनियां ॥ ७ ॥
यांचें ऋण नाहीं फिटलें मागील । पुढें भांडवल जोडिती हीं ॥ ८ ॥
हीं नव्हतीं कधीं या देवा वेगळीं । केला वनमाळी सेवाऋणी ॥ ९ ॥
सेवाऋणें तुका ह्मणे रूपधारी । भक्तांचा कैवारी नारायण ॥ १० ॥

॥ ५० ॥

नारायण आले निजमंदिरासि । जाले या लोकांसि बहुडविते ॥ १ ॥
बहुडविले बहु केलें समाधान । विसरू तो[4] क्षण नका माझा ॥ २ ॥
मात सांगितली सकळ वृत्तांत । केलें दंडवत सकळांनीं ॥ ३ ॥
सकळां भातुकें वांटिल्या साखरा । आपलाल्या[5] घरा लोक गेले ॥ ४ ॥
लोक गेले कामा गाईपें गोपाळ । वारली सकळ लोभापाठी ॥ ५ ॥
लोभ दावुनियां आपला विसर । पाडितो कुमर धनआशा ॥ ६ ॥
आशेचे बांधले तुका ह्मणे जन । काय नारायण ऐसा[6] जाणे ॥ ७ ॥

॥ ५१ ॥

जाला कवतुक करितां रोकडें । आणीक ही पुढें नारायण ॥ १ ॥

---

१ त. वर्णा.—२ पं. आळिंगिला.—३ त. मायबापा.—४ पं. हा.—५ त. गेलें आपलाल्या घरा लोक.—६ पं. जाणे ऐसा.

येउनियां पुढें धरिला मारग । हरावया भाग इंद्रयाजीं ॥ २ ॥
इंद्रा दहीं दुध तूप नेतां लोणी । घेतलें हिरोनि वाटे त्यांचें ॥ ३ ॥
हिरोनि घेतल्या कावडी सकळा । ह्मणती गोपाळा बरें नव्हे ॥ ४ ॥
नव्हे तें चि करी न मे कळिकाळा । तुका ह्मणे लीळा खेळे देव ॥ ५ ॥

॥ ५२ ॥

खेळ नव्हे बरा इंद्र कोपलिया । देव ह्मणे तयां भेऊं नका ॥ १ ॥
नका धरूं भय धाक कांहीं मनीं । बोले चक्रपाणि गौळियांसि ॥ २ ॥
गौळियांसि धीर नाहीं या वचनें । आशंकितमनें वेडावलीं ॥ ३ ॥
वेडावलीं त्यांसि न कळतां भाव । देवाआदिदेव नोळखतां ॥ ४ ॥
नोळखतां दुःखें वाहाती शरीरीं । तुका ह्मणे वरि भारवाही ॥ ५ ॥

॥ ५३ ॥

भारवाही नोळखती या अनंता । जवळी असतां अंगसंगें ॥ १ ॥
अंगसंगें तया न कळे हा देव । कळोनि संदेह मागुंताला ॥ २ ॥
मागुती पडती चिंतेचिये डोहीं । जयाची हे नाहीं बुद्धि स्थिर ॥ ३ ॥
बुद्धि स्थिर होउं नेदी नारायण । आशाबद्ध जन लोभिकांची ॥ ४ ॥
लोभिकां न साहे देवाचें करणें । तुका ह्मणे तेणें दुःखी होती ॥ ५ ॥

॥ ५४ ॥

दुःखी होती लोभें करावें तें काई । उडतील गाई ह्मैसी आतां ॥ १ ॥
आणीकही कांहीं होईल अरिष्ट । नायिके हा धीट सांगितलें ॥ २ ॥
सांगों चला याच्या मायबापांपाशीं । निघाले घरासि देवा रागें ॥ ३ ॥

---

१ पं. दे. इंद्रापाशीं—२ पं. वाहातील शिरीं ।—३ त. भार पाठी ।—४ त. मागुताले.—५ पं. राहों.—६ पं. लोभिकांसी.—७ त. लोकां हें न०.

रागें काला देतां न घेती कवळ । टोकवी गोपाळ क्रोधियांसि ॥ ४ ॥
क्रोध देवावरि धरियेला राग । तुका ह्मणे भाग न लभती ॥ ५ ॥

॥ ५५ ॥

भाग त्या सुखाचे वांकड्यां बोबड्यां । आपलिया गड्यां भाविकांसि ॥ १ ॥
भारवाही गेले टाकुनि कावडी । नवनीतगोडी भाविकांसि ॥ २ ॥
काला करूनियां वांटिलां सकळां । आनंदें गोपाळांमाजी खेळे ॥ ३ ॥
खेळेंमेळें दहीं दुध तूप[1] खाती । भय नाहीं चित्तीं कवणाचें ॥ ४ ॥
कवणाचें चाले तुका ह्मणे बळ । जयासि गोपाळ साह्य जाला ॥ ५ ॥

॥ ५६ ॥

जाणवलें इंद्रा चरित्र सकळ । वांकुल्या[2] गोपाळ दाविताती ॥ १ ॥
तातडिया मेघां आज्ञा करी राव । गोकुळींचा ठाव उरों नेदों[3] ॥ २ ॥
नेदाविया गाई ह्मसी वांचों लोक । पुरा सकळिक सिळाधारीं ॥ ३ ॥
धाक नाहीं माझा गोवळियां[4] पोरां । सकळिक मारा ह्मणे मेघां ॥ ४ ॥
ह्मणविती देव आपणां तोंवरी । जंव नाहीं वरी कोपलों मी ॥ ५ ॥
मीपणें हा देव न कळे चि त्यांसि । अभिमानें रासि गर्वाचिया ॥ ६ ॥
अभिमानरासि जयाचिये ठायीं । तुका ह्मणे तईं देव दुरी ॥ ७ ॥

॥ ५७ ॥

देव त्यां फावला भाविकां गोपाळां । नाहीं तेथें कळा अभिमान ॥ १ ॥
नाडलीं आपल्या आपण चि एकें । संदेहदायकें बहुफारें ॥ २ ॥
फारें चाळविलीं नेदी कळों मात्र । देवाआदिदेव विश्वंभर ॥ ३ ॥

---

१ पं. लोणी.—२ त. वांकल्या.—३ त. नेदीं.—४ पं. गौळियांच्या पोरां।.—५ पं. तंवरी। नाहीं जंवरी०.

विश्वासावांचुनि कळों नये खरा । अभक्तां अधीरा[1] जैसा तैसा ॥ ४ ॥
जैसा भाव तैसा जवळि त्या दुरि । तुका ह्मणे हरि देतो[2] घेतो ॥ ५ ॥

॥ ५८ ॥

तो या साच भावें न कळे चि इंद्रा । ह्मणउनि धारा घाली सिळा[3] ॥ १ ॥
घाली[4] धारा मेघ कडाडिला माथा । वरि अवचिता देखियेला ॥ २ ॥
देखती पाऊस वोळला गोपाळ । भ्याले हे सकळ विचारिती ॥ ३ ॥
विचार पडला विसरले खेळ । अन्याय गोपाळ ह्मणती केला ॥ ४ ॥
लागलेंसे गोड न कळे ते काळीं । भेणें वनमाळी आठविती ॥ ५ ॥
आतां काय कैसा[5] करावा विचार । गोधनासि थार आपणिया ॥ ६ ॥
यांचिया विचारें होणार तें काई । तुका ह्मणे ठायीं वेडावलीं ॥ ७ ॥

॥ ५९ ॥

वेडावलीं काय करावें या काळीं । ह्मणे वनमाळी गोपाळांसि ॥ १ ॥
शिरीं[6] धरूं गोवर्द्धन उचलूनि । ह्मणे तुह्मी कोणी भिऊं नका ॥ २ ॥
नका सांडूं कोणी आपला आवांका । मारितां या हाका आरोळिया ॥ ३ ॥
अशंकित चित्तें न वटे[7] त्यां खरें । धाकें च ते बरें ह्मणती चला ॥ ४ ॥
चित्तीं धाक परि जवळी अनंत । तुका ह्मणे घात होऊं नेदी ॥ ५ ॥

॥ ६० ॥

नेदी दुःख देखों दासा नारायण । ठेवी निवारून आल्या आधीं ॥ १ ॥
आधीं पुढें[8] शुद्ध करावा मारग । दासांमागें[9] मग सुखरूप ॥ २ ॥
पर्वतासि हात लाविला अनंतें । तो[10] जाय वरतें आपेंआप ॥ ३ ॥

---

१ त. अंधारा.—२ पं. घेतो देतो.—३ पं. मेघा.—४ पं. घाली मेघ धारा.—५ त. ऐसा.—६ पं. शिरीं गोवर्धन धरा उचलूनि.—७ पं. वाटे.—८ पं. शुद्ध पुढें.—९ पं. दासामागेंमागें.—१० त. वें.

आपल्याआपण उचलिला गिरी । गोपाळ हे करी निमित्यासि ॥ ४ ॥
निमित्य करूनि करावें कारण । करितां आपण कळों नेदी ॥ ५ ॥
दिनाचा कृपाळु पतितपावन । हें करी वचन सांच खरें ॥ ६ ॥
सांगणें न लगे सुखदुःख दासा । तुका ह्मणे ऐसा कृपावंत ॥ ७ ॥

॥ ६१ ॥

कृपावंतें हाक दिली सकळिकां । माजिया रे नका राहों कोणी ॥ १ ॥
निघाले या भेणें पाउसाच्या जन । देखे गोवर्द्धन उचलिला ॥ २ ॥
लाविले गोपाळ फेरीं चहूंकडे । हांसे फुंदे रडे कोणी धाकें ॥ ३ ॥
धाकें हीं सकळ निघोलीं भीतरी । उचलिला गिरी तयाखालीं ॥ ४ ॥
तयाखालीं गाई वत्सें आलीं लोक । पक्षी सकळिक जीवजाति ॥ ५ ॥
जिहीं ह्मणविलें हरीचे अंकित । जातीचे ते होत कोणी तरी ॥ ६ ॥
जाति कुळ नाहीं तयासि प्रमाण । अनन्या अनन्य तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ ६२ ॥

त्यांसि राखे बळें आपुले जे दास । काळिकाळासि वास पाहों नेदी ॥ १ ॥
पाउस न येतां केली यांची थार । लागला तुषार येऊं मग ॥ २ ॥
येउनि दगड बैसतील गिरी । वरुषला धारीं शिळांचिये ॥ ३ ॥
शिळांचिये धारीं वरुषला आकांत । होता दिवस सात एक सरें ॥ ४ ॥
एक सरें गिरि धरिला गोपाळीं । होतों[3] भाव बळी आह्मी ऐसे ॥ ५ ॥
ऐसें कळों आलें देवाचिया चित्ता । ह्मणे तुह्मीं आतां हात सोडा ॥ ६ ॥
हांसती गोपाळ करूनि नवल । आइकोनि बोल गोविंदाचे ॥ ७ ॥

---

१ त. फेरी.—२ पं. निघाले.—३ होता भाववळी आह्मां ऐसा । त. होता भाववळी आह्मी ऐसा.

दावितील डोया गुडघे कोपर । फुटले ते[1] भार उचलितां ॥ ८ ॥
भार आह्मांवरि घालुनि निराळा । राहिलासि डोळा चुकवुनि ॥ ९ ॥
निमित्य अंगुळी लावियेली वरी । पाहों कैसा गिरी धरितोसि ॥ १० ॥
सिणले हे[2] होते ठायींच्या त्या भावें । लटिकें चि खरें मानुनियां ॥ ११ ॥
यांणीं अंत पाहों आदरिला याचा । तुका ह्मणे वाचा वाचाळ तें ॥ १२ ॥

॥ ६३ ॥

वाचाळ लटिके अभक्त जे खळ । आपुलें तें बळ वाखाणावें[3] ॥ १ ॥
बळें हुंबरती सत्य त्यां न कळे । नुघडती डोळे अंधळ्यांचे ॥ २ ॥
आसुडिल्या माना हात पाय नेटें । तंव भार बोटें उचलिला ॥ ३ ॥
लटिका चि आह्मीं सीण केला देवा । कळों आलें तेव्हां सकळांसि ॥ ४ ॥
आलें कळों तुका ह्मणे अनुभवें । मग अहंभावें सांडवलें[4] ॥ ५ ॥

॥ ६४ ॥

सांडवले सकळांचे अभिमान । आणिले शरण लोटांगणीं ॥ १ ॥
लोटांगणीं आले होऊनियां दीन । मग नारायण ह्मणे भलें ॥ २ ॥
भला आजि तुह्मी केला साच पण । गिरि गोवर्धन उचलिला ॥ ३ ॥
लागती चरणा सकळ ते काळीं । आह्मांमध्यें बळी तूं चि एक ॥ ४ ॥
एका तुजविण न यों आह्मी कामा । कळों कृष्णा रामा आलें आजी[5] ॥ ५ ॥
आजिवरि आह्मां होता अभिमान । नेणतां चरणमहिमा तुझा ॥ ६ ॥
तुझा पार आह्मी नेणों नारायणा । नखीं गोवर्द्धना राखियेलें ॥ ७ ॥
राखियेलें गोकुळ आह्मां सकळांसि । दगडाच्या[6] राशी वरुषतां ॥ ८ ॥

---

१ पं. तो.—२ पं. ही होते ठायीं च त्या भावें ।.—३ दे. वाखाणीतीं.—४ दे. सांडवली.—५ पं. तुह्मी आजी.—६ त. दगडाचे.

वर्णावें तें काय तुझें महिमान । धरिती चरण सकळही[1] ॥ ९ ॥
सकळ ही तान विसरलीं भूक । सकळ ही सुख दिलें त्यांसि ॥ १० ॥
त्यासि कळों आला वैकुंठनायक । तुका ह्मणे लोक निर्भर ते ॥ ११ ॥

॥ ६५ ॥

लोकां कळों आला देव आह्मांमधीं । टाकिली उपाधि तिहीं शंका ॥१॥
शंका नाहीं थोरां लाहानां जीवांसि । कळेला[2] हा हृषीकेशी मग ॥ २ ॥
मग मनीं जाले निर्भर सकळ । संगें लोकपाळ कृष्णाचिया ॥ ३ ॥
कृष्णाचिया ओंव्या गाणें गाती गीत । कृष्णमय चित्त जालें त्यांचें ॥४॥
त्यांसि ठावा नाहीं बाहेरिल भाव । अंतरीं[3] च वाव सुख जालें ॥ ५॥
सुखें[4] तया दीस न कळे हे राती । अखंड या ज्योती गोविंदाची॥ ६ ॥
चिंतनें चि धालीं न लगे अन्नपाणी । तुका ह्मणे मनीं समाधान ॥ ७ ॥

॥ ६६ ॥

समाधान त्यांचीं इंद्रियें सकळ । जयां तो[5] गोपाळ समागमें ॥ १ ॥
गोविंदाचा जाला प्रकाश भीतरी । मग त्यां बाहेरी काय काज ॥ २ ॥
काज[6] काम त्यांचे सरले व्यापार । नाहीं आप पर माझें तुझें ॥ ३ ॥
माया सकळांची सकळां ही वरी । विषम तें हरि दिसों नेदी ॥ ४ ॥
दिसे तया आप परावें[7] सारिखें । तुका ह्मणे सुखें कृष्णाचिया ॥ ५ ॥

॥ ६७ ॥

कृष्णाचिया सुखें भुक नाहीं तान । सदा समाधान सकळांचें ॥ १ ॥
कळलें चि नाहीं जाले[8] किती दिस । बाहेरिल वास[9] विसरलीं ॥ २ ॥
विसरु[10] कामाचा तुका ह्मणे जाला । उद्वेग राहिला जावें यावें ॥३ ॥

---

१ त. दे. सकाळिक.—२ पं. कळला हृषीकेशी तेव्हां मग।.—३ पं. अंतरींचें वाव०.—४ पं. सुख तया दीसे०.—५ पं. ते.—६ पं. काम काज.—७ पं. पराचे.—८ पं. किती जाले.—९ पं. यास.—१० पं. विसर.

॥ ६८ ॥

जावें बाहेरी हा नाठवे विचार । नाहीं समाचार ठावा कांहीं ॥ १ ॥
कांहीं न कळे तें कळों आलें देवा । मांडिला रिघावा कवतुक ॥ २ ॥
कवतुकासाटीं भक्त देहावरि । आणिताहे हरि बोलावया ॥ ३ ॥
यासि नांव रूप नाहीं हा आकार । कळला साचार भक्तां[1] मुखें ॥ ४ ॥
मुखें भक्तांचिया बोलतो आपण । अंगसंगें भिन्न नाहीं दोघें[2] ॥ ५ ॥
दोघे वेगळाले लेखिल जो कोणी । तयाचा मेदिनी बहु भार ॥ ६ ॥
तयासी घडलीं सकळ ही पापें । भक्तांचिया कोपें निंदा द्वेषें ॥ ७ ॥
द्वेषियाचा संग न घडावा कोणा । विष जैसी प्राणां नाश करी ॥ ८ ॥
करितां आइके निंदा या संतांची । तया होती ते चि अधःपात ॥ ९ ॥
पतन उद्धार संगाचा महिमा । त्यजावें अधमा संत सेवीं ॥ १० ॥
संतसेवीं[3] जोडे महालाभरासी । तुका ह्मणे यासि नाश नाहीं ॥ ११ ॥

॥ ६९ ॥

नाहीं नाश हरि आठवितां मुखें । जोडतील सुखें सकळ ही ॥ १ ॥
सकळ ही सुखें वोळलीं अंतरीं । मग त्याबाहेरी काय काज ॥ २ ॥
येऊं विसरलीं[4] बाहेरी गोपाळें । तल्लीन सकळें कृष्णसुखें ॥ ३ ॥
सुख तें योगियां नाहीं समाधीस । दिलें गाई वत्स पशु जीवां ॥ ४ ॥
वारला पाऊस केव्हां नाहीं ठावा । तुका ह्मणे देवावांचूनियां ॥ ५ ॥

॥ ७० ॥

यांसि समाचार सांगतों सकळा । चलावें गोकुळा[5] ह्मणे देव ॥ १ ॥

---

१ दे. त. भक्ती मुखें.—२ त. दे. दोघां.—३ त. सेवी संत.—४ पं. ०विसरले बाहेरी गोपाळ । वल्लीन सकळ कृष्ण०.—५ पं. गोपाळा.

देव राखे तया आडलिया काळें । देव सुखफळें देतो दासां ॥ २ ॥
दासां दुःख देखों नेदी आपुलिया । निवारी आलिया न कळतां ॥ ३ ॥
नाहीं मेघ येतां[1] जातां देखियेला । धारीं वरुषला शिळांचिये[2] ॥ ४ ॥
एवढें भक्तांचें[3] सांकडें अनंता । होय निवारिता तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ७१ ॥

काकुलती एकें[4] पाहाती बाहेरी । तया ह्मणे हरि वोसरला ॥ १ ॥
वोसरला मेघ आला होता काळ । बाहेरी सकळ[5] आले लोक ॥ २ ॥
कवतुक जालें ते काळीं आनंद । कळला गोविंद साच भावें ॥ ३ ॥
भावें तयापुढें नाचती सकळें[6] । गाती मंगळें[7] ओंव्या गीत ॥ ४ ॥
गीत गाती ओंव्या रामकृष्णावरी । गोपाळ मोहोरी वाती[8] पांवे ॥ ५ ॥
वत्सें[9] गाई पशू नाचती आनंदें । वेधलिया छंदें गोविंदाच्या ॥ ६ ॥
चित्त वेधियेलें गोविंदें जयाचें । कोण[10] तें दैवाचें तयाहुनि ॥ ७ ॥
तयाहुनि कोणी नाहीं भाग्यवंत । अखंड सांगात गोविंदाचा ॥ ८ ॥
गोविंदाचा संग तुका ह्मणे ध्यान । गोविंद ते जन गोकुळींचे ॥ ९ ॥

॥ ७२ ॥

गोकुळींची गती कोण जाणे परि । पाहों आला वरी इंद्रराव[10] ॥ १ ॥
इंद्रापाशीं मेघ बोलती बडिवार । सकळ संहार करुनि आलों ॥ २ ॥
आतां जीव[11] नाहीं सांगाया ते रानीं । पुरिलें पाषाणीं शिळाधारीं ॥ ३ ॥
रिता कोठें नाहीं राहों[12] दिला ठाव । जल्पती तो भाव न कळतां ॥ ४ ॥

---

१ पं. जातां येतां.—२ पं. शिळांचियां.—३ पं. सांकडें भक्ताचें.—४ पं. एक.—५ पं. सकळ.—६ पं. मंगळ.—७ पं. वाहाती.—८ पं. वत्स.—९ त. कोण दइवाचें.—१० त. इंद्रराव.—११ पं. ०नाहीं जीव सांगावया राणीं.—१२ पं. उरों.

न कळतां देव बळें हुंबरती । साच ते पावती अपमान ॥ ५ ॥
माव न कळतां केली तोंडपिटी । इंद्र आला दृष्टी पाहावया ॥ ६ ॥
पाहतां तें आहे जैसें होतें तैसें । नाचती विशेषें तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ ७३ ॥

नाचतां देखिलीं गाई वत्सें जन । विस्मित होऊन इंद्र ठेला ॥ १ ॥
लागला पाऊस शिळांचिये धारीं[1] । वांचलीं हीं[2] परी कैसीं येथें ॥ २ ॥
येथें आहे नारायण संदेह नाहीं । विघ्न केलें ठायीं निर्विघ्न[3] तें ॥ ३ ॥
विचारितां उचलिला गोवर्द्धन । अवतार पूर्ण कळों आला ॥ ४ ॥
आला गौळियांच्या घरा नारायण । करितो स्तवन इंद्र त्यांचें[4] ॥ ५ ॥
त्यांच्या[5] पुण्या पार कोण करी लेखा । न[6] कळे चतुर्मुखा ब्रह्मयासि ॥ ६ ॥
सीणतां जो ध्यानां[7] न ये एकवेळा । तो तया गोपाळां समागमें ॥ ७ ॥
समागमें गाई वत्स पुण्यवंता ॥ देह कुर्वाळितां[8] अंगसंग ॥ ८ ॥
संग जाला मायबापां लोकपाळां । आळिंगिती गळा कंठाकंठ ॥ ९ ॥
करिते[9] हे जाले स्तुती सकळिक । देव इंद्रादिक गोविंदाची ॥ १० ॥
करितील वृष्टी पुष्पवरुषाव । देवाआदिदेव पूजियेला ॥ ११ ॥
पुष्पांजुळी मंत्र घोष जयजयकार । दुमदुमी अंबर तेणें नादें ॥ १२ ॥
नामाचे[10] गजर गंधर्वांचीं गाणीं । आनंद भुवनीं[11] न माये तो ॥ १३ ॥
तो सुखसोहळा अनुपम्य रासी । गोकुळीं देवासी दोहीं ठायीं ॥ १४ ॥
दोहीं ठायीं सुख दिलें नारायणें । गेला दरुषणें वैरभाव ॥ १५ ॥
भावना भेदाची जाय उठाउठी । तुका ह्मणे भेटी गोविंदाचे[12] ॥ १६ ॥

---

१ पं. शिळांचिया.—२ पं. हे.—३ त. निरविघ्न.—४ त. यांचें.—५ त. यांच्या.—६ पं. नव्हे चतु०.—७ पं. ध्यानीं.—८ त. कुवाळिता.—९ पं. करिता हे स्तुती जाली सकळिक.—१० पं. नामाचा.—११ पं. त्रिभुवनीं नसमाये.—१२ पं. गोविंदाची.

॥ ७४ ॥

गोविंदाचें नाम गोड घेतां वाचे । तेथें[1] हे कैंचे वैरभाव ॥ १ ॥
भावें नमस्कार घातले[2] सकळीं । लोटांगणें[3] तळीं महीवरि ॥ २ ॥
वरि हातबाहे उभारिली देवें । कळलीया भावें सकळांच्या ॥ ३ ॥
सकळ[4] ही वरि बहुडविले स्थळा । चलावें गोपाळा ह्मणे घरा ॥ ४ ॥
राहिलीं हीं[5] नाचों गोविंदाच्या बोलें । पडिलीया डोलें[6] छंदें हो तीं ॥५॥
छंद तो नावरे आपणा आपला । आनंदाचा आला होता त्यांसि ॥ ६ ॥
त्यांच्या[7] तुका ह्मणे आनंदें[8] सकळ । ठेंगणें गोपाळ[9] समागमें ॥ ७ ॥

॥ ७५ ॥

समागमें [10]असे हरि नेणतियां । नेदीं जाऊं वांयां अंकितांसि ॥ १ ॥
अंकितां सावध केलें नारायणें । गोपाळ गोधनें सकळिकां[11] ॥ २ ॥
सकळही जन आले गोकुळासि । आनंद मानसीं सकळांच्या ॥ ३ ॥
सकळांचा केला अंगीकार देवें । न कळतां[12] भावें वांचवी त्यां ॥ ४ ॥
[13]त्यां जाला निर्धार हरि आह्मांपासीं । निवांत मानसीं निर्भर तीं[14] ॥ ५ ॥
निर्भर हे जन गोकुळींचे लोक । केले सकळिक नारायणें ॥ ६ ॥
नारायण भय येऊं नेदी गांवा । तुका ह्मणे नांवा अनुसरे त्या ॥ ७ ॥

॥ ७६ ॥

ये[15] दशे चरित्र केलें नारायणें । रांगतां गोधनें राखिताहे ॥ १ ॥

---

१ पं. तेथें राहे कैंचे देहभाव ।.—२ पं. घातला.—३ पं. लोटांगण.—४ पं सकळा.—५ पं. हे.—६ पं. डोळें छंद०.—७ पं. त्यासीं.—८ पं. आनंद सकळा ।.—९ पं. गोपाळा.—१० पं. हरि असे.—११ पं. सकळही.—१२ त. कळे तें भावें०.—१३ त. त्यांजला०.—१४ पं. ते.—१५ पं. यादृश्य चरित्र०.

हें सोंग सारिलें या रूपें अनंतें ॥ पुढें हि बहु[1] तें करणें आहे ॥ २ ॥
आहे तुका ह्मणे धर्म संस्थापणें[2] । केला नारायणें[3] अवतार ॥ ३ ॥

॥ ७७ ॥

अवतार केला संहारावे[4] दुष्ट । करिती हे नष्ट परपीडा ॥ १ ॥
परपीडा करी दैत्य कंसराव । पुढें तो ही भाव आरंभिला ॥ २ ॥
लाविलें लाघव पाहोनियां संधी । सकळांही[5] वधी दुष्टजना[6] ॥ ३ ॥
दुष्टजन परपीडक जे कोणी । ते[7] या चक्रपाणी न साहति ॥ ४ ॥
न साहवे[8] दुःख भक्तांचें या देवा । अवतार घ्यावा लागे रूप ॥ ५ ॥
रूप हें चांगलें रामकृष्ण नाम[9] । हरे भवश्रम उच्चारितां ॥ ६ ॥
उच्चारितां नाम कंस[10] वैरभावें । हरोनियां जीवें[11] कृष्ण केला ॥ ७ ॥
कृष्णरूप त्यासि दिसे अवघें जन । पाहे तों आपण कृष्ण जाला ॥ ८ ॥
पाहिलें दर्पणीं आधील[12] मुखासि । चतुर्भुज त्यासि तो चि जाला ॥ ९ ॥
जालीं कृष्णरूप कन्या पुत्र भाज । तुका ह्मणे राज्य सैन्य जन ॥ १० ॥

॥ ७८ ॥

सैन्य जन हांसे राया जालें काई । वोसपे[13] तो ठायीं आपणासि ॥ १ ॥
आपणा आपण जयास[14] तीं तैसीं । वैरभाव ज्यांसि भक्ति नाहीं ॥ २ ॥
नाहीं याचा त्याचा भाव एकविध । ह्मणउनि छंद वेगळाले ॥ ३ ॥
वेगळाल्या भावें तीं[15] तया हांसती । तयास दिसती अवघीं हरि ॥ ४ ॥
हरिला कंसाचा जीव भाव देवें । द्वेषाचिया भावें तुका ह्मणे ॥ ५ ॥

---

१ पं. बहुत करणें०.—२ पं. संस्थापन.—३ पं. नारायण.—४ पं. संहारावा.—५ पं. सकळ.—६ पं. दुष्टजन.—७ पं. तयां०.—८ पं. साहे तें दुःख०.—९ त. नाम कृष्णराम ।.—१० त. कौंसें.—११ पं. जीव.—१२ पं. आधिल्या.—१३ पं. वोसणें.—१४ पं. जाय सती तैसी ।.—१५ पं. ते.

॥ ७९ ॥

द्वेषाचिया ध्यानें[1] हरिरूप जाले । भाव हारपले देहादिक ॥ १ ॥
देहादिक कर्मे अभिमान वाढे । तया कंसा जोडे नारायण ॥ २ ॥
नारायण जोडे एकविध भावें । तुका ह्मणे जीवें जाणें लागे ॥ ३ ॥

॥ ८० ॥

जीवभाव त्याचा गेला अभिमान । ह्मणऊनि जन हांसे कंसा ॥ १ ॥
सावध करितां नये देहावरि । देखोनियां दुरि पळे जन[2] ॥ २ ॥
जन वन हरि जालासे आपण । मग हे लोचन झांकियेले ॥ ३ ॥
झांकुनि लोचन मौन्यें चि राहिला[4] । नाहीं आतां बोलायाचें काम ॥४॥
बोलायासि[3] दुजें नाहीं हें उरलें[5] । जन कृष्ण जाले स्वयें रूप ॥ ५ ॥
रूप पालटलें गुण नाम याति । तुका ह्मणे भूतीं देव जाला ॥ ६ ॥

॥ ८१ ॥

जोंलों स्वयें कृष्ण आठव हा चित्तीं । भेदें[6] भयवृत्ति उरली आहे ॥ १ ॥
उरली[7] आहे रूप नांव दिसे भिन्न । मी आणि हा कृष्ण आठवतो ॥ २ ॥
तोंवरि हा देव नाहीं तयापासीं । आला दिसे त्यासि[8] तो चि देव ॥ ३ ॥
देवरूप त्याची दिसे वरी काया । अंतरीं तो भयाभीत भेदें[9] ॥ ४ ॥
भेदें तुका ह्मणे अंतरे गोविंद । साचें[10] विण छंद वांयां जाय ॥ ५ ॥

॥ ८२ ॥

वांयां तैसे बोल हरिशीं अंतर । केले होती चार भयभेदें ॥ १ ॥
भेदभय गेलें नोळखे आपणा । भेटी नारायणा कंसा जाली ॥ २ ॥

---

१ पं. भावें.—२ त. जना.—३ त. बोलायास.—४ पं. राहिलें. ५ त. जाला.—६ पं. भयभेदवृत्ति.—७ पं. उरलें असे.—८ पं. त्यासी.—९ पं. भयें.—१० पं. साचवीण.

जाली भेटी कंसा हरिशीं निकट । सन्मुख चि नीट येरयेरां ॥ ३ ॥
यरयेरां भेटी युद्धाच्या[1] प्रसंगीं[2] । त्याचें शस्त्र अंगीं[3] हाणितलें ॥ ४ ॥
त्याचें वर्म होतें ठावें या अनंता । तुका ह्मणे सत्तामायक हा ॥ ५ ॥

॥ ८३ ॥

नारायणें कंस चाणूर मर्दिला[4] । राज्यीं बैसविला[5] उग्रसेन ॥ १ ॥
उग्रसेन स्थापियेला शरणागत । पुरविला अंत अभक्ताचा ॥ २ ॥
अवघें चि केलें कारण अनंतें । आपुलिया हातें सकळ ही ॥ ३ ॥
सकळ ही केलीं आपुलीं अंकित । राहे गोपीनाथ मथुरेसि ॥ ४ ॥
मथुरेसि आला वैकुंठनायक । जालें सकळिक एक राज्य ॥ ५ ॥
राज्य दिलें उग्रसेना शरणागता । सोडविलीं[6] माता पिता दोन्ही ॥ ६ ॥
सोडवणे धांवे भक्ताच्या कैवारें । तुका ह्मणे करें शस्त्र धरी ॥ ७ ॥

॥ ८४ ॥

धरी दोही ठायीं सारखा चि भाव । देवकी वसुदेव नंद दोघे ॥ १ ॥
दोन्ही एके ठायीं केल्या[7] नारायणें । वाढविला तिणें आणि व्याली ॥ २ ॥
व्याला वाढला हा आपल्या[8] आपण । निमित्या कारणें मायबाप ॥ ३ ॥
माय हा जगाची बाप नारायण । दुजा करी कोण यत्न यासि ॥ ४ ॥
कोण जाणे यांचे[9] अंतरींचा भाव । कळों नेदी माव तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ८५ ॥

दिनाचा कृपाळु दुष्टजना काळ । एकला सकळ व्यापक हा ॥ १ ॥
हांसे बोले तैसा नव्हे हा अनंत । नये पराकृत ह्मणों यासि ॥ २ ॥

---

१ त. यौद्धयाच्या.—२ पं. प्रसंगे.—३ त. , आंगा हांतिले त्या ।.—४ पं. मर्दिले.—५ पं. स्थापियेलें उग्रसेना.—६ पं. केलीं.—७ पं. आपणा.—८ पं. त्याच्या.—९ पं. तुका ह्मणे माव कळों नेदी.

यासि कळावया एक भक्तिभाव । दुजा नाहीं ठाव धांडोळितां ॥ ३ ॥
धांडोळितां श्रुति राहिल्या निश्चित । तो करी संकेत गोपींसवें ॥ ४ ॥
गोपिकांची वाट पाहे द्रुमातळीं । मागुता न्याहाळी न देखतां ॥५॥
न देखतां त्यांसि उठे बैसे पाहे । वेडावला राहे वेळोवेळां ॥ ६ ॥
वेळोवेळां पंथ पाहे गोपिकांचा । तुका ह्मणे वाचा नातुडे तो[1] ॥७॥

॥ ८६ ॥

तो बोले कोमळ निष्ठुर साहोनि । कोपतां गौळणी हास्य करी ॥१॥
करावया[2] दास्य भक्तांचें निर्लज्ज । कवतुकें रज माथां वंदी ॥ २ ॥
दिलें उग्रसेना मथुरेचें राज्य । सांगितलें काज करी त्याचें ॥ ३ ॥
त्यासि होतां[3] कांहीं अरिष्टनिर्माण । निवारी आपण शरणागता ॥ ४ ॥
शरणागतां राखे सर्व भावें हरि । अवतार धरी तयांसाटीं ॥ ५ ॥
तयांसाटीं वाहे सुदर्शन गदा । उभा आहे[4] सदा सांभाळित ॥ ६ ॥
तळमळ नाहीं तुका ह्मणे चित्ता । भक्तांचा अनंता भार माथां ॥ ७ ॥
मारिले असुर दाटले[5] मेदिनी । होते कोणाकोणी पीडित ते ॥ ८ ॥
ते[6] हा नारायण पाठवी अघोरा । संतांच्या मत्सरा घातावरी[7] ॥ ९ ॥
वरिले[8] ते दूतीं यमाचिया दंडीं । नुच्चारितां तोंडीं नारायण[9] ॥ १० ॥
नारायण नाम नावडे जयांसि[10] । ते जाले मिरासी कुंभपाकीं ॥ ११ ॥
कुंभपाकीं सेलें[11] मान तो तयांचा । तुका ह्मणे वाचा संतनिंदा[12] ॥१२॥

॥ ८७ ॥

वास नारायणें केला मथुरेसि । वधूनि दुष्टांसि तये ठायीं ॥ १ ॥

१पं. जो.—२त. करावें या कामें भक्ताचे०.—३पं. कांहीं होतां.—४पं. असे.—५पं. वाढल्या.—६ पं. तयां नारा०.—७ पं. "घातावारी" असतां "घातावारा" असें केलें आहे.—८ पं. वारिले ते दुरीं.—९ त. नारायणा.—१० त. तयासि.—११ पं. "शेल" असतां "शेले" असें केलें आहे.—१२ त. संत निंदी.

ठायीं पितियाचे मानी उग्रसेना । प्रतिपाळी[1] जनांसहित लोकां ॥ २ ॥
लोकां दुःख नाहीं मागील आठव । देखियेला देव दृष्टी त्यांणीं ॥ ३ ॥
देखोनियां देवा विसरलीं, कंसा । ठावा नाहीं ऐसा होंता येथें ॥ ४ ॥
येथें दुजा कोणी नाहीं कृष्णाविणें । ऐसें वाटे मनें काया वाचा ॥ ५ ॥
काया वाचा मन[2] कृष्णीं रत जालें । सकळां लागलें कृष्णध्यान ॥ ६ ॥
ध्यान गोविंदाचें लागलें[3] या लोकां । निर्भर हे तुका ह्मणे चित्तीं ॥ ७ ॥

॥ ८८ ॥

चिंतले पावलीं[4] जयां कृष्णभेटी । एरवीं ते आटी वांयांविण ॥ १ ॥
वासना धरिती कृष्णाविणें कांहीं । सीण केला तिहीं साधनांचा ॥ २ ॥
चाळविले[5] दंभें एक अहंकारें । भोग जन्मांतरें न चुकती ॥ ३ ॥
न चुकती भोग तपें दानें व्रतें । एका त्या अनंतवांचूनियां ॥ ४ ॥
चुकवुनि जन्म देईल[6] आपणा । भजा नारायणा तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ८९ ॥

भजल्या गोपिका सर्व भावें देवा । नाहीं चित्तीं हेवा दुजा कांहीं ॥ १ ॥
दुजा छंदु नाहीं तयांचिये मनीं । जागृति सपनीं[7] कृष्णध्यान ॥ २ ॥
ध्यान ज्यां हरीचें हरीसि तयांचें । चित्त ग्वाही ज्यांचें तैशा भावें ॥ ३ ॥
भाग्यें[8] पूर्वपुण्यें आठविती लोक । अवघे सकळिक मथुरेचे ॥ ४ ॥
मथुरेचे लोक सुखी केले जन । तेथें नारायण राज्य करी ॥ ५ ॥
राज्य करी गोपीयादवांसहित । कर्मिलें बहुतकाळ तेथें ॥ ६ ॥
तेथें दैत्यीं[9] उपसर्ग[10] केला लोकां । रचिली[11] द्वारका तुका ह्मणे ॥ ७ ॥

---

१ दे. त. प्रतिपाळ.—२ पं. मने.—३ पं. लागलेंसे लोकां।—४ पं. चिंतिलीं पावलें.—५ पं. चाळविलीं दंभें एका.—६ पं. दाखवी.—७ पं. स्वपनीं.—८ पं. भाग्य पूर्वपुण्य.—९ त. दैवीं.—१० पं. केला उपसर्ग.—११ त. रचली.

॥ ९० ॥

रचियेला गांव सागराचे पोटीं । जडोनि गोमटीं नानारत्नें ॥ १ ॥
रत्नें खण्डोखणी सोनियाच्या भिंती । लागलिया ज्योति रविकळा ॥ २ ॥
कळा सकळ ही गोविंदाचे हातीं । मंदिरें निगुतीं उभारिलीं ॥ ३ ॥
उभारिलीं दुर्गें दारवंठे[1] फांजी । कोटि[2] चर्या माजी शोभलियां[3] ॥ ४ ॥
शोभलें उत्तम गांव सागरांत । सकळांसहित आले हरि ॥ ५ ॥
आला नारायण द्वारका[4] नगरा । उदार या शूरा[5] मुगुटमणि ॥ ६ ॥
निवडीना याति समान चि केलीं । टणकें धाकुलीं नारायणें ॥ ७ ॥
नारायणें दिलीं अक्षई मंदिरें । अभंग साचारें सकळांसि ॥ ८ ॥
सकळ ही धर्मशीळ पुण्यवंत । पवित्र विरक्त नारीनर ॥ ९ ॥
रचिलें तें देवें न मोडे कवणा । बळियांचा राणा नारायण ॥ १० ॥
बळबुद्धीनें[6] तीं देवा च सारिखीं । तुका ह्मणे मुखीं गाती ओंव्या ॥ ११ ॥

॥ ९१ ॥

गाती ओंव्या कामें करितां सकळें[7] । हालवितां बाळें[8] देवावरी ॥ १ ॥
ऋद्धिसिद्धी दासी दारीं ओळंगती । सकळ[9] संपत्ति सर्वां घरीं ॥ २ ॥
घरीं बैसलिया जोडलें निधान । करिती कीर्तन नरनारी[10] ॥ ३ ॥
नारीनर लोक धन्य त्यांची याति । जयांसि संगति गोविंदाची ॥ ४ ॥
गोविंदें गोविंद केले लोकपाळ । चिंतनें सकळ तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ९२ ॥

कांहीं चिंता कोणा नाहीं कोणेविशीं । करी द्वारकेसि राज्य देव ॥ १ ॥

---

१ पं. द्वारवंट फांजी ।.—२ त. कोठ.—३ त. °यां.—४ त. द्वारके नगरा.—५ पं. सुरा.—६ पं. बळबुद्धीनीति देवाची सा०.—७ पं. सकळ.—८ पं. बाळ.—९ पं. सफळ.—१० पं. नारीनर.

द्वारकेसि राज्य करी नारायण । दुष्ट संहारून धर्म पाळी ॥ २ ॥
पाळी वेदआज्ञा ब्राह्मणांचा मान । अतीतपूजन वैष्णवांचें ॥ ३ ॥
अतीत अलिप्त अवघियां वेगळा । नाहीं हा गोपाळा अभिमान[1] ॥ ४ ॥
अभिमान नाहीं तुका ह्मणे त्यासि । नेदी आणिकासि धरूं देव ॥ ५ ॥

॥ ९३ ॥

धरियेलें रूप कृष्ण नाम बुंथी । परब्रह्म क्षिती उतरलें ॥ १ ॥
उत्तम हें नाम राम कृष्ण जगीं । तरावयालागीं भवनदी ॥ २ ॥
दिनानाथाब्रिदें रुळती चरणीं । वंदितील मुनि देव ऋषि ॥ ३ ॥
ऋषीं मुनीं भेटी दिली नारायणें । आणीक कारणें बहु केलीं ॥ ४ ॥
बहु कासावीस जाला भक्तांसाटीं । तुका ह्मणे आटी सोसियेली ॥ ५ ॥

॥ ९४ ॥

सोसियेली आटी गर्भवास फेरे । आयुधांचे भारे वागवितां ॥ १ ॥
वाहोनि सकळ आपुलिये माथां । भार दासां चिंता वाहों नेदी ॥ २ ॥
नेदी काळाचिये हातीं सेवकांसि । तुका ह्मणे ऐसी ब्रिदावळी ॥ ३ ॥

॥ ९५ ॥

ब्रिदावळी ज्यांचे रुळते[2] चरणीं । पाउलें मेदिनी सुखावे त्या ॥ १ ॥
सुखावे मेदिनी कृष्णाचिये चालीं । कुंकुमें शोभलीं होय रेखा ॥ २ ॥
होउनि भ्रमर पाउलांचें सुख । घेती भक्त मुख लावूनियां ॥ ३ ॥
याचसाटीं धरियेला अवतार । सुख दिलें फार निजदासां ॥ ४ ॥
निज सुख तुका ह्मणे भक्तां ठावें । तींहीं च जाणावें भोगूं त्यासि ॥ ५ ॥

---

१ पं. अभिमान तुका ह्मणे नाहीं त्यांसी । त. नाहीं मान तुका ह्मणे त्या देवासी ।.—२ पं. ज्यातें रुळती.

॥ ९६ ॥

भोगिला[1] गोपिकां यादवां सकळां । गौळणीगोपाळां गाईवत्सां ॥ १ ॥
गाती धरीवरी केला अंगसंग । पाहिला श्रीरंग डोळेभरि ॥ २ ॥
भक्ति नवविधा तयांसी घडली । अवघीं च केलीं कृष्णरूप ॥ ३ ॥
रूप दाखविलें होतां[2] भिन्न भाव । भक्त आणि देव भिन्न नाहीं ॥ ४ ॥
नाहीं राहों दिलें जातां निजधामा । तुका ह्मणे आह्मांसहित गेला ॥ ५ ॥

॥ ९७ ॥

गेला कोठें[3] होता कोठुनियां आला । सहज व्यापला आहे नाहीं ॥ १ ॥
आहे साच भावें सकळव्यापक[4] । नाहीं अभाविक लोकां कोठें ॥ २ ॥
कोठें नाहीं ऐसा नाहीं रिता ठाव । अनुभवी[5] देव स्वयें जाले[6] ॥ ३ ॥
जातों येतों आह्मी देवाचें सांगात[7] । तुका ह्मणे गात देवनाम ॥ ४ ॥

॥ ९८ ॥

मना वाटे तैसीं[8] बोलिलों वचनें । केली धिटपणें सलगी देवा ॥ १ ॥
वाणी नाहीं शुद्ध याति एक ठाव । भक्ति नेणें भाव नाहीं मनीं ॥ २ ॥
नाहीं जालें ज्ञान पाहिलें अक्षर । मानी जैसें थोर थोरी नाहीं ॥ ३ ॥
नाहीं मनीं लाज धरिली आशंका । नाहीं भ्यालों लोकां चतुरांसि ॥ ४ ॥
चतुरांच्या राया मी तुझें अंकित । जालों शरणागत देवदेवा ॥ ५ ॥
देवा आतां करीं सरतीं[9] हीं वचनें । तुझ्या कृपादानें बोलिलों तीं ॥ ६ ॥
तुझें देणें तुझ्या[10] समर्पूनि पायीं । जालों उतरायी पांडुरंगा ॥ ७ ॥
रंकाहुनि रंक दास मी दासांचें । सामर्थ्य[11] हें कैचें बोलावया ॥ ८ ॥
बोलावया पुरे वाचा[12] माझी कायी । तुका ह्मणे पायीं ठाव द्यावा ॥ ९ ॥

---

१ पं. भोगिल्या.—२ त. होतें भिन्नभावें । भक्ता आणि देवें भेदे नाहीं ।.—३ पं. होता कोठें.—४ पं. सकळा व्यापक.—५ पं. अनुभवें.—६ त. जालें.—७ त. सांगातें.८ पं. मानीजेसे.—९ पं. "हीं" नाहीं.—१० पं. तुज.—११ पं. सामर्थ्य हें मज कैचें०.—१२ पं. माझी वाचा.

॥ ९९ ॥

चारी वेद ज्याची कीर्ती वाखाणिती । प्रत्यक्ष ये मूर्ति-विठोबाची ॥ १ ॥
चहुयुगांचें हें साधन साधिलें । अनुभवा आलें आपुलिया ॥ २ ॥
एवढें करूनि आपण निराळां । प्रत्यक्ष हें डोळां दाखविलें ॥ ३ ॥
दावुनि सकळ प्रमाणाच्या युक्ति । जयजयकार करिती अवघे भक्त ॥ ४ ॥
भक्ति नवविधा पावली मुळची । जनार्दननामाची संख्या जाली ॥ ५ ॥
नवसें ओंव्या आदरें वाचितां । त्याच्या मनोरथा कार्यासिद्धि ॥ ६ ॥
सीमा न करवे आणीक ही सुखा । तुका ह्मणे देखा पांडुरंगा ॥ ७ ॥

---

१ त. पं. या दोन्ही प्रतींत हा अभंग नाहीं, फक्त देहूच्या प्रतींत आहे.

॥ इति बालक्रीडा संपूर्णमस्तु ॥

देहू व तळेगांव या प्रतींत खालीं लिहिल्या प्रमाणें ज्यांचा आरंभ झालेला नाहीं असे पंढरपुरच्या प्रतींतले अभंग.

॥ १ ॥

सिंदळीचें चित्त परपुरुषावरी । पति चरमुरी रात्रदिवस ॥ १ ॥
॥ध्रु.॥ऐसी ते वोंगळी जाय वो नरका । तिच्या दोषा देखा पति जाय ॥ ध्रु ॥
आपण बुडती पती बुडविती । दोन्ही कुळें नेती अधःपाता ॥ २ ॥
तुका ह्मणे तिची न करावी संगती । होईल फजिती मागें पुढें ॥ ३ ॥

॥ २ ॥

हे चि व्हावी माझी आस । जन्मोजन्मीं तुझा दास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदीं हरी ॥ ध्रु ॥
संतसंग सर्वकाळ । अखंड प्रेमाचा सुकाळ ॥ २ ॥
चंद्रभागे स्नान । तुका मागे हें चि दान ॥ ३ ॥

॥ ३ ॥

आन नेघों देसी तरी । रिद्धि सिद्धि मुक्ति चारी ॥ १ ॥
संतसंग सर्वकाळ । थोर प्रेमाचा सुकाळ ॥ २ ॥
तुका ह्मणे नाम । तेणें पुरे माझें काम ॥ ३ ॥

॥ ४ ॥

दिवाळखोर नारायण । यावरी बहुतांचें ऋण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उठतां चि उभे द्वारीं । अवघे दे दे ह्मणती हरी ॥ ध्रु ॥

भाजघरीं देड हरी । माया तडकी आड करी ॥ २ ॥
युगायुगींचें हें ऋण । ह्मणउनि धरिलेंसे मौन्य ॥ ३ ॥
रोखापत्र पाहीं । वेदशास्त्र देती ग्वाही ॥ ४ ॥
धनकोनाम तुका वाणी । रिणकोनाम विठ्ठल धणी ॥ ५ ॥

॥ ५ ॥

गरुडाचे पायीं । ठेवीं वेळोवेळां डोई ॥ १ ॥
॥ध्रु.॥ वेगीं आणावा तो हरी । मज दीनातें उद्धरी ॥ ध्रु ॥
पाय लक्ष्मीच्या हातीं । तिसी यावें काकुलती ॥ २ ॥
तुका ह्मणे शेषा । जागे करा हृषीकेशा ॥ ३ ॥

॥ ६ ॥

जाळी महाकर्मे । दावी निजसुखवर्मे ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ ऐसें कळलें आह्मां एक । जालों नामाचे धारक ॥ ध्रु ॥
तपाचे सायास । नलगे घ्यावा वनवास ॥ २ ॥
तुका ह्मणे येणें । कळिकाळ हें ठेंगणें ॥ ३ ॥

॥ ७ ॥

माझ्या वडिलांची मिराशी देवा । तुझी चरणसेवा पांडुरंगा ॥ १ ॥
उपास पारणीं राखिला दारवंटा । केला भोगवटा आह्मांलागीं ॥ २ ॥
वंशपरंपरा दास मी अंकित । तुका मोकलितां लाज कोणा ॥ ३ ॥

॥ ८ ॥

आनंद अद्वय नित्य निरामय । जे कां नित्य ध्येय योगियांचे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ते हे समचरण साजिरे विटेवरी । पाहा भीमातीरीं विठ्ठलरूप ॥ ध्रु ॥

पुराणासी वाड श्रुति नेणती पार। तें जालें साकार पुंडलिका ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्यातें सनकादिक ध्यात । तें आमुचें कुळदैवत पांडुरंग ॥ ३ ॥

॥ ९ ॥

संतकृपा जाली । इमारत फळा आली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ज्ञानदेवें रचिलें पाया । रचियेलें देवालया ॥ ध्रु ॥
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ॥ २ ॥
जानार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥ ३ ॥
भजन करा सावकाश । तुका ह्मणे सेवा कळस ॥ ४ ॥

॥ १० ॥

त्याचिया चरणा माझें दंडवत । ज्याचें धन वित्त पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें माझा जीव पावला विसावा । ह्मणउनी हावा भरलोंसें ॥ ध्रु
चरणीचें रज लावीन कपाळा । जे पदें राउळा सोयी जाती ॥ २ ॥
आणीक तें भाग्य येथें फुरवंडी । करुनियां सांडी इंद्रा ऐसी ॥ ३ ॥
वैष्णवांच्या घरीं देवाची वसति । विश्वास हा चित्तीं सर्वभावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे सखे हरिचे ते दास । आतां पुढें आस दुजी नाहीं ॥ ५ ॥

॥ ११ ॥

पाळुनियां गोमटे । त्याच्या बोलें वोळखी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जवळुनी न वजे दुरी । लाडें करी कवतुक ॥ ध्रु ॥
खुण उभा इटेवरी । कट करीं धरियेले ॥ २ ॥
तुका ह्मणे घातली वरी । झुली थोरी मोलाची ॥ ३ ॥

॥ १२ ॥

आतां काय विठो पाहासील अंत । आलों शरणागत तुजलागीं ॥ १ ॥

॥ध्रु.॥ करीं अंगीकार राखें पायांपाशीं । झणी दिसों देशी कीविलवाणें ध्रु
नाहीं ऐकिली मागें ऐसी मात । जे त्वां शरणागत उपेक्षिले ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा धरीं अभिमान । आहेसी तूं दानशूर दाता ॥ ३ ॥

॥ १३ ॥

मीतूंपण ऐसी परी । जैसें लवण सागरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दोहीं माजी एक जाणा । विठ्ठल पंढरीचा राणा ॥ ध्रु ॥
देव भक्त ऐसी बोली । जंव भ्रांति नाहीं गेली ॥ २ ॥
तंतुपट जैंवी एक । जैसा विश्वेशीं व्यापक ॥ ३ ॥
एका जनार्दनीं कृपा । जगीं विश्रांति कैंची बापा ॥ ४ ॥

॥ १४ ॥

नेणें जप तप जीवासी आटणी ॥ मनासी दाटणी नाहीं केली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं आणुनियां समर्पिलें जळ । सेवा ते केवळ चिंतनाची
॥ ध्रु ॥
बैसलिया ठायीं पोकारिला धांवा ॥ सांकडें तें देवा निवारावें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी वेचिलीं उत्तरें । घेतलीं उदारें साचभावें ॥ ३ ॥

॥ १५ ॥

जेणें देवा तुह्मी करा अंगीकार । हा नाहीं विचार मजमाजी ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आतां दोहीं पक्षीं लागलें लांछन । देवभक्तपण लाजविलें ॥ ध्रु ॥
एकांत एकलें मन हें निश्चळ । न राहे चपळ एके ठायीं ॥ २ ॥
महत्वाची पायीं पडिली शृंखळा । बांधविला गळा स्नेहाहातीं ॥ ३ ॥
शरीर सोकलें देखिलिया सुखा । कदान्न तें मुखा रुची नेदि ॥ ४ ॥
तुका ह्मणे जाला अवगुणांचा थारा । वाढविली निद्रा आळस बहु ॥५॥

॥ १६ ॥

कीर्ति चराचरीं आहे तैसी आहे । भेटुनि त्वां काय द्यावें आह्मां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घेउनि धरणें बैसति उपवासी । हा हाट आह्मांसी नाहीं तैसा
॥ ध्रु ॥
तांतडी तयांनीं केली विटंबणा । आह्मां नारायणा काय उणें ॥ २ ॥
नाहीं मुक्ती चाड वास वैकुंठींचा । पिकलीसे वाचा रामनामें ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय व्हावें उतराई । जीव ठेवूं पायीं संतांचिया ॥ ४ ॥

॥ १७ ॥

आतां मज तरी सांगसील भावें । काय म्यां करावें ऐसें देवा ॥ १ ॥
वर्म चुकलिया नव्हे तें कारण । केला होय शीण आवघा चि ॥ २ ॥
तुका ह्मणे नको पाहों हें निर्वाण । देई कृपादान याचकासी ॥ ३ ॥

॥ १८ ॥

कासवीचें बाळ वाढे कृपादृष्टी । दुधा नाहीं भेटी अंगसंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नये दाखवितां प्रेम बोलतां सांगतां । अनुभव चित्ता चित्त जाणे
॥ ध्रु ॥
पोंटामध्यें कोणें सांगितलें सर्पा । उपजत लपा ह्मणऊनी ॥ २ ॥
सांगों नेणे परी जाणे गोड क्षार । अंतरी विचार त्यासी ठावा ॥ ३ ॥
तुका ह्मणे हें तों विचारावें मनीं । आणीक भल्यांनीं पुसूं नये ॥ ४ ॥

॥ १९ ॥

एक ह्मणती आह्मी देव चि पैं जालों । ऐसें नका बोलों पडाल पतनीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ एक ह्मणती आह्मीं देवाचीं पैं रूपें । तरी तुमचिया बापें न चुके जन्म
॥ ध्रु ॥

देवें उचलिली स्वकरें मेदिनी । तुमचेनीं गोणी नुचलवे ॥ २ ॥
देवें मारियेले दैत्य दानव मोटे । तुमचेनीं न तुटे तृणमात्र ॥ ३ ॥
राया विठोबाचें पद जो अभिळाषी । पातकाची राशी तुका ह्मणे ॥४ ॥

॥ २० ॥

जयासी नावडे संतांचा संग । जाणावा तो मांग जन्मांतरींचा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अपवित्र वाचा जातीचा अधम । आचरण धर्म नाहीं तया ॥ध्रु॥
मंजुळ वचनीं बचनागाची कांडी । सेवटींची घडी जीव प्राणा ॥ २ ॥
तुका ह्मणे ज्याचा पिता नाहीं शुद्ध । तयासी गोविंद अंतरला ॥ ३ ॥

॥ २१ ॥

आंगीं भरला ताठा । तळणी नये जैसा खुंटा ॥ १ ॥
किती सांगावें त्या डेंगा । हित आदळेना आंगा ॥ २ ॥
तुका ह्मणे अनु । मुसळाचें नव्हे धनु ॥ ३ ॥

॥ २२ ॥

मागितल्याची परती करा । उरी धरा कांहीं बाही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनी सारिली आस । होती यास मूळ ते ॥ ध्रु ॥
माझ्या मोहें तुज पान्हा । लोटे स्तना वोरसे ॥ २ ॥
तुका ह्मणे आळवणे । माझ्या देणें उत्तरा ॥ ३ ॥

॥ २३ ॥

आंगीं लावुनियां राख । डोळे झाकुनी करिती पाप ॥ १ ॥
वैराग्याची कळा । भोगिती विषयाचा सोहाळा ॥ २ ॥
तुका ह्मणे सांगों किती । जळो तयांची संगति ॥ ३ ॥

॥ २४ ॥

पुराणिक ह्मणविती । जाणोनी कांदे भक्षिती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अगस्तीचें मूत्र मळ । लाउनी ह्मणति कृष्णावळ ॥ ध्रु. ॥
श्रेष्ठ वर्ण ब्राह्मणाचा । संग न सुटे शूद्रीचा ॥ २ ॥
बदराहीच्या पाडी दाढा । लागे तुकयाचा हुंदाडा ॥ ३ ॥

॥ २५ ॥

जयाची वदे पूर्ण वेदांतवाणी । ह्मणावें कसें हो तयालागि वाणी ॥
परब्रह्मरूपी असा जो तुकावा । तयाचे तुकीं असा कोण तुकावा ॥१॥
जयादर्शनें स्पर्शनें मुक्त होती । तुका नाम वाचे आणिताती ॥
पुनर्जन्म त्या प्राणियालागिं कैंचा । तुकारामि वाणीं जया नाम वाचा ॥२॥
परंधाम टाकून कैसा उडाला । जीवन्मुक्त होऊनी ब्रह्मीं बुडाला ॥
जयाची तनु ब्रह्मरूपीं बुडाली । भवभ्रांति हे जाण कैसी गळाली ॥३॥
तुका यासि कोठें तुकायासि दिसेना । जनीं हिंडतांना तुकावा दिसेना ॥
तुका वा तो कसा चतुर्भुज जाला ॥ निराकार ब्रह्मीं स्वरूपीं निराळा ॥४॥
तुका ब्रह्मरूपी स्वरूपीं रहातो । जया दीपन्यायें जयासी पाहातो ॥
तुका बैसला ज्ञानवैराग्यधामीं ॥ वसे चित्कळा पूर्णब्रह्मीं आरामीं ॥५॥
जयाचे मुखीं भारती वेदमाता । तया प्राप्तिची कायसी जाण चिंता ॥
निजानंदआनंद तो मग्न झाला । निराकार ब्रह्मस्वरूपीं मिळाला ॥ ६ ॥
कृपासागरें नाव निर्माण केली । असंख्यात बुद्धी तरोनी च गेली ॥
पुढें ही तरायासी उपाय केला । ह्मणोनी तुका मृत्यलोकासी आला ॥७॥
कसें भर्जिलें तें बीज उगवेना । तसें सर्व संपादिलें तें कळेना ॥
पाहा बोध त्या जाहला वामनाला । सुखाचा गमे पूर्ण ठेवा मनाला ॥ ८ ॥

॥ २६ ॥

मना या साक्षीसी जाली सांगों मात । सकळ वृत्तांत आपुला तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मां परामृष घेतां सत्ताबळें। धरितां निराळे कैसीं वांचों ॥ ध्रु ॥
मी माझी सांडोनी यावया पसारा । आणीक दातारा काय काज ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी तुज विणें एका । निढळ लौकिकामाजी असों ॥ ३॥

॥ २७ ॥

उपजोनी मरों कीति वेळोवेळा । कोणा कळवळा येत माझा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनी धांवा करी काकुलती । धावें बा श्रीपती सोडावया ॥ध्रु॥
बहुत या काळें केलों भयाभीत । येतों गिवसीत पाठिलागीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी दावितां स्वरूपे । माझें कांहीं पाप निरसतें ॥ ३ ॥

॥ २८ ॥

हाका मारी ज्याच्या नांवें । त्याचें गांव चि नाहीं ठावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय गातों हें कळेना । राग आळवितों नाना ॥ ध्रु ॥
आशा धरूनियां मनीं । कांहीं देईल ह्मणउनी ॥ २ ॥
वितीभरी पोटासाटीं । तुका ह्मणे पडिली तुटी ॥ ३ ॥

॥ २९ ॥

संतचरणीं नाहीं गोडी । ज्यासि विषयीं आवडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्यासि कैंचा भेटे देव । संतचरणीं नाहीं भाव ॥ ध्रु ॥
संतसेवेसि आंग चोरी । दृष्टी न पडो तयावरी ॥ २ ॥
पाहे गुणदोष संतांचे । जळो काळें तोंड त्याचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे संतसेवा । आमुच्या पूर्वजांचा ठेवा ॥ ४ ॥

॥ ३० ॥

स्वप्नींचें धन चित्रींच्या ब्राह्मणा। जातकर्म जाणा वांटिती पैं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तैसें शब्दज्ञान करिती चावटी। ज्ञान पोटासाटीं विकूनियां ॥ध्रु॥
बोलाची च कढी बोलाचा चि भात। जेउनियां तृप्त कोण जाला ॥ २ ॥
कागदीं लिहीतां नामाची साकर। चाखतां मधुर कैंवि लागे ॥ ३ ॥
तुका ह्मणे जळो तैसें ज्ञानबंड। यमपुरी दंड कठिण आहे ॥ ४ ॥

॥ ३१ ॥

आतां बरें धरीं। आपली उरी आपणापें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाईट बरें न पडे दृष्टी। मग कष्टी होईजे ना ॥ ध्रु ॥
बोलों जातां वाढे बोल। वायां फोल खटपट ॥ २ ॥
काकुलती यावें देवा। तों तो सेवा इच्छितो ॥ ३ ॥
हिशेबाचें खोटें साटें। खटपट तुटेना ॥ ४ ॥
तुका ह्मणे कळों आलें। दुसरें भलें तें नव्हे ॥ ५ ॥

॥ ३२ ॥

कारणापें असतां दृष्टी। काम पोटीं नुपजे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शूर मिरवे रणांगणीं। मरणीं च संतोषे ॥ ध्रु ॥
पाहिजे तो कळवळा। मग बळा काय उणें ॥ २ ॥
तुका ह्मणे उदारपणें। काय उणें मनासी ॥ ३ ॥

॥ ३३ ॥

कायेंकरुनि करी धंदा। चित्त गोविंदा तुझे पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐशा संकल्पाची संधी। माझे बुद्धी धीर देवा ॥ ध्रु ॥
कुटुंबाचा तुह्मां भार। मज व्यवहारनिर्मित्य ॥ २ ॥
तुका ह्मणे करितां काम। त्वदर्थीं नाम धरीन ॥ ३ ॥

॥ ३४ ॥

आजि नव्हे कालिच्या ऐसें । अनारिसें पालटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां लागवेग करा । ज्याचें धरा टाकें तें ॥ ध्रु ॥
नका सांगों वाउग्या गोटी । चाहुल खोटी येठायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मोडा माग । आपल्या लागवरूनी ॥ ३ ॥

॥ ३५ ॥

खाणोरियांचीं पुसों घरें । जीं हीं बरीं पाळती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांगति त्या जावें वाटा । धरूनी पोटामध्यें गोष्टी ॥ ध्रु ॥
आली गेली होती ठाया । सत्य छाया कळली ॥ २ ॥
तुका ह्मणे आपुलें बळ । युक्ति काळ कारण ॥ ३ ॥

॥ ३६ ॥

स्वगोत्रींचा पुत्र परगोत्रीं अर्पिला । विभागा मुकला पितृधना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें मजलागीं न धरावें दुरी । नव्हे परगोत्री पोटिचा चि ॥ध्रु॥
सुतकासी त्याचे नाहीं प्रयोजन । जनिता ह्मणोनि तीन दिवस ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं ठावें हें कोणासी । पुसावें वेदांसी देती ग्वाही ॥ ३॥

॥ ३७ ॥

एक ब्रह्मचारी गाढवा झोंबतां । हाणोनियां लाता पळालें तें ॥ १ ॥
गाढवही गेलें ब्रह्मचर्य गेलें । तोंड काळें झालें जगामाजी ॥ २ ॥
होणार तैसें जालें हें नातैसें केलें ॥ तुका ह्मणे गेलें वांयां चि तें ॥३॥

तुकारामबांवाच्या अभंगांतील कठिण शब्दांचा कोश.

अ.

अकळ अथवा आकळ—न कळण्यासारखा.
अखम—अक्षम, पंगु.
अखय—अक्षय.
अगुणा—निर्गुण, गुणशून्य. २ द्वाड, खोडकर.
अंगुलें—अंगठी.
अंगेजणें—अंगीकारणें.
अघोरजप—पिशाचमंत्रजप.
अठरा—अठरा पुराणें.
अठोनी वेठोनी—अडवातिडवा, वेडावांकडा.
अडबंद—कस्ट्रोटा, कटदोरा.
अडांखा अ. आडांखा—धोरण, युक्ति. २ ताळा.
अत्यंत—प्रत्यक्ष अनुभव.
अधीलपणा—श्रेष्ठपणा, मुख्यपणा, पहिलेपणा.
अनर्गळ—निष्प्रतिबंध, स्वच्छंदी.
अनामिक—अंत्यज, महार इ०.
अनारिसें अ. आनारिसें—वेगळें, अन्य.
अनु अ. आणु—अन्य, अणीक.
अनुहात (ध्वनि)—अविच्छिन्न योगादिधारणेनें जो दशनादांचा ध्वनि ऐकूं येतो तो. (अनुहत हें शुद्ध.)
अबाळ—हाल, विपत्ति.
अबोळणा—न बोलण्यासारखा.
अभंड—विपुल, पुष्कळ.
अभिन्नव—नवल, अभिनव.
अभिळास—अभिलाष.
अभुक—भूक नाहीं अशी स्थिति, तृप्ति.
अरोथा—अपूर्व इच्छा.
अवकळा—तेजोहानि, तेजोभंग, फजीती, स्वरूपनाश.
अवगणी—सोंग.
अवगणें अ. आवगणें—ओळखणें.
अवश्वरा— अवसरा
अशुद्ध—रक्त.
अशुभीं—अशुभीं.
असट—पातळ, पाणचट.
असमाई—असह्य.
असुक—असुख.
असेरया—आश्रया.
असोशी—हांव, उत्कंठा.
अहिक्य अ. आहिक्य—ऐक्य.

आ.

आइत अ. आइतीं—सामग्री, तयारी, सामान, साहित्य.
आउठावे अ. औठावे—(४३२५—३).
आकळ—सत्यज्ञान, परब्रह्म.
आगळा—अधिक, फार मोठा.
आगा—मोठा, श्रेष्ठ.
आगोज—अगाध, भयंकर, मोठें.
आचावाचे—बडबड.
आचीतत्या—(३६०३—ध्रु.).
आट—आड, हरकत.
आटी—प्रयत्न, खटपट, पराकाष्ठा.
आणी—टोंक, अग्र.

आतळणें—जवळ येणें, शिवणें, स्पर्श करणें.
आतुडणें—सांपडणें, प्राप्त होणें.
आथिलें—असलेलें.
आदा—जमा, उत्पन्न.
आन—अन्य, दुसरा.
आपसया—आपोआप.
आपैतें—आपोआप, ऐतें.
आयणी—तत्त्वनिर्णयेच्छा.
आरणें—उत्सुक अ. अधीर होणें. २ ओरडणें.
आरथ अ. आरथ किंवा आर्त—(३८२२—३).
आरंधे—दुःखाचा कोलाहल.
आराइणें—अनुकूल असणें.
आराणूक—शांति, सौख्य, उसंत.
आराला—उत्सुक झालेला.
आरालिया—आराधिल्या ?
आरुष—आर्ष, अडाणी.
आरोगणें—भक्षणें.
आर्त—उत्कट इच्छा.
आर्थ—मार्गणें.
आलगट—अल्लड, हूड, अडाणी.
आवारा—खटाटोप.
आवर्त—भोंवरा.
आविस—आमिष.
आसडा—अंगास एकाएकीं हिसका बसतो तो व त्यानंतर होणारें दुःख.
आहाकटा—गडबड, ओरड, आक्रोश.
आहाच—वरवर.
आहाचपण—वरवरची कृति.
आहाचवाहाच—सामान्य. २ वरवर.
आळ अ. आळी—छंद, नाद, हट्ट.
आळवण—विनवणें.
आळिकर—छांदिष्ट.

उ.

उखती—अवघा.
उखर—खडबडीत.
उखितों अ. उखतों—अवघे. २ उदासीन.
उगटिलें—वाईट.
उगलें—उगें, व्यर्थ. २ दुसरें. ३ शांत.
उगवणें—उकलणें, सोडवणें.
उगळणें,—ओंकणें. २ माघारा घेणें.
उगाणा—सर्व दोष व पापें आपणावर घेऊन केलेली सोडवणूक. २ गणना.
उगिया—रिकामा, फुकटचा.
उजगरा—जागरण. २ उशीर, विलंब.
उजरी—उदय, उत्कर्ष.
उदेशीं—उद्देशीं.
उदैजणें—उगवणें.
उद्वेग—उद्विग्नपणा, उदासीनपणा, अस्वस्थपणा.
उधानु—तीन. (नंदभाषा)
उन्मन—लीन.
उन्मनी—मनाची लीनता होते अशी पांचवी अवस्था.—१ जागृति, २ स्वप्न, ३ सुषुप्ति, ४ तुरीया, ५ उन्मनी—अशा एकंदर पांच अवस्था आहेत.
उन्मळित—उघडलेला.
उन्हवणी—ऊन पाणी.
उपणणें—झडपणें, पाखडणें.—धान्यांतील भूस, कोंडा इ० वाऱ्याच्या योगानें निराळें करण्याकरितां धान्य पाटींतून उंचावरून खालीं ओतणें.
उपेग—उपयोग.
उबग—कंटाळा, त्रास.
उभारा—स्थिरता, स्तिमितपणा.
उमस—अवकाश, उसंत. २ विस्तार. ३ उद्भव.
उमानें—उमजणें.
उरी—बाकी; ठाव, स्थिति.
उल्लंघ—उल्लंघणें. २ उल्लंघणारा.
उसंतणें—शेवटास नेणें, आटोपणें.

उसाळणें—हर्षविणें.
उसाळी—हर्षवितें.

ऊ.

ऊर्मी—मनाचे तरंग.

ऋ.

ऋणिया—ऋणकरी, देणेदार.

ए.

एकावळी—एकेरा हार.
एकीसवा—एके ठिकाणीं.
एक्याच—उग्याच, न बोलतां, स्तब्धपणें.

औ.

औट—साडेतीन (३॥.)
औठडें—औटपीठ—४ स्थान. (त्रिकूट, श्रियांट, गोलाट, औटपीठ.) हीं महाकारणस्थानें.

क.

कंकर—खडा. २ निखारा.
कडविड—खिडुकमिडूक, रजगीबिजगी (सोन्याची, रुप्याची इ०.)
कडसणी—विचार.
कणव—करुणा.
कंदु—कांदा.
कप—कापूस अथवा त्यासारखा जलद पेटणारा पदार्थ.
कपाट देणें—दार लावणें, बंद करणें.
करवाडें—कडवा.
करमर—शस्त्रविशेष.
करमुर—कळा.
करवडी अ. करवंडी—पोटाची खांच. अतिक्षुधा लागली असतां "करवड वाळली" असें म्हणतात.
कर्णधार—नावाडी.
कर्दळी—केळ.
कलवड अ. कलवडु—गोवऱ्यांचा ढीग रचून त्याजवर लिंपण घालून ठेवतात तो. २ डेरे वगैरे मडक्यांचें लिंपण.
कल्पणें—वाटणें.
कव—मिठी, वेंग.
कवळ—काविळीनें डोळ्यांवर पिवळेपणा येतो तो. २ ग्रास.
कवळणें—घास घालणें. २ कृपा करणें.
कळस—शेवट. २ कलश.
कळह—कलह, भांडण.
कळांतर—व्याज.
कळी—खडा.
कांचवटी—कांच.
काचाकुची—काचकूच.
काचें—कच्चें.
काट—मळ.
कांटवण—कांट्रेवन, कांटेरान.
काटी—वीस. (नंदभाषा.)
कानकोंडें—चोरटें.
कानवडें—एका आंगावरलें, वांकडें.
कापडी—यात्रेकरू, निशाण घेऊन नेहमी वाऱ्या करणारा.
कामारी—सेवक, चाकर.
कामावणें—कमावणें.
कारियाची—कार्याची.
कालाबूल अ. कालाबुली—कासावीस.
काव्हविणें—त्रासविणें, चिडविणें.
काहाळा—वाद्यविशेष.
काहो—घोष.
काळोसा—काळोख.
किरव्या—(३९६९—४).
कीर—खचीत, निश्चयात्मक.
कुकारा—मोठी हाक, हरळी.
कुंकड अ. कुंकड—कोणीकडें.
कुंचा—मोरचल.

कुची—कुकट (गल्लीकुचीचें.)
कुंच्या—खांचा (भोवऱ्यानें भोवऱ्यास पाडतात त्या,) गुच्चे.
कुटीमेटी—घरदार.
कुठावा, कुंडोवा, कुढावा—रक्षण. २ भिंत.
कुठोरा—दुसरा.
कुठोरि—कोठवर.
कुडी—कपट्टी, वांकडी.
कुडें—वक्र, हेवेखोर, वाईट.
कुढणें—मनातल्यामनांत जळणें.
कुलाकुड—वाईट लांकूड.
कुश्चळ अ कुश्चिळ—कुत्सित, घाणेरें, मलीन.
कुसरी—कुशळता, कौशल्य.
कुळवणी—कोळवणी.
कुळीक—अजीर्ण.
कूट—निंदा. कूट खाणें=निंदा करणें.
केजें—धान्य. २ नारळ.
केवा—पाड, धोरी.
केळवणें—केळवण—लग्नाच्या पूर्वींची मेजवानी घेणें, मिरवणें.
कैवाड अ. कैवाडें—कारस्थान, युक्ति, तजवीज. २ धीर, अवसान.
कोड—कौतुक, आवड.
कोडिसवाणें—मौजेचें, गोजिरवाणें.
कोप—झोंपडी.
कोंपट—घर, झोंपडी.
कोवसा—आश्रय, आधार.
क्याला अ. क्याल्या—कां.
क्रमणें—मरणें, जाणें.

ख.

खंड—मक्ता, ठराव.
खत—व्रण, खवंद, क्षत.
खतेला—खचलेला, भरलेला.
खद्योत—काजवा.
खलेती—जीत अर्ज अथवा पत्र घालतात ती थैली.
खळ—छंद, नाद.
खाई—छाया.
खाण अ. खाणें—ठिकाण, स्थान. २ वस्ती, मुक्काम. ३ भक्ष्य, जेवणखाण.
खाणोरा—खादाड, खाणचोर
खातड—खातेरांत राहणारा.
खान—खानचोर, खणती लावून चोरी करणारा.
खालें—खालीं.
खीरम्या—(३९०६—२.)
खुडा—अवयव आंखडलेला.
खेदी—दुःख देई.
खेवलें—जडलेलें.
खोंकर—मोडकळीस आलेलें, फुटकें.
खोडणें—वाईट चाल—खोडी लागणें.
खोडावणें—खोडाविडी होऊन पडणें, लुळा होऊन पडणें.
खोळ—गुह्य.
खौसा—खिसमतगार.

ग.

गडसंद—अडचण, कचाटी, पेंच.
गदा—एक आयुध, हत्यार.
गदारोळ—मोठी गर्जना. २ पांडित्य, निरूपण.
गभस्ति—सूर्य.
गरुडटका—गरुड अग्रभागीं असलेला. २ पताका
गवांदी—अन्नसत्र.
गव्हान—गव्हाण. २ पांगळ्याच्या हातांतील टेंकण. ३ गावानें.
गहिला—वेडा.
गांजिवा—जाळें पिशवीऐवजी.
गाठचोळ—आंतल्या गांठीचा, कपटी.
गांडमणी—गुह्य.

गांढा—दुर्बळ, नपुंसक, गांडू.
गादणें—मळणें; पीडावणें.
गांवढळ अ. गांवढाळ—अडाणी.
गिऱ्हे—गरीब.
गुज—गुह्य, गुप्तगोष्ट.
गुंडगे—(३१७३—ध्रु.)
गुढार—लमाण, डोंबारी, वैदू, कोल्हांटी यांच्या चटयांच्या झोंपड्या. २ हौदा, अंबारी. ३ गूढ.
गुढी—ध्वज, पताक.
गुंत } —गुंता, घोटाळा.
गुंती }
गुपणें अ. गुंफणें—जुळणी करणें, रचणें. २ गुंतणें.
गुमान—अभिमान, अहंकार. २ पर्वा.
गेठा—गळ्यांतला एक दागिना.
गोठी—गोष्टी.
गोमटा—सुंदर, चांगला.
गोरवें—गौरवानें.
गोरांजन—नर किंवा नारी ईश्वरप्रीत्यर्थ आपणास जाळून घेतात त्या साधनाचें नांव.
गोऱ्हवाडी—गुखाडी.
गोवळा—गवळी. २ भूत.
गोवा—गोंधळ, घोटाळा.
गोवार—शेणखळा.
गोही अ. ग्वाही—साक्षी, साक्षीची जबानी.
ग्यानगड—ज्ञानाचे गड.

घ.

घडी—(३१७३—ध्रु.)
घमंडी—पुष्कळपणा, वैपुल्य.
घराचारी—गृहस्थाश्रमी, घरंदाज.
घायवटा—जखम.
घालन—धोंका, संकट. घालणीचें रान ह्म० धोक्याचें—संकटाचें—चोराचें—रान.
घुमरी—पुष्कळ, ओतप्रोत.
घुसमांडणें—श्वास कोंडणें, कोंडमारा करणें.
घुळी—पोळ, सांड.
घोगें—पोटें. २ घबाड.
घोंघाणिया—घामट बायको.
घोणे—(३८८—३.)

च.

चपणी—(२२९३—१).
चपे—सांदीस.
चपेट—झपाटा; सपाटा.
चपेटा—झपाटा.
चर्मक—चांभार.
चर्या—तऱ्हा, प्रकार.
चाकाटणें—चकित होणें.
चांग—चांगला.
चाचें—चलाखें, चपल, चंचल.
चाट—बडबड्या, बहुभाष.
चाटू—सैपाकाची पळी.
चाम—चामडें, चर्म.
चार—उपचार.
चार—चारी वेद.
चावटी—वाचाळपणा.
चिकरणें अ. विकरणें—विखरणें.
चिंतवनीं—चिंतावनांत.
चितांक अ. चितांग—बायकांच्या गळ्यांतला एक दागिना.
चितावणें—चिंतेत पडणें.
चिरा—धोंडा, दगड. उदाहरण, घालूं जीवपणा चिरा ह्म० जीवपणावर धोंडा घालूं, ह्मणजे तें नाहींसें करूं.
चिनचिनी अ. चिणचिणी—रात्रीं चिनचिन असें ओरडणारा प्राणी, रात्र.
चुंभळ—चोंवडें. २ आशाळभूत.
चेइणें—चेतणें, चैतन्यरूपें व्यापार करणें. २ चेष्टा करणें.

चेडा—चेटक.
चेत—चित्त.
चेवणें—चालू होणें. २ चालू करणें.
चोखटा—चांगला.
चोखडा—चोख, चांगला.
चोजवणें—चकित करणें. २ मोठ्या उल्हासानें करणें इ०.
चोपडू—लोणी वगैरे चोपडलेला पदार्थ.
चोहटा—चवाठा.
चौघाचार—चौघांत न्याय, पंचाईत.
चौबार—चवाठा.

ज.

जति—यति, अवसान. २ बौद्धपंथी यति. ४ संन्यासी.
जती—शक्ति, अधिकार. २ जत्रा.
जनाचार—पंचाईत.
जमतीं अ. जेमतीं—(२२७६—३).
जमान—जामीन.
जयेजत—जये (जेव्हां) जत (अद्वैत) ?
जरजर—जीर्ण वस्त्र, फाटकें तुटकें वस्त्र.
जवाळिके—जवळ, समीप.
जाडा—झाडा.
जार—गर्भवेष्टन.
जाहाती—जुलूम, जास्ती.
जाळी—(२०१—३.)
जिव्हार—अंतःकरण. २ बीज. ३ मर्म.
जीणें—वांचणें.
जुग—युग.
जुंझार अ. झुंजार—योद्धा, पराक्रमी.
जुंतणें—जुंपणें.
जुंती—जुंपणी.
जेंगट—वाद्यविशेष.
जेठी—पहिलवान, मल्ल.
जेवा—जेवण.
जोड अ. जोडी—संपादणी.
जोतिला—जोडला.
जोहर—अग्नि, आग.
जोहारणें—नमणें, जोहार करणें.
ज्यालेंपण—जिवंतपण, जन्म.

झ.

झकणें—चकित होणें, फसणें.
झड—झडप.
झणी—झटकन, लवकर. २ कदाचित्, नाहीं तर.
झळई—मृगजळ. २ उष्णता.
झळंधा—(१८६५—ध्रु)
झांसा—दहशत, धास्ती.
झोंटि—केश, शेंडी.

ट.

टकणें—शकणें, करूं शकणें.
टकळा—घोष.
टका—अग्रभाग.
टणक—मोठें.
टाकणें—मिळणें, पावणें, घडणें.
टाकी—कृति. २ आवड.
टांचणी—टंचाई, उणीव.
टांचर—जोड्याची टांच.
टांचें—टंचाई, तोटा. २ उणें.
टाहो—घोष, टकळी.
टेवा—ढब, डौल.
टोका—माप. २ काटा, ताजवा.
टोके—(१४५१—१.)
टोंके—(१७६७—२.)
टोप—युद्धाच्या वेळीं घालण्याचें शिरस्त्राण.

ठ.

ठकणें—ठकवणें, फसवणें.
ठाकण अ. ठाकणी—ठिकाण.
ठाडा—उभा.

ठाणमान—बांधा-रचना (शरीराची.) २ सुरेखपणा.
ठांवें—जागा, ठिकाण.
ठेंगा अं. ठेंग्या—सोडगें, काठी.
ठेणें—राहणें.
ठोंवरा—करलासुद्धां धान्य.
ठोंबा—दांडू, टिकोरें.

ड.

डवळा—(४०१६—१.)
डसवणें—चिकटावणें, तादात्म्य करून टाकणें
डाईं—द्वेषीं, शहांत, गोत्यांत.
डांक—एक वाद्य. (खुनाचा पत्ता न लागेसा झाला ह्मणजे कुंभार ही डांक वाजिवतो. ह्मणजे खून आंगास येतो व खुनाची हकीकत सांगतो असा कोठें समज आहे.)
डांग—काठी.
डाय—द्वेष, अकस.
डाव—डाग (लोखंड तापवून दिलेला.)
डाळे—(२२८५—२.)
डिंगर—मूल, लेंकरूं.
डिवणें—उपद्रव-इजा देणें, मारणें.
डिवी—मारकट.
डेंगा—ढ, जड.
डोवड—ह्मसरूं. लाक्षणिक खंदक, दिवा इ०.
डोहणा—टोमणा, ठोसरा. २ विघ्न, आडकाठी.
डौरणें—सजणें, शोभणें.

ढ.

ढवळार—हवेली, टोलेमंग इमारत.
ढाळ—रीति, चाल.
ढाळणें—झाडणें, हालवणें.
ढिसाळ—उंच.
ढुंग—ढुंगण.

त.

तजणें—त्याग करणें.
तट—तक्रावंत, अंतर; प्रतरणा. २ भांडण.
तंट—बोभाटा, हकाटा; प्रख्याति.
तडताथवड—ताबडतोब, तात्काळ.
तन—तृण, रानझाड, गवत.
ताकट—घामट, ओखट.
ताकपिरें—ताक पिणारीं, ताकट, घामट.
ताटस्थ—तटस्थ.
तानें—बच्चा, तान्हेंबाळ.
तापटणें—थापटणें.
तारातीर—ताडातोड, त्रिस्थळी.
ताळी—देहसत्यत्व.
तिमाणें—शेतांतील माणसाच्या आकृतीचें बुजगावणें.
तिळतांदळा—सर्वांशीं मिळून चालणारा, मनमिळावू.
तुक—तोल, वजन, महत्त्व.
तुटी—तूट, तुटणूक.
तुरतुरा—झपाट्याचा.
तूर—वाजंत्रें.
तेग—(४६३—४)
तेजी—पाणीदार घोडा.
तोंडक—भांडण. २ भांडखोर.
तोडर—तोडा, वाळा.
तों यें—(६३०—५.)
तोरड—साखळी-तोरडी घालणें म्ह. जिंकून कबजांत-ताब्यांत ठेवणें.
त्राहाविलीं—त्रासविलेलीं.
त्रिपुटी—ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान; ध्येय, ध्याता, ध्यान; इत्यादि त्रितय.
त्रिमिर—तिमिर, अंधार.

थ.

थकित—थक्क झालेला.
थडवा—अल्पजलाशय.
थाटी—जमाव, मंडळी, थवा.

थार—आश्रय.
थिंकणें—खेद-दुःख करणें.
थिता अ. थीता—वांयां.
थिल्लर—डबकें.
थीत—वांयां.
थुलिया— (३३८३—१).
थेटें—शैत्य.
थोकडा—लहान, लघु
थोंट—दांडगा, हरामी, गुलाम.

द.

दंडणें—सजणें.
दंदी—वादी, द्वेषी.
दमामा—मोरचा.
दरकूट—(३९५३—१).
दर्दुर—बेडूक.
दसडी अ. दसोडी—दशी.
दाढीसी—(७९१—४).
दादुला—नवरा.
दारवंटा—उंबरठा.
दिठी—दृष्टि.
दिंडी—एक तंतुवाद्य.
दिवसें—कणकेचा एक पदार्थ विशेष.
दी—दिवस; उदा० सात दी=सात दिवस, दोन दी=दोन दिवस.
दुचाळा—कातरी, चिमटा, दोन टोंकांचें हत्यार.
दुडी—घागर.
दुणवणी—दुप्पट करणें.
दुधाणी—दुध तापवण्याचें भांडें. २ दुभत्याचें भांडें.
दुम—धुमें.
दुमाला—पिछाडी. २ पाठ.
दुलड—गळ्यांतला दागिना.
दुश्चित—दुःखी, खिन्न.
दुव्हें—दुपट.
देखणा—पाहणारा.
देखी—देखणें, दृष्टि, अवलोकन.
देखीचा—ज्ञानाचा, विचाराचा.
देखोवेखी—पाहून.
देवलसी—देवपिसा.
देवाईल—देऊळ, देवालय.
देहाडा—देह.
दो—दोन. उदा० दो पाहारा=दोन प्रहरा.
दोमदोम—भिक्षेच्या वगैरे वेळीं फकीर लोकांच्या म्हणण्यांत हा शब्द येत असतो.
दोरा—एक दागिना, सुताच्या वाकी कंगण्या वगैरे.

ध.

धगी—धग, आग, उष्णता.
धडफुडा—खरा. २ खरोखरी.
धडफुडी अ. धडफाडी—धड फाडणारी. २ खरोखरी.
धण अ. धणी—समाधान, तृप्ति, भर, पूर्ति.
धदंधंद—सोंगें, ढव, ढंग.
धसा—कुटाळ, मूर्ख.
धाटे—दाटे.
धाणें—तृप्त-संतुष्ट होणें.
धाय—हंबरडा.
धारण—घुसळखांबा. मुख्यखांब (जमिनीपासून आढ्यापर्यंत पोंचणारा.)
धाव—बीळ, गुहा.
धिंग—धूम, ओतप्रोत, गजरधूम.
धिंद—धिंडवडा.
धिंदधिंद—डांगोरा, जघन्य; प्रसिद्धि.
धीर—अवकाश, विलंब.
धुडका—धडकी.
धुडवणी—पोकळ, डौलाच्या, वायचळ.
धुनी—धुणारी, नदी.

धेंडें—पोकळ अवडंबर.

न.

नंदुली—नणंद.
नल्हाचि (नलाहाची)—लाहाणें पाहा.
नळी—नरडी, मान.
नागर—रम्य, सुंदर.
नागवणें अ. नांगवणें—नाटोपणें, अनावर होणें.
नागीवा—नागवा, उघडा.
नाटक—नाटकी, खेळ करणारा.
नाड—विघ्न, अडचण, नड.
नाडियें—नक्रें.
नाड्या—नक्रास.
नाथणें—पीडा देणें, खोड मोडणें.
नांद्या—नंदी बैल, मूर्ख.
नाहो—नवरा.
निउल अ. नेउले—(५०५—ध्रु.)
निकी—नेटकी, चांगली, खरी.
निकुर—निश्चय.
निगुती—निभ्रांत, खास, निःसंशय.
निगुरा—ज्यानें गुरु केला नाहीं तो.
निघोंट—सघन, परिपूर्ण.
निडळ } —केवळ. २ कपाळ.
निढळ }
निडारणें— भरून येणें.
नित—नित्य.
निदसुरा—झोंपेच्या धुंदींत असलेला.
निधाई—धन्य, कृतकृत्य.
निपट—अगदीं.
निपराध—दुष्ट, नीच.
निपराधी—निरुपयोगी, अप्रयोजक.
निंब देणें—तुच्छ करणें. दोष देणें.
निरंजन—प्रकाशरूप.
निरय—नरक.
निरवणें—सोंपवणें, हवालणें.
निरसणें—नाहींसें करणें, निस्तारणें.
निरांजणें—त्रासणें, वैतागणें.
निरुतें—खरें, निश्चित.
निरें—निखालस, शुद्ध, निर्मळ.
निर्वाण—अंत.
निर्वाळा—निवाडा.
निष्टंक—खचीत, निःसंशय.
निसुग—निर्लज्ज, निलाजरा.
निसुर—निखालस, निश्चित.
निक्षेपणें—ठेव ठेवणें, पुरून ठेवणें (द्रव्य.)
नीस—निवड, पृथक्करण.
नुधवा—न+उधवा=(उधवणें, वर करणें, उचलणें.)
नेट्यां—नेटानें?
नेपुर—नूपुर, पैंजण, तोरड्या.
नेवरा—खूर, नखी.
नैश्वर्य—नाशवंत.
न्याहाल्या—गाद्या, गिरद्या इ०.

प.

पग—पाऊल, पाय. २ पावलाची खूण.
पच—पचन; संवय.
पटंगा—आस्रा.
पटे—पट, वस्त्र.
पडदळ—तरवार अडकावण्याचा पट्टा. २ सामान.
पडिपाडें—सारखेपणें.
पडिभर—मोठेपणा, डौल. २ आसक्ति.
पढियंता—आवडता.
पढिये—आवडीचा, आवडेलसा.
पतंग—तांबूस रंगाचें एक लांकूड. २ पाखरूं.
परताप—दक्षिणा. २ प्रताप.
परमाई—वीरमू, वीरजननी.
परवडी—चातुर्यानें. २ प्रकार.
परावा—परका.

परावी, पराविया—परकी, परक्या.
परावें—परकें.
पराश्रम—दुसऱ्याचा आश्रम.
परियेळ—परळ, ताटली, तबक.
पहुडणें—पडणें, निजणें.
पव्हे—पाणपोवई, पाणसत्र.
पाईक—सेवक (मोठ्या इदबाराचा), अत्यंत विश्वासू व हुशार चाकर.
पाइकी—सेवकपणा.
पांकुळणें—शिथिल होणें, विस्कळणें, सईल होणें, फुटणें.
पाख—शुद्ध, स्वच्छ.
पाखर—कृपा. २ गाय, म्हैस यांचे दोन स्तन.
पांग—पराधीनपणा.
पांगणें—पराधीन होणें. २ पसरणें.
पागोरा—झाडाच्या मुळ्यांचीं बारीक मुळें.
पाठोवाठी—पाठोपाठ.
पाठचेळ—ओढ्याचें जनावर, ओझील.
पाडेवार—महार.
पाणचोरा—भोंकाचा घट, मडकें.
पाणोवाणी—पाठोपाठ.
पातेजणें—विश्वासणें.
पातेरा—झाडाचा गळलेला व वाळलेला पाला.
पाधाणी—अडाणी वायका.
पानसरा—आडवा.
पानेडी—पाना+आड. २ फानदी.
पान्हेरी—पोवई.
पापरी—लात.
पाबळीं—तिरीं.
पायरिका—पायरीच्या.
पायवणी—पायाचें पाणी (तीर्थ.)
पारुषणें—सोडणें, तुच्छ करणें.
पान्हेरा—संगत.
पास—पसंत. २ स्वच्छ.
पाहुनर अ. पाहुणेर—पाहुणचार.
पिटणें अ. पिडणें—दुःख-त्रास देणें.
पिटपिट—चिरचिर, टुरटुर.
पिलंगणें—पुढें पुढें धांवणें. २ कोणतीही क्रिया हळू हळू करणें.
पिशवी—गोमुखी.
पिशुन—चाहाड, दुष्ट.
पुंजाळणें—परिपक्वज्ञानभक्तीच्या योगानें नेत्र तेजावून गंभीर दिसणें.
पुट—प्रकार, रूपांतर.
पुंड्र—नाम (कपाळीं लावलेला.)
पुनस्कार—पुरस्कार.
पुरलासाटीं—भोगासाटीं, चैनीसाटीं.
पुस अ. पुंस—पुच्छ, शेपुट.
पेटे—(१२६५—२.)
पेठवणी—पाठवणी-बिदागी मागणें.
पेडखान—(१२३६—२.)
पेंढा—जोंधळे अ. भातेण यापासून काढलेली दारू.
पेणा अ. पेंणें—मुक्काम, वस्ती.
पेणावणें—उठवणीस येणें.
पेसपाड—पेंचपांच. २ तिखटमीठ.
पैल—पलीकडे.
पोभाळणें—चोळणें, घासणें.
पोरवडा—अव्यवस्था, घोटाळा.
प्रजी—(१०७१—१.)
प्रताप—दक्षिणा.

फ.

फका—एखादा पदार्थ तोंडभर.—पिठाचे फके, पोह्यांचे फके (मारणें.)
फटकाळ—वाईट, दुष्ट.
फटमर—गांढ्या, भित्रा, पळपुट्या.
फटमरें—गांढेपणाचें.
फडी—निकाल, उलगडा, फाड.

फलकट—फोलकट, पोकळ.
फांजी—आडफाटा, हरकत, अडचण.
फांदा—संकट, घोटाळा, गोता.
फावणें—साधणें, मिळणें, हातीं लागणें, चालणें.
फांसावणें—समजणें, उमजणें.
फिका—निस्तेज; विनहुशिली.
फिरंगी—तरवार, तिखें.
फुंज—अभिमान.
फुंदणें—डौल—गर्व करणें.
फुदी—स्त्रीचें जननेंद्रिय.
फुलवरा—माळ, गजरा.
फोडी—कौडी. २ खांड (सुपारिचें वगैरे.)

ब.

बंदखाणी—बंदीखाना.
बदराही—(२४—३. पंढरपुच्या प्रतींतलें शेवटचे ३७ अभंग आहेत त्यांपैकीं.)
बरग—एका प्रकारचें बीज.
बरवंट—चांगला, सुंदर.
बरवया—बरवा याचें रूप, सुंदर, सुरूप.
बराडी—आशाळभूत, दुकाळलेला.
बहिरवास—बाहेर वास.
बहुडविणें—मागें लावून देणें, जिकडच्या तिकडे धाडणें.
बहुडा—मोठा.
बळरया—बळाची योग्यता.
बळियाढा—बळकट निश्चयाचा, दृढनिश्चयी.
बाखर—पुरण (गुळखोबरें अथवा गुळ, साखर यांचें करंज्या वगैरेंत घालतात तें.)
बाजागिरी अ. बाजीगेरी—गारूडविद्या, हातचलाखी, गौडबंगाली विद्या.
बांडा—कांहीं काळा व कांहीं पांढरा या दोन रंगांचा.
बांदवडी } —बंदी.
बांदोडी }
बाधिका—भ्रांति. २ बाधणारी.
बापुला—बाप.
बार—बारी, पाळी. २ घोष, हव्यास.
बालिस्ट—लोड, उशी, तक्या.
बारस—(२९२१—१).
बासणें—चालणें.
बासर—शिळें अन्न. २ रिकामटवळा, उनाड. ३ व्यर्थ.
बिडवई—श्रेष्ठ, हितकर्ता.
बिढार—बिऱ्हाड.
बिदी—गल्ली, रस्ता.
बुच्या—निर्लज्ज, मूर्ख.
बुझावणें—समजावणें.
बुंध्री—घुंगट, बुरखा. २ घुंगट जुरखा ज्याचा घेतात तें वस्त्र.
बुनादीचें—अनादिकाळचें, बहुतां दिवसांचें.
बुर—भुस्सा (काढणें.)
बेंबळ—ढिला.
बेरसा—विचारशून्य, दांडगा.
बोटवरी—बोटावर.
बोनें—नैवेद्य, बळी.
बोभा—हाका, बोंबा.
बोहरी—राखरांगोळी, नाश, क्षय.
बोळावा—सोवती.

भ

भकांद्या—कुचेष्टा, निंदा.
भंडभंड—निरर्थक वाग्जल्प, रिकामी बडबड.
भरोवरी—सामग्री, श्रम.
भवतारिया—भवतारक.
भाकणें—मागणें, दीनवाणीनें विनवणें.
भाज—भार्या, बायको.
भांजिलीखांजणी—क्षयवृद्धि.
भाटवोळीपणा—बडबड.
भांड—बहुभाष, भिक्षेनें पोट भरणारा.

भांडाई—भांडखोरपणा.
भांण—ताट, पात्र.
भातुकें—खाजें, खाऊ.
भातें—मजुरी.
भार—समुदाय, जमाव.
भावणें—भावना करणें, कल्पिणें.
भांस अ. भासी—भाताचा कोंडा, करलें.
भिंगुळवाणें—भयानक, भयंकर, उदासवाणी.
भेव—भय.
भोज—आवड.
भोत—सर्वांगाचें कातडें काढल्यावर राहते ती आकृति. २ वाईट भाग.
भोरडी—एक पक्षी, क्रौंचपक्षी, करकोचा.
भोवरी—बुगडी.

म.

मठारे—ढोंगी साधु.
मंडण—भूषण.
मतोळा—हीण, घोटाळा; घाला.
मंदला—स्वस्त झाला, भाव उतरला.
मदार—मुसलमानाचें थडगें.
मनणें—मानणें.
मरो—मरण.
मवणें—मोजणें.
मविता—मोजणारा.
मवेश—मायेश.
महजर—हुकूम, सनद.
माखणें—(३२९८—ध्रु.)
माजिरा—माजोरी, उन्मत्त.
माजिरें—माज, धुंदी.
माट—मंद.
माती—देह (अलंकारिक.)
मात्रा—वासनांचे विषय.
माथुलिया—मडकी.
मादळा—मृदंग.
मांदें—समुदाय, मेळा.
मापणें—मोजणें, गणणें.
मारगेली—मार (वांयां) गेली.
माव—माया.
माविकणें—मोल पावणें.
मिनणें—मिळणें, एकत्व पावणें.
मीनती—वियोग.
मुडतर—दैन्य, दुःख, दास्य.
मुडताळणें—वळणें, लवलवणें.
मुडा—पंगु, कुब्ज.
मुरहाळी अ. मुळहारी—बोलावणें, बोलावणारा.
मुसाफा—मुसलमानाचे धर्मग्रंथ.
मुसावणें—ओतप्रोत-पूर्णपणें भरणें.
मूळ—बोलावणें, आमंत्रण.
मूळडाळ—मूळपाळ.
मूळवंद—आरंभींचा वंद, पहिला वंद.
मोटचौफळ—(३७३७—२.)
मोकट अ. मोकटा—मोकळा, अनर्गळ.
मोकळ—निकामा, निरुद्योगी.
मोड अ. मोडी. —आकार, पद्धत. २ गुंता, गोंधळ, घोटाळा.
मोहरी—वाद्य.
मोहोरणें—प्राप्त होणें, शिरणें.
मोळा—ओझें. २ रीत, रिवाज, चाल.
म्हणियारा—सेवक, दूत.
म्हणियें म्हणीयें —काम, कार्य.
म्हनेरा मनेरा मनेरी —मन (अलंकारिक). २ तगादा.
म्हैसवेल सुरकाडी—सुरकांडी.
म्हैसा—रेडा.

य.

याति—जाति, ज्ञात.

यारी—निकट मित्रता.
यावा—उदय, प्राप्ति.
येसणार—अगत्य.
येह—इह, ह्यां.

र.

रंग—वर्ण.
रजा—कामवासना. २ रजोगुणाची प्रेरणा.
रडारोवी—रडारड, आक्रोश.
रवडवणें—भरणें, वरवटणें. २ गुंतवून—जखडून घेणें (कामांत.)
रया—किंमत, योग्यता, पाड.
रस—भक्तिरस इ.
रहणी—रीत, चाल. २ ठिकाण.
रळपळ अ. रळफळ—घोटाळा, अव्यवस्था.
रळी—विनोद, थट्टा.
राई—(४५१३—२)
राऊळ—देऊळ.
रांडवडा—शिव्यागाळी.
रातणें—रमणें, रिझणें.
राहडी—राड, चिखलाची थिरविटी.
रींद—(३६६३—२)
रीस—रोष, क्रोध.
रूपडें—सुंदर रूप, साजिरें तोंड.
रेमट—लांबट गोष्ट.
रोटा—(३७०१—२)

ल.

लचाळ—मचाळ, हेंदरा.
लवलाहो—त्वरा.
लवी—लवन.
लहणें—रोकड. २ प्रीति, प्रेम.
लाइ अ. लै—बहुत, पुष्कळ.
लाखणीक—लाक्षणिक. २ दर्शनी.
लागपाठ—पाठलाग, त्वरा.
लागभाग—लागाबांधा.
लागवरी (? लागवडी)—गर्भधारणस्थिति.
लागवेग—अतित्वरा.
लागें—लागलेंच.
लाटें—मोठें.
लाडणें—लाडावणें.
लाडसा—(३७७३—ध्रु०)
लाणी—लावणी. २ मालमत्ता.
लादी—घडीव चीप.
लांस—डाग.
लांसें—डागानें, चिन्हानें.
लाहणें—पावणें—स होणें. उ. तो दंड लाहे=तो दंड पावतो किंवा त्यास दंड होतो.
लाहा—मोठा, लठ्ठ.
लाहाणें अ. ल्हाणें—पावणें.
लाहातें—चिरकाळचा लाभ.
लाहेंरास—(२९८८—ध्रु०)
लाहो—छंद, धोस्रा.
लुगडें—वस्त्र (सामान्यतः)
लुडा—लुळा.
लोकभांड—लोकांत पुष्कळ बोलून भिकेवर पोट भरणारा.
लोलिंगत—आसक्त, लंपट.
लोवाळ—पुष्कळ लोंकरीचा.

व.

वंचणें—वगळणें.
वजणें—जाणें.
वर—वार (प्रसवानंतर पडते ती.)
वरदळ—बाह्यरंग, दाखवण्याचा डौल, आच्छादन. २ हिणकट.
वरदळा—बाह्यात्कारें.
वरपडला—स्वाधीन झालेला.
वरपडा—गुंतलेला, कूळ, स्वाधीन झालेला.
वरळा अ. वरळें—फोल व धान्य यांचें मिश्रण. २ फोल. ३ दाणा.

वरावरी—वारीवारी.
वरो—वरव, पुष्कळ. २ वरी.
वहिली—चांगली.
वहिलें—लवकर.
वा—उवा. २ वाजविणें.
वाइला—वाजविला.
वाइलें—वाहिलें.
वाखणें—वांकणें, मित्रेपणानें स्वाधीन होणें.
वाखती—खोळ (घोंगडी वगैरेची.) २ ओटी. ३ पोटाची वखळ.
वाखर—एक प्रकारचा लोखंडाचा पदार्थ.
वाखा—वार्ता. २ दुःखें.
वागवरणें—वाणीनें बोलणें.
वाघुरा—वनांतलें पशु धरण्याचा सांपळा.
वाज—वृथा, व्यर्थ.
वाटुली—वाट.
वाड—वाट. २ थोर, मोठें.
वाडा—गुरांचा वाडा.
वाडेंकोडें—अत्यंत कौतुकानें.
वाण—वर्ण. २ माल, जिनसा.
वाणी—तोटा, वाण.
वादिलागें—(१४३४—४.)
वाधा अ. वाथ्या—गर्भाशय, पोट.
वान अ. वाण—जिन्नस, वस्तु.
वाय—वांयां, व्यर्थ.
वार—आवर.
वारणें—संपणें, आटोपणें.
वारिकें—वर बसणारें, स्वार.
वार्ता—खवर, ऐकीव वर्त्तमान.
वाला अ. वाल्हा—प्रिय, आवडता.
वाव—व्यर्थ, वांयां. २ थारा, आश्रय, रीग, मार्ग.
वावडणें—फडकणें, फडफडणें.
वावरणें—फिरणें, भटकणें.
वावसें—व्यर्थसें.
वास—वाट, मार्गप्रतीक्षा.
वासपणें—बरळणें, वडबडणें.
वासलाती—निकाल, फडशा.
वाह अ. वाहो—प्रवाह, प्रचार.
वाहाळ—ओढा.
वाही—मार्ग, कृति. २ भरोस.
वाळणें—वाळीत टाकणें.
विखळ—दुष्ट, वावगा.
विटवणें—कंटाळवणें.
विताळ—वेताळ.
विंदान—कौशल्य, शिताफी.
विध—विद्ध, फोडलेलें. २ विधि.
विनटणें—रंगून जाणें, मग्न होणें.
विव्हडणें—विवळणें, विव्हल होणें.
विल्हाळ—दुःखाच्या गोष्टी सांगणारा.
विल्हाळक—व्यर्थ, निष्कारण.
विवसी—काळजी, चेटकी-विघ्नकरणारी देवता.
विश्वामित्री—ह्लेस.
विषम—विरुद्ध, विलक्षण संकट.
विसंभणें—टाकून जाणें, सोडणें.
विळवणें—विवळणें.
वेटणें अ. वेठणें—वेढणें, वेष्टणें.
वेठी—(१३२३—१.)
वेथा—व्यथा, दुःख.
वेरसा—(४०४४—२)
वेवसाय अ. वेवसाव—व्यवसाय, व्यापार, धंदा, उदीम.
वेशी—मार्ग, आस्ता.
वेसन—व्यसन, नाद.
वेळाईत—कैवारी, साह्यकर्ता.
वैखरी—वाणी, स्पष्ट वाणी. चार प्रकारच्या वाणी (परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी अशा) आहेत त्यांतील शेवटची.
वैरागर—रत्नाकर, रत्नाची खाण.

वोगर—वाढपी.
वोगरणें—अन्न वाढणें, भोजन वाढणें.
वोज—स्वच्छता, चांगुलपण.
वोडवणें—प्राप्त होणें. २ प्राप्त करून घेणें.
वोढणें—नेसणें, पांघरणें.
वोरस—स्नेहभरित पान्हा. २ तसा पान्हा येणें.
वोल्हावणें—भिजणें. २ भारावणें.
वोसंग—मांडी.
वोसणणें—बरळणें, बडबडणें, स्वप्नांत बोलणें.
वोसपणें—कंटाळणें, त्रासणें, उबगणें.
वोळ—वळणें.
वोळगणा—सेवाधार.
वोळणें—वळणें.
वोळंब—खोटें, ढोंग. २ कौतुक.
वोळसा—नाद, चटक, व्यसन.
व्यंकट—वांकडचा (भ्रकुटी.)
व्याली—आई. (वीते ती)
व्यासी—व्यासकृति.

श.

शर्त—पाणी, पराक्रम, इभरत.
शादी—शाहीर, बहुरूपी.
शास्त—शासन.
शिराणी—उपभोग. २ अपूर्व नवल.
शीक—शिक्षा.
श्वपच—अंत्यज, चांडाल.

स.

संगणें—सांगणें.
सगर—अरुंद वाट.
संगीत—यथास्थित.
संडवणें—सोडवणें, सांडवणें.
सतंत—स्वतंत्र.
सती } —संतसंबंधी.
संती }
